त्याअर्थी आता, उक्त संहितेमधील तरतुदीच्या नियमांच्या आणि खालील शर्तींना अधिन राहून उपरोक्त जमिनीच्या धारकास सदर जमिनीवर, उक्त नमूद करण्यात आलेला अकृषिक वापर अनुज्ञेय करण्यात आल्याचे मानण्यात आल्याने उक्त संहितेच्या कलम ४२ब / ४२क / ४२ड अन्वये ही सनद देण्यात येत आहे.

१. वरीलप्रमाणे अनुज्ञेय केलेल्या अकृषिक वापरामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मंजूरीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.

२. जमिनीवर प्रत्यक्ष विकास अथवा बांधकाम सुरु करण्यापूर्वी सक्षम नियोजन प्राधिकरणाची विकास परवानगी घेणे आवश्यक राहिल.

३. जिल्हाधिकारी / नियोजन प्राधिकरण यांच्या मान्यतेने रेखांकन मंजूर केल्याशिवाय क्षेत्राची पोटविभागणी करता येणार नाही अथवा छोटे भूखंड करुन विक्री करता येणार नाही.

४. नियोजन प्राधिकरणाच्या मान्यतेने सदर जमिनीच्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास, त्याची माहिती अशा मंजूरीपासून ३० दिवसांच्या आत जिल्हाधिकारी यांना देणे बंधनकारक राहिल.

५. अकृषिक वापर अनुज्ञेय करण्याच्या या सनदेव्यतिरिक्त वित्तीय संस्था/ नियोजन प्राधिकरण यांनी इतर कोणत्याही स्वरुपातील बिन शेती आदेशाची मागणी करु नये.

(तहसिलदाराची मोहोर) **(तहसिलदाराची स्वाक्षरी)**

(तहसिलदाराचे नांव व पदनाम)

अकृषिक कराच्या आकारणीच्या वसूलीसंदर्भात शासनाची भूमिका ठरविण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती नियुक्ती करण्याबाबत".

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः एनएपी-२०२२/प्र.क्र.५०/ज-१ अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०६ जून,२०२२.

वाचा -

१. शासन परिपत्रक क्रमांक एनएपी-२०१५/प्र.क्र.४७/टी-१,दिनांक ०५/०२/२०१८
२. शासनाचे समक्रमांकाचे दिनांक ०७/०४/२०२२ चे पत्र

प्रस्तावना -

अकृषिक कर हा जमिनीवरील मुलभूत कर असून तो राज्याचा उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४५, ४२ तसेच कलम १०९ ते ११४ मधील तरतुदीनुसार अकृषिक वापर करण्यात येणा-या जमिनीच्या संदर्भात अकृषिक आकारणी करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. याकरिता महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापराचे रुपांतर व अकृषिक आकारणी) नियम १९६९ मध्ये तरतूदी करण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त तरतुदींनुसार अकृषिक वापरासाठी नागरी तसेच ग्रामीण भागाचे दर ठरविणे, सदर दरांचा हमी कालावधी ठरविणे, अकृषिक दर निश्चित करताना सदर दर निश्चित करण्याची कार्यपद्धतीचा उल्लेख उपरोक्त कलम व नियमांत करण्यात आलेला आहे.

उपरोक्त कायद्यातील व नियमांनुसार, अकृषिक वसूलीत दिलेली स्थगिती उठवण्याबाबत व सुधारित अकृषिक प्रमाणदराच्या आधारे, अकृषिक आकारणी करुन ती वसूल करण्या संदर्भात दिशानिर्देश निर्गमित करण्याबाबत संदर्भाधीन क्र.१ शासन परिपत्रक दिनांक ५ फेब्रुवारी २०१८ रोजी शासनाने निर्गमित केले. सदर परिपत्रकानुसार, साधारणपणे सन २००१ ते २००६ / २००६ ते २०११ / २०११ ते २०१६ / २०१६ ते २०२१ या हमी कालावधीत कशाप्रकारे अकृषिक दर निश्चित करुन बिनशेती सा-याची रक्कम आकारणी करावी, याबाबत क्षेत्रीय अधिका-यांना मार्गदर्शन करुन वसूल करण्याच्या अनुषंगाने सूचना देण्यात आल्या आहेत.

यानुसार, क्षेत्रीय स्तरावर संबंधित मिळकतधारकांना नोटीस देऊन अकृषिक कराच्या आकारणीची वसूली करण्यात येत होती. तथापि, सदर अकृषिक कर आकारणीच्या वसूलीचा सर्वसामान्य जनतेवर मोठया प्रमाणात बोजा पडत असल्याचे विधानसभेच्या सन २०२२ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनातील उपस्थित झालेल्या लक्षवेधी चर्चेच्या अनुषंगाने निदर्शनास आले आहे.

यानुषंगाने, संदर्भाधीन क्र.२ दिनांक ०७/०४/२०२२ च्या पत्रान्वये, सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे की, दिनांक ५ फेब्रुवारी, २०१८ च्या शासन परिपत्रकात नमूद केलेल्या

दिशानिर्देशाप्रमाणे क्षेत्रीय स्तरावर करण्यात येणाऱ्या अकृषिक कराच्या आकारणीच्या वसूलीस पुढील आदेश होईपर्यंत याद्वारे तात्पुरती स्थगिती देण्यात येत आहे.तसेच यानुषंगाने सक्तीच्या वसुलीसंदर्भात केलेली कार्यवाही थांबविण्यात यावी.

या पार्श्वभूमीवर अकृषिक कराचे दर व दरानुसार आकारणी यावर फेरविचार करण्यासाठी एक अभ्यास समिती नियुक्त करुन शासनास योग्य शिफारस करण्याकरीता अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती नेमण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

राज्यात सुधारित अकृषिक प्रमाणदराच्या आधारे, अकृषिक आकारणीच्या वसूलीस देण्यात आलेली स्थगिती उठविण्याबाबत व त्यासंदर्भात करावयाच्या अनुषंगिक अंमलबजावणीत सुसूत्रता आणण्याकरिता सर्वकष अभ्यास करुन शासनास योग्य शिफारस करण्याकरीता अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे अभ्यास समिती गठित करण्यात येत आहे.

अ.क्र.	समिती रचना व पदनाम	पद
१	अपर मुख्य सचिव (महसूल)	अध्यक्ष
२	जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे	सदस्य
३	विभागीय आयुक्त, नाशिक	सदस्य
४	विभागीय आयुक्त, कोकण	सदस्य
६	सह सचिव (ज-१अ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य सचिव

०२. सदर समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहिल:-

अ) शासन परिपत्रक, दिनांक ५ फेब्रुवारी,२०१८ मध्ये नमूद केलेल्या अकृषिक कराच्या मार्गदर्शन सूचनांबाबत फेरविचार करणे.

ब) सुधारित अकृषिक प्रमाणदर नव्याने निश्चित करणेबाबत विचार करणे.

क) अनुषंगिक बाबी विषयी शिफारशी करणे.

०२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०६०६१५४८४१९९१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAMESH SHIVAJI CHAVAN

Digitally signed by RAMESH SHIVAJI CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7ada4e8fa11566f3b9c9f7b5fa123945d54f8e3d5b09d05bedfa09b97ee45cad, pseudonym=8681E76138CFE5A3E889A80B442F95DD2288C273, serialNumber=EB458B05E05EE27F435BD399537405D44E1C88021CF038B060AC10B9D8FB8787, cn=RAMESH SHIVAJI CHAVAN
Date: 2022.06.06 15:50:15 +05'30'

(रमेश चव्हाण)
सह सचिव, महसूल व वन विभाग

प्रत,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,

बांधकाम परवानगी प्राप्त भूखंडावर स्वतंत्ररित्या अकृषिक परवानगीची आवश्यकता नसणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः एनएपी- २०२२/प्र.क्र.१०३/ज-१ अ

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक: २३ मे, २०२३

वाचा -

१. सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, दिनांक १५/०४/२०१७

२. शासन परिपत्रक क्रमांक एनएए-२०१७/प्र.क्र.११५/टी-१, दिनांक १९ /०८/२०१७

३. सन २०१८ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, दिनांक १७/०१/२०१८

४. शासन परिपत्रक क्रमांक एनएपी-२०१७/प्र.क्र.१४२/टी-१, दिनांक १४ /०३/२०१८

५. शासन परिपत्रक क्रमांक एनएपी-२०२१/प्र.क्र.११८/ज-१अ, दिनांक १३/०४/२०२२

प्रस्तावना -

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम-४२ अन्वये शेतीसाठी उपयोग करण्यात येणाऱ्या कोणत्याही जमिनीचा कोणत्याही अकृषिक प्रयोजनासाठी वापर करण्याकरिता किंवा एका अकृषिक प्रयोजनातून दुसऱ्या अकृषिक प्रयोजनासाठी वापर करण्याकरिता जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. त्यामध्ये सुधारणा करून प्रारुप अथवा अंतिम विकास योजनेमध्ये समाविष्ट केलेल्या क्षेत्रात स्थित असलेल्या जमिनीच्या वापरात बदल करण्यासाठी परवानगीची आवश्यकता नसणे, अंतिम विकास योजना क्षेत्रात तसेच प्रारूप अथवा अंतिम प्रादेशिक योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्या जमीनीकरिता जमीन वापराच्या मानीव रुपांतरणासाठी तरतूद आणि गावाच्या हद्दीपासून २०० मीटरच्या आतील परिघीय क्षेत्रात समाविष्ट जमीनीच्या निवासी प्रयोजनासाठी जमीन वापराच्या मानीव रुपांतरणाची तरतुद यासंदर्भात अनुक्रमे कलम- ४२ (अ), (ब), (क) आणि (ड) अन्वये सुधारणा करण्यात आल्या असून त्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करुन देण्यात आली आहे. तसेच संहितेच्या कलम ४४-अ अन्वये खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी जमीनीच्या वापरात बदल करण्यासाठी परवानगीची आवश्यकता नसल्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. या तरतुदींनुसार जमीनधारकांना मानीव अकृषिक वापराची सनद घेणे आवश्यक असून, त्याशिवाय स्वतंत्रपणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम,१९६६ च्या तरतुदींनुसार बांधकाम /विकसन परवानगी घेणे आवश्यक आहे. नागरीकांना बांधकाम करण्यासाठी दोन प्राधिकरणांकडे अर्ज करून कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. दोन्ही परवानग्या घेताना सहायक संचालक, नगररचना यांचे अभिप्राय घ्यावेच लागतात. त्यामुळे यांचे एकत्रीकरण करणे शक्य व आवश्यक आहे.

अशा बांधकाम / विकसन परवानग्या देण्यासाठी "बांधकाम परवानगी व्यवस्थापन प्रणाली" (BPMS- Building Plan Management System) ही ऑनलाईन प्रणाली वापरण्यात येत असून कार्यपध्दतीचे सुलभीकरण (Ease of Doing Business) करण्याच्या उद्देशाने अशा सर्व अकृषिक

परवानग्या/ अकृषिक वापराची सनद, बांधकाम / विकसन परवानगी या सर्व सेवा ऑनलाईन पध्दतीने व एकत्रितपणे देण्यासंदर्भात दिशानिर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदी अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याकडून एखाद्या जमिनीवर बांधकाम परवानगी अथवा रेखांकन मंजुरी देण्यात येत असताना अशा जमिनीमध्ये प्रस्तावित केलेला अकृषिक प्रयोजनाचा वापर अनुज्ञेय असल्याची खात्री केली जाते. म्हणजेच अशा जमिनींकरिता महाराष्ट्र जमीन संहिता, १९६६ च्या कलम ४२-अ, ४२-ब, ४२-क, ४२-ड किंवा ४४-अ अन्वये स्वतंत्रपणे अकृषिक परवानगी घेण्याची आवश्यकता नसल्याने किंवा त्या जमिनी अकृषिक वापरात रुपांतरित झाल्याचे मानण्यात येत असल्याने, अशा जमीनींबाबत सक्षम प्राधिकरणाने बांधकाम परवानगी दिल्यास संबंधित जमीनधारकास/ भूखंडधारकास /विकासकास स्वतंत्रपणे अकृषिक परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.

०२. उक्त जमीन भोगवटदार वर्ग-१ या धारणाधिकाराची असल्यास Building Plan Management System (BPMS) प्रणालीतच आवश्यकता असेल तिथे रुपांतर कर वसूल केला जाईल व विकास परवानगी सोबतच अकृषिक वापराची सनद निर्गमित करण्यात येईल. जमीन वर्ग-२ धारणाधिकाराची असल्यास, नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय रकमांची देणी इ. रकमांची परिगणना करण्यात यावी आणि सदर रकमांचा भरणा केल्यावर सक्षम महसूल अधिकारी यांनी तसे प्रमाणित केल्यानंतर Building Plan Management System (BPMS) यंत्रणेद्वारे विकास परवानगी देणे बंधनकारक राहील व अशा प्रकरणी सुध्दा वर नमूद केल्याप्रमाणे अकृषिक वापराची सनद सोबतच निर्गमित होईल. ही सनद System generated स्वरुपाची असेल व अशा सर्व प्रकरणांमध्ये सनदेची एक प्रत electronically गाव दप्तरात नोंद घेण्यासाठी जाईल व पुढे नियमित देय अकृषिक सारा भरणे परवानगी घेणाऱ्यावर बंधनकारक राहील.

०३. याची नोंद सर्व संबंधित शासकीय विभाग /वित्तीय संस्था इत्यादी यांनी घ्यावी.

०४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०५२३१८३५४७३३१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHILPA VINAY PATWARDHAN

Digitally signed by SHILPA VINAY PATWARDHAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=505eeafe3f9e7d70f63a44a99a167a7b82f5f960e6935504b09176ad120d080e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2E5A83C1841FA4BC41727E7EBE9ACE8CE284A9564CBC908352616154B5CA485D, cn=SHILPA VINAY PATWARDHAN
Date: 2023.05.23 18:36:32 +05'30'

(शिल्पा पटवर्धन)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

(१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,

(२) मा.मुख्यमंत्री याचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,

(३) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत जमिनीस/ भूखंडास आवश्यक असलेल्या अकृषिक परवानगीसंदर्भात दिशानिर्देश देण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः एनएपी- २०२३/प्र.क्र.६४ /ज-१ अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १३ मार्च,२०२४

वाचा -

१.सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, दिनांक १५/०४/२०१७

२.शासन परिपत्रक क्रमांक एनएए-२०१७/प्र.क्र.११५/टी-१, दिनांक १९ /०८/२०१७

३.सन २०१८ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, दिनांक १७/०१/२०१८

४.शासन परिपत्रक क्रमांक एनएपी-२०१७/प्र.क्र.१४२/टी-१, दिनांक १४ /०३/२०१८

५. शासन परिपत्रक क्रमांक एनएपी-२०२१/प्र.क्र.११८/ज-१अ, दिनांक १३/०४/२०२२

६.शासन निर्णय क्रमांक एनएपी-२०२२/प्र.क्र.१०३/ज-१अ, दिनांक २३/०५/२०२३

प्रस्तावना -

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० अन्वये, कोणत्याही क्षेत्रामध्ये अंतिम विकास योजना प्रसिध्द केल्यावर, अशा ठिकाणी अनुज्ञेय असलेल्या वापरासाठी अशा जमिनीच्या वापराकरिता कलम ४२ अन्वये, कोणतीही स्वतंत्र परवानगी घेण्याची आवश्यकता असणार नाही, अशा स्वरुपाची महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ कलम ४२ ब ही सुधारणा करण्यात आलेली आहे. तसेच, ज्या क्षेत्रासाठी प्रारुप प्रादेशिक योजना तयार करण्यात आली असेल आणि अशा प्रारुप प्रादेशिक योजनेबाबतची आवश्यक ती नोटीस यथोचितरित्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली किंवा अशी प्रादेशिक योजना मान्य करण्यात आली असेल आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम,१९६६ याच्या कलम १८ अन्वये अशा जमिनीबाबत विकास कामाची परवानगी दिलेली असेल तर, कलम ४२ च्या प्रयोजनांसाठी अशा जमिनीच्या वापरास, तत्सम अकृषिक वापरामध्ये रुपांतरीत करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल अशा स्वरुपाची महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ कलम ४२ क ही सुधारणा करण्यात आलेली आहे. यासंदर्भातील करावयाच्या कार्यवाहीसंदर्भातील दिशानिर्देश शासन परिपत्रक क्रमांक एनएए-२०१७/प्र.क्र.११५/टी-१, दिनांक १९ ऑगस्ट,२०१७ अन्वये देण्यात आलेले आहेत.

०२. तसेच, सन २०१८ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ अन्वये, कोणत्याही गावाच्या ठिकाणाच्या हद्दीपासून २०० मीटरच्या आतील क्षेत्राकरिता निवासी प्रयोजनासाठी जमीन वापराच्या रुपांतरणासाठी तरतूद करण्यासंदर्भात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये कलम ४२ ड अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. यासंदर्भातील करावयाच्या कार्यवाहीसंदर्भातील दिशानिर्देश शासन परिपत्रक क्रमांक एनएपी-२०१७/ प्र.क्र.१४२/टी-१, दिनांक १४ मार्च,२०१८ अन्वये देण्यात आलेले आहेत.

०३. या विभागाच्या दिनांक १३/०४/२०२२ अन्वये, अंतिम विकास योजना/ प्रारुप तसेच अंतिम प्रादेशिक योजना किंवा प्रारूप विकास योजना तसेच गावठाणाच्या कलम १२२ खालील घोषित हद्दीपासून २०० मीटरच्या परिघीय क्षेत्रात रहिवासी, वाणिज्य व औद्योगिक इ. अकृषिक स्वरुपाच्या वापर विभागात (झोन निहाय) ज्या बिनशेती न झालेल्या जमिनी आहेत अशा जमिनींना अकृषिक आकारणीचे आदेश लागु करण्याबाबत व मानीव अकृषिक वापर व सनद देण्याबाबत सर्व महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना दिशानिर्देश देण्यात आले आहेत.

०४. याप्रमाणे, महाराष्ट्र महसूल जमीन संहिता,१९६६ अंतर्गत शेतजमिनीच्या अकृषिक वापराच्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी क्षेत्रीय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना दिशानिर्देश दिलेले आहेत. तसेच, सक्षम प्राधिकाऱ्याकडून एखादया जमिनीवर बांधकाम परवानगी अथवा रेखांकन मंजूरी देण्यात येत असताना अशा जमिनीमध्ये प्रस्तावित केलेला अकृषिक प्रयोजनाचा वापर अनुज्ञेय असल्याची खात्री केली जाते. अशा जमिनींकरिता स्वतंत्रपणे अकृषिक परवानगी घेण्याची आवश्यकता नसल्याने किंवा त्या जमिनी अकृषिक वापरात रुपांतरीत झाल्याचे मानण्यात येत असल्याने, अशा जमिनींबाबत सक्षम प्राधिकरणाने बांधकाम परवानगी दिल्यास संबंधित जमीनधारकास / भूखंडधारकास स्वतंत्रपणे अकृषिक परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. अशा स्वरुपाचा निर्णय शासनाने या विभागाच्या दिनांक २३/०५/२०२३ च्या शासन निर्णयान्वये घेतलेला आहे.

०५. तरीही, विकास आराखडा / प्रादेशिक आराखडा मंजूर असलेल्या ठिकाणी, शेतकऱ्यांकडून सदर जमिनी बिनशेती करण्याबाबत महसूली प्राधिकारी / अधिकारी यांच्याकडून आग्रह केला जातो किंवा बांधकाम परवानगी देतांना बीनशेती आदेशाची प्रत दाखल करण्याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांकडून आग्रह धरला जातो अशा स्वरुपाच्या तक्रारी लोकप्रतिनिधी यांच्याकडून शासनास प्राप्त झालेल्या आहेत. यानुषंगाने, सर्व महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना दिशानिर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक-

महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतूदींनुसार सर्व महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना खालीलप्रमाणे दिशानिर्देश देण्यात येत आहेत :-

१.सदर अधिनियमातील तरतूदींनुसार, विकास आराखडा / प्रादेशिक विकास योजना यामधील तरतुदीनुसार बिनशेती वापर अनुज्ञेय असल्यास स्वतंत्र बिनशेती परवानगीची आवश्यकता नाही.

२.संबंधित विकास प्राधिकरणाकडून शेतजमिनीस बांधकाम परवानगी / रेखांकन मंजूरी दिली असल्यास सदर शेतजमीन मंजूर प्रयोजनासाठी बिनशेतीकडे वर्ग झाल्याचे मानण्यात येईल.

३.सदर जमिनीवरील विकास परवानगी, बांधकाम परवानगी/ मंजूर बांधकाम आराखडे यांच्या आधारे, अकृषिक वापराबाबतची सनद संबंधित महसूल अधिकाऱ्यांनी निर्गमित करावी.

४.नियोजन प्राधिकरणाने विकास परवानगी / बांधकाम परवानगी देण्यापूर्वी बिनशेती परवानगीचा आग्रह धरु नये.

५.उपरोक्त तरतूद ही भोगवटादार वर्ग १ जमिनींसाठी लागू राहील. भोगवटादार वर्ग-२ जमिनींसाठी नियोजन प्राधिकरणाने विकास परवानगी / बांधकाम परवानगी देण्यापूर्वी सक्षम महसूल अधिकाऱ्यांकडून ना-हरकत दाखला प्राप्त करुन घ्यावा.

०२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलास असून त्याचा संकेताक २०२४०३१३१२१५३५१६१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dhananjay Sukadeo Nikam

Digitally signed by Dhananjay Sukadeo Nikam
DN: c=IN, o=Personal, title=2381, pseudonym=af38757b1f0443b4bf1d763b88b6b20f, 2.5.4.20=8803f74e6ae970e103ec4a483b2a22e2ab6038136b274e9b97ce840ce4afac21, postalCode=422009, st=Maharashtra, serialNumber=023c7f2efb2f165c86d952ca9235fb77d1a378b6608a6358a1ecac9bc7fb1fbb, cn=Dhananjay Sukadeo Nikam
Date: 2024.03.14 12:42:06 +05'30'

(धनंजय निकम)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री याचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
३) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
४) मा.विरोधी पक्षनेता (विधान सभा/ विधान परिषद) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई-४०० ०३२,
५) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई-३२,
७) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२,
८) महालेखापाल, लेखा व अनुज्ञयेता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (१,) मुंबई,
९) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (२) नागपूर,
१०) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२,
११) सर्व विभागीय आयुक्त,
१२) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१३) सर्व जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी,
१४) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२,
१५) सर्व उप विभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी) / सर्व जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख,
१६) सर्व तहसिलदार/ सर्व तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
१७) सर्व सह सचिव /उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
१८) "ज" समूहातील सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
१९) निवडनस्ती (कार्यासन ज-१ अ), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.

उद्योग घटकाला औद्योगीक प्रयोजनासाठी बिनशेती वापर सुरू करावयाचा असल्यास अकृषिक वापराची सनद आवश्यक नसल्याबाबत सर्व महसूली अधिकारी यांना दिशानिर्देश देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक एनएपी -२०२४/प्र.क्र.१८०/ ज-१अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुख्य इमारत, १ ला मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दि. २९/०१/२०२५

प्रस्तावना-

भारत सरकारच्या उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग (DPIIT- Department for Promotion of Industry and Internal Trade) द्वारे सुरू करण्यात आलेल्या उपक्रमांपैकी व्यवसाय सुलभता (EoDB) हा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. व्यवसाय सुलभता (EoDB) या उपक्रमाचा उद्देश भारतातील राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये अनुकूल व्यवसाय परिसंस्था निर्माण करणे हा असून यासाठी विविध सुधारणात्मक उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. सदर सुधारणा या व्यवसाय सुधारणा कृती आराखडा (BRAP) चा भाग म्हणून राबवल्या जातात. व्यवसाय सुधारणा कृती आराखडा-२०२४ च्या अनुषंगाने महसूल विभागाशी संबंधीत पुढील तीन विषय चर्चिले गेले. :-

१. Integration of -Change in Land Use◦ with MAITRI-SWS
२. Procedure document for -Change in Land Use◦
३. Dashboard for -Change in Land Use◦

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२ (अ), (ब), (क) व (ड) व कलम ४४-अ अन्वये जमिनीच्या अकृषिक प्रयोजनासाठी वापर करण्याकरिता परवानगीची आवश्यकता नसल्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. मात्र या तरतुदींनुसार जमीनधारकांना मानीव अकृषिक वापराची सनद घेणे आवश्यक असून त्यासाठी करावी लागणारी कार्यवाही व वेळ हा जमिनीच्या अकृषिक प्रयोजनासाठी वापर करण्याकरिता लागणाऱ्या परवानगी एवढाच लागत असल्याचे शासनाच्या निदर्शनास येत आहे. सबब, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करुन अकृषिक वापराच्या सनदेची तरतूद रद्द करण्याचे शासन स्तरावर प्रस्तावीत आहे.

यास्तव, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करुन शासन स्तरावरील अकृषिक वापराच्या सनदेची तरतूद रद्द करण्याची कार्यवाही पूर्ण होई पर्यंत व व्यवसाय सुधारणा कृती आराखडा-२०२४ च्या अनुषंगाने, एखाद्या उद्योग घटकाला औद्योगीक प्रयोजनासाठी बिनशेती वापर सुरू करावयाचा असल्यास सदर सनदेची आवश्यकता नसल्याबाबत दिशानिर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२ (अ), (ब), (क) व (ड) व कलम ४४-अ मध्ये सुधारणा करून अकृषिक परवानगीच्या सनदेच्या आवश्यकतेची तरतूद रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. यासाठी काही कालावधी लागणार आहे. यास्तव, सदर कार्यवाही पुर्ण होई पावेतोच्या कालावधीत एखाद्या उद्योग घटकाला औद्योगीक प्रयोजनासाठी बिनशेती वापर सुरू करावयाचा असल्यास अकृषिक वापराकरीता सनद घेण्याची आवश्यकता राहणार नाही. ज्या उद्योग घटकाला औद्योगीक प्रयोजनासाठी बिनशेती वापर सुरू करावयाचा आहे त्यांनी सक्षम नियोजन प्रधिकरणाकडून विकास परवानगी (Development Permission) घेतल्यानंतर किंवा नियोजन प्राधिकरणाकडून बांधकाम आराखडे मंजूर केल्यानंतर त्यांची एक प्रत संबंधीत ग्राम महसूल अधिकाऱ्याकडे अधिकार अभिलेखात योग्य त्या नोंदी घेण्यासाठी सादर करावी. अशी माहिती प्राप्त झाल्यानंतर ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी अधिकार अभिलेखात नोंद घेऊन अधिकार अभिलेख अद्यावत करण्याची कार्यवाही यथाशीघ्र पुर्ण करावी.

०२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२५०१२९१८३२३०६११९ असा आहे, हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RELIEF AND REHABILITATION DEPARTMENT, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ae7a2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FCF7172A73579B34FA622983D8FB647780FBEF1D35A1CA975955EB9193F3F800, cn=SANJAY AUDUMBAR DHARURKAR
Date: 2025.01.29 18:33:45 +05'30'

(संजय धारुरकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई-३२,

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय,बुलढाणा

विषय क्र.२

अधिकार अभिलेख विषयक धोरणात्मक शासन निर्णय

<u>अधिकार अभिलेख</u>

भूसंपादन केलेल्या जमिनी आणि वक्फ जमिनी यांच्याबाबतीत गा. न.नं.७/१२ च्या इतर हक्क सदरी तसेच गा.न.नं.१ (क) मध्ये घ्यावयाच्या नोंदी संदर्भात क्षेत्रीय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना पुरक दिशानिर्देश देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः जमीन- २०२१/प्र.क्र.१०/ज-१ अ

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक: - १५ मार्च, २०२१.

<u>वाचा -</u>

१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रं.लोआप्र-२००९/प्र.क्र.२३८/ल-६, दिनांक १७ मार्च,२०१२

२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.वक्फ-२०१५/प्र.क्र.७८/ज-१अ, दिनांक १३ एप्रिल,२०१६

३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण/०१/२०१७/प्र.क्र.११/अ-२, दिनांक ११ जानेवारी,२०१८

४) महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका खंड-४ भाग (दोन) यांमधील ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन पध्दती

५) महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम,१९७१.

६) जमाबंदी आयुक्त कार्यालयाचे पत्र क्रमांक क्र.रा.भू.४/इतर हक्कातील नोंदी/२०२०, दिनांक २८/१२/२०२०.

<u>प्रस्तावना</u> -

महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका (खंड चार) मधील भाग (दोन) महाराष्ट्र राज्यातील ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन पध्दती या विषयी आहे. त्यानुसार ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन करण्याकरीता, विविध नोंदवह्यांचा गाव नमुना व दुय्यम नोंदवह्या यांचे नमुने विहीत करण्यात आलेले असुन त्याचा गोषवारा देखील देण्यात आलेला आहे.

या विभागाचा शासन निर्णय क्र. लोआप्र-२००९/प्र.क्र.२३८/ल-६, दि. १७/०३/२०१२ अन्वये गाव नमुना १(क) मध्ये सुधारणा केली असून, भोगवटदार वर्ग-२ सत्ता प्रकाराच्या तसेच निर्बंधित सत्ता प्रकारच्या जमिनीची वर्गवारी १ ते १४ या प्रकारामध्ये निश्चित करुन दिली आहे व त्याप्रमाणेच सुविधा ई-फेरफार प्रणालीमध्ये विकसित करण्यात आली आहे.

तसेच या विभागाच्या शासन निर्णय क्र.संकीर्ण/०१/२०१७/प्र.क्र.११/अ-२, दिनांक ११ जानेवारी,२०१८ अन्वये भूसंपादन करून प्रदान केलेल्या जमीनीचे वापरात बदलाचे सर्वंकष धोरण निश्चित केले आहे. त्याच्या अनुषंगाने **"भूसंपादन अधिनियमान्वये संपादित वापर आणि हस्तांतरणावर निर्बंध"** असा शेरा गा.न.नं. ७/१२ च्या इतर हक्कात दर्शविण्यासाठी तसेच याकरीता निर्बंधित सत्ताप्रकाराचा नविन स्वतंत्र प्रकार गाव न.नं.१ (क) मध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. यास्तव,

भूसंपादन केलेल्या जमिनीचा स्वतंत्र प्रकार नमुद करुन गाव नमुना नं.१(क) च्या निर्बंधित सत्ताप्रकारांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्याबाबत व त्या अनुषंगाने **"भूसंपादन अधिनियमान्वये संपादित वापर आणि हस्तांतरणावर निर्बंध"** असा शेरा गा.न.नं. ७/१२ च्या इतर हक्कात दर्शविण्यासाठी संगणकीकरण प्रणाली (ई-फेरफार प्रणाली) मध्ये सुधारणा करण्याबाबत सर्व क्षेत्रीय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना दिशानिर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

तसेच, शासन निर्णय क्र.वक्फ-२०१५/प्र.क्र.७८/ज-१अ,दिनांक १३ एप्रिल,२०१६अन्वये, वक्फ अधिनियम १९९५ अन्वये अधिसूचित वक्फ मिळकतीच्या गा.न.नं. ७/१२ वर कब्जेदार सदरी वक्फ संस्थेचे नाव आणि गा.न.नं. ७/१२ च्या इतर हक्क सदरी **"वक्फ प्रतिबंधीत सत्ता प्रकार"** अशी नोंद घेण्याबाबतचे निर्देश आहेत. तथापि वक्फ संस्थेच्या या मिळकतीची भूधारणा निर्बंधित सत्ताप्रकारांचा एक स्वतंत्र प्रकार गा.न.नं.१ (क) च्या यादीमध्ये समाविष्ट करण्याबाबत सर्व क्षेत्रीय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना दिशानिर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन परिपत्रक</u> -

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम,१९७१ मधील तरतूदीन्वये प्राप्त अधिकारानुसार, सर्व क्षेत्रीय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना याद्वारे पुढीलप्रमाणे दिशानिर्देश देण्यात येत आहेत:-

(१) अधिकार अभिलेख विषयक गाव नमुना नं.१ (क) मध्ये घ्यावयाच्या नोंदीच्या संदर्भातील प्रकार शासन निर्णय क्र. लोआप्र-२००९/प्र.क्र.२३८/ल-६, दिनांक १७/०३/२०१२ मध्ये नमूद केले आहेत. त्या जमिनींच्या प्रकारांच्या मध्ये अ.क्र.१५ येथे **"भूसंपादन अधिनियमान्वये संपादित केलेल्या जमिनी"** तर अ.क्र.१६ येथे **"वक्फ जमिनी"** हा प्रकार या आदेशाव्दारे समाविष्ट करण्यात येत आहे. तसेच शासन निर्णय, दिनांक १७/०३/२०१२ अन्वये सुधारीत गा.न.नं.१(क) मध्येच वेगवेगळे भाग करुन या भागांमध्ये निर्बंधित सत्ताप्रकाराच्या जमिनीची सदर शासन निर्णयात विशद केलेल्या वर्गवारीप्रमाणे नोंद घेण्याचे निर्देश आहेत, त्यानुसार या जमिनींची देखील खालील दिलेल्या वर्गवारीप्रमाणे नोंद घेण्यात यावी.

अ.क्र.	**जमिनीचा प्रकार**	**१(क)मधील नोंद घेण्यासाठी प्रस्तावित सदर/भाग क्रमांक**
१५	भूसंपादन अधिनियमान्वये संपादित केलेल्या जमिनी	**१(क)१५**
१६	वक्फ जमिनी	**१(क)१६**

(२) अधिकार अभिलेख विषयक गाव न.नं.७/१२ च्या इतर हक्क सदरी भूसंपादन केलेल्या जमिनीच्या संदर्भात **"भूसंपादन अधिनियमान्वये संपादित वापर आणि हस्तांतरणावर निर्बंध"** अशी नोंद घेण्यात यावी. तसेच वक्फ जमिनीच्या संदर्भात शासन निर्णय क्रमांक वक्फ-२०१५/प्र.क्र.७८/ज-१अ, दिनांक १३ एप्रिल,२०१६ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशानुसार भोगवटादार सदरी **"वक्फ संस्थेचे नाव"** आणि इतर हक्क सदरी **"वक्फ प्रतिबंधित सत्ता प्रकार"** अशी नोंद घेण्यात यावी.

(३) उपरोक्त निर्देशाच्या अनुषंगाने अधिकार अभिलेखात नोंदी घेण्याकरीता संगणकीकरण प्रणाली (ई-फेरफार प्रणाली) यामध्ये संबंधितांनी आवश्यक त्या सुधारणा कराव्यात.

०२. सर्व जिल्हाधिकारी व क्षेत्रीय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांनी या निर्देशांची तात्काळ अंमलबजावणी करावी.

०३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०३१५१५२९५४५६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAMESH SHIVAJI CHAVAN

Digitally signed by RAMESH SHIVAJI CHAVAN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=7ada4e8fa11566f3b9c9f7b5fa123945d54f8e3d5b09d05bedfa09b97ee45cad, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=eb458b05e05ee27f435bd399537405d44e1c88021cf038b060ac10b9d8fb8787, ou=REVENUE, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAMESH SHIVAJI CHAVAN
Date: 2021.03.15 15:34:22 +05'30'

(रमेश चव्हाण)
सह सचिव, महसूल व वन विभाग

प्रत,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री याचे अपर मुख्यसचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
३) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
४) मा.विरोधी पक्षनेता (विधान सभा/ विधान परिषद) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई-४०० ०३२,
५) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई-३२,
७) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२,
८) महालेखापाल, लेखा व अनुज्ञयेता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (१,) मुंबई,
९) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (२) नागपूर,
१०) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२,
११) प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंब ई-३२.
१२) सर्व विभागीय आयुक्त,
१३) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१४) सर्व जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी,
१५) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२,
१६) सर्व सह सचिव /उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
१७) "ज" समूहातील सर्व कायासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
१८) निवडनस्ती, कार्यासन-ज-१ अ, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.

****

"जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयात उघडण्यात आलेल्या स्वीय प्रपंजी लेखा खात्यामधून तलाठी व मंडळ अधिकारी यांचेसाठी लॅपटॉप खरेदी करण्यास मान्यता देण्याबाबत."

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्रमांकः संकिर्ण-२०१८/प्र.क्र.२०९./ल-१
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक : ३१ मार्च, २०२१

संदर्भ:-

१. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१८/प्र.क्र.२०९/ल-१, दि.२६.०३.२०१९
२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१८/प्र.क्र.२०९/ल-१, दि.०२.०७.२०२०
३. महसूल व वन विभाग, शासन निर्णय शुधिपत्रक क्रमांक संकिर्ण-२०१८/प्र.क्र.२०९/ल-१, दि.२१.०८.२०२०
४. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१८/प्र.क्र.२०९/ल-१, दि.०२.०९.२०२०
५. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे क्र.राभू-४/लॅपटॉप मान्यता/२०२१, दि.१०.०३.२०२१ चे पत्र.

प्रस्तावना :-

राज्यात डिजीटल इंडिया लँड रेकॉर्ड मॉडर्नायझेशन कार्यक्रमातंर्गत जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे याच्या कार्यालयाकडून संगणकीय गा.न.नं. ७/१२, ८ अ, ई-फेरफार, ई-अभिलेख, इत्यादी प्रकल्पांची अज्ञावली विकसित करण्यात आलेल्या आहेत. या अज्ञावलीमधील ई-फेरफार आज्ञावलीची अंमलबजावणी राज्यातील संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या लॅपटॉपची क्लाऊड सर्व्हर बरोबर जोडणी करण्याची कार्यवाही तलाठी व मंडळ अधिकारी यांचेकडून करण्यात येते. संदर्भ क्र. ४ येथील दि. ०२/०९/२०२० च्या शासन निर्णयान्वये नागपूर, भंडारा, अकोला, अहमदनगर, कोल्हापूर या पाच जिल्ह्यांकरीता १०८१ लॅपटॉप खरेदीसाठी रू.४,८६,४५,०००/- इतका निधी मंजूर करण्यांत आला आहे. राज्यातील बारा जिल्ह्यांतील ११५४ तलाठी व २१३ मंडळ अधिकारी यांचेसाठी एकूण १३६७ लॅपटॉप खरेदी करण्यासाठी प्रत्येकी ४५०००/- प्रमाणे एकूण रक्कम रुपये रू.६,१५,१५,०००/- (अक्षरी सहा कोटी पंधरा लाख पंधरा हजार फक्त) इतक्या खर्चास स्वीय प्रपंजी लेख्यातील शिल्लक रकमेतून संबंधित जिल्हाधिकारी यांना वर्ग करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव संदर्भ क्रं. ५ अन्वये जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सादर केला आहे. त्यानुषंगाने शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश :-

ई-महाभूमि अंतर्गत ई-फेरफार आज्ञावलीच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या लॅपटॉपची क्लाऊड सर्व्हरबरोबर जोडणी करण्यासाठी सोबत जोडलेल्या परिशिष्ठ अ नुसार बारा जिल्ह्यांतील ११५४ तलाठी व २१३ मंडळ अधिकारी यांना एकूण १३६७ लॅपटॉप खरेदी करण्यासाठी परिशिष्ठ-ब मध्ये नमुद केलेल्या संरचनेच्या प्रत्येकी रू.४५०००/- प्रमाणे एकूण रक्कम रू.६,१५,१५,०००/- (अक्षरी सहा कोटी पंधरा लाख पंधरा हजार फक्त) इतक्या खर्चास जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्वीय प्रपंजी लेख्यातील शिल्लक रकमेतून खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. संदर्भ क्रं. २ व ३ च्या शासन निर्णयामधील नमूद करण्यात आलेल्या अटीं व शर्तींचे पालन करणे व सदर खर्चाच्या बाबींच्या अनुषंगाने स्वीय प्रंपजी लेख्यांशी संबंधीत जमा व खर्चाचा हिशोब ठेवणे जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना बंधनकारक राहील.

३. सदर निधीबाबत आर्थिक व भौतिक अहवाल उपयोगीता प्रमाणपत्रासह शासनास पाठविण्याची जबाबदारी जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील. तसेच शासनास सदर निधीच्या जमा व खर्चाचा हिशोब तपासण्याचा अधिकार राहील. जिल्हाधिकारी यांनी सदर निधीचे विनियोगासाठी स्वतंत्र लेखे ठेवावेत तसेच खर्चाचा ताळमेळ महालेखापालांकडे वेळोवेळी देणेची दक्षता घ्यावी. प्रस्तुत निधीबाबत जमाबंदी आयुक्त, पुणे यांनी आर्थिक व भौतिक अहवाल उपयोगिता प्रमाणपत्रासह शासनास पाठवावा.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०३३११८१२१७९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANTOSH HARIDASRAO BHOGLE

Digitally signed by SANTOSH HARIDASRAO BHOGLE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cfe36679ae12922422bc5e7f7d277841f1fe67725f465c272fd672725926 0b3d, cn=SANTOSH HARIDASRAO BHOGLE
Date: 2021.03.31 18:18:40 +05'30'

(डॉ.संतोष भोगले)
सह सचिव

प्रति,

१. मा. मंत्री/ मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२
२. अपर मुख्य सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई
३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
४. जिल्हाधिकारी, सातारा, पालघर, सिंधुदुर्ग, नाशिक, नंदुरबार, धुळे जळगांव, हिंगोली, अमरावती, वाशिम, गडचिरोली, वर्धा
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
६. महालेखापाल (वाणिज्यिक लेखा परिक्षा) मुंबई
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. निवासी लेखा परिक्षण अधिकारी, मुंबई
९. निवड नस्ती

परिशिष्ठ अ

❖ **तलाठी व मंडळ अधिकारी लॅपटॉप मागणी संख्या -**

अ.क्रं.	जिल्हा	लॅपटॉप मागणी		एकुण	लॅपटॉप मागणीचे कारण
		तलाठी	मंडळ अधिकारी		
१	२	३	४	५	६
१	सातारा	१००	-	१००	नविन तलाठी भरती
२	पालघर	७	२९	३६	लॅपटॉप वाटप न केलेले
३	सिंधुदुर्ग	२२४	३८	२६२	कालबाहय झालेने
४	नाशिक	७६	-	७६	नविन तलाठी भरती
५	नंदूरबार	४८	१३	६१	लॅपटॉप वाटप न केलेले
६	धुळे	५१	३१	८२	नविन तलाठी भरती
७	जळगाव	१८०	३०	२१०	कालबाहय झालेने
८	हिंगोली	२१	५	२६	लॅपटॉप वाटप न केलेले
९	अमरावती	६०	१	६१	कालबाहय झालेने
१०	वाशिम	८४	१७	१०१	कालबाहय झालेने
११	गडचिरोली	१२	२	१४	कालबाहय झालेने
१२	वर्धा	२९१	४७	३३८	कालबाहय झालेने
	एकुण	११५४	२१३	१३६७	

परिशिष्ठ-ब

Sr. No	Item	Specifications
1	Form Factor	Clampshell
2	Chassis	With metallic hinges
3	Chipset	Integrated in Processor
4	Processor	Intel® Core™ i5-1035G1
5	Memory	8 GB DDR4-2666 Mhz ,should support Dual Channel, Memory expandability up to 16 GB with 2 DIMM Slots
6	Storage	1TB 5400 RPM
7	Graphics	Integrated graphics
8	Audio	Integrated audio controller with 2 Integrated stereo speakers
9	Operating System	Microsoft 10 Home 64 SL
10	Networking	Integrated Gigabit 10/100/1000 Ethernet Controller
		802.11ac (2x2) WLAN and Bluetooth® 5.0 (MU-MIMO supported)
11	Ports	2 Super Speed USB Type-A 5Gbps signaling rate; 1 SuperSpeed USB Type-C® 5Gbps signaling rate; 1 RJ-45; 1 headphone/microphone combo; 1 HDMI 1.4b; 1 AC power
12	Slots	2 M.2 for WLAN & Storage
14		1 multi-format digital media reader
15	Keyboard	Full size textured island-style keyboard
	Touchpad	Touchpad with gestures support
16	Battery	3-cell, 40 Whr Li-ion Longlife Battery with 1000 charge should Support battery fast charge - Approximately 90% in 90 minutes
17	Power Supply	65 W with 88% average efficiency or better Adapter
18	Weight	up to 1.65 Kg including battery
19	Security	TPM 2.0 security lock slot
20	Manageability	Integrated utility to enables hardware level testing outside the operating system & Drivers should be available on OEM Website for download
21	Certifications	Microsoft Windows 10 FCC,CE, RoHS, UL, EPEAT, Energy Star ISO 9001,14001,20001,27001 for OEM
22	Display	14" HD, IPS, anti-glare, with digital microphone and HD Webcam with Wide Dynamic Range
23	Warranty	3 Years onsite including battery

"नगर भूमापन हद्दीतील दुहेरी अधिकार अभिलेख (७/१२ व मिळकत पत्रिका) ठेवणे/संधारण करण्याच्या पध्दतीत बदल करण्याकरिता स्थापन केलेल्या समितीस मान्यता देणेबाबत."

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२१/प्र.क्र.४६/ल-१
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०४ ऑगस्ट, २०२१

संदर्भ :-

जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. ना.भू.३/ पुणे/ दुहेरी पध्दत /कावि/२०२१ दि. २८.०५.२०२१ चे पत्र.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नगरभूमापन झालेल्या शेती व्यतिरिक्त जमिनीचे अधिकार अभिलेख नगर भूमापन अधिकारी/उप अधीक्षक भूमि अभिलेख यांचेकडून ठेवले जातात व त्यामधील हस्तांतरणाच्या नोंदी करण्याची कार्यवाही करण्यात येते. नगरभुमापन हद्दीतील शेती मिळकती बिनशेती झाल्यानंतर मोजणी अंती मिळकत पत्रिकेवर अंमल घेण्यात येते. तसेच नगरभुमापन हद्दीतील शेती मिळकतींचे अधिकार अभिलेख (७/१२ उतारे) हे तलाठ्याकडून ठेवले जात असून त्यांच्याकडून हस्तांतरणाच्या नोंदी घेतल्या जातात. अशा प्रकारे अधिकार अभिलेखाची दुहेरी नोंद पध्दत अस्तित्वात असलेमुळे अधिकार अभिलेखावरील नोंदी व मिळकत पत्रिकेवरील नोंदी यामध्ये विसंगती दिसून येते. तसेच सदर दोन्ही अधिकार अभिलेखाचे आधारे हस्तांतरणाचे व्यवहार होवून फसवणूक होण्याचे प्रकार वाढत आहेत.

२. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम १२२ अन्वये अधिसुचित केलेल्या क्षेत्रातील शेती मिळकतीसह नगरभूमापनाची कार्यवाही कलम १२६ अन्वये करावयाची आहे. नगरभूमापन हद्दीतील शेती मिळकतीसह सर्व मिळकतीच्या बाबतीत मिळकत पत्रिका उघडणेत येवून मिळकत पत्रिका संधारण करणे, सारा वसूल करणे, तंदअनुषंगिक कर्तव्ये पार पाडणे व नोंदवहया संधारण करणे याबाबतची कार्यपध्दती नगरभुमापन विभागाकडुन होणे आवश्यक आहे. याकामी कायद्यातील तरतुदी व शासन परिपत्रके तसेच प्रत्यक्षकाम करताना येणा-या अडचणी याबाबीचा विचार करून शासनास प्रस्ताव सादर करणेकामी समिती स्थापन करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

नगर भूमापन हद्दीतील दुहेरी अधिकार अभिलेख (७/१२ व मिळकत पत्रिका) ठेवणे/संधारण करणे याबाबतची कार्यपध्दती नगरभुमापन विभागाकडुन होणे आवश्यक आहे. याकामी कायद्यातील तरतुदी व शासन

परिपत्रके तसेच प्रत्यक्षकाम करताना येणा-या अडचणी याबाबीचा विचार करून शासनास प्रस्ताव सादर करणेकरिता खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	शेरा
१	जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख म. राज्य पुणे	अध्यक्ष
२	अतिरीक्त जिल्हाधिकारी नंदुरबार ,ठाणे, पुणे व नागपूर	विशेष निमंत्रीत
३	उपसंचालक भुमि अभिलेख, संलग्न जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) पुणे	सदस्य
४	राज्य समन्वयक, ई-फेरफार जमाबंदी आयुक्त कार्यालय ,पुणे	सदस्य
५	सहाय्यक संचालक, नगररचना, पुणे शाखा	सदस्य
६	जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे, नागपूर	सदस्य
७	तहसिलदार हवेली, औरंगाबाद,नाशिक	सदस्य
८	नगरभुमापन अधिकारी, कोल्हापुर	सदस्य
९	नगरभुमापन अधिकारी ,क्रं.१ नागपुर	सदस्य
१०	उपअधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद	सदस्य
११	नायब तहसिलदार नाशिक जिल्हा- नाशिक	सदस्य
१२	कार्यालय अधीक्षक नागरी भूमापन क्र.३ जमाबंदी आयुक्त कार्यालय पुणे	सदस्य सचिव

२. सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे आहे:-

१. नगरभुमापन हद्दीतील दुहेरी अधिकार अभिलेख बंद करणेबाबतची सद्य:स्थितीची माहीती घेणे.
२. प्रचलित कायदे व नियमात काय दुरूस्ती करणे उचीत होईल याबाबत दुरूस्ती सुचविणे.
३. नगरभुमापन हद्दीतील दुहेरी सातबारा बंद करणेबाबत प्रचार व प्रसिध्दीची कार्यवाही करणे.
४. नगर भूमापन हद्दीतील नमुना नंबर १२ संधारण करणेबाबत व अकृषक जमिन महसूल वसुलीची जबाबदारी निश्चित करणे.
५. अंमलबजावणीचे टप्पे / कार्यपध्दती ठरविणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०८०४१४५७५३६८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shridhar Baburao Dube

Digitally signed by Shridhar Baburao Dube
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bfe7996a51d0fda36a9f4ef60d969b7ee904c5b75320a6a8a0bf60e2e9cbba06, pseudonym=EABFEBBD83697D3DF66A3DA707B7DCCA230CEE8A, serialNumber=34CDB4C0A0CF400AD02CF1830E2F946F9CC0415A591E9A82SD9E9B9AE62ED37F, cn=Shridhar Baburao Dube
Date: 2021.08.04 15:06:57 +05'30'

(श्रीधर डुबे-पाटील)
सह सचिव

प्रत ,

१. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव

अधिकार अभिलेखाविषयक गा. न. नं. ७/१२ च्या उताऱ्यामधील "शेतीचे स्थानिक नाव" या सदरी नोंदविण्यात आलेल्या "जातीवाचक" नावांची नोंद कमी करुन सुधारीत नोंद घेण्यासंदर्भात क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना दिशा-निर्देश देण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र.जमीन-२०२१/प्र.क्र.५९/ज-१अ
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २५ ऑगस्ट, २०२१.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र महसूल संहिता, १९६६, त्याखालील नियम महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका (खंड-४) यामधील तरतुदीनुसार राज्याच्या प्रत्येक "साझा" यामध्ये अधिकार अभिलेख विषयक विविध नोंदवहया ठेवण्यात येतात. त्यामध्ये गा .न .नं. ७ ही "अधिकार अभिलेख विषयक" नोंदवही आहे, तर गा .न .नं. १२ ही "पिक पाहणी विषयक" नोंदवही आहे. या दोन्ही गा.न.नं. नोंदवहयांच्या एकत्रित उताऱ्यास गा. न. नं. ७/१२ चा उतार असे संबोधण्यात येते. राज्यातील काही गावांमधील गा. न. नं. ७/१२ या अधिकार अभिलेखाविषयक गा. न. नं. ७/१२ च्या उताऱ्यावरील शेतीचे स्थानिक नाव या सदरी "शेतीचे जातीवाचक स्थानिक नावे" असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. राज्यात सामाजिक सलोखा व सौहार्द निर्माण होऊन राष्ट्रीय एकात्मता वृध्दींगत होण्याच्या दृष्टीने अशा अधिकार अभिलेखाविषयक गा. न. नं. ७/१२ च्या उताऱ्यामधील "शेतीचे स्थानिक नाव" या सदरी नोंदविण्यात आलेल्या "जातीवाचक" नावांची नोंद कमी करुन सुधारीत नोंद घेण्यासंदर्भात क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना दिशानिर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील जमिनीच्या अधिकार अभिलेखाविषयक गा. न. नं. ७/१२ उताऱ्यात "शेतीचे स्थानिक नाव" याविषयी स्वतंत्र रकाना आहे. काही गावांतील गा. न. नं. ७/१२ च्या उताऱ्यातील या रकान्यात "शेतीचे जातीवाचक स्थानिक नावे" नोंदविले असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली आहे. त्यामुळे राज्यात सामाजिक सलोखा व सौहार्दपूर्ण वातावरण राहून राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने अशा गावांतील अधिकार अभिलेखातील गा. न. नं. ७/१२ च्या उताऱ्यातील "शेतीचे स्थानिक नाव" या सदरी असलेली "जातीवाचक शेतीचे स्थानिक नाव" यांची नोंद वगळून त्याऐवजी आवश्यक असल्यास गावातील स्थानिक-भौगोलिक स्थितींशी निगडित, नदी-नाल्यांशी निगडित नावे देण्यास याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

०२. कार्यपद्धती:- अशा बदलावयाच्या नावासंदर्भात नियम व अधिनियमांतील कार्यपद्धती अनुसरून संबंधित गावच्या ग्रामपंचायतीचा ठराव घेऊन त्यास संबंधित तहसीलदाराने जिल्हाधिकारी यांची प्रथम मान्यता घ्यावी, तद्नंतर संबंधित नोंदी नियमातील तरतुदीस अनुसरुन संबंधित गा.न .नं. ७/१२ च्या "शेतीचे स्थानिक नाव" या सदरी अद्ययावत करण्यात याव्यात.

०३. या विषयाचे महत्त्व लक्षात घेता अधिकार अभिलेख विषयक गा. न .नं. ७/१२ उताऱ्याच्या "शेतीचे स्थानिक नाव" या सदरी असलेल्या जातीवाचक नावांच्या नोंदी वगळून वरील प्रमाणे सुधारित नावांच्या नोंदी घेण्यासंदर्भात सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात "विशेष मोहीम" हाती घ्यावी. तसेच यानुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा संबधित जिल्हाधिकारी यांनी मासिक बैठकीत घ्यावा.

०४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२१०८२५१४३३३२१८१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAMESH SHIVAJI CHAVAN

Digitally signed by RAMESH SHIVAJI CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7ada4e8fa11566f3b9c9f7b55a123945d1548e3d5b09d05bedfa09b97ee45cad, pseudonym=868187615BCFE5A1E8899A80B442F9ED0228BC273, serialNumber=EB458B005E05EE27F455BD3995374095D44E1C88021CF0588060AC1089DBF8B787, cn=RAMESH SHIVAJI CHAVAN
Date: 2021.08.25 14:41:56 +05'30'

(रमेश चव्हाण)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
३) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
४) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई-३२,
६) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,३२
७) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य, (१) मुंबई,
८) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (२) नागपूर,
९) प्रधान सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई-३२,
१०) सर्व विभागीय आयुक्त,
११) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१२) सर्व जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी
१३) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय,मुंबई-३२,
१४) सर्व उप विभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी) / सर्व जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख,
१५) सर्व तहसिलदार/ सर्व तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख,
१६) सर्व सहसचिव /उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
१७) "ज" समूहातील सर्व कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
१८) निवडनस्ती, कार्यासन-ज-१ अ, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

राज्यातील शेतकऱ्यास देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षा निमीत्त मोफत संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीकृत अधिकार अभिलेख विषयक गा.न.नं.७/१२ उताऱ्याची प्रत उपलब्ध करून देण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०२१/प्र.क्र. २९५ /ल-१
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक : ०१ सप्टेंबर, २०२१

संदर्भ :-महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.जमीन-२०२०/प्र.क्र.२७/ज-१अ, दि.०२.०९.२०२०.

प्रस्तावना :-

भारत हा कृषी प्रधान देश असून, देशाच्या व राज्याच्या आर्थिक प्रगतीमध्ये आजपर्यंत शेती क्षेत्राचा मोठा वाटा राहिलेला आहे. तसेच, महात्मा गांधी यांच्या स्वराज्य संकल्पनेत म्हणजेच संपूर्ण स्वातंत्र्य यामध्ये शेती ही सर्व विकासाची आधारशिला होती. उक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये महसूली लेखांकन पध्दती विषयक गा.न.नं.७/१२ अधिकार अभिलेख पत्रक अद्यावत करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयान्वये अद्ययावत करण्यात आलेला गा.न.नं.७/१२ चा उतारा सर्व संबंधितांना समजण्यासाठी अधिक सोपा करण्यात आलेला आहे. चालु वर्ष हे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याच्या आर्थिक उभारणीतील शेतकऱ्यांचे योगदान विचारात घेऊन, दिनांक ०२ ऑक्टोबर, २०२१ या महात्मा गांधी यांच्या जयंती दिनांकापासून डिजीटल भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम, ई-महाभूमि अंतर्गत विकसीत करण्यात आलेल्या आज्ञावलीमधून संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने प्राप्त होणाऱ्या अधिकार अभिलेख विषयक गा.न.नं.७/१२ अद्यावत उताऱ्याच्या प्रती गावामध्ये संबंधीत तलाठ्यामार्फत प्रत्येक खातेदारास घरोघरी जाऊन मोफत देण्याच्या दृष्टीने विशेष मोहिम राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षा निमीत्त डिजीटल भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम, ई-महाभूमि अंतर्गत विकसीत करण्यात आलेल्या आज्ञावलीमधून संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने प्राप्त होणाऱ्या अधिकार अभिलेख विषयक गा.न.नं.७/१२ अद्यावत उताऱ्याच्या प्रती गावामध्ये संबंधीत तलाठ्यामार्फत प्रत्येक खातेदारास घरोघरी जाऊन मोफत देण्याच्या उद्देशाने विशेष मोहिम राबविण्यास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि त्याखालील नियम या अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारात याव्दारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर मोहिमेचा प्रारंभ दिनांक ०२ ऑक्टोबर, २०२१ रोजी (महात्मा गांधी जयंती) करण्यात यावा.

३. यासाठी सर्व संबंधितांना आवश्यक ते तांत्रिक सहाय्य पुरविण्याची जबाबदारी जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील.

४. सदर गा.न.नं.७/१२ अद्यावत उताऱ्याच्या प्रती उपलब्ध करून देण्यासाठी येणारा खर्च हा जिल्हा सेतू समितीकडील निधीमधून उपलब्ध करून देण्यात यावा आणि त्याची जबाबदारी प्रत्येक जिल्हाधिकारी यांची राहील.

५. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्ष २०२१-२०२२ निमित्ताने राबविण्यात येणाऱ्या या विशेष मोहिमेतर्गत वरीलप्रमाणे गा.न.नं.७/१२ उताऱ्याची अद्यावत प्रत एका खातेदारास फक्त एकदाच मोफत उपलब्ध करून देण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०९०११६२४३८८६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJAY BANKAR

Digitally signed by SANJAY BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c8a7d6860ff227f9e69a02e9ca5dfb2ccb25eda92d749629970f349fc6ed260, pseudonym=B37546F6A6BD466ED45270ED708F924F51A07EA8, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY BANKAR
Date: 2021.09.01 16:24:36 +05'30'

(संजय बनकर)
उप सचिव

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२
३. सर्व मा. मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२
४. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवान, मुंबई
५. मा. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सविच, विधान भवन, मुंबई
६. मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खासगी सचिव, विधान भवन, मुंबई
७. उपसभापती, विधावपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
८. मा. विरोधी पक्षनेता (विधानपरिषद) यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
९. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा) यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
१०. मा.मुख्य सचिव , महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई
११. अपर मुख्य सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई
१२. अपर मुख्य सचिव (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई
१३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४. सर्व विभागीय आयुक्त
१५. सर्व जिल्हाधिकारी
१६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१७. महालेखापाल ½ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
१८. महालेखापाल (वाणिज्यिक लेखा परिक्षा) मुंबई
१९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२०. निवासी लेखा परिक्षण अधिकारी, मुंबई
२१. निवड नस्ती

"नागरी भूमापन हद्दीतील दुहेरी अधिकार अभिलेख (७/१२ व मिळकत पत्रिका) ठेवणे / संधारणाचे काम भूमी अभिलेख विभागाकडे देण्याबाबत कायदयातील तरतुदींचा अभ्यास करून प्रस्ताव सादर करण्यासाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याबाबत."

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२१/प्र.क्र.३२६/ल-१.
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ ऑक्टोबर, २०२१

प्रस्तावना :-

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नगर भूमापन झालेल्या क्षेत्रामध्ये गावठाणातील मिळकती व कलम १२२ अन्वये अधिसुचीत केलेल्या सर्व्हे नं./गट नं. च्या जमीनीचा समावेश असतो. नगर भूमापन नियमपुस्तिका व कलम १२६ च्या तरतुदीनुसार नगर भूमापन नियम फक्त बिनशेती जमीनीला लागू आहेत. या तरतुदीनुसार नगर भूमापन झालेल्या क्षेत्रामध्ये शेतजमीनी व्यतीरिक्त जमीनीचे अधिकार अभिलेख मिळकत पत्रिका व नकाशा संधारण व अद्यावतीकरणाचे काम भूमी अभिलेख विभागातील नगर भूमापन अधिकारी /उप अधिक्षक भूमी अभिलेख यांचे कार्यालयाकडून केले जाते. नगर भूमापन हद्दीतील शेत जमीनींचे अधिकार अभिलेख सात-बारा तहसिलदार, मंडळ निरीक्षक, तलाठी यांचेकडून संधारण व अद्यावत केला जातो. नगर भूमापन हद्दीतील शेती मिळकती /शेतजमीनी बिनशेती झाल्यानंतर विहीत कार्यपध्दतीअंती मिळकत पत्रिकेवर अंमल घेऊन त्या बिनशेती झालेल्या जमीनींचा सातबारा बंद करून तदनंतर पुढील सर्व हस्तांतरणाचे अधिकार अभिलेख संधारण व अद्यावतीकरण करण्याचे काम भूमी अभिलेख विभागामार्फत करण्याची तरतुद आहे. सदर तरतुदीप्रमाणे अधिकार अभिलेख जतन व संधारण करण्याची कार्यवाही प्रत्यक्षात होत नाही. पर्यायाने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. अधिकार अभिलेखाची दुहेरी नोंद पध्दत अस्तित्वात असल्यामुळे अधिकार अभिलेखावरील नोंदी व मिळकत पत्रिकेवरील नोंदी यामध्ये विसंगती दिसून येते. तसेच सदर दोन्ही अधिकार अभिलेखाचे आधारे हस्तांतरणाचे व्यवहार होवून फसवणूक होण्याचे प्रकार वाढत आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम -१२२ अन्वये अधिसुचीत केलेल्या क्षेत्रातील शेती मिळकतीसह नगरभूमापनाची कार्यवाही कलम-१२६ अन्वये करण्याची असून नगर भूमापन हद्दीतील शेती शेतजमीनीसह सर्व मिळकतीच्या बाबतीत मिळकत पत्रिका उघडण्यात येवून मिळकतपत्रिका संधारण करणे, अकृषीक सारा वसूल करणे, तदनुषंगिक कर्तव्य पार पाडणे व नोंदवहया संधारण करणे याबाबतची कार्यपध्दती भूमी अभिलेख विभागाकडून करून घेणे अथवा नगर भूमापन हद्दीतील अधिकार अभिलेख संधारण करण्याची प्रचलित पध्दतीप्रमाणे ही कामे भूमी अभिलेख विभागाकडे देता येईल किंवा कसे याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याकरीता कायदयातील तरतुदी व शासन परिपत्रके तसेच प्रत्यक्ष काम करताना येणाऱ्या अडचणी याबाबीचा विचार करून शासनास प्रस्ताव सादर करणेकामी जमाबंदी आयुक्त आणि सचालक, भूमी अभिलेख यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

नगर भूमापन हद्दीतील दुहेरी अधिकार अभिलेख (७/१२ व मिळकत पत्रिका) ठेवणे /संधारण करणेची पद्धतीत बदल करून संधारणाचे काम भूमी अभिलेख विभागाकडे देण्याकरीता कायदयातील तरतुदी, शासन परिपत्रके तसेच प्रत्यक्ष काम करताना येणाऱ्या अडचणी याबाबत अभ्यास करून सविस्तर प्रस्ताव सादर करण्याकरीता जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	समितीतील पद
१	जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.	अध्यक्ष
२	उपायुक्त महसूल, विभागीय आयुक्त, पुणे.	सदस्य.
३	अतिरिक्त जिल्हाधिकारी, नंदुरबार, ठाणे, पुणे व नागपूर.	विशेष निमंत्रित
४	उप संचालक, भूमी अभिलेख,संलग्न जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) पुणे.	सदस्य
५	राज्य समन्वयक, ई-फेरफार जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे.	सदस्य
६	उप विभागीय अधिकारी, संगमनेर.	सदस्य
७	सहाय्यक संचालक, नगर रचना पुणे.	सदस्य
८	जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, पुणे, नागपूर, मुंबई उपनगर.	सदस्य
९	तहसिलदार औरंगाबाद, नाशिक, मिरज, जि. सांगली.	सदस्य
१०	नगर भूमापन अधिकारी, कोल्हापूर.	सदस्य
११	नगर भूमापन अधिकारी क्र. १ नागपूर.	सदस्य
१२	उप अधिक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद.	सदस्य
१३	नायब तहसिलदार , नाशिक जिल्हा नाशिक.	सदस्य
१४	कार्यालय अधिक्षक, नागरी भूमापन क्र. ३ , जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे.	सदस्य सचिव

२. सदर समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे विहीत करण्यात येत आहे.

अ) नगर भूमापन हद्दीतील जमीनीचे अधिकार अभिलेखाबाबत व दुहेरी अधिकार अभिलेख बंद करणेबाबतची सद्यस्थितीची माहिती घेणे.

ब) प्रचलित कायदे व नियमात काय दुरूस्ती करणे उचित होईल याबाबत दुरूस्ती सुचविणे.

क) नगर भूमापन हद्दीतील दुहेरी सातबारा बंद करणेबाबत प्रचार व प्रसिध्दीच्या कार्यक्रमाची रुपरेषा तयार करणे.

ड) नगर भूमापन हद्दीतील नमुना नंबर १२ संधारण करणेबाबत व अकृषीक जमीन महसूल वसुलीची जबाबदारी निश्चित करणे.

इ) अंमलबजावणीचे टप्पे /कार्यपध्दती ठरविणे.

३. सदर समितीने नगर भूमापन हद्दीतील दुहेरी अधिकार अभिलेख (७/१२ व मिळकत पत्रिका) ठेवणे / संधारण करणेची पद्धतीत बदल करून संधारणाचे काम भूमी अभिलेख विभागाकडे देण्याबाबत कायदयातील

तरतुदी, शासन परिपत्रके तसेच प्रत्यक्ष काम करताना येणाऱ्या अडचणी याबाबत सविस्तर अभ्यास करून सविस्तर प्रस्ताव एक महिन्यात शासनास सादर करावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२११०१३१५४९१८२९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJAY BANKAR

Digitally signed by SANJAY BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c8a7d6860ff227fd9e69a02e9ca5dfb2ccb25eda92d749629970f349fc6ed260, pseudonym=B37546F6A6BD466ED45270ED708F924F51A07EA8, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E8BAA, cn=SANJAY BANKAR
Date: 2021.10.13 15:50:40 +05'30'

(संजय बनकर)
उप सचिव

प्रत :-

१) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे.
२) उपायुक्त महसूल, विभागीय आयुक्त, पुणे.
३) अतिरिक्त जिल्हाधिकारी, नुदंरबार, ठाणे, पुणे व नागपूर.
४) उप संचालक भूमी अभिलेख,संलग्न जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) पुणे.
५) राज्य समन्वयक, ई-फेरफार जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे
६) उप विभागीय अधिकारी, संगमनेर.
७) सहाय्यक संचालक, नगर रचना पुणे.
८) जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, पुणे नागपूर, मुंबई उपनगर .
९) तहसिलदार औरंगाबाद, नाशिक, मिरज, जि. सांगली.
१०) नगर भूमापन अधिकारी, कोल्हापूर
११) नगर भूमापन अधिकारी क्र. १ नागपूर
१२) उप अधिक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद.
१३) नायब तहसिलदार , नाशिक जिल्हा नाशिक
१४) कार्यालय अधिक्षक, नागरी भूमापन क्र. ३ , जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे.
१५) निवड नस्ती.

शासनाचे इतर विभाग, वित्तीय संस्था व इतर यांना संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने गा.न.नं.७/१२ व गा.न.नं.८-अ या अधिकार अभिलेख Application Programming Interface (APIs) व्दारे उपलब्ध करून देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्रमांकः संकिर्ण-२०२१/प्र.क्र.२३५/ल-१
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक : १८ एप्रिल , २०२२

संदर्भ :-

१) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्रमांक :-राभूअ-२०१३/प्र.क्र.३२/ल-१, दिनांक २३.०१.२०१३.
२) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्रमांक :-राभूअ-२०१८/प्र.क्र.३४/ल-१, दिनांक ३१.०१.२०१९.
३) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्रमांक :-राभूअ-२०१८/प्र.क्र.३९७/ल-१, दिनांक ३१.०१.२०१९.
४) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक रा.भू.४/निशुल्क ७/ब/बारा/२०२१, दिनांक१७.०६.२०२१.

प्रस्तावना :-

राज्यात डिजीटल भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम ई-महाभूमि या नावाने राबविण्यात येत आहे. ई-महाभूमि अंतर्गत विकसीत करण्यात आलेल्या आज्ञावलीमधून गा.न.नं.७/१२, गा.न.नं.८-अ व गा.न.नं.६ या अधिकार अभिलेखांच्या नक्कला संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने ऑनलाईन पध्दतीने संदर्भाधीन क्रमांक २ अन्वये ठरविण्यात आलेले शुल्क/रक्कम आकारण्यात येवून उपलब्ध करून देण्यात येत आहेत. परंतु, इतर विभाग, वित्तीय संस्था व इतर यांना संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने गा.न.नं.७/१२ व गा.न.नं.८-अ या अधिकार अभिलेख Application Programming Interface (APIs) व्दारे उपलब्ध करून देण्याबाबत किती शुल्क आकारण्यात यावे, याबाबत कोणताही धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला नव्हता. ई-महाभूमि अंतर्गत विविध प्रकल्पाकरीता अज्ञावली विकसीत करण्यासाठी व विकसीत करण्यात आलेल्या आज्ञावलींची भविष्यातील देखभाल व तांत्रिक सहाय्य ही अतिशय महत्त्वाची व आवश्यक बाब असल्याने, सदर प्रकल्पांना स्वयंसहाय्यित बनविण्यासाठी निधीची आवश्यकता आहे. त्यामुळे, सदर निधी उभारण्यासाठी व संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने गा.न.नं.७/१२ व गा.न.नं.८-अ या अधिकार अभिलेख Application Programming Interface (APIs) व्दारे उपलब्ध करून देणाऱ्या सेवाकरिता आकारण्यात येणाऱ्या शुल्कापैकी काही शुल्क महाभूमि प्रकल्प व्यवस्थापन संस्थेस देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

ई-महाभूमि अंतर्गत विविध प्रकल्पांना स्वयंसहाय्यित बनविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची उभारणी करण्याच्या दृष्टीने व संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने गा.न.नं.७/१२ व गा.न.नं.८-अ या अधिकार अभिलेख Application Programming Interface (APIs) व्दारे उपलब्ध करून देण्यात येणा-या सेवाकरिता आकारण्यात येणाऱ्या शुल्काची विभागणी पुढीलप्रमाणे निर्धारित करण्यात येत आहे.

अ.क्र.	विभाग/संस्था	माहितीचे स्वरूप	प्रस्तावित सेवाशुल्क	विविध घटकांचा हिस्सा
१	२	३		१
१.	शासकिय विभाग	i)संगणकीकृत स्वाक्षरीत PDF स्वरूपात	i) रू.१०/- प्रति अभिलेख.	i) महाभूमि प्रकल्प व्यवस्थापन संस्था
		ii) संगणकीकृत डेटा स्ट्रीम (डेटा स्वरूपात)	ii) रू.६/- प्रति अभिलेख. (प्रति शिट)	ii) महाभूमि प्रकल्प व्यवस्थापन संस्था
२.	शासकिय विभाग वगळता निमशासकीय व अन्य संस्था.	i)संगणकीकृत स्वाक्षरीत PDF स्वरूपात	i) रू.१५ /- प्रती अभिलेख.	i) महाराष्ट्र शासन-रू.५/- ii) महाभूमि प्रकल्प व्यवस्थापन संस्था रू.१०/-
		ii) संगणकीकृत डेटा स्ट्रीम (डेटा स्वरुपात)	i) रू.१५ /- प्रती अभिलेख. (प्रती शिट)	i) महाराष्ट्र शासन-रू.५/- ii) महाभूमि प्रकल्प व्यवस्थापन संस्था रू. १०/-

२. Application Programming Interface (APIs) व्दारे संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने गा.न.नं.७/१२ व गा.न.नं.८-अ हे अधिकार अभिलेख ज्यांना उपलब्ध करून द्यावयाचे आहेत त्यांच्यासोबत सामंजस्य करार करण्यासाठी या शासन निर्णयान्वये जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना अधिकार देण्यात येत आहेत.

३. Application Programming Interface (APIs) व्दारे संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने गा.न.नं.७/१२ व गा.न.नं.८-अ हे अधिकार अभिलेख खालील अटी व शर्तींच्या आधारे उपलब्ध करून देण्यात यावेत.

(i) Application Programming Interface (APIs) व्दारे ज्यांना संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने गा.न.नं.७/१२ व गा.न.नं.८-अ हे अधिकार अभिलेख आवश्यक आहेत, त्यांच्यासाठी प्रीपेड पध्दतीचे वॉलेट उपलब्ध करून देण्यात यावे.

(ii) सदर वॉलेट किती रकमेपर्यंत प्रीपेड करता येईल, याबाबतची मर्यादा याकरीता जामबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्णय घ्यावा.

(iii) सदर वॉलेट मध्ये उपलब्ध असलेल्या रकमेच्या प्रमाणातच संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने गा.न.नं.७/१२ व गा.न.नं.८-अ हे अधिकार अभिलेख उपलब्ध करून देण्यात यावेत.

(iv) उक्त प्रमाणे प्राप्त होणाऱ्या सेवा शुल्क निधीचे व्यवस्थापन करण्यासाठी महाभूमी प्रकल्प व्यवस्थापन संस्थेने शुल्क व्यवस्थापन प्रणाली विकसीत करावी.

(v)दिनांक ३१.०१.२०१९ च्या शासन निर्णयान्वये जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना स्वतंत्र बँक खाते (Depository Account) नेटबँकींगच्या सुविधेसह स्टेट बँक ऑफ इंडिया, मुख्य शाखा, पुणे येथे उघडण्यास देण्यात आलेल्या परवानगीच्या अनुषंगाने सदर उघडण्यात आलेल्या बॅक खात्यात प्राप्त सेवा शुल्क जमा करण्यात यावे.

पृष्ठ ४ पैकी २

(vi) Application Programming Interface (APIs) व्दारे उपलब्ध करून देण्यात आलेल्या अधिकार अभिलेखाच्या वितरणातून प्राप्त शुल्कपैकी महाभूमी प्रकल्प व्यवस्थपन संस्थेचा हिस्सा व्यवस्थापन प्रणाली मधून प्राप्त अहवाला प्रमाणे स्वीय प्रपंजी लेखा खात्यामध्ये जमा करण्यात यावा. तर, शासनाचा हिस्सा व्यवस्थापन प्रणाली मधून प्राप्त अहवाला प्रमाणे GRAS प्रणालीव्दारे शासनाच्या विहीत लेखा शीर्षाखाली जमा करणे आवश्यक राहील.

(vii) Application Programming Interface (APIs) व्दारे ज्यांना अधिकार अभिलेख उपलब्ध करून द्यावयाचे आहेत, त्यांच्यासोबत प्रथम एक वर्षासाठी सामंजस्य करार करण्यात यावा. त्यानंतर त्यामध्ये एक एक वर्षाने वाढ करण्यात यावा.

(viii) सामंजस्य कराराच्या कालावधीत जर सेवा शुल्कामध्ये वाढ झाल्यास वाढ होणाऱ्या शुल्काची रक्कम ज्यांनी Application Programming Interface (APIs) व्दारे अधिकार अभिलेख उपलब्ध करण्याबाबत सामंजस्य करार केला आहे, त्यांना वाढ होणारे शुल्क भरल्यानंतरच Application Programming Interface (APIs) ची सेवा देण्यात यावी.

४. Application Programming Interface (APIs) व्दारे संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने गा.न.नं.७/१२ व गा.न.नं.८-अ हे अधिकार अभिलेख उपलब्ध करून देण्याबाबत सामंजस्य करार करताना जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना योग्य व आवश्यक वाटतील अशा अटी व शर्तींचा सामंजस्य करारामध्ये समावेश करता येईल.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०४१८१२२९४२७५१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

BHAGWAN MARUTI SAWANT

Digitally signed by BHAGWAN MARUTI SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8ee89eb0aec64f8bc0bdf8d85ddb4706d35abd8b73c618e114ee98d5c9ecf57b, pseudonym=6A69B309A6281D99F5A420A268723ECE6A8B4A60, serialNumber=C7DBA1C6B5F7AB2A6CABC4F7EAD8CFA74F8F7A0FADCAC76D8F1CF22569F16BD3, cn=BHAGWAN MARUTI SAWANT
Date: 2022.04.18 14:48:25 +05'30'

(भगवान सावंत)
अवर सचिव

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
३. सर्व मा. मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
४. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवान, मुंबई.
५. मा. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सविच, विधान भवन, मुंबई.
६. मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खासगी सचिव, विधान भवन, मुंबई.
७. उपसभापती, विधावपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
८. मा. विरोधी पक्षनेता (विधानपरिषद) यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
९. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा) यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
१०. मा.मुख्य सचिव , महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई.

पृष्ठ ४ पैकी ३

राज्यातील जमीनींना अव्दितीय भूभाग ओळख क्रमांक ULPIN (Unique Land Parcel Identification Number) देण्याबाबतची कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२२/प्र.क्र.१७७/ल-१.
मुख्य इमारत, पहिला मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ जुलै, २०२२.

वाचा :- १.भूमी संसाधन विभाग, भारत सरकार यांचेकडील दिनांक २०.१०.२०२१ व दिनांक २४.१२.२०२१ चे अ.शा. पत्र.

२. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे याचे क्र. रा. भू. -४, भूभाग ओळख क्रमांक/ULPIN/२०२२, दि. ३१.०३.२०२२ व दिनांक २५.०४.२०२२ चे पत्र.

प्रस्तावना:-

केंद्र शासनाच्या भूमी संसाधन विभागाने संदर्भाधिन क्र.१ च्या पत्रान्वये डिजीटल इंडीया लॅन्ड रेकॉर्ड मॉडर्नायझेशन प्रोग्राम (DILRMP) अंतर्गत संगणकीकृत झालेल्या अधिकार अभिलेखांसाठी अव्दितीय भूभाग ओळख क्रमांक ULPIN (Unique Land Parcel Identification Number) देण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देशांत नमूद केल्यानुसार राज्यातील जमीनींना जिओ रेफरन्सिंग नुसार हे क्रमांक देता येतील. तथापि त्यासाठी जिओ रेफरन्सिंगचे काम पुर्ण होणे आवश्यक आहे.

राज्यातील प्रत्येक भूभागास अव्दितीय भूभाग ओळख क्रमांक (ULPIN) देण्यात येणार असल्याने प्रत्येक भूभागास विशिष्ठ ओळख निर्माण होणार आहे. तसेच नागरिकांना त्याचा फायदा होणार असून सहजरित्या ULPIN च्या आधारे जागेबाबत तपासणी करणे शक्य होणार आहे. ULPIN चा वापर Interconnectivity of various Systems म्हणजे Data Sharing साठी करण्यात येईल. केंद्र शासनाच्या भूमी संसाधन विभागाच्या निर्देशांस अनुसरून राज्यातील प्रत्येक भूभागास अव्दितीय भूभाग ओळख क्रमांक (Unique Land Parcel Identification Number) देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

शासन निर्णय :-

केंद्र शासनाच्या भूमी संसाधन विभागाने संदर्भाधिन क्र.१ च्या पत्रान्वये डिजीटल इंडीया लॅन्ड रेकॉर्ड मॉडर्नायझेशन प्रोग्राम (DILRMP) अंतर्गत संगणकीकृत झालेल्या अधिकार अभिलेखांसाठी अव्दितीय भूभाग ओळख क्रमांक ULPIN (Unique Land Parcel Identification Number) देण्याबाबत दिलेल्या निर्देशांनुसार राज्यातील प्रत्येक भूभागास अव्दितीय भूभाग ओळख क्रमांक (Unique Land Parcel Identification Number) देण्यास मान्यता देण्यात येत आहे. प्रत्येक भूभागास देण्यात येणारा अद्वितीय भूभाग ओळख क्रमांक (ULPIN) हा विशिष्ट पध्दतीने (Random) तयार होणारा ११ अंकी क्रमांक असेल.

अव्दितीय भूभाग ओळख क्रमांक ULPIN (Unique Land Parcel Identification Number) ग्रामीण व शहरी भागातील भूभागांना देण्याबाबतची कार्यपध्दती खालीलप्रमाणे विहीत करण्यात येत आहे.

अ. ग्रामीण अधिकार अभिलेखांकरीता ULPIN:-

१. ग्रामीण भागात सुमारे २.६२ कोटी ७/१२ कार्यान्वीत आहेत.

२. ग्रामीण संगणकीकृत अधिकार अभिलेख्यांकरीता ULPIN प्रस्तावित करण्यात येत आहे.

३. संगणकिकृत अल्गोरिदमनुसार ULPIN निर्माण होणार असून,त्यामध्ये शहानिशा करण्याची व्यवस्था असेल.

४. दुबार (Duplicate) ULPIN तयार होणार नाही.

५. प्रकरणपरत्वे ULPIN देण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

५.१ अस्तित्वात असलेले सर्व ७/१२ नां ULPIN लागू करण्यात (assign) येतील.

५.२ क्षेत्राच्या सामिलीकरणामुळे अथवा पोटहिस्स्यामुळे त्याचे क्षेत्र व हद्दीमध्ये बदल होणार असल्याने तयार होणाऱ्या नवीन ७/१२ क्रमांकाला नवीन ULPIN देण्यात येईल. त्यासाठी मॅट्रीक्स तयार करून Website वर उपलब्ध करून देण्यात येईल.

५.३ महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम २०(२), ८५, ८७, (१०६ सह १३५), १२२, १३५, २४७, २५७ अन्वये पारित होणाऱ्या असे आदेश ज्याद्वारे क्षेत्र व हद्दीत बदल होत आहेत तसेच कजाप आदेश यांच्याद्वारे तसेच शेत जमीनिसाठीच्या मुंबई धारण जमिनीचे तुकडे पाडणेस प्रतिबंध करण्याबाबत व तिचे एकत्रीकरण करणेबाबत अधिनियम १९४७ चे कलम ३२(१) नुसार जेव्हा जेव्हा क्षेत्र व हद्दीत बदल करून नवीन भूमापन क्रमांक देणेत येतील तेव्हा त्यास नवीन ULPIN लागू होईल.

५.४. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम १०६ व १५५ अंतर्गत प्रकरणांमध्ये तसेच टंकलेखनातील चुकांच्या प्रकरणांमध्ये, संबंधित ७/१२ च्या ULPIN मध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही.

६. याकरीता केंद्रीकृत अधिकार अभिलेख्यांचा डेटाबेस (centralized database) वापरण्यात येईल.

७. ULPIN कार्यान्वीत करण्याकरीता पुढीलप्रमाणे कार्यपध्दती वापरण्यात येईल.

७.१ प्रत्येक ७/१२ स ULPIN (Unique Land Parcel Identification Number) देण्यात येईल.

७.२. ULPIN अव्दितीय क्रम निर्मीती प्रणालीतून (Random Number generator) तयार करून देण्यात यावा. हा क्रमांक ११ अंकांचा असेल व त्यामध्ये हा क्रमांक योग्य आहे की, अयोग्य आहे हे ओळखणारी प्रणाली कार्यान्वीत असेल.

७.३. ग्रामीण भागाचा ULPIN (७/१२ शी संलग्न) हा क्र.१,२,३ व ४ यापैकी कोणत्याही अंकाने सूरू होणारा Random क्रमांक असेल (एकूण उपलब्ध क्रमांक ४००० कोटी)

७.४. जेव्हा जेव्हा भूभागाचे क्षेत्र व हद्दी यात कोणत्याही कारणास्तव बदल होईल तेव्हा नवीन ULPIN निर्माण करण्यात येईल त्यास लेखनप्रमाद दुरूस्ती आदेश अपवाद असेल.

७.५. ULPIN निर्मीती व पुननिर्मीती यांचा एकमेकांशी संबंध ठेवण्याची दक्षता प्रणाली घेईल.

७.६. ULPIN तसेच QR Code ७/१२ वर नमूद करण्यात येईल.

ब. नागरी अधिकार अभिलेखांकरीता ULPIN:-

१. शहरी भागात सुमारे ६० लाख नगरभूमापन क्रमांक कार्यान्वीत आहेत.

२. संगणकीकृत अधिकार अभिलेख्यांकरीता ULPIN प्रस्तावित करण्यात येत आहे.

३. संगणकीकृत अल्गोरिदमनुसार ULPIN निर्माण होणार असून, त्यामध्ये शहानिशा करण्याची व्यवस्था असेल.

४. दुबार (Duplicate) ULPIN तयार होणार नाही.

५. प्रकरणी ULPIN देण्याची खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

५.१. अस्तित्वात असलेले सर्व नगर भूमापन क्रमांकांना ULPIN लागू करण्यात (assign) येतील.

५.२ क्षेत्राच्या सामिलीकरणामुळे अथवा पोटहिस्स्यामुळे त्याचे क्षेत्र व हद्दीमध्ये बदल होणार असल्याने तयार होणाऱ्या नवीन नगर भूमापन क्रमांकाला नवीन ULPIN देण्यात येईल.

५.३ महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम २०(२),(१०६ सह १३५), १२२, १३५,२४७,२५७ अन्वये पारित होणारे असे आदेश ज्याद्वारे क्षेत्र व हद्दीत बदल होत आहेत तसेच क.जा.प.आदेश यांच्याद्वारे तसेच शेत जमीनीसाठीच्या मुंबई धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व तिचे एकत्रीकरण करणेबाबत अधिनियम १९४७ चे कलम ३२(१) नुसार जेव्हा क्षेत्र व हद्दीत बदल करून नवीन नगर भूमापन क्रमांक देण्यात येतील तेव्हा त्यास नवीन ULPIN देण्यात येईल.

५.४. महाराष्ट्र महसूल संहिता कलम १०६ व १५५ अंतर्गत प्रकरणांमध्ये तसेच टंकलेखनातील चुकांच्या प्रकरणांमध्ये, संबंधित नगर भूमापन क्रमांकाच्या ULPIN मध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही.

६. याकरीता केंद्रीकृत अधिकार अभिलेख्यांचा डेटाबेस (centralized database) वापरण्यात येईल.

७. ULPIN कार्यान्वीत करण्याकरीता पुढीलप्रमाणे कार्यपध्दती वापरण्यात येईल.

७.१ प्रत्येक मिळकत पत्रिकेस ULPIN (Unique Land Parcel Identification Number) देण्यात येईल.

७.२. ULPIN अव्दितीय क्रम निर्मीती प्रणालीतून (Random Number generator) तयार करून देण्यात यावा हा क्रमांक ११ अंकी असेल व त्यामध्ये हा क्रमांक योग्य आहे की , अयोग्य आहे हे ओळखणारी प्रणाली कार्यान्वीत असेल.

७.३. शहरी भागाचा ULPIN (मिळकत पत्रिका भूमापन क्रमांक संलग्न) हा क्र.५, ६, ७,८ व ९ यापैकी कोणत्याही अंकाने सुरू होणारा क्रमांक असेल (एकूण उपलब्ध क्रमांक ५००० कोटी)

७.४. जेव्हा जेव्हा भूभागाचे क्षेत्र व हद्दी यात कोणत्याही कारणास्तव बदल होईल तेव्हा नवीन ULPIN निर्माण करण्यात येईल त्यास लेखनप्रमाद दुरूस्ती आदेश अपवाद असेल.

७.५. ULPIN निर्मीती व पुनर्निमिती यांचा एकमेकांशी संबंध ठेवण्याची दक्षता प्रणाली घेईल.

७.६. ULPIN तसेच QR Code मिळकतपत्रिकेवर वर नमूद करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२२०७२८१५२६०९७३१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

BHAGWAN MARUTI SAWANT

Digitally signed by BHAGWAN MARUTI SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8ee89eb0aec64f8bc0bdf8d85ddb4706d35abd8b73c618e114ee98d5c9ecf57b, pseudonym=6A69B309A6281D99F5A420A268723ECE6A8B4A60, serialNumber=C7DBA1C6B5F7AB2A6CABC4F7EAD8CFA74F8F7A0FADCAC76D8F1CF22569F16BD3, cn=BHAGWAN MARUTI SAWANT
Date: 2022.07.28 15:34:26 +05'30'

(भगवान सावंत)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत ,

१. विभागीय आयुक्त (सर्व).
२. जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमी अभिलेख (म.रा.) पुणे.
३. जिल्हाधिकारी (सर्व).
४. उप जिल्हाधिकारी तथा डी डी ई (सर्व).
५. जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख (सर्व).
६. उप विभागीय अधिकारी (सर्व).
७. तहसीलदार (सर्व).
८. उप अधीक्षक भूमी अभिलेख (सर्व) .
९ . निवड नस्ती (ल-१).

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
शासन परिपत्रक क्र.- एससीवाय-२०२२/प्र.क्र.५७/म-७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगरू चौक, मंत्रालय, मुंबई.
दिनांक: १८ ऑक्टोबर, २०२२

वाचा:-

१) शासन निर्णय, कृषी व सहकार विभाग, क्र. सांख्यिकी-७०७५/४०५५७-B-११-A, दिनांक २३ ऑगस्ट, १९७५
२) शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्र. एससीवाय-२०१३/प्र.क्र.२०७/म-७, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०१५
३) शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/म-७, दिनांक ०७ ऑक्टोबर, २०१७ व दिनांक २८ जून, २०१८
४) शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्र. एससीवाय-२०१८/प्र.क्र.२३७/म-७, दिनांक ११ फेब्रवारी, २०१९
५) प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना, २०२०

प्रस्तावना:-

पीकांच्या उत्पादनाची आकडेवारी राज्य तसेच केंद्र शासनास अनेक मुलभुत आणि धोरणात्मक बाबींसाठी आवश्यक असते. महाराष्ट्र राज्यामध्ये पीकांच्या उत्पादनाचा अंदाज अंतिम करण्यासाठी सन १९४४-४५ सालापासून पीक कापणी प्रयोग राबविण्यात येतात. या प्रयोगातील सरासरी उत्पादनाच्या प्राप्त आकडेवारीचा उपयोग राज्य व जिल्हा पातळीवरील निरनिराळ्या पीकांच्या दर हेक्टरी सरासरी उत्पादनाचा विश्वासार्ह अंदाज काढणे, कृषी मालाच्या उत्पादनाबरोबरच कृषी उत्पादनाची खरेदी, आयात निर्यात धोरण, किमान आधारभूत किंमत इत्यादी अनेक बाबींवर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी करण्यात येतो. तसेच पीकांची पैसेवारी निश्चित करण्यासाठी तालुका पातळीवर ५ वर्षांची पीकांच्या सरासरी उत्पादनाची आकडेवारी उपलब्ध करून देण्यात येते. याशिवाय पीक विमा योजनेच्या नुकसान भरपाईसाठी सुध्दा सदर आकडेवारीचा उपयोग करण्यात येतो.

२. महसुल विभागाकडून पैसेवारी ठरविण्यासाठी ग्रामपंचायतनिहाय स्वतंत्र प्रमुख पीकाचे ६ पीक कापणी प्रयोग घेण्यात येतात. महाराष्ट्रामध्ये एकूण ग्रामपंचायतींची संख्या २८२४० एवढी असून प्रति ग्रामपंचायत सहा (६) प्रमाणे एका मुख्य पीकाकरिता एकूण १,६९,४४० एवढे पीक कापणी प्रयोग हे मंडळाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महसुल विभागामार्फत घेतले जातात. तसेच पीक सर्वेक्षण योजना व प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामाकरिता सर्वसाधारणपणे ९०,००० ते १,२०,००० इतके पीक कापणी प्रयोग घेतले जातात. सदरचे पीक कापणी प्रयोगांच्या कामाची व्याप्ती मोठी असल्याने हे प्रयोग काल मर्यादेत पूर्ण करण्यास अडचणी येतात.

३. पीक कापणी प्रयोग व पैसेवारीच्या कार्यपध्दतीत सुसूत्रता नसल्यामुळे एकाच क्षेत्रामध्ये पीकाची वेगवेगळी उत्पादकता दर्शविल्यामुळे प्रशासकीय अडचणी उद्भवतात. पीक कापणी प्रयोगामध्ये सुसूत्रता आणून Single Series पध्दतीचा अवलंब करून पीक कापणी प्रयोगाद्वारे महसुल मंडळनिहाय प्राप्त

होणाऱ्या सरासरी उत्पादनाच्या आकडेवारीचा उपयोग यापुढे पीकाचे उत्पादन, पैसेवारी, व पीक विमा नुकसान भरपाई निश्चिती करिता उपयोगात आणणे आवश्यक आहे. त्यासाठी सध्याच्या पीक कापणी प्रयोगाच्या कार्यपध्दतीत सर्वसमावेशक सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे सुधारीत कार्यपध्दतीचा अवलंब करण्यास शासन मान्यता देत आहे.

शासन परिपत्रक:-

१. पीक कापणी प्रयोगासाठी निवड करण्याची कार्यपध्दती :-

१.१) गावांची यादी तयार करणे.

केंद्र शासनाच्या "पीकांचे क्षेत्रफळ वेळेवर कळविण्याची योजना" (Timely Reporting of the Agriculture intelligence) अंतर्गत दरवर्षी मंडळातील एकूण गावांपैकी २० टक्के गावे रॅण्डम पध्दतीने निवडली जातात. मंडळातील सर्व गावांची ५ वर्षात निवड केली जाते. निवडलेल्या गावात गतवर्षी घेण्यात आलेल्या पीकांची माहिती संबंधित मंडळ अधिकारी यांच्याकडून घेण्यात येते. मंडळ अधिकारी यांच्याकडून प्राप्त यादीवरून प्रशिक्षणाच्या वेळी याकरिता गावांची अंतिम यादी निश्चित करण्यात यावी.

१.२) पीक कापणी प्रयोगासाठी निवडलेली गावे क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना कळविणे :-

पीक कापणी प्रयोगासाठी १.१) नुसार अंतिम केलेली गावे जिल्हास्तरीय पीक कापणी सनियंत्रण समितीने, तहसिलदार, तालुका कृषी अधिकारी व गट विकास अधिकारी यांच्यामार्फत क्षेत्रीय कर्मचारी यांना कळविण्याची कार्यवाही करावी.

२. पीक सर्वेक्षण, प्रधानमंत्री पीक विमा योजना व पैसेवारी करिता सर्वसामवेशक पीक कापणी प्रयोग संख्या :-

२.१) पैसेवारी ठरविण्याकरिता राजस्व निरीक्षक अथवा तत्सम अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायतवार प्रत्येक प्रमुख पीकांचे किमान ६ पीक कापणी प्रयोग घेण्यात येतात. तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत महसूल मंडळ/मंडळ गटस्तरावर १२ व तालुकास्तरावर १८ पीक कापणी प्रयोग घेण्यात येतात. तसेच, विमा अधिसूचित नसलेल्या पीकांसाठी संबंधीत जिल्ह्यातील पेरणी क्षेत्रानुसार किमान २४ पीक कापणी प्रयोग घेण्यात येतात.

२.२) यापुढे पीक सर्वेक्षण, पीकांचे उत्पादन, प्रधानमंत्री पीक विमा योजना व पैसेवारी करिता विमा अधिसूचित असलेल्या पीकांसाठी सर्वसमावेशक पीक कापणी प्रयोग संख्या खालीलप्रमाणे राहील.

अ.क्र.	पीक कापणी प्रयोगाचे पीक विमा अधिसूचित क्षेत्र	किमान पीक कापणी प्रयोग संख्या
१	महसूल मंडळ/महसूल मंडळ गट	१०

तसेच, विमा अधिसूचित नसलेल्या पीकांसाठी संबंधित जिल्ह्यातील पेरणी क्षेत्र ८० हजार हेक्टरहून अधिक असल्यास किमान १५० पीक कापणी प्रयोग, सदर क्षेत्र २० हजार ते ८० हजार हेक्टर असल्यास किमान १२० पीक कापणी प्रयोग व ते क्षेत्र २० हजार हेक्टरपेक्षा कमी असल्यास किमान ८० पीक कापणी प्रयोग जिल्हास्तरावर घेण्यात यावेत.

२.३) सद्यस्थितीमध्ये बहुतांश पीकांकरिता अधिसूचित क्षेत्र महसूल मंडळ आहे त्यानुसार पीक कापणी प्रयोगाचे नियोजन करावे. पैसेवारी निश्चित करताना वरीलप्रमाणे निश्चित केलेल्या पीक कापणी प्रयोगांच्या संख्येच्या आकडेवारीच्या आधारावर करावी.

२.४) क्षेत्रिय स्तरावर पीक कापणी प्रयोगाचे नियोजन करताना महसूल मंडळ वा महसूल मंडळ गटस्तरावर किमान पीक कापणी प्रयोगांपेक्षा अधिकच्या पीक कापणी प्रयोगांचे ग्रामपंचायत स्तरावर नियोजन करण्याचे संबंधीत जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना स्वातंत्र्य देण्यात येत आहे.

३. पीक कापणी प्रयोगाचे यंत्रणानिहाय वाटप:-

३.१) महसूल, कृषी व ग्रामविकास यंत्रणेमार्फत पीक कापणी प्रयोगांची अंमलबजावणी करण्यात येऊन जिल्हयाचे निवासी उपजिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली असलेल्या जिल्हास्तरीय पीक कापणी प्रयोग सनियंत्रण समितीच्या उपस्थितीत तिन्ही यंत्रणेला खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामातील एकुण नियोजनाच्या सम प्रमाणात पीक कापणी प्रयोगाचे वाटप करावे. पीक कापणी प्रयोगांची अंमलबजावणी महसूल यंत्रणेकडील मंडळ अधिकारी /पटवारी /तलाठी, कृषि यंत्रणेकडील कृषि सहायक व ग्रामविकास यंत्रणेकडील ग्रामसेवक /ग्रामविकास अधिकारी यांनी करावी.

४. पीक कापणी प्रयोग मार्गदर्शक सुचना:-

४.१) संदर्भ क्र ३ येथील शासन निर्णय दिनांक ०७ ऑक्टोबर, २०१७ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या राज्यस्तरीय दुष्काळ देखरेख समितीच्या (State Level Drought Monitoring Committee) मार्गदर्शनाखाली मुख्य सांख्यिकी अधिकारी, कृषी आयुक्तालय, पुणे हे खरीप व रबी हंगामाच्या सुरवातीस पीक कापणी प्रयोगाच्या मार्गदर्शक सूचना व वेळापत्रक स्वतंत्रपणे निर्गमित करतील.

५. दुष्काळ घोषित करण्याबाबत:-

५.१) दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ व त्यासंदर्भातील शासन निर्णय, दिनांक ०७.१०.२०१७, दिनांक २८.०६.२०१८ व दिनांक ११.०२.२०१९ अन्वये Trigger-१ व Trigger-२ तालुके निश्चित करण्यामध्ये येत असलेल्या अडचणी विचारात घेऊन, राज्य शासनाने MRSAC यांच्या सहाय्याने दुष्काळाचे मुल्यांकन करण्यासाठी Maha MADAT नावाची संगणकीय प्रणाली कार्यान्वित केलेली आहे. त्या प्रणालीच्या मदतीने Trigger-१ व या तालुक्यापैकी Trigger-२ लागू झालेले तालुके निश्चित केले जातात. Trigger-२ लागू झालेल्या तालुक्यामध्ये मध्यम किंवा गंभीर दुष्काळ निश्चित करण्यासाठी मात्र क्षेत्रिय स्तरावरून Ground Truthing ची कार्यवाही करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही.

५.२) Trigger-२ लागू झालेल्या तालुक्यांतील १०% गावे रँडम पध्दतीने निवडून सदरचे क्षेत्रीय सर्वेक्षण (सत्यापन) केवळ पीक नुकसानीचे प्रमाण ठरविण्यासाठी करण्यात येते. पीकनुकसानीचे प्रमाण ३३% पेक्षा जास्त असल्यास असे तालुके दुष्काळी म्हणून घोषित केली जाण्यास पात्र ठरतात, तसेच पीकनुकसानीचे प्रमाण ५०% पेक्षा जास्त असल्यास गंभीर दुष्काळ सूचित होतो. सदर क्षेत्रीय सर्वेक्षणाचा उपयोग केवळ पीक नुकसानीचे प्रमाण ठरविण्यासाठी असून, याचा उपयोग कुठेही पीकांच्या उत्पादनाची आकडेवारी अथवा पीकांच्या उत्पादनाचा अंदाज अंतिम करण्यासाठी करण्यात येऊ नये. सत्यापनाच्या कालावधीत वरीलप्रमाणे पीक कापणी प्रयोगाची कार्यवाही सुरू असल्यास, त्याची आकडेवारी सत्यापनासाठी उपयोगात आणता येईल.

५.३) दुष्काळ व्यवस्थापन संहितेमधील उक्त कार्यपध्दतीनुसार दुष्काळ जाहीर करण्यासाठी आता पैसेवारीचा उपयोग केला जात नाही. तथापि, इतर प्रयोजनासाठी उपयोगी व्हावे, याकरिता महसूल मंडळनिहाय पैसेवारी निश्चित करण्यात येईल व ती त्या मंडळातील गावांसाठी लागू राहील.

६. राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय पीक कापणी प्रयोग समिती:-

६.१) राज्यस्तरीय पीक कापणी प्रयोग संनियंत्रण समिती:-

राज्यातील हंगामनिहाय आयोजित करण्यात येणाऱ्या पीक कापणी प्रयोगाचे राज्यस्तरीय संनियंत्रण करण्यासाठी संदर्भ क्र ३ मधील राज्यस्तरीय दुष्काळ देखरेख समिती (State Level Drought Monitoring Committee) कार्य करेल.

६.२) राज्यस्तरीय पीक कापणी प्रयोग समन्वय समितीची कार्ये:-

१. राज्यस्तरीय पीक कापणी प्रयोगांचे सनियंत्रण व नियोजन करणे.

२. राज्यातील हंगामनिहाय आयोजित करण्यात येणाऱ्या पीक कापणी प्रयोगांचे कृषि, महसूल व ग्रामविकास विभागाशी समन्वय ठेवून अंमलबजावणी करणे.

३. पीकांच्या उत्पादनाची आकडेवारी अचूक व वेळेत उपलब्ध होण्यासाठी कार्यवाही करणे.

४. पीक कापणी प्रयोगाच्या वेळी येणाऱ्या विविध अडचणीच्या संदर्भात विचार विनिमय करून निर्णय घेणे.

६.३) जिल्हास्तरीय पीक कापणी प्रयोग सनियंत्रण समितीची रचना व कार्ये:-

पीक कापणी प्रयोगांचे नियोजनानुसार वाटप, अमलबजावणी आणि पर्यवेक्षणासाठी खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय पीक कापणी प्रयोग सनियंत्रण समिती स्थापन करण्यात येत आहे.

१. निवासी उपजिल्हाधिकारी	: अध्यक्ष
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद	: सदस्य
३. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद	: सदस्य
४. सॅम्पल सर्वे ऑर्गनायझेशनचे प्रतिनिधी	: सदस्य
५. विमा कंपनीचे प्रतिनिधी	: सदस्य
६. कृषि उपसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय	: सदस्य सचिव

६.४) पीक कापणी प्रयोगाचे तालुकास्तरावरील समितीची रचना व कार्ये:-

तालुकास्तरीय पीक कापणी प्रयोगाचे सनियंत्रण करणे, कृषि, महसूल व ग्राम विकास विभागाशी समन्वय ठेवून अंमलबजावणी करणे, पीकांच्या उत्पादनाची आकडेवारी अचूक व वेळेत उपलब्ध होण्यासाठी कार्यवाही करणे, पीक कापणी प्रयोगाच्या वेळी येणाऱ्या विविध अडचणीच्या संदर्भात विचार विनिमय करुन निर्णय घेणे व योजनेची अमलबजावणी मार्गदर्शक सूचनांच्या अधिन राहून कार्यवाही करणे, याबाबतची तालुकास्तरावर समिती खालीलप्रमाणे स्थापन करण्यात येत आहे.

१) तहसीलदार	: अध्यक्ष
२) गटविकास अधिकारी, पंचायत समिती	: सदस्य
३) तालुका कृषि अधिकारी	: सदस्य
४) संबंधित तालुका कार्यालयातील कृषि अधिकारी	: सदस्य सचिव
५) संबंधित विमा कंपनीचे प्रतिनिधी	:सदस्य

७. ग्रामस्तरीय समितीची रचना व कार्ये:

महसूल विभागाकडील पीक कापणी प्रयोग असल्यास तलाठी ग्रामस्तरीय समितीचे अध्यक्ष राहील. कृषि विभागाकडे पीक कापणी प्रयोग असल्यास या समितीचे अध्यक्ष कृषि सहायक राहील व ग्राम विकास विभागाकडे पीक कापणी प्रयोग असल्यास समितीचे अध्यक्ष ग्राम सेवक राहील. याचबरोबर पीक कापणी प्रयोग घेण्यात येणाऱ्या गावातील ग्रामस्तरिय समितीमध्ये दोन प्रगतशील शेतकरी यांचा समावेश करण्यात येत असून त्यानुसार खालीलप्रमाणे ग्रामस्तरिय समितीची रचना सुधारीत करण्यात येत आहे.

१. कृषि सहायक/ग्रामसेवक /तलाठी	: अध्यक्ष
२. ग्रामपंचायत नामनिर्देशित एक ग्रामपंचायत सदस्य	: सदस्य
३. पोलिस पाटील	: सदस्य
४. प्रगतशील शेतकरी	: सदस्य
५. प्रगतशील शेतकरी	: सदस्य

८. पीक कापणी प्रयोगासाठी श्रमीक सेवा मजुरी:-

वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे प्रति पीक कापणी प्रयोगनिहाय देय मानधन अनुज्ञेय राहील.

९. जिल्हयात पीक कापणी प्रयोगासाठी मोबाईल ॲपचा प्रभावीपणे वापर :-

उपरोक्त संदर्भ क्र. ५ नुसार पीक विमा योजनेंतर्गत पीक कापणी प्रयोगाचा तपशिल संकलीत करणेसाठी मोबाईल ॲपचा १०० टक्के वापर करणे बंधनकारक केले आहे. त्यानुसार पीक कापणी प्रयोगाच्या १०० टक्के नोंदी CCE App वर होण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय कर्मचारी यांनी कार्यवाही करावी. याबाबात आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आवश्यक सूचना निर्गमित कराव्यात.

१०. पीक कापणी प्रयोगाद्वारे प्राप्त आकडेवारी पीकांची उत्पादकता, पीकविमा, पैसेवारी व इतर बाबीकरिता ग्राह्य धरण्यात यावी. पैसेवारी समितीने स्वतंत्र पीक कापणी प्रयोग आयोजित करण्याची आवश्यकता नाही. पीक कापणी प्रयोगाच्या आकडेवारीचा उपयोग करून विहीत कार्यपद्धतीनुसार परिच्छेद ६.४ नुसार गठीत समितीने मंडळनिहाय पैसेवारी जाहीर करावी.

११. पीक कापणी प्रयोगांमध्ये सुसूत्रता येण्याकरिता सर्व संबंधितांनी वरीलप्रमाणे सूचनांचे पालन करावे. सर्व विभागीय आयुक्त, आयुक्त (कृषि) व सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आवश्यक ते पूरक आदेश सर्व संबंधितांना निर्गमित करावेत.

१२. Single Series पध्दतीचा अवलंब करून पीक कापणी प्रयोगाद्वारे प्राप्त होणाऱ्या आकडेवारी संदर्भातील विधिमंडळ कामकाज, न्यायालयीन प्रकरणे, नागरिकांना माहिती पुरविणे व इतर अनुषंगिक बाबी कृषी विभागामार्फत हाताळण्यात येतील.

१३. सदरचे परिपत्रक कृषी विभाग व ग्रामविकास विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

१४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२२१०१८१७०४३९९६१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Sanjay Audumbar Dharurkar
Date: 2022.10.19 12:35:03 +05'30'

(संजय औ. धारूरकर)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४) सर्व मा. लोकसभा सदस्य/राज्यसभा सदस्य (महाराष्ट्रातील)
५) सर्व मा. विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य
६) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
७) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव (महसुल), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (ग्रामविकास), ग्रामविमास विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) सर्व विभागीय आयुक्त

महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख (अभिलेख नोंदवहया तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम,१९७१ गाव नमुना नं.१२ मध्ये सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः जमीन- २०२२/प्र.क्र.७३ /ज-१ अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २५ नोव्हेंबर, २०२२

वाचा -

१. शासन निर्णय क्रमांक जमीन-२०१८/प्र.क्र.९२/ज-१अ, दिनांक १२/०९/२०१८
२. शासन निर्णय क्रमांक जमीन-२०१८/प्र.क्र.९२/ज-१अ, दिनांक ३०/०७/२०२१

प्रस्तावना -

पीक पेरणीची माहिती भ्रमणध्वनी वरील ॲप द्वारा (Mobile App) गा.न.नं.१२ मध्ये नोंदविण्यासाठी स्वत: शेतकऱ्यांनी उपलब्ध करुन देण्याचा "ई-पीक पाहणी" कार्यक्रम संपूर्ण राज्यात राबविण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना संदर्भाधीन क्र.२ दिनांक ३० जुलै, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिशानिर्देश देण्यात आलेले आहेत. हा "ई-पीक पाहणी" कार्यक्रम टाटा ट्रस्टसच्या सहकार्याने /मदतीने, त्यांनी विकसित केलेल्या आज्ञावलीद्वारे दिनांक १५ ऑगस्ट,२०२१ पासून संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे. यानुसार, शासनाने डिजिटल इंडिया लँड रेकॉर्ड मॉडर्नायझेशन अंतर्गत ई फेरफार प्रकल्प संपूर्ण राज्यभर कार्यान्वित केलेला असून, त्या अंतर्गत गाव पातळीवर फेरफार प्रक्रियेचे संगणकीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे गाव नमुना नंबर ७ ऑनलाईन पद्धतीने फेरफार घेऊन अद्ययावत केला जातो.

गाव नमुना नंबर १२ चा सध्याचा प्रचलित नमुना पाहिला असता त्यामध्ये संदर्भाधीन क्रमांक १ दिनांक १०.०९.२०१८ शासन निर्णय अन्वये खाते नंबर समाविष्ट करण्याबाबत दुरुस्ती करण्यात आली आहे. मात्र मिश्र पिकाखालील क्षेत्र यास्तंभामध्ये स्तंभ क्रमांक ४ मिश्र पिकाचा सांकेतांक, स्तंभ क्रमांक ५ जलसिंचित व स्तंभ क्रमांक ६ अजलसिंचित असे स्तंभ असून त्यामध्ये आजपर्यंत कोणतीही माहिती नोंदवली गेलेली नाही. शेतकऱ्यांमध्ये देखील या स्तंभांबाबत संभ्रम असल्याचे दिसून येते. गाव नमुना नंबर १२ वाचतानाही तो समजणे शेतकऱ्यांना अडचणीचे होत आहे. सध्या वापरात असलेल्या ई-पीक पाहणी मोबाईल ॲपमध्येही सदरची माहिती भरण्याची सुविधा उपलब्ध नाही, त्यामुळे सध्या वापरात असलेला गाव नमुना नंबर १२ मध्ये सुटसुटीतपणा आणण्यासाठी व तो शेतकऱ्यांना समजण्यासाठी सोपा करण्यासाठी कालानुक्रमे त्यामध्ये बदल करणे आवश्यक आहे.

त्याच पद्धतीने राज्यात गाव नमुना नंबर १२ मध्ये देखील वस्तुनिष्ठ पिकांच्या नोंद घेण्यासाठी पारंपारिक पध्दतीने तलाठ्यांमार्फत पिक पाहणी नोंदविण्याची पद्धत बंद करून मोबाईल ॲपद्वारे ई- पीक पाहणीच्या माध्यमातून पारदर्शकपणे व अचूक पद्धतीने शेतकऱ्यांचा सहभाग घेऊन शासनाकडे अत्यंत वस्तुनिष्ठ व योग्य पिकांचे आकडेवारी ची माहिती संकलित करण्यासाठी मोबईल ॲप द्वारे उपलब्ध करुन

दिलेली आहे हे बदल लक्षात घेता, महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख (नोंदवहया तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ मधील नियम ३ मधील नमुना एक मध्ये (म्हणजेच गाव नमुना नंबर १२) मध्ये देखील सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख (नोंदवहया तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ मधील नियम ३ मधील नमुना एक मध्ये (म्हणजेच **सध्या प्रचलित** गाव नमुना नंबर १२) **मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे** :-

खालील स्तंभ रद्द करण्यात यावेत :-

स्तंभ क्रमांक ४	स्तंभ क्रमांक ५	स्तंभ क्रमांक ६	स्तंभ क्रमांक ७
मिश्र पिकाचा सांकेतांक	जलसिंचित	अजलसिंचित	पिकाचे नाव

त्याऐवजी खालीलप्रमाणे स्तंभ नोंदविण्यात यावेत :-

पिकाचा प्रकार	पिकाचे नाव	पिकाचे क्षेत्र	
		जल सिंचित	अजल सिंचित
४	५	६	७
निर्भेळ			
मिश्र			

०२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२११२५१७२६००३३१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAMESH SHIVAJI CHAVAN

Digitally signed by RAMESH SHIVAJI CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7ada4e8fa11566f3b9c9f7b5fa123945d54f8e3d5b09d05bedfa09b97ee45cad, pseudonym=868187613BCFE5A3E889A80B442F95DD2288C273, serialNumber=EB458B05E05EE27F435BD399537405D44E1C88021CF038B060AC10B9D8FB8787, cn=RAMESH SHIVAJI CHAVAN
Date: 2022.11.25 17:30:59 +05'30'

(रमेश चव्हाण)
सह सचिव, महसूल व वन विभाग

प्रत,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री याचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
३) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
४) मा.विरोधी पक्षनेता (विधान सभा/ विधान परिषद) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई-४०० ०३२,
५) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई-३२,
७) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२,

शासनाचे इतर विभाग, वित्तीय संस्था व इतर यांना संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने गा.न.नं.७/१२, गा.न.नं.८-अ व फेरफार या अधिकार अभिलेख Application Programming Interface (APIs) व्दारे उपलब्ध करून देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०२१/प्र.क्र.२३५/ल-१.
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक : २९ नोव्हेंबर, २०२२

संदर्भ :-

१) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्रमांक :-राभूअ-२०१३/प्र.क्र.३२/ल-१, दिनांक २३.०१.२०१३.
२) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्रमांक :-राभूअ-२०१८/प्र.क्र.३४/ल-१, दिनांक ३१.०१.२०१९.
३) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्रमांक :-राभूअ-२०१८/प्र.क्र.३९७/ल-१, दिनांक ३१.०१.२०१९.
४) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक रा.भू.४/निशुल्क ७/ब/बारा/२०२१, दिनांक १७.०६.२०२१.
५) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्रमांक :-संकिर्ण-२०२१/प्र.क्र.२३५/ल-१, दिनांक १८.०४.२०२२.
६) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक रा.भू.४/अधिकार अभिलेख APIs/२०२२, दिनांक १३.५.२०२२ व दिनांक १६.६.२०२२.

प्रस्तावना :-

राज्यात डिजीटल भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम ई-महाभूमि या नावाने राबविण्यात येत आहे. ई-महाभूमि अंतर्गत विकसीत करण्यात आलेल्या आज्ञावलीमधून गा.न.नं.७/१२, गा.न.नं.८-अ व गा.न.नं.६ या अधिकार अभिलेखांच्या नक्कला संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने ऑनलाईन पध्दतीने संदर्भाधीन क्रमांक २ अन्वये ठरविण्यात आलेले शुल्क/रक्कम आकारण्यात येवून उपलब्ध करून देण्यात येत आहेत. परंतु, इतर विभाग, वित्तीय संस्था व इतर यांना संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने गा.न.नं.७/१२, गा.न.नं.८-अ व फेरफार या अधिकार अभिलेख Application Programming Interface (APIs) व्दारे उपलब्ध करून देण्याबाबत किती शुल्क आकारण्यात यावे, याबाबत संदर्भाधिन क्र. ५ शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांनी संदर्भाधिन क्र. ६ नुसार संदर्भाधिन क्र. ५ येथील शासन निर्णय दुरूस्त करण्याबाबत प्रस्ताव सादर केला आहे. त्यास अनुसरून संदर्भाधिन क्र.५ येथील दिनांक १८.४.२०२२ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येत असून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

ई-महाभूमि अंतर्गत विविध प्रकल्पांना स्वयंसहाय्यित बनविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची उभारणी करण्याच्या दृष्टीने व संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने गा.न.नं.७/१२, गा.न.नं.८-अ व फेरफार या अधिकार अभिलेख

पृष्ठ ३ पैकी १

Application Programming Interface (APIs) व्दारे उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सेवांकरिता आकारण्यात येणाऱ्या शुल्काची विभागणी पुढीलप्रमाणे निर्धारित करण्यात येत आहे.

सशुल्क/निशुल्क वितरण तक्ता

अ.क्रं.	वापरकर्ता	देण्यात येणाऱ्या ७/१२, ८-अ व फेरफार माहितीचे स्वरूप	शुल्क सुविधा	प्रस्तावित सेवाशुल्क	विविध घटकांचा हिस्सा
१	२	३	४	५	६
१.	नागरिक (एकल)	i)संगणकीकृत स्वाक्षरीत PDF स्वरूपात.	प्रिपेड वॉलेट	र.रू.१५/- प्रति अभिलेख	DILRMP चे SC&DLR यांचे स्वीय प्रपंजी लेखा खाते र.रू.१०/- महाराष्ट्र शासन र.रू.५/-
२.	सरकारी/खाजगी बँका, वित्तिय संस्था अथवा इतर खाजगी संस्था.	i)संगणकीकृत स्वाक्षरीत PDF स्वरूपात.	पोस्टपेड १ महिना क्रेडीट	र.रू.१५/- प्रति अभिलेख	DILRMP चे SC&DLR यांचे स्वीय प्रपंजी लेखा खाते र.रू.१०/- महाराष्ट्र शासन र.रू.५/-
		ii)संगणकीकृत स्वाक्षरीत डेटा स्ट्रीम (डेटा स्वरूपात.)	पोस्टपेड १ महिना क्रेडीट	र.रू.१५/ - प्रति अभिलेख	DILRMP चे SC&DLR यांचे स्वीय प्रपंजी लेखा खाते र.रू.१०/- महाराष्ट्र शासन र.रू.५/-
३.	महाराष्ट्र व भारत सरकारची महामंडळे व सार्वजनीक उपक्रम	i)संगणकीकृत स्वाक्षरीत PDF स्वरूपात.	पोस्टपेड १ महिना क्रेडीट	र.रू.१०/- प्रति अभिलेख	DILRMP चे SC&DLR यांचे स्वीय प्रपंजी लेखा खाते र.रू.१०/-
		ii)संगणकीकृत स्वाक्षरीत डेटा स्ट्रीम (डेटा स्वरूपात.)	पोस्टपेड १ महिना क्रेडीट	र.रू. ६/- प्रति अभिलेख	DILRMP चे SC&DLR यांचे स्वीय प्रपंजी लेखा खाते र.रू.६/-
४.	भारत सरकार व महाराष्ट्र शासनाचे असे विभाग जे महसूल अभिलेख घेऊन स्व विभागाकडील Data Share करत नाहीत.	i)संगणकीकृत स्वाक्षरीत PDF स्वरूपात.	पोस्टपेड १ महिना क्रेडीट	र.रू.१/- प्रति अभिलेख	DILRMP चे SC&DLR यांचे स्वीय प्रपंजी लेखा खाते र.रू.१/-
		ii)संगणकीकृत स्वाक्षरीत डेटा स्ट्रीम (डेटा स्वरूपात.)	-	र.रू.१/- प्रति अभिलेख	DILRMP चे SC&DLR यांचे स्वीय प्रपंजी लेखा खाते र.रू.१/-
५.	भारत सरकार व महाराष्ट्र शासनाचे असे विभाग जे महसूल अभिलेख सेवा घेऊन Data Share करतात.	i)संगणकीकृत स्वाक्षरीत PDF स्वरूपात.	-	निशुल्क	-
		Ii)संगणकीकृत स्वाक्षरीत डेटा स्ट्रीम (डेटा स्वरूपात.)	-	निशुल्क	-

२. उपरोक्त वापरकर्त्याशिवाय UPMU व्दारे वा UPMU च्या मदतीने अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या सर्व प्रकल्पांना सदर सेवा निशुल्क उपलब्ध होईल.

३. Application Programming Interface (APIs) व्दारे संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने गा.न.नं.७/१२, गा.न.नं.८-अ व फेरफार हे अधिकार अभिलेख ज्यांना उपलब्ध करून द्यावयाचे आहेत त्यांच्यासोबत सामंजस्य करार करण्यासाठी या शासन निर्णयान्वये जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना अधिकार देण्यात येत आहेत.

४. Application Programming Interface (APIs) व्दारे संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने गा.न.नं.७/१२, गा.न.नं.८-अ व फेरफार हे अधिकार अभिलेख उपलब्ध करून देण्याबाबत सामंजस्य करार करताना जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना योग्य व आवश्यक वाटतील अशा अटी व शर्तींचा सामंजस्य करारामध्ये समावेश करता येईल.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौ.संदर्भ क्र.११५/सासं/२०२२,दिनांक १४/०७/२०२२ रोजीच्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२११२९१७०२४९१०१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

BHAGWAN MARUTI SAWANT

Digitally signed by BHAGWAN MARUTI SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8ee89eb0aec64f8bcc0bd8d85ddb4706d35abd8b73c618e114ee98d5c9ecf57b, pseudonym=6A69B309A62B1D99F5A420A26B723ECE6ABBAA60, serialNumber=C7DBA1C68SF7AB2A6CABC4F7EAD8CFA74F8F7A0FADCAC76D8F1CF22569F168D3, cn=BHAGWAN MARUTI SAWANT
Date: 2022.11.29 17:05:36 +05'30'

(भगवान सावंत)
अवर सचिव

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
३. सर्व मा. मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
४. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
५. मा. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
६. मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खासगी सचिव, विधान भवन, मुंबई.
७. मा.उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
८. मा. विरोधी पक्षनेता (विधानपरिषद) यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
९. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा) यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
१०. मा.मुख्य सचिव , महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई.
११. अपर मुख्य सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई.
१२. अपर मुख्य सचिव (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई.
१३.जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१५. महालेखापाल (वाणिज्यिक लेखा परिक्षा) मुंबई.
१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१७. निवासी लेखा परिक्षण अधिकारी, मुंबई.
१८. निवड नस्ती (ल-१).

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः जमीन- २०२२/प्र.क्र.९४/ज-१ अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ३० नोव्हेंबर,२०२२.

प्रस्तावना -

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६, महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका (खंड-४) भाग दोन महाराष्ट्र राज्यातील ग्राम पातळीवरील महसूली लेखांकन पध्दती, महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१ मधील तरतुदींनुसार राज्याच्या ग्रामीण क्षेत्रात ग्राम पातळीवर महसूली लेखे ठेवण्याकरिता विविध गाव नमुने व दुय्यम नोंदवहया विहित करण्यात आलेल्या आहेत. यामधील गाव नमुना नं ७ हा "अधिकार अभिलेख विषयक असून गाव नमुना नं. १२ हा "पिकांची नोंदवही ठेवण्यासंदर्भात आहे. उक्त नमूद नियमपुस्तिकेतील गा.न.नं. ७-१२ संबंधी खुलासा अधिकार अभिलेख आणि पिकांची नोंदवही या शीर्षाखाली प्रकरणांमध्ये या एकत्रित नमुन्यावरील सर्वसाधारण सूचना तसेच पीक नोंदवहीमधील नोंदी घेण्यासंदर्भातील कार्यपध्दती नमूद केलेली आहे.

सदयस्थितीत, राज्यातील सर्व ७/१२ व मिळकत पत्रिका यांना ULPIN (अद्वितीय भूभाग ओळख क्रमांक) देण्याच्या अनुषंगाने, राज्यातील सर्व ७/१२ व मिळकत पत्रिका यांना ULPIN (अद्वितीय भूभाग ओळख क्रमांक) देण्यासंदर्भातील कार्यवाही करण्यासाठी सर्व क्षेत्रीय **महसूली प्राधिकारी व अधिकारी तसेच संबंधित यंत्रणांना सूचना देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती**.

शासन निर्णय

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम,१९७१ मधील तरतूदींन्वये प्राप्त अधिकारानुसार, संगणकीय प्रणालीद्वारा ७/१२ व मिळकत पत्रिका यांना देण्यात येणारा ULPIN (अद्वितीय भूभाग ओळख क्रमांक) यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

अ.७/१२:-

१) "गट क्रमांक व उपविभाग" या दर्शकाच्यापुर्वी त्याच ओळी मध्ये सुरूवातीला "ULPIN": "....." असा ULPIN क्रमांक दर्शविण्यात यावा.

२) "ULPIN" शी संबंधित Scan करावयाचा "QR Code" गाव नमुना नं.७ वर उजवीकडील कोपऱ्यात दर्शविण्यात यावा व त्याखाली छोटया अक्षरात ULPIN क्रमांक दर्शविण्यात यावा.

ब. मिळकत पत्रिका:

१) मिळकत पत्रिकेच्या दर्शनी भागातील शीर्ष ठिकाणी महाराष्ट्र शासनाचे बोध चिन्ह लावण्यात यावे.

२) ULPIN चा ULPIN क्रमांक हा मिळकत पत्रिकेच्या प्रथम ओळीच्या वर डावीकडे दर्शविण्यात यावा.

३) ULPIN चा QR Code (ULPIN) मिळकत पत्रिकेच्या दर्शनी भागावर उजव्या कोपऱ्यावर नमूद करण्यात यावा आणि त्या खाली ULPIN क्रमांक दर्शविण्यात यावा.

यानुसार, उपरोक्त प्रमाणे ULPIN क्रमांक. त्याचा QR Code तसेच मिळकत पत्रिकेवर शीर्षस्थानी महसूल विभागाचे बोधचिन्ह केल्यानंतर दिसणाऱ्या ७/१२ आणि मिळकत पत्रिका (नमुना प्रती) यांच्या प्रतीचा नमुना अनुक्रमे परिशिष्ट "अ" व "ब" मध्ये जोडला आहे.

०२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२२११३०१६०००८४५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAMESH SHIVAJI CHAVAN

Digitally signed by RAMESH SHIVAJI CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7ada4e8fa11566f3b9c9f7b5fa123945d54f8e3d5b09d05bedfa09b97ee45cad, pseudonym=868 1E7613BCFE5A3E889AB0B442F95DD2288C273, serialNumber=E84580E0E05EE27F435BD39953740 5D44E1C88021CF038B060AC10B9D8FB8787, cn=RAMESH SHIVAJI CHAVAN
Date: 2022.11.30 16:03:55 +05'30'

(रमेश चव्हाण)
सह सचिव, महसूल व वन विभाग

प्रत,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री याचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
३) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
४) मा.विरोधी पक्षनेता (विधान सभा/ विधान परिषद) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई-४०० ०३२,
५) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई-३२,
७) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२,
८) महालेखापाल, लेखा व अनुज्ञयेता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (१,) मुंबई,
९) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (२) नागपूर,
१०) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२,
११) सर्व विभागीय आयुक्त,
१२) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१३) नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१४) सर्व जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी,
१५) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२,
१६) सर्व उप विभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी) / सर्व जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख,
१७) सर्व तहसिलदार/ सर्व तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
१८) सर्व सह सचिव /उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
१९) "ज" समूहातील सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
२०) निवडनस्ती (कार्यासन ज-१ अ), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.

शासन निर्णय क्रमांक : जमीन-२०२२/प्र.क्र.९४/ज-१अ, दिनांक ३०/११/२०२२ सोबतचे

परिशिष्ट "अ"

महाराष्ट्र शासन

गाव नमुना सात (अधिकार अभिलेख पत्रक)

[महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१ यातील नियम ३,५,६ आणि ७]

XXXXXXXXXXX

गाव :- तालुका :- जिल्हा :-

ULPIN : XXXXXXXXXXX गट क्रमांक व उपविभाग :

भू-धारणा पध्दती : शेताचे स्थानिक नाव :

क्षेत्र, एकक व आकारणी	खाते क्र. भोगवटादाराचे नांव क्षेत्र आकार पो.ख. फे.फा.	कुळ, खंड व इतर अधिकार
क्षेत्राचे एकक अ) लागवड योग्य क्षेत्र जिरायत बागायत - एकुण ला.यो. क्षेत्र ब) पोट-खराब क्षेत्र (लागवड अयोग्य) वर्ग (अ) वर्ग (ब) - एकुण पो.ख. एकुण क्षेत्र (अ+ब) आकारणी जुडी किंवा विशेष आकारणी -		कुळाचे नाव व खंड इतर अधिकार शेवटचा फेरफार क्रमांक : व दिनांक :
जुने फेरफार क्र.		सीमा आणि भुमापन चिन्हे :

गाव नमुना बारा (पिकांची नोंदवही)

[महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम,१९७१ यातील नियम २९]

गाव :- तालुका :- जिल्हा :-

गट क्रमांक व उपविभाग :

			पिकाखालील क्षेत्राचा तपशील					लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन		शेरा
वर्ष	हंगाम	खाता क्रमांक	पिकाचा प्रकार	पिकाचे नाव	जल सिंचित	अजल सिंचित	जल सिंचनाचे साधन	स्वरूप	क्षेत्र	
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)
					हे.आर. चौ.मी	हे.आर. चौ.मी				

टीप : * सदरची नोंद मोबाइल ॲप द्वारें घेणेत आलेली आहे

शासन निर्णय क्रमांक : जमीन-२०२२/प्र.क्र.९४/ज-१अ, दिनांक ३०/११/२०२२ सोबतचे
परिशिष्ट "ब"

महाराष्ट्र शासन

मालमत्ता पत्रक

ULPIN:
XXXXXXXXXX

[महाराष्ट्र जमीन महसूल (गाव, नगर व शहर भूमापन) नियम,१९६९ यातील नियम ७ नमुना "ड"]

XXXXXXXXXX

गाव/पेठ :	तालुका/न.भू.का. :	जिल्हा :

नगर भूमापन क्रमांक	शिट नंबर	प्लॉट नंबर	क्षेत्र चौ.मी.	धारणाधिकार	शासनाला दिलेल्या आकारणीचा किंवा भाड्याचा तपशील आणि त्याच्या फ़ेरतपासणीची नियत वेळ

सुविधाधिकार :
हक्काचा मूळ धारक : वर्ष :
पट्टेदार :
इतर भार :
इतर शेरे :

दिनांक	व्यवहार	खंड क्रमांक	नविन धारक(धा), पट्टेदार(प) किंवा भार (इ)	साक्षांकन

डिजीटल स्वाक्षरी डेटाबेस आधारीत संगणकीकृत अधिकार अभिलेखास (मिळकत पत्रिका, फेरफार, व इतर संगणकीकृत तयार होणारे दस्तऐवज) कायदेशीर वैधता देण्यासंदर्भात क्षेत्रिय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना निर्देश देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०२२/प्र.क्र.१९९/ल-१.
मुख्य इमारत, पहिला मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ६ डिसेंबर, २०२२.

वाचा :- १. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. राभूअ-२०१६/प्र.क्र.३५०/ल-१, दिनांक ३१.०३.२०१७.
२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. राभूअ-२०१९/प्र.क्र.२८९/ल-१, दिनांक २.७.२०२२.
३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे याचे क्र. ना.भू.-१, /ePCIS/डिजीटल स्वाक्षरी/२०२२, दि.२१.०२.२०२२ चे पत्र.

प्रस्तावना -

संदर्भाधिन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील नगरभूमापन झालेल्या भागात मिळकत पत्रिकांच्या व्यवस्थापनाकरीता ई-प्रॉपर्टी कार्ड इन्फॉरमेशन सिस्टीम (e-PCIS) प्रकल्प राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच ई-प्रॉपर्टी कार्ड इन्फॉरमेशन सिस्टीम (e-PCIS) अंतर्गत देण्यात येणाऱ्या संगणकीकृत मिळकत पत्रिकांची नक्कल फी संदर्भाधिन क्र.२ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आली आहे. सर्व नगर भूमापन अधिकारी/उप अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालयात e-PCIS आज्ञावलीचे सहाय्याने ऑनलाईन फेरफार घेण्याची कार्यवाही सुरु झाली आहे. तसेच १) खरेदी २) बक्षिसपत्र ३) हक्कसोड ४) वाटप ५) भाडेपट्टा ६) बोजा दाखल करणे ७) बोजा उतरवणे च्या नोंदणीकृत दस्ताच्या आधारे ऑनलाईन फेरफार (Auto Trigger Mutation) घेण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. डिजीटल स्वाक्षरीत अद्यावत संगणकीकृत मिळकतपत्रिका जनतेसाठी महाभूमि संकेतस्थळावर उपलब्ध होतात. फेरफार प्रक्रियेच्या अनुषंगाने संगणकीकृत तयार होणारे दस्तावेज उदा. फेरफार, परिशिष्ट-अ व ब, नमुना-९ ची नोटीस व इतर संगणकीकृत तयार होणारे दस्तावेज इत्यादी डिजीटल डेटाबेस आधारित संगणकीकृत अधिकार अभिलेखास कायदेशिर वैधता देण्याबाबत क्षेत्रिय महसूली अधिकारी व संबंधित प्राधिकारी यांना निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन परिपत्रक :-

माहिती व तंत्रज्ञान अधिनियम, २००० च्या कलम ४, ५, ६, ७ व ८ मधील तरतूद आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम,१९७१ व महाराष्ट्र जमीन महसूल (गाव, नगर व शहर भूमापन) नियम १९६९ मधील तरतुदीनुसार, प्राप्त अधिकारात क्षेत्रीय महसूली यंत्रणा व प्राधिकारी आणि संबंधित सक्षम प्राधिकारी यांना खालीलप्रमाणे दिशानिर्देश देण्यात येत आहेत.

१. शासनाच्या महाभूमि पोर्टलवर https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावरुन व भूमि अभिलेख विभागाचे अधिकृत संकेतस्थळावरुन उपलब्ध होणारे क्यु आर कोड (QR CODE) व १६ अंकी पडताळणी क्रमांक असलेले डिजीटल स्वाक्षरीत डेटाबेस आधारित संगणकीकृत मिळकत पत्रिका, (Digitally Signed Property Card) उतारा तसेच डिजीटल स्वाक्षरीत फेरफार नोंदवही व अनुषंगीक अभिलेख (फेरफार, परिशिष्ट-अ व ब, नमूना-९ ची नोटीस, नमूना-१२ ची नोटीस इ.) सर्व कायदेशीर व शासकिय/निमशासकिय कामकाजासाठी वैध राहतील.

२. अशा डिजिटल स्वाक्षरीत डेटाबेस आधारित संगणकीकृत मिळकतपत्रिका, फेरफार नोंदवहीचा उतारा तसेच e-PCIS आज्ञावलीद्वारे तयार होणारे दस्तऐवज यावर परिरक्षण भूमापक, निमतानदार,नझूल परिरक्षण भूकरमापक, मुख्यालय सहायक अथवा अन्य कोणत्याही अधिका-याची (शाईची/हस्ताची) स्वाक्षरी असण्याची आवश्यकता नाही.

३. दिनांक ०१.०१.२०२३ पासून मिळकत पत्रिकेची हस्तलिखित व फोटोकॉपी प्रमाणीत नक्कलांचे वितरण पूर्णत: बंद करण्यात येत आहे. त्यामुळे मिळकतपत्रिकेची हस्तलिखित व फोटोकॉपीची प्रमाणीत नक्कल दिनांक ०१.०१.२०२३ पासून देण्यात येऊ नये.

४. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांचेमार्फत "e-PCIS आज्ञावली" विकसित करणेत आली आहे. या आज्ञावलीद्वारे नगर भूमापनाकडील फेरफार संगणकाद्वारे ऑनलाईन घेण्यास मान्यता देण्यात येत असून दिनांक ०१.०१.२०२३ पासून हस्तलिखित फेरफार पद्धती पूर्णपणे बंद करण्यात येत आहे.

०२. सर्व उपसंचालक भूमि अभिलेख, जिल्हा अधिक्षक,भूमि अभिलेख व क्षेत्रीय महसूली व भूमि अभिलेख प्राधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांनी या परिपत्रकाची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.

०३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२२१२०६१७३९३७३५१९ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

BHAGWAN MARUTI SAWANT

Digitally signed by BHAGWAN MARUTI SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8ee89eb0aec64f8bc0bdf8d85ddb4706d35abd8b73c618e114ee98d5c9ecf57b, pseudonym=6A69B309A6281D99F5A420A26872 3EC E6A8B4A60, serialNumber=C7DBA1C6B5F7AB2A6CABC4F7EADBCFA74F8F7A0FADCAC76D8F1CF22569F16BD3, cn=BHAGWAN MARUTI SAWANT
Date: 2022.12.06 17:44:46 +05'30'

(भगवान सावंत)
अवर सचिव

प्रत:-

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन,मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
४. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/विधानपरिषद) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.
५. मा.मुख्य सचिव यांचे सहसचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य, (१) मुंबई.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य, (२) मुंबई.
९. जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमी अभिलेख (म.रा.) पुणे.
१०. सर्व विभागीय आयुक्त.
११. सर्व जिल्हाधिकारी.
१२. सर्व उपसंचालक, भूमी अभिलेख.
१३. सर्व जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख.
१४. सर्व उप जिल्हाधिकारी/सर्व उपविभागीय अधिकारी.
१५. सर्व तहसिलदार.
१६. सर्व उप अधिक्षक, भूमी अभिलेख.
१७. निवड नस्ती (ल-१).

अभिलेखापोटी जमा होणाऱ्या रकमांचा भरणा शासन खाती करण्याबाबतच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्र. : विनिप/अभिलेख-०६/प्र.क्र.(१४/२०२२)/पीएसी-१
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक:- १२ डिसेंबर, २०२२

संदर्भ:-

१. महसूल व वन विभाग शासन निर्णय आरईव्ही-०६१३/प्र.क्र. ८९ / टी-२, दिनांक २६ जुन,२०१५
२. महसूल व वन विभाग पत्र क्रमांक आरईव्ही - ०३१७/प्र.क्र. २७ / टी-२, दिनांक ७ एप्रिल, २०१७
३. महसूल व वन विभाग पत्र क्रमांक -विनिप/अभिलेख-०६/प्र.क्र.(१४/२०२२)/पीएसी-१ दि.०६/७/२०२२.

प्रस्तावना-

सर्वसाधारणपणे जिल्हाधिकारी कार्यालय / उप विभागीय अधिकारी कार्यालय / तहसिलदार कार्यालयात अभिलेख्यापोटी खालील बाबींकरीता शासनास रकमा प्राप्त होतात.

i. विविध प्रकारचे कोरे नमुने विक्री रक्कम
ii. विविध प्रकारच्या प्रमाणित प्रती
iii. विविध प्रकारचे निवाडा आदेशाच्या प्रती
iv. शोध / शोधनावळ फी
v. नक्कल फी ई.

संदर्भ क्र.१ व २ अन्वये शासनाने " ००२९- जमीन महसूल, ००४५- करमणुक कर व ०८५३ - गौण खनिजे उत्खनन नियमापासून मिळणाऱ्या जमा रकमां " या लेखाशिर्षाखाली सर्व रकमा या ग्रास (GRAS) प्रणालीव्दारेच जमा करण्याचे निर्देश दिलेले आहेत. परंतु मंत्रालयीन विशेष निरीक्षण पथकाच्या अचानक तपासणीत असे निर्देशनास आले की, काही कार्यालयात अजुनही सदरच्या रकमा या मन्युअली बँकेत भरल्या जातात, तर काही कार्यालयात अभिलेख्यापोटी जमा रकमा योग्य त्या लेखाशिर्षाखाली विहित मुदतीत भरल्या जात नाही. तर काही कार्यालयात अभिलेखाकरीता जमा रकमा करीता दुय्यम नोंदवही ठेवली जात नाही किंवा ठेवली तरी सर्व कार्यालयात तिचा विहीत नमुना एक समान नाही. म्हणून संदर्भ क्र. ३ च्या पत्रान्वये अभिलेखापोटी प्राप्त होणाऱ्या रकमा शासन खाती जमा करण्याबाबतच्या सुचना निर्गमित करण्यात आल्या होत्या, परंतु विभागीय आयुक्त कार्यालयाकडून सदरच्या एकत्रित सूचना संबंधितांना कळविल्या गेल्या नसल्याने अजुनही काही कार्यालयात अभिलेख्यापोटी जमा रकमा या मॅन्युअली बँकेत चुकीच्या लेखाशिर्षाखाली भरल्या जातात.

अभिलेखाकरीता स्विकृत करण्यात येणाऱ्या रकमा, त्यांचा भरणा व त्याकरीता ठेवायची नोंदवही याबाबत संपूर्ण महाराष्ट्रात एक समानता राहण्यासाठी सर्व संबधित कार्यालयांना खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत. सदरच्या सूचना या फक्त मार्गदर्शक स्वरूपाच्या असून, अभिलेख्यापोटी जमा रकमा स्विकारताना व त्या शासन खाती जमा करताना शासनाने विहित केलेले अधिनियम / नियम / शासन निर्णय / परिपत्रके यांचे पालन करण्यात यावे.

परिपत्रक-

१. संदर्भ क्र.१ व २ अन्वये निर्देशित केल्यानुसार अभिलेख्यांपोटी जमा होणाऱ्या सर्व रकमा या यापुढे **फक्त (GRAS) प्रणालीव्दारेच** शासन खाती जमा करण्यात याव्यात. सदर रकमांचा कोणत्याही परिस्थितीत मॅन्युअली पध्दतीने शासन खाती भरणा करण्यात येऊ नयेत.

२. वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. संकिर्ण-२०२०/प्र.क्र.३७/ कोषाप्रशा-४, दिनांक २५.८.२०२० नुसार रक्कम रू.५०/- किंवा त्यापेक्षा जास्त रक्कमेची चलने GRAS प्रणालीद्वारे भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्याचाही उपयोग अभिलेख्यापोटी देय रकमा स्विकराताना / भरताना करावा.

३. ज्या खातेदारांची रक्कम रू.५०/- पेक्षा कमी असेल अशा खातेदारांकडून ती रोखीने घेण्यात यावी व त्यानुसार जमा झालेली रक्कम ही रू.५०/- झाल्यावर लागलीच ती ग्रास प्रणालीद्वारे शासन खाती जमा करण्यात यावी.

४. अपवादात्मक परिस्थिती / तांत्रिक अडचणी असल्याच अभिलेख्यापोटी जमा होणाऱ्या रकमा रोखीने स्विकारण्यात याव्यात. मात्र कोणताही खातेदार सेवेपासून वंचित राहणार नाही याची कृपया दक्षता घेण्यात यावी.

५. अभिलेख्यांपोटी जमा होणाऱ्या सर्व रकमा (नक्कल फी, शोध फी कोरे नमुने विक्री इ.) या आपापल्या विभागाप्रमाणे खाली नमुद केलेल्या संकेतांकाखालीच शासन खाती फक्त ग्रास (GRAS) प्रणाली मार्फत भरणा करण्यात याव्यात.

जमा लेखाशिर्ष :- ००२९ जमीन महसूल, ८०० इतर जमा रकमा, (०५) इतर बाबी ...

अ.क्र.	विभागाचे नाव	योजना संकेतांक
१	विभागीय आयुक्त, कोकण	००२९११११
२	विभागीय आयुक्त, नाशिक	००२९११२९
३	विभागीय आयुक्त, पुणे	००२९११३८
४	विभागीय आयुक्त, अमरावती	००२९११४७
५	विभागीय आयुक्त, नागपूर	००२९११५६
६	विभागीय आयुक्त, औरंगाबाद	००२९११६५

६. महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ मधील नियम क्र.८ नुसार कार्यालयात जमा होणाऱ्या रकमा दोन कार्यालयीन दिवसात शासन खाती भरणे आवश्यक आहे. त्यामुळे अभिलेख्यांकरीता प्राप्त होणाऱ्या रकमा दोन दिवसात शासन खाती भरणा करण्यात याव्यात.

७. शासन महसूल व वन विभाग अधिसूचना क्र. संकीर्ण-१०९५/ प्र.क्र. १२१/ ल-१, दिनांक २५.९.२००१ नुसार अभिलेख्यापोटी जमा होणाऱ्या रकमा स्विकारताना दर आकारण्यात यावेत.

८. अभिलेखाकरीता प्राप्त होणाऱ्या रकमांची चलनांकरीता वर्षनिहाय एक स्वतंत्र फाईल तयार करण्यात येऊन त्यात दिनांकनिहाय चलने लावण्यात यावीत.

९. अभिलेखांच्या ग्रास प्रणालीव्दारे जमा रकमांची चलने ग्रास प्रणालीत न चुकता नियमित Defaced करण्यात यावी व अशी Defaced केलेली चलने देखिल मुळ चलनासोबत सदर नस्तीत लावावीत.

१०. वरिष्ठ कार्यालयास पाठविण्यात येणाऱ्या जमा रकमांच्या विविध अहवालात अभिलेख्याच्या रकमा स्वतंत्र दाखविण्यात याव्यात.

११. शासनाकडुन / वरिष्ठ कार्यालयाच्या तपासणीच्या वेळेस अभिलेखांच्या रकमा संबधीची नोंदवही, चलने इ. दस्तऐवज सदर पथकास दाखविण्यात यावेत.

१२. सोबत जोडलेल्या नमुन्यात अभिलेख्याच्या रकमा स्विकारणाऱ्या प्रत्येक कार्यालयाने स्वतंत्र नोंदवही ठेवावी. सदरची नोंदवही लिहिताना शासन महसूल व वन विभाग परिपत्रक दिनांक १७.११.२०२२ मध्ये दिलेल्या सर्व सुचनांचे पालन करण्यात यावे.

१३. सदर नोंदवहीत महिना संपल्यानंतर जमा झालेल्या रकमांचा दिनांकानिहाय गोषवारा काढण्यात यावा, तर आर्थिक वर्ष संपल्यानंतर एप्रिल ते मार्च असा महिना निहाय गोषवारा काढण्यात यावा.

१४. GRAS द्वारे जमा होणाऱ्या अभिलेख्याच्या प्राप्त होणाऱ्या रकमांचा ताळमेळ शासन वित्त विभाग परिपत्रक दि.०१/०७/२०१६ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार घेण्यात यावा.

१५. वरीलप्रमाणे कार्यवाही होते किंवा कसे याची तपासणी जिल्हयातील अंतर्गत लेखा परिक्षण पथकाकडुन त्या त्या कार्यालयाच्या अंतर्गत लेखा परिक्षणाच्या वेळी तपासण्यात यावी.

१६. **टी / ल-१ कार्यासन**, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सदर बाबींचा वेळोवेळी आढावा घेण्यात यावा.

१७. या सुचना फक्त दिनांक २५.९.२००१ अधिसुचनेप्रमाणे घेण्यात येणाऱ्या रकमांकरीता लागु राहतील, **माहिती अधिकाराकरीता प्राप्त होणाऱ्या रकमांकरीता या सुचना लागु राहणार नाहीत**.

सदरचे परिपत्रक हे महसूल व वन विभागातील कार्यासन ल-१ व टी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२२१२१२१६५५२४९६१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT SOPANRAO DESHMUKH

Digitally signed by AJIT SOPANRAO DESHMUKH
DN: CN = AJIT SOPANRAO DESHMUKH, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = REVENUE AND FOREST DEPARTMENT
Date: 2022.12.12 17:06:42 +05'30'

(अ. सो. देशमूख)
उप सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

१. अप्पर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी), प्रधान सचिव (वने) व प्रधान सचिव (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन), यांचे स्वीय सहायक,

२. महसूल व वन विभागातील सर्व संबंधित उप सचिव / सहसचिव

प्रत :-

१) विभागीय आयुक्त, कोकण / नाशिक / पुणे / औरंगाबाद / अमरावती / नागपूर
२) महालेखाकार (लेखापरीक्षा) १ व २, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
३) जिल्हाधिकारी (सर्व).
४) निवडनस्ती पी ए सी - १.

अभिलेख रकमा जमा नोंदवही नमुना

अभिलेख शाखा ---------- कार्यालय, जि.----------

रोख रक्कमेचे रजिष्टर

दिनांक	पावती क्र.	अर्जदाराचे नाव व गाव	नक्कल फी	पेपर फी	शोधनावळ फी	तपासणी फी	पोस्टेज खर्च	इतर	एकूण
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
माहे--									

महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ मधील नियम २९ व ३० अंतर्गत ई-पीक पाहणी नोंदणी प्रक्रियेतील तरतुदींमध्ये सुधारणा करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः जमीन-२०२२/प्र.क्र.७४/ज-१ अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ३१ जानेवारी,२०२३

वाचा - १. महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१
२.शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक जमीन-२०१८/प्र.क्र.९२/(भाग-१)/ज-१अ, दिनांक ३०/०७/२०२१

प्रस्तावना -

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६. महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका (खंड-४) भाग दोन, महाराष्ट्र राज्यातील ग्राम पातळीवरील महसूली लेखांकन पध्दती, महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१ मधील तरतुदींनुसार राज्याच्या ग्रामीण क्षेत्रात ग्राम पातळीवर महसूली लेखे ठेवण्याकरिता विविध गाव नमुने व दुय्यम नोंदवहया विहित करण्यात आलेल्या आहेत. यामधील गाव नमुना नं ७ हा "अधिकार अभिलेख" विषयक असून गाव नमुना नं. १२ हा "पिकांची नोंदवही" ठेवण्यासंदर्भात आहे. उक्त नमूद नियमपुस्तिकेतील गा.न.नं. ७-१२ संबंधी खुलासा अधिकार अभिलेख आणि पिकांची नोंदवही या शीर्षाखाली प्रकरणांमध्ये या एकत्रित नमुन्यावरील सर्वसाधारण सूचना तसेच पीक नोंदवहीमधील नोंदी घेण्या संदर्भातील कार्यपध्दती नमूद केलेली आहे. त्यानुसार, गाव नमुना नं. १२ मधील पिकांच्या नोंदी या संबंधित तलाठी यांनी घ्यावयाच्या असून, गावभेटी नंतर, सदर नोंदी चुकीच्या आढळल्यास त्या दुरुस्त करण्याबाबतचा अधिकार मंडळ निरीक्षक किंवा त्याहून वरिष्ठ असलेल्या अधिकारी यांना आहे. उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक ३० जुलै २०२१ अन्वये पीक पेरणीची माहिती भ्रमणध्वनी वरील आज्ञावली द्वारा (Mobile App) गा.न.नं. १२ मध्ये नोंदविण्याची सोय स्वतः शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याचा "ई-पीक पाहणी" कार्यक्रम संपूर्ण राज्यात राबविण्याच्या अनुषंगाने दिशानिर्देश देण्यात आलेले आहेत.

क्षेत्रीय स्तरावरुन पीक पाहणी Real time crop data संकलित होण्याच्या दृष्टीने तसेच सदर data संकलित करताना पारदर्शकता आणणे, पीक पेरणी नोंदणी प्रक्रियेत शेतकऱ्यांचा सक्रीय सहभाग घेणे, कृषी पतपुरवठा सुलभ करणे, पीक विमा आणि पीक पाहणी दावे निकाली काढण्याची प्रक्रिया सुलभ करणे, नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास अचूक भरपाई आणि योग्य प्रकारे मदत करणे शक्य व्हावे इत्यादी उद्देशाने शेतकऱ्यांनी त्यांच्या स्मार्ट भ्रमणध्वनीमध्ये ई-पिकपाहणी ॲपची स्थापना करून पीक पाहणी नोंदवण्याची नवीन पध्दत दिनांक १५ ऑगस्ट २०२१ पासून संपुर्ण राज्यात लागू केली आहे.

सध्या ई पीक पाहणी प्रणालीमध्ये शेतकऱ्यांनी नोंदवलेले पीकपाहणीला तलाठी हे मान्यता देतात. त्याऐवजी शेतकऱ्यांनी नोंदवलेली पिक पाहणी ही स्वयंप्रमाणित मानण्यात येवून त्यापैकी केवळ दहा टक्के पिक पाहणीची तपासणी तलाठ्यांमार्फत करणेबाबत सूचना देणे आवश्यक आहे.

वरील सर्व पार्श्वभूमीवर ज्याअर्थी पूर्वीच्या पिकांच्या नोंदी या संबंधित तलाठी यांनी घेण्याचे पद्धतीमध्ये बदल होऊन आता शेतकऱ्यांनी त्यांच्या स्मार्ट भ्रमणध्वनीमधील ई-पिकपाहणी आज्ञावली द्वारे पिकांची माहिती नोंदविण्यास सुरूवात झालेली आहे. त्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख व नोंदवया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ चे नियम २९ आणि ३० मधील तरतुदीनुसार पीक-पाहणी बाबतची प्रक्रिया सुधारणा करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख व नोंदवहया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१, नियम २९ आणि ३० मधील तरतुदीनुसार करावयाची सुधारित कार्यपध्दती पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.:-

अ. पिकांची नोंदवही

प्रत्येक गावामध्ये शेतजमिनीत घेतलेली पिके आणि त्यांचे क्षेत्र दर्शविणारी पिकांची नोंदवही ठेवण्यात येईल. ती प्रत्येक भूमापन क्रमांक किंवा भूमापन क्रमांकाच्या उपविभाग निहाय नमुना क्रमांक XII मध्ये स्वतंत्र स्वरूपात ठेवण्यात येईल. सदर नोंदवहीमध्ये खातेनिहाय पीकपाहणीच्या नोंदी केल्या जातील.

ब. वेब आज्ञावलीद्वारे पिकांच्या नोंदवहीत नोंदी करण्याची प्रक्रिया

(१) दरवर्षी लागवड केलेली पिके शेतात उभी असताना केव्हाही आणि शासनाने वेगवेगळ्या पिकांसाठी ठरवून दिलेल्या तारखेपर्यंत किंवा यथास्थिती शासनाने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याने ठरवून दिलेल्या तारखेपर्यंत, जमीन मालक किंवा जमिनीत लागवड करणाऱ्या व्यक्तीने, शेतात लागवड केलेली पीके वेब आज्ञावलीमध्ये विहित केलेल्या पध्दतीने आणि शासनाने निर्देशित केलेल्या पध्दतीनुसार नोंद करणे आवश्यक राहील. त्या त्या हंगामासाठी लागवड केलेली पिके शासनाने दिलेल्या अधिमान्यतेनुसार मोबाइल किंवा इतर कोणत्याही उपकरणाद्वारे नोंदवली जातील.

(२) जमीन मालक किंवा जमिनीत लागवड करणाऱ्या व्यक्तीने लागवड केलेल्या पिकांच्या तपशीलाबरोबर लागवड केलेले पिकाचे क्षेत्र, जल सिंचनाचे स्रोत व प्रकार, शेताच्या बांधावरील झाडे, कायम पड जमीन, शेतातील पायाभूत सुविधा असल्यास आणि शासनाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या बाबी यांची माहिती नोंदवणे आवश्यक असेल.

(३) जमीन मालक किंवा जमिनीत लागवड करणाऱ्या व्यक्तीने उभ्या पिकाचे, बांधावरील झाडांचे आणि त्याने प्रविष्ट केलेल्या कायम पड जमिनीचे अक्षांश आणि रेखांशासह जिओ टॅग केलेले छायाचित्र वेब आज्ञावलीद्वारा अपलोड करणे आवश्यक असेल.

(४) जमीन मालक किंवा जमिनीत लागवड करणाऱ्या व्यक्तीने त्याने नमूद केलेल्या नोंदींच्या सत्यतेबाबत स्वयंघोषणापत्र वेब आज्ञावलीद्वारा देणे बंधनकारक असेल.

(५) जमीन मालक किंवा जमिनीत लागवड करणारी व्यक्ती त्याने ई-पीक पाहणी प्रणालीद्वारे नोंदविलेल्या पिकांची माहिती, अशी माहिती नोंदविल्यापासून ४८ तासांच्या आत किंवा शासन निर्देश देईल अशा कालावधीच्या आत स्वतः दुरुस्त करु शकेल.

(६) उक्त मुद्दा क्रमांक ५ मध्ये नमूद केलेला कालावधी संपल्यानंतर जमीन मालक किंवा जमिनीत लागवड करणाऱ्या व्यक्तीने नोंदविलेल्या पिकांची आणि इतर माहिती मुद्दा क्र.७ अ मधील बाबी वगळता वैध मानली जाईल आणि अशी माहिती गाव नमुना १२ मध्ये प्रतिबिंबित होईल.

(७) (अ) शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या मापदंड आणि अटीवर आधारित (उदा अस्पष्ट नोंदी, निरंक किंवा चुकीचा जिओ टॅग केलेला फोटो अपलोड करणे इत्यादी) ई-पीकपाहणी प्रणालीत माहिती अपलोड करणाऱ्या एकूण खातेदारांपैकी किमान १०% खातेदारांच्या माहितीची पडताळणी शासन तलाठ्यांद्वारे करेल.

(ब) जमीन मालक किंवा जमिनीत लागवड करणाऱ्या व्यक्तीने ई-पीकपाहणी प्रणालीदवारे नोंद केलेली पिकांची आणि इतर माहिती मुद्दा क्रमांक (७) (अ) मध्ये नमूद कैलेप्रमाणे तलाठ्याद्वारे पडताळणी अंती चुकीची आढळल्यास, संबंधित जमीन मालक किंवा जमिनीत लागवड करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध शासन गाव नमुना बारा मधील संबंधीत नोंद रद्द करणे किंवा शासकीय लाभापासून संबंधितांना वंचित ठेवणे अशी किंवा शासनास योग्य वाटेल अशी इतर कारवाई करु शकेल.

(८) प्रत्येक हंगामासाठी जमीन मालक किंवा जमिनीत लागवड करणाऱ्या व्यक्तींना शासनाने ठरवून दिलेल्या मुदतीमध्ये किंवा यथास्थिती शासनाने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याने ठरवून दिलेल्या मुदतीमध्ये मोबाईल ॲपद्वारे पीक पाहणी न नोंदविलेल्या खातेदारांची पिक पाहणी संबंधित तलाठी यांनी शासनाने त्या हंगामासाठी ठरवून दिलेल्या कालावधीसाठी पूर्ण करणे करणे आवश्यक राहिल.

(९) शासनाने किंवा यथास्थिती शासनाने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याने जमीन मालक किंवा जमिनीत लागवड करणाऱ्या व्यक्तीने ई-पीकपाहणी प्रणालीद्वारे पिकांच्या नोंदीसाठी ठरवून दिलेली कालमर्यादा संपुष्टात आल्यानंतर, उक्त मुद्दा क्रमांक ७ (अ) मध्ये नमूद तरतुर्दीच्या अधीन राहून, तलाठी त्याच्या गाव भेटीचा दिनांक, किमान सात दिवस अगोदर निश्चित करेल आणि असा दिनांक व गाव भेटीचा उद्देश याबद्दल, दवंडीने किंवा अन्य कोणत्याही योग्य पद्धतीने गावकऱ्यांना सुचीत करेल. त्याचप्रमाणे तो गाव भेटीची माहिती सरपंच, ग्रामपंचायतीच्या सदस्यांना आणि इतर संबंधीतांना देईल आणि गावभेटीच्या दिवशी पिक पाहणी पडताळणीच्या वेळी त्याच्यासोबत उपस्थित राहण्याची विनंती करेल.

(१०) गाव भेटीसाठी निश्चित केलेल्या दिनांकास, तलाठी उक्त मुद्दा क्रमांक ७ (अ) प्रमाणे निश्चित केलेल्या खातेक्रमांक निहाय प्रत्येक भूमापन क्रमांक किंवा भूमापन क्रमांकाच्या उपविभागास गावकरी, ग्रामपंचायत सदस्य आणि सरपंच यांच्यापैकी उपस्थित असतील त्यांच्यासह भेट देईल आणि त्या त्या भूमापन क्रमांकांच्या संदर्भात जमीन मालक किंवा जमिनीत लागवड करणाऱ्या व्यक्तीने केलेल्या पिकाच्या नोंदींची पडताळणी करेल आणि त्या नोंदी योग्य आढळल्यास त्यास मान्यता देईल किंवा त्यात आवश्यक दुरुस्त्या केल्यानंतर त्या सत्यापित करेल.

(११) जमीन मालक किंवा जमिनीत लागवड करणाऱ्या व्यक्तीने अंतिमतः नोंदविलेली पीके व इतर नोंदी आणि तलाठी यांनी सत्यापित करून मंजूर केलेल्या नोंदी, शासनाने दिलेल्या अधिमान्यतेनुसार मोबाइल किंवा इतर कोणत्याही उपकरणाद्वारे गावकऱ्यासाठी "केवळ पहा" स्वरुपात गावनिहाय उपलब्ध करून देण्यात येतील.

(१२) मोबाईल उपकरणाद्वारे किंवा इतर कोणत्याही उपकरणाद्वारे नोंदणी केलेल्या ई-पीक पाहणी नोंदीतील दुरुस्तीसाठी जमीन मालक किंवा जमिनीत लागवड करणारी व्यक्ती किंवा ग्रामस्थ संबंधित तलाठी यांचेकडे अर्ज करु शकतील. त्याचप्रमाणे तलाठी स्तरावरुन करण्यात आलेली पीक-पाहणी व तलाठी यांनी मुद्दा क्रमांक ७(अ) प्रमाणे पडताळणी अंती सत्यापित केलेल्या कोणत्याही नोंदीमध्ये दुरुस्तीसाठी संबंधित मंडळ अधिकारी यांचेकडे अर्ज करु शकतील.

(१३) मुद्दा क्रमांक १२ च्या तरतुदींन्वये, असा अर्ज प्राप्त झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, तलाठी/मंडळ अधिकारी नोंदीची पडताळणी करण्याच्या उद्देशाने वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदारास व गावकऱ्यांना आगाऊ सूचना देऊन गावाला भेट देईल आणि रीतसर आवश्यक ती चौकशी व पंचनामा केल्यानंतर चुकीच्या आढळून येणाऱ्या नोंदी दुरुस्त करेल.

(१४) जमीन मालक किंवा जमिनीत लागवड करणारी व्यक्तीने शासनाने दिलेल्या अधिमान्यतेनुसार मोबाइल किंवा इतर कोणत्याही उपकरणाद्वारे नोंदवलेली किंवा तलाठ्याने सत्यापित व मंजूर केलेल्या ई-पीकपाहणी नोंदी, जोपर्यंत आणि उलट सिद्ध होत नाहीत तोपर्यंत सर्व शासकीय योजना आणि लाभ जसे की, पीक कर्ज, पीक विमा इत्यादीसाठी वैध मानल्या जातील.

(१५) ई-पीक पहाणीची माहिती ३ वर्षांसाठी ऑनलाइन उपलब्ध ठेवण्यात येईल आणि आणखी ५ वर्षासाठी संग्रहित केली जाईल. तत्पूर्वीची सर्व माहिती (डेटा) डिजिटल स्वरुपात स्वतंत्रपणे संग्रहीत करुन ठेवण्यात येईल.

(१६) ई-पीकपाहणीद्वारे संकलीत होणारी माहिती, शेतकऱ्यासाठीच्या शासकीय योजनांच्या अंमलबजावणीच्या उद्देशाने इतर विभागांना दिली जाऊ शकेल.

०२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०१३११७२४०१८३१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने, RAMESH SHIVAJI CHAVAN

Digitally signed by RAMESH SHIVAJI CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7ada4e8fa11566f3b9c9f7b5fa123945d54f8e3d5b09d05bedfa09b97ee45cad, pseudonym=8681E76138CFE5A3E889A80B442F95DD2288C273, serialNumber=E845880S05E05E27F435BD39953740SD44E1C88021CF038B060AC10B9D8FB8787, cn=RAMESH SHIVAJI CHAVAN
Date: 2023.01.31 17:28:50 +05'30'

(रमेश चव्हाण)
सह सचिव, महसूल व वन विभाग

प्रत,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री याचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
३) मा.उप मुख्यमंत्री याचे सचिव, उप मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
३) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
४) मा.विरोधी पक्षनेता (विधान सभा/ विधान परिषद) यांचे खाजगी सचिव, विधानभवन,मुंबई-४०० ०३२,
५) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई-३२,
७) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन ,मुंबई-३२,
८) महालेखापाल, लेखा व अनुज्ञयेता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (१,) मुंबई,
९) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (२) नागपूर,
१०) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२,
११) सर्व विभागीय आयुक्त,
१२) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१३) सर्व जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी,
१४) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२,
१५) सर्व उप विभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी) / सर्व जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख,
१६) सर्व तहसिलदार/ सर्व तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
१७) सर्व सह सचिव /उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
१८) "ज" समूहातील सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
१९) निवडनस्ती (कार्यासन ज-१ अ), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.

एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन (Unified Project Management Unit-UPMU) कक्षांतर्गत शासन निर्णयांचे एकत्रीकरण व सुसुत्रीकरण करण्यासाठी जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०२२/प्र.क्र.६३ /ल-१.
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक : ८ मार्च , २०२३.

संदर्भ :- १. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२२/प्र.क .६३/ल-१, दिनांक १८.४.२०२२.
२. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांचे दिनांक १६.१.२०२३ चे पत्र.

प्रस्तावना :-

महसूल विभाग हा राज्याच्या प्रशासनाचा कणा असून खुद्द महसूल विभाग, नोंदणी व मुद्रांक विभाग तसेच भूमी अभिलेख विभाग हे स्थावर मालमत्तांशी संबंधित कामकाज हाताळतात. महसूल, भूमि अभिलेख व नोंदणी विभागाअंतर्गत पार पाडण्यात येणाऱ्या अर्धन्यायिक व प्रशासकीय कामकाजाची व्याप्ती अत्यंत मोठी आहे. याकामी विविध विषयांबाबत कायदेशीर तरतुदींनुसार करावयाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी शासन निर्णय व शासन परिपत्रकांमध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. एकाच विषयाबाबत वेगवेगळ्या कालावधीत निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या/शासन परिपत्रकांच्या आधारे कार्यवाही करणे आवश्यक असते. याकरीता शासन निर्णयांचे एकत्रीकरण व सुसुत्रीकरण करण्यासाठी जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याबाबत प्रस्ताव शासनास संदर्भ क्र. २ अन्वये प्राप्त झाला आहे. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

महसूल विभाग (खुद्द), नोंदणी व मुद्रांक विभाग तसेच भूमी अभिलेख विभाग त्याचबरोबर भूसंपादन शाखा तसेच मदत व पुनर्वसन विभाग या सर्व विभागातील संगणकीकरणाच्या कामकाजाचे परिचालन, व्यवहार्यता, राज्यव्यापी अंमलबजावणी तसेच समन्वयाच्या अनुषंगाने एकात्मिक प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (Unified Project Management Unit-UPMU) स्थापन करण्यात आले आहे. एकात्मिक प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (Unified Project Management Unit-UPMU) अंतर्गत शासन निर्णयांचे एकत्रीकरण व सुसुत्रीकरण करण्यासाठी जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	समितीतील पदनाम
१	जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख, पुणे.	अध्यक्ष
२	नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे.	सह अध्यक्ष
३	विभागीय आयुक्त, पुणे.	सदस्य

४	विभागीय आयुक्त, नाशिक.	सदस्य
५	जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.	सदस्य
६	एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, प्रभारी अधिकारी	सदस्य
७	संबंधित सह सचिव/उप सचिव, महसूल व वन विभाग	निमंत्रित सदस्य
८	राज्य समन्वयक, ई -फेरफार प्रकल्प, पुणे.	सदस्य
९	अपर जिल्हाधिकारी - १	सदस्य
१०	उप जिल्हाधिकारी - १	सदस्य
११	नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक -१	सदस्य
१२	सह जिल्हानिबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी -१	सदस्य
१३	जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख -१	सदस्य
१४	उप अधिक्षक भूमी अभिलेख /नगर भूमापन अधिकारी	सदस्य
१५	नायब तहसिलदार-१	सदस्य
१६	अपर जिल्हाधिकारी, एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्ष	सदस्य सचिव

उपरोक्त अनु. ९ ते १५ वरील सदस्यांचे नामनिर्देशन जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख, पुणे व नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांचे स्तरावरून निश्चित करण्यात यावे.

२. सदर समितीची कार्यकक्षा :-

१. महसूल, भूमि अभिलेख व नोंदणी विभागांतर्गत शासन निर्णय/शासन परिपत्रके/मार्गदर्शक सुचना इ.यांचे विषयानुसार दिनांक ३१.१२.२०२२ अखेरचे संकलन करणे.

२. याबाबत समितीने दर महिन्याला आढावा बैठका घेऊन प्रचलित शासन निर्णय/शासन परिपत्रके/ मार्गदर्शक सुचना इ. बाबत संकलनाअंती चर्चा करून व आवश्यक त्या बाबींचे एकत्रिकरण करून सुधारित शासन निर्णय/परिपत्रक/मार्गदर्शक सुचना इ. बाबत प्रारूप सादर करण्यात यावे.

३. वरीलप्रमाणे कार्यवाही दर पाच वर्षांनी करण्यात यावी.

४. उपरोक्त मुद्या क्र.१ व २ बाबत कार्यवाही करून अंतरीम अहवाल २ महिन्यांमध्ये सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०३०८१४४९३९७७१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

RAMESH NAMDEO JAGTAP

Digitally signed by RAMESH NAMDEO JAGTAP
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=0c19f5aff07e8e032316c50df2eee86d4eadc6e4ac1e502c4ce53a7762e7e059, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=842F1BB542CD2BC481C7C6F994B2BEBD588BB368E14A9C6CBD23808C8315A965C, cn=RAMESH NAMDEO JAGTAP
Date: 2023.03.08 14:54:46 +05'30'

(रमेश जगताप)
अवर सचिव

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
४. प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. विभागीय आयुक्त, पुणे.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयात उघडण्यात आलेल्या स्वीय प्रपंजी लेखा खात्यामध्ये अधिकार अभिलेखातून प्राप्त होणाऱ्या नक्कल फी मधून नवीन खर्चाच्या बाबी अनुज्ञेय करणे बाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०१८/प्र.क्र.२०९./ल-१.
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक : ०३ ऑगस्ट, २०२३

वाचा :-

१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१८/प्र.क्र.२०९/ल-१, दि.२६.०३.२०१९.
२) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांचेकडील पत्र क्र.राभूअआका-१/स्विग्रले/खर्चाच्या बाबी /२०२०, दि.२७/०५/२०२०.
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१९/प्र.क्र.८३/ल-१, दि.१९.०९.२०१९.
४) महालेखापाल-२, म.रा.नागपूर यांच्या No.TM/Gr.III/PLA/Settlement Commissioner, Pune /UoR-१५/११३८, दि.१७.०२.२०२०.
५) महालेखापाल-२, म.रा.नागपूर यांच्या No.TM/Gr.III/PLA/Settlement Commissioner, Pune /UoR-१५/९५, दि.२६.०६.२०२०.
६) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१८/प्र.क्र.२०९/ल-१, दि.०२.०७.२०२०.
७) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१८/प्र.क्र.२०९/ल-१, दि.२१.०८.२०२०.
८) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांचेकडील पत्र क्र.राभू-४/PLA/खर्चात वाढ/३१७२४/२०२२, दि.०९.११.२०२२.

प्रस्तावना :-

राज्यात डिजीटल इंडिया लँड रेकॉर्ड मॉडर्नायझेशन कार्यक्रमातंर्गत जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांच्या कार्यालयाकडून संगणकीय गा.न.नं. ७/१२, ८-अ, ई-फेरफार, ई-अभिलेख प्रकल्पांची आज्ञावली विकसीत करण्यात आलेल्या आहेत. या प्रणालीव्दारे वितरीत होणाऱ्या अधिकार अभिलेखाच्या नक्कल फी मधून प्राप्त होणारी एकूण रकमेतून जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांच्या हिस्याची रक्कम जमा करण्यासाठी तसेच विकसित करण्यात आलेल्या/करण्यात येणाऱ्या ऑनलाईन प्रणालीच्या देखभाल, दुरूस्ती, तांत्रीक सहाय्य व दुरूस्तीसाठी येणाऱ्या खर्चासाठी व अन्य खर्चासाठी वाचा क्र.१ अन्वये जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयात नविन स्वीय प्रपंजी लेखा उघडण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच दिनांक ०२.०७.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये स्वीय प्रपंजी लेखा खात्यामधून विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीकरीता खर्च करण्यासाठीच्या बाबी अनुज्ञेय करण्यात आलेल्या आहेत. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांनी त्यांचे वाचा क्र. ८ च्या प्रस्तावान्वये जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांचे कार्यालयातील स्वीय प्रपंजी लेखा खात्यामधून विविध प्रकल्पांच्या सुकर अंमलबजावणीच्या अनुषंगाने नवीन बाबींवर खर्च

करण्यास मान्यतेचा प्रस्ताव सादर केला असून दिनांक ०२.०७.२०२० रोजीचा शासन निर्णय सुधारित करण्याची विनंती केली आहे. त्यास अनुसरून दिनांक ०२/०७/२०२० व दिनांक २१/०८/२०२० रोजीच्या शासन निर्णयास सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्वीय प्रपंजी लेखा खात्यामध्ये अधिकार अभिलेखातून प्राप्त होणारी नक्कल फी जमा करणे व त्यामधून विविध अनुज्ञेय खर्चाच्या बाबींमध्ये समावेश करण्यासंदर्भात सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरून आता पुढीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे :-

(१) "तांत्रिक तसेच विशिष्ट प्रकारचे कामकाजसाठी सल्लागार/मनुष्यबळ नेमणूक-भूमि अभिलेख व महसूल विभागाच्या कोणत्याही कामकाज किंवा सेवेबाबत वैधानिक, प्रशासकीय व तांत्रिक बाबतीत सल्ला देणे किंवा एखाद्या क्षेत्रातील माहिती उपलब्ध करून देणे यासाठी बाहेर संस्थेची/मनुष्यबळाची मदत घेण्यासाठी होणारा खर्च करणे" या बाबींचा समावेश दिनांक २/७/२०२० रोजीच्या शासन निर्णयातील परि. १ (V) मधील खर्चाच्या बाबींमध्ये अ.क्र.१ (a) मध्ये होईल.

(२) दिनांक २.७.२०२० रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद १ (V) मधील खर्चाच्या बाबींमध्ये अ.क्र. १ येथील (d) नंतर पुढीलप्रमाणे (e) चा समावेश करण्यात येत आहे.

"जमाबंदी आयुक्त कार्यालयातील महसूल, भूमी अभिलेख विभागाच्या माहिती तंत्रज्ञान विषयक प्रकल्पांसाठी इमारत बांधकाम व अनुषंगीक खर्च (देखभाल व दुरुस्ती)- जागा खरेदी करणे, उक्त जागेवर बांधकाम करणे, बांधीव इमारत विकत घेणे. उक्त कार्यालयाच्या इमारतींची दुरुस्ती करणे, सुशोभीकरण करणे, फर्निचर व इतर सुविधा खरेदी करणे किंवा स्थापित करणे इत्यादी बाबींवर अनावर्ती खर्च. बांधीव इमारत भाड्याने घेणे, कार्यालयीन स्वच्छता, प्रसन्न व कार्याभिमुख वातावरण, पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहांची देखभाल इत्यादीवर आवर्ती खर्च करणे."

(३) दिनांक २१/८/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक २/७/२०२० रोजीच्या शासन निर्णयातील परि. १ (v) मध्ये नमूद बाबींवर "बाबनिहाय/प्रतिप्रस्ताव रक्कम रुपये १.०० कोटी पर्यंत शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय खर्चाचे /मंजुरीचे अधिकार जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख यांना असतील", त्याऐवजी "बाबनिहाय/प्रतिप्रस्ताव रक्कम रुपये ३.०० कोटी पर्यंत शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय खर्चाचे /मंजुरीचे अधिकार जमाबंदी आयुक्त

आणि संचालक भुमि अभिलेख यांना असतील" अशी दिनांक २१.८.२०२० रोजीच्या शासन निर्णयात सुधारणा करण्यात येत आहे.

२. वाचा येथील दिनांक २.०७.२०२० रोजीच्या शासन निर्णयामधील इतर अटी व शर्ती कायम राहतील.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १३६/२३/को.प्र.५, दिनांक १/६/२०२३ व अनौपचारिक संदर्भ क्रमांक २२०/२०२३/व्यय-१०, दिनांक २/६/२०२३ अन्वये प्राप्त सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०८०३१२३२३१४७१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUBHASH UTTAM RATHOD

Digitally signed by SUBHASH UTTAM RATHOD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4900ceadef378ce6953fc366d818c664ad0c54be36d6234bdc213e86d85816c2, pseudonym=BCD86FFDB67AD43A7B590E9CD3A8BDBDCA27C96B, serialNumber=1C0198SDAA2DB39DF76EF8C33C169711D61EA01A32C5E5CACFAE4CC6C6F928A2, cn=SUBHASH UTTAM RATHOD
Date: 2023.08.03 17:59:18 +05'30'

(सुभाष राठोड)
शासनाचे अवर सचिव

प्रति:-

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
३. सर्व मा. मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
४. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवान, मुंबई.
५. मा. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
६. मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खासगी सचिव, विधान भवन, मुंबई.
७. मा.उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
८. मा. विरोधी पक्षनेता (विधानपरिषद) यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
९. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा) यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
१०. मा.मुख्य सचिव , महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई.
११. अपर मुख्य सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई .
१२. अपर मुख्य सचिव (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई.
१३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१५. महालेखापाल (वाणिज्यिक लेखा परिक्षा) मुंबई.
१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

पृष्ठ

महसूल विभागांतर्गत उपलब्ध असलेले अभिलेख सेतू/आपले सरकार सेवा केंद्र/ महा-ई सेवा केंद्र यांचेमार्फत उपलब्ध करून देणे व ई-हक्क प्रणाली व्दारे अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः राभुअ-२०२१/प्र.क्र.२११/ल-१.
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक : ५ डिसेंबर, २०२३

वाचा :-

१. महसुल व वन विभाग शासन परिपत्रक क्र.राभुअ आका २०१६/प्र.क्र.१८०/ल -१, दिनांक ११.०७.२०१७.
२. महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. राभुअ २०१८/प्र.क्र.३४ /ल -१, दिनांक ३१.०१.२०१९.
३. माहिती व तंत्रज्ञान विभागाचे शासन परिपत्रक क्र. मातंसं- २०१९/प्र.क्र.२१/से ५/३९,दिनांक १९.१२.२०१९.
४. महसूल व वनविभाग शासन परिपत्रक क्र/जमीन-२०२०/ प्र.क्र.३१/ल-१, दिनांक २३/११/२०२०.
५. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचा क्र.रा.भू.४/नक्कल विक्री/वितरण/२०२१, दि.२६/०४/२०२१ चा प्रस्ताव.
६.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचा क्र.रा.भू.अ.अ.का.४/ई-हक्क प्रणाली/ २०२, दि.१०.६.२०२२ चे पत्र.

प्रस्तावना :-

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय भुमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमासाठीच्या मार्गदर्शक सूचना तसेच संदर्भ क्र.१ च्या शासन परिपत्रकान्वये ई-फेरफार प्रकल्पांतर्गत राज्यातील सर्व अधिकार अभिलेखामधील गाव नमुना नं. ७/१२, ८-अ डिजीटल स्वरूपात उपलब्ध केले आहेत. सदर संगणकीकृत अभिलेखापैकी जे अभिलेख डिजिटल स्वाक्षरीत स्वरूपात उपलब्ध करून देणेत आले आहेत त्यांची नक्कल फी संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेली आहे. अधिकार अभिलेखामध्ये फेरफार घेण्याची संपूर्ण प्रक्रिया संगणकीकृत करण्यात आली असून, त्यासाठी राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र (NIC), पुणे यांचेमार्फत ई-फेरफार प्रणाली विकसीत केली आहे. यापुर्वी अनोंदणीकृत दस्ताचे फेरफार नोंदविण्यासाठी खातेदार नागरिकाला तलाठी कार्यालयात समक्ष अर्ज कागदपत्रांसह दाखल करावा लागत असे. यासाठी आता ई-हक्क प्रणाली विकसीत करण्यात आली आहे.याव्दारे कोणत्याही खातेदार नागरीकांना फेरफारसाठी अर्ज ऑनलाईन पध्दतीने आवश्यक कागदपत्र अपलोड करून ई-हक्क प्रणाली व्दारे थेट संबंधित तलाठी यांचेकडे दाखल करता येतात.

महाभूमी पोर्टल वर https://digitalsatbara.mahabhumi.gov.in/dslr या संकेतस्थळावरून उपलब्ध होणारे डिजिटल स्वाक्षरीत डेटाबेस आधारित संगणकीकृत गाव नमुना नं. ७/१२ व गाव नमुना नं. ८-अ ज्यावर दर्शविलेल्या क्युआर कोड (QR CODE) व १६ अंकी पडताळणी क्रमांकाआधारे त्याची सत्यता पडताळणी करणे शक्य आहे, असे डिजिटल स्वाक्षरीत अभिलेख दि.२३.११.२०२० च्या शासन परिपत्रकान्वये सर्व कायदेशीर व शासकीय कामकाजासाठी ग्राह्य समजले जातात. हे सर्व डिजिटल स्वाक्षरीत अभिलेख शासनाच्या महाभूमी पोर्टल वर सामान्य नागरिकांना डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहेत.

सदर डिजिटल स्वाक्षरीत अभिलेख उपलब्ध करून घेण्यासाठी प्रत्येक खातेदाराकडे संगणक, लॅपटॉप, प्रिंटर आणि इंटरनेट जोडणी उपलब्ध असेलच असे नाही, म्हणून असे डिजिटल स्वाक्षरीत अभिलेख सामान्य जनतेला उपलब्ध करून देणाऱ्या व्यक्ती, संस्था अथवा सेवा केंद्र यांनी आकारावयाच्या नक्कल फी बाबत एकवाक्यता राहावी व नागरिकांची आर्थिक पिळवणूक होवू नये याकरीता तसेच ई-हक्क प्रणालीव्दारे नागरिकांना अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

शासन निर्णय :-

ई-फेरफार प्रकल्पांतर्गत राज्यातील सर्व अधिकार अभिलेखामधील गाव नमुना नं. ७/१२, ८-अ संगणकीकृत करण्यात आले असून संगणकीकृत अभिलेखापैकी जे अभिलेख डिजिटल स्वाक्षरीत स्वरूपात उपलब्ध करून देणेत आले आहेत त्यांची नक्कल फी संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेली आहे. सदर संगणकीकृत अभिलेख खालील तक्त्यात नमूद केलेल्या दरानुसार सेतू/आपले सरकार सेवा केंद्र /महा ई-सेवा केंद्र यांचेमार्फत उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	अभिलेख	दर	२ पेक्षा अतिरिक्त पृष्ठ संख्या असल्यास
१	७/१२, ८-अ	रू.२५/- (पृष्ठ संख्या २ पर्यंत)	प्रति पृष्ठ रू. २/-

वर नमूद रू.२५ ची विभागणी ही राज्य शासन रू.५/-, जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांचेकडील स्विय प्रपंजी लेखा खाते रू.१०/- आणि सेतू/आपले सरकार सेवा केंद्र /महा ई-सेवा केंद्र रू.१०/- अशी राहील. २ पेक्षा अतिरिक्त पृष्ठे असल्यास प्रतिपृष्ठ रू.२/- प्रमाणे शुल्क सेवा केंद्र चालकास घेता येईल.

२. डिजिटल स्वाक्षरीत डेटाबेस आधारित संगणकीकृत गाव नमुना नं.७/१२ व गाव नमुना नं. ८-अ ज्यावर दर्शविलेल्या क्युआर कोड (QR CODE) व १६ अंकी पडताळणी क्रमांकाआधारे त्याची सत्यता पडताळणी करणे शक्य आहे, असे डिजिटल स्वाक्षरीत अभिलेख दि.२३.११.२०२० च्या शासन परिपत्रकान्वये सर्व कायदेशीर व शासकीय कामकाजासाठी ग्राह्य समजण्यात यावेत.

३. भूलेख संकेतस्थळावरील https://bhulekh.mahabhumi.gov.in या लिंकवरून विनाशुल्क उपलब्ध होणारे विनास्वाक्षरीत गाव नमुना नं. ७/१२ व गाव नमुना नं. ८-अ ज्यावर महाभूमी चा वाटरमार्क असतो आणि ज्यावर क्युआर कोड किंवा १६ अंकी पडताळणी क्रमांक दर्शविलेला नसतो असे अधिकार अभिलेख फक्त माहितीसाठी असून ते कोणत्याही कायदेशीर व शासकीय कामासाठी अवैध समजण्यात येतात. सदर विनास्वाक्षरीत गाव नमुना नं. ७/१२ व ८-अ कोणत्याही आपले सरकार सेवा केंद्र, महा-ई-सेवा केंद्र, सेतू केंद्र अथवा संग्राम केंद्रचालक यांना त्यांचे सही शिक्क्याने विक्री/वितरण करता येणार नाहीत. सदर बाबत सविस्तर सुचना माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या संदर्भ क्र.३ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

४. ई-हक्क प्रणालीव्दारे एक फेरफार अर्ज नोंदविण्यासाठी अपलोड करावयाची कागदपत्रे व अंदाजित दर याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे निर्धारित करण्यात येत आहे.

अ.क्रं	फेरफार प्रकार	आवश्यक कागदपत्रे	अंदाजित पृष्ठ संख्या	सेतू/ आपले सरकार सेवा केंद्र /महा-ई सेवा केंद्रांकरीता अंदाजित दर
A	B	C	D	E
१	ई-करार	सोसायटी ई-करार प्रत व अधिक १ कागदपत्र	२	र.रू.२५/-
२	बोजा दाखल करणे/ गहाणखत	बँकेची प्रत व गहाण खताची प्रत व अधिक १ कागदपत्र	३	र.रू.२५/-
३	बोजा कमी करणे	बँकेची प्रत व अधिक १ कागदपत्र	२	र.रू.२५/-
४	वारस नोंद	मृत्यु दाखला सत्यप्रत, इतर व अधिक १ कागदपत्र	३	र.रू.२५/-
५	मयताचे नाव कमी करणे	अर्जदाराचे ओळखपत्र, मृत्युचा दाखला व स्वयंघोषणा संमत्ती पत्र	३	र.रू.२५/-
६	अ.पा.क. शेरा कमी करणे	खातेदाराचा वयाचा पुरावा व अधिक १ कागदपत्र	२	र.रू.२५/-
७	एकुम्या (एकत्र कुटुंब प्रमुख) नोंद कमी करणे	एकुम्या संबधित फेरफार, सहधारक/ वारस स्वयंघोषणा पत्र व अधिक १ कागदपत्र	३	र.रू.२५/-
८	विश्वस्थांचे नाव बदलणे	धर्मादाय आयुक्त यांचे आदेश पत्र व अधिक १ कागदपत्र	२	र.रू.२५/-

पृष्ठ ३ पैकी २

वर नमूद रू.२५ ची विभागणी ही महा-ई सेवा केंद्र /आपले सरकार/सेतू सारख्या संस्थांकडून प्रचलित सेवाशुल्क आकारणी रू. १५/- अधिक ई-फेरफार प्रकल्प सेवाशुल्क र.रू.१०/- अशी राहील. सदरचे ई-फेरफार प्रकल्प सेवाशुल्क हे जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांचे कार्यालयातील स्विय प्रपंजी लेखा खाते यामध्ये जमा करण्यात येईल. वर नमूद पृष्ठसंख्येपेक्षा अतिरिक्त पृष्ठे असल्यास प्रतिपृष्ठ रू.२/- एवढे अतिरिक्त शुल्क सेवा केंद्र चालकास घेता येईल. तथापि, कोणत्याही खातेदार नागरीकाने वैयक्तिकरित्या सदर कागदपत्रे अपलोड केल्यास, सदर सेवा खातेदार नागरीकास नि:शुल्क राहील.

५. उपरोक्त सुचना सर्व विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या अधिनस्त सर्व महसूल अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

७. सदर शासन निर्णय माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या अनौ.संदर्भ दिनांक ७.३.२०२२ नुसार प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३१२०५१७४५२०७५१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=c8a7d6860ff227fd9e69a02e9ca5dfb2ccb25eda92d749629970f349fc6ed260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2023.12.05 17:46:01 +05'30'

(संजय बनकर)
सह सचिव

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. सभापती/मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधान परिषद/विधानसभा यांचे सचिव
३. मा.उप सभापती/मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधान परिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
५. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मा. मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक.
७. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान परिषद / विधानसभा यांचे स्वीय सहाय्यक,
८. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव.
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे.
११. सर्व विभागीय आयुक्त.
१२. सर्व जिल्हाधिकारी.
१३. महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र १ व २, मुंबई / नागपूर.
१४. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र १ व २, मुंबई / नागपूर.
१५. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१६. माहिती तंत्रज्ञान संचालनालय, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१८. निवड नस्ती (ल-१).

जी.आय.एस.आधारीत तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेल्या मोजणी नकाशांवर अक्षांश व रेखांश नमूद करून 'क' प्रत उपलब्ध करून देणे व सदर मोजणी नकाशे भूमी अभिलेख विभागाच्या पोर्टलवर प्रसिध्द करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२३/प्र.क्र.५१४/ल-१.
मुख्य इमारत, पहिला मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २ फेब्रुवारी, २०२४.

संदर्भ :- जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील पत्र क्रमांक पु.मो. २/प्र.क्र.२२०/२०२३ दि. २१/०९/२०२३.

प्रस्तावना :-

भूमि अभिलेख विभागामार्फत महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम - १३६ व महाराष्ट्र जमिन महसूल (सीमा व सीमाचिन्हे) नियम, १९६९ मधील तरतुदीनुसार जमीनधारक अगर हितसंबंधित व्यक्तीच्या अर्जानुसार विभागाकडून मुख्यत: जमिनीची मोजणी करून भूमी अभिलेखानुसार जमिनीच्या हद्दी कायम करणे, जमिनीचा झालेला पोटहिस्सा मोजणी करून त्यांचे नवीन पोटहिस्सा अभिलेख तयार करणे भूसंपादन मोजणी करणे व संपादन क्षेत्राप्रमाणे अभिलेख तयार करणे, जमिनीच्या हद्दी निश्चित करून त्या हद्दीसंबंधीत जमीन धारकास दर्शवून जनतेच्या विनंतीचे/तक्रारींचे निवारण केले जाते. तसेच मोजणीअंती संबंधित धारकांना/अर्जदारांना मोजणी नकाशाच्या "क" प्रती पुरविल्या जातात. सदर मोजणी नकाशाच्या "क" प्रती मध्ये जागेवर प्रत्यक्ष मोजणी वेळी वहिवाटी / ताब्याप्रमाणे व अभिलेखाप्रमाणे येणा-या हद्दी दर्शवून योग्य परिमाणात संबंधित टिपा नमूद करुन मोजणी नकाशाची "क" प्रत पुरविली जाते.

सद्य:स्थितीत जमीन मोजणीसाठी जी.आय.एस.आधारीत जी.एन.एस.एस.रोव्हर्स व इलेक्ट्रॉनिक्स टोटल स्टेशन मशिन इ. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. तसेच मूळ भूमापन नकाशांचे डिजीटायझेशन व जिओ रेफरन्सिंग केलेल्या नकाशांचा मोजणी नकाशा अंतिम करताना आधार नकाशा (Base Map) म्हणून वापर करण्यात येत आहे. तसेच ई-मोजणी व्हर्जन २.० ही आज्ञावली नंदुरबार व वाशिम जिल्ह्यांमध्ये तसेच इतर जिल्ह्यातील प्रत्येकी एका तालुक्यामध्ये लागू करण्यात आलेली असून टप्प्याटप्याने संपूर्ण राज्यात लागू करण्यात येणार आहे. सदर आज्ञावलीद्वारे स्विकारण्यात येणारे मोजणी अर्ज प्रकरणी जी.आय.एस.आधारीत जी.एन.एस.एस.रोव्हर्सद्वारे मोजणी काम करण्यात येत आहे. त्यामुळे मोजणी नकाशामध्ये प्रत्येक हद्दीचे अक्षांश व रेखांश प्राप्त होत आहेत. त्यामुळे जमीन मोजणी प्रकरणांमध्ये लगतच्या धारकांचे हद्दीबाबत मोजणीवेळी मानवी चुकांमुळे होणारे लगत गटांमध्ये एकमेकांच्या हद्दी जाणे अथवा दोन मोजणीमुळे हद्दीमध्ये अंतर पडणे, इ. (overlap, gap, etc.) यासारखे वाद/तक्रारी कमी होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे भूमी अभिलेख विभागाकडून सर्व मोजणी प्रकरणांचे जी.आय.एस. आधारीत मोजणी नकाशे पुरविताना अक्षांश व रेखांशासह नागरीकांना मोजणी नकाशा पुरविण्यास तसेच सदर मोजणी नकाशे अक्षांश व रेखांशासह भूमि अभिलेख विभागाच्या पोर्टलवर प्रसिध्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

भूमि अभिलेख विभागाकडून धारकांच्या जमिनीचे हद्दकायम, पोटहिस्सा, सामिलीकरण, बिनशेती, कोर्टवाटप व कोर्टकमिशन व विविध प्रकल्पांकरीता भूमि संपादन इत्यादी विविध प्रकारच्या मोजणीचे काम करुन मोजणी नकाशाची 'क' प्रत पुरविण्यात येते. त्यासाठी ज्या मोजणी प्रकरणांमध्ये जमीन मोजणीसाठी जी.आय.एस.आधारीत जी.एन.एस.एस.रोव्हर्स व इलेक्ट्रॉनिक्स टोटल स्टेशन मशिन इ. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेल्या मोजणी नकाशावर अक्षांश व रेखांश नमूद करून 'क' प्रत उपलब्ध करून देणे व सदर मोजणी नकाशे भूमी अभिलेख विभागाच्या पोर्टलवर प्रसिध्द करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०२०२१५१४२२२५१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=c8a7d6860ff227fd9e69a02e9ca5dfb2ccb25eda92d749629970f349fc6ed260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2024.02.02 15:16:56 +05'30'

(संजय बनकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधापरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा.उप सभापती, महाराष्ट्र विधापरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद /विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
७. सर्व सन्माननीय सदस्य, विधानपरिषद /विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
८. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.रा.) पुणे.
१४. सर्व विभागीय आयुक्त.
१५. सर्व जिल्हाधिकारी.
१६. सर्व उपसंचालक, भूमी अभिलेख.
१७. सर्व जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख.
१८. सर्व उप अधीक्षक, भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी/विशेष भूमापन अधिकारी, भूमी अभिलेख.
१९. निवड नस्ती (ल-१).

महाराष्ट्र शासन

महसूल व वनविभाग

शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२५/प्र.क्र. १७८/ल-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १९ मार्च, २०२५

प्रस्तावना:-

महसूल विभाग - १०० दिवस कृती कार्यक्रम आराखडा अंतर्गत दिनांक ०१ मार्च २०२५ पासुन बुलढाणा जिल्हयातील सर्व गावांमध्ये " जिवंत सातबारा मोहिम" राबविण्यात येत असून सदर मोहिमेची शासनस्तरावर मा.महसूल मंत्री महोदय यांनी दखल घेवून सदर मोहिम संपुर्ण राज्यामध्ये राबविण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

"जिवंत सातबारा मोहिम" अंतर्गत सातबारावरील गावातील सर्व मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदीची प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे. मयत खातेदार यांच्या वारसांना शेतजमिनीच्या अनुषंगाने विविध दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रामध्ये वारसांची नोंद विहित कालावधीत अधिकार अभिलेखामध्ये नोंद न झाल्याने अडचणींना सामोरे जावे लागते. या दृष्टीकानातुन संपूर्ण राज्यात " जिवंत सातबारा मोहिम" राबविण्याचा निर्णय शासनस्तरावर घेण्यात आला आहे.

शासन निर्णय :-

सर्व मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदी अधिकार अभिलेखामध्ये अद्यावत करुन मयत खातेदारांच्या वारसाची नोंदींचे कामकाज पूर्ण करण्याच्या दृष्टीने राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये "जिवंत सातबारा मोहिम" राबविण्यात यावी.

२. सदर मोहिम राबविण्यासाठी खालील प्रमाणे कालबध्द कार्यक्रम निश्चित करण्यात येत आहे:-

अ.क्र.	कालावधी	करावयाची कार्यवाही
१	दि.१/४/२०२५ ते ५/४/२०२५	ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांनी त्यांच्या सजा अंतर्गत येणा-या गावामध्ये चावडी वाचन करून न्यायप्रविष्ठ प्रकरणे सोडून गाव निहाय मयत खातेदार यांची यादी तयार करणे
२	दि.६/४/२०२५ ते २०/४/२०२५	वारसासंबंधी आवश्यक कागदपत्रे (मृत्यूदाखला, वारसाबाबत सत्य प्रतिज्ञालेख / स्वयं घोषणापत्र, पोलीस पाटील / सरपंच / ग्रामसेवक यांचा दाखला, सर्व वारसांचे नावे, वय, पत्ते व दुरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमांक, रहिवास बाबतचा पुरावा ग्राम महसूल अधिकारी

		(तलाठी) यांच्याकडे सादर करणे व ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांनी स्थानिक चौकशी करुन मंडळ अधिकारी यांचे मार्फत वारस ठराव ई फेरफार प्रणालीमध्ये मंजूर करणे.
३	दि.२१/४/२०२५ ते १०/५/२०२५	ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांनी ई फेरफार प्रणालीमध्ये वारस फेरफार तयार करावा. त्यानंतर म.ज.म.अ.१९६६ च्या विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन मंडळ अधिकारी यांनी वारस फेरफार वर निर्णय घेऊन त्यानुसार ७/१२ दुरुस्त करावा जेणेकरुन सर्व जिवंत व्यक्ती ७/१२ वर नोंदविलेल्या असतील.

वरील कालबध्द कार्यक्रम राबविण्याकरीता खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत:-

१) संबंधित तहसिलदार यांची त्यांच्या तालुक्याकरीता "समन्वय अधिकारी" म्हणुन नियुक्ती करण्यात येत आहे. त्यांनी आपल्या अधिनस्त कार्यक्षेत्रात सदर कालबध्द कार्यक्रम वर नमूद विहीत मुदतीत पुर्ण करण्याबाबतची कार्यवाही करावी. तसेच उपरोक्त कार्यक्रमाबद्दल ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) व मंडळ अधिकारी यांना अवगत करण्यात येऊन उचित कार्यवाही करण्याबाबत सक्त सुचना देण्यात याव्यात.

२) संबंधित जिल्हाधिकारी यांची त्यांच्या जिल्ह्याकरीता "नियंत्रण अधिकारी" म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त तालुक्यांचा वेळोवेळी आढावा घेऊन सदर मोहिम राबविण्यामध्ये काही अडचणी येत असल्यास त्यांचे निराकरण करावे.

३) संबंधित विभागीय आयुक्त यांची त्यांच्या अधिनस्त जिल्ह्यांकरीता "विभागीय संनियंत्रण अधिकारी" म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या अधिनस्त जिल्ह्यांचा नियमित आढावा घेऊन त्याबाबतचा साप्ताहिक अहवाल खालील नमुन्यामध्ये प्रत्येक सोमवारी निश्चितपणे dol1cell.rfd.revenue@maharashtra.gov.in या ई-मेल पत्त्यावर सादर करावा.

जिल्हा	तालुका	एकूण मयत खातेदार संख्या	ई-हक्क प्रणालीत वारसनोंद अर्ज दाखल संख्या	वारसनोंद अर्जानुसार वारस ठराव निर्णय संख्या	वारस फेरफार संख्या		
					दाखल	मंजूर	नामंजूर

४) सदर मोहिमेंतर्गत वारस नोंदीकरीता अर्ज ई-हक्क प्रणालीमार्फतच नोंदविणेत यावा.

३. सातबारावरील मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदीची प्रक्रिया करणेसाठी आवश्यकअसलेल्या सर्व वारस नोंदी घेऊन ७/१२ "जिवंत" म्हणजेच अद्ययावत करणेसाठी वर नमूद केल्याप्रमाणे विहित कालबध्द कार्यक्रम राबवावा व "जिवंत ७/१२" मोहिम यशस्वी होईल याची दक्षता घ्यावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा संकेतांक २०२५०३१९१२३३०५५७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAJESH KUMAR
Date: 2025.03.19 12:34:54 +05'30'

(राजेश कुमार)
अपर मुख्य सचिव (महसूल).

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री [नगरविकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.)] यांचे सचिव.
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क) यांचे सचिव.
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
८. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. सर्व विभागीय आयुक्त.
१०. सर्व जिल्हाधिकारी.
११. सर्व मंत्रालयीन विभाग.
१२. निवडनस्ती/ल-१.

DILRMP अंतर्गत अधिकार अभिलेख संगणकीकरण करण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांच्याकरिता लॅपटॉप व प्रिंटर खरेदी करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वनविभाग

शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२१/प्र.क्र.४२८/ल-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २४ मार्च, २०२५

संदर्भ : १. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२१/प्र.क्र.४२८/ल-१, दि.२२.१२.२०२१.
२. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.IT cell/लॅपटॉप-प्रिंटर/६००९७५/२०२५, दि.२०.०२.२०२५.

प्रस्तावना:-

ई-फेरफार प्रणालीचे ऑनलाईन कामकाज करण्यासाठी राज्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांना लॅपटॉप, प्रिंटर व डिजीटल स्वाक्षरी (DSC) ची गरज असते. यापूर्वी शासन स्तरावरून जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयामार्फत राज्यातील सर्व तलाठी / मंडळ अधिकारी यांना लॅपटॉप व ऑल ईन वन प्रिंटर स्कॅनर खरेदी करणेकरीता जिल्हास्तरावरुन जिल्हाधिकारी यांना स्वीय प्रपंजी लेखा खात्यातून निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली. त्यासाठी संदर्भिय शासन निर्णय क्र. १ व्दारे लॅपटॉप व प्रिंटरचे Specifications निश्चित करण्यात आलेले आहेत. तथापि, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भ क्र. २ येथे नमूद पत्राव्दारे सुधारित Specifications निर्गमित करण्याबाबत प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुसार DILRMP अंतर्गत अधिकार अभिलेख संगणकीकरण करण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांच्याकरिता लॅपटॉप व प्रिंटर कम स्कॅनर खरेदीसंदर्भातील Specifications सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

ई-महाभूमी अंतर्गत ई-फेरफार आज्ञावलीच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील संबंधित ग्राम महसूल अधिकारी व व मंडळ अधिकारी यांच्यासाठी खरेदी करावयाच्या लॅपटॉप व प्रिंटर कम स्कॅनर खरेदीसाठी सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार सुधारित Specifications निश्चित करण्यात येत आहेत.

२. ग्राम महसूल अधिकारी व व मंडळ अधिकारी यांच्यासाठी लॅपटॉप व प्रिंटर कम स्कॅनर खरेदी करण्याच्या अनुषंगाने जमांबदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी लॅपटॉप व प्रिंटर कम स्कॅनरच्या मुळ उत्पादक कंपन्यांचे (Original Equipment Manufacturers) शासनाच्या विहित कार्यपध्दतीनुसार empanelment करण्याची कार्यवाही करावी.

३. वरीलप्रमाणे कंपन्यांची नामिका (empanelment) ही प्रथमत: एक वर्षासाठी निश्चित करण्यात येईल. तद्नंतर सदर कंपन्यांकडून करण्यात येणाऱ्या लॅपटॉप व प्रिंटर कम स्कॅनरच्या पुरवठ्याच्या अनुषंगाने कामगीरीचा आढावा घेऊन सदर नामिकेस शासन मान्यतेने पुढील एक वर्षसाठी मुदतवाढ देण्यात येईल.

४. संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त ग्राम महसूल अधिकारी व व मंडळ अधिकारी यांच्यासाठी त्यांच्या जिल्ह्यामध्ये आवश्यक असणाऱ्या लॅपटॉप व प्रिंटर कम स्कॅनरची मागणी एकत्रित करून जमांबदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे करावी.

५. जमांबदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी नामिका प्रविष्ट (empanelled) मुळ उत्पादक (OEM-Original Equipment Manufacturers) कंपन्यांकडून जमाबंदी आयुक्त, पुणे यांच्या स्तरावर केंद्रीय (Centralise) खरेदी करून ती संबंधित जिल्ह्यांना पुरविण्यात यावी.

६. याबाबत संदर्भ क्र. १ येथे नमूद शासन निर्णयाव्दारे विहित करण्यात आलेल्या इतर अटी व शर्ती कायम असतील व त्यांचे पालन करणे व सदर खर्चाच्या बाबतीत स्वीय प्रपंजी लेख्यांशी संबंधित जमा व खर्चाचा हिशोब ठेवणे जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांना बंधनकारक राहील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा संकेतांक २०२५०३२४१७४४४४४०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=c8a7d6860ff227fd9e69a02e9ca5dfb2ccb25seda92d749629970f349fc6ed260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2025.03.24 17:46:21 +05'30'

(संजय बनकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री [नगरविकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.)] यांचे सचिव.
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क) यांचे सचिव.
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
८. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. सर्व विभागीय आयुक्त.
१०. सर्व जिल्हाधिकारी.
११. सर्व मंत्रालयीन विभाग.
१२. निवडनस्ती/ल-१.

Laptops Specifications for Village Revenue Officers

Parameter	Description	Proposed Specification	reasoning/justification
Construction	Form Factor	Standard	Only available
	Chases Material	Laptop and bottom body should be metal	For robust use
	Hinges	Metallic	For robust use
Processar	Processor Generation	13 or higher/ AMD 7000 or higher	This is latest processor Generation, number of core and Frequency available in most of the OEM. The computers of i5 series are mainly suitable for Office use and economical than i7. The computer with i7 are mainly useful for high end processing, which is not required in LR office purpose.
	Processar Description	Intel Core i5 or higher/AMD Ryzen 5 or Higher	
Operating System	Operating System	Windows 11 Professional (Preloaded)	Latest Operating system having additional secuirity features for device encription, Remote Desktop Connection.
Memory	Type of RAM	DDR4 or higher	DDR4 RAM is sufficient for use by Talathi. Other type, that is DDR5 RAM has higher speed but at the same time it is costly
	RAM Size (GB)	16 or Higher	Talathi make use of laptop for eFerfar application and other applications of Govt. Higher RAM (16 GB) will be more useful..
	RAM Speed (MHz)	3200 or higher	Available in DDR4
	RAM Expandability up to (using spare DIMM Slots in GB)	64 or more	It is a future provision
Storage	Type of Drives used to populate the Internal Bays	SSD	An SSD (Solid State Drive) is faster than an HDD (Hard Disk Drive) because it has no moving parts, unlike an HDD which relies on spinning platters to access data, making SSDs significantly quicker to read and write data due to their flash memory technology that allows for near-instantaneous access to any location on the drive; this translates to faster boot times, application loading, and file transfer speeds.
	Total SSD Capacity (GB)	512 or higher	
Connectivity	Wireless Connectivity	Yes	Standard feature
	If Yes, Type of Wireless Connectivity	WHFi 6: 802.11ax or better	Standard feature
	Bluetooth Connectivity	Yes	Standard feature
	If Yes, Version of Bluetooth Available	5 or higher	Standard feature
Display	Display Size (Inch)	14 or higher	14 inch Display size in Laptop will have more battery life
	Display Type	Non Touch	Standard feature
	Display Technology	LED HD Backlit Antiglare	Standard and Economical feature
	Panel Technology	TN or Better	Standard feature
	Display Resolution (Pixels)	1920x1080 or better	Standard feature
	Availability of Webcam integrated with Display	Yes	Standard feature
	If Yes, Resolution of Webcam	HD	Standard feature
Miscellaneous	Internal Speaker (Dual)	Yes	Standard feature
	Type of Keyboard	Standard	Standard feature
	Backlit Keyboard	NO	Standard feature
	Spill Resistant Keyboard	Yes	Standard feature
	Carry Case	Yes, OEM Brand	Sturdry Case is required from OEM.
	If Yes, Type of Carry Case	Back Pack	Standard feature
	Security Lock Slot	Yes	Essenttial feature for Laptop safety
Power	Battery Type	Integrated	Standard feature
	Battery Chemistry	Li -ion	Standard feature
	Battery Capacity [Watt Hour]	36 or higher	Standard feature
Certification	Microsoft Windows 11 Prof BIS registration under CRS of Meity BIS registration Number and its validity BEE/Energy star for the given model	Yes Yes Yes Yes	These are the essential certificates for Quality and Environmental safety point of view

	ROHS compliance Other specifications available - FCC, CE or Higher	Yes Yes	
Antivirus	Preloaded	3 years	Essential for safety of Data protection
Warranty	Battery Warranty	1 year or more	Standard Warranty provided by most of the OEM
	On Site OEM Warranty (Year)(OEM/ Authorised channel partner shall note that W/G to be fulfilled by OEM at site)	3 year or more	Standard Warranty provided by most of the OEM
Additional Specification Parameters - Laptop - Notebook	Additional Ports	Laptop shall have Minimum 2 x 3.2 USB	Latest USB ports availabel in the models available with OEM
		HDMI- One	
		LAN- One	
		USB-C- One	
	Web Cam	HD Web Cam	Standard feature
	Keyboard	Inbuilt Rupee Symbol and Copilot Key Button Laptop should have Caps Lock Indicator	Standard feature
Other T&C	Additional ATC Terms	Respective Collector Office or Land Records	Requirement from identifying laptop as Govt. Property
		Product shall be with Preinstall OEM Own Manageability Tool/Software for Asset Management, Patch Management, Power Management Settings, 3rd Party Application Deployment, and Network Monitoring facility [Factory Preloaded).	Standard Features
		OEM Data Backup/Recovery Tool shall be Factory Preloaded with the supplied Laptops	
		Same OEM Backpack with OEM Brand Logo	
		Proposed Laptop shall be Window11, FCC,CE,CB, ROHS,ISO 50000, ISO 270000,ISO 20000, EPR MILL STANDARD 810 Certified. All above certificates shall be submitted along with the technical bid.	For robust use
		Bidder should submit Ink Signed Bid Specific Manufacturers Authorization Form (MAF)/ Certificate from proposed OEM i.e Laptop and Microsoft OEM division with OEM detalls such as name, designation, address, e-mail Id and Phone No, along with the bid. Genuine MAF to be submitted as MAF issuance confirmation will be taken from respective OEM.	Standard feature

Specification Parameters - Multi-functional Printer-Scanner-Copier

Parameter	Description	Proposed Specification	reasoning/justification
Print Technology	InkJet	InkJet	Inkjet refilling is economical than Laser
Type of Machine	Multifunction Machine	Multi-functional Printer-Scanner-Copier	Essential feature for Talati office use.
Type of Printing	Mono	Mono	Black and white printer is required and not a color print out
Cartridge Technology	B/w Ink Cartridges	B/w Inkjet Cartridge	Standard feature
Platen/Flatbed Size	A4	A4	Standard feature
Paper Size (Original / Image]	A4/A4	A4/A4	Standard feature
RAM Size (MB)	512	512	Standard feature
Minimum Speed per Minute as per ISO/ IEC 24734 in A4 Size Mono	Minimum 20	Minimum 20	Standard feature
Resolution(Dpi)	2400 x 1200	2400 x 1200	Standard feature
Hard Disk Capacity (GB)	0 or higher	0 or higher	Internal HDD is not required
Scanning Feature Availability	Yes	Yes	Standard feature
Duplexing Feature Avallability	Yes	Duplex printing	Standard feature
Networking Feature Availability	Yes (Ethernet 10/100)	Yes,	Standard feature
Wi-Fi Availability	Yes (802.11 b/g/n & Wi Fi Direct)	Yes,	Standard feature
Original Document Feeder Type	ADF	ADF	Standard feature
Feeder Capacity (Number)	35	35	Standard feature
Number of Main Paper Tray	1	1	Standard feature
Each Main Paper Tray Capacity (Number)	250	250	Standard feature
By pass Facility & Bypass Tray capacity	Yes and 1	Yes and 1	Standard feature
Yeild of Single Cartridge/Ink Tank/Ink Pack Supplied with Machine as per ISO/IEC : 19752/2004 (E) for black (Number of prints)	Minimum 6000	Minimum 6000	Standard feature
Duty Cycle	Minimum 20000	Minimum 20000	Standard feature
BIS Registration Under CRS of Meity	Yes	Yes	Standard feature
Other Certifications Available	RoHS	RoHS	Standard feature
On site OEM Warranty (Year)	3	3	Standard feature

महाराष्ट्र जमीन महूसल संहिता, १९६६ अंतर्गत जिल्हाधिकारी, प्रांत अधिकारी व तहसिलदार यांचे नियमपुस्तिका (Manual) तयार करणेबाबत... (शुध्दीपत्रक)

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांक: मजसं-२०२५/प्र.क्र.०१/ज-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २५ मार्च, २०२५

वाचा:- शासन निर्णय क्रमांक: मजसं-२०२५/प्र.क्र.०१/ज-१, दि. १८ फेब्रुवारी, २०२५.

शासन शुध्दीपत्रक :-

शासन समक्रमांच्या दिनांक १८ फेब्रुवारी, २०२५ च्या शासन निर्णयातील परि. अ) मध्ये नमूद केल्यानुसार महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत जिल्हाधिकारी नियमपुस्तिका Manual तयार करण्याबाबत शासनास शिफारस करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीमध्ये खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार "**अनु. क्र.२ वरील जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या ऐवजी जिल्हाधिकारी, अहिल्यानगर असा अंशत: बदल तसेच, सदर समितीमध्ये अनु. क्र. ५ येथे जिल्हाधिकारी, नांदेड व अनु क्र.६ येथे जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचा सदस्य**" म्हणून नव्याने समावेश करण्यात येत आहे.:-

अ.क्र.	अधिकाऱ्याचे पदनाम	पद
१.	विभागीय आयुक्त, कोंकण	अध्यक्ष
२.	**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर**	**सदस्य**
३.	जिल्हाधिकारी, जालना	सदस्य
४.	जिल्हाधिकारी, जळगांव	सदस्य
५.	**जिल्हाधिकारी, नांदेड**	**सदस्य**
६.	**जिल्हाधिकारी, चंद्रपूर**	**सदस्य**
५.	उप आयुक्त (महसूल), कोंकण विभाग	सदस्य-सचिव

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२५०३२५१२४७५५१८१९ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(मोहसिन रा. शेख)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

मा. बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजनेंतर्गत माजी सैनिक व सैनिक विधवा/पत्नी यांना मालमत्ता करातून सूट देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन शुद्धीपत्रक क्रमांक: संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१०१/भाग-२/का-मासैक
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २८/०३/२०२५.

वाचा:-

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण २०२०/प्र.क्र. १०१/भाग़-२/मासैक, दि.२३/११/२०२०
२) संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांचे पत्र क्र.१८१४३/टॅक्सेस/सैकवि-१७, दि. १४/०८/२०२४.

शासन शुद्धीपत्रक :-

उपरोक्त वाचा येथील संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यातील माजी सैनिक व सैनिक विधवा/पत्नी यांना मालमत्ता करातून सूट देण्यात येत आहे.सदर शासन निर्णयातील परिच्छेद २ अ मध्ये " या योजनेचे लाभ मिळण्यासाठी सदर माजी सैनिक महाराष्ट्र राज्यात जन्मलेला असावा किंवा महाराष्ट्र राज्याचा किमान १५ वर्षे सलग रहिवासी असावा." असे नमुद केले आहे.

याऐवजी संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णय परिच्छेद २ अ मधील अट खालीलप्रमाणे वाचावी:-

" या योजनेचे लाभ मिळण्यासाठी सदर माजी सैनिक महाराष्ट्र राज्याचा जन्मतः अधिवासी असावा किंवा त्यांचे आई/वडील/आजी/आजोबा महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत. इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या माजी सैनिकांनी सैन्यसेवेतील निवृत्तीनंतर किमान सलग १५ वर्षे महाराष्ट्र राज्यात वास्तव्य केलेले असावे व या कालावधीमध्ये त्यांनी इतर कोणत्याही राज्यातील सैनिक कल्याण कार्यालयाचे माजी सैनिक ओळखपत्र घेतलेले नसावे."

२. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२५०३२८१८१०२०५८०७ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(उर्मिला सावंत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय,बुलढाणा

विषय क्र.३

अर्धन्यायिक कामकाजाबाबत धोरणात्मक शासन निर्णय

अर्ध न्यायिक प्रकरणात दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात क्षेत्रीय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना दिशानिर्देश देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः न्यायाप्र- २०२१/प्र.क्र.११६ /ज-१ अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १८ जानेवारी,२०२२.

वाचा -

१.शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक जमीन-२०१९/प्र.क्र.१७९/ ज-१अ, दिनांक १३/९/२०१९
२. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट पिटीशन क्र.५०४६/२०२१ मधील दिनांक ७/९/२०२१ चे आदेश

प्रस्तावना -

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी संदर्भाधीन रिट पिटीशन क्र.५०४६ / २०२१ मध्ये दिनांक ०७/०९/२०२१ रोजीच्या आदेशात **नमूद केल्यानुसार, जिल्हाधिकारी, पुणे यांचे दिनांक** ०६/०१/२०१० **रोजीचे परिपत्रक व विभागीय आयुक्त, पुणे यांचे दिनांक** १५/१२/२०१० **रोजीचे परिपत्रक यांमध्ये देण्यात आलेल्या सूचनांच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावरील महसूली अधिकाऱ्यांमार्फत होत असलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने राज्य स्तरावर सविस्तर एकत्रित सूचना देण्याबाबत आदेशित केले आहे. तसेच, एका प्रकरणात मा.लोकायुक्त यांच्याकडे झालेल्या सुनावणी दरम्यान मा.मंत्री (महसूल) व मा.राज्यमंत्री (महसूल) यांच्याकडील अर्धन्यायिक प्रकरणातील आदेशही रितसररित्या विभागामार्फत क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्याबाबत आदेशित केले आहे.**

काही प्रकरणांतील निकालांची अंमलबजावणी करताना असे निदर्शनास आले आहे की, बहुतांश वेळा अपिल/पुनरिक्षणाचा अंतिम निकाल झाल्यानंतर, पुढील अपिल मुदतीच्या आधीच प्रकरणात अंमलबजावणी करण्यात येते. त्यामुळे प्रकरणात कायदेशीर गुंतागुंत निर्माण होतात. तसेच संबंधित पक्षकारांना आर्थिक, मानसिक ताण तणावांना सामोरे जावे लागते व यामध्ये महसूल विभागाची प्रतिमाही खराब होते.

त्यामुळे, क्षेत्रीय स्तरावर असलेल्या सगळयाच अर्धन्यायिक कामकाजात पारदर्शकता व सुसूत्रता यावी यासाठी क्षेत्रीय स्तरावर सध्याच्या कार्यपध्दतीचे अवलोकन करता, महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना सर्व अर्धन्यायिक प्रकरणी कार्यवाही करण्यासाठी **सूचना देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.**

शासन परिपत्रक -

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम,१९७१ मधील तरतूदींन्वये प्राप्त अधिकारानुसार, **अर्धन्यायिक कामकाजात पारदर्शकता व सुसूत्रता यावी यासाठी क्षेत्रीय स्तरावरील सध्याच्या कार्यपध्दतीचे अवलोकन करता, सर्व महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना** अर्धन्यायिक प्रकरणी कार्यवाही करण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

१) अर्धन्यायिक कामकाजामध्ये ज्या दिवशी अथवा ज्या तारखेला अंतिम आदेश / स्थगिती आदेश पारीत झालेला असेल त्याच दिवशी सदर आदेश शासनाच्या eqjcourts.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे आवश्यक राहिल.

२) ज्यावेळी नवीन प्रकरण दाखल होते त्यावेळी संबंधीत पक्षकार, वकील यांचा भ्रमणध्वनी क्रमांक घेऊन तो शासनाच्या "eqjcourts.gov.in" या संकेतस्थळावर upload करणे आवश्यक राहिल जेणे करून, प्रकरणाचा जेव्हा अंतिम निकाल होईल तेव्हा झालेल्या आदेशाबाबत त्यांना Message द्वारे निकालाची कल्पना होऊ शकते. यामध्ये संबंधित पक्षकार तात्काळ निकालाची प्रत काढुन झालेल्या आदेशाबाबत पुढील कार्यवाही करणेसाठी त्याचा मार्ग सुकर होईल.

३) **अपिल/पुनरिक्षण/पुर्नविलोकन आदेश निर्गमित झाल्यानंतर जो अनुज्ञेय अपिल** कालावधी आहे तो संपुष्टात आल्यावरच प्रकरणी आदेशाची अंमलबजावणी करावी जेणे करून प्रकरणात अधिक गुंतागुंत होणार नाही. तथापि, ज्या अर्धन्यायिक आदेशांमध्ये आदेशांच्या अंमलबजावणीबाबत विशिष्ट सूचनेचा उल्लेख असल्यास त्याप्रमाणे अर्धन्यायिक आदेशाची अंमलबजावणी करणे बंधनकारक असेल.

४) अर्धन्यायिक कामकाजात बहुतांश प्रकरणे हे वरिष्ठ पातळीवरून अंशतः मंजूर करून, अधिक चौकशीसाठी कनिष्ठ कोर्टाकडे पाठविण्यात येतात. परंतु अशा प्रकरणांच्या बाबतीत, त्यामध्ये दिलेल्या कालावधीत फेरचौकशी झाली किंवा नाही याची पडताळणी केली जात नाही. त्यामुळे अशी प्रकरणे वर्षानुवर्षे फेरचौकशीसाठी तशीच पडून राहतात व पक्षकारांना यामध्ये तात्काळ न्याय मिळत नाही. यासाठी **सर्व महसूली प्राधिकारी व अधिकारी** यांनी अशा प्रकरणांचा त्यांच्या पातळीवरून पारित केलेल्या आदेशांच्या अनुषंगाने सतत पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

५) मा.मंत्री (महसूल) अथवा मा.राज्यमंत्री (महसूल) स्तरावर अर्धन्यायिक प्रकरणांमध्ये दिले जाणारे स्थगिती आदेश अथवा अंतरिम अथवा अंतिम आदेशाची अंमलबजावणी या विभागाच्या संबंधित कार्यासनांकडून रितसररित्या क्षेत्रीय कार्यालयांना कळविल्यानंतरच करण्यात यावी.

०२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२२०११८१६५६०९९७१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAMESH SHIVAJI CHAVAN

(रमेश चव्हाण)

सह सचिव, महसूल व वन विभाग

प्रत,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,

पृष्ठ ३ पैकी २

अर्धन्यायिक स्वरुपाच्या प्रशासकीय सुनावण्या घेण्याकरिता व्हिडीओ कॉन्फरन्सिंगचा (ऑनलाईन सुनावणीचा) पर्याय उपलब्ध करून देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण – २०२०/प्र.क्र.६२/१८ (र.व का.)
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२
दिनांक : १७ मे, २०२२.

वाचा:- :

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०२० / प्र. क्र. ६२ / १८ (र.व का.), दिनांक १३ ऑक्टोबर, २०२०.

प्रस्तावना:-

कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विविध अधिनियमांतर्गत विविध सक्षम प्राधिकरणांद्वारे घेण्यात येत असलेल्या अर्धन्यायिक स्वरुपाच्या सुनावण्या तसेच माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्रथम अपिलांच्या सुनावण्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून घेण्यात याव्यात, या मागणीसाठी मा. मुंबई उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेस (क्रमांक PIL (L) ३१४४ / २०२०, श्री. शैलेश गांधी व इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन) अनुसरून कोविड-१९ विषाणूंच्या प्रादुर्भावाच्या परिस्थितीमध्ये सदर सुनावण्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून घेण्याबाबतच्या सूचना दिनांक १३ ऑक्टोबर, २०२० च्या संदर्भीय शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून सुनावण्या घेण्याची सदर पद्धत फक्त कोविड कालावधीपुरतीच न राहता ती कायमस्वरूपी करण्याबाबत उक्त याचिकेत याचिकाकर्ते यांनी दिनांक २६ ऑक्टोबर, २०२० च्या निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे. या पार्श्वभूमीवर सुधारित सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक:-

अर्धन्यायिक स्वरुपाच्या प्रशासकीय सुनावण्या घेण्याकरिता व्हिडीओ कॉन्फरन्सिंगचा (ऑनलाईन सुनावणी) पर्याय यापुढेही सर्व शासकीय कार्यालयांमध्ये पुढील अटींच्या अधीन राहून उपलब्ध करून देण्यास या परिपत्रकान्वये मान्यता देण्यात येत आहे:-

अ) सध्या कोविड संदर्भातील आदेशान्वये कोविड प्रतिबंधात्मक निर्बंध उठविण्यात आलेले असल्याने अर्जदारांना / पक्षकारांना प्रत्यक्ष सुनावणीसाठी कार्यालयात उपस्थित राहण्याचा पर्याय जरी उपलब्ध असला तरी, अर्धन्यायिक स्वरूपाची सुनावणी घेणा-या प्राधिकरणांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे (ऑनलाईन) सुनावणी घेण्याचा पर्याय उपलब्ध ठेवावा व कोणत्या माध्यमातून सुनावणी ठेवावी यासंदर्भात सुनावणी घेणा-या प्राधिकरणाने उचित निर्णय घ्यावा.

ब) सुनावणी घेणा-या प्राधिकरणाने अर्धन्यायिक स्वरूपाच्या सुनावणीस अर्जदारास / पक्षकारास व्यक्तीश: (समक्ष) कार्यालयात बोलाविल्यास शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या कोविड - १९ विषाणूसंदर्भातील प्रतिबंधात्मक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

क) अर्जदाराने / पक्षकाराने अर्धन्यायिक सुनावणीकरीता व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे (ऑनलाईन) सुनावणीची मागणी केल्यास त्याला अशा ऑनलाईन सुनावणीचा पर्याय, सुनावणी घेणा-या प्राधिकरणाने उपलब्ध करून दयावा. त्याकरीता आवश्यक सुविधा कार्यालयात उपलब्ध करून घेण्याची योग्य ती व्यवस्था करावी.

३. सदर परिपत्रकान्वये देण्यात आलेले आदेश पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

४. सदर परिपत्रक वित्त्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ६६७ /२०२१/ व्यय-४, दिनांक १०/१२/२०२१ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२२०५१७१७५१५७५२०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SOMNATH NAMDEO BAGUL

Digitally signed by SOMNATH NAMDEO BAGUL
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b01714c1480a47cec5943a1c3c73ea95af0534418cf92d1ac844331c4116879d, serialNumber=4807c89831881ede55b0d82cb9991539d1bd33c6f8a64931d9194d5e2cbdcf56, cn=SOMNATH NAMDEO BAGUL
Date: 2022.05.17 17:54:38 +05'30'

(सो. ना. बागुल)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
८. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
९. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
१०. सर्व मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
११. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

Instructions on the "Notice Period" for personal hearing in the matters before Various Authorities.

Government of Maharashtra
Law and Judiciary Department
Government Circular No. 518-2023/E
Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai- 400032.
Date : 14th July, 2023

Circular

The Hon'ble High Court of Judicature at Bombay, by order dated 29th March, 2023 passed in Writ Petition No. 3973/2023 *(Devidas Anandrao Pingale V/s State of Maharashtra & Ors.)*, has expressed displeasure in respect of the Notice given to the Petitioner for the personal hearing before the Authority in the case filed under the provisions of the Maharashtra Agricultural Produce Marketing (Development and Regulation) Act, 1963.

2. The Hon'ble High Court, in Paras 1 and 2 of the aforesaid Judgment, (copy enclosed) has, *inter alia,* directed/observed as under:-

> "***…..State of Maharashtra is directed that in all those matters where personal hearing has to be given, they shall give minimum five working days notice to all parties in every matter, and that applies to this matter as well. This is a direction that shall apply to personal hearing before every authority.***
>
> 2….. ***State of Maharashtra is put to notice through its Chief Secretary that if, such notices are brought to the notice of the court, this court may impose substantial costs to be recovered from the salary of Principal Secretary of the concerned department."***

3. Further, the Hon'ble High Court has observed that giving less than 24 hours' notice or short notice of hearing is against the principles of natural justice.

4. All the departments are, therefore, instructed to strictly adhere to the aforementioned directions of the Hon'ble High Court with regard to

'Notice period' to the parties concerned for personal hearing, before various Authorities to ensure Natural Justice.

Non-compliance of the said directions may result in imposition of cost by the Hon'ble Court to be recovered from the salary of the Principal Secretary of the concerned Department.

5. The aforesaid directions be also brought to the notice of the offices under the administrative control of the departments.

6. This Government Circular of Maharashtra Government is available at the website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 202307141653155212. This Circular has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NEERAJ PRADEEP DHOTE

Digitally signed by NEERAJ PRADEEP DHOTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=LAW AND JUDICIARY DEPARTMENT, 2.5.4.20=ecf8ac6cd2050be6b2f1a2e67257b46e511d059da5a2b598b641533ab0393dac, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=714EFBF760DA6C143FDF63D5EC3DA8A8957B82D41451A5F202043CE4895E4205, cn=NEERAJ PRADEEP DHOTE
Date: 2023.07.14 16:56:30 +05'30'

(Neeraj P. Dhote)
Principal Secretary & R.L.A.
Law and Judiciary Department
Government of Maharashtra

Copy for information and necessary action to:-

1. All Additional Chief Secretaries/Principal Secretaries/ Secretaries Maharashtra State, Mantralaya, Mumbai.
2. The Joint Secretary (Law) to the Hon'ble Chief Secretary, Maharashtra State, Mantralaya, Mumbai.
3. The Joint Secretary, Law and Judiciary Department 'A' Branch/ 'M' Branch/Nagpur/Aurangabad.

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
CIVIL APPELLATE JURISDICTION
WRIT PETITION NO.3973 OF 2023

Devidas Anandrao Pingale ….Petitioner

V/s.

Agricultural Produce Market Committee
Nashik & Ors. …Respondents

Mr. Kishor Patil i/b Mr. Pratik Rahade for Petitioner.
Mr. Sachin Gite for Respondent.
Ms K. N. Solunke, AGP for State Respondent nos.2, 4, 5 & 6.
Mr. Shailesh Surve, Desk Officer, Mantralaya.

CORAM : K.R. SHRIRAM &
RAJESH S. PATIL JJ
DATED : 29th MARCH 2023

P.C. :

1 The grievance in the petition is, as submitted by Mr. Patil that the notice for personal hearing that was scheduled to be held on 24th March 2023, was served only on 25th March 2023. Ms Solunke on instructions from Mr. Shailesh Surve, Desk Officer, Mantralaya, states that the notice was issued on 23rd March 2023 and the Desk Officer called petitioner and informed that the personal hearing is fixed at 1.30 p.m. on 24th March 2023. Mr. Patil denies that any such telephonic call has been received from the so called Desk Officer. The indisputable fact is that the written notice was delivered only on 25th March 2023. Ms Solunke had no explanation when the court queried as to why the notice for personal hearing of 24th March

::: Uploaded on - 31/03/2023 ::: Downloaded on - 14/07/2023 16:13:37 :::

2023 has been issued only on 23rd March 2023. State of Maharashtra is directed that in all those matters where personal hearing has to be given, they shall give minimum five working days notice to all parties in every matter, and that applies to this matter as well. This is a direction that shall apply to personal hearing before every authority.

2 Copy of this order to be sent to the Principal Secretary, Law and Judiciary Department, who shall circulate this order to every department. This will ensure courts are not saddled with this kind of petitions. By giving less than 24 hours notice or short notice is against the principles of natural justice. State of Maharashtra is put to notice through its Chief Secretary that if, such notices are brought to the notice of the court, this court may impose substantial costs to be recovered from the salary of Principal Secretary of the concerned department. Copy of this order be also sent to the Learned Advocate General of Maharashtra, for information and necessary action.

3 As regards the matter at hand, we are informed no order has been passed and the personal hearing is scheduled to be held on 10th April 2023 at 2.30 p.m. Mr. Patil states petitioner will attend the personal hearing either in person or through his duly authorised Advocate / representative.

4 Should petitioner wish to file written submissions recording what had transpired during the personal hearing, he shall submit the same within three working days after the personal hearing. The order to be passed shall be a reasoned order dealing with every submission of petitioner.

::: Uploaded on - 31/03/2023 ::: Downloaded on - 14/07/2023 16:13:37 :::

5 Petition disposed.

6 We clarify that we have not made any observations on the merits of the matter.

(RAJESH S PATIL, J.) (K.R. SHRIRAM, J.)

::: Uploaded on - 31/03/2023 ::: Downloaded on - 14/07/2023 16:13:37 :::

अर्धन्यायिक प्रकरण- अर्धन्यायिक आदेशांना अंमल देणे तसेच अधिकार अभिलेखात नोंद घेण्यासंदर्भात निर्देश..

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः अन्याप्र - २०२३/प्र.क्र.८०/ज-१ अ

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक: ०७ ऑगस्ट २०२३

वाचा:-

शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. न्यायाप्र-२०२१/प्र.क्र.११६/ज-१अ, दि.१८/०१/२०२२

प्रस्तावना-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि, महाराष्ट्र जमीन महसूल (अपिले, पुनरिक्षण व पुनर्विलोकन) नियम, १९६७ आणि उक्त संहितेखालील अन्य नियमातील तरतूदी या अन्वये प्राप्त अधिकारात जमीन विषयक अर्धन्यायिक प्रकरणे शासन स्तरावर मा. मंत्री (महसूल) / मा. राज्यमंत्री (महसूल) यांचेकडे वेळोवेळी दाखल करण्यात येतात. मा. मंत्री (महसूल) यांचेसमोरील अशा अपील, पुनरिक्षण अर्जावरील सुनावणीच्या वेळी असे निदर्शनास आले आहे की, अपर आयुक्त / उपसंचालक, (भूमि अभिलेख) अथवा सक्षम प्राधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशास क्षेत्रीय महसूली अधिकारी हे कित्येक महिने अंमल देत नाहीत किंवा अशा आदेशाची उचित नोंद अधिकार अभिलेखात घेत नाहीत. तद्नंतर असे आदेश शासन स्तरावर आव्हानित केल्यानंतर देखील अशा आदेशास क्षेत्रीय स्तरावर अंमल देण्यात आलेला नसतो तसेच अधिकार अभिलेखात यांची नोंद देखील घेतलेली नसते.

मात्र, शासन स्तरावर दाखल अपिल / पुनरिक्षण अर्जावर सुनावणी आयोजित केल्यानंतर आणि सुनावणीची नोटीस सर्व संबंधितांना पाठविण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविण्यात आल्यानंतर घाईघाईने अपर आयुक्त / उपसंचालक (भूमी अभिलेख) अथवा सक्षम प्राधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशास अंमल देण्याची / अधिकार अभिलेखात नोंदी घेण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर करण्यात येते. ही बाब योग्य व न्यायोचित नाही. यानुषंगाने, सर्व महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना अर्धन्यायिक आदेशाना अंमल देणे तसेच अधिकार अभिलेखात नोंद घेण्यासंदर्भात निर्देश देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक:-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि त्याखालील नियमान्वये प्राप्त अधिकारात क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना अर्धन्यायिक प्रकरणी पारीत आदेशास अंमल देणे व त्याची उचित नोंद अधिकार अभिलेखात घेण्याच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत :-

(१) अपर आयुक्त / उपसंचालक (भूमी अभिलेख) अथवा सक्षम प्राधिकारी यांनी पारीत केलेल्या आदेशास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता अधिनियम, नियमांतील तरतूदी आणि शासनाने

वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार विहित कालावधीत अंमल देवून, त्याची उचित नोंद अधिकार अभिलेखात घेण्याची दक्षता यावी.

(२) तसेच, अशा प्रकरणी अपर आयुक्त, उपसंचालक (भूमि अभिलेख) अथवा सक्षम प्राधिकारी यांनी पारित केलेल्या अर्धन्यायिक आदेशाची अंमलबजावणी केली नसल्यास आणि असे अर्धन्यायिक आदेश संबंधितांनी, शासन स्तरावर मा. मंत्री (महसूल) / मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे स्तरावर संबंधितांनी आव्हानित केल्यामुळे त्याबाबतची सुनावणीची नोटीस क्षेत्रीय स्तरावर प्राप्त झाल्यानंतर अशा सुनावणींचे अंतरिम अथवा अंतिम आदेश पारित होईपर्यंत, अपर आयुक्त / उपसंचालक (भूमि अभिलेख) अथवा सक्षम प्राधिकारी यांनी पारीत केलेल्या आदेशास अंमल देण्यात येवू नये. तसेच त्या आदेशाची अधिकार अभिलेखात नोंद घेवू नये. अशा वेळी शासन स्तरावरुन मा. मंत्री (महसूल) / मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे न्यायालयाकडून पारित होणाऱ्या अर्धन्यायिक आदेशाची प्रतिक्षा क्षेत्रीय महसूली प्राधिकारी यांनी करावी.

(३) सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

०४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०८०७१६१८०५७८१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ

Digitally signed by SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=1085617af371f507cb8ee4d914eb645d92480247b61bd58b5c3074ba3a6a62d7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F7145AF5949FB706E2DCB06C2B209B58FFA369F6E085E02041722C90F0528791, cn=SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
Date: 2023.08.07 16:21:36 +05'30'

(डॉ. सत्यनारायण बजाज)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
२. मा. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
३. सर्व विभागीय आयुक्त,
४. जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख, पुणे
५. सर्व अपर आयुक्त,
६. सर्व उपसंचालक (भूमि अभिलेख)
७. सर्व जिल्हाधिकारी
८. सर्व उप विभागीय अधिकारी
९. सर्व अधिक्षक (भूमि अभिलेख)
१०. सर्व निवासी उपजिल्हाधिकारी
११. सर्व तहसिलदार
१२. सर्व उप अधिक्षक (भूमि अभिलेख)
१३. निवड नस्ती (ज-१ अ)

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुषंगाने महसूली अधिकारी व प्राधिकारी यांच्या समोर जमीन विषयक अधिनियमाखाली चालणाऱ्या अर्ध-न्यायिक प्रकरणांच्या संदर्भातील स्थगिती आदेशाच्या बाबतीत मार्गदर्शनात्मक दिशानिर्देश ...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०२१/ प्र.क्र.१५/ज-१अ,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- ०१ ऑगस्ट, २०२४

संदर्भ :- शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०२१/ प्र.क्र.१५/ज१अ, दि.०६ मे,२०२१

शासन परिपत्रक:-

सर्वोच्च न्यायालयातील संकीर्ण याचिका क्र.१५७७/सी.एफ २०२० (क्रिमिनल अपिल क्र.१३७५-७६/२०१३), दि. १५/१०/२०२० च्या आदेशानुसार "मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुषंगाने महसूली अधिकारी व प्राधिकारी यांच्या समोर जमीन विषयक अधिनियमाखाली चालणाऱ्या अर्ध-न्यायिक प्रकरणांच्या संदर्भातील स्थगिती आदेशाच्या बाबतीत मार्गदर्शनात्मक दिशानिर्देश" या विषयावर शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०२१/ प्र.क्र.१५/ ज- १अ, दि ०६,मे २०२१ अन्वये निर्गमित करण्यात आले होते. उपरोक्त परिपत्रकान्वये सर्व संबंधित महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना पुढीलप्रमाणे दिशानिर्देश देण्यात आले होते.

(१) मा.मंत्री (महसूल), मा.राज्यमंत्री (महसूल), प्रधान सचिव (अ.व.रि.), क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी आणि महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांच्या समोर चालणा-या अर्ध-न्यायिक (Quasi-Judicial)/ न्यायिक प्रकरणी ६ महिन्यांपेक्षा जास्त काळाकरीता स्थगिती दिलेल्या सर्व प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने MISCELLANEOUS APPLICATION NO.१५७७ CF २०२० IN CRIMINAL APPEAL NOS.१३७५-७६ OF २०१३ या प्रकरणात दि.१५ ऑक्टोबर, २०२० रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे, सर्व संबंधितांनी योग्य ती कार्यवाही करावी कोणत्याही परिस्थितीत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होणार नाही, याचीही दक्षता घ्यावी.

(२) उक्त नमूद कोणत्याही महसुली न्यायालयाने आणि महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने दिलेली अंतरिम स्थगितीची कालमर्यादा फक्त ६ महिन्यांपर्यंत लागू राहील. महसुली न्यायालयाने सबळ कारणांच्या आधारे, अपवादात्मक परिस्थितीत अशी स्थगिती ६ महिन्यानंतर वाढविली असेल, तरच तत्पुर्वी दिलेली स्थगिती चालू राहील, अन्यथा सदरहु स्थगिती ६ महिन्याचा कालावधी संपल्यानंतर आपोआप व्यपगत होईल. तसेच, हे आदेश संपूर्ण राज्यातील कोणत्याही महसुली अथवा अन्य न्यायालयाने दिलेल्या सर्व स्थगिती आदेशाला लागू राहतील.

०२. तथापि, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. ९७२०/२०२४ श्रीमती. ताराबाई लेंडघर व इतर याप्रकरणी दि.१९/०७/२०२४ रोजीच्या आदेशान्वये विचाराधीन दि.०६/०५/२०२१ रोजीचे परिपत्रकामध्ये नमूद Asian Resurfacing of Road Agency Pvt. Ltd. V. C. B. I. (२०१८) १६ SCC २९९ यातील तरतूदी या फक्त दिवाणी व फौजदारी खटल्यातील प्रकरणांनाच लागू राहतील, असे स्पष्ट केले आहे. सदर आदेश पुढीलप्रमाणे आहे.

"He also relies upon ***Devsingh Ramchandra Chavan Vs. State of Maharashtra & Ors २०२२ (५) Mh.LJ. १३८,*** *in which it has been held that* ***Asian Resurfacing of Road Agency Pvt. Ltd V. C.B.I.*** *(supra) would operate only qua the civil and criminal cases pending in trial and not to any other category of orders passed in proceedings."*

०३. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. ९७२०/२०२४ श्रीमती. ताराबाई लेंडघर व इतर याप्रकरणी दि. १९/०७/२०२४ रोजीचे आदेश विचारात घेता महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. २०२१/प्र.क्र.१५/ ज-१अ, दि. ०६/०५/२०२१ हे रद्द करण्यात येत आहे.

०४. सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व क्षेत्रीय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांनी उपरोक्त तरतूदीची नोंद घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२४०८०११४५९१०९८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MANJUSHA DATTATRAY SONJE

Digitally signed by MANJUSHA DATTATRAY SONJE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=8e491e40da312b87356d474f3637bdb55dff1aa207b172303026 5ad04926cadb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=14ABD3DD33A977D709D803B6057EB9FE0DE69BD4ACD4BF7CA36CED00F53EA72C, cn=MANJUSHA DATTATRAY SONJE
Date: 2024.08.01 15:15:17 +05'30'

(मंजुषा सोनजे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
६) अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८) अप्पर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर
१०) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र१/२, मुंबई/ नागपूर
११) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख,
१२) नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
१४) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
१५) सर्व विभागीय आयुक्त
१६) सर्व जिल्हाधिकारी
१७) सर्व सह सचिव/ उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१९) सह सचिव (ज-१), यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
२०) निवड नस्ती (ज-१)

महसूल विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय,बुलढाणा

विषय क्र.४

गौण खनिज विषयक धोरणात्मक शासन निर्णय

परराज्यातून आणलेल्या वाळूचा साठा व निर्गतीबाबतची कार्यपध्दती निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः गौखनि-०७२०/प्र.क्र.८५/ख-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ०५ फेब्रुवारी, २०२१

वाचा:-

१) शासन परिपत्रक क्रमांकःगौखनि-१०/१११०/प्र.क्र.४४६/ख,दि.२३/०२/२०११
२) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन), नियम-२०१३.

--शासन परिपत्रक--

राज्य शासनाने संदर्भ क्र.१ वरील परिपत्रकाद्वारे महाराष्ट्र राज्यामध्ये वाळूच्या उपलब्धतेचा तुटवडा जाणवत असल्याने राज्यातील वाळूची मागणी पूर्ण करण्यासाठी इतर राज्यातून वाळू वाहतूक करणा-या वाहनाकडे वैध वाहतूक पास असल्यास राज्यात वाळू घेवून येण्यास कोणत्याही प्रकारे प्रतिबंध करण्यात येऊ नये अशा प्रकारच्या सूचना राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच संदर्भ क्र.२ नुसार गौण खनिज उत्खननाचे विनियमन करण्याकरिता नियम तयार करण्यात आले आहे. तथापि, क्षेत्रीय कार्यालयांकडून परराज्यातून आयात केलेल्या वाळूची वाहतूक करणे, साठा करणे व त्याची विक्री करणे तसेच वाळूचासाठा करण्यासाठीचा अकृषक परवाना याबाबत वारंवार शासनाकडे विचारणा करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने पराराज्यातून वाळूचा साठा व विक्री करिता परवानगी देण्याबाबतची कार्यपध्दती कशी असावी या बाबत पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत:-

१) परराज्यातून वाळू/रेती वाहतूक करण्यासाठी संबंधित व्यक्ती/संस्था यांना महाराष्ट्र राज्यामध्ये गौण खनिजाच्या उत्खनन व वाहतूकीसाठीच्या संगणकीय प्रणाली (महाखनिज) मध्ये नोंदणी करणे बंधनकारक राहील.

२) परराज्यातून वैध मार्गाने येणा-या वाळूची क्षेत्रीय कार्यालयाने अनुज्ञप्ती तपासून त्या राज्यातून आणलेली वाळू वैध परवानाद्वारे आणल्याची खात्री करावी.

३) संबंधित व्यक्ती/संस्था स्वत:च्या वापरासाठी परराज्यातून आणलेली वाळू साठा न करता थेट बांधकामाच्या ठिकाणी नेणार असल्यास अशा व्यक्ती/संस्थेकडे त्या राज्यातील वैध वाहतूक पास परिमाणासह असणे आवश्यक आहे.

४) संबंधित व्यक्ती/संस्था परराज्यातून आणलेल्या वाळूचा साठा करुन विक्री करणार असेल तर, महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील नियम ७१ ते ७८ मधील तरतूदीनूसार व्यापारी परवाना घेणे आवश्यक आहे. तसेच आवश्यकतेनुसार व्यापारी परवानाचे नुतनीकरण करता येईल.

५) परराज्यातून रस्त्याने व जलमार्गाने आणलेली वाळू/रेती महाराष्ट्रातील ज्या जिल्ह्याच्या हद्दीमध्ये प्रवेश करणार आहे त्या जिल्हाधिकारी कार्यालयात आणि परराज्यातून रेल्वेने आणलेल्या वाळू/रेती करता ती वाळू/रेती ज्या रेल्वेस्टेशनवर

खाली करण्यात येणार आहे, त्या जिल्हयात संबंधितांने राज्य शासनाने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या स्वामित्वधन दराच्या १०% एवढ़ी प्रतिब्रास रक्कम जिल्हा खनिज प्रतिष्ठान मध्ये जमा करणे आवश्यक राहील.

६) सदरहू रकमेचा भरणा केल्यानंतर संबंधितांना झिरो रॉयल्टी पास देण्याबाबतची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी कार्यलयाने करणे आवश्यक आहे.

७) संबंधित व्यक्ती/संस्था हे ज्या जमीनीवर पर‌राज्यातून आणलेल्या वाळूचा साठा करणार असतील ती जमिन अकृषक असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने क्षेत्रीय कार्यालयाने महाराष्ट्र जमिन महसूल संहिता,१९६६ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

८) संबंधित व्यक्ती/संस्था यांनी वाळूचा साठा व विक्रीची दैंनंदिन नोंद साठा नोंदवहीत घेणे आवश्यक असून सदर नोंदवहीची क्षेत्रीय कार्यालयांकडून वेळोवेळी तपासणी करण्यात यावी.

९) पर‌राज्यातून आणलेल्या वाळूचा वाळूसाठा वैध परवान्यापेक्षा जादा आढळल्यास अथवा वाहतूक झिरो रॉयल्टी पासेस शिवाय केलेली आढळून आल्यास महाराष्ट्र जमिन महसूल संहिता,१९६६ च्या ४८(७) व ४८(८) नुसार दंडात्मक कारवाईसाठी पात्र राहील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२१०२०५१६४५५९५०१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAMESH SHIVAJI CHAVAN

Digitally signed by RAMESH SHIVAJI CHAVAN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=7ada4e8fa11566f3b9c9f7b5fa123945d54f8e3d5b09d05bedfa09b97ee45cad, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=eb458b05e05ee276435bd39953740fd44e1c8802 1cf038b060ac10b9d8fb8787, ou=REVENUE, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAMESH SHIVAJI CHAVAN
Date: 2021.02.05 16:55:46 +05'30'

(रमेश चव्हाण)
शासनाचे सह सचिव

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई (पत्राने)
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (महसूल) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) सर्व मंत्रालयीन विभाग,
७) सर्व विभागीय आयुक्त,
८) सर्व जिल्हाधिकारी,
९) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
१०) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षि कर्वे भवन, न्यू मरीन लाईन्स, मुंबई - ४०० ०२०.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः गौखनि १०/०१२०/प्र.क्र. १७ /ख-२

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक : ०३ /०५/२०२१.

वाचा :-

१) शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक गौखनि १०/०८१२/प्र.क्र.६१३/ख, दिनांक १८/०७/२०१३
२) शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक गौखनि १०/०२१५/प्र.क्र.९२/ख, दि. १२/०१/२०१८.
३) शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक गौखनि १०/०३१६/प्र.क्र.४७२/ख, दि. १२/०१/२०१८.
४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक गौखनि १०/१११८/प्र.क्र.४४८/ख, दि. २३/०१/२०१९.

-: शासन परिपत्रक :-

राज्य शासनाने संदर्भ क्र. १ वरील अधिसूचनेन्वये महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ अधिसूचित करुन, दिनांक १९/०८/२०१३ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द केले आहेत. सदर नियम दिनांक २४/१०/२०१३ रोजीच्या अधिसूचनेन्वये राज्यात दिनांक २४/१०/२०१३ पासून लागू करण्यात आलेले आहेत. तसेच संदर्भ क्र. ३ वरील शासन अधिसूचना दिनांक १२.१.२०१८ अन्वये, महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मध्ये सुधारणा करुन सार्वजनिक जमिनींवरील गौण खनिजाचे खनिपट्टे केवळ जाहीर लिलावपध्दतीने मंजूर करणे, खाजगी जमिनीवरील खनिपट्टे लिलावातून वगळणे, तसेच वडार व कुंभार समाजाच्या पारंपारिक व्यवसायासाठी, या समाजातील कुटुंबांना अर्जाद्वारे परवाने मंजुर करण्याच्या तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरुन संदर्भ क्र. ४ वरील महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक २३/०१/२०१९ अन्वये गौण खनिजाच्या खाणपट्टयाच्या जाहीर लिलावाची कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. अशाप्रकारे गौण खनिजाच्या खाणपट्टयाबाबत कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने शासनाकडून वेळोवेळी आवश्यक त्या सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. परंतु, खाणपट्टयातून गौणखनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक तसेच मंजूरीपेक्षा अधिकचे गौण खनिज उत्खनन होत असल्याबाबत अनेक वेळा तक्रारी प्राप्त होत असतात. तसेच गौण खनिजाचे ईटीएस मशीनद्वारे वेळोवेळी मोजणी करण्याबाबत जनता व लोकप्रतिनीधींकडून मोठ्या प्रमाणात मागणी करण्यात येते. त्याअनुषंगाने खाणपट्टयातून गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश या शासन परिपत्रकान्वये देण्यात येत आहेत:-

१) खाणपट्टाधारकास खाणपट्टयाचा ताबा देतेवेळी तसेच खाणपट्टयाचा कालावधी समाप्त होतेवेळी खाणपट्ट्याची ईटीएस मशीनद्वारे मोजणी करण्यात यावी. तसेच जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या अखत्यारितील खाणपट्टयांची वर्षातून किमान एक वेळा ईटीएस मशीनद्वारे मोजणी करुन घेऊन मोजणीचा अहवाल प्राप्त करुन घ्यावा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख यांनी या कामास प्राधान्य दयावे.

२) मोजणी अंती खनिपट्टाधारक/परवानाधारक यांनी मंजूर खोलीपेक्षा जास्त खोल व मंजूरीपेक्षा जास्त गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे आढळून आल्यास जास्तीच्या गौण खनिज उत्खननापोटी व वापरापोटी वाढीव स्वामित्वधनाची रक्कम ३० दिवसांच्या आत शासनजमा करण्याबाबत अविलंब कळविण्यात यावे.

३) संबंधित खनिपट्टाधारक/परवानाधारक यांनी ३० दिवसाच्या आत जास्तीच्या गौण खनिज उत्खननापोटी व वापरापोटी स्वामित्वधनाची रक्कम शासनजमा केल्यास संबंधितांविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम ४८ (७) अनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येऊ नये. मात्र, संबंधित खनिपट्टाधारक/ परवानाधारक यांनी ३० दिवसांच्या आत जास्तीच्या गौण खनिज उत्खननापोटी व वापरापोटी स्वामित्वधनाची रक्कम शासनजमा न केल्यास संबंधित खनिपट्टाधारक/ परवानाधारक यांच्यावर नियमानुसार दंडाची आकारणी करण्यात यावी.

४) जास्तीच्या गौणखनिज उत्खननप्रकरणी संबंधित खनिपट्टाधारक/परवानाधारक यांनी ३० दिवसांच्या आत जास्तीच्या गौण खनिज उत्खननापोटी व वापरापोटी स्वामित्वधनाची रक्कम शासनजमा न केल्यास वरीलप्रमाणे आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण करण्याबाबत दक्षता घेण्यात यावी. दंडाची रक्कम विहीत कालावधीत भरणा न करणाऱ्या लिलावधारक/ परवानाधारकास तो अशी दंडाची रक्कम शासनजमा करेपर्यंत वाहतूक पास देऊ नयेत. तसे न करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२१०५०३१५४४५३२८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAMESH SHIVAJI CHAVAN

Digitally signed by RAMESH SHIVAJI CHAVAN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=7ada4e8fa11566f3b9c9f7b5fa123945d54f8e3d5b09d05bedfa09b97ee45cad, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=eb458b05e05ee27f435bd399537405d44e1c88021cf038b060ac10b9d8fb8787, ou=REVENUE, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAMESH SHIVAJI CHAVAN
Date: 2021.05.03 15:52:02 +05'30'

(रमेश चव्हाण)
शासनाचे सह सचिव

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन मलबार हिल मुंबई. (पत्रान्वये)
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री (महसूल) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्याकरिता राज्यस्तरीय दक्षता पथक स्थापन करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः गौखनि १०/०५२१/प्र.क्र.१४२/ख-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: २९/०६/२०२१

वाचा :-

१) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम,२०१३
२) शासन निर्णय क्रमांक गौखनि १०/१०१४/प्र.क्र.५००/ख, दि.२१/०५/२०१५.
३) शासन निर्णय क्रमांक गौखनि १०/०२१९/प्र.क्र.९/ख-१, दि.०३/०९/२०१९

प्रस्तावना:-

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम,२०१३ अन्वये राज्यातील गौण खनिज उत्खननाचे विनियमन करण्याकरिता नियम तयार करण्यात आले आहेत. सदर नियम शासन अधिसूचना दि.१८/०७/२०१३ अन्वये राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहे. तसेच शासन निर्णय दि.२१/०५/२०१५ अन्वये सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती निर्गती धोरण अवलंबिण्यात आले आहेत.

तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने दिलेल्या वेळोवेळी मार्गदर्शक सूचना तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय व मा. हरित लवादाचे निकष तसेच काही ठळक राज्यांचा अभ्यास करुन सर्वकष वाळू/रेती निर्गती धोरण शासन निर्णय दि.०३/०९/२०१९ अन्वये निश्चित करण्यात आले आहे.

राज्याच्या विकासात गौण खनिजाचे महत्व अनन्यसाधारण आहे. मोठे, मध्यम व लघु प्रकल्प, रस्ते, बांधकाम इत्यादी पायाभूत सुविधांसाठी गौण खनिजांचा प्रामुख्याने वापर केला जातो. गौण खनिजांच्या उपलब्धतेवर पायाभूत सुविधा उभ्या करणे अवलंबून असते. शासनाने गौण खनिजांचे अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्याकरिता वेळोवेळी उपाययोजना केल्या आहेत. तरीही गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक सुरु असल्याच्या काही घटना शासनाच्या निदर्शनास येत आहेत. गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रभावीरित्या आळा घालण्याकरिता महसूली विभाग निहाय राज्यस्तरीय दक्षता पथक स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या तक्रारीच्या पडताळणीसाठी आणि आकस्मिक तपासणीसाठी महसूली विभाग निहाय खालील अधिका-यांचा समावेश असलेले राज्यस्तरीय दक्षता व निरीक्षण पथक स्थापन करण्यात येत आहे. प्रत्येक विभाग निहाय राज्यस्तरीय दक्षता व निरीक्षण पथक पुढीलप्रमाणे राहील:-

विभागीय आयुक्त यांनी नियुक्त केलेले:-

१) उपायुक्त	--	पथक प्रमुख
२) उपजिल्हाधिकारी	--	सदस्य
३) जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख	--	सदस्य
४) जिल्हा खनिकर्म अधिकारी (तपासणी करावयाचा जिल्हा वगळता अन्य जिल्ह्यातील)	--	सदस्य सचिव

विभागीय आयुक्त यांनी सदर पथकाकरिता गरजेनुसार वेळोवेळी अधिकाऱ्यांचे नियुक्ती आदेश काढावेत.

सदर दक्षता निरीक्षण पथकाकडून करण्यात येणा-या तपासणी दरम्यान गौण खनिजाचे अवैध उत्खनन, वाहतूक व गौण खनिजाचा अवैध साठा आढळून आल्यास उत्खननासाठी वापरण्यात आलेली यंत्रसाम्रगी, वाहतूकीची साधने व गौण खनिज जप्त करुन ते संबंधित तहसिलदार यांच्या ताब्यात देण्यात यावे.

संबंधित तहसिलदार यांनी सदर गौण खनिजाच्या साठ्याचा व यंत्रसाम्रग्रीच्या विल्हेवाटीबाबत व कारवाईबाबत नियमानुसार विहित कार्यपध्दती अनुसरुन तात्काळ कार्यवाही करावी.

पथकाने केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल संबंधित विभागीय आयुक्त यांना सादर करावा व विभागीय आयुक्त यांनी त्यावर नियमानुसार कारवाईच्या सूचना संबंधितांना द्याव्यात.

सदर दक्षता पथकास शासनाने निर्देशीत केल्यास दुस-या विभागात जाऊन गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या तक्रारीवर कारवाई करता येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०६२९११५६३५२४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAMESH SHIVAJI CHAVAN

Digitally signed by RAMESH SHIVAJI CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7ada4e8fa11566f3b9c9f7b5fa123945d54f8e3d5b09d05bedfa09b97ee45cad, pseudonym=8681E76138CFE5A3E889AB0B442F95DD2288C273, serialNumber=EB458B05E05EE27F435BD39953740SD44E1C88021CF038B060AC10B9D8FB8787, cn=RAMESH SHIVAJI CHAVAN
Date: 2021.06.29 12:07:01 +05'30'

(रमेश चव्हाण)

शासनाचे सह सचिव

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन मलबार हिल मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४) मा. सभापती/उपसभापती/विरोधी पक्ष नेते (विधानसभा) यांचे सचिव
५) मा. सभापती/उपसभापती/विरोधी पक्ष नेते (विधान परिषद) याचे सचिव
६) मा. मंत्री (महसूल) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७) मा. राज्यमंत्री (महसूल) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८) सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) सर्व विधानपरिषद सदस्य/ विधानसभा सदस्य

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः गौखनि-१०/१०२१/प्र.क्र.८२/ख-१,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय मुंबई-३२,
दिनांक : २८ जानेवारी, २०२२.

वाचा :-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक : गौखनि-१०/१०१४/प्र.क्र.५००/ख, दिनांक : २१ मे, २०१५.

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक : गौखनि-१०/०२१९/प्र.क्र.९/ख-१, दिनांक : ३ सप्टेंबर, २०१९.

३) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील प्रकरण पाच.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील प्रकरण पाच मध्ये, नाला, नदी व खाडीपात्रातील वाळू/रेतीच्या निर्गतीबाबत तरतुदी केल्या असून, नियम ७० मध्ये, "लिलाव, विनियोग इत्यादीच्या अटी व शर्ती यासंबंधातील कार्यपध्दती शासनाकडून वेळोवेळी सूचनांच्याद्वारे विर्निदीष्ट करण्यात येईल," अशी तरतूद केली आहे. त्यानुसार यापूर्वी शासन निर्णय क्र.गौखनि-१०/१०१४/प्र.क्र.५००/ख, दि.२१.०५.२०१५ अन्वये खाडीपात्रातील वाळू/रेती निर्गती विषयी धोरण जाहीर केले होते. त्याचप्रमाणे क्र.गौखनि-१०/०२१९/प्र.क्र.९/ख, दि.३ सप्टेंबर,२०१९ अन्वये नदीपात्रातील वाळू/रेती निर्गती विषयी धोरण जाहीर करण्यात आले आहे.

खाडीपात्रातील वाळू / रेती उत्खननाबाबतच्या दि.२१.५.२०१५ रोजीच्या सदर धोरणामधील हातपाटी / डूबी पद्धतीने पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती व संस्थांकरिता वाळूगटाच्या हातची किंमत ही दरवर्षी १५ टक्के वाढविण्यात येत असल्यामुळे तसेच हातपाटी / डूबी पद्धतीने उत्खनन करावयाच्या वाळूगटांसाठी निश्चित करण्यात येणारी हातची किंमत यांत्रिकी पद्धतीने उत्खनन करणाऱ्यांसाठीच्या लिलावाच्या दरासोबत जोडून ठरविली जात होती. यामुळे हातपाटी / डूबी पद्धतीच्या वाळूगटांची हातची किंमत फार मोठ्या प्रमाणावर वाढल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर प्राप्त झाल्या. सदर तक्रारींबाबत मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली बैठका आयोजित करण्यात आल्या.

त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या खनिकर्म विभागाने मार्च,२०१८ मध्ये Sand Mining Framework-२०१८ प्रसिद्ध केले, त्यामध्ये देशातील काही ठळक राज्यांचा अभ्यास करुन वाळू / रेती निर्गती करताना आवश्यक असणाऱ्या बाबींसंदर्भात काही दिशानिर्देश दिले. तसेच मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने (NGT) यांनी O.A.No.३६८/२०१५ मध्ये दिनांक १९/०९/२०१८ रोजीच्या केंद्र

शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय यांच्याशी समन्वय साधून Sustainable Sand Mining Guidelines,२०१६ व Sand Mining Framework,२०१८ नुसार धोरणात अनुकुल बदल करण्याचे निदेश दिले होते. त्याचप्रमाणे मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांच्याकडे दाखल जनहित याचिका क्र.११०/२०१८ मध्ये मा.उच्च न्यायालयापुढे सुधारित वाळू धोरण तयार करण्याचे आश्वासन राज्य शासनातर्फे देण्यात आले. त्यानुसार केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय यांच्याशी समन्वय साधून नवीन वाळू / रेती निर्गती धोरण तयार करण्यासाठी संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय यांच्या अध्यक्षतेखालील समिती स्थापन करुन काही ठळक राज्यांच्या वाळू धोरणांचा अभ्यास करण्यात आला. त्यानुसार दि.३.९.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये नवीन सुधारित वाळू / रेती निर्गती धोरण निर्गमित करण्यात आले.

नदीपात्रातील वाळू / रेती उत्खननाबाबतच्या दि.३.९.२०१९ रोजीच्या सदर शासन निर्णयानुसार वाळूगटांच्या लिलावासाठी जाहीरात देण्यापूर्वी पर्यावरण अनुमतीचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पर्यावरण विभागास मान्यतेस्तव सादर करावे लागत होते. खाणकाम आराखडा तयार झाल्यानंतर पर्यावरण अनुमती प्राप्त होईपर्यंत बराच कालापव्यय होत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच काही ठिकाणी वाळूगटास पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्यानंतर लिलाव यशस्वी न झाल्यास शासकीय यंत्रणेची सर्व मेहनत व वेळ वाया जात असल्याचे देखील दिसून आले. त्यामुळे वाळूगटांचे सर्व्हेक्षण व खाणकाम आराखडा जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तयार करण्यात आल्यानंतर सदर वाळूगटांचे लिलाव आयोजित करुन पर्यावरण अनुमती यशस्वी लिलावधारकामार्फत घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

पर्यावरण अनुमतीप्रमाणे वाळूगटांची हातची किंमत दरवर्षी ६ टक्के दराने वाढविण्याची तरतूद शासन निर्णय दि.३.९.२०१९ मध्ये असल्यामुळे वाळूगटांची हातची किंमत मोठ्या प्रमाणात वाढत जात असल्याचे देखील दिसून आले आहे. त्यामुळे लिलावधारक वाळूगटांच्या लिलावात भाग घेण्यास उत्सुक नसतात. परिणामी वाळूगट लिलाव यशस्वी होत नाहीत व त्यामुळे सदर वाळूगटांमधून वाळूचे अवैध उत्खननाचे प्रमाण वाढून शासनाचा महसूल देखील बुडतो. यास्तव वाळूगटांच्या लिलावाची हातची किंमत नव्याने निर्धारित करण्याची बाब देखील शासनाच्या विचाराधीन होती.

केंद्र शासनाच्या पर्यावरण,वने व वातावरणीय बदल मंत्रालयाने Sustainable Sand Mining Guidelines-२०२० व त्याबाबतचे स्पष्टीकरणात्मक दिशानिर्देश शासन अधिसूचना क्र.सी.जी.डी एल. - अ २८०३२०२०-२१८९४८, दि.२८ मार्च,२०२० अन्वये प्रसिद्ध केले आहेत.

वाळू धोरण, दि.३.९.२०१९ निर्गमित झाल्यानंतर उपरोक्त दिशानिर्देशांनूसार वाळू धोरणातील तरतूदींमध्ये सदर बाबी समाविष्ट करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन गुजरात व आंध्रप्रदेश राज्यांच्या वाळू धोरणाचा अभ्यास करुन प्रचलित वाळू धोरणामध्ये सुधारणा / शिफारशी सादर करण्याकरीता विभागीय आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक यांना निर्देश देण्यात आले होते. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांच्यामार्फत सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने वाळू धोरण, दि.३.९.२०१९ मध्ये अधिकचे सुधारित दिशानिर्देश देण्याचा

निर्णय घेण्यात आला असून खाडीपात्रातील रेती / वाळू निष्कासनाचे दि.२१.५.२०१५ रोजीचे धोरण आणि नदीपात्रातील रेती / वाळू निष्कासनाचे दि.३.९.२०१९ रोजीचे धोरण एकत्रित करुन यापुढे एकच सर्वंकष धोरण तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय :</u>

प्रस्तावनेतील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, वाळू /रेती निर्गती विषयक धोरणाबाबतचे संदर्भाधीन शासन निर्णय दि.२१.०५.२०१५ आणि दि.०३.०९.२०१९ अधिक्रमित करुन, राज्यातील खाडीपात्र व नदीपात्रातील वाळू/रेती उत्खननासंदर्भात यापुढे सुधारीत कार्यपध्दती अवलंबण्याकामी पुढीलप्रमाणे नव्याने मार्गदर्शक तत्वे शासन विहित करीत आहे :-

प्रकरण क्रमांक - एक

वाळू/रेती उत्खनन व वाहतुकीबाबतची कार्यपध्दती

I) वाळू/रेती गटांचे सर्वेक्षण व निश्चिती :

A - १. महाराष्ट्र सागरी किनारपट्टी क्षेत्रातील नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती गटांचे सर्वेक्षण व निश्चिती :-

(अ) महाराष्ट्र सागरी किनारपट्टी क्षेत्रातील नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वेळोवेळी वाळू / रेतीचे उत्खनन करणे आवश्यक असल्याने, अशा ठिकाणातील वाळू उत्खननाबाबत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने दरवर्षी सप्टेंबर महिन्यात सर्वेक्षण करुन, वाळू/रेती गट निश्चित करावेत. तसेच संबंधित वाळू/रेती गटात उपलब्ध होणारा अंदाजित वाळू/रेती साठा, उत्खनन किती खोलीपर्यंत करावे, उत्खननासाठी यांत्रिक साधनांचा वापर करावा किंवा कसे व यांत्रिक साधनांचा वापर करावयाचा झाल्यास त्या क्षेत्रात किती सक्शन पंप/ड्रेझर्स लावावेत या बाबी सुध्दा महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने निश्चित कराव्यात.

(ब) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी सागरी किनारपट्टी क्षेत्रातून नौकानयन मार्ग सूकर करण्यासाठी वाळू उत्खनन करावयाच्या क्षेत्रात वाळू / रेती गट, त्यांचे भौगोलिक स्थान, वाळू / रेतीचा अंदाजित साठा, नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी करावयाच्या उत्खननाचे परिमाण व उपलब्ध पोचमार्ग इत्यादी निश्चित केल्यानंतर महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्या वतीने वरीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या वाळू / रेती गटातून वाळू/रेती उत्खननाची व्यवस्था करण्यास व सदर व्यवस्थेवर सनियंत्रण ठेवण्यास संबंधित जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करतील.

(क) महाराष्ट्र सागरी किनारपट्टी क्षेत्रातील स्थानिक व्यक्तींच्या, डूबी / हातपाटी पध्दतीने वाळू/रेतीचे उत्खनन या पारंपारिक व्यवसायासाठी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र

मेरीटाईम बोर्ड यांचे वतीने संबंधित जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी *जिल्हास्तरीय वाळू नियंत्रण समितीच्या शिफारशीनुसार* "विनालिलाव परवाना पध्दतीने डूबी / हातपाटीव्दारे वाळू/रेती उत्खननासाठी राखीव गट " असे चिन्हांकित करतील.

(ड) नौकानयन मार्ग सूकर करण्यासाठी ज्या गटात वाळू/रेती उत्खननासाठी सक्शन पंप किंवा ड्रेझर सारख्या यांत्रिक साधनांचा वापर करणे आवश्यक असल्यास त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्यावतीने संबंधित जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी *जिल्हास्तरीय वाळू नियंत्रण समितीच्या शिफारशीनुसार* "यांत्रिक साधनाव्दारे वाळू/रेती उत्खननासाठी राखीव गट "असे चिन्हांकित करतील.

A - २. नदीपात्रातील वाळू/रेती गटांचे सर्वेक्षण व निश्चिती :-

१) नदी पात्रातील वाळूगटांचे स्थळनिरीक्षण खालील तांत्रिक उपसमिती मार्फत कार्यवाही करण्यात येईल.

i) तहसिलदार - अध्यक्ष
ii) उप अभियंता, जलसंपदा विभाग - सदस्य
iii)कनिष्ठ भूवैज्ञानिक (भूविज्ञान खनिकर्म संचालनालयामार्फत नामनिर्देशित) - सदस्य
iv) कनिष्ठ भूवैज्ञानिक (भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचे मार्फत नामनिर्देशित) - सदस्य
v) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ विभागाचे प्रतिनिधी - सदस्य

२) तांत्रिक उप समितीने अवर्षण व सतत टंचाईग्रस्त भागात वाळू उत्खननामुळे पर्यावरण तसेच पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम होत असल्यास अशा भागात वाळू / रेती गट निश्चित करु नये.

३) सदर तांत्रिक उप समितीमार्फत वाळूगट निश्चित करताना स्थानिक पर्जन्यमान तसेच भौगोलिक परिस्थिती व इतर पर्यावरण विषयक अनुकूल बाबींचा विचार करुनच वाळूगट उत्खननासाठी योग्य आहेत किंवा कसे, याबाबत तालुकास्तरीय वाळू सनियंत्रण समितीस शिफारस करील.

II) वाळू सनियंत्रण समिती :-

(१) तालुकास्तरीय वाळू सनियंत्रण समिती -

जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यासाठी तालुकास्तरीय वाळू सनियंत्रण समिती (Taluka Sand Monitoring Committee) स्थापन करण्यात येईल. (सदर समितीचा उल्लेख यापुढे "तालुकास्तरीय समिती" म्हणून करण्यात येईल.)

सदर समितीची रचना खालीलप्रमाणे असेल:-

१) उपविभागीय अधिकारी - अध्यक्ष
२) उप विभागीय पोलीस अधिकारी - सदस्य
३) कनिष्ठ भूवैज्ञानिक (भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयामार्फत नामनिर्देशित) - सदस्य
४) कनिष्ठ भूवैज्ञानिक (भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचे मार्फत नामनिर्देशित) - सदस्य
५) गटविकास अधिकारी, पंचायत समिती - सदस्य
६) उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग - सदस्य
७) उप अभियंता, जलसंपदा विभाग - सदस्य
८) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे प्रतिनिधी - सदस्य
९) प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे प्रतिनिधी - सदस्य
१०) तहसिलदार -सदस्य सचिव

एखाद्या विशिष्ट मुद्याबाबत सल्ला व मार्गदर्शनासाठी या समितीचे अध्यक्ष अन्य तज्ञ व्यक्ती तथा अधिकारी यांची निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती करू शकतील.

(२) जिल्हा वाळू सनियंत्रण समिती -

प्रत्येक जिल्ह्यामध्ये वाळू/रेती निर्गती संबंधी संपूर्ण प्रक्रियेचे सनियंत्रण करण्यासाठी जिल्हा वाळू सनियंत्रण समिती (District Sand Monitoring Committee) गठीत करण्यात येईल. (यापुढे ज्याचा उल्लेख - "जिल्हास्तरीय समिती" म्हणून करण्यात येईल.)

सदर समितीची संरचना पुढीलप्रमाणे असेल:-

१) जिल्हाधिकारी - अध्यक्ष
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - सदस्य
३) पोलीस अधीक्षक/पोलीस आयुक्त - सदस्य
४) अपर जिल्हाधिकारी - सदस्य
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग - सदस्य
६) कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग - सदस्य
७) उप वनसंरक्षक - सदस्य
८) प्रादेशिक परिवहन अधिकारी - सदस्य
९) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - सदस्य
१०) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण यंत्रणा - सदस्य
११) जिल्हा खनिकर्म अधिकारी - सदस्य सचिव

एखाद्या विशिष्ट मुद्याबाबत सल्ला व मार्गदर्शनासाठी या समितीचे अध्यक्ष अन्य तज्ञ व्यक्ती तथा अधिकारी यांची निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती करू शकतील.

III) वाळू सनियंत्रण समितीचे अधिकार व कार्ये :-

(A) तालुकास्तरीय वाळू / रेती सनियंत्रण समिती :-

१) तालुकास्तरीय समितीची बैठक दोन महिन्यात किमान एकदा होईल.

२) जिल्हास्तरीय समितीस खालील बाबतीत शिफारशीसह प्रस्ताव सादर करणे -

i) शासन अधिसूचना क्रमांक गौखनि-१०/०२१५/प्र.क्र.९२/ख, दिनांक १७ नोव्हेंबर २०१८ मधील तरतूदींनुसार वाळूगट आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्याकरीता असलेल्या शासनाच्या गृहनिर्माण योजनांसाठी राखीव ठेवणे.

ii) शासन अधिसूचना, क्र.गौखनि-१०/०२१५/प्र.क्र.९२/ख, दिनांक १७ नोव्हेंबर २०१८ मधील तरतूदींनुसार स्थानिक रहिवाश्यास त्याच्या घरगुती किंवा शेतीच्या प्रयोजनासाठी पर्यावरण अनुमती प्राप्त वाळुगटातून स्वामीत्वधनाचे दराने वाळू उत्खननासाठी वाळूगट राखीव ठेवणे.

iii) केंद्र/राज्य शासनाच्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखालील सार्वजनिक प्राधिकरणांच्या प्रकल्प /योजनांकरीता त्यांच्या नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही अभिकरणाच्या नावे वाळूगट राखीव ठेवणे.

iv) महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ यांच्या करीता नदीपात्रातील वाळूगट राखीव ठेवणे.

v) लिलावाकरीता वाळूगट निश्चित करण्याकामी शिफारस करणे.

३) तालुकास्तरीय समिती वाळू उत्खननासाठी निश्चित केलेल्या वाळूगटातून उत्खननाचे अंदाजित परिमाण ठरवेल. वाळूगट निश्चित करताना सदर गटाचे अक्षांश रेखांशासह प्रमाणित नकाशा सादर करणे आवश्यक राहील.

४) तालुकास्तरीय समिती ही जिल्हास्तरीय समितीस Sustainable Sand Mining Guidelines, २०१६ व Sand Mining Framework, २०१८ आणि केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार District Survey Report तयार करण्यास सहकार्य करील.

५) तालुकास्तरीय समिती निश्चित केलेल्या वाळूगटाचे निरसन जाहीर ऑनलाईन ई-लिलाव पध्दतीने करणे अथवा सदर गट शासकीय कामासाठी राखीव ठेवणेबाबतचा संयुक्त स्थळपाहणी अहवाल परिपुर्ण कागदपत्रे व स्पष्ट शिफारशींसह जिल्हास्तरीय समितीस सादर करील.

६) सदर समिती पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तीनुसार वाळूगटातून उत्खनन होत आहे किंवा कसे याबाबत सनियंत्रण व पर्यवेक्षण करील.

७) सदर समिती या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या शिफारशी जिल्हास्तरीय वाळू सनियंत्रण समितीस करील.

८) कार्यक्षेत्रात उपलब्ध असणारे वाळूसाठे शोधणे तसेच नदीपात्रातील वाळू उत्खननाला पर्याय म्हणून इतर स्त्रोत शोधणे (जसे मातीमिश्रीत वाळू, धरणातील वाळू इ.) याबाबतही समिती शिफारस करील.

९) सदर समिती अधिसूचित क्षेत्रासाठी पेसा कायदा, २०११ मधील तरतूदींनुसार किंवा त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांनुसार रेतीगटांचे निर्धारण करील.

१०) वरील व्यतिरिक्त तालुकास्तरीय समिती ही जिल्हास्तरीय वाळू सनियंत्रण समितीने वेळोवेळी सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडतील.

(B) <u>जिल्हास्तरीय समिती :-</u>

१) समितीची बैठक तीन महिन्यातून किमान एकदा घेणे आवश्यक राहील.

२) योग्य सनियंत्रणाकरीता समितीला जिल्ह्यातील वाळूगटांचे Digitization महाराष्ट्र सुदूर संवेदन यंत्रणा अथवा मान्यता प्राप्त अभिकर्त्यामार्फत आवश्यकतेनुसार करता येईल.

३) तालुकास्तरीय समित्यांकडून प्राप्त प्रस्तावांवर विचार करुन तसेच आवश्यकता असल्यास त्यामध्ये आवश्यक ते बदल करून, जिल्हास्तरीय समिती खालीलप्रमाणे कार्यवाही करील:-

i) शासन अधिसूचना, क्रमांक गौखनि-१०/०२१५/प्र.क्र.९२/ख, दिनांक १७ नोव्हेंबर, २०१८ मधील तरतूदींनुसार वाळूगट आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्याकरीता असलेल्या शासनाच्या गृहनिर्माण योजनांसाठी राखीव ठेवतील.

ii) शासन अधिसूचना, क्रमांक गौखनि-१०/०२१५/प्र.क्र.९२/ख, दिनांक १७ नोव्हेंबर, २०१८ मधील तरतूदींनुसार स्थानिक रहिवाश्यास त्याच्या घरगुती किंवा शेतीच्या प्रयोजनासाठी पर्यावरण अनुमती प्राप्त वाळुगटातून स्वामीत्वधनाचे दराने वाळू देण्याकरीता वाळूगट राखीव ठेवतील.

iii) हातपाटी / डूबी यासारख्या पारंपारिक पद्धतीने वाळू काढण्यासाठी स्थानिक व्यक्ती तसेच स्थानिक संस्थांना परवाना देण्याकरीता वाळूगट राखीव ठेवतील.

iv) महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ यांच्याकरीता नदी पात्रातील वाळूगट राखीव ठेवण्याबाबत निर्णय घेईल.

v) लिलावाकरीता वाळूगट निश्चित करतील.

४) उपरोक्त क्र.३ मध्ये नमूद प्रयोजनार्थ वाळूगटांच्या पर्यावरणविषयक मान्यतेसाठी शिफारस प्रदान करतील.

५) वाळूगट निश्चिती व उत्खननाबाबत सर्व कार्यपद्धती ही मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी वेळोवेळी दिलेले निदेश तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचनेतील तरतूदीनुसार राहील याची दक्षता घेईल.

६) पर्यावरणविषयक अनुमती व त्याबाबतच्या अन्य कामांसाठी व District Survey Report तयार करण्यासाठी मान्यताप्राप्त सल्लागाराची नेमणूक करण्याचे अधिकार सदर समितीस असतील.

७) वाळू लिलावाच्या प्रक्रियेकरिता हातची किंमत शासनाच्या या संदर्भातील निर्देशानूसार प्रतिब्रास किंवा यथास्थिती प्रतिमेट्रीक टन या स्वरुपात निश्चित करण्यात यावी.

८) सदर समिती वाळू/रेती उत्खनन/विकसन व वाहतूकीबाबत आवश्यकतेनुसार यथायोग्य निर्णय घेईल.

९) या निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता सदर समिती जिल्ह्यातील शासकीय / निमशासकीय तथा स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना निर्गमित करतील.

१०) या शासन निर्णयाद्वारे निर्धारित केलेल्या तरतूदी, अटी व शर्तींच्या अधिन राहून सदर समिती वाळूगटांतून वाळू उत्खननाची मंजूरी देणे किंवा वाळू उत्खननाचा परवाना प्रदान करण्याची जिल्हाधिकारी यांना शिफारस करील.

११) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या तक्रारींच्या पडताळणीसाठी दक्षता समितीच्या जबाबदाऱ्या विवक्षितपणे पार पाडतील.

IV) नदीपात्रातील वाळू/रेती लिलावाकरीता ग्रामसभेची शिफारस -

नदी पात्रातील वाळू/रेतीगट निश्चित केल्यानंतर सदर वाळूगटाच्या लिलावासाठी ग्रामसभेची शिफारस घेणे अनिवार्य राहील. ग्रामपंचायतीकडे संदर्भ प्राप्त झाल्यानंतर ग्रामसभा बोलावून त्यावर एक महिन्याच्या आत निर्णय घेणे ग्रामपंचायतीवर बंधनकारक राहील. ग्रामसभेने नकारात्मक ठराव दिल्यास उपविभागीय अधिकारी (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा आयोजित करण्यात यावी व त्यांच्या शिफारशीआधारे गुणवत्तेनूसार वाळू लिलावाची शिफारस जिल्हास्तरीय वाळू सनियंत्रण समितीला करण्यात यावी.

V) राज्य शासनाच्या विविध विभागाच्या प्रकल्पांकरीता वाळूगट राखीव ठेवणे :-

केंद्र/राज्य शासनाच्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखालील सार्वजनिक प्राधिकरणांच्या प्रकल्प/योजनांकरीता त्यांच्या नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही अभिकरणाच्या नावे वाळूगट राखीव ठेवता येतील. अशा राखीव वाळूगटातून अशा प्रकल्पांसाठी आवश्यक वाळूच्या

उत्खननाकरीता जिल्ह्यातील संबंधित शासकीय कामांच्या अंदाजपत्रकात नमूद केलेली वाळूची किंमत किंवा शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या वाळूच्या स्वामित्वधनाची रक्कम यापैकी जी रक्कम जास्त असेल त्या किंमतीनुसार अशा शासकीय कामासाठी उपलब्ध करुन देण्याकामी परवाने मंजूर करण्याची मूभा जिल्हाधिकारी यांना राहील.

VI) महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळासाठी नदीपात्रातील वाळूगट राखीव ठेवणे :-

१) जिल्हाधिकारी स्वेच्छेनुसार किंवा महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाच्या मागणीनुसार जिल्ह्यातील वाळूगट महामंडळामार्फत वाळूचे उत्खनन व विक्रीसाठी राखीव ठेवू शकतील.

२) सदर वाळूगटातून वाळू उत्खननाची कार्यवाही महामंडळ स्वत: किंवा अभिकर्त्यामार्फत करु शकतील.

३) महामंडळ अशा वाळूगटामधून उत्खनन केलेल्या वाळूची साठवणूक व विक्रीसाठी डेपो तयार करुन शासनाने पूर्वमान्यता दिलेल्या किंमतीने महामंडळ वाळूची विक्री करील.

४) वाळूच्या विक्रीपासून प्राप्त रकमेमधून शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या वाळूच्या दराने स्वामित्वधनाची रक्कम शासनजमा करतील.

५) महामंडळाकडून विक्री करण्यात येणाऱ्या वाळूच्या वाहतूकीसाठी संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून mahakhanij प्रणालीअंतर्गत वाहतूक पास देण्यात येतील.

प्रकरण क्रमांक – दोन

I) **वाळू/रेती उत्खननासाठी खाणकाम आराखडा** – Sustainable Sand Mining Guidelines, २०१६ व २०२० तसेच Sand Mining Framework, २०१८ आणि केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार वाळूगटांच्या लिलावापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत योग्य त्या कालावधीचा खाणकाम आराखडा तयार करतील.

II) **पर्यावरण अनुमती –**

१) खाडी पात्रातील वाळूगटांमधून वाळू / रेती उत्खननासाठी पर्यावरण अनुमती –

मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्रमांक (सी) क्र.१९६२८-१९६२९/२००९ मध्ये दि.२७/०२/२०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार व मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पश्चिम विभाग, खंडपीठ पुणे यांनी अर्ज क्र.३४ (टीएचसी)/२०१३ (डब्लूझेड) मध्ये दिनांक २९.०५.२०१४ रोजी दिलेल्या आदेशानुसार वाळू/रेती उत्खननापूर्वी केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेतील (EIA Notification -२००६) तरतुदीनुसार, पर्यावरण अनुमती घेण्याची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी करणे आवश्यक राहील.

(अ) "विनालिलाव परवाना पध्दतीने डूबी / हातपाटीव्दारे वाळू/रेती उत्खननासाठी राखीव गट " यामधून पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या स्थानिक व्यक्तींना तसेच अशा व्यक्तींच्या संस्थांना वाळू/रेती उत्खननाचे परवाने देण्यासाठी पर्यावरण अनुमती घेणे आवश्यक नाही. याबाबत संबधित जिल्हाधिकारी केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाचे कार्यालयीन आदेश दिनांक ०८.११.२०११ नुसार कार्यवाही करतील.

(ब) "यांत्रिक साधनाव्दारे वाळू/रेती उत्खननासाठी राखीव गट" यामधील वाळू/रेती उत्खननासाठी मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी वेळोवेळी दिलेले निदेश तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचनेतील तरतूदीनुसार गौण खनिज उत्खननापूर्वी पर्यावरण अनुमती व अनुषंगीक बाबींबद्दल कार्यवाही करणे आवश्यक आहे. पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्याशिवाय वाळूचे उत्खनन करता येणार नाही. त्यासाठी केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार Accredited Environment Consultant ची नेमणूक करण्यात येईल. यासाठी येणारा खर्च शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक १ सप्टेंबर, २०१६ मधील तरतूदीनुसार भागविता येईल. पर्यावरण अनुमतीसाठी आवश्यक असलेल्या निधीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड यांनी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर यांना सादर करावा.

(क) सागरी किनारपट्टी क्षेत्रातील (Coastal Regulation Zone) वाळू/रेती उत्खननासाठी महाराष्ट्र सागरी किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (Maharashtra Coastal Zone Management Authority) ची पूर्व मान्यता मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड यांनी घेणे आवश्यक राहील.

२) नदी पात्रातील वाळू/रेती उत्खननासाठी पर्यावरण अनुमती -

(a) मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी वेळोवेळी दिलेले निदेश तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचनेतील तरतूदीनुसार पर्यावरण अनुमती व अनुषंगीक बाबींबद्दल कार्यवाही करणे आवश्यक आहे. पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्याशिवाय वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

(b) जिल्ह्यातील वाळूगटाचे लिलाव झाल्यानंतर ज्या यशस्वी लिलावधारकास लिलाव मंजूर झाला असेल त्या लिलावधारकास इरादा पत्र (LOI) देण्यात येईल. सदर इरादा पत्राच्या आधारे पर्यावरण अनुमती घेण्याची जबाबदारी यशस्वी लिलावधारकाची राहील.

(c) वाळू/रेती गटांतून वाळू उत्खननापूर्वी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या वेळोवेळी प्रसिध्द होणाऱ्या अधिसूचनेनुसार त्या-त्या वेळी कार्यक्षेत्र असलेल्या तज्ञ मूल्यांकन समिती (Expert Appraisal Committee) व पर्यावरण परिणाम व्यवस्थापन प्राधिकरण (Environment Impact Assessment Authority) या समित्यांची मान्यता घेण्याची प्रक्रिया लिलाव प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर करण्यात यावी.

(d) पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्यानंतर उर्वरित रकमा भरून करारनामा केल्याशिवाय वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

(e) यथास्थित पर्यावरण परिणाम व्यवस्थापन प्राधिकरणाने पर्यावरण अनुमतीमध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीचे लिलावधारकाकडून योग्यरित्या अनुपालन करण्यात येते किंवा कसे, याबाबत वेळोवेळी पाहणी करण्याची जबाबदारी संबंधित तालुक्याचे तहसिलदार, संबंधित उप विभागीय अधिकारी, जिल्हा खनिकर्म अधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांची राहील.

(f) जे लिलावधारक पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तीचे उल्लंघन करतील, त्यांच्या बाबतीत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत करावयाच्या कारवाईखेरीज, पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ अंतर्गत कारवाई करण्यासंबंधीचा अहवाल, तहसिलदार यांनी जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्यामार्फत दर सहा महिन्यांनी पर्यावरण विभागास सादर करावा.

प्रकरण क्रमांक – तीन

वाळूगटांचे लिलाव करण्यासाठी हातची किंमत (अपसेट प्राईसची) निश्चिती :-

अ) वाळूगटांचा उत्खननाचा कालावधी हा मंजूर दिनांकापासून पाच वर्षापर्यंत असू शकेल. तसेच वाळूगटाचे क्षेत्र ५ हेक्टर पर्यंत असू शकेल. त्याअनुषंगाने वाळूगट निश्चितीची प्रक्रिया, गटातील वाळू उत्खननाची प्रक्रिया व त्या वाळूगटाची हातची किंमत निश्चित करण्याची प्रक्रिया पुढीलप्रमाणे राहील:-

i) खाणकाम आराखड्यातील त्या त्या वर्षासाठी केलेल्या वार्षिक नियोजनानुसार संबंधित वाळूगटाच्या नकाशावर व प्रत्यक्षात क्षेत्रस्तरावर त्या त्या वर्षातून करावयाच्या उत्खननाबाबत हद्दी निश्चित करण्यात याव्यात व याप्रमाणे लिलावाच्या कालावधीत करावयाच्या उत्खननाचे नियोजन करण्यात यावे.

ii) शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या वाळूच्या स्वामित्वधनाची रक्कम आणि संबंधित वाळूगटातून वाळूचे होऊ शकणारे उत्खनन यांचा गुणाकार केल्यानंतर येणारी रक्कम अशा वाळूगटाची हातची किंमत (Upset price) म्हणून निश्चित करण्यात यावी.

iii) वाळू लिलावाच्या जाहीरनाम्यामध्ये सदर हातची किंमत जाहीर करण्यात यावी.

iv) हातची किंमत ही प्रतीब्रास किंवा यथास्थिती प्रती मेट्रीक टन याप्रमाणे असेल.

v) खाणकाम आराखड्याप्रमाणे उत्खनन पूर्ण झालेल्या भागामध्ये पुन्हा कोणतेही उत्खननन होणार नाही याची जबाबदारी लिलावधारकाची राहील.

vi) दोन वर्षानंतर महसूल वाढीबाबत आढावा घेवून आवश्यकतेप्रमाणे हातची किंमत ठरविण्याच्या पध्दतीत बदल करण्यात येईल.

ब) हातपाटी व डुबीसाठी राखीव वाळू/रेती गटांसाठी :-

(i) हातपाटी व डूबीसाठी राखीव ठेवण्यात येणाऱ्या वाळू/रेतीगटासाठी हातची किंमत ठरविण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक वाळूगटामधील निर्गतीसाठी उपलब्ध असलेला वाळूसाठा विचारात घ्यावा.

(ii) संबंधित वाळू गटामधील हातपाटी व डुबीद्वारे पारंपारिक पध्दतीने व्यवसाय करणाऱ्या स्थानिक व्यावसायीकांना परवाना देताना *प्रचलित स्वामित्वधनाच्या* प्रतिब्रास किंवा यथास्थिती प्रतिमेट्रीक टन या दराने हातपाटी व डूबीद्वारे वाळू उत्खननाचे परवाने देण्यासाठीची रक्कम परिगणीत करण्यात यावी.

प्रकरण क्रमांक – चार

(१) <u>लिलावधारक यांच्यासाठी आवश्यक पात्रता</u>

(अ) कोणतीही व्यक्ती किंवा कंपनी / संस्था लिलावात भाग घेण्यास खालील कारणास्तव अपात्र असतील :-

१. वयाने अज्ञान, दिवाळखोर किंवा मतिमंद व्यक्ती किंवा

२. केंद्र अथवा राज्य शासनामध्ये लाभाचे पद धारण केलेल्या व्यक्ती किंवा

३. गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची थकबाकी किंवा मृतभाटकाची रक्कम (Dead Rent) थकविण्यात आली असणारी व्यक्ती / संस्था या प्रयोजनार्थ जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत गौण खनिजाचे स्वामीत्वधन, मृतभाटक रक्कम, किंवा शासनाच्या महसूलाची थकबाकीदारांची यादी वेळोवेळी तयार करण्यात येईल व प्रसिद्ध करण्यात येईल.

४. नैतिक अध:पतन केल्याबद्दल किंवा गौण खनिजाचे अवैध उत्खनन किंवा वाहतूक केल्याबाबत न्यायालयाकडून शिक्षा झाली असेल अशी व्यक्ती / संस्था

५. लगतपूर्वीच्या आर्थिक वर्षातील उलाढाल विहित मर्यादेपेक्षा कमी असल्यास - (व्यक्तीसाठी रेतीगट मूल्याच्या किमान ५ टक्के व संस्था व कंपनीसाठी रेतीगट मूल्याच्या किमान १० टक्के एवढी उलाढाल असणे आवश्यक राहील)

(ब) लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्था यांच्याकडे नियमित आयकर भरत असल्याचा पुरावा, पॅन क्रमांक, वस्तू व सेवाकर विभागाचा GSTIN क्रमांक असणे आवश्यक राहील.

(क) लिलावाच्या निविदा भरु इच्छिणाऱ्या व्यक्तीं/संस्था यांना निविदा अर्जाचे शुल्क वाळूगटाची हातची किंमत रू.१०.०० लाखापेक्षा कमी असल्यास रू.२,०००/- व रू.१०.०० लाखापेक्षा जास्त असल्यास रू.५,०००/- संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याच्या नावाने धनादेशाद्वारे किंवा जिल्हाधिकारी सूचित करतील त्या पध्दतीने भरावी लागेल.

(ड) लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्थेला निविदेसोबत इसारा रक्कम म्हणून लिलावाच्या अपसेट प्राईसच्या रकमेच्या २५ टक्के रक्कम भरावी लागेल.

(२) वाळू गटाच्या लिलावाकरीता अधिकारिता:-

(अ) जिल्ह्यातील सर्व वाळूगटांचे लिलाव जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली करण्यात यावे.

(ब) एखादा वाळूगट एका महसूल विभागातील दोन जिल्ह्यामध्ये संयुक्तरित्या येत असेल तर दोन्ही जिल्हाधिकारी यांनी संयुक्त पाहणी करुन व सल्लामसलत करुन त्याची संयुक्त वाळूगट म्हणून निश्चिती करावी आणि यासंबंधीचा अहवाल विभागीय आयुक्त यांना सादर करावा. तद्नंतर विभागीय आयुक्त दोन जिल्हाधिकाऱ्यांपैकी ज्या एका जिल्हाधिकाऱ्यास अशा संयुक्त वाळूगटाच्या लिलावाची कार्यवाही करण्यास निर्देश देतील, त्या जिल्हाधिकाऱ्याने सदर संयुक्त वाळूगटाच्या लिलावाची कार्यवाही पूर्ण करावी. अशा लिलावात प्राप्त रक्कम वाळूगटाच्या परिमाणानुसार दोन्ही जिल्ह्यांमध्ये मानीव विभाजन करुन शासनजमा करण्यात यावी.

(क) एखादा वाळूगट दोन महसूल विभागामधील दोन जिल्ह्यामध्ये संयुक्तरित्या येत असेल तर अशा प्रकरणांत सुध्दा दोन्ही जिल्हाधिकारी यांनी संयुक्त पाहणी करुन व सल्लामसलत करुन, यासंबंधीचा अहवाल संबंधित दोन्ही विभागीय आयुक्त यांना सादर करावा. विभागीय आयुक्त हे सल्लामसलत करुन, दोन जिल्हाधिकाऱ्यांपैकी ज्या एका जिल्हाधिकाऱ्यास लिलावाची कार्यवाही करण्यास निर्देश देतील, त्या जिल्हाधिकाऱ्याने सदर संयुक्त

वाळूगटाच्या लिलावाची कार्यवाही पूर्ण करावी. अशा लिलावात प्राप्त रक्कम वाळूगटाच्या परिमाणानुसार दोन्ही जिल्ह्यांमध्ये मानीव विभाजन करुन शासनजमा करण्यात यावी.

अशा संयुक्त वाळूगटाच्या लिलावाविषयी दोन्ही विभागीय आयुक्त यांचे एकमत न झाल्यास त्यासंबंधीचा स्वयंस्पष्ट प्रस्ताव शासनास निर्णयार्थ सादर करण्यात यावा.

प्रकरण क्रमांक – पाच

वाळू/रेती लिलावाची कार्यपध्दती

जिल्हा वाळू संनियंत्रण समितीने लिलावासाठी शिफारस केलेल्या वाळूगटांचे लिलाव ई-टेंडरिंग / ई-ऑक्शन पध्दतीने करण्यात यावेत.

(१) सर्व वाळूगट मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी वेळोवेळी दिलेले निदेश तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचनेतील तरतूदीनुसार निश्चित करण्यात यावेत.

(२) लिलावाचा कालावधी पावसाळ्याच्या कालावधीसह समाविष्ट असेल. दिनांक १० जून ते ३० सप्टेंबर हा पावसाळ्याचा कालावधी असेल व या कालावधीमध्ये वाळू उत्खनन करता येणार नाही. याची स्पष्ट जाणीव लिलावात भाग घेणाऱ्या सर्व संबंधितांना करुन देण्यात यावी.

(३) उत्खननाचा कालावधी निश्चित करताना खालील बाबींचा विचार करण्यात यावा :-

अ) वाळूच्या पुनर्भरणाचे वार्षिक मूल्यांकनाचा दर.

ब) भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा तसेच पाटबंधारे विभागाचा वाळू उपलब्धतेबाबतचा व्यवहार्यता (feasibility) अहवाल.

क) पर्यावरण अनुमती व खाणकाम आराखड्यात नमूद स्थानिक व भौगोलिक परिस्थिती.

ड) Sustainable Sand Mining Guidelines,२०१६ व २०२० तसेच Sand Mining Framework,२०१८ मधील मार्गदर्शक तत्वे तसेच केंद्र व राज्य शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या मार्गदर्शक सूचना.

(४) वाळू/रेती गटाच्या लिलावाची जाहिरात जिल्ह्यातील दोन प्रमुख वर्तमानपत्रात लिलावापूर्वी किमान १५ दिवस अगोदर प्रसिध्द करण्यात यावी. त्याच्या प्रती सर्व क्षेत्रीय महसूल अधिकाऱ्यांच्या कार्यालयात सूचना फलकावर लावण्यात याव्यात. तसेच जाहिरात शासनाच्या संकेतस्थळावर सुध्दा प्रसिध्द करण्यात यावी.

(५) वाळू/रेती गट लिलावाच्या जाहिरातीमध्ये उत्खननाचा कालावधी, वाळू/रेती गटाचा सर्वे क्रमांक, वाळू/रेतीगट क्रमांक, वाळू/रेतीगटाचे नाव, वाळू/रेतीगटातील अंदाजित वाळू/

रेतीसाठा व वाळू/रेती गटाची हातची किंमत (Upset Price),या बाबी ठळकपणे नमूद करण्यात याव्यात.

(६) जाहिरातीमध्ये नमूद वाळू/रेती गटात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत, वाळूगटामधील वाळू मातीमिश्रीत आहे किंवा कसे, याची लिलावापूर्वी खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत लिलावधारकाची राहील. वाळू/रेती गटाचा ताबा घेऊन लिलावधारकाने वाळूचे उत्खनन केल्यानंतर यासंबंधीची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच वाळूगट बदलून देण्याची किंवा वाळू लिलावापोटी शासन जमा केलेल्या रकमेपैकी प्रमाणशीर रक्कम परत करण्याच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही, या बाबीसुध्दा जाहिरातीमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात याव्यात.

(७) लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्या व निविदा भरु इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्ती/संस्थेला निविदा सादर करताना इसारा रक्कम RTGS/NEFT द्वारे अथवा जिल्हाधिकारी सूचित करतील त्यापद्धतीने भरावी लागेल.

(८) प्रस्तावित लिलावासंदर्भात काही तक्रारी / आक्षेप / सूचना प्राप्त झाल्यास जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी व संयुक्त वाळूगटाच्या बाबतीत विभागीय आयुक्त यांनी त्याची तपासणी / चौकशी करावी व लिलाव न करण्यास सबळ कारणे असल्याची खात्री झाल्यास संबंधित वाळूगटाच्या लिलावाच्या प्रक्रियेबाबत योग्य तो निर्णय घेतील.

(९) विभागीय आयुक्तांनी त्यांच्या विभागातील सर्व जिल्ह्यामध्ये वाळू/रेती गटांचे लिलाव शक्यतो एकाच दिवशी करण्यासाठी खाली नमूद केल्यानुसार नियोजन करावे.

(अ) जिल्ह्यातील वाळू / रेतीच्या निर्गतीसाठी निश्चित केलेल्या सर्व वाळू / रेती गटांचा गटनिहाय लिलाव जिल्ह्याच्या मुख्यालयी एकाच दिवशी आयोजित करण्यात यावा.

(ब) लिलावाच्या दिवशी सर्व वाळूगटांच्या लिलावाची कार्यवाही पूर्ण न झाल्यास लगतच्या पुढील दिवशी सकाळी कार्यालयीन वेळेत कार्यवाही पुढे सुरु करावी.

(क) जिल्ह्यातील सर्व वाळूगटांचे लिलाव संबंधीत जिल्हाधिकारी किंवा अपर जिल्हाधिकारी यांच्या व्यक्तीगत नियंत्रणाखाली व देखरेखीखाली पार पाडण्यात यावेत. जिल्हाधिकारी किंवा अपर जिल्हाधिकारी यांना हे काम कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही अन्य अधिकाऱ्याला नेमून देता येणार नाही.

(ड) संयुक्त वाळूगटाच्या बाबतीत संबंधीत विभागीय आयुक्त यांच्या व्यक्तीगत नियंत्रणाखाली व देखरेखीखाली लिलावाची प्रक्रिया पार पाडण्यात येईल. विभागीय आयुक्त यांना हे काम कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही अन्य अधिकाऱ्याला नेमून देता येणार नाही.

प्रकरण क्रमांक - सहा

I) लिलावाची प्रक्रिया

(१) ई-निविदा व ई-लिलाव पद्धतीद्वारे राबविण्यात येणाऱ्या सर्व लिलावामध्ये शासनाने प्रसिद्ध केलेल्या हातच्या किंमतीपेक्षा अधिक रकमेने लिलावाच्या बोलीची सुरुवात करण्यात येईल. ई-लिलावाची बोली ऑनलाईन पद्धतीने करताना कमीत कमी रु.१००० च्या वाढीने करणे बंधनकारक राहील.

(२) यामध्ये सर्वोच्च बोली बोलणारा स्पर्धक यशस्वी बोलीधारक म्हणून समजला जाईल.

(३) सदर यशस्वी बोलीधारकाकडून लिलाव रकमेच्या एकूण २५ टक्के रक्कम लिलावाच्या दिवसानंतर कार्यालयीन कामकाजाच्या ४८ तासांच्या आत जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयात भरल्यानंतर इरादा पत्र (LOI) देण्यात येईल.

(४) लिलावधारकाने लिलावाच्या बोलीच्या ७५ टक्के रक्कम लिलावाच्या दिनांकापासून विहित मुदतीत भरणार असल्याचे हमीपत्र रू.१००/- च्या मुद्रांकनावर सादर करणे आवश्यक राहील.

(५) पर्यावरण अनुमती ही लिलावातील परिमाणाइतके उत्खनन पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी खाणकाम आराखड्यामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे कमाल पाच वर्षे पर्यंतच्या कालावधीसाठी वाळूगटाच्या परिमाणानुसार घेण्यात यावी.

(६) यशस्वी लिलावधारकाकडून पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्यानंतर आणि ती जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केल्यानंतर उर्वरित ७५ टक्के रक्कम तदनंतर ३० दिवसांच्या आत प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी किंवा यथास्थिती विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयात भरावी लागेल. लिलावधारकाकडून पर्यावरण अनुमतीसाठी आवश्यक प्रस्ताव पर्यावरण विभागाकडे लिलावाच्या दिनांकापासून ४५ दिवसांच्या आत सादर न केल्यास इसारा रक्कमेच्या १०% रक्कम दंडनीय रक्कम म्हणून लिलावधारकास आकारण्यात येईल.

(७) सर्वोच्च बोलीधारकाकडून रक्कम भरुन घेतल्यानंतर सर्वोच्च बोलीधारकासोबत शासनाचा करारनामा करण्यात येईल. व त्यानंतरच वाळूगटाचा ताबा देण्यात येईल.

(८) लिलावात भाग घेणाऱ्या ज्या व्यक्तीचा देकार / निविदा स्वीकारण्यात आली नसेल, त्यांची लिलावात भाग घेण्यासाठी भरलेली इसारा रक्कम (EMD) लिलावाची कार्यवाही संपताच परत करण्यात यावी.

(९) ज्या लिलावधारकाच्या सर्वोच्च बोलीचा देकार/निविदा स्वीकारण्यात येईल त्याला, सर्वेक्षण शुल्कापोटी रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) इतक्या किंवा आवश्यकतेप्रमाणे योग्य रकमेचा धनादेश उपसंचालक किंवा वरीष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्या नावाने जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करावा लागेल.

(१०) लिलावातील / निविदेतील सर्वोच्च बोलीचा देकार स्वीकारावयाचा किंवा नाकारावयाचा निर्णय प्रकरणपरत्वे अपर जिल्हाधिकारी/जिल्हाधिकारी किंवा यथास्थिती विभागीय आयुक्त यांनी घ्यावयाचा असून, सदर निर्णय संबंधितास लिलावाच्या दिवशीच कळविणे आवश्यक राहील. निविदा नाकारावयाचा निर्णय घेतल्यास त्याची सविस्तर कारणे नोंदविण्यात यावी.

(११)अपवादात्मक परिस्थितीत लिलावाच्या बोलीच्या ३/४ तथा ७५ टक्के रक्कम भरण्याची मुदत आणखी १५ दिवसापर्यंत वाढविण्याचे अधिकार, त्यासंबंधीची कारणे नोंदवून, जिल्हाधिकारी यांना राहतील. मात्र अशा परिस्थितीत लिलावधारकास विलंबाने भरलेल्या सदर रकमेवर १५ टक्के वार्षिक दराने व्याज भरावे लागेल. त्यापलीकडे अपवादात्मक परिस्थितीमुळे विलंब होत असल्यास लिलावाची ७५ टक्के रक्कम भरण्याची मुदत वाढविण्याचे अधिकार शासनास राहतील.

(१२)यशस्वी लिलावधारकासोबत वाळू/रेतीच्या लिलावाच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे योग्य त्या मुद्रांक शुल्काची रक्कम संबंधित लिलावधारकाने भरणे आवश्यक राहील. अथवा याबाबतच्या प्रचलित शासन निर्णयाप्रमाणे मुद्रांक शुल्क भरणे अनिवार्य राहील.

(१३)लिलावधारकाने/परवानाधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ हातच्या किंमतीच्या २०% एवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी किंवा यथास्थिती विभागीय आयुक्त यांच्याकडे ठेवणे आवश्यक राहील. ही रक्कम लिलावधारकाने/परवानाधारकाने लिलावाच्या/परवान्याच्या मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास, लिलावाची/परवान्याची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल. अटी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

(१४) लिलावधारक/परवानाधारकाने जिल्हा परिषद / पंचायत समिती तसेच शासनाने विहित केलेले कर/शुल्क व जिल्हा खनिज प्रतिष्ठानकरीता शासन वेळोवेळी निश्चित करील एवढी अंशदानाची रक्कम भरणा करणे बंधनकारक राहील.

(१५) करारनामा केल्यानंतर लिलावधारकास वाळू स्थळाचा प्रत्यक्षात ताबा उशीरात उशीरा सात दिवसात देण्यात यावा. वाळू/रेती स्थळाचा ताबा लिलावधारकास सात दिवसात सबळ

कारणाशिवाय न दिल्यास त्यास जबाबदार असलेल्या अधिकारी /कर्मचारी यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी.

(१६) लिलावधारकास वाळूगटाचा ताबा देताना तसेच ताबा परत घेताना तहसिलदार किंवा जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्या समक्ष पंचनामा करण्यात यावा. वाळूगटात खड्डे असल्यास त्याचा उल्लेख पंचनाम्यामध्ये करावा. याबाबतचे ड्रोनद्वारे चित्रीकरणही करण्यात यावे.

(१७) लिलावधारक यांनी mahakhanij प्रणाली अथवा शासन निर्देशित अशी प्रणाली वापरणे बंधनकारक राहील.

II) वाळू/रेती गटाचे फेरलिलाव व फेरलिलावातही वाळू/रेती गटाचा लिलाव न झाल्यास करावयाची कार्यपध्दती:-

अ) (१) लिलावधारकाने देकाराची उर्वरित ३/४ रक्कम विहित कालावधीत न भरल्यास तसेच विहित कालावधीत करारनामा करुन न दिल्यास त्याला वाळू/रेती गटाचा ताबा देण्यात येणार नाही. अशा लिलावधारकाने शासनजमा केलेली १/४ रक्कम जप्त करण्यात यावी व अशा वाळू/रेती गटाचा फेरलिलाव करण्यात यावा.

(२) कोणत्याही कारणास्तव वाळू /रेती लिलाव रद्द करण्यात आल्यास अशा वाळू/रेतीगटाचा नव्याने लिलाव करण्यात यावा.

(३) फेरलिलाव किंवा नव्याने लिलाव केल्यास पूर्वीच्या लिलावाच्या किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलावधारकाकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात यावी. तथापि, फेरलिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक किंमत आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

(४) लिलावात ठेवण्यात आलेल्या एखाद्या वाळू/रेती गटाकरीता हातच्या किंमतीपेक्षा (अपसेट प्राईसपेक्षा) कमी देकार प्राप्त झाल्यास किंवा देकार प्राप्त न झाल्यास त्याची सविस्तर कारणे नोंदवून त्या वाळू/रेती गटाचा फेरलिलाव करण्यात यावा.

(ब) वरीलप्रमाणे कार्यवाही करुनही जे वाळूगट लिलावात जाणार नाहीत यापैकी कोणतेही वाळूगट महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळासाठी राखीव ठेवण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील. सदर वाळूगटातून वाळू उत्खननाची कार्यवाही महामंडळ स्वत: किंवा अभिकर्त्यामार्फत करु शकेल. अशा वाळूगटामधून उत्खनन केलेल्या वाळूची साठवणूक व विक्रीसाठी डेपो तयार करुन शासनाकडून पुर्वनिर्धारीत झालेल्या किंमतीने वाळूची विक्री महामंडळाकडून करण्यात येईल. वाळूच्या विक्रीपासून प्राप्त रकमेमधून शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या वाळूच्या स्वामित्वधनाची रक्कम शासनजमा करावी लागेल व उर्वरित रक्कम महामंडळाचे उत्पन्न राहील. महामंडळाकडून विक्री करण्यात येणाऱ्या वाळूच्या वाहतूकीसाठी संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून वाहतूक पास देण्यात येतील.

क) लिलावधारकास वाळू उत्खननाच्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी (कमीत कमी १ किलोमीटर अंतरापलीकडे) वाळूसाठा करुन विक्री करावयाचे असल्यास नियमातील तरतूदींप्रमाणे व्यापारी परवाना (Trading License) घेणे आवश्यक राहील.

ड) अवैध उत्खनन व वाहतूक कारवाईतील जप्त वाळू / रेती साठ्याच्या विल्हेवाटीबाबत अनुसरावयाची कार्यपद्धती -

(१) जप्त केलेला वाळूसाठा चोरी होऊ नये, पावसाच्या पाण्याने वाळू वाहून जाऊ नये, धूप होऊन वाळूसाठा कमी होऊ नये, या दृष्टीकोनातून जप्त केलेल्या वाळूगटाचा लिलाव शक्यतो एक महिन्याच्या आत करण्यात यावा.

(२) वाळूगटांच्या लिलावासाठी निश्चित केलेल्या हातच्या किंमतीनूसार जप्त केलेल्या वाळूगटाचा लिलाव उपविभागीय अधिकारी यांनी करावा.

(३) जप्त वाळू / रेती साठ्याच्या लिलावाबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही केल्यावरही जे वाळूसाठे लिलावात जाणार नाहीत, असे वाळूसाठे जिल्ह्यातील संबंधित शासकीय कामांच्या अंदाजपत्रकात नमूद केलेली वाळूची किंमत किंवा शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या वाळूच्या स्वामित्वधनाची रक्कम यापैकी जी रक्कम जास्त असेल त्या किंमतीनूसार अशा शासकीय कामांसाठी उपलब्ध करुन देण्याकामी परवाने मंजूर करण्याची मुभा जिल्हाधिकाऱ्यांना राहील.

प्रकरण क्रमांक - सात

अ) वाळू / रेती उत्खननासाठी सर्वसाधारण निर्बंध व अटी/शर्ती

(१) वाळू / रेती उत्खननासाठी सर्वसाधारण निर्बंध व अटी / शर्ती पुढीलप्रमाणे राहतील व त्यांचा समावेश संबंधित लिलावधारक/परवानाधारकासोबत करावयाच्या करारपत्रात न चूकता करणे अनिवार्य असेल:-

(i) लिलावधारकाने/परवानाधारकाने त्याला मंजूर केलेल्या वाळूगटाच्या ठिकाणी फलक लावून, उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करुन सीमा दर्शविणारे खांब उभारणे अनिवार्य राहील. विहीत केलेल्या क्षेत्राच्या बाहेर वाळू/रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच लिलावधारकाने जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगीने सदर वाळूगटाचे कामकाज पाहण्यासाठी नियुक्त केलेल्या उपठेकेदार, व्यवस्थापक व कर्मचारी यांची नावे, पत्ता व जागेचा तपशील दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक राहील.

(ii) माननीय सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका (सी) क्र.१९६२८-१९६२९/२००९ मध्ये दि.२७/०२/२०१२ रोजी दिलेले आदेश तसेच नदीपात्रातील पाणी स्वच्छ व शुध्द राहण्यासाठी व नैसर्गिकरित्या पाण्याचे नदीपात्रात वहन होण्यासाठी वाळू/रेती गटातून जास्तीत जास्त ३ मीटर किंवा पाण्याची पातळी यापैकी जे कमी असेल तितक्या खोलीपर्यंत किंवा पर्यावरण

अनुमतीमध्ये परवानगी दिलेल्या खोलीपर्यंत यापैकी जे कमी असेल तेवढ्या खोलीपर्यंतच लिलावधारक/ परवानाधारकाला वाळू/रेतीचे उत्खनन करता येईल.

(iii) नदी पात्रातील वाळू थराची जाडी सातत्याने राहण्यासाठी बेंच मार्क निश्चित करुन बेंच मार्कच्या खाली कोणत्याही परिस्थितीत वाळूचे उत्खनन करता येणार नाही. निश्चित केलेले बेंच मार्क पडणार नाहीत, तसेच नदी पात्रातील वाळूच्या थराच्या आधारे आजूबाजूच्या विहिरीतील पाण्याची पातळी कमी होणार नाही, याबाबत योग्य ती दक्षता लिलावधारकाने घेणे आवश्यक राहील.

(iv) लिलावधारकास लिलावात मंजूर केलेल्या वाळूसाठ्याइतकेच उत्खनन करण्याचा अधिकार प्राप्त होईल.

(v) वाळू/रेतीचे उत्खनन सकाळी ६.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीतच करता येईल. या कालावधीव्यतिरिक्तच्या काळात केलेले उत्खनन अवैध समजून कारवाई करण्यात येईल.

(vi) कोणत्याही रेल्वे पुलाच्या व रस्ते पूलाच्या कोणत्याही बाजुने ६०० मीटर्स (२००० फुट) अंतराच्या आत वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

(vii) कोल्हापूर पध्दतीचे बंधारे असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग / विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक असेल.

(viii) सार्वजनिक पाणवठा / पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून १०० मीटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढ्या अंतरापलिकडे उत्खनन करणे आवश्यक राहील.

(ix) रस्ते/पायवाट म्हणून वापरण्यात येणाऱ्या जमिनीतून वाळू/ रेती काढता येणार नाही.

(x) लिलावधारकास नदीपात्रामध्ये वाळू वाहतूकीसाठी मोठी वाहने नेता येणार नाहीत. लिलावधारकाने वाळूगटाच्या नजीकच्या मुख्य रस्त्यावर डेपो तयार करुन वाळूगटामधून उत्खनन केलेली वाळू सदर डेपोमध्ये साठवून विक्री करावी. डेपोपर्यंतच्या वाळू वाहतूकीसाठी ट्रॅक्टर, ट्रॉलीचा वापर करावा. वाळू डेपोमध्ये सीसीटीव्ही लावणे अनिवार्य असून, त्याचे फुटेज दर आठवड्याला तहसिलदार यांना सादर करावे.

(xi) वाळू उत्खननासाठी लिलाव किंवा परवाना देण्यामागे वाणिज्यिक किंवा महसूल मिळविणे हा एकमेव उद्देश नसून, विकास कामासाठी आवश्यक वाळू उपलब्ध व्हावी हा प्रमुख उद्देश आहे. तसेच नदीपात्रात वाळू साठल्याने आजुबाजूच्या परिसरात पूरसदृश्य परिस्थिती उद्भवू नये म्हणून वाळूचे उत्खनन केले जाते. लिलावधारकास लिलाव मंजूर केल्यानंतर किंवा परवाना दिल्यानंतर लिलावधारकाने / परवानाधारकाने वाळूगटाचा ताबा दिल्याच्या दिनांकापासून एका आठवड्याच्या आत वाळू/रेतीचे उत्खनन सुरू करणे आवश्यक राहील.

(xii) या व्यतिरिक्त वाळू/रेती उत्खननासंदर्भात यासोबतच्या **विवरणपत्रात** नमुद केलेल्या इतर अटी व शर्ती लिलावधारकांवर बंधनकारक राहतील.

(२) अवैध उत्खनन अधिक प्रभावीपणे रोखण्याच्या दृष्टीने शासनास कोणताही आर्थिक भार पडणार नाही, अशा अतिरिक्त उपाययोजनांच्या संदर्भात संबंधित जिल्हाधिकारी लिलावधारकांबरोबर करावयाच्या करारनाम्यात तत्संबंधी अटी व शर्तींचा समावेश करु शकतील.

ब) वाळू / रेती उत्खननासाठी वापरावयाची साधने:-

१. नदी पात्रात निश्चित केलेल्या वाळूगटातून वाळूचे उत्खनन अयांत्रिकी पद्धतीने (Manual method) करावे लागेल.

२. Sustainable Sand Mining Guidelines,२०१६ व २०२० तसेच Sand Mining Framework, २०१८ मधील सूचना तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालय व पर्यावरण अनुमतीमध्ये समाविष्ट असलेल्या अटी व शर्तीनूसार वाळू / रेती उत्खननासाठी वापरावयाची साधने निश्चित करण्याची जबाबदारी उपलब्ध वाळूसाठा व भौगोलीक स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन जिल्हास्तरीय समिती यांची राहील.

प्रकरण क्रमांक - आठ

प्रतिबंधात्मक उपाययोजना :-

वाळूचे अवैध उत्खनन व वाहतुक होणार नाही, यासाठी संबंधित जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त यांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

१) प्रत्येक वाळूगटांमधील वाळू वाहतूकीसाठी एकच रस्ता ठेवण्यात यावा.

२) जिल्हाधिकारी यांनी वाळूगट असलेल्या भागातील मोक्याच्या ठिकाणी चेकनाके निश्चित करावे. अशा निश्चित केलेल्या चेकनाक्यावर शासनाने निश्चित केलेल्या प्रमाणकानुसार जिल्हा नियोजन समिती यांच्याकडून निधी उपलब्ध करुन वजनकाटा बसविण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

३) (अ) प्रत्येक वाळूगटाच्या ठिकाणी २४/७ छायाचित्रण होण्यासाठी लिलावधारकामार्फत CCTV बसविण्यात यावेत. यापैकी किमान एक CCTV कॅमेरा वाहतुकीच्या साधनात ज्या ठिकाणी वाळू भरण्यात येते त्या ठिकाणी बसविण्यात यावा व वाळूगटातील वाळूची वाहतूक करणारी सर्व वाहने गावातील ज्या ठिकाणावरुन ये-जा करतात त्या ठिकाणच्या छायाचित्रणासाठी वापरण्यात यावा. वाळूगटाच्या ठिकाणी बसविलेल्या CCTV ची किंमत लिलावधारकांना सोसणे आवश्यक राहील. तसेच लिलाव न झालेल्या वाळूगटातील वाळूची अवैध वाहतूक होवू नये यासाठी ज्या ठिकाणाहून वाहतूक होण्याची शक्यता आहे, अशा ठिकाणीही सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे व यासाठी जिल्हा नियोजन समिती यांच्याकडून निधी उपलब्ध करुन घेण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

(ब) लिलावधारकांनी बसविलेल्या CCTV चा Address जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त व शासनाच्या महसूल व वन विभागाकडे देणे आवश्यक राहील. लिलावधारकाने वाळू उत्खनन

व वाहतूकीचे छायाचित्रण असलेली सीडी दर १५ दिवसांनी तहसिलदार कार्यालयात जमा करणे अनिवार्य राहील.

(क) तहसिलदारांनी सदर सीडी मधील छायाचित्रण आपल्या अधिनस्त यंत्रणेमार्फत तपासून घ्यावे. संबंधित तहसिलदार व उप विभागीय अधिकारी यांनी अधूनमधून स्वत: देखील अशा छायाचित्रणाची तपासणी करावी. अशा तपासणीत सी.सी.टी.व्ही. कॅमेरा काही काळासाठी बंद असल्याचे निदर्शनास आल्यास, मंजूर वाळूसाठा व वाळू उत्खननासाठी उपलब्ध दिवस यानुसार दरदिवशी करावयाचे उत्खनन विचारात घेऊन, जेवढे दिवस सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बंद होता, तेवढे दिवस सरासरी उत्खनन केले, असे गृहीत धरुन लिलावाच्या रकमेनुसार प्रतीब्रास रक्कम परिगणीत करुन त्या दराने सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बंद असलेल्या कालावधीत उत्खनन केलेल्या वाळूच्या रक्कमेएवढी दंडात्मक रक्कम लिलावधारकाकडून वसूल करण्यात यावी. एखाद्या दिवशी कितीही कालावधीसाठी सी.सी.टी.व्ही बंद असला, तरीही पूर्ण दिवसासाठी सी.सी.टी.व्ही. बंद असल्याचे समजून वरीलप्रमाणे दंडात्मक रकमेची आकारणी व वसूली करण्यात यावी.

४) प्रत्येक गाव कामगार तलाठ्याने त्याच्या कार्यक्षेत्रातील वाळूगटास नियमितपणे भेट देणे आवश्यक राहील. त्यासाठी संबंधित लिलावधारकाकडे तहसिलदारांनी प्रमाणित करून दिलेली भेटवही ठेवणे बंधनकारक असेल. तलाठ्याने वाळूगटास भेट दिल्यानंतर दैनंदिन भेट वहीमध्ये त्याची नोंद करुन दिनांकित स्वाक्षरी करावी.

५) संबंधित मंडळ अधिकाऱ्यानेही नियमितपणे त्यांच्या कार्यक्षेत्रातील वाळूगटाची पाहणी करून, त्याची नोंद उक्त दैनंदिन भेट वहीमध्ये करुन, दिनांकित स्वाक्षरी करावी.

६) संबंधित तहसिलदार, उपविभागीय अधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या क्षेत्रातील वाळूगटाला वेळोवेळी आकस्मिक भेट देऊन त्याची दैनंदिन भेटवहीत नोंद करुन, दिनांकित स्वाक्षरी करावी.

७) अधिकाऱ्यांनी रेतीगटाची तपासणी करताना खालील बाबी कटाक्षाने पहाव्यात :-

(अ) उत्खननास प्रारंभ केल्यापासून तपासणीच्या दिनांकापर्यंत उत्खनन केलेल्या वाळूचे परिमाण व तपासणीच्या दिवसापर्यंत उत्खननाच्या ठिकाणी असलेला वाळूसाठा.

(ब) संबंधित तलाठी व ग्रामसेवक तसेच संबंधित लिलावधारक यांच्यासमक्ष दरमहा वाळूगटामधील उत्खननाची मोजणी करण्यात यावी.

(क) नदी पात्रात पूल असल्यास त्या पुलाच्या आजूबाजूस तसेच बेंच मार्कच्या आजूबाजूस व बेंच मार्कच्या खाली वाळू उत्खनन केले जात आहे किंवा कसे याची पहाणी करण्यात यावी व त्याची नोंद भेटवहीत घेण्यात यावी.

(ड) नदीच्या काठाजवळच्या लगतच्या भागामध्ये उत्खनन केले जाते आहे किंवा कसे, व त्याकरीता पोकलेन/ जेसीबी यांसारख्या यांत्रिक साधनांचा वापर करण्यात आला आहे किंवा कसे, याची पहाणी करण्यात यावी व त्याची नोंद भेटवहीत घेण्यात यावी.

(इ) उत्खनन केलेला वाळू साठा विहित अंतरापर्यंत करण्यात आलेला आहे किंवा कसे, याची नोंद भेटवहीत घेण्यात यावी.

८) जिल्हाधिकाऱ्यांनी तपासणी बाबतची वरील मानके काटेकोरपणे पाळली जात आहेत किंवा कसे, याची खात्री करुन घ्यावी. तपासणीनंतरही एखाद्या अधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्रात अवैध वाळू उत्खनन/ वाहतूक अव्याहतपणे होत असल्याचे निष्पन्न झाल्यास, संबंधित अधिकाऱ्याचे अवैध उत्खनन/वाहतूक करणाऱ्या व्यक्तींशी संगनमत आहे असे गृहीत धरुन संबंधिताविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांमार्फत शासनास सादर करण्यात यावा.

प्रकरण क्रमांक – नऊ

१) सनियंत्रण

(अ) वाळू वाहतूकीसाठी केंद्र शासन/राज्य शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या निदेशांनुसार सनियंत्रण प्रकियेचा वापर करणे अनिवार्य राहील. तसेच वाळूच्या अवैध उत्खनन/वाहतूकीस प्रभावीपणे आळा घालण्याच्या दृष्टीने उक्त सनियंत्रण प्रकियेबरोबरच शासनास कोणताही आर्थिक भार पडणार नाही, अशा प्रणालीचा वापर करण्याची संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना मुभा राहील. तसेच वाळू /गौण खनिजाच्या उत्खनन कार्यपध्दतीत होणारी महसूलाची गळती व उत्खनन प्रक्रिया यावर MRSAC या तंत्रज्ञानाचा आवश्यकतेप्रमाणे वापर करण्याची मुभा जिल्हाधिकारी यांना राहील.

(ब) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतूकीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य व्हावे, यासाठी तहसिल, उप विभाग, जिल्हास्तरावर व विभागीय स्तरावर पोलीस, परिवहन विभागातील अधिकारी/कर्मचारी व महसूल अधिकारी / कर्मचारी यांची स्वतंत्र भरारी / दक्षता पथके अपर जिल्हाधिकारी /जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांनी निर्माण करावी. सदर पथकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अवैध उत्खनन व वाहतूकीस अटकाव करणे ही या पथकाची सामुहिक जबाबदारी राहील.

(क) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन /वाहतूकीची घटना वा प्रकरण ज्या महसूल अधिकारी / कर्मचारी यांच्या कार्यक्षेत्रात उघडकीस येईल, ते अधिकारी / कर्मचारी सदर प्रकरणात जबाबदार आहेत काय, याची कसून तपासणी करण्यात यावी. तपासणीमध्ये संबंधित स्थानिक अधिकारी / कर्मचारी अवैध उत्खननाकडे हेतूत: दुर्लक्ष करीत असल्याचे आढळून आले किंवा त्यांनी अवैध उत्खनन / वाहतूकीवर पुरेसे नियंत्रण न ठेवल्याचे आढळल्यास त्या अधिकारी / कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन, त्यांच्याविरुध्द प्रचलित नियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी.

२) उत्खननाबद्दल मासिक अहवाल:-

प्रत्येक जिल्ह्यामध्ये एकूण वाळूघाट किती आहेत, त्यापैकी किती वाळूघाटांचा लिलाव झाला, किती वाळूघाटांचा लिलाव झाला नाही, या लिलावात शासनास किती महसूल प्राप्त झाला, प्रत्येक वाळूघाटातून दर महिन्याला किती ब्रास वाळू उत्खनन करण्यात आली, तसेच जिल्ह्यामध्ये अवैध उत्खननाची किती प्रकरणे प्रत्येक महिन्याला उघडकीस आली व किती प्रकरणात संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले, याबाबतचे मासिक विवरणपत्र अपर जिल्हाधिकारी /जिल्हाधिकारी यांनी शासनास व संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय यांना सादर करावे.

३) ग्राम दक्षता समिती –

ज्या गावात वाळूसाठे असतील अशा गावात ग्राम दक्षता समिती स्थापन करण्यात यावी. या समितीची रचना पुढीलप्रमाणे असावी :-

(१) ग्रामपंचायतीचे सरपंच	-	अध्यक्ष
(२) ग्राम सेवक	-	सदस्य
(३) पोलीस पाटील	-	सदस्य
(४) कोतवाल	-	सदस्य
(५) तलाठी	-	सदस्य सचिव

ग्रामदक्षता समितीची दर पंधरा दिवसांनी एक बैठक घेणे आवश्यक असेल, वाळू/रेतीचे अवैध उत्खनन होत असल्यास त्याला आळा घालण्यासाठी ग्रामदक्षता समितीच्या काही शिफारशी असल्यास त्या संबंधित तहसिलदार व जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात याव्यात.

प्रकरण क्रमांक – दहा

जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीमधून संबंधित ग्रामपंचायतीसाठी निधी :-

केंद्र शासनाने खाण व खनिजे (विकास व विनियमन) सुधारणा अधिनियम, २०१५ मधील कलम ९ (ब) मध्ये राज्य शासनाने अधिसूचनेद्वारे खनिकर्मामुळे बाधित प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडीएफ-०६१५/५१/प्र.क्र.३४/उद्योग-९, दिनांक ०१.०९.२०१६ अन्वये, खनिकर्म जिल्ह्यातील पर्यावरण दर्जा वाढ करण्याच्या अनुषंगाने अन्य उपाययोजनाकरीता अनुज्ञेय असलेल्या निधीमधून पर्यावरण विषयक बाबींसाठी होणारा खर्च भागविण्यात यावा.

जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करुन, सर्व प्रकारच्या गौण खनिज खाणपट्टाधारक, परवानाधारक तसेच वाळू लिलावधारकाकडून शासनास जमा करण्यात येणाऱ्या स्वामित्वधनाच्या रकमेच्या १० टक्के रक्कम जिल्हा खनिज प्रतिष्ठानसाठी अंशदान म्हणून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर निधीमधून ग्रामपंचायती क्षेत्रातील रस्ते, आरोग्य, इत्यादी साठी निधी देय आहे.

शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक एमडीएफ-०६१५/५१/प्र.क्र.३४/ उद्योग-९, दिनांक ०१.०९.२०१६ अन्वये, जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीमध्ये जमा होणाऱ्या रकमेच्या पाच टक्केपेक्षा जास्त नाही अशी रक्कम प्रशासकीय किंवा आस्थापना खर्च भागविण्यासाठी खर्च करता येते. सदर मर्यादेच्या अधिन राहून उक्त निधीतून खालील बाबींकरीता गरजेनुसार खर्च करता येऊ शकेल:-

१. अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी करावयाच्या आवश्यक उपाययोजना करणे.

२. जप्त केलेले वाहन बंद स्थितीत असल्यास सदर वाहन सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी उपाययोजना करणे.

३. जप्त केलेल्या वाळूसाठ्याचे संरक्षण करण्यासाठी व क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या संरक्षणासाठी सुरक्षारक्षक नियुक्त करणे.

४. दक्षता व निरीक्षण पथकासाठी खाजगी वाहने भाड्याने घेणे.

५. वाळू उपलब्धतेचा अंदाज काढणे, वाळू उत्खननाचे पर्यवेक्षण व सनियंत्रण याकरीता नावीन्यपुर्ण प्रकल्प/ तंत्रज्ञान विकसीत करणे.

प्रकरण क्रमांक - अकरा

वाळू/रेती उत्खननातील अडचणी व तक्रारीसंदर्भात जिल्हास्तरीय तक्रार निवारण समिती

लिलाव झालेल्या वाळू/रेती गटांतून वाळू उत्खननासाठी लिलावधारकास येणाऱ्या अडचणी व विविध व्यक्ती व संस्थांकडून वाळू उत्खननाबाबत करण्यात येणाऱ्या पर्यावरणविषयक तक्रारींचे देखील जिल्हास्तरीय वाळू सनियंत्रण समिती कामकाज पाहील.

(अ) एकदा अत्युच्च बोली स्वीकारुन अंतिम करण्यात आलेल्या लिलावात वाळू उत्खनन करण्यास लिलावधारकास काही अडचणी / अडथळे आल्यास, त्यांनी याबाबत संबंधित तहसिलदार यांच्याकडे अर्ज सादर करावा. संबंधित तहसिलदार यांनी अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्या वाळू गटातून उत्खनन करण्यास येणाऱ्या अडचणींची चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल उक्त समितीसमोर सादर करावा. सदर अहवालावर उक्त समितीने १५ दिवसांत निर्णय घेणे आवश्यक राहील.

(ब) तसेच रेती / वाळू स्थळातून लिलावांच्या अटी/शर्तीचे उल्लंघन करुन वाळूचे उत्खनन होते, अवैध/नियमबाह्य वाळू उत्खननामुळे नदी काठच्या गावातील पिण्याच्या व शेतीच्या पाण्यावर विपरीत परिणाम होतो, वाळूच्या वाहतूकीमुळे नदी काठच्या शेतीची/रस्त्यांची हानी होते, अशा स्वरुपाच्या तक्रारी विविध व्यक्ती व संस्थाकडून प्राप्त झाल्यास, अशा तक्रारीची

तहसिलदार यांनी चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल उक्त समितीसमोर सादर करावा. सदर अहवालावर उक्त समितीने १५ दिवसांत निर्णय घेणे आवश्यक राहील.

(क) लिलावधारकास वाळू उत्खनन करण्यास होणाऱ्या स्थानिक विरोधामुळे किंवा त्याच्या नियंत्रणाबाहेरील व नैसर्गिक सबळ कारणामुळे वाळूचे उत्खनन करता येत नसल्यास लिलावधारकाने त्वरीत जिल्हास्तरीय समितीसमोर अर्ज करावा. याप्रमाणे लेखी अर्ज प्राप्त झाल्यास, सदर समितीने अशा वाळू / रेती स्थळांना प्रत्यक्ष भेट देऊन, त्या वाळू/रेती स्थळाचे पुनश्च: सर्वेक्षण करावे, तसेच तक्रारीतील अन्य मुद्यांबाबत स्थानिक चौकशी करावी व समितीच्या बैठकीत त्यावर विचार विनिमय करुन, संबंधीत वाळू / रेती गटातून वाळूचे उत्खनन चालू ठेवण्याविषयी किंवा ते बंद करण्याबाबत १५ दिवसांत उचित निर्णय घ्यावा व तो निर्णय संबंधीत लिलावधारक, तक्रारदार व क्षेत्रिय महसूल अधिकाऱ्यांना कळवावा. जिल्हास्तरीय समितीने वाळूगटाच्या सर्वेक्षणाच्या वेळी व्हिडीओ चित्रीकरण करण्याची दक्षता घ्यावी.

(ड) ज्या तक्रारदाराला त्याच्या तक्रारीच्या संदर्भात समितीने घेतलेला निर्णय मान्य नसेल, अशा तक्रारदाराला त्याबाबत संबंधीत विभागीय आयुक्तांकडे अपील करता येईल. संबंधीत विभागीय आयुक्त, जिल्हास्तरीय समितीने घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करुन कोणत्याही परिस्थितीत १५ दिवसात उचित निर्णय घेतील. सदर निर्णय संबंधित तक्रारदार व संबंधित जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येईल.

(इ) वरीलप्रमाणे वाळू उत्खननासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर समितीने चौकशी करुन, ज्या वाळूगटातील वाळूचे उत्खनन बंद करण्याविषयी निर्णय घेतला असेल, अशावेळी लिलावधारकासोबत करण्यात आलेला करारनामा तात्काळ रद्द करण्यात यावा. तसेच संबंधित लिलावधारक यांना लिलावाची रक्कम अथवा यथास्थिती उत्खनन न करता आलेल्या वाळूची रक्कम परत करण्याबाबत सदर शासन निर्णयातील **<u>प्रकरण क्रमांक बारा</u>** मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

(ई) लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत ठेका रद्द केल्यास किंवा लिलावधारकास वाळू/ रेती उत्खनन करण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही.

प्रकरण क्रमांक - बारा

(१) लिलावाची रक्कम परत करण्यासंबंधी कार्यपध्दती :-

१) लिलावाची रक्कम परत करण्यासंबंधीची कारणे व अधिकार :-

(अ) वाळूगटाचा यशस्वीरित्या लिलाव झाल्यानंतर लिलावधारकाने लिलावाची रक्कम तसेच इतर संबंधित रकमा शासनजमा केल्यानंतर संबंधित लिलावधारक यांना काही अपरिहार्य कारणास्तव वाळूगटाचा ताबा देणे शक्य झाला नसेल/ होत नसेल अशा प्रकरणांत जिल्हास्तरीय समितीने स्थळ पहाणी करुन, वाळूगटाचा ताबा देणे शक्य नाही, असा अहवाल शिफारशीसह सादर केल्यास लिलावाची संपूर्ण रक्कम परत करण्याबाबत विचार करता येईल.

(ब) लिलावधारक यांनी लिलावाची रक्कम तसेच इतर संबंधित रकमा शासनजमा केल्या असतील आणि कोणत्याही न्यायालयीन आदेशाने किंवा शासनाच्या तसेच वरीष्ठ प्राधिकरणाच्या आदेशाने वाळू उत्खननास स्थगिती देण्यात आली असेल, अशा प्रकरणांत ज्या कालावधीसाठी स्थगिती देण्यात आली आहे, त्या कालावधीच्या प्रमाणात लिलावाची प्रमाणशीर रक्कम परत करण्याबाबत विचार करता येईल.

(क) अन्य कोणत्याही कारणास्तव वाळू उत्खनन करणे शक्य झाले नसेल/होत नसेल (उदा. ग्रामस्थांचा विरोध, प्रशासकीय यंत्रणांचा विरोध) अशा प्रकरणांत जिल्हास्तरीय समितीने प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन, लिलावधारक तसेच ग्रामस्थांनी दिलेल्या कारणांची खातरजमा करुन, संबंधित वाळूगटातून वाळूचे उत्खनन करणे शक्य आहे किंवा कसे, याबाबत सुस्पष्ट शिफारशीसह अभिप्राय जिल्हाधिकारी यांना सादर करावेत. जिल्हाधिकारी यांनी जिल्हास्तरीय समितीने वाळू उत्खनन न करता येण्याबाबत दिलेल्या कारणांची तपासणी करुन, तसेच संबंधित लिलावधारकास उपलब्ध कागदपत्रांची एक प्रत देण्यात येऊन त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात यावी. तद्पश्चात तर्कशुद्ध आदेश पारीत करावेत.

(२) लिलावाची प्रमाणशीर रक्कम परत करण्याकामी परिगणना :-

(अ) लिलावाची देकाराची रक्कम व लिलावातील अंदाजीत वाळूसाठा यानुसार वाळूची प्रतिब्रास किंवा यथास्थिती प्रतिमेट्रीक टन किंमत परिगणीत करण्यात यावी.

(ब) लिलावातील अंदाजीत वाळूसाठा व वाळू उत्खननासाठी उपलब्ध कालावधी यानुसार दरदिवशी उत्खनन करावयाच्या वाळूचे सरासरी परिमाण निश्चित करण्यात यावे. लिलावधारकास ज्या कालावधीसाठी वाळू उत्खनन स्थगित/बंद ठेवावे लागले तो कालावधी व दरदिवशी उत्खनन करावयाच्या वाळूचे सरासरी परिमाण यानुसार स्थगित/बंद कालावधीमध्ये उत्खनन करता येऊ न शकलेला वाळूसाठा निश्चित करण्यात यावा.

(क) वरील क्रमांक (ब) नुसार निश्चित केलेला वाळूसाठा व प्रत्यक्षात उत्खनन न करता आलेला वाळूसाठा यापैकी जो कमी असेल, तेवढ्या वाळूसाठी वरील क्रमांक (अ) येथील प्रतिब्रास किंवा यथास्थिती प्रतिमेट्रीक टन दरानुसार लिलावधारकास देय रकमेची परिगणना करण्यात यावी.

(३) खालील कारणास्तव लिलावाची रक्कम परत करण्यात येणार नाही :-

वाळू/रेती निर्गती धोरणातील अटी व शर्ती तसेच निविदा सूचनेतील अटी व शर्तीनुसार लिलावधारकाने लिलावात भाग घेण्यापूर्वी, वाळूस्थळात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच, परवानगी दिलेल्या साधनांच्या सहाय्याने वाळूचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची आहे. त्यामुळे वाळूस्थळात अपेक्षित वाळूसाठा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध नाहीत, वाळूगटात पाणी आहे, मातीमिश्रीत वाळू आहे, वाळू उत्खननासाठी सक्शन पंपाची परवानगी मिळाली नाही अशा कारणास्तव लिलावाच्या रकमेचा परतावा अनुज्ञेय असणार नाही.

वाळू/रेती निर्गतीबाबत अथवा त्याअनुषंगाने यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय, शासन ज्ञापन, शासन परिपत्रक अथवा शासन पत्रान्वये देण्यात आलेले आदेश, सूचना जर या शासन निर्णयातील काही तरतूदींशी विसंगत असतील तर अशा प्रकरणी या शासन निर्णयातील तरतूदी अंतीम समजून त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४६६/२०२१/व्यय-९, दिनांक २२ नोव्हेंबर,२०२१ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०१२८१४५१५६१६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAMESH SHIVAJI CHAVAN

Digitally signed by RAMESH SHIVAJI CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7ada4e8fa11566f3b9c9f7b5fa123945d54f8e3d5b09d05bedfa09b97ee45cad, pseudonym=8681E76138CFE5A3E889AB0B442F95DD2288C273, serialNumber=EB458B05E05EE27F435BD399537405D44E1C88021CF038B060AC1089D8F88787, cn=RAMESH SHIVAJI CHAVAN
Date: 2022.01.28 14:57:26 +05'30'

(रमेश चव्हाण)
शासनाचे सह सचिव

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अ.मु.स., मंत्रालय, मुंबई
३) मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

विवरणपत्र

वाळू/रेती लिलावाच्या अनुषंगाने इतर अटी व शर्ती

(१) लिलावधारकाला नदीपात्रातून /नाल्यातून रेती /वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातून रेती/वाळू उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

(२) लिलावधारकाने गावकऱ्यांच्या निस्तार हक्कांस बाधा पोहोचविता कामा नये.

(३) लिलावधारकाने रेती / वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेतीबाबतची दैनंदिन हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरीक्षक, महसूल अधिकारी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरीक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांना उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

(४) लिलावधारकास वाळूची / रेतीची वाहतूक करण्यासाठी परवाना द्यावयाचा असल्यास त्याने सहकारी संस्था/संस्थांना प्राधान्य दिले पाहिजे.

(५) वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने / ताडपत्रीने आच्छादित करुनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतूक न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

(६) लिलावधारकाने त्याच्या लिलावस्थळातील रेती / वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनास त्याच्या वहनक्षमते इतक्याच परिमाणाची वाहतूक करावी. वहनक्षमतेपेक्षा अधिक परिमाणाची रेती / वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण वाळू अवैध आहे, असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतूकीबाबत मोटर वाहन कायद्यानुसार कारवाई करावी. दंडनीय कारवाईबरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात यावा.

(७) रेती / वाळूचे उत्खनन करताना अथवा वाहतूक करताना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.

(८) लिलावधारकाने नियमात नमुद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौण खनिज उत्खनन नियमातील तरतूदीनुसार असलेले नियम (संबंधित विभागास लागू असलेले नियम) आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदीनुसार लागू असलेल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेतीचा/वाळूचा पूर्ण उपयोग गौण खनिज म्हणूनच केला पाहिजे.

(९) रेतीचे/वाळूचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळून आल्यास लिलावधारकाने/ ठेकेदाराने विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे सात दिवसात कळविले पाहीजे.

(१०) अंदाजित परिमाणापेक्षा अधिक वाळूसाठा रेतीगटात असल्यास त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजित परिमाणापेक्षा अधिक उत्खनन करण्यास लिलावधारकास परवानगी देता येणार नाही, या अटी करारनाम्यात अंतर्भूत कराव्यात.

(११) लिलावाने दिलेल्या क्षेत्रातून करारात नमूद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनाच्या सहाय्यानेच वाळूचे/रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळू स्थळात पाणी आहे, वाळूगटामधील वाळू मातीमिश्रीत आहे अशा तसेच मानवी वा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळूगट बदलून दिला जाणार नाही.

(१२) उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळू/रेतीची साठवणूक, लिलाव ज्या अपर जिल्हाधिकारी/ जिल्हाधिकाऱ्याने केला असेल त्याच जिल्ह्यात करावी लागेल व त्यासाठी अकृषक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी लिलाव धारकाची असेल. वाळू / रेती ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळू / रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळूचा / रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर १० दिवसात उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल. अशा वाळूच्या / रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत लिलावधारकास अथवा त्यांच्या ठेकेदारास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही.

लिलावाचा कालावधी संपल्यानंतर तसेच १० दिवसाची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाळू / रेतीसाठा करण्यास परवानगी देता येणार नाही किंवा त्याच्या वाहतूकीसाठी दुय्यम वाहतूक पासेस देण्यात येणार नाहीत. याबाबत लिलावधारकाशी करावयाच्या करारपत्रात अशा प्रकारची अट अंतर्भूत करण्यात यावी.

(१३) शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय लिलावधारकास लिलाव / ठेका दुसऱ्या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा दुसऱ्या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा लिलावानंतर भागीदारही घेता येणार नाही.

(१४) लिलावधारकाने त्यांना मंजूर केलेल्या वाळूघाटातून उत्खनन केले आहे, त्याबाबतचे विवरणपत्र दर महिन्याच्या १० तारखेला जिल्हाधिकारी यांना सादर करणे सक्तीचे आहे. प्रत्यक्षात अशी विवरणपत्रे लिलावधारकाकडून सादर केली जात नाहीत, असे आढळून येत आहे. त्यामुळे जे लिलावधारक मासिक विवरणपत्र विहित वेळेत सादर करणार नाहीत, त्यांच्याविरुध्द ठेका रद्द करण्याबाबत तसेच त्यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार अपर जिल्हाधिकारी /जिल्हाधिकारी यांना असतील.

(१५) लिलावधारक, त्यांच्या लिलाव क्षेत्रातील ज्या ठिकाणातून रेती / वाळू काढण्याने धूप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतींना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातून वाळूचे स्वत: उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी

देणार नाही. अशा प्रकरणी अपर जिल्हाधिकारी /जिल्हाधिकारी यांचा उत्खनन करण्यास प्रतिबंध करण्याचा निर्णय अंतिम राहील.

(१६) एकदा अत्युच्च बोली स्विकारुन अंतीम करण्यात आलेल्या लिलावात कोणत्याही परिस्थितीत रेती / वाळू उत्खननाचा कालावधी वाढवून देण्याचा अथवा कोणत्याही कारणास्तव रेतीचा / वाळूचा गट बदलून देण्याची मागणी लिलावधारकास करता येणार नाही. उत्खनन केलेल्या वाळू / रेतीच्या वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतूकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच वाहतूकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतूकीसाठी बंद आहेत या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत वाळू /रेती उत्खननाचा कालावधी वाढवून दिला जाणार नाही अथवा वाळू / रेतीघाट बदलून दिला जाणार नाही.

(१७) अवैध वाळू / रेती साठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६ मधील नियम ४८ (७) व (८) नुसार कारवाई करण्यात यावी.

(१८) लिलावधारकाने /परवानाधारकाने वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांची माहिती तहसिलदार / जिल्हाधिकारी यांना देण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत वाहनाच्या वहन क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(१९) अपर जिल्हाधिकारी / जिल्हाधिकारी यांनी वाळूची वाहतूक करणाऱ्या ट्रकना एकाच प्रकारचा रंग देणे शक्य आहे का, याबाबतची शक्यता तपासून पाहून वाळू वाहतूकीसाठी एकाच प्रकारचा रंग दिलेले ट्रक वापरण्यात येईल, याबाबत लिलावधारकाशी चर्चा करुन निर्णय घ्यावा.

(२०) वाळूचे / रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी / नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व लिलावधारकावर राहील. अशा हानीची/नुकसानीची परिगणना सक्षम अधिकाऱ्याकडून करण्यात येईल व त्याबाबतचा त्यांचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकीबाकीच्या वसूलीप्रमाणे संबंधीत लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल.

लिलाव/परवानाधारकाने अटी/शर्तींचे उल्लंघन केल्यास करावयाची कारवाई :-

(अ) लिलावधारकांनी आपापसात संगनमत केल्यास, ठराविक वाळू घाटांचा लिलाव पुन्हा पुन्हा लावून सुध्दा कोणीही लिलावधारक बोली बोलण्यास पुढे येत नाहीत व त्यामुळे वाळू घाटाचा लिलाव होऊ शकत नाही. अशाप्रकारे संगनमत करुन शासनाच्या महसूलाचे नुकसान करणाऱ्या तसेच अवैध उत्खनन व वाहतूकीसारखे गुन्हे करणाऱ्या लिलावधारकास संपुर्ण राज्यासाठी काळ्या यादीत (Black List) टाकण्यात येईल.

(ब) पर्यावरण अनुमतीमध्ये परवानगी दिलेल्या खोलीपेक्षा जास्त खोल उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास लिलावधारक/परवानाधारकाकडून घेण्यात आलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन, लिलाव/परवाना रद्द करण्यात यावा. तसेच असे उत्खनन अवैध ठरवून महाराष्ट्र जमीन

महसूल संहिता,१९६६ मधील कलम ४८ (७) व (८) मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात यावी.

(क) वाळू/रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनचालकाकडे वैध बारकोडयुक्त वाहतूक पास आहे किंवा नाही, याची शहानिशा करण्यात यावी. याबाबतच्या निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहनचालकाकडे वैध बारकोडयुक्त वाहतूक पास आढळला नाही किंवा वाहतूक पासचा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर वाळूचे उत्खनन/वाहतूक अवैध समजून त्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ मधील कलम ४८ (७) व (८) नुसार कारवाई करण्यात यावी.

(ड) अवैध उत्खनन व वाहतुकीच्या प्रकरणामध्ये संबंधित ठेकेदार / लिलावधारक दोषी आढळल्यास त्यांच्याविरुध्द प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात यावी.

प्रचलित नियमानुसार कारवाई करतांना संबंधितांविरुध्द भारतीय दंड विधि संहिता कलम, ३४,११४,३७९,३९२,३९३,३९४,३९६ इत्यादी कलमांतर्गत गुन्हा दाखल करणे, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ मधील कलम ४८ (७) मधील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करणे व कलम ४८(८) मधील तरतूदीनुसार वाळू उत्खननासाठी वापरलेली यंत्रसामग्री व वाहतूकीसाठी वापरलेली वाहने जप्त करणे, अवैध उत्खनन केलेली वाळू जप्त करणे इत्यादी कारवाई करण्यात यावी.

(इ) वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणात वाळूच्या बाजारभावाच्या आधारे दंडाची आकारणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील वाळूच्या बाजारभावाची सरासरी काढून दरवर्षी दिनांक १ जानेवारी रोजी वाळूचे बाजारभाव निश्चित करावे व त्यानुसार दंडाच्या रकमेची परिगणना करावी. प्रकरणपरत्वे दंडात्मक कारवाई करण्यापूर्वी संबंधितांना नोटीस देवून त्यांची बाजू ऐकून घेऊन कायद्यातील तरतुदीनुसार स्वयंस्पष्ट आदेश पारीत करण्यात यावेत.

तसेच वाळूचे अवैध उत्खनन / वाहतूकीच्या अनुषंगाने कारवाई करतांना महसूल अधिकारी / कर्मचारी यांच्यावर हल्ले होत असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा अशा ठिकाणी संघटित गुन्हेगारीचे प्रकार आढळून आल्यास अशा संघटित गुन्हेगारीविरुध्द "महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्ये विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम,१९८१ या अधिनियमान्वये कारवाई करण्यात यावी.

(ई) लिलावधारक / परवानाधारक यांनी पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तीचे तसेच पर्यावरण विषयक नियमातील तरतूदींचे पालन करणे बंधनकारक असेल. सदर तरतूदीचे उल्लंघन झाल्यास ते पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ मधील तरतूदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

****

पर राज्यातून आणलेल्या वाळूचा साठा व निर्गतीबाबतची कार्यपध्दती निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन शुध्दीपत्र क्रमांक: गौखनि-०७२०/प्र.क्र.८५/ख-१
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: १६ जून, २०२२.

वाचा : १) शासन परिपत्रक क्र.गौखनि-०७२०/प्र.क्र.८५/ख-१, दिनांक ५ फेब्रुवारी,२०२१

शासन शुध्दीपत्र:

उक्त संदर्भाधीन दि.५ फेब्रुवारी,२०२१ मधील मुद्दा क्र.५ अनुषंगाने मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल रिट याचिका क्र.२०७८/२०२१, क्र.२०८६/२०२१, क्र.१७२/२०२२ व क्र.१७३/२०२२ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.७/४/२०२२ रोजी आदेश पारीत केले आहेत. सदर आदेशानुसार शासन परिपत्रक क्र.गौखनि-०७२०/प्र.क्र.८५/ख-१, दिनांक ५ फेब्रुवारी, २०२१ मधील मुद्दा क्र.५ वगळण्यात येत आहे. तसेच सदर शासन परिपत्रकातील इतर तरतूदी लागू राहतील.

सदर शासन शुध्दीपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२२०६१६१८१३१८३९१९ असा आहे. सदर शासन शुध्दीपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SHIVAJI SONAJI CHOURE

Digitally signed by SHIVAJI SONAJI CHOURE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fa37c7e079f23b78a27c84b9d6e46f94d549fc79ba170d5815f3619617b13313, pseudonym=0592554E096862442D21372FBE05C91C3D50FA17, serialNumber=03FE2B2D7158ED4BDD90A99525AE0694667 2E68EA905C97DA50B34FD21223011, cn=SHIVAJI SONAJI CHOURE
Date: 2022.06.16 18:17:18 +05'30'

(शिवाजी चौरे)
अवर सचिव, महसूल व वन विभाग

प्रत:

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई (पत्राने)
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
४) मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) सर्व मंत्रालयीन विभाग
७) विभागीय आयुक्त (सर्व)
८) जिल्हाधिकारी (सर्व)
९) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर
१०) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षि कर्वे भवन, न्यु मरीन लाईन्स, मुंबई-४०० ०२०
११) प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षि कर्वे भवन, न्यु मरीन लाईन्स, मुंबई-४०० ०२०
१२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) -२, नागपूर
१३) प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा) -२, नागपूर
१४) निवड नस्ती (ख-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन
(विकास व विनियमन) नियम, २०१३
मधील अल्प मुदतीच्या परवाण्याबाबत
कार्यवाहीबाबत निर्देश.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : गौखनि-१०/१०२२/प्र.क्र.२९२/ख-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२
दिनांक : १३ ऑक्टोंबर २०२२

संदर्भ :- १) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३
२) शासन परिपत्रक क्रमांक गौखनि-१०/१०१२/प्र.क्र.६०३/ख, दि. ०१.११.२०२१.

प्रस्तावना :-

खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७ च्या मलम १५(१)(३) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ तयार करण्यात आले आहेत. सदर नियमातील गौण खनिजासाठी अल्प मुदतीचे परवाने देण्याबाबत तसेच सदर परवाने निर्गमित करण्यास असलेले सक्षम प्राधिकारी याबाबत तरतूद करण्यात आली आहे.

याबाबत मा. राष्ट्रीय हरीत लवादाने दिलेला निर्णय व त्यानंतर केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने दिनांक ८ ऑगस्ट २०२२ रोजी दिलेले कार्यालयीन ज्ञापन व त्यानंतर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या निकालानुसार सर्व यंत्रणाना, सर्व क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक १४/०९/२०२२ रोजी सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि, याबाबत काही जिल्हयामधील अधिकाऱ्यांना याबाबत संभ्रम असल्याचे नमूद करुन सदर परवाने देत नाहीत, अशी बाब शासनाच्या निदर्शनास आलेली आहे. त्या अनुषंगाने गौण खनिजाचे linear project साठी अल्प मुदतीचे अथवा जास्त कालावधीचे परवाने देण्याबाबत क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी, कर्मचाऱ्यांना निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन खालील प्रमाणे निर्देश देत आहेत.

शासन परिपत्रक :-

अ) पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या दिनांक २८/०३/२०२० रोजीच्या अधिसूचनेतील परिशिष्ट ९ मधील बाबीसाठी पर्यावरण अनुमतीची गरज नाही असे स्पष्टपणे नमुद केले आहे. यामध्ये अ.क्र. ६ वर (Extraction or sourcing or borrowing of ordinary earth for the linear projects such as road, pipelines etc.) असे नमूद आहे. तथापि याबाबत ही मा. राष्ट्रीय हरीत

न्यायालयाच्या दिनांक ७ मार्च २०२२ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने शासनाने दि. २४/०३/२०२२ च्या पत्रान्वये यासाठीचे परवाने ही पर्यावरण अनुमती शिवाय देता येणार नाही, असे कळविले होते. परंतु त्यानंतर मा. राष्ट्रीय हरीत न्यायालयाच्या निर्णयाचा परामर्श घेऊन व Expert Appraisal Committee चा सल्ला घेऊन केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने दि.०८.०८.२०२२ रोजी स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. त्या सूचना मधील परिछेद ५ हा आदेश स्वरुपातील आहे. त्याचे अवलोकन व पालन करणे सर्व क्षेत्रीय अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर बंधनकारक करण्यात येत आहे.

याचाच अर्थ की linear projects साठी आवश्यक असणारी Earth / Soil material साठी परवाने देतांना पर्यावरण अनुमती स्वतंत्रपणे लागणार नाही. तथापि, केंद्र सरकारच्या दि. ०८/०८/२०२२ च्या ज्ञापनातील परिशिष्ट मधील (SOP- Standard Operating Procedure) चे अनुपालन करणे क्षेत्रीय अधिकारी /कर्मचारी यांना बंधनकारक आहे. या निर्देशांचे पालन करुन क्षेत्रीय स्तरावरील संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांनी असे परवाने देण्याची कार्यवाही करावी व याबाबतच्या प्रक्रिये संबंधी पूर्वी दिलेल्या सूचना एकत्रितपणे पुन्हा स्पष्ट करण्यात येत आहे.

ब) १) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील तरतूदीनुसार गौण खनिजासाठी अर्ज व त्याबाबतचे प्रक्रिया शुल्क भरुन देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

२) सदर नियमाच्या नियम ५९ खाली गौण खनिज परवाना देण्यासाठी सक्षम प्राधिकारी यांनी अर्ज प्राप्त झाल्याच्या ३० दिवसाच्या आत परवाने निर्गमित करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

३) तसेच सदर नियमानुसार अल्प / तात्पुरत्या मुदतीचे परवाने देण्यास सक्षम असलेल्या सक्षम प्राधिकारी यांनी ज्या क्षेत्रातून परवाना देत आहे ते क्षेत्र जिल्हा खाणकाम योजनेत अंतर्भाव करण्यात आले असल्याचे खात्री केल्यानंतरच परवाने देण्याची कार्यवाही करावी.

४) मुख्य नियम-४६ मधील उपनियम (१) अन्वये जमिनीच्या भूखंडाचा विकास करताना नियोजन प्राधिकरणाने मंजूर केलेल्या भूखंडाचा विकास आराखडा/बांधकाम परवाना यामध्ये अंतर्भूत गौण खनिज उत्खननाचे परिमाण, इत्यादी बाबी विचारात घेऊन स्वामित्वधनाची आकारणी करण्यात यावी.

५) गौण खनिजाचे अल्प / तात्पुरते परवाना देण्यास सक्षम असलेल्या अधिकारी यांनी खालीलप्रमाणे परिमाण विचारात घेऊनच आदेश निर्गमित करण्यात यावेत :-

अ.क्र.	**सक्षम प्राधिकारी**	**परिमाण (ब्रास)**
१	तहसिलदार	५००
२	उप विभागीय अधिकारी	२०००
३	जिल्हाधिकारी	१. २५००० २. अधिसूचीत केलेल्या कोणत्याही महत्वाच्या सार्वजनिक प्रकल्पासाठी १००००० पेक्षा अधिक नाही.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२२१०१३१८१५२६९११९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAMESH SHIVAJI CHAVAN

Digitally signed by RAMESH SHIVAJI CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7ada4e8fa11566f3b9c9f7b5fa123945d54f8e3d5b09d05bedfa09b97ee45cad, pseudonym=8681E76138CFE5A3E889AB0B442F95DD2288C273, serialNumber=EB458B05E05EE27F435BD399537405D44E1C88021CF038B060AC10B9D8FB8787, cn=RAMESH SHIVAJI CHAVAN
Date: 2022.10.13 18:22:48 +05'30'

(रमेश चव्हाण)
शासनाचे सह सचिव

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. विधानसभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ, मुंबई.
४. मा. विधानपरिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ, मुंबई
५. मा.मंत्री, महसूल यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व मा. मंत्री /मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. सर्व मा. विधानसभा / विधानपरिषद सदस्य.
९) सर्व मंत्रालयीन विभाग
१०. सर्व विभागीय आयुक्त.
११. सर्व जिल्हाधिकारी.
१२. सर्व उपविभागीय अधिकारी.
१३. सर्व तहसिलदार.
१४. संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
१५. निवडनस्ती.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. डीएमएफ-०६२१/प्र.क्र.५७/उ-९
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २१ नोव्हेंबर, २०२२

वाचा: १. केंद्रिय खाण मंत्रालय यांचे आदेश क्र.१६.०७.२०१५/एन, V। (पार्ट) दि.१६.०९.२०१५
२. शासन निर्णय क्र. एमडिएफ-०६१५/प्र.क्र.३४/उ-९, दि.०१.०९.२०१६

प्रस्तावना :-

खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम १९५७ च्या कलम ९ (ब) उपकलम १ च्या तरतूदीनूसार राज्य शासनद्वारे खाण बाधीत क्षेत्र व व्यक्तींच्या विकासाकरीता प्रत्येक जिल्हयाकरीता (बृन्हमुंबई वगळून) शासन अधिसूचना दि.०१.०९.२०१६ अन्वये जिल्हा खनिज विकास प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली आहे.

केंद्र शासनाने प्रस्तुत विषयी जाणिवपूर्वक निर्णय घेवून देशातील सर्व राज्यामधील खनिज विकास प्रतिष्ठानमार्फत खाण बाधीत क्षेत्र व व्यक्तींच्या विकासाकरीता एकवाक्यता रहावी व अशा कार्यक्रमामध्ये सामाजिक विकास व मूलभूत गरजा तेथील लोकसंख्या व बाधीत क्षेत्राच्या स्थानिक गरजा लक्षात घेवून प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना, जिल्हा खनिज विकास प्रतिष्ठान अंतर्गत निधीमधून राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना संदर्भाधीन दि.१६.०९.२०१५ च्या पत्रान्वये सर्व राज्यांना निर्देश दिले आहेत. तसेच प्रस्तुत सूचना खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम १९५७ च्या कलम २० (अ) च्या तरतूदीनुसार राष्ट्रीयहित लक्षात घेवून केंद्र शासनाने राज्य शासनास प्रस्तुत प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना राबविणे व त्यानुषंगाने मार्गदर्शक सूचना जिल्हा, खनिज प्रतिष्ठानच्या नियमावलीमध्ये अंतर्भूत करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

शासन निर्णय :

प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना संबंधित जिल्हयाच्या खनिज प्रतिष्ठान निधीमधून राबविण्यात यावी. प्रस्तुत प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेचे सर्वसाधारण उदिष्ट खालीलप्रमाणे राहिल :-

अ) खाण बाधीत क्षेत्र व व्यक्तींच्या विकास व कल्याणाकरीता विविध प्रकल्प, कार्यक्रम राबविणे व सदर कार्यक्रम/ प्रकल्प केंद्र/राज्य शासनाच्या अस्तित्वातील चालू कार्यक्रम व योजनांना सहाय्यभूत पूरक राहतील.

ब) खनिजयुक्त जिल्हयात खाणकामामुळे व त्यानंतर खाणकामाशी निगडीत झालेल्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कृतीमुळे स्थानिक नागरीकांवर झालेले आरोग्य, पर्यावरणीय व सामाजिक व आर्थिक परिस्थितीवरील आघात/ परिणाम कमी करणे व त्यावर उपाययोजना करणे.

क) खाण बाधित क्षेत्रातील व्यक्तींना दिर्घ मूदतीचे शाश्वत उपजिविकेचे साधन उपलब्ध करून देणे.

ड) खाणबाधित क्षेत्रातील शैक्षणिक मागासलेपण दुर करणे व शैक्षणिक प्रगतीकरीता उपाययोजना करणे.

२. प्रस्तुत प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेचे मार्गदर्शक तत्वे खालीलप्रमाणे राहतील :-

प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना करीता बाधित क्षेत्र व व्यक्तींची निवडीचे निकष:-

२.१ बाधित क्षेत्र:-

अ) प्रत्यक्ष बाधित क्षेत्र- ज्या ठिकाणी खनिकर्म/खाणकामाशी निगडीत पुढील कृती केल्या जातात जसे, उत्खनन, खनिकर्म, सुरूंग विस्फोट व कचरा विसर्जन (डम्पस्, तळे, वाहतूक इ.)

I. खाण चालू असलेल्या क्षेत्रातील गावे व ग्रामपंचायती. (सदर खाण क्षेत्रालगतचे गांव, तालुका, जिल्हा व राज्याच्या हद्दीपर्यंत राहू शकेल.)

II. एखाद्या खाण व खाणसमूहाच्या परिसरातील राज्य शासनाने निश्चित केलेले क्षेत्र, असे क्षेत्र (या प्रयोजनासाठी खाण अथवा डम्पस् पासून १० कि.मी. त्रिज्येचे क्षेत्र) त्याच जिल्ह्यात असेल अथवा लगतच्या जिल्हयातील असेल.

III. खाण क्षेत्राशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष निगडीत असल्याने विस्थापित झालेल्या व्यक्तिंचे पुनर्वसीत झालेल्या कुटुंबाची गावे.

IV. खनिकर्म क्षेत्रामधून आपले आर्थिक गरजा भागविण्यासाठी परंपरागत हक्क जसे चराई, गौण वन उत्पादनांचे संकलन इ. कामे ज्या गावांमधून केले जातात, अशी गावे प्रत्यक्ष बाधीत क्षेत्र म्हणून गणण्यात येतील.

ब) अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र :- ज्या क्षेत्रातील स्थानिक रहिवाशी खाणकामाशी संबंधीत सर्व कृतिंमुळे आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय दुष्पपरिणामांचा/ समस्यांचा सामना करीत आहेत व या विपरीत परिणामांमध्ये प्रामुख्याने पाणी,जमीन व हवा यामध्ये होणारे प्रदुषण आणि त्यामुळे या घटकांची खालावणारी गुणवत्ता, तसेच स्थानिक नैसर्गिक संसाधने व मुलभूत व्यवस्थेवर पडणारा अतिरिक्त भार यांचा समावेश होतो.

क) जिल्हा खनिज प्रतिष्ठान अशा खाणबाधित प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष क्षेत्र व गावांची प्रतिवर्षी माहे-जानेवारी मध्ये यादी तयार करेल व ती वेळोवेळी अद्ययावत करेल.

२.२ **बाधित व्यक्ती :-**

अ) प्रत्यक्ष बाधित व्यक्तींमध्ये समाविष्ट बाबी / घटक खालीलप्रमाणे :

१. <u>बाधित कुटुंब</u> :- भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना **वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम ३ (क)** अन्वये व्याख्या केलेले कुटुंब.

२. <u>विस्थापित कुटुंब</u> :- भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना **वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम ३(क) अन्वये कलम ३ (१२)** अन्वये व्याख्या केलेले कुटुंब.

ब) खाणकाम परिसरात ज्या जमिनीवर संबंधित व्यक्तीचा कायदेशीर, व्यावसायिक आणि परंपरागत हक्क आहे अशा व्यक्तींचा खाणबाधित व्यक्तींमध्ये समावेश असेल.

क) बाधित कुटुंबाची निवड संबंधित क्षेत्रातील ग्रामसभा / स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेमार्फत करण्यात यावी.

ड) जिल्हा खनिज प्रतिष्ठानमार्फत प्रतिवर्षी माहे-जानेवारी मध्ये बाधित कुटुंबाची यादी वेळोवेळी तयार केली जाईल व ती वेळोवेळी अद्ययावत केली जाईल.

२.३ ग्रामसभेने निवड केलेल्या अन्य पात्र व्यक्ती

३. निधीचा विनियोग :-

३.१ <u>प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेची व्याप्ती :-</u>

प्रस्तुत योजनेमध्ये खालील घटकांचा समावेश असेल:-

प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेमधील प्रत्यक्ष खाण बाधित क्षेत्रामध्ये एकूण निधीच्या किमान २/३ निधी खर्च करण्यात यावा व उर्वरित कमाल १/३ निधी अप्रत्यक्ष खाण बाधित क्षेत्रात खर्च करण्यात यावा. प्रस्तुत योजनेत खाण बाधित क्षेत्र व व्यक्तींचा विकास करताना हाती घ्यावयाच्या बाबी पुढीलप्रमाणे :-

I) **उच्च प्राथमिक बाबी** :- ज्या ठिकाणी योजनेतील किमान ६०% निधी खालील बाबींवर खर्च करण्यात येईल.

१. **<u>आरोग्य</u> :-** खाण बाधित क्षेत्रातील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष बाधित व्यक्तींना अधिकाधिक आरोग्य सुविधा पुरविणे हे उद्दिष्ट असावे. यामध्ये केवळ आरोग्यविषयक पायाभूत सुविधांच्या निर्मितीसह आवश्यक मनुष्यबळ, साधन साहित्य देखील पुरविण्यात यावे. याद्वारे निर्माण करण्यात येणाऱ्या सुविधा स्थानिक प्रशासन, राज्य व केंद्र शासन यांच्याद्वारे निर्माण केलेल्या अस्तित्वातील आरोग्य सुविधाला सहाय्यभूत असतील. तसेच माता व बाल आरोग्य कुपोषण व संसर्गजन्य आजार यांच्याशी निगडीत उपाययोजना घेता येतील. सार्वजनिक ठिकाणाची स्वच्छता, मल निस्सारण प्रक्रिया केंद्र, सार्वजनिक स्वच्छतागृहे. खाणकामाशी निगडित आजार व रोगांवर उपाययोजना करण्याकरीता नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मायनर्स हेल्थ (National Institute of Miner◦s Health) यांच्याकडील तांत्रिक सहाय्य घेवून विशेष सूविधा निर्माण करता येतील. खाण बाधित व्यक्तींचा गट आरोग्य विमा योजनेची अंमलबजावणी करता येईल.

<u>२) शिक्षण :-</u> यामध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये सुलभ शौचालय उभारणे, शाळेची इमारत/ वर्गखोल्यांचे बांधकाम व दुरूस्ती, प्रयोगशाळा, वाचनालय, कलावर्ग, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा, शिक्षक व विद्यार्थ्याकरीता निवासी वसतिगृह, क्रिडा सुविधा, शिक्षक व

अन्य सहायभूत कर्मचारी यांच्या सेवा, ई-शिक्षण सुविधा, अन्य परिवहन सुविधा जसे बस/ सायकल/ रिक्षा/इ., पोषणआहार निगडित कार्यक्रम.

३) **<u>पर्यावरण, संवर्धन व प्रदुषण नियंत्रण उपाययोजना</u>** :- सांडपाणी प्रक्रिया केंद्र तलाव भूजल नाले व अन्य जल स्त्रोतांच्या प्रदूषण नियंत्रण खाणकाम व डम्पस् च्य कृतीमुळे त्या क्षेत्रात होणाऱ्या वायू व जल प्रदूषण कमी करणे, खाण सांडपाणी व्यवस्था, पर्यावरण सुलभ व शाश्वत खाण विकासाकरीता चालु व बंद खाणीतील जल, वायु व जमिन प्रदूषण नियंत्रण उपाययोजना व खाण प्रदूषण तंत्रज्ञान आणि उपाययोजना तसेच कच-याचे संकलन, वाहतूक आणि विल्हेवाट व इतर आनुषंगिक सुविधा

४) **<u>इतर</u> :-**

अ) पिण्याचे पाणी पुरवठा- केंद्रिभूत जलशुध्दीकरण यंत्रणा, जलप्रक्रिया केंद्र, तात्पुरती / शाश्वत जल वितरण सुविधा ज्यामध्ये एकल पाणी पुरवठा योजनेचा समावेश असेल, जल वितरण पाईपलाईन टाकणे.

ब) महिला व बालकल्याण :- प्रस्तुत योजनेअंतर्गत माता व बाल आरोग्य कुपोषण, संसर्गजन्य आजार यांच्याशी निगडीत उपाययोजना घेता येतील.

क) वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्तींचे कल्याण :- प्रस्तुत योजनेअंतर्गत वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्तीचे कल्याण योजना हाती घेता येतील.

ड) कौशल्य विकास :- स्थानिक पात्र व्यक्तींच्या आर्थिक प्रगती व उत्पन्न वाढीसाठी व उदरनिर्वाहासाठी कौशल्य विकास, प्रकल्प/ योजनांमध्ये प्रशिक्षण, कौशल्य विकास केंद्र, स्वयंरोजगार योजना व स्वयंसहाय्यता गटांना सहाय्य.

II) अन्य प्राथम्य बाबी :-

(ज्या ठिकाणी प्रस्तूत योजनेतील कमाल ४०% निधी खर्च करता येईल.)

१)भौतिक पायाभूत सुविधा :- रस्ते, पुल, रेल्वे व जल वाहतूक प्रकल्प

२)जलसंपदा :- जलसिंचनाचे पर्यायी स्त्रोतांचा विकास करणे, आधुनिक व स्थानिक पर्यावरणाशी सुलभ जलसिंचन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे

३)ऊर्जा व पाणलोट क्षेत्र विकास :- पावसाच्या पाण्याचे साठवणूक करणे व पर्यायी ऊर्जा स्तोत्राचा विकास करणे, फळबाग, अत्याधुनिक एकात्मिक शेती, आर्थिक वनीकरण व पाणलोट क्षेत्राचे पुनर्भरण

४)खनिकर्म जिल्हयातील पर्यावरण दर्जा वाढ करण्याकरिता अन्य उपाययोजना

३.२. सर्वसाधारण मागदर्शक सूचना :-

अ) प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेच्या व्याप्तीमधील अनेक घटक शासनाच्या विविध विभागांशी व विकास योजनांशी संलग्न आहेत. त्यामुळे या अंतर्गत हाती घ्यावयाची कामे संबंधित विभागांनीही नियोजित केलेली असू शकतात. सार्वजनिक संसाधनांचा व निधीचा वापर करताना द्विरूक्ती व अपवय टाळणे, अग्रक्रम ठरविणे आणि आंतरविभागीय समन्वय राखणे आवश्यक आहे. यास्तव या योजनेअंतर्गत हाती घ्यावयाची सर्व कामे मंजूरीपुर्वी राज्यस्तरीय संनियत्रण समितीच्या निदर्शनास आणावीत.

ब) प्रधान मंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेत हाती घ्यावयाचे उपक्रम शक्यतोवर जेथे शक्य असेल तेथे राज्य/ केंद्र शासनाच्या अर्थसहायेत चालू असलेल्या योजना/प्रकल्पांना सहाय्यभूत व परस्पर पुरक राहतील. प्रदुषणास चालना मिळेल असे उपक्रम सदर योजनेअंतर्गत राबविण्यात येऊ नयेत. तथापि, जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या अधिकारास बाधा न आणता राज्यस्तरीय योजना व जिल्हा स्तरीय योजनांमध्ये एकवाक्यता व एकसुत्रता आणली जाईल असे उपक्रम हाती घेतले जातील जेणेकरुन विकास व कल्याण उपक्रमाद्वारे राज्यस्तरीय अर्थसंकल्पीय संसाधनाला अतिरिक्त हातभार लागेल.

क) राज्य शासन विहित करेल अशा कमाल मर्यादेच्या अधिन राहून जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या एकूण वार्षिक जमा रकमेच्या जास्तीत जास्त ५ टक्के रक्कम प्रशासकीय खर्चाकरिता उपयोगात आणता येईल. (कमाल रु.२ कोटी एवढया मर्यादेत) प्रस्तुत योजनेअंतर्गत तात्पुरते/स्थानापन्न पदे निर्माण करणे, तसेच प्रतिष्ठानकरिता/ जिल्हा खनिकर्म कार्यालयाकरिता वाहन खरेदी करणे/ वाहन भाडेतत्त्वार घेणे यासाठी राज्य शासनाची पूर्व परवानगी आवश्यक राहील.

ड) जिल्हा खनिज प्रतिष्ठान/ जिल्हा खनिकर्म कार्यालयाकरिता उपलब्ध होणारे नवीन/ भाडेतत्त्वारील वाहन हे जिल्हा खनिकर्म अधिकारी तथा सदस्य सचिव, नियामक परिषद यांच्या अखत्यारित असेल, तसेच प्रत्येक जिल्हयाकरिता एकच चारचाकी वाहन अनुज्ञेय राहील.

इ) जर एखाद्या जिल्हयातील खाणीचे क्षेत्र अन्य जिल्हयात देखील येत असल्यास अन्य जिल्हयात असलेल्या क्षेत्राच्या टक्केवारीच्या सम प्रमाणात खाण मालकाकडून प्राप्त होणारे अंशदान संबंधीत जिल्हा खनिज प्रतिष्ठानकडे बाधित क्षेत्राच्या विकास कामांसाठी हस्तांतरित करण्यात येईल. एखादया प्रकरणात बाधीत क्षेत्राच्या/व्यक्तिच्या विकासाशी संबंधीत प्रकल्प/ योजना जिल्हयाच्या हददीबाहेर देखील हाती घ्यावयाची झाल्यास राज्य शासनाच्या पुर्वपरवानगी नंतर असा प्रकल्प/ योजना हाती घेता येईल. रस्ते, पुल बांधणी इत्यादी सारखे सर्वसाधारण पायाभूत सुविधा प्रकल्प निधी विनियोगाच्या प्राथम्य क्रमानुसार विहीत आर्थिक मर्यादेच्या पलिकडे

खर्च करावयाचे झाल्यास प्रत्येक प्रकरण परत्वे संबंधित जिल्हयाचे विशेष महत्व लक्षात घेऊन राज्य शासनाच्या पुर्वमान्यतेनेच हाती घेता येईल. **अन्य प्राथम्य बाबी या अंतर्गत खर्च करावयाच्या प्रस्तावांची माहिती केंद्र शासनाला देणे व सदर खर्चास राज्य शासनाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.**

ई) शाश्वत रोजगार निर्मितीसाठी जिल्हा खनिज प्रतिष्ठाणच्या एकुण वार्षिक जमा रकमेपैकी पर्याप्त रक्कम / निधी या प्रयोजनासाठी राखीव निधी म्हणून ठेवण्यात येईल.

३.३. अनुसूचित क्षेत्राकरिता विशेष तरतूद-

प्रधान मंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेच्या अनुसूचित क्षेत्रात अवलंबविण्याची कार्यपध्दती भारतीय संविधानाचे कलम २४४ व त्यासह परिशिष्ठ V व VI मधील अनुसूचित जाती आणि आदिवासी क्षेत्र आणि पंचायत (अनुसूचित क्षेत्राचा विस्तार) अधिनियम १९९६ PESA आणि अनुसूचित जमाती आणि अन्य पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ च्या तरतुदी प्रमाणे राहील.

I) खाण बाधित गावे अनुसुचित क्षेत्रात असल्यास :,

ग्राम सभेची मान्यता खालील बाबींसाठी आवश्यक राहील.

अ) प्रधान मंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेतील सर्व आराखडे, कार्यक्रम व प्रकल्पांना

आ) राज्य शासनाच्या प्रचलित मागदर्शक तत्वाप्रमाणे लाभार्थीची निवड करणे.

II) प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेत हाती घेतलेल्या कामांचा/ प्रकल्पांचा अहवाल प्रत्येक आर्थिक वर्षाच्या समाप्तीनंतर माहे-एप्रिल/ मे मध्ये ग्रामसभेत सादर करण्यात येईल.

(ग्राम सभा म्हणजे पंचायत (अनुसुचित क्षेत्राचा विस्तार) अधिनियम १९९६ (४०/१९९६) च्या तरतूदींच्या अंमलबजावणीच्या उददेषाने अभिप्रेत असलेला अर्थ)

४. करार/कामांची अंमलबजावणी –

१) राज्य शासन विहित करेल त्या पध्दतीने जिल्हा खनिज प्रतिष्ठान वस्तु/कामाचे संपादणूक (procurement) करेल.

२) लाभार्थी व सर्व यंत्रणांना निधीचे वाटप त्यांच्या बँकेच्या खात्यात करण्यात येईल.

५. पारदर्शकतेची पुर्तता-

१) राज्य शासन जिल्हा खनिज प्रतिष्ठानकरिता संगणक संकेतस्थळाची (web site) निर्मिती व व्यवस्थापन करेल व त्यामध्ये खालील माहिती ठेवेल व वेळोवळी अद्ययावत करेल.

i) जिल्हा खनिज प्रतिष्ठानचे संगठण व त्या अंतर्गत विविध शाखा असल्यास,

ii) खाण बाधित क्षेत्र व व्यक्तिंचा तपशिल व यादी.

iii)खाणपटटाधारक व आवश्यकतेनूसार इतरांकडून प्राप्त होणारे एकूण अंशदानाचे तिमाही विवरणपत्र

iv) जिल्हा खनिज प्रतिष्ठाणच्या सर्व बैठक सूची/कार्यवृत्त/इतिवृत्त आणि कार्यपुर्तता अहवाल.

v) वार्षिक आराखडा आणि अर्थसंकल्प कार्यआदेश व वार्षिक अहवाल.

२) चालु कामांची ऑनलाईन स्थिती- प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेतील सर्व प्रकल्प/कार्यक्रमांचे अंमलबजावणीची सदयास्थिती/ प्रगतीचा तपशिल संकेतस्थळावर देण्यात येईल. ज्यामध्ये कामाचे स्वरुप व विवरण, लाभार्थीची यादी, प्रस्तावित किंमत अंमलबजावणी यंत्रणा काम चालू व समाप्तीचा अपेक्षित कालावधी/ दिनांक, गत तिमाहीचा भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल.

३) जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष बाधीत क्षेत्र आणि व्यक्तिंच्या कल्याणाकरिता/ विकासाकरिता मंजूर करण्यात आलेले प्रकल्प, कामे इत्यादींना वितरीत करावयाच्या निधी हा तीन टप्प्यात वितरीत करण्यात यावा, त्यानुसार मंजूर प्रकल्प/ कामे इत्यादींना संबंधीत यंत्रणांकडून प्रशासकिय मान्यता प्राप्त झालेनंतर मंजूर निधीच्या प्रथम टप्पा २० %, दुसरा टप्पा ५०% व तिसरा आणि अंतिम टप्पा ३०% याप्रमाणे वितरीत करण्यात यावा.

४) जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष बाधीत क्षेत्र आणि व्यक्तिंच्या कल्याणाकरिता/ विकासाकरिता मंजूर करण्यात आलेले प्रकल्प, कामे इत्यादी विहित कार्यपध्दीनूसार करण्यात आले आहेत किंवा कसे? याबाबत संबंधीत जिल्हा खनिकर्म अधिकारी तथा सदस्य सचिव यांनी प्रत्यक्ष खात्री करावी. योजनेंतर्गत कामे/ प्रकल्पांकरिता भौगोलिक स्थानदर्शक चिन्हाचा (Geo-tagging) वापर करावा जिल्हा खनिकर्म अधिकारी तथा सदस्य सचिव यांच्या खात्रीनंतर संबंधीत प्रकल्प/ कामे इत्यांदीचे निधी वितरण करण्याची दक्षता घेण्यात यावी.

६. लेखा परीक्षण-

प्रति वर्ष माहे एप्रिल/ मे मध्ये जिल्हा खनिज प्रतिष्ठाणचे लेखे प्रतिष्ठाण तर्फे नियुक्त सनदी लेखापालाकडून अथवा राज्य शासन विहित करेल अशा पध्दतीने लेखापरिक्षण करेल व त्याचा अहवाल तसेच वार्षिक अहवाल जिल्हयातील नागरीकांस माहितीस्तव उपलब्ध करण्यात येईल.

७. वार्षिक अहवाल व वार्षिक लेखा परिक्षण-

अ) जिल्हा खनिज प्रतिष्ठान प्रति वर्ष आर्थिक वर्ष समाप्तीच्या तीन महिन्याच्या आत (माहे जून पर्यंत) संबंधीत वर्ष भरातील उपक्रमांचा/ प्रकल्पांचा वार्षिक अहवाल तयार करेल व जिल्हा खनिज प्रतिष्ठान / नियामक परिषदेच्या समोर ठेवेल.

आ) जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या मान्यतेनंतर एक महिन्यात वार्षिक अहवाल राज्य शासनास सादर करण्यात येईल, तसेच संगणक संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देण्यात येईल.

इ) प्रत्येक जिल्हा खनिज प्रतिष्ठानचा वार्षिक अहवाल राज्य विधीमंडळास सादर करण्यात येईल.

उपरोक्त मार्गदर्शक सूचनांप्रमाणे सर्व जिल्हा खनिज प्रतिष्ठाण यानी प्रस्तुत योजनेची अंमलबजावणी करावी व विवक्षीत मुद्यांबाबत स्पष्टीकरण हवे असल्यास राज्य शासनास संदर्भ करण्यात यावा.

उपरोक्त शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळा वर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याचा संगणक संकेताक २०२२११२११७३७१५२५१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,

(रविंद्र गुरव)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ सचिवालय,मुंबई-३२
५) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२
६) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२
७) मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२
८) मा.मंत्री (उदयोग व खनिकर्म), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
९) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
१०) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर
११) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र खनिकर्म महामंडळ, नागपूर
१२) सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, खनिकर्म शाखा, संबंधित जिल्हा.

खडी क्रशर धारक यांनी गौण खनिजाच्या अनुषंगाने महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ अन्वये व्यापारी परवाना घेणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्र.गौखनि-१०/०२२३/प्र.क्र.२४/ख-२

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय मुंबई-३२
दिनांक :- ०९ मे, २०२३

संदर्भ : महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३

प्रस्तावना:-

खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम,१९५७ (१९५० च्या ६७) च्या कलम १५(१)(३) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ तयार करून दिनांक १९.०८.२०१३ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील प्रकरण सहा नुसार/मध्ये गौण खनिजाचा साठा व विक्री करणेसाठी व्यापारी परवाना घेणेबाबतची तरतूद नियम ७१ ते ७८ मध्ये करण्यात आलेली आहे.

राज्यात गौण खनिजाचे काही प्रमाणात अनधिकृत उत्खनन व वाहतूकीचे प्रकार निदर्शनास आले आहेत. खडी क्रशर युनिटसाठी परवागी उद्योग विभागाच्या अंतर्गत क्षेत्रीय कार्यालयाकडून देण्यात येते. परंतू, अशा खडी क्रशरची नोंद महसूल विभागाकडे होत नसल्याने तेथे वापरलेल्या दगडाच्या परिमाणाची तपासणी करणे शक्य होत नाही. त्यामुळे अवैध उत्खनन व वाहतूकीला प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने व महसुलाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी स्टोन क्रशर/खडी क्रशर धारक याना महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम २०१३ अन्वये व्यापारी परवाना घेणेबाबत बंधनकारक करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम,२०१३ मधील तरतुदीनुसार स्टोन क्रशर/खडी क्रशर धारक यांनी व्यापारी परवाना व इतर अनुषंगीक बाबीसाठी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

(i) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील नियम ७१ नुसार प्रत्येक खडी क्रशर/स्टोन क्रशर धारक यांनी व्यापारी परवाना घेणे बंधनकारक राहील

(ii) खडी क्रशर/स्टोन क्रशर धारक यांनी व्यापारी परवाना घेण्यासाठी "महाखनिज" या संगणक प्रणालीवर ऑनलाईन अर्ज करून व्यापारी परवाना प्राप्त करून घेणे क्रमप्राप्त राहील

(iii) ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यावर सक्षम प्राधिकारी म्हणजे जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम,२०१३ च्या ७२ नुसार तात्काळ कार्यवाही करावी

(iv) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम,२०१३ मधील ४६(२६) व ७८ नुसार गौण खनिजाच्या वाहतूकीसाठी वाहतूक करणाऱ्या वाहणासोबत "वाहतूक परवाना" ठेवणे बंधनकारक राहील.

(v) खडी क्रशर/स्टोन क्रशरसाठी वापरण्यात येणाऱ्या गौण खनिजाच्या वापराबाबत "परिशिष्ट-अ(आवक नोंदवही)" व "परिशिष्ट-ब(जावक नोंदवही)" प्रमाणे नोंदवही ठेवणे बंधनकारक राहील व त्याबाबतचा ताळमेळ वेळोवेळी क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांचेकडून तपासण्यात येईल.

(vi) वाहतूक करणाऱ्या वाहनांना GPS प्रणाली बसवणे बंधनकारक राहील अशा GPS असलेल्या वाहनांची नोंद "महाखनिज" प्रणालीवर करण्यात यावी. GPS प्रणाली नसलेल्या वाहनांची वाहतूक अवैध समजण्यात येईल.

(vii) व्यापारी लायसन्स धारक यानी ज्या ठिकानी स्टोन क्रशर/खडी क्रशर साठी परवाना घेतला असेल /त्या ठिकाणी साठा करण्यासाठीच परवाना घेतला आहे अशा जागा महाखनिज प्रणालीवर Geo fencing करण्यात याव्यात.

(viii) गौण खनिजाचे वाहतूक करताना वाहतूक परवाना पास नसल्यास महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम,२०१३ मधील नियम ७९ नुसार तसेच प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

(ix) सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अमलात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२३०५०९१५०३१८८११९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरिने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SADANAND GOVIND MOHITE

Digitally signed by SADANAND GOVIND MOHITE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9bd0088751b6a3a9fddad3e55fe0328df13a27221cb2bbc67abd0155f914efc01, pseudonym=F9638BC6AD59D767D7C33C1B8350D778425D54B0E, serialNumber=6590E2301450C474B246074049174C79201BCAD9E5EB15E8F21C282EAEFEDA38, cn=SADANAND GOVIND MOHITE
Date: 2023.05.09 15:03:14 +05'30'

(स. गो. मोहिते)

कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई.
३. मा. विधानसभा अध्यक्ष यांचे खासगी सचिव, विधानमंडळ, मुंबई
४. मा. विधानपरिषद सभापती यांचे खासगी सचिव, विधानमंडळ, मुंबई
५. मा.मंत्री (महसूल) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

खडी/स्टोन क्रशरसाठी नोंदवहीचा नमूना

परिशिष्ट-"अ"

आवक नोंदवही

अ.क्र.	दिनांक	गौण खनिजाचे नाव	गौण खनिज कोठून आणले त्याबाबतची माहिती(खाणपट्टा आदेश)	गौण खनिजाचे परिमाण (ब्रास/मे.ट.)	वाहन क्रमांक	eTP नंबर	शिल्लक साठा (Progressive)
१	२	३	४	५	६	७	९

खडी/स्टोन क्रशरसाठी नोंदवहीचा नमूना

परिशिष्ट-"ब"

जावक नोंदवही

अ.क्र.	दिनांक	गौण खनिजाचे नाव	गौण खनिज घेणाऱ्याचे नाव	गौण खनिजाचे परिमाण (ब्रास/मे.ट.)	वाहन क्रमांक	eTP नंबर	गौण खनिज ज्या ठिकाणी पोहच होणार आहे ते ठिकाण	शिल्लक साठा
१	२	३	४	५	६	७	८	९

महाराष्ट्र राज्यातील नागरी व शहरी क्षेत्राच्या लगत वाहणा-या अधिसूचित नद्यांची वहन क्षमता पुन:स्थापित करण्याचे धोरण व कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग,

शासन निर्णय क्रमांक:- नदिगा २०२२/ प्र.क्र. (२९९/२०२२) सिं.व्य.(म),

मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक :- २५ जुलै, २०२३.

<u>प्रस्तावना :</u>

महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ मधील कलम १९,२० व २१ मधील तरतूदीनुसार अधिसुचीत नदी, ओढा किंवा जलनि:स्सारणाचा नैसर्गिक मार्ग यामध्ये होणारे अडथळे दूर करण्याचे अधिकार जलसंपदा विभागास आहेत.

महाराष्ट्र राज्यामध्ये पावसाळयात व बारमाही वाहणाऱ्या प्रमुख नद्या व उपनद्या असून, दरवर्षी पावसाळयात या नद्यांना लहान मोठया प्रमाणात पूर येत असतो. या पूरामुळे आजू-बाजूच्या नागरी व शहरी भागांमध्ये पाणी पसरुन दरवर्षी आर्थिक नुकसान होत असते. या नुकसानीचे पंचनामे करुन शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागामार्फत बाधितांना आर्थिक मदत देखील द्यावी लागते. यामुळे शासनाचे दरवर्षी दोन्ही प्रकारे महसुली नुकसान होत असते.

एकंदरीत जागतिक तापमान वाढीमुळे व पर्यावरणीय बदलामुळे सर्वच ठिकाणी पर्जन्याचे प्रमाण विखुरलेल्या स्वरुपात न होता, केंद्रीत स्वरुपात व कमी कालावधीत ढगफुटी सदृश्य पाऊस पडण्याचे प्रमाण वाढले आहे. या मोठया प्रमाणावर होणाऱ्या पर्जन्यवृष्टीमुळे शहरी भागात पूर परिस्थिती निर्माण होवून, जिवीत व वित्तहानी होण्याचे प्रकार वाढले आहेत. याप्रमाणेच सन २००५, २००६, २०११, २०१९ व २०२२ या वर्षांमध्ये विविध शहरांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली होती.

पावसाळयात पूराच्या पाण्याबरोबर आजू-बाजूच्या डोंगर भागातील भुस्खलनामुळे होणारी माती, दगड, गोटे, रेती असे अनेक पदार्थ वाहून येतात व हळूहळू नदीच्या सखल भागामध्ये जमा होवून अशा गाळाची बेटे तयार होतात. त्यामुळे नदीच्या वहन क्षमतेमध्ये घट होवून, पूराच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी अडथळे निर्माण होतात. तसेच नद्यांच्या पाणलोट क्षेत्रात होणारे शहरीकरण, बांधकामे, वृक्षतोड, रस्ते व रेल्वे वाहतूक इत्यादीसाठी केलेला भराव व खोदकामे यामुळे आजूबाजूचा गाळ पाण्यामध्ये वाहत येवून त्यामुळे नदी पात्र अरुंद व उथळ होत असते. नदी पात्रात अशाप्रकारे तयार झालेले अडथळे काढणेबाबत शासनाचे निश्चित असे कोणतेही धोरण नसल्याने, प्रमुख नद्यांच्या पात्रातील अडथळे दूर करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे बहुतांश नद्यांची वहन क्षमता ही त्यांच्या मुळ क्षमतेपेक्षा कमी झालेली असून त्यामुळे नद्यांच्या शेजारील शहरी भागांमध्ये पर्जन्यमानामुळे पाणी पसरुन पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होते.

राज्यातील अधिसूचीत नद्या व त्यावर बांधलेले पाटबंधारे प्रकल्प हे जलसंपदा विभागांतर्गत ५ विविध पाटबंधारे विकास महामंडळांच्या अखत्यारित आहेत. पाटबंधारे विकास महामंडळ कायद्यातील तरतूदी नुसार पाटबंधारे विकास महामंडळांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील नद्यांचे व

प्रकल्पांचे पूरनियंत्रण व लाभक्षेत्र विकासाच्या योजनांची आखणी, बांधकामे व सिंचन व्यवस्थापन करणे अपेक्षित आहे.

सन २०१९ साली कृष्णा व भिमा खोऱ्यात उद्भवलेल्या पूर परिस्थितीची कारणे शोधणे व भविष्यकालीन उपाययोजना सुचविण्यासाठी शासन निर्णय २३ ऑगस्ट, २०१९ अन्वये श्री. नंदकुमार वडनेरे निवृत्त प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करणेत आली होती. या समितीने केलेल्या एकूण १८ शिफारशींपैकी शासनाने दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ च्या शासन निर्णयाद्वारे ज्या शिफारशी स्विकृत केल्या आहेत, त्यामधील शिफारस क्र. ८ "नदी व मोठे नाले रुंदीकरण करणे, खोलीकरण करणे व त्यातील गाळ काढणे, नदीला पूर संरक्षक बांध घालणे, नदी सरळीकरण कामे" ही शिफारस अंशत: स्विकृत केली असून, त्याची कार्यवाही महसूल विभाग, नगर विकास विभाग, जलसंपदा विभाग यांच्या समन्वयाने करण्याचे शासन निर्णयामध्ये नमूद आहे.

दिनांक २२ व २३ जुलै, २०२१ रोजी रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण शहराला वाशिष्ठी नदीला आलेल्या पुरामुळे सलग दोन दिवस पूर परिस्थितीशी सामना करावा लागला. यावर उपाययोजना म्हणून स्थानिक लोक प्रतिनिधी व चिपळूण बचाव समिती यांची आग्रही मागणी व आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने वाशिष्ठी नदीचा गाळ काढण्याचे काम दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी संघटनेमार्फत हाती घेतले होते व सन २०२२ च्या पावसाळयाची सुरुवात होण्यापर्यंत बहुतांश काम पूर्ण केले होते. त्यामुळे सन २०२२ च्या पावसाळयामध्ये चिपळूण शहराला पूर परिस्थितीचा सामना करावा लागला नाही.

शासन निर्णय क्रमांक पूसंभि -२०१९/(प्र.क्र.११५/२०१९)/सिं.व्य.(म), दिनांक ३१ ऑगस्ट, २०१९ नुसार जलसंपदा विभागाने पुरसंरक्षक कामांना प्रशासकीय मान्यता देणेबाबतचे सुधारित धोरण निश्चित केले आहे. यामध्ये प्रामुख्याने नदी/नाला काठावर माती भराव करणे, दगडी/ संधानक अस्तरीकरण करणे, संधानकातील आधार भिंत/Retaining wall बांधणे, नदी/नाला प्रवाहाला उचित दिशा देणे इत्यादी कामांचा समावेश आहे.

त्याचबरोबरीने पूरसंरक्षणासाठी काही नद्या व उपनद्या यांच्या वहनमार्गातील अडथळे दूर करणे देखील आवश्यक झाले असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. या कामाचा उद्देश साठलेल्या गाळामुळे / बेटांमुळे नदीच्या विसर्गाला होणारा अडथळा दूर करणे व नदीची विसर्ग क्षमता वाढविणे हा आहे, जेणेकरुन येणारा पूर हा नदीचा काठ सोडून आजू-बाजूच्या नागरी वस्तीच्या परिसरात पसरु शकणार नाही.

नदी,नाल्यांच्या पूर विसर्गामुळे घरे, रस्ते, लोकवस्ती, कारखाने, उद्योग, शेत जमीनी इत्यादी पाण्याखाली बुडतात. नदीच्या कमी वहन क्षमतेमुळे पुराचा कालावधीही वाढतो. त्यामुळे होणारी वित्त व जिवित हानी टाळण्यासाठी पूर प्रतिबंधक योजना म्हणून नद्यांच्या वहन मार्गातील अडथळे दूर करण्याची योजना राबविणे क्रमप्राप्त झालेले आहे.

मध्यंतरीच्या काळात राष्ट्रीय हरित लवाद वेस्टर्न झोन, पुणे बेंच यांनी M.A. ७८/२०१८ (WZ) in Appeal No.२५/२०१४ (WZ) सारंग यादवाडकर विरुध्द महाराष्ट्र शासन या न्यायालयीन

प्रकरणात असे आदेश पारित केले होते की, पूर प्रवण क्षेत्रातील शहरी/ नागरी व इतर भागात निळी पूररेषा आखण्यात यावी.

सदर निर्णयाच्या अनुषंगाने आढावा घेतला असता, राज्यातील प्रमुख नद्यांच्या लांबीपैकी शहरी/नागरी वसाहतीतून प्रवाहीत होणा-या एकूण १६४८.८३ कि.मी. लांबीमध्ये लाल व निळया पूर रेषांची आखणी करण्यात आली आहे व त्याची माहिती जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर दर्शविण्यात आली आहे. त्यामुळे सदर माहितीच्या आधारे शहरी/नागरी वसाहती असल्याने या ठिकाणी जिवित/वित्त हानी मोठया प्रमाणात होण्याची शक्यता विचारात घेता, या धोरणांतर्गत याच १६४८.८३ कि.मी. पैकी ज्या लांबीमध्ये गाळ साठून नद्यांच्या प्रवाहामध्ये मोठया प्रमाणात अडथळे निर्माण झालेले आहेत अशा भागांमधून प्रथम टप्प्यात गाळ काढण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

उपरोक्त पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील प्रमुख शहरालगत वाहणाऱ्या व त्यांचेमुळे वारंवार पूर परिस्थिती उद्भवणाऱ्या नद्यांमधील अडथळे दूर करण्याचे धोरण ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने दिनांक २८.०६.२०२३ रोजी झालेल्या मा. मंत्रीमंडळ बैठकीत याविषयी सर्वांगीण चर्चा व विचारविनिमय करुन आता पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्याच्या पूरप्रवण क्षेत्रातील बाधित शहरातून वाहणा-या नद्यांमधील पुराचा प्रभाव कमी करण्याच्या दृष्टीने तसेच नद्यांची वहन क्षमता पुन:स्थापित करण्याच्या दृष्टीने नदी पात्रातील गाळ व राडारोडा तसेच नदी पात्रात गाळामुळे निर्माण झालेली बेटे, नदीपात्रातील अडथळे इत्यादी (इथून पुढे या सर्वांना " वहन मार्गातील अडथळा" असे संबोधण्यात येत आहे) निष्कासित करण्याची कार्यवाही जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील यांत्रिकी संघटनेमार्फत/ अशासकीय संस्थेच्या मदतीने (NGO)/ खाजगी कंपन्यांकडून CSR फंडातून करण्यात यावी. त्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे:-

प्रशासकीय मान्यतेची कार्यपध्दती :-

१) " वहन मार्गातील अडथळा" काढण्याची कार्यवाही जलसंपदा विभागाने अधिसूचीत केलेल्या सोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये दर्शविण्यात आलेल्या विविध नद्यांमधील एकूण १६४८.८३ कि.मी. लांबीपैकी ज्या लांबीमध्ये गाळ साठून नद्यांच्या प्रवाहामध्ये मोठया प्रमाणात अडथळे निर्माण झालेले आहेत, त्या लांबीमध्येच प्रथम टप्प्यांत करण्यात यावी.

२) गाळ काढावयाच्या अधिसूचीत असलेल्या नद्या व पूरप्रवण क्षेत्रामध्ये सर्वप्रथम लाल व निळया पूररेषांचे सर्व्हेक्षण करुन पूररेषा नकाशांना मुख्य अभियंता स्तरावर मान्यता घेऊन अशा पुररेषा विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द कराव्यात व त्यानुसार क्षेत्रिय स्तरावर पूर रेषांची आखणी करण्यात आली असल्याची खात्री जलसंपदा विभागाच्या स्थानिक अधिका-यांनी करावी.

३) परिशिष्ट-१ मध्ये दर्शविण्यात आलेल्या नद्यांच्या लांबीपैकी ज्या लांबीमध्ये गाळ काढावयाचा आहे त्या लांबीमधील नदी पात्राचे सर्वेक्षण जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता यांनी करावे.

४) वहन मार्गातील अडथळा दूर करण्याच्या कामांकरीता संबंधित जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती गठित करावी :-

१.	जिल्हाधिकारी	अध्यक्ष
२.	वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजलसर्वेक्षण व विकास यंत्रणा	सदस्य
३.	उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ	सदस्य
४.	जिल्हा खनिकर्म अधिकारी	सदस्य
५.	जिल्हा जलसंधारण अधिकारी,मृद व जलसंधारण विभाग	सदस्य
६.	आयुक्त/उपायुक्त -- स्थानिक महानगरपालिका/ मुख्याधिकारी- नगरपालिका	सदस्य
७.	कार्यकारी अभियंता (यांत्रिकी), यांत्रिकी विभाग, जलसंपदा विभाग	सदस्य
८.	महसूल यंत्रणेकडील उपविभागीय अधिकारी/ तहसिलदार	सदस्य
९.	उप वनसंरक्षक अधिकारी	सदस्य
१०.	आय.आय.टी किंवा शासकीय इंजिनिअरिंग कॉलेज येथील स्थापत्य विभागातील एक प्राध्यापक.	सदस्य
११.	अशासकीय संस्थेचे दोन सभासद	सदस्य
१२.	कार्यकारी अभियंता (स्थापत्य), जलसंपदा विभाग	सदस्य सचिव

<u>समितीची कार्यकक्षा</u> :-

i. समितीच्या सदस्यांनी नदीपात्राची प्रत्यक्ष पाहणी करुन कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार नदी पात्रातील गाळ साठलेल्या भागाची लांबी व गाळाचे परिमाण तसेच निष्कासित केलेल्या गाळाची विल्हेवाट कोणत्या जागेवर करावी याबाबतचा अहवाल समितीचे अध्यक्ष यांच्याकडे सादर करावा.

ii. पूराच्या तीव्रतेचा विचार करुन गाळ काढण्याच्या कामाचे प्राधान्यक्रम निश्चित करणे.

iii. नदीपात्रातील गाळ साठलेल्या भागाची लांबी व गाळाचे परिमाण निश्चित करणे.

iv. निष्कासित गाळाची विल्हेवाट करावयाचे ठिकाण निश्चित करणे.

v. सदर उपाययोजनेमुळे पुर परिस्थिती निवळण्यासाठी किती मदत होणार आहे याबाबत सर्वंकष अभ्यास करणे.

vi. जिल्हाधिकारी यांनी या अहवालाच्या अनुषंगाने आपत्कालीन व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम (३०) चा वापर करुन नदीतील गाळ काढण्याच्या कामास ठरावाद्वारे मान्यता द्यावी.

vii. अशासकीय संस्था (NGOs) यांची सूचिबध्द यादी (Empanelled List) धर्मदाय आयुक्त (Charity Commissioner) यांच्या सहकार्याने निश्चित करावी.

viii. जलसंपदा विभागाची यांत्रिकी संघटना, अशासकीय संस्था (NGO) तसेच खाजगी कंपन्यांकडून (CSR) मार्फत करण्यात आलेल्या कामांचे मुल्यमापन / मोजमाप यावर संनियंत्रण करणे .

ix. याव्यतिरिक्त या शासन निर्णयातील मुद्या क्रमांक इ(२) मध्ये नमूद सर्व बाबींचे संनियंत्रण सदर समितीने करावे.

५) नदी पात्रातील गाळ निष्कासित करण्याचे परिमाण निश्चित झाल्यानंतर गाळ काढण्यासाठी जलसंपदा विभागांतर्गत प्रचलित पध्दतीनुसार अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही जलसंपदा विभागाच्या क्षेत्रिय कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांनी करावी.

६) या अंदाजपत्रकासह नदी पात्रातील अडथळे काढण्यासाठीचा प्रस्ताव तयार करुन त्याची तपासणी शासन निर्णय पुसंभि २०१९/प्र.क्र. (११५/२०१९)/सिं.व्य.(म), दिनांक ३१.०८.२०१९ मधील तरतूदीनुसार करुन तो प्रस्ताव शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी संबंधित महामंडळाने सादर करावा.

७) अशा प्रस्तावांना "४७११- पूर संरक्षक कामे" या लेखाशिर्षाखाली शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्रमांक- पुसंभि २०१९/(प्र.क्र.११५/२०१९)/सिं.व्य.(म), दिनांक ३१.०८.२०१९ मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिका-यांची मान्यता घेऊन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात यावी.

ब) <u>प्रत्यक्ष गाळ काढण्याची कार्यपध्दती</u> :

१) सदर कामाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर नदी पात्रातील गाळ काढण्याची कार्यवाही जलसंपदा विभागांतर्गत यांत्रिकी संघटनेमार्फत हाती घेण्यात यावी. सद्य:स्थितीत जलसंपदा विभागांतर्गत यांत्रिकी संघटनेकडे उपलब्ध असलेली यंत्रसामुग्री ही जलसंपदा विभागाच्या नियमित कामासाठी आवश्यक असल्यामुळे या धोरणानुसार नदीतील गाळ काढण्याची कार्यवाही यांत्रिकी संघटनेने खालील पर्यायांचा अवलंब करुन करावी :-

(i) <u>यांत्रिकी संघटनेने नवीन यंत्रसामुग्री खरेदी करुन त्याद्वारे गाळ काढणे</u> :-

- नदी पात्रातील गाळ काढण्याची कार्यवाही शासन निर्णयाच्या दिनांकापासून ५ वर्षात टप्प्याटप्प्याने प्राधान्यक्रम ठरवून पूर्ण करावयाची आहे. सदर काम ५ वर्षात पूर्ण करावयाचे असल्यामुळे जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी संघटनेच्या मुख्य अभियंता यांनी त्यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री खरेदी करण्याची कार्यवाही या शासन निर्णयाच्या दिनांकापासून सहा महिन्यात करावी.
- सदर यंत्रसामुग्रीची खरेदी करण्यासाठी यांत्रिकी संघटनेमार्फत स्वतंत्रपणे प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.
- सदर मशिनरीच्या देखभाल व दुरुस्तीकरीता "मुख्य लेखाशिर्ष ४७०१, ५२- यंत्रसामुग्री व साधनसामुग्री " या लेखाशिर्षाखाली तरतूद करण्यात यावी.
- सदर कामासाठी आवश्यक मनुष्यबळ कमी पडत असल्यास प्रचलित पध्दतीनुसार कंत्राटी स्वरुपात मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यात यावे.

(ii) <u>अशासकीय संस्थेच्या (NGO) मदतीने गाळ काढणे</u> :-

- सदर काम अधिक जलदगतीने पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून काही ठिकाणी काही अशासकीय संस्थांना (NGO) मदतीला घेण्याचे प्रयत्न करण्यात यावेत. अशा प्रकरणांमध्ये जर अशासकीय संस्था यंत्रसामुग्री (परिचालनासाठी आवश्यक मनुष्यबळासह) तसेच त्यासाठी लागणारे पेट्रोल, तेल, वंगण या

सर्वांची उपलब्धता करुन देत असेल, तर त्यांना तसे काम क्षेत्रिय कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांच्या देखरेखीखाली करण्यास परवानगी देण्यात यावी. जर अशा अशासकीय संस्था केवळ यंत्रसामुग्री व परिचालनासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देत असेल, तर त्यासाठी लागणा-या पेट्रोल, तेल, वंगण (POL) जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) यांचेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल व याबाबतचा खर्च "४७११- पूर संरक्षक कामे" या लेखाशिर्षांतर्गत करण्यात यावा. त्यांनी केलेल्या कामांचे प्रमाणपत्र कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांनी त्यांच्या स्तरावर देण्यात यावे.

(iii) <u>खाजगी कंपन्यांकडून Corporate Social Responsibility fund (CSR) अंतर्गत गाळ काढणे</u> :-

- सदर काम अधिक जलदगतीने पुर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून काही ठिकाणी खाजगी कंपन्यांकडून CSR अंतर्गत अशा कामांसाठी मदत घेण्याचे प्रयत्न करावेत. अशा प्रकरणांमध्ये जर खाजगी कंपनी CSR अंतर्गत यंत्रसामुग्री (परिचालनासाठी आवश्यक मनुष्यबळासह) तसेच त्यासाठी लागणारे पेट्रोल, तेल, वंगण या सर्वांची उपलब्धता करुन देत असेल, तर त्यांना तसे काम क्षेत्रिय कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांच्या देखरेखीखाली करण्यास परवानगी देण्यात यावी. जर अशा खाजगी कंपन्या केवळ यंत्रसामुग्री व परिचालनासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देत असेल, तर त्यासाठी लागणा-या पेट्रोल, तेल, वंगण (POL) जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) यांचेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल व याबाबतचा खर्च "४७११- पूर संरक्षक कामे" या लेखाशिर्षांतर्गत करण्यात यावा. त्यांनी केलेल्या कामांचे प्रमाणपत्र कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांनी त्यांच्या स्तरावर देण्यात यावे.

२) उपरोक्त प्रमाणे निश्चित केलेल्या पर्यायास अनुसरुन प्रत्यक्ष गाळ काढण्याची कार्यवाही संबंधित कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचे देखरेखीखाली करण्यात यावी.

क) <u>काढलेल्या गाळाची विल्हेवाट लावणेबाबतची कार्यपध्दती</u>:-

१) जलसंपदा विभागामार्फत फक्त नदी पात्रातून गाळ काढण्याची कार्यवाही अपेक्षित असून त्याची विल्हेवाट/लिलाव/वापर व त्याचा हिशोब याबाबतची कार्यवाही महसूल विभागामार्फत करण्यात येईल.

२) जलसंपदा विभागामार्फत नदी पात्रातील काढलेल्या गाळाचा साठा करण्यासाठी महसूल विभागाने शासकीय अथवा खाजगी जागा मोफत उपलब्ध करुन द्यावी.

३) गाळ काढणेत येणा-या नद्यांमध्ये जर खाजगी बेटे असतील, तर त्याबाबत संबंधीतांची संमती/परवानगी प्राप्त करणेची कार्यवाही महसूल विभागामार्फत करण्यात यावी.

४) काढण्यात येणारा गाळ स्थानिक शेतकरी त्यांच्या शेतामध्ये स्वखर्चाने वाहून नेण्यास तयार असतील, तर त्यांना स्वामित्वधन अदा करण्यापासून सूट देऊन प्राधान्याने शेतक-यांना काढलेला गाळ उपलब्ध करुन देण्यात यावा.

ङ) <u>इतर शर्ती व अटी</u> :

१) नदीपात्रातील गाळ साठलेल्या भागाची लांबी, गाळाचे परिमाण व खोली निश्चित करणे, कामाचा प्रकल्प अहवाल तयार करणे, अंदाजपत्रक करणे तसेच प्रत्यक्ष काम करुन गाळ निष्कासित करणे व त्याची मोजमापे नोंदविणे यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे स्वतंत्रपणे जलसंपदा विभागामार्फत निर्गमित करण्यात येतील.

२) काढलेल्या गाळाची विल्हेवाट लावण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यासाठीची मार्गदर्शक तत्वे स्वतंत्रपणे महसूल विभागामार्फत निर्गमित करण्यात येतील.

३) उपरोक्तनुसार नदी पात्रातील गाळ काढण्याचे काम हे पूर संरक्षक काम - अर्थात, पूराचा तडाखा नद्यांच्या तीरावरील नागरी व शहरी भागांना कमी पोहोचावा या हेतूने करण्यात येत असल्यामुळे व यास जिल्हाधिकारी यांचेकडून आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अंतर्गत ठरावाद्वारे मंजूरी देण्यात येणार असल्यामुळे या कामासाठी इतर कोणत्याही विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र/वैधानिक मान्यता घेण्याची आवश्यकता राहणार नाही.

४) गाळ काढण्याचे काम सागरी किनारी क्षेत्रात (CRZ) येत असल्यास सदर काम हाती घेण्यापूर्वी त्याबाबत सक्षम प्राधिकरणाची मंजूरी घेणे आवश्यक राहील.

५) नदीपात्रातील गाळ काढताना भूजल उत्खनन, स्वच्छ पाणी धारणा पद्धतीचा वापर, पावसाच्या पाण्याचे संवर्धन, पाण्याचा पुर्नभरण, नदीचा किमान प्रवाह राखणे याबाबत काळजी घेण्यात यावी.

६) नदीपात्रातील गाळ काढताना अनाधिकृत वाळू उत्खनन होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

७) गाळ काढण्यापूर्वी, काढताना / काढून झाल्यावर GIS Based photographs व चित्रफिती जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात याव्यात.

इ) <u>नद्यांमध्ये येणारा गाळ कमी प्रमाणात यावा याकरिता आवश्यक दीर्घकालीन उपाययोजना</u> :

१) नद्यांमध्ये गाळ साठण्याची प्रक्रिया नैसर्गिकपणे अव्याहत सुरु असते. या धोरणानुसार नद्यांमधून गाळ निष्कासित केल्यानंतर नदीच्या तीरावरील नागरी/शहरी भागांना पूराचा तडाखा कमी बसेल व जिवित/वित्त हानी कमी होईल, असे जरी असले तरी नदीत गाळ साठण्याच्या कारणांच्या मुळाशी जाऊन नदी खोरे उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे , जेणेकरुन नदी पात्रात गाळ साठण्याची प्रक्रिया संथपणे होईल. अन्यथा गाळ निष्कासित केल्यानंतर काही वर्षांमध्ये पुन:श्च नव्याने गाळ साचेल व पुन्हा नदीचे पाणी नदी पात्राबाहेर पसरुन नागरी/शहरी भागाचे नुकसान होऊ शकेल.

२) तसे होणे टाळण्याकरिता पुढीलप्रमाणे उपाययोजना नदीखो-यात राबविण्यात याव्यात. व याकरिता आवश्यक निधी त्या-त्या विभागाने संबंधित कामाशी निगडीत लेखाशिर्षामधून भागविण्यात यावा.

I. नदी खो-यातील तीव्र उतारावरील मातीच्या धुपीच्या तीव्रतेनुसार आणि प्रमाणानुसार छोटे छोटे पाणलोट क्षेत्र निर्धारित करुन मर्यादीत क्षेत्रासाठी मृद आणि जल संधारणाच्या उपाययोजना मृद व जल संधारण विभागाने कराव्यात.

II. वृक्षतोडीवर कायमस्वरुपी बंदी आणून हानी पोहोचलेल्या ठिकाणी जंगल विभागात (Degraded forest) पुनर्लागवड करण्याची कार्यवाही वन विभागाने करावी.

III. नदीच्या दोन्ही बाजूने झाडाची लागवड करावी व नदी काठाची धूप थांबविणे याबाबत उपाययोजना करण्याबाबत महसूल व वन विभागाने कार्यवाही करावी

IV. नदी आणि नाले यांच्या पात्रात पुन्हा गाळ येवू नये यासाठी सर्व संबंधित विभागांनी जैविक व अभियांत्रिकी उपाययोजना कराव्यात.

उपरोक्त सर्व कामांचे संनियंत्रण जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात यावे.

सदर शासन निर्णय (१) मृद व जलसंधारण विभाग, (२) पर्यावरण विभाग, (३)मदत व पुनर्वसन विभाग, (४) महसूल व वन विभाग, (५) नियोजन विभाग व (६) वित्त विभाग यांचे अनुक्रमे अनौपचारिक संदर्भ (१) क्र. ८१/जल-१, दिनांक २०.१०.२०२२, (२) क्र. निरंक /तां.क.-३, दिनांक १०.१०.२०२२,(३) क्र. निरंक/आव्यप्र-१, दिनांक १८.१०.२०२२, (४) क्र. निरंक, दिनांक०७.०९.२०२२ व दिनांक ०४.१०.२०२२,(५) क्र.३०३/१४३३, दिनांक १३.०२.२०२३ व (६)क्र. १२/व्यय-१२,दिनांक २७.०१.२०२३ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र राज्याच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२३०७२५१७०४११३३२७ असा देण्यात आला आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

सहपत्र :- परिशिष्ट-१.

SANJIV ARUNKANT TATU

Digitally signed by SANJIV ARUNKANT TATU
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER RESOURCES DEPARTMENT, 2.5.4.20=2d4c9d30f88b6a2745465552d33743e7c967f8c7a5d28752 0a1c61013a9d322a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CDC760A62A3C19856AA294BBEA7AE1D009186809 C9360393D324611015F646EA, cn=SANJIV ARUNKANT TATU
Date: 2023.07.25 18:52:30 +05'30'

(सं.अ.टाटू)
शासनाचे मुख्य अभियंता तथा सहसचिव

प्रत :-

१. मा. राज्यपाल यांचे अपर मुख्य सचिव, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद/विधानसभा महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.

परिशिष्ट- 1

अ.क्र.	महामंडळ	जिल्हा	नदीचे नांव	Name of Rivers	प्राथम्याने खोलीकरण करण्याच्या नदीची लांबी (कि.मी.)
1		2	3	4	5
1	मकृखोविम,पुणे	अहमदनगर	सिना	Sina	2.00
2	मकृखोविम,पुणे	अहमदनगर	भिंगरनाला	Bhingarnalla	2.00
3	मकृखोविम,पुणे	अहमदनगर	खैरी	Khairi	7.00
4	मकृखोविम,पुणे	अहमदनगर	विंचारना	Vincharana	5.00
5	मकृखोविम,पुणे	कोल्हापूर	वारणा	Warna	5.00
6	मकृखोविम,पुणे	कोल्हापूर	कडवी	Kadvi	3.00
7	मकृखोविम,पुणे	कोल्हापूर	कासारी	Kasari	5.00
8	मकृखोविम,पुणे	कोल्हापूर	भोगावती	Bhogawati	5.00
9	मकृखोविम,पुणे	कोल्हापूर	पंचगंगा	Panchganga	15.00
10	मकृखोविम,पुणे	कोल्हापूर	हिरण्यशेपी	Hiranyakeshi	3.00
11	मकृखोविम,पुणे	कोल्हापूर	ताम्रपर्णी	Tamraparni	6.00
12	मकृखोविम,पुणे	कोल्हापूर	घटप्रभा	Ghatprabha	4.00
13	मकृखोविम,पुणे	कोल्हापूर	वेदगंगा	Vedganga	10.00
14	मकृखोविम,पुणे	कोल्हापूर	कृष्णा	Krishna	3.40
15	मकृखोविम,पुणे	कोल्हापूर	जांभळी	Jambhali	2.00
16	मकृखोविम,पुणे	पुणे	मुठा	Mutha	23.00
17	मकृखोविम,पुणे	पुणे	मुळा-मुठा	Mula-Mutha	61.00
18	मकृखोविम,पुणे	पुणे	मुळा	Mula	5.00
19	मकृखोविम,पुणे	पुणे	भीमा	Bhima	5.00
20	मकृखोविम,पुणे	पुणे	राम	Ram	15.00
21	मकृखोविम,पुणे	पुणे	उरवाडे नाला	Urawade Nalla	13.26
22	मकृखोविम,पुणे	पुणे	सुधा	Sudha	5.00
23	मकृखोविम,पुणे	पुणे	कासारसाई नाला	Kasarsai Nalla	9.40
24	मकृखोविम,पुणे	पुणे	घोड	Ghod	10.00
25	मकृखोविम,पुणे	पुणे	कुकडी	Kukadi	10.00
26	मकृखोविम,पुणे	पुणे	घोड (मिना)	Ghod (Mina)	10.00
27	मकृखोविम,पुणे	पुणे	कुकडी (मांडवी)	Kukadi (Mandvi)	5.00
28	मकृखोविम,पुणे	पुणे	कुकडी (पुष्पवती)	Kukadi (Pushpavati)	3.00
29	मकृखोविम,पुणे	सांगली	कृष्णा	Krishna	20.00
30	मकृखोविम,पुणे	सांगली	वारणा	Warna	10.00
31	मकृखोविम,पुणे	सातारा	कृष्णा	Krishna	10.00
32	मकृखोविम,पुणे	सातारा	कोयना	Koyna	10.00
33	मकृखोविम,पुणे	सातारा	कृष्णा	Krishna	5.00
34	मकृखोविम,पुणे	सोलापूर	भीमा	Bhima	25.00
35	मकृखोविम,पुणे	सोलापूर	माण	Man	5.00
36	मकृखोविम,पुणे	सोलापूर	कोरडा	Korda	5.00
37	कोपाविम,ठाणे	ठाणे	पेज	Pej	5.00
38	कोपाविम,ठाणे	ठाणे	शिलार	Shilar	5.00
39	कोपाविम,ठाणे	ठाणे	पोशिर	Poshir	5.00
40	कोपाविम,ठाणे	ठाणे	मुरबाडी	Murbadi	5.00
41	कोपाविम,ठाणे	ठाणे	काळू	Kalu	10.00
42	कोपाविम,ठाणे	ठाणे	कनकविरा	Kanakvira	5.00
43	कोपाविम,ठाणे	ठाणे	शाई	Shai	5.00
44	कोपाविम,ठाणे	ठाणे	कानवी	Kanvi	5.00
45	कोपाविम,ठाणे	ठाणे	उल्हास	Ulhas	10.00
46	कोपाविम,ठाणे	पालघर	सुर्या	Surya	48.00
47	कोपाविम,ठाणे	पालघर	वांद्री	Wandri	10.00
48	कोपाविम,ठाणे	पालघर	देहरजी	Deharji	34.00
49	कोपाविम,ठाणे	पालघर	गारगाई	Gargai	22.00
50	कोपाविम,ठाणे	पालघर	पिंजाळ	Pinjal	35.00

अ.क्र.	महामंडळ	जिल्हा	नदीचे नांव	Name of Rivers	प्राथम्याने खोलीकरण करण्याच्या नदीची लांबी (कि.मी.)
1		2	3	4	5
51	कोपाविम,ठाणे	पालघर	तानसा	Tansa	56.00
52	कोपाविम,ठाणे	पालघर	वैतरणा	Vaitarna	84.40
53	कोपाविम,ठाणे	रत्नागिरी	अर्जुना	Arjuna	5.00
54	कोपाविम,ठाणे	रत्नागिरी	जगबूडी	Jagbudi	5.00
55	कोपाविम,ठाणे	रत्नागिरी	वाशिष्ठी	Vashisthi	10.00
56	कोपाविम,ठाणे	रत्नागिरी	काजळी	Kajli	5.00
57	कोपाविम,ठाणे	रत्नागिरी	शास्त्री	Shastri	5.00
58	कोपाविम,ठाणे	रत्नागिरी	सोनवी	Sonvi	4.00
59	कोपाविम,ठाणे	रायगड	म्हसळा	Mhasal	22.00
60	कोपाविम,ठाणे	रायगड	सावित्री	Savitri	14.00
61	कोपाविम,ठाणे	रायगड	कुंडलिका	Kundalika	12.00
62	कोपाविम,ठाणे	रायगड	अंबा	Amba	8.00
63	कोपाविम,ठाणे	रायगड	बाळगंगा	Balganga	5.00
64	कोपाविम,ठाणे	सिंधुदुर्ग	वाघोटन	Vaghotan	5.00
65	कोपाविम,ठाणे	सिंधुदुर्ग	देवगड	Devgad	5.00
66	कोपाविम,ठाणे	सिंधुदुर्ग	गड	Gad	5.00
67	कोपाविम,ठाणे	सिंधुदुर्ग	कर्ली	Karli	5.00
68	कोपाविम,ठाणे	सिंधुदुर्ग	आचरा	Achara	3.00
69	कोपाविम,ठाणे	सिंधुदुर्ग	तेरेखोल	Terekhol	5.00
70	कोपाविम,ठाणे	सिंधुदुर्ग	तिलारी	Tilari	5.00
71	गोमपाविम,छ.संभाजीनगर	उस्मानाबाद	तेरणा	Terna	5.00
72	गोमपाविम,छ.संभाजीनगर	उस्मानाबाद	मांजरा	Manjara	15.00
73	गोमपाविम,छ.संभाजीनगर	उस्मानाबाद	बोरी	Bori	10.00
74	गोमपाविम,छ.संभाजीनगर	औरंगाबाद	शिवना	Shivana	5.00
75	गोमपाविम,छ.संभाजीनगर	औरंगाबाद	बोर	Bor	5.00
76	गोमपाविम,छ.संभाजीनगर	औरंगाबाद	खाम	Kham	10.00
77	गोमपाविम,छ.संभाजीनगर	औरंगाबाद	गोदावरी	Godavari	20.00
78	गोमपाविम,छ.संभाजीनगर	जालना	पाथरवाळा नदी	Patharawala River	2.16
79	गोमपाविम,छ.संभाजीनगर	जालना	जोगालादवी नदी	Jogaladavi River	2.15
80	गोमपाविम,छ.संभाजीनगर	जालना	शाहा नदी	Shaha River	2.11
81	गोमपाविम,छ.संभाजीनगर	जालना	रामासगाव नदी	Ramasgav River	2.10
82	गोमपाविम,छ.संभाजीनगर	नांदेड	गोदावरी	Godavari	15.00
83	गोमपाविम,छ.संभाजीनगर	नाशिक	कडवा नदी	Kadwa River	41.40
84	गोमपाविम,छ.संभाजीनगर	नाशिक	पाराशा नदी	Parasha River	23.10
85	गोमपाविम,छ.संभाजीनगर	नाशिक	कोळवण नदी	Kolvan River	20.50
86	गोमपाविम,छ.संभाजीनगर	नाशिक	उनांदा (ओझरखेड धरण ते कडवा नदी)	Unanda (Ozer khad Dam To Kadawa River)	7.50
87	गोमपाविम,छ.संभाजीनगर	नाशिक	उनांदा (पूणे गोम धरण ते ओझरखेड डॅम)	Unanda (Pune goan dam to Ozer khad Dam.)	8.60
88	गोमपाविम,छ.संभाजीनगर	परभणी	दुधना	Dudhana	15.00
89	गोमपाविम,छ.संभाजीनगर	परभणी	मासोळी	Masoli	4.00
90	गोमपाविम,छ.संभाजीनगर	परभणी	कारपारा	Karpara	6.00
91	गोमपाविम,छ.संभाजीनगर	लातूर	रेणा	Rena	15.00
92	गोमपाविम,छ.संभाजीनगर	लातूर	मांजरा	Manjara	25.00
93	गोमपाविम,छ.संभाजीनगर	हिंगोली	कायधु नदी	Kaydhu River	45.00
94	विपाविम,नागपूर	अकोला	वाण	Wan	5.00
95	विपाविम,नागपूर	अकोला	मोर्णा	Morna	12.00
96	विपाविम,नागपूर	अकोला	विद्रुपा	Vidrupa	8.00
97	विपाविम,नागपूर	अमरावती	अंबा	Amba	10.00
98	विपाविम,नागपूर	अमरावती	बिच्छन	Vichhan	7.00
99	विपाविम,नागपूर	अमरावती	सपन	Sapan	7.00
100	विपाविम,नागपूर	अमरावती	शानूर	Shanur	5.00
101	विपाविम,नागपूर	अमरावती	चंद्रभागा	Chandrabhaga	5.00

अ.क्र.	महामंडळ	जिल्हा	नदीचे नांव	Name of Rivers	प्राथम्याने खोलीकरण करण्याच्या नदीची लांबी (कि.मी.)
1		2	3	4	5
102	विपाविम,नागपूर	अमरावती	नाल	Nal	2.00
103	विपाविम,नागपूर	अमरावती	देवाना	Devana	5.00
104	विपाविम,नागपूर	अमरावती	जिवाना	Jiwana	5.00
105	विपाविम,नागपूर	अमरावती	वर्धा	Vardha	19.70
106	विपाविम,नागपूर	अमरावती	पुर्णा	Poorna	70.00
107	विपाविम,नागपूर	गडचिरोली	पोटफोडी	Potphodi	5.00
108	विपाविम,नागपूर	गडचिरोली	साती	Sati	7.00
109	विपाविम,नागपूर	गडचिरोली	प्राणहिता	Pranhita	10.00
110	विपाविम,नागपूर	गोंदिया	वैनगंगा	Vainganga	18.00
111	विपाविम,नागपूर	गोंदिया	चूलबंद	Chulband	7.00
112	विपाविम,नागपूर	गोंदिया	गाढवी	Gadhavi	10.00
113	विपाविम,नागपूर	चंद्रपूर	पैनगंगा	Painganga	20.00
114	विपाविम,नागपूर	चंद्रपूर	वर्धा	Wardha	30.00
115	विपाविम,नागपूर	नागपूर	कनान	Kanan	5.00
116	विपाविम,नागपूर	नागपूर	वेन्ना	Venna	5.00
117	विपाविम,नागपूर	नागपूर	नंद	Nand	5.00
118	विपाविम,नागपूर	नागपूर	नाग	Nag	3.55
119	विपाविम,नागपूर	नागपूर	जाम	Jam	10.00
120	विपाविम,नागपूर	बुलढाणा	मून	Mun	20.00
121	विपाविम,नागपूर	बुलढाणा	तोरणा	Torna	10.00
122	विपाविम,नागपूर	बुलढाणा	पैनगंगा	Painganga	20.00
123	विपाविम,नागपूर	भंडारा	वैनगंगा	Vainganga	5.00
124	विपाविम,नागपूर	भंडारा	सूर	Sur	5.00
125	विपाविम,नागपूर	भंडारा	चूलबंद	Chulband	10.00
126	विपाविम,नागपूर	यवतमाळ	बेंबाळा	Bembala	17.50
127	विपाविम,नागपूर	यवतमाळ	अरुणावती	Arunawati	15.00
128	विपाविम,नागपूर	यवतमाळ	अदान	Adan	10.00
129	विपाविम,नागपूर	यवतमाळ	खुनी	Khuni	7.00
130	विपाविम,नागपूर	यवतमाळ	गोकी	Goki	5.00
131	विपाविम,नागपूर	यवतमाळ	चक्रवती	Chakravati	5.00
132	विपाविम,नागपूर	यवतमाळ	पूस	Pus	5.00
133	विपाविम,नागपूर	यवतमाळ	वाघाड	Waghad	5.00
134	विपाविम,नागपूर	यवतमाळ	निरगुडा	Nirguda	5.00
135	विपाविम,नागपूर	यवतमाळ	खडकपूर्णा	Khadakpurna	10.00
136	विपाविम,नागपूर	यवतमाळ	उतावळी	Utawali	5.00
137	विपाविम,नागपूर	यवतमाळ	सिध्दगंगा	Sidhhaganga	0.00
138	विपाविम,नागपूर	वर्धा	बोर	Bor	10.00
139	विपाविम,नागपूर	वर्धा	पंचधारा	Panchdhara	7.00
140	विपाविम,नागपूर	वर्धा	धाम	Dham	10.00
141	विपाविम,नागपूर	वर्धा	पोथारा	Pothara	5.00
142	विपाविम,नागपूर	वर्धा	कार	Kar	2.00
				Total	**1608.83**

अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबतची कालमर्यादा निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः- गौखनि १०/०२२५/प्र.क्र.७२/ख-२

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग

मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दिनांक:- ०७ मार्च, २०२४

प्रस्तावना:-

राज्यातील अवैध गौण खनिजाच्या उत्खनन व वाहतूकीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व सामान्य नागरिक यांच्याकडून मोठया प्रमाणात शासनस्तरावर व क्षेत्रीय स्तरावर तक्रारी/निवेदने प्राप्त होत आहेत. अशा तक्रारीचे निवारण व त्याची शहानिशा करण्याच्या अनुषंगाने चौकशी करणे आवश्यक आहे. अशा प्राप्त तक्रारी/निवेदनावर कार्यवाही करण्याबाबतची निश्चित अशी कालमर्यादा घालणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीबाबत प्राप्त तक्रारी/निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबतची कालमर्यादा निश्चित करून त्यानुषंगाने कार्यवाही करण्याबाबत शासन परिपत्रकान्वये क्षेत्रीय यंत्रणास सूचना देणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन परिपत्रक:-

सामान्य नागरीक व स्थानिक लोकप्रतिनीधी यांच्याकडून अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीबाबत प्राप्त तक्रारी/निवेदनाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

(i) सामान्य नागरीक व स्थानिक लोकप्रतिनिधींकडून क्षेत्रीय अधिकारी/कार्यालयास अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक या विषयाबाबात प्राप्त झालेल्या तक्रारी/निवेदने, तसचे शासनस्तरावर क्षेत्रीय यंत्रणेकडे वर्ग करण्यात आलेल्या अशा प्रकारच्या तक्रारी/निवेदने यांच्या अनुषंगाने क्षेत्रीय यंत्रणेकडून तक्रारी/निवेदनामधील मुद्यांच्या अनुषंगाने निवेदन प्राप्त झाल्यापासून ०७ दिवसात प्रत्यक्ष पाहणी करुन चौकशीची कार्यवाही करण्यात यावी.

(ii) तक्रारीच्या चौकशीमध्ये अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक आढळून आल्यास पुढील १५ दिवसात संबंधिता विरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४७ (७) व ४७ (८) अन्वये, तसेच गौण खनिज उत्खनन (नियम व विनियमन) नियम, २०१३ मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी दंडात्मक कार्यवाही करावी.

(iii) अशा प्रकारच्या तक्रारी/निवेदनाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती संबंधित तक्रारदार/निवेदन धारकांना लेखी कळविण्यात यावी.

(iv) स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडुन प्राप्त झालेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती तात्काळ स्थानिक लोकप्रतिनिधींना कळविण्यात यावी.

(v) उपरोक्त प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या कालावधीत तक्रारी/निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात न आल्यास व संबंधित तक्रारदार/निवेदनधारकाला विहीत कालावधीत न कळविल्यास संबंधित सक्षम अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येवून विभागीय चौकशीची कारवाई करण्यात येईल.

०२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०३०७१४१६४९५४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SADANAND GOVIND MOHITE

Digitally signed by SADANAND GOVIND MOHITE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=9bd008875b6a3a9fddad3e55fe0328df13a27221cb2bbc67abd0155f914efc01, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6590E2301450C474B2460740491 74C79201BCAD9E5EB15E8F21C282EAEFEDA38, cn=SADANAND GOVIND MOHITE
Date: 2025.03.07 14:18:54 +05'30'

(सदानंद गो. मोहिते)
कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई.
३. मा. विधानसभा अध्यक्ष यांचे खासगी सचिव, विधानमंडळ, मुंबई
४. मा. विधानपरिषद सभापती यांचे खासगी सचिव, विधानमंडळ, मुंबई
५. मा.मंत्री (महसूल) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व मा. मंत्री/मा. राज्यपाल यांचे खासगी सचिव, मंत्रालय मुंबई.
८. सर्व मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य
९. सर्व मंत्रालयीन विभाग
१०.सर्व विभागीय आयुक्त
११.सर्व जिल्हाधिकारी
१२.सर्व उपविभागीय अधिकारी
१३.सर्व तहसिलदार
१४.संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर
१५.निवडनस्ती "ख-२" कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी गौण खनिज सुलभपणे व नियमितपणे उपलब्ध होण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन परिपत्रक क्र.गौखनि-१०/०४१६/प्र.क्र.३०२/ख-२

पहिला मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :-०९ ऑक्टोबर, २०२४

संदर्भ:१.महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ चे कलम-४८
२.महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३
३.समक्रमांक दिनांक १४.०६.२०१७ चे परिपत्रक

<u>प्रस्तावना:</u>-

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून राज्यात मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय महामार्गांना मंजूरी देण्यात आली असून, सदर राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी माती, मुरूम व दगड यांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे. सदर राष्ट्रीय महामार्गाची कामे वेळेवर पूर्ण होण्यासाठी माती, मुरूम व दगड हे गौण खनिज सुलभपणे व नियमितपणे उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्याद्दष्टीने या संदर्भातील कार्यपध्दती सुरळीत करण्याच्या द्दष्टीने संदर्भाधिन क्रमांक ०३,दिनांक १४.०६.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये दिशानिर्देश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

त्यानुषंगाने एखाद्या संबंधित कंत्राटदार यांना राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी माती,मुरुम व दगड या गौण खनिजाचे उत्खनन करुन वाहतुक करण्यास परवानगी देण्यात येते. अशा परवानग्या अर्जदाराने अर्जात नमुद केलेल्या सर्व्हे नं/गट नं. यामधुन देण्यात येतात. वास्तविक पाहता ग्रामीण भागामध्ये क्षेत्राबाबत असलेले सर्व्हे नं व गट नं. यांच्या हद्दी या निश्चित नसतात. त्यामुळे उत्खनन करुन वाहतुक करण्यासाठी परवानगी घेतलेल्या क्षेत्राव्यतिरिक्त म्हणजेच लगतच्या क्षेत्रामध्ये उत्खनन होत असल्याचे दिसून आलेले आहे. त्यामुळे ज्या क्षेत्राच्या अनुषंगाने परवानगी देण्यात आलेली नाही व अशा क्षेत्रातून उत्खनन झाल्याचे आढळून आल्याने, सदर उत्खननाच्या अनुषंगाने संबंधित जमिनधारकास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ चे कलम-४८ मधील तरतुदीनुसार त्यांच्याविरुध्द क्षेत्रीय यंत्रणेकडुन दंडात्मक आदेश पारित करण्यात येतात. अशा दंडाच्या आदेशाबाबत क्षेत्रीय स्तरावर अनेक अर्धन्यायिक व न्यायिक स्वरुपाचे दावे दाखल झालेले आहेत. त्यामुळे संबंधित शेतकरी/जमिनधारक यांना त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे.

याबाबी विचारात घेता, राष्ट्रीय महामार्गाचे काम वेळेवर पुर्ण होण्यासाठी गौण खनिज सुलभतेणे व नियमितपणे उपलब्ध होण्यासाठी तसेच इतर शेतकरी/जमिनधारक यांना होणारा त्रास टाळण्याच्या द्दष्टीने संदर्भ क्र.०३ दिनांक १४.०६.२०१७ अन्वये राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी गौण खनिज सुलभतेणे व नियमितपणे उपलब्ध होण्यासंदर्भात कार्यपध्दती सुरळीत करण्याच्या द्दष्टीने देण्यात आलेल्या दिशा निर्देशामध्ये क्रमांक (उ) नंतर खालील बाबींचा समावेश करण्यात येत आहे.

(१) एखाद्या राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी उत्खनन करून वाहतूक करण्यासाठी देण्यात आलेल्या परवानगी व्यतीरिक्त लगतच्या सर्व्हे/गट नंबर मधून उत्खनन झाले असल्याचे आढळून आलयास, राष्ट्रीय महामार्गाच्या कामांसाठी वापरलेल्या गौण खनिजांसाठी दंडात्मक कारवाई न करता संबंधित ठेकेदारास जास्तीच्या गौण खनिज उत्खननापोटी/वापरापोटी स्वामित्वधन भरणेबाबतची नोटीस बजाविण्यात आल्याच्या दिनांकापासून स्वामित्वधनाची रक्कम ३० दिवसात शासन जमा करणेबाबत कळविण्यात यावे..

(२) संबंधित ठेकेदार यांच्याकडून ज्यावर्षी उत्खनन करण्यात आलेले असेल त्या-त्यावेळी असलेले स्वामित्वधनाचे दर विचारात घेऊन कार्यवाही करण्यात यावी.

राष्ट्रीय महामार्गांची कामे वेळेवर पूर्ण होण्यासाठी कोणत्याही प्रकारे अडथळा येणार नाही, याबाबतची दक्षता सर्व क्षेत्रीय महसूल अधिकाऱ्यांनी कटाक्षाने घ्यावी.

उपरोक्त निर्देश हे राष्ट्रीय महामार्गाच्या कामासंबंधीच लागू राहतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२४१००९१२४८१८१५१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरिने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SADANAND GOVIND MOHITE

Digitally signed by SADANAND GOVIND MOHITE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=9bd008875b6a3a9fddad3e55fe0328df13a27221cb2bbc67abd0155f914efc01, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=659DE2301450C474B246074049174C79201BCAD9E5EB15E8F21C282EAEFEDA38, cn=SADANAND GOVIND MOHITE
Date: 2024.10.09 15:05:10 +05'30'

(सदानंद गो. मोहिते)
कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई.
३. मा. विधानसभा अध्यक्ष यांचे खासगी सचिव, विधानमंडळ, मुंबई
४. मा. विधानपरिषद सभापती यांचे खासगी सचिव, विधानमंडळ, मुंबई
५. मा.मंत्री (महसूल) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व मा. मंत्री/मा. राज्यपाल यांचे खासगी सचिव, मंत्रालय मुंबई.
७. सर्व मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य
८. सर्व मंत्रालयीन विभाग
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व उपविभागीय अधिकारी
१२. सर्व तहसिलदार

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मंत्रालय मुख्य इमारत, दालन क्र.१०१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
शासन परिपत्रक, क्र. संकीर्ण- ०१२५/प्रक्र ०४/ई-१
दिनांक- ०२ जानेवारी, २०२५.

संदर्भ :- १. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एस-१४/३६१३/प्रक्र २०९(२)/ई-३, दिनांक ३०.०४.१९९२, दिनांक २६.०६.१९९२, दि. २६.०७.१९९३ व दि. १३.१०.१९९३
२. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-०२/२०११/प्र.क्र. १३/ई-१, दिनांक २९.०७.२०११
३. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-०२/२०११/प्रक्र १३/ई-१, दिनांक २९.०३.२०१२, दिनांक २८.१२.२०१२
४. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-०२/२०१२/प्रक्र ४३/ई-१, दिनांक ०४.१०.२०१३
५. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण- २०१५/प्रक्र २८/ई-१ अ, दिनांक २४.०४.२०१७ व दिनांक २५.०५.२०१५.

शासन परिपत्रक :-

शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एस-१४/३६१३/प्र.क्र.२०९/ई-३. दि.२८.१.१९९२ अन्वये राज्यातील प्रत्येक जिल्हयासाठी एक या प्रमाणे अपर जिल्हाधिकारी यांची पदे निर्माण करण्यात आली आहेत. प्रत्येक जिल्हयासाठी अपर जिल्हाधिकाऱ्याचे स्वतंत्र पद निर्माण करण्यात आल्याने जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्यामध्ये विषयवारीनुसार कामाची वाटणी करण्याबाबत संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये वेळोवेळी प्रशासकीय आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

२. उपरोक्त नमूद संदर्भाधीन शासन परिपत्रकांन्वये सर्व विभागीय आयुक्तांकडून प्राप्त झालेल्या शिफारशी व विषयांचे स्वरुप विचारात घेवून जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्यामधील कामाची वाटप करण्याबाबतचे शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आली आहेत.

३. सदर जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्यामधील कामाची वाटप करण्याच्या अनुषंगाने संदर्भ क्र. ३ अन्वये नेमुन दिलेल्या विषयांपैकी अपर जिल्हाधिकारी यांचेकडे दर्शविण्यात आलेला **"गौण खनिज व तद्नुषंगिक बाबी"** हा विषय या परिपत्रकाच्या दिनांकापासून संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(महेश वरूडकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अप्पर मुख्य सचिव
२. मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव
४. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
५. अपर मुख्य सचिव (महसूल, नोंदणी व मुद्रांक) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सर्व विभागीय आयुक्त
७. सर्व जिल्हाधिकारी
८. सर्व अपर जिल्हाधिकारी (विभागीय आयुक्तांमार्फत)
९. सर्व उप विभागीय अधिकारी
१०. सर्व तहसिलदार
११. निवडनस्ती कार्यासन ई-१

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय,बुलढाणा

विषय क्र.५

जमीन विषयक धोरणात्मक शासन निर्णय

जिल्हा महसूल प्रशासन,बुलढाणा

विविध प्रयोजनासाठी शासकीय जमीन कब्जेहक्काने अथवा भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या प्रकरणी झालेल्या शर्तभंगाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : जमीन-२०२१/प्र.क्र.१२/ज-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय,मुंबई-४०० ०३२

दिनांक : २८ जानेवारी, २०२१

वाचा : महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्र.लेखाप १०/२०११/प्र.क्र.१५९/ज-१, दि.०३.०३.२०१२

शासन परिपत्रक :-

शासनाने राज्यात स्वातंत्र्यापूर्वी मुंबई जमीन महसूल संहिता, या संहितेनुसार आणि स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि त्याखालील, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे विल्हेवाट करणे) नियम, १९७१ अन्वये शासकीय जमिनी विविध प्रयोजनासाठी विविध अटी व शर्तीवर कब्जेहक्काने किंवा भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या आहेत. अशा प्रदान केलेल्या जमिनींचा वापर दिलेल्या उदिष्टासाठीच होणे आवश्यक आहे. तसेच शासनाने अशा प्रकरणी दिलेल्या कालमर्यादेत ती जमीन वापरात आाणणे आवश्यक आहे.

ज्या अटी व शर्तीवर शासकीय जमिनी प्रदान करण्यात आल्या आहेत, त्या अटी व शर्तीनुसार या जमिनीचा वापर झाला आहे किंवा नाही हे पहाण्याची जबाबदारी ही क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांची आहे. यासंदर्भात यापूर्वी उक्त वाचा येथील शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, असे असतांनाही काही प्रकरणात नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

०२. या अनुषंगाने आपणांस पुन्हा कळविण्यात येत आहे की, अशा प्रकारे प्रदान केलेल्या जमिनीबाबत शर्तभंग झाला असेल, तर, अशी प्रकरणे स्वत:हून शोधून काढावित आणि त्यामध्ये अस्तीत्वात असलेल्या शासन धोरणानुसार कार्यवाही करावी. तसेच ज्या प्रकरणात शर्तभंगाकडे जाणिवपूर्वक दूर्लक्ष करुन कार्यवाही करण्यास टाळाटाळ होत असेल / झाली असेल, अशा प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी.

०३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२१०१२८१५४२२७४३१९ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAMESH SHIVAJI CHAVAN

Digitally signed by RAMESH SHIVAJI CHAVAN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=7ada4e8fa11566f3b9c9f7b5fa123945d54f8e3d5b09d05bedfa09b97ee45cad, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=eb458b05e05ee27f435bd399537405d44e1c88021cf038b060ac10b9d8fb8787, ou=REVENUE, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAMESH SHIVAJI CHAVAN
Date: 2021.01.28 17:02:55 +05'30'

(रमेश चव्हाण)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव, (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
९) अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
११) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
१२) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे.
१३) नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१५) सर्व विभागीय आयुक्त.
१६) सर्व जिल्हाधिकारी.
१७) सर्व सहसचिव/उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.
१८) सर्व अवरसचिव/कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.
१९) सहसचिव (ज-१), यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) निवड नस्ती (ज-१).

******

"ब-सत्ताप्रकार" अथवा अन्य कोणताही सत्ताप्रकार म्हणून नोंदविलेल्या आणि निवासी, कृषिक, वाणिज्यिक, औद्योगिक प्रयोजनासाठी प्रदान केलेल्या जमिनींचे भोगवटादार वर्ग-१ या धारणाधिकारामध्ये रुपांतरण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्र. जमीन २०२०/प्र.क्र.१०३/ज-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :१५ मार्च, २०२१

वाचा:-

१) शासन निर्णय क्रमांक : जमीन -१०/२००८/प्र.क्र.१४६/ज-१, दि. २० जानेवारी, २००९
२) शासन निर्णय क्रमांक : जमीन -१०/२००९/प्र.क्र.७६/ज-१, दि. १ ऑगस्ट, २००९
३) शासन निर्णय क्रमांक : जमीन -०३/२०१०/प्र.क्र.४८/ज-१, दि. ९ जुलै, २०१०
४) महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक : जमीन-२०१८/प्र.क्र.९०/ज-१, दि. ८ मार्च, २०१९

शासन परिपत्रक :-

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये तत्कालीन मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ आणि मुंबई जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९२१ आणि स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ अन्वये विविध व्यक्ती व संस्था यांना धर्मदाय, शैक्षणीक, कृषी, रुग्णालय, वाणिज्यिक, औद्योगिक, निवासी इत्यादी अशा विविध प्रयोजनासाठी जमिनी प्रदान करण्यात आल्या आहेत. या प्रमाणे विविध प्रयोजनांसाठी प्रदान करण्यात आलेल्या जमिनींपैकी कृषिक, निवासी, वाणिज्यिक अथवा औद्योगिक प्रयोजनासाठी भोगवटादार वर्ग-२ किंवा भाडेपट्ट्याने या धारणाधिकारावर प्रदान केलेल्या किंवा प्रदानानंतर असा वापर अनुज्ञेय करण्यात आलेल्या जमिनीचे भोगवटादार वर्ग-१ या धारणाधिकारामध्ये रुपांतरण करण्याकरिता महसूल व वन विभाग, क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९०/ज-१ दिनांक. ०८.०३.२०१९ च्या अधिसूचने अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमीन भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरीत करणे) नियम,२०१९ विहीत करण्यात आले आहेत.

१.२ नगर भूमापन चौकशीच्या दरम्यान अकृषिक झालेल्या मिळकतींचा सत्ताप्रकार निश्चित करण्यात येतो. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २९ (१) नुसार जमीन धारण करण्या-या व्यक्तीचे वर्ग निश्चित केलेले आहेत, त्यानुसार भोगवटादार वर्ग-२ म्हणजे ज्या व्यक्तींच्या जमिनीच्या हस्तांतर करण्याच्या हक्कावरील निर्बधांना अधीन राहून बिनदुमाला जमीन कायम धारण करित असतील अशा व्यक्ती असतात. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम-३८ मध्ये "सरकारी पट्टेदार" म्हणजे शासनाकडून पट्ट्याने जमीन धारण करणारी व्यक्ती, अशी तरतुद आहे.

१.३ स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये तत्कालीन मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ आणि मुंबई जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९२१ आणि स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ अन्वये यापूर्वी शासनाकडून प्रदान

करण्यात आलेल्या जमिनींच्या अधिकार अभिलेखामध्ये नोंद घेत असतांना स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या काळामध्ये शहरी भागामध्ये सर्वेक्षण करण्यात येत होते. राज्यात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १२६ व महाराष्ट्र जमीन महसूल (गाव, नगर,व शहर भू-मापन) नियम, १९६९ अन्वये नगर भूमापन चौकशीचे काम हाताळण्यात येते. तथापि, सदर संहिता व नियम यांमध्ये सत्ता प्रकारासंदर्भात विवेचन नसून नगर भू-मापन पुस्तिका यामध्ये सत्ताप्रकार नमूद आहेत.

१.४ पण, दरम्यानच्या कालावधीत जिथे सर्वेक्षण करून नगर भूमापन क्रमांक देण्यात आले त्यावेळी त्या ठिकाणच्या गावच्या संबंधित नगर भूमापन अधिकारी यांनी त्या गावामध्ये ज्या जमिनीच्या भूधारणा पद्धती आहेत, त्यानुसार त्यांना संबंधीत गावनिहाय अस्तित्वात असलेल्या भूधारणा पध्दतीच्या मर्यादेत अ,ब,क,ड या आद्याक्षरांचा मुक्तपणे वापर करुन अशा नोंदी करण्याची मुभा देण्यात आली होती. त्यावेळी शासनाने कब्जेहक्काने/भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या अशा ब-याच जमिनींना भूधारणा पध्दतीच्या मर्यादेत वरीलप्रमाणे "ब" आद्याक्षरांचा वापर झाल्याने "ब सत्ताप्रकार" या सत्ताप्रकारच्या नोंदी लागलेल्या आहेत. तसेच त्याचवेळी राज्याच्या अन्य भागात देखील भूधारणा पध्दतीच्या मर्यादेत वरीलपैकी अन्य आद्याक्षरांचा वापर झाला असण्याची शक्यता आहे. कालांतराने, या संपूर्ण राज्यासाठी एकच भूधारणा पद्धती विहित करण्यात आल्या आणि त्यावेळी ॲन्डरसन मॅन्युअल नुसार अ,ब,क,ड असे वर्गिकरण करण्यात आले आहे. त्यानुसार "ब सत्ताप्रकार" म्हणजे -शासनाचे भाडेपट्ट्यान्वये भूईभाडे भरत असलेली जमीन, तसेच -बी-१ सत्ताप्रकार म्हणजे जमीन महसूल नियम १९२१ च्या नियम ४२ व ४३ अन्वये शासनाने प्रदान केलेली जमीन थोडक्यात शासनाने व्यक्ती अथवा संस्था यांना सर्वेक्षण झालेल्या नागरी भागात भाडेपट्ट्याने/ कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय जमिनींना "ब सत्ताप्रकार" अशी नोंद अधिकार अभिलेखात वापरण्यात येते.

१.५ दरम्यानच्या कालावधीत राज्यातील ग्रामीण भाग शहरात समाविष्ट होण्याच्या वेळी नगर भूमापन करताना काही खाजगी मालमत्तांना देखील चुकीने "ब-सत्ताप्रकार" लागला असण्याची शक्यता आहे. ज्या जमिनींना चुकून "ब-सत्ताप्रकार" लागलेला आहे अशा जमीनधारकांना त्याबाबत नाहक त्रास सोसावा लागतो. त्यामुळे अयोग्यरित्या मिळकत पत्रिकेत अभिलिखीत करण्यात आलेला "ब-सत्ताप्रकार" कमी करण्यात यावा अशी मागणी शासनाकडे होत होती. शासनाच्या असे निदर्शनास आल्यानंतर शासन निर्णय क्रमांक जमीन-१०/ २००८/ प्र.क्र.१४६/ज-१ दि. २० जानेवारी २००९ अन्वये चुकून लागलेल्या "ब-सत्ताप्रकाराची " नोंद कमी करणेबाबत निर्णय घेतला. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांना मोहीम राबविण्यासंदर्भात निर्देशित केलेले आहे.

०२. उपरोक्त पार्श्वभुमी विचारात घेता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि त्या खालील नियम या अन्वये शासनास प्राप्त असलेल्या अधिकारात क्षेत्रीय महसूल अधिकारी तथा प्राधिकारी यांना याद्वारे निर्देशित करण्यात येते की, शासनाने दिनांक ०८.०३.२०१९ अन्वये "महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमीन भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरीत करणे) नियम, २०१९" हे नियम केलेले आहेत. त्यामध्ये कृषिक, निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक प्रयोजनासाठी भोगवटादार वर्ग-२ किंवा भाडेपट्ट्याने या धारणाधिकारवर प्रदान केलेल्या जमिनीच्या धारणाधिकाराचे रुपांतरण करण्या संदर्भात तरतूद करण्यात आली आहे. राज्याच्या ग्रामीण भागातील प्रदान केलेल्या शासकीय जमिनींच्या बाबतीत सरकारी पट्टेदार, भोगवटादार वर्ग-२ अशा नोंदी घेण्यात आलेल्या आहेत आणि सर्वेक्षण झालेल्या शहरी भागात अधिकार अभिलेखामध्ये "सत्ताप्रकार" हा जमिनीचा प्रकार नोंदविण्यात आलेला आहे.

त्यामुळे कृषिक, निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक प्रयोजनासाठी ज्या जमिनी कब्जेहक्काने अथवा भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या आहेत, तथापि अशा ठिकाणी "ब सत्ताप्रकार" अथवा "अन्य कोणताही सत्ताप्रकार" यांच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत, अशा जमिनी "महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमीन भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरीत करणे) नियम, २०१९" या नियमांखाली भोगवटादार वर्ग-१ या धारणाधिकारामध्ये रूपांतरीत करण्यास पात्र ठरतात. त्यामुळे, राज्याच्या सर्वेक्षण झालेल्या नागरी क्षेत्रातील शासनाने प्रदान केलेल्या जमिनीवर /भुखंडावर अधिकार अभिलेखात "ब-सत्ताप्रकार" अथवा "अन्य कोणताही सत्ताप्रकार" म्हणून नोंदविलेल्या आणि कृषिक, निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक प्रयोजनासाठी प्रदान केलेल्या जमिनींचे "महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमीन भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरीत करणे) नियम, २०१९" अन्वये अन्वये विहीत केलेली कार्यपध्दती अनुसरुन "भोगवटादार वर्ग-१/ सी-सत्ताप्रकार" या धारणाधिकारामध्ये रूपांतरण करण्यात यावे.

०३. सर्व संबंधित क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी यांनी सदर निर्देशाप्रमाणे सत्वर कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२१०३१५१६३३४२९३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAMESH SHIVAJI CHAVAN

Digitally signed by RAMESH SHIVAJI CHAVAN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=7ada4e8fa11566f3b9c9f7b5fa123945d54f8e3d5b09d05bedfa09b97ee45cad, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=eb458b05e05ee27f435bd399537405d44e1c88021cf038b060ac10b9d8fb8787, ou=REVENUE, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAMESH SHIVAJI CHAVAN
Date: 2021.03.15 17:42:46 +05'30'

(रमेश चव्हाण)
शासनाचे सह सचिव

प्रत,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव, (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
८) अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
१०) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
११) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे.
१२) नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१४) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
१५) सर्व विभागीय आयुक्त.

शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर कब्जेहक्काच्या किंमतीवर आकारावयाचा व्याजाचा दर तसेच भाडेपट्ट्याने द्यावयाच्या जमिनीच्या वार्षिक भाडेपट्ट्याचा दर घोषित करणेबाबत .

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक :- पीएलआर-२०१६/प्र.क्र.२६/ज-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २७ एप्रिल, २०२१.

वाचा :- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एलएनडी १०९२/प्र.क्र.८४/ज-१, दिनांक ३०.६.१९९२
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. जमीन १०९७/२२१४/प्र.क्र.९३/ज-१, दिनांक ८.७.१९९९

प्रस्तावना :-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता - १९६६ आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम- १९७१ मधील तरतूदीनुसार शासकिय जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर, कब्जेहक्काने किंवा भाडेपट्टयने दिलेल्या जमिनी संदर्भात आकाण्यात येणाऱ्या दरामध्ये दिनांक ८.९.१९९९ च्या शासन निर्णयान्वये, या दराबाबत शासनाकडून पुनर्विचार करुन व्याजाच्या व भूईभाड्याच्या उक्त दरामध्ये सुधारणा करुन संदर्भाधीन शासन निर्णय दि. ८.०७.१९९९ अन्वये सुधारित आदेश देऊन, त्यानुसार पुढील तरतुद करण्यात आली:-

"आगाऊ ताबा दिलेल्या शासकिय जमिनीच्या अंतिम किंमतीवर तथा तात्पुरती किंमत व अंतिम किंमत यातील थकीत रकमेवर आकारावयाच्या व्याजाचा दर आणि भूईभाड्याने दिलेल्या शासकीय जमिनीच्या वार्षिक भूईभाड्याचा दर भारतीय स्टेट बँकेच्या "प्राईम लेंडींग रेट" इतका असावा. हा दर दरवर्षी दि. ०१ जानेवारीच्या भारतीय स्टेट बँकेच्या "प्राईम लेंडींग रेट" च्या दराइतका असावा आणि तो त्या संपूर्ण वर्षाकरिता कायम असावा. "

उक्त तरतुदीच्या अनुषंगाने भारतीय स्टेट बँकेचा त्या-त्या वर्षी ०१ जानेवारी रोजी असलेला P.L.R. (Prime Lending Rate) घोषित करुन क्षेत्रीय यंत्रणांना कळविण्यात येतो. परंतु आता भारतीय रिझर्व बँकेच्या सुधारीत निर्देशानुसार **P.L.R. ऐवजी M.C.L.R.** (Marginal Cost of Funds based Lending Rate) ही संज्ञा (term) वापरण्यात येत आहे. त्यानुसार दिनांक ०१.०१.२०२१ रोजीचा भारतीय स्टेट बँकेचा संपूर्ण वर्षासाठीचा **M.C.L.R.** दर ७% निश्चित केला आहे. त्यामुळे आगाऊ ताबा दिलेल्या शासकिय जमिनीच्या अंतिम किंमतीवर तथा तात्पुरती किंमत व अंतिम किंमत यातील थकीत रकमेवर आकारावयाच्या व्याजाचा दर आणि भूईभाड्याने दिलेल्या शासकीय जमिनीच्या वार्षिक भूईभाड्याचा दर सन २०२१ या संपूर्ण वर्षासाठी घोषीत करुन तो क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :-

शासकिय जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर, अशा जमिनींच्या कब्जेहक्काच्या रकमेवर, त्या जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यापासून ते अंतिम कब्जेहक्काची किंमत निश्चित करुन तिचा भरणा करण्याच्या दिनांकापर्यंत आकारावयाचा व्याजाचा दर तसेच, भाडेपट्टयाने देण्यात येणाऱ्या शासकीय जमिनीबाबत भूईभाडयासाठी आकारण्यात येणारा दर सन २०२१ या संपूर्ण वर्षासाठी ७% असा आकारण्यात यावा.

सदर शासन परिपत्रक वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५५/२०२१/५४२/व्यय-९ दिनांक २५.०१.२०२१ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसुरुन निर्गमित करण्यात येत आहेत.

२. सदर शासन परिपत्रक, महाराष्ट्र शासनाच्या (www.maharashtra.gov.in) या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२१०४२७१२०७३२२८१९ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAMESH SHIVAJI CHAVAN

Digitally signed by RAMESH SHIVAJI CHAVAN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=7ada4e8fa11566f3b9c9f7b5fa123945d54f8e3d5b09d05bedfa09b97ee45cad, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=eb458b05e05ee27f435bd399537405d44e1c88021cf038b060ac10b9d8fb8787, ou=REVENUE, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAMESH SHIVAJI CHAVAN
Date: 2021.04.27 15:31:39 +05'30'

(रमेश चव्हाण)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहाय्यक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व विभागीय आयुक्त.
६. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (१) मुंबई.
९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (२) नागपूर.
१०. सर्व जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी.
११. वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई.
१२.सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई.
१३. सर्व सहसचिव / उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१४. "ज" समुहातील सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई-०५.
१५. कक्ष अधिकारी (ल-१), संगणक शाखा, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-०५.
१६. निवडनस्ती कार्यासन ज-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

भाडेपट्ट्याने/ कब्जेहक्काने प्रदान केलेल्या शासकिय जमिनींवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदस्यत्व नियमानुकूल करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : जमीन-२०१७/प्र.क्र.९८/ज-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २२ फेब्रुवारी, २०२२

वाचा:-

१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. जमीन-२०१७/प्र.क्र.९८/ज-१, दि.०७.०७.२०१०
२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. जमीन-२०१७/प्र.क्र.१२७/ज-१,दि. ०७.०७.२०१७
३. शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१२७/ज-१ दि.०४.०५.२०१८

प्रस्तावना :-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम-४० व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम,१९७१ च्या नियम-२७ मधील तरतुदीनुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांची निवासी प्रयोजनार्थ शासकीय जमीन प्रदानाबाबतची मागणी आणि गुणक्रम विचारात घेऊन, शासकीय जमीन संबंधीत संस्थांना कब्जेहक्काने अथवा भाडेपट्ट्याने सवलतीच्या दराने प्रदान करण्यात आलेल्या आहेत. या संदर्भात दिनांक ०९/०७/१९९९ च्या शासन निर्णयान्वये धोरण निश्चित केले होते. त्यानंतर यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या सर्व शासन निर्णयांचे संकलन करून दिनांक २५/०५/२००७ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित सर्व समावेशक शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तथापि, अनेक प्रकरणांमध्ये शासनाने प्रदान केलेल्या जमिनींवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांनी सक्षम प्राधिकाऱ्याची परवानगी न घेताच काही व्यक्तींना सदस्यत्व बहाल केल्याचे दिसून येते. तसेच, काही प्रकरणी अशा पद्धतीने सदस्यत्व मिळालेली व्यक्ती मयत झाल्याची किंवा सदस्यत्व अन्य व्यक्तीला हस्तांतरीत केल्याचेही आढळून आलेले आहे. अशा परिस्थितीत शर्तभंग नियमानुकूल करण्याची कार्यवाही कोणत्या निकषांन्वये करावी, या अनुषंगाने संदर्भाधीन क्र.१ वरील दिनांक ०७/०७/२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये क्षेत्रीय महसूल यंत्रणांना दिशानिर्देश दिलेले आहेत. तथापि, उपरोक्त दिशानिर्देशामध्ये एखाद्या सदस्याने राजीनामा दिल्यामुळे संस्थेने अनेकवेळा सभासद बदलल्याचा /विनापरवाना झालेल्या हस्तांतरणांचा समावेश नव्हता, त्यामुळे असे शर्तभंग नियमानुकुल करतांना अडचणी येत असल्याची बाब क्षेत्रीय कार्यालयाकडून निदर्शनास आणण्यात आली. या अनुषंगाने शर्तभंग नियमानुकुल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

१) **अ)** सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता प्राप्त नसलेला सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सदस्य हा मुळ सदस्याची पात्रता पूर्ण करीत असेल व सदनिका धारण करीत असेल तर अशा व्यक्तीने सदनिका ज्या प्रथम वर्षी धारण केली आहे, त्या वर्षाच्या वार्षिक दर विवरणपत्रातील दराच्या १ टक्के दंडनीय अधिमूल्य आकारुन सक्षम प्राधिकारी अशा व्यक्तीस संबंधीत गृहनिर्माण संस्थेचे सदस्य म्हणून कार्योत्तर मंजुरी देतील.

ब) सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता प्राप्त नसलेला सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सदस्य हा मुळ सदस्याची पात्रता पूर्ण करीत नसेल परंतू सदनिका धारण करीत असेल तर, अशा व्यक्तीने

सदनिका ज्या प्रथम वर्षी धारण केली आहे, त्या वर्षाच्या वार्षिक दर विवरणपत्रातील दराच्या २ टक्के दंडनीय अधिमूल्य आकारुन सक्षम प्राधिकारी अशा व्यक्तीस संबंधीत गृहनिर्माण संस्थेचे सदस्य म्हणून कार्योत्तर मंजुरी देतील.

२) **अ)** सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता प्राप्त नसलेला **मयत** सदस्य हा मुळ सदस्यत्वाची पात्रता पूर्ण करीत असून त्यांचे वारस सदनिका धारण करीत आहेत, अशा प्रकरणी, सदर व्यक्तीने ज्या वर्षी प्रथम वेळी सदनिका धारण केली आहे, त्या वर्षाच्या वार्षिक दर विवरणपत्रातील दराच्या १टक्के दंडनीय अधिमूल्य वारसाकडून आकारुन सक्षम प्राधिकारी अशा मयत व्यक्तीच्या सदस्यत्वास कार्योत्तर मंजुरी देतील.

ब) सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता प्राप्त नसलेला **मयत** सदस्य हा मुळ सदस्यत्वाची पात्रता पूर्ण करीत नसल्यास आणि त्यांचे वारस सदनिका धारण करीत असतील तर, अशा मयत व्यक्तीने ज्या प्रथम वर्षी सदनिका धारण केली आहे, त्या वर्षाच्या वार्षिक दर विवरणपत्रातील दराच्या २ टक्के दंडनीय अधिमूल्य वारसाकडून आकारुन सक्षम प्राधिकारी अशा मयत व्यक्तीच्या सदस्यत्वास कार्योत्तर मंजुरी देतील.

३) **अ)** सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता प्राप्त नसलेला सदस्य हयात नसेल आणि त्यापूर्वीच त्याने अनधिकृतरित्या अन्य व्यक्तीस सदस्यत्व हस्तांतर केले असेल, अशा प्रकरणी सदर मयत व्यक्ती संबंधित गृहनिर्माण संस्थेचे सदस्यत्व धारण करण्यास पात्र असल्याची खात्री करुन सक्षम प्राधिकारी प्रथम मयत व्यक्तीच्या सदस्यत्वास प्रतीकात्मक (notional) कार्योत्तर मंजुरी देईल.

ब) अशी **हयात नसलेली व्यक्ती** गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यत्वासाठीची पात्रता धारण करीत नसल्यास तसेच अशा व्यक्तींच्या वारसाकडे सदनिकेचे अधिकार धारण केल्याबाबत तत्कालीन वेळेचे कागदपत्रे/ उत्पन्नाचा दाखला/ इतर अनुषंगीक आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसल्यास अथवा संबंधीत गृहनिर्माण संस्थेकडेही अशा मयत व्यक्तीची सदनिकेचा अधिकार प्राप्त केलेबाबतची कागदपत्रे उपलब्ध नसल्यास अशा व्यक्तीच्या सदस्यत्वास कार्योत्तर मंजूरी देणे आवश्यक राहणार नाही.

क) अशा मयत व्यक्तीने ज्या अन्य व्यक्तीच्या नावे अनधिकृतरित्या सदस्यत्व हस्तांतरीत केले असेल व अशी व्यक्ती सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यत्वाची पात्रता पूर्ण करीत असेल व सदनिका धारण करीत असेल तर अशा व्यक्तीने ज्या प्रथम वर्षी सदनिका धारण केली आहे. त्या वर्षाच्या वार्षिक दर विवरणपत्रातील दराच्या २.५ टक्के दंडनीय अधिमूल्य व त्या वर्षीच्या प्रचलित धोरणानुसार हस्तांतरण शुल्क आकारुन सक्षम प्राधिकारी अशा व्यक्तीस सदस्य म्हणून कार्योत्तर मंजूरी देतील.

ड) अशा मयत व्यक्तीने ज्या अन्य व्यक्तीच्या नावे अनधिकृतरित्या सदस्यत्व हस्तांतरीत केले असेल व अशी व्यक्ती सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यत्वाची पात्रता पूर्ण करीत नसेल तथापि सदनिका धारण करीत असेल तर अशा व्यक्तीने ज्या प्रथम वर्षी सदनिका धारण केली आहे, त्या वर्षाच्या वार्षिक दर विवरणपत्रातील दराच्या ५ टक्के दंडनीय अधिमूल्य व त्या वर्षीच्या प्रचलित धोरणानुसार हस्तांतरण शुल्क आकारुन सक्षम प्राधिकारी अशा व्यक्तीस सदस्य म्हणून कार्योत्तर मंजूरी देतील.

४) **अ)** सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता प्राप्त नसलेल्या सदस्य व्यक्तीने राजीनामा दिल्यामुळे अथवा अन्य कोणत्याही समुचित कारणास्तव त्याचे सदस्यत्व संबंधित गृहनिर्माण संस्थेने सक्षम

प्राधिकारी यांची मान्यता न घेता एखाद्या **अन्य व्यक्तीस** परस्पर दिले असेल व ती व्यक्ती **पात्रता पूर्ण करीत असून सदनिका धारण करीत असेल तर** अशा व्यक्तीने सदनिका ज्या प्रथम वर्षी धारण केली आहे, त्या वर्षाच्या वार्षिक दर विवरणपत्रातील दराच्या **२.५ टक्के दंडनीय अधिमूल्य** व त्या वर्षाच्या प्रचलित धोरणानुसार **हस्तांतरण शुल्क** आकारून सक्षम प्राधिकारी त्यांच्या सदस्यत्वास कार्योत्तर मंजूरी देतील.

ब) सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता प्राप्त नसलेल्या सदस्य व्यक्तीने राजीनामा दिल्यामुळे अथवा अन्य कोणत्याही समुचित कारणास्तव त्याचे सदस्यत्व संबंधित गृहनिर्माण संस्थेने सक्षम प्राधिकारी यांची मान्यता न घेता एखाद्या **अन्य व्यक्तीस** परस्पर दिले असेल व ती व्यक्ती **पात्रता पूर्ण करीत नसेल आणि सदनिका धारण करीत असेल तर** अशा व्यक्तीने सदनिका ज्या प्रथम वर्षी धारण केली आहे, त्या वर्षाच्या वार्षिक दर विवरणपत्रातील दराच्या **५टक्के दंडनीय अधिमूल्य** व त्या वर्षाच्या प्रचलित धोरणानुसार **हस्तांतरण शुल्क** आकारून सक्षम प्राधिकारी त्यांच्या सदस्यत्वास कार्योत्तर मंजूरी देतील.

५) **अ)** शासनाची/सक्षम प्राधिका-याची परवानगी न घेता गृहनिर्माण संस्थेने परस्पर एखाद्या **पात्रता धारण करणाऱ्या व्यक्तीस हस्तांतरणाने** सदस्यत्व दिल्यानंतर कार्योत्तर मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केल्याची सक्षम प्राधिकारी यांची खात्री झाल्यास, त्या व्यक्तीने सदनिका ज्या प्रथम वर्षी धारण केली आहे, त्या वर्षाच्या वार्षिक दर विवरणपत्रातील दराच्या **२.५ टक्के दंडनीय अधिमूल्य** व त्या वर्षीच्या प्रचलित धोरणानुसार **हस्तांतरण शुल्क** आकारून अशा व्यक्तीच्या सदस्यत्वास सक्षम प्राधिकारी कार्योत्तर मंजूरी देतील.

ब) शासनाची/सक्षम प्राधिका-याची परवानगी न घेता गृहनिर्माण संस्थेने परस्पर एखाद्या **पात्रता धारण न करणाऱ्या व्यक्तीस हस्तांतरणाने** सदस्यत्व दिल्यानंतर कार्योत्तर मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केल्याची सक्षम प्राधिकारी यांची खात्री झाल्यास, त्या व्यक्तीने सदनिका ज्या प्रथम वर्षी धारण केली आहे, त्या वर्षाच्या वार्षिक दर विवरणपत्रातील दराच्या **५ टक्के दंडनीय अधिमूल्य** व त्या वर्षीच्या प्रचलित धोरणानुसार **हस्तांतरण शुल्क** आकारून अशा व्यक्तीच्या सदस्यत्वास सक्षम प्राधिकारी कार्योत्तर मंजूरी देतील.

६) **अ)** एकापेक्षा जास्त वेळा सदनिकेचे हस्तांतरण झाले असल्यास **शेवटचे हस्तांतरणानंतर सदनिका धारण करणारी व्यक्ती सदस्यत्वासाठी पात्र असल्यास** शेवटचे हस्तांतर केलेल्या व्यक्तीने सदनिका ज्या प्रथम वर्षी धारण केली आहे त्या वर्षाच्या वार्षिक दर विवरणपत्रातील दराच्या **२.५ टक्के दंडनीय अधिमूल्य** व त्या वर्षीच्या प्रचलित धोरणानुसार **हस्तांतरण शुल्क** आकारून अशा व्यक्तीच्या सदस्यत्वास सक्षम प्राधिकारी कार्योत्तर मंजूरी देतील.

ब) एकापेक्षा जास्त वेळा सदनिकेचे हस्तांतरण झाले असल्यास **शेवटचे हस्तांतरणानंतर सदनिका धारण करणारी व्यक्ती सदस्यत्वासाठी अपात्र असल्यास** त्या व्यक्तीने सदनिका ज्या प्रथम वर्षी धारण केली आहे त्या वर्षाच्या वार्षिक दर विवरणपत्रातील दराच्या **५ टक्के दंडनीय अधिमूल्य** व त्या वर्षीच्या प्रचलित धोरणानुसार **हस्तांतरण शुल्क** आकारून अशा व्यक्तीच्या सदस्यत्वास सक्षम प्राधिकारी कार्योत्तर मंजूरी देतील.

७) गृहनिर्माण संस्थेने सक्षम प्राधिका-याची परवानगी न घेता अनधिकृतरित्या सदस्यत्व हस्तांतरण केले असेल अशा प्रकरणी संबंधीत गृहनिर्माण संस्थेस जबाबदार धरून सदर

संस्थेस सदनिका धारण केलेल्या प्रथम वर्षाच्या वार्षिक दर विवरणपत्रातील दराच्या **२.५ टक्के दंडनीय अधिमूल्य** आकारावे व सक्षम प्राधिकारी सहकार कायद्यातील तरतुदीनुसार संबधीत प्राधिकरणाकडे संस्थेविरुध्द कारवाई प्रस्तावित करतील.

८) या शासन निर्णयानुसार दंडणीय अधिमुल्याची परिगणना करताना संबंधित वर्षाचे वार्षिक दर विवरणपत्र उपलब्ध नसल्यास त्या वर्षीच्या बाजारमुल्याचा दर विचारात घेण्यात यावा.

९) हा शासन निर्णय निर्गमित झालेल्या दिनांकापूर्वी झालेल्या सदस्यत्वाच्या हस्तांतरणास या शासन निर्णयामधील तरतुदी लागू राहतील.

सदर शासन निर्णय हा वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.८१/साधनसंपत्ती, दि.०१.०६.२०२१ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२०२०३१३३००३०६१९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAMESH SHIVAJI CHAVAN

Digitally signed by RAMESH SHIVAJI CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7ada4a8fa115666f3b9c9f7b5fa123945d54f8e3d5b09d05bedfa09b97ee45cad, pseudonym=86B1E9618BCFE5A3EB89A89B442F95D22688C273, serialNumber=EB45B05E05EE27F435BD39953740SD44E1C88021CF038B060AC10B9D8FB8787, cn=RAMESH SHIVAJI CHAVAN
Date: 2022.02.22 13:14:10 +05'30'

(रमेश चव्हाण)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव, (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
८) अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
१०) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
११) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, .
१२) नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१४) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
१५) सर्व विभागीय आयुक्त.
१६) सर्व जिल्हाधिकारी.
१७) सर्व सहसचिव/उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.
१८) सर्व अवरसचिव/कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.
१९) सहसचिव (ज-१), यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) निवड नस्ती (ज-१).

******

शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर कब्जेहक्काच्या किंमतीवर आकारावयाच्या व्याजाच्या दराबाबत व भाडेपट्ट्याने द्यावयाच्या जमिनीच्या वार्षिक भाडेपट्ट्याच्या दराबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक :- पीएलआर-२०१६/प्र.क्र.२६/ज-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- २१ जून, २०२२.

वाचा :- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एलएमडी १०९२/प्र.क्र.८४/ज-१, दिनांक ३०.६.१९९२
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. जमीन १०९७/२२१४/प्र.क्र.९३/ज-१, दिनांक ८.७.१९९९

प्रस्तावना :-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता - १९६६ आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम- १९७१ मधील तरतूदीनुसार शासकिय जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर, कब्जेहक्काने किंवा भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनी संदर्भात आकारण्यात येणाऱ्या व्याजाच्या व भूईभाडयाच्या दरामध्ये झालेली सुधारणा विचारात घेऊन शासन निर्णय दि.०८.०७.१९९९ अन्वये सुधारित आदेशा नुसार पुढील तरतुद करण्यात आली आहे. :-

"आगाऊ ताबा दिलेल्या शासकिय जमिनीच्या अंतिम किंमतीवर तथा तात्पुरती किंमत व अंतिम किंमत यातील थकीत रकमेवर आकारावयाच्या व्याजाचा दर आणि भूईभाड्याने दिलेल्या शासकीय जमिनीच्या वार्षिक भूईभाड्याचा दर भारतीय स्टेट बँकेच्या "प्राईम लेंडींग रेट" इतका असावा. हा दर दरवर्षी दि. ०१ जानेवारीच्या भारतीय स्टेट बँकेच्या "प्राईम लेंडींग रेट" च्या दराइतका असावा आणि तो त्या संपूर्ण वर्षाकरिता कायम असावा.."

उक्त तरतुदीच्या अनुषंगाने भारतीय स्टेट बॅकेचा त्या-त्या वर्षी ०१ जानेवारी रोजी असलेल्या सुधारित निर्देशानुसार P.L.R. ऐवजी M.C.L.R. (Marginal Cost of Funds based Lending Rate) ही संज्ञा (term) वापरण्यात येत आहे. त्यानुसार दि.१९.०१.२०२२ रोजी च्या पत्रान्वये भारतीय स्टेट बँकेने संपूर्ण वर्षासाठीचा M.C.L.R.दर निश्चित केल्याचे कळविले आहे. त्यामुळे आगाऊ ताबा दिलेल्या शासकीय जमिनीच्या अंतिम किंमतीवर तथा तात्पुरती किंमत व अंतिम किंमत यातील थकीत रकमेवर आकारावयाच्या व्याजाचा दर आणि भूईभाडयाने दिलेल्या शासकीय जमिनीच्या वार्षिक भूईभाडयाचा दर सन २०२२ या संपूर्ण वर्षासाठी घोषित करुन तो क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :-

शासकिय जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर, अशा जमिनींच्या कब्जेहक्काच्या रकमेवर, त्या जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यापासून ते अंतिम कब्जेहक्काची किंमत निश्चित करुन तिचा भरणा करण्याच्या दिनांकापर्यंत आकारावयाच्या व्याजाचा दर तसेच, भाडेपट्टयाने देण्यात येणाऱ्या शासकीय जमिनीबाबत भूईभाडयासाठी आकरण्यात येणारा दर सन २०२२ या संपूर्ण वर्षासाठी ७% असा आकारण्यात यावा.

सदर शासन परिपत्रक वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारिक सदर्भ क्र.४५/२०२२ / व्यय-९, दिनांक ०८/०२/२०२२ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहेत.

२. सदर शासन परिपत्रक, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२२०६२११५१४१८९८१९ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUHAS MADHAV MAMDAPURKAR

Digitally signed by SUHAS MADHAV MAMDAPURKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=15e9cd7730234dc2963eb61397dd04240c15d02a5a148c43a83593ac725fd19c, pseudonym=1A2F622DE5904FF048601C73A184349D5EEECBB8, serialNumber=F1B00E718156EED7B08803397FED3A96870CA795C4D9384B72F43A5A066D99, cn=SUHAS MADHAV MAMDAPURKAR
Date: 2022.06.21 15:19:37 +05'30'

(सुहास ममदापूरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहाय्यक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व विभागीय आयुक्त.
७. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (१) मुंबई.
१०. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (२) नागपूर.
११. सर्व जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी.
१२. वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई.
१२.सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई.
१३. सर्व सहसचिव / उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१४. "ज" समुहातील सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई-०५.
१५. कक्ष अधिकारी (ल-१), संगणक शाखा, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-०५.
१६. निवडनस्ती कार्यासन ज-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन परिपत्रक क्र. जमीन-२०२२/ प्र.क्र.२६४/ज-१

पहिला मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक:- १३ जानेवारी, २०२३

वाचा:-

१) शासन परिपत्रक क्रमांक:- एलएनडी १०८१/३१९४९-प्र.क्र.-१५८१-ग-५, दि. १३ ऑक्टोबर, १९८१

२) शासन निर्णय क्रमांक:- एलबीएल १०८६/२६४४/प्र.क्र.१९६/ग-८, दिनांक १४ जून, १९८८

३) शासन निर्णय क्रमांक:- एलएनडी १०८५/१३४२२२/प्र.क्र.१८४/ज-२, दिनांक ०५ ऑक्टोबर, १९९९

४) शासन निर्णय क्रमांक:- जमीन १०/२००२/प्र.क्र.३८७/ज-१, दिनांक: २९ मे, २००६

५) शासन परिपत्रक क्रमांक:- संकिर्ण-०५/२००६/प्र.क्र.४३/ज-१, दिनांक: ३१ ऑक्टोबर, २००६

६) शासन परिपत्रक क्रमांक:- जमीन ११/२००७/प्र.क्र.९८/ज-१, दिनांक ३१ डिसेंबर, २००७

७) शासन निर्णय, म.व.व.वि.क्र.जमीन-११/२००७/प्र.क्र.९८/ज-१, दिनांक २९ एप्रिल, २००८

८) शासन पूरकपत्र क्र. जमीन १०/२००२/प्र.क्र.३८७/ज-१, दि. ६ मे, २००८

९) शासन निर्णय क्रमांक:- जमीन-२०१९/प्र.क्र.०१/ज-१, दिनांक १८ फेब्रुवारी, २०१९

१०) शासन परिपत्रक क्रमांक:- मुद्रांक-२०१७/अनौ.क्र.११/प्र.क्र.१३३/म-१ (धोरण) दिनांक: २४ डिसेंबर २०२०

प्रस्तावना:

शासकीय जमिनी विविध प्रयोजनासाठी कब्जेहक्काने/भाडेपट्टयाने देताना तसेच अनर्जित उत्पन्नाची परिगणना करण्यासाठी जमिनीचे मुल्यांकन करताना विविध कार्यपध्दतीसह वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यानुसार मुल्यांकन करण्याच्या सूचना वरील शासन निर्णय / परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. तसेच, संदर्भीय क्र. १० मधील शासन परिपत्रक दि. २४ डिसेंबर, २०२० अन्वये संदर्भीय क्र. ६ वरील शासन परिपत्रक दि. ३१ डिसेंबर, २००६ या प्रयोजनासाठी अधिक्रमित केले आहे.

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, विविध प्रयोजनसाठी शासनाने प्रदान केलेल्या जमिनीबाबत करारनामा करताना, त्यावर मुद्रांक शुल्क आकारताना वरील संदर्भाधीन शासन निर्णय/परिपत्रक यातील सूचनांचा विचार करुन मुद्रांक शुल्क ठरविले जात आहे. तथापि, एखादया दस्तावर किती रकमेचे मुद्रांक शुल्क आकारावे याबाबतच्या तरतुदी मुद्रांक शुल्क कायदा/मिळकतीचे खरे-खुरे बाजारमुल्य ठरविणेबाबतचे नियम व त्या अनुषंगाने निर्गमित केलेले शासन निर्णय परिपत्रक/ सूचना यानुसार आकारणे अपेक्षित आहे. या बाबींचा विचार करुन पुढील प्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन परिपत्रक :-

शासनाने कब्जेहक्काने/करारनाम्याने/भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या जमिनीचे दस्त/ करारनामे निष्पादन/ नोंदणी करताना आवश्यक मुद्रांक शुल्काची परिगणना करताना उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय/परिपत्रकान्वये दिलेल्या सुचनांनुसार मिळकतींचे मुल्यांकन न करता उक्त दस्तांवर/करारनाम्यावर आकारावयाचे मुद्रांक शुल्क हे महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम/ मिळकतीचे खरे- खुरे बाजारमुल्य निर्धारीत करणे नियम व त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय/ परिपत्रक/आदेश यामधील तरतुदींनुसार आकारण्यात यावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२३०११३१६३५१०८५१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUHAS MADHAV MAMDAPURKAR

Digitally signed by SUHAS MADHAV MAMDAPURKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=15e9cd7730234dc2963eb61397dd04240c15d02a5a148c43a83593ac725fd19c, pseudonym=1A2F622DE5904FF048601C73A1843490SEEEC888, serialNumber=F1B00E7181536EEDD7B08803397FED3A96870CA795C4D9384B72F43A5A066D99, cn=SUHAS MADHAV MAMDAPURKAR
Date: 2023.01.13 16:39:39 +05'30'

(सुहास ममदापूरकर)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहाय्यक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (१) मुंबई.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (२) नागपूर
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व सहसचिव / उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२. "ज" समुहातील सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई
१३. निवडनस्ती कार्यासन ज-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

स्वातंत्र्य सैनिकांना निवासी प्रयोजनासाठी शासकीय जमीन देण्याबाबत सुधारित कौटुंबिक मासिक उत्पन्न मर्यादा वाढविण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय, क्रमांक जमीन-२०२१/प्र.क्र.५३/ज-१,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक : ३० जून,२०२३

वाचा :- १) शासन परिपत्रक,महसूल व वन विभाग क्रमांक ११-२०३९५८-आ.१, दि.१४ मार्च,१९६७.
२) शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्रमांक एलएनडी-१०७३/२९०८४/अ-१,दि.२ डिसेंबर,१९७४.
३) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्रमांक एलएनडी१०९०/२२४८६६/प्र.क्र.१७५/ज१, दि. २५ जानेवारी,१९९३.
४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक जमीन १०९८/१२७/प्र.क्र.२१/ज-१, दि.१२ ऑक्टोबर,१९९९.
५) शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्रमांक जमीन ११०५/प्र.क्र.९८/ज-१, दि.१ जून,२००७.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीचे वितरण) नियम, १९७१ च्या नियम २८ मध्ये स्वातंत्र्य सैनिकांना जमीन देण्याबाबत तरतूद आहे. निवृत्ती वेतनधारक स्वातंत्र्यसैनिकांना निवासी प्रयोजनासाठी ग्रामीण भागात तसेच, नागरी भागात भूखंड देणे शक्य व्हावे याकरीता महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीचे वितरण) नियम, १९७१ च्या नियम २८ अन्वये असलेल्या तरतुदीनुसार स्वातंत्र्य सैनिकांना निवासी प्रयोजनाकरीता ग्रामीण व नागरी भागात शासकीय जमीन देण्याबाबत दि. १ जून,२००७ च्या शासन निर्णयान्वये या बाबतचे धोरण तसेच, कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. सदरहू शासन निर्णयामध्ये उपरोक्त प्रयोजनासाठी एकत्रित कौटुंबिक मासिक उत्पन्न दरमहा १०,०००/- किंवा त्यापेक्षा कमी अशी अट विहीत करण्यात आली होती.

मात्र, सदरहू उत्पन्न मर्यादा सुमारे १५ वर्षापूवी सुनिश्चित केली आहे. तसेच दि. ०१ जून,२००७ पासून आजपर्यत कुशल, अर्धकुशल कामगारांच्या किमान मासिक वेतनामध्ये देखील भरघोस वाढ झाली आहे, या बाबी विचारात घेऊन वयोवृध्द असणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांना निवासी प्रयोजनासाठी जागा प्रदान करण्याच्या अनुषंगाने एकत्रित कौटुंबिक मासिक उत्पन्न मर्यादा वाढविण्याची बाब विचाराधीन होती.

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेऊन, दि. ०१ जून,२००७ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेली एकत्रित मासिक उत्पन्नाची मर्यादा वाढविण्याबाबत पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीचे वितरण) नियम, १९७१ च्या नियम २८ मध्ये स्वातंत्र्य सैनिकांना जमीन देण्याबाबत तरतूद आहे. दि. ०१ जून,२००७ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.अ येथे नमूद केल्यानुसार " निवृत्ती वेतन धारक स्वातंत्र्य सैनिकांना निवासी प्रयोजनासाठी निवासी जागा प्रदान करणे **बाबतची एकत्रित कौटुंबिक मासिक उत्पन्नाची दरमहा रु.१०,०००/- किंवा त्यापेक्षा कमी "असलेली मर्यादा सुधारित करुन " एकत्रित कौटुंबिक उत्पन्नाची मर्यादा आता रुपये ३०,०००/- किंवा त्यापेक्षा कमी"** अशी विहीत करण्यात येत आहे.

शासन निर्णय क्रमांक जमीन ११०५/प्र.क्र.९८/ज-१, दि. ०१ जून,२००७ मधील उर्वरित तरतूदी या कायम राहतील.

०२. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४२/२०२२/व्यय-९, दि.०३.०२.२०२२ तसेच, अ.नौ.२१/सासं, दि.११.२.२०२२ अन्वये त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०६३०२०२२३५७११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUHAS MADHAV MAMDAPURKAR

Digitally signed by SUHAS MADHAV MAMDAPURKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=15e9cd7730234dc2963eb61397dd04240c15d02a5a148c43a83593ac725fd19c, pseudonym=1A2F62ZDE5904FF048601C73A184349D5EEECB8B, serialNumber=F1B00E7181536EEDD7B08803397FED3A96870CA795C4D93B4B72F43ASA066D99, cn=SUHAS MADHAV MAMDAPURKAR
Date: 2023.06.30 20:23:23 +05'30'

(सुहास ममदापूरकर)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग

प्रत :-

सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व मंत्रालयीन विभाग.

शासनाने प्रदान केलेल्या जमिनीचे / भूखंडाचे हस्तांतरणाबाबत आकारावयाच्या अनर्जित रकमेचे एकत्रित सुधारीत धोरण...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक:- जमीन-२०२२/ प्र.क्र.१०६/ज-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ०५ जुलै, २०२३

वाचा :-

१. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३७अ
२. महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ मधील नियम ३१
३. शासन निर्णय क्र. एलएनडी-४८५७/१६९१४६-एआय, दि.२१ नोव्हेंबर १९५७
४. शासन निर्णय क्र.एलएनडी-३२०८/२८४४-ए, दि. ११ सप्टेंबर, १९६८
५. शासन निर्णय क्र. एलएनडी-१०८३/२७९२५/प्र.क्र.३६७१/ग-६, दि. ८ सप्टेंबर, १९८३
६. शासन निर्णय क्र.जमीन १०/२००२/प्र.क्र.३८७/ज-१, दि. २९ मे, २००६
७. शासन निर्णय क्र. जमीन-११/२०१३/प्र.क्र.५०२/ज-१, दि. २८ जानेवारी, २०१४
८. शासन अधिसूचना क्र. जमीन-२०१७/ प्र.क्र.२६९/ज-१, दि. १४ फेब्रुवारी, २०२०

प्रस्तावना :-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील तरतूदी अन्वये शासकीय जमिनी विहित अटी व शर्तींच्या अधीन राहून कब्जेहक्काने अथवा भाडेपट्टयाने निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक व अन्य प्रयोजनासाठी वेळोवेळी विविध व्यक्ती किंवा संस्था यांना प्रदान करण्यात आल्या/ येत आहेत. राज्यात मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा यांसह अन्य जिल्हयांमध्ये सदर संहिता अस्तित्वात येण्यापूर्वी देखील अनेक शासकीय जमिनी भाडेपट्टयाने निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक इत्यादी प्रयोजनांसाठी प्रदान करण्यात आलेल्या आहेत.

भाडेपट्टयाने / कब्जेहक्काने प्रदान करण्यात आलेल्या शासकीय जमिनीच्या तसेच, अशाप्रकारच्या शासकीय जमिनीचे वाटप केल्यानंतर जागेच्या वापरामध्ये बदल करण्यासंदर्भात, झालेले शर्तभंग नियमित करण्यासंदर्भात व अशा जमिनीची खुल्या बाजारात विक्री करतेवेळी लागू असणाऱ्या अनर्जित उत्पन्नाची रक्कम निश्चित करुन संबंधितांकडून वसूल करण्याबाबत वेळोवेळी आदेश/ शासन निर्णय/ शासन परिपत्रक निर्गमित झालेले आहेत.

तथापि, असे आढळून आले आहे की, वरील सर्व शासन निर्णय/परिपत्रक/नियमातील तरतूदी वेगवेगळ्या पद्धतीने मांडल्यामुळे क्षेत्रीय स्तरावर अनर्जित उत्पन्न वेगवेगळया पध्दतीने परिगणित करण्यात येत आहे. सदर बाब विचारात घेता, अनर्जित रक्कम आकारावयाच्या कार्यपद्धतीबाबत यापूर्वीचे शासन निर्णय / परिपत्रके यांचा फेरविचार करुन एकत्रितरित्या खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील तरतुदीनुसार अथवा तत्पूर्वीच्या तत्सम नियमातील तरतूदीनुसार (प्रचलित धोरणातील अटी/ शर्ती नुसार) कब्जेहक्काने प्रदान केलेल्या जमिनींना विक्री परवानगी देणे अथवा अशा जमिनीचे बेकायदेशीर/नियमबाह्य हस्तांतरण नियमानुकूल करतांना आकारावयाच्या अनर्जित उत्पन्न/नजराणा रक्कमेबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

अ.क्र.	भूखंडाचे हस्तांतरण/वापरात बदल केल्याचा तपशील (अ)	मुल्यांकनानुसार आकारावयाची अनर्जित रक्कम	
		पूर्व परवानगीने हस्तांतरण/वापरात बदल केल्यास (ब)	परवानगीशिवाय हस्तांतरण/वापरात बदल केल्यास (क)
१	कृषि ते कृषि	५०%	५०+१०= ६०%
२	कृषि ते अकृषिक	६०%	६०+१५= ७५%
३	अकृषिक जमीन/भूखंड ते पूर्वीच्याच वापरासाठी हस्तांतरण	५०%	५०+१०= ६०%
४	अकृषिक जमीन/भूखंडाच्या वापरात बदलास परवानगी	६०%	६०+१५= ७५%

टिप:- (१) भूखंडाचे हस्तांतरण / वापरात बदल पूर्व परवानगीने केल्यास वरील रकान्यातील (ब) नुसार अनर्जित रकमेची आकारणी करुन अशी प्रकरणे पूर्व परवानगी देण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे **"जिल्हाधिकारी"** हे **"सक्षम प्राधिकारी"** असतील.

तर, भूखंडाचे हस्तांतरण / वापरात बदल पूर्व परवानगीने न केल्यास वरील रकान्यातील (क) नुसार अनर्जित रकमेची आकरणी करुन अशी प्रकरणे नियमानुकूल करण्यासाठी **"राज्य शासन"** हे **"सक्षम प्राधिकारी"** असेल.

(२) आकारावयाच्या अनर्जित रकमेची परिगणना करतांना शासन अधिसूचना दि.१४/०२/२०२० अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ च्या नियम ३१ मधील स्पष्टीकरणाप्रमाणे कार्यवाही करावी.

(३) अनर्जित उत्पन्नाची परिगणना करण्याबाबत शासन निर्णय दि.२१/११/१९५७, दि.११/०९/१९६८,दि.०८/०९/१९८३ तसेच, यापूर्वीच्या इतर कोणत्याही सूचना/मार्गदर्शक तत्वांचा विचार करण्यात येऊ नये.

(४) धर्मादाय प्रयोजनासाठी संस्था आणि सार्वजनिक सोयी / सुविधा निर्माण करण्यासाठी ज्या संस्थांना जमिनी प्रदान केल्या असतील अशा संस्थांच्या जमिनीबाबत या शासन निर्णयातील तरतूदी लागू राहणार नाहीत.

हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ६५/ २०२३/ व्यय-९, दि. १४/२/२०२३ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०७०५१६४०५४४५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUHAS MADHAV MAMDAPURKAR

(सुहास ममदापूरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई.

पृष्ठ ३ पैकी २

शासकीय जमीन शैक्षणिक प्रयोजनासाठी प्रदान करताना आकारावयाच्या दरांमध्ये सुधारणा करणे, शैक्षणिक प्रयोजनासाठी झालेली अतिक्रमणे नियमानुकूल करणे व शैक्षणिक संस्थांना प्रदान केलेल्या जमिनीच्या वापराच्या अनुषंगाने दिशानिर्देश देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः जमीन-२६२१/प्र.क्र. ०३/ ज-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ३१ जुलै, २०२३

संदर्भ :-

१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एलआरएफ-१०८३/७११३४/सीआर-३४७८/ जी-६, दिनांक ८.२.१९८३
२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एलआरएफ-१०८३/१४९६/सीआर-३७००/ जी-६, दिनांक ११.५.१९८४
३. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एलआरएफ-१०९२/प्र.क्र.८७/ज-१, दिनांक ३०.६.१९९२ व दिनांक २०.७.१९९२
४. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एलआरएफ-१०९३/ प्र.क्र. ६१/ ज-१, दिनांक २०.७.१९९५

प्रस्तावना :-

राज्यामध्ये प्राथमिक व माध्यमिक शैक्षणिक प्रयोजनासाठी शासकीय जमीन वाटपासंदर्भात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील तरतुदी अन्वये शासन निर्णय, दिनांक ८/२/१९८३, दिनांक ११/५/१९८४ अन्वये धोरण विहित केले आहे. सदर धोरणानुसार जमिनीचे दिनांक १/२/१९७६ रोजीचे बाजारमुल्य विचारात घेण्यात येते. सदर धोरण निश्चित करुन बराच कालावधी लोटलेला असून दरम्यानच्या कालावधीमध्ये जमिनींच्या किंमतीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे.

संदर्भ (३) व (४) येथील शासन निर्णयान्वये शासकीय जमिनी महाविद्यालयांसाठी व उच्च माध्यमिक विद्यालये तथा कनिष्ठ महाविद्यालये यांना प्रदानासमयी आकारावयाची सवलतीची किंमत / भाडेपट्टयाचे दर सुधारित केले आहेत. तथापि, सदर धोरण निश्चित करुन देखील बराच कालावधी लोटलेला असून दरम्यानच्या कालावधीमध्ये जमिनीच्या किंमतीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे.

त्यामुळे प्राथमिक व माध्यमिक शैक्षणिक प्रयोजनासाठी तसेच महाविद्यालयांसाठी व उच्च माध्यमिक विद्यालये तथा कनिष्ठ महाविद्यालये यांना शासकीय जमिनी प्रदानासमयी

आकारावयाची सवलतीची किंमत / भाडेपट्टयाचे दर सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी शासकीय जमीन मंजूर करण्याकरिता कोणते दर आकारावेत, याबाबत शासनाच्या प्रचलित धोरणामध्ये तरतूद नसल्यामुळे यानुषंगाने दर निश्चत करण्याची बाब देखील शासनाच्या विचाराधीन होती.

उच्च शिक्षण प्रयोजनासाठी दिलेली जमीन प्राथमिक व माध्यमिक शिक्षण प्रयोजनासाठी आणि प्राथमिक व माध्यमिक शिक्षण प्रयोजनासाठी दिलेली जमीन उच्च शिक्षण प्रयोजनासाठी वापरास परवानगी देणे, यापुर्वी शैक्षणिक संस्थांना क्रीडांगणासाठी दिलेली जमीन अन्य शैक्षणिक प्रयोजनासाठी वापरण्यास परवानगी देणे, शैक्षणिक प्रयोजनासाठी भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनी कब्जेहक्काने रुपांतरीत करण्यास परवानगी देणे यानुषंगाने निर्णय घेण्याची बाब देखील शासनाच्या विचाराधीन होती.

तसेच शैक्षणिक प्रयोजनाचा वापर हा सार्वजनिक वापर असल्याने, आणि त्याची मदत समाजोन्नती करीता होत असल्याने, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे), नियम १९७१ मधील तरतुदीनुसार शैक्षणिक प्रयोजनाची दिनांक ०१ जानेवारी, २०१५ रोजी पर्यंतची शासकिय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची बाब देखील शासनाच्या विचाराधीन होती.

यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

<u>शासन निर्णय</u> :-

०१. पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक (इ. ११ वी व १२ वी पर्यंतची कनिष्ठ महाविद्यालये) तसेच महाविद्यालये यांना शैक्षणिक प्रयोजनासाठी शासकीय जमीन प्रदान करताना आकरावयाचे सुधारित दर तसेच शैक्षणिक संस्थांना प्रदान केलेल्या जमिनीचा शैक्षणिक प्रयोजनांतर्गत बदल करुन वापर करण्यास मान्यता देताना यापुढे आकारावयाचे दर खालीलप्रमाणे असतील:-

अ.क्र	शिक्षण संस्था / प्रयोजन	भोगाधिकार मूल्याचा / अधिमूल्याचा दर / वार्षिक भाडेपट्टयाचा दर
१	२	३
(i)	पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक (इ. ११ वी व १२ वी पर्यंतची कनिष्ठ महाविद्यालये) या प्रयोजनासाठी शासकीय जमीन प्रदान करणे --	**(१) कब्जेहक्काने जमीन प्रदान करणे-** जमिनीच्या प्रचलित बाजार मुल्याच्या **२०%** **(२) वार्षिक भाडेपट्टीने --** वरील प्रमाणे येणाऱ्या रक्कमेवर शासनाने विहीत केलेल्या भाडेपट्टयाच्या दराने.

(ii)	उच्च शिक्षणासाठी, म्हणजेच कला, विज्ञान, वाणिज्य, विधी इ. महाविद्यालये, हॉस्पिटलशी संलग्न मेडीकल कॉलेज, पॉलिटेक्निक संस्था, इंजिनिअरींग, डी. एड. कॉलेज, बी. एड. कॉलेज व अन्य तत्सम महाविद्यालयीन शिक्षण संस्था या प्रयोजनासाठी शासकीय जमीन प्रदान करणे --	**(१) कब्जेहक्काने शासकीय जमीन प्रदान करणे:-** जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या **३०%** **(२) वार्षिक भाडेपट्टीने** -- वरील प्रमाणे येणाऱ्या रक्कमेवर शासनाने विहीत केलेल्या भाडेपट्टयाच्या दराने.
(iii)	पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शिक्षणासाठी दिलेली जमीन उच्च शिक्षणासाठी वापरण्यास परवानगी देणे --	**(१) कब्जेहक्काने:--** जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या **२५%.** तथापि, सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व मान्यतेशिवाय वापर सुरू झाला असल्यास, जमिनीच्या प्रचलित बाजारमूल्याच्या ३% अतिरिक्त अधिमूल्य आकारण्यात यावे. **(२) वार्षिक भाडेपट्टीने**-- जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या **२५%** प्रमाणे येणाऱ्या रक्कमेवर शासनाने विहीत केलेल्या भाडेपट्टयाच्या दराने. तथापि, सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व मान्यतेशिवाय वापर सुरू झाला असल्यास, जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या ३% अतिरिक्त अधिमूल्य आकारण्यात यावे.
(iv)	उच्च शिक्षणासाठी दिलेली शासकीय जमीन पूर्ण किंवा अंशतः भाग पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षणासाठी वापरण्यास परवानगी देणे --	कोणतीही रक्कम आकारु किंवा कमी करण्यात येऊ नये. मात्र, ज्यादा भरलेली रक्कम परत मिळणार नाही. तथापि, सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व मान्यतेशिवाय वापर सुरू झाला असल्यास, जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या ३% अधिमूल्य आकारण्यात यावे.
(v)अ	शैक्षणिक संस्थांना क्रिडांगणासाठी दिलेली जमीन किंवा जमिनीचा अंशत भाग उच्च शिक्षणासाठी वापरायचा वापरण्यास परवानगी देणे-	*(क्रिडांगण प्रयोजनासाठी आवश्यक जमीन ठेवून उर्वरीत जमीन)* **(१) कब्जेहक्काने:--** जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या **२५%.** तथापि, सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व मान्यतेशिवाय वापर सुरू झाला असल्यास, जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या ३% अतिरिक्त अधिमूल्य आकारण्यात

		यावे. **(२) वार्षिक भाडेपट्टीने** -- जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या **२५%** प्रमाणे येणाऱ्या रक्कमेवर शासनाने विहीत केलेल्या भाडेपट्टयाच्या दराने. तथापि, सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व मान्यतेशिवाय वापर सुरू झाला असल्यास, जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या **३%** अतिरिक्त अधिमूल्य आकारण्यात यावे.
(v)ब	शैक्षणिक संस्थांना क्रिडांगणासाठी दिलेली शासकीय जमीन किंवा जमिनीचा अंशत: भाग पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षणासाठी वापरण्यास परवानगी देणे	*(क्रिडांगण प्रयोजनासाठी आवश्यक जमीन ठेवून उर्वरीत जमीन)* **(१) कब्जेहक्काने:-** जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या **१५%**. तथापि, सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व मान्यतेशिवाय वापर सुरू झाला असल्यास, जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या **३%** अतिरिक्त अधिमूल्य आकारण्यात यावे. **(२) वार्षिक भाडेपट्टीने** § जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या **१५%** प्रमाणे येणाऱ्या रक्कमेवर शासनाने विहीत केलेल्या भाडेपट्टयाच्या दराने. तथापि, सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व मान्यतेशिवाय वापर सुरू झाला असल्यास, जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या **३%** अतिरिक्त अधिमूल्य आकारण्यात यावे.
(vi)अ	प्राथमिक व माध्यमिक शिक्षणासाठी भाडेपट्टयाने दिलेली जमीन कब्जेहक्काने रुपांतरीत करावयाची असेल तर –	जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या **१५%**.
(vi)ब	उच्च शिक्षणासाठी व उच्च माध्यमिक शिक्षणासाठी भाडेपट्टयाने दिलेली जमीन कब्जेहक्काने रुपांतरीत करावयाची असेल तर --	जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या २५%.

(vii)	विद्यापिठाला जमीन मंजूर करणे	(१) राज्य शासनाच्या अखत्यारितील विद्यापिठांसाठी शासकीय जमीन राज्य शासनाच्या संबंधित प्रशासकीय विभागाला विनामूल्य मंजूर करण्यात यावी. (२) अभिमत विद्यापीठे, खासगी विद्यापीठे व इतर विद्यापिठांसाठी जमिनीची प्रचलित बाजारमूल्याची ३०% किंमत आकारुन शासकीय जमीन कब्जेहक्काने प्रदान करण्यात यावी. भाडेपट्टयाने जमीन मंजूर करताना कब्जेहक्काप्रमाणे येणाऱ्या रकमेवर शासनाने विहित केलेल्या भाडेपट्टयाच्या दराने जमीन मंजूर करण्यात यावी.
(viii)	व्यवस्थापनात बदल होताना-	व्यवस्थापनात बदल होताना, संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांची पूर्व मान्यता घेणे बंधनकारक राहील. अशी पूर्वमान्यता देताना उच्च शैक्षणिक प्रयोजनाकरिता जमिनीच्या चालू बाजारभावाच्या ३०% मूल्यांकनावर १% अधिमूल्य आकारण्यात यावे. तसेच पूर्व प्राथमिक/ प्राथमिक/ माध्यमिक शैक्षणिक प्रयोजनाकरिता जमिनीच्या चालू बाजारभावाच्या २०% मूल्यांकनावर १% अधिमूल्य आकारण्यात यावे. मात्र, पूर्वमान्यतेशिवाय व्यवस्थापनात बदल झाले असल्यास, अतिरिक्त ०.५% अधिमूल्य आकरण्यात यावे.
(ix)	शैक्षणिक संस्थेला सवलतीच्या दराने दिलेली जमीन सदर संस्था शैक्षणिक गुणवत्ते वाढ करण्याकरीता इतरांशी जमीन / जमिनीवरील इमारतीचा काही भाग वापराबाबत करार करत असेल तर --	प्रदान केलेल्या जमिनीचे हस्तांतरण करता येणार नाही. इतर व्यक्ती / संस्था / कंपनी यांचेबरोबर भागीदारीमध्ये शैक्षणिक उपक्रम राबविताना शासनाची पूर्वमान्यता घेणे बंधनकारक राहील. अशी पूर्वमान्यता देताना उच्च शैक्षणिक प्रयोजनाकरिता आवश्यक जमिनीच्या चालू बाजारभावाच्या ३०% मूल्यांकनावर १०% अधिमूल्य आकारण्यात यावे. तसेच पूर्व प्राथमिक/ प्राथमिक/ माध्यमिक शैक्षणिक प्रयोजनाकरिता जमिनीच्या चालू बाजारभावाच्या २०% मूल्यांकनावर १०% अधिमूल्य आकारण्यात यावे. मात्र, पूर्वमान्यतेशिवाय असे करारनामे झाले असल्यास अतिरिक्त ५% अधिमूल्य आकरण्यात यावे.

०२. दिव्यांगांच्या शाळेसाठी शासन निर्णय, क्र. जमीन-१०/२००३/प्र.क्र.४०१/ज-१, दिनांक २५ जुलै, २००७ मध्ये विहित केलेल्या दरानेच जमीन मंजूर करण्यात यावी.

तसेच, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील तरतुदी विचारात घेता, दिव्यांगांच्या महाविद्यालयांसाठी शासन निर्णय, क्र.जमीन-१०/२००३/प्र.क्र.४०१/ज-१, दिनांक २५ जुलै, २००७ मध्ये विहित केलेल्या दरानेच (म्हणजेच जमीन कब्जेहक्काने देताना संबंधित जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या ५% दराने किंमत आकारुन व जमीन भाडेपट्टयाने देताना संबंधित जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या ५% किंमतीवर ७.५ % दराने प्रतिवर्ष भाडेदराने ३० वर्षाच्या कालावधीसाठी) जमीन मंजूर करण्यात यावी.

मात्र, उपरोक्त सवलत दिव्यांगासाठी शाळा / महाविद्यालय सुरू असेपर्यंतच राहील. संबंधितांनी सदर शासकीय जमिनीवरील दिव्यांगासाठीची शाळा / महाविद्यालय बंद केल्यास सदर शासकीय जमीन संबंधित जिल्हाधिकारी यांनी शासन जमा करावी.

०३. उच्च शिक्षण, उच्च माध्यमिक तथा कनिष्ठ महाविद्यालय, प्राथमिक शिक्षण यांसाठी प्रदान केलेली संपूर्ण शासकीय जमीन किंवा सदर जमिनीचा अंशत: भाग, संबंधित जमीन धारकास दिव्यांगाच्या शाळेसाठी अथवा महाविद्यालयासाठी वापरावयाचा असेल तर अशी परवानगी देता येईल. अशी परवानगी देताना कोणतीही अतिरिक्त रक्कम वसूल करण्याची गरज राहणार नाही. तसेच भरलेली रक्कम संबंधितांना परत मिळणार नाही. तथापि, अशी जमीन भाडेपट्टयाने दिलेली असेल व ही संपूर्ण जमीन अथवा त्या जमिनीचा अंशत: भाग दिव्यांगाच्या शाळेसाठी अथवा महाविद्यालयासाठी भाडेपट्टयानेच वापरावयाचा असल्यास, जेवढी जमीन या प्रयोजनासाठी वापरण्यात येणार आहे, त्या जमिनीच्या प्रमाणात (Prorata Basis) शासन निर्णय, क्र. जमीन-१०/ २००३/ प्र.क्र.४०१/ ज-१, दिनांक २५ जुलै, २००७ मधील तरतुदीनुसार सुधारित दराने वार्षिक भुईभाडे निर्धारित करून ते वसूल करण्यात यावे. सदर भुईभाडे निर्धारित करताना संबंधित जमिनीच्या वापरास अशी मान्यता ज्यावेळी देण्यात येईल त्यावेळीच्या प्रचलित वार्षिक दर विवरणत्रातील दरानुसार जमिनीचे मूल्यांकन विचारात घ्यावे

०४. महानगरपालिका क्षेत्रात, नगरपालिका / नगरपरिषद व ग्रामीण क्षेत्रात शासन निर्णय, क्र. जमीन-१०/ २००३/ प्र.क्र.४०१/ज-१, दिनांक २५ जुलै, २००७ मधील तरतुदीनुसार दिव्यांगांच्या शैक्षणिक संस्थांकरिता प्रदान केलेल्या / करावयाच्या शासकीय जमिनीवरील बांधकामापैकी काही क्षेत्र शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एलबीएल-१०८६/ २६४४/ प्र.क्र.१९६/ग-८, दिनांक १४/६/१९८८ मधील तरतुदीनुसार परवाना फी आकारुन अधिक लाभदायी प्रयोजनाकरिता वापरण्यास परवानगी देताना, अशा जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या ५% इतकी किंमत विचारात घेवून भाडेपट्टयाच्या प्रचलित दराने परवाना फी आकारावी व या परवाना फी च्या दरामध्ये दर १५ वर्षांनी सुधारणा करण्यात यावी.

०५. तसेच शासन निर्णय, महसुल व वन विभाग क्र. एलआरएफ-१०९२/प्र.क्र.८७/ज-१, दिनांक ३०/६/१९९२ अन्वये विहित केलेल्या धोरणाप्रमाणे एखादया संस्थेस उच्च शिक्षणासाठी

शासकिय जमीन प्रदान करण्यात आली असेल, किंवा यापुढे या शासन निर्णयाप्रमाणे एखादया संस्थेला उच्च शिक्षणासाठी शासकीय जमीन प्रदान करण्यात आली असेल, अशा प्रकरणी जर उच्च शिक्षणाच्या एका शाखेतून दुस-या शाखेकडे वापराच्या प्रयोजनात बदल करावयाचा असल्यास अथवा उच्च शिक्षणाच्याच वापराच्या व्याप्तीत वाढ करावयाची असल्यास, (उदा. (१) इंजिनिअरींग कॉलेज साठी दिलेली जागा वैद्यकीय महाविद्यालयासाठी वापरणे किंवा (२) इंजिनिअरींग यांसह वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणे इत्यादी) अशा वापराच्या प्रयोजनात बदल करण्यास जिल्हाधिकारी सक्षम राहतील. तसेच सदर जमीन उच्च शिक्षणाच्या मुळ प्रयोजनातच वापरात येत असल्याने, यासाठी कोणतेही अतिरिक्त अधिमुल्य अथवा रक्कम आकारण्याची आवश्यकता नाही.

तथापि, पूर्व मान्यतेशिवाय वरीलप्रमाणे प्रयोजनात बदल झाला असल्यास, जमिनीच्या प्रचलित बाजारमूल्याच्या रकमेवर १ % इतके अधिमूल्य आकारण्यात यावे.

०६. शैक्षणिक प्रयोजनाचा वापर हा सार्वजनिक वापर असल्याने, आणि त्याची मदत समाजोन्नती करीता होत असल्याने, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे), नियम १९७१ मधील तरतुदीनुसार शैक्षणिक प्रयोजनाची दिनांक ०१ जानेवारी, २०१५ रोजी पर्यन्तची शासकिय जमिनीवरील अतिक्रमणे प्रकरण परत्वे अनुज्ञेय क्षेत्राच्या मर्यादेत नियमानुकूल करता येतील. याकरिता शासनाची मान्यता आवश्यक राहील. अशी अतिक्रमणे नियमानुकूल करताना अतिक्रमण नियमानुकूल करण्याच्या तारखेला सदर जमिनीचे असलेले पूर्ण (१००%) बाजारमूल्या इतकी किंमत जमिनीचे भोगाधिकार मुल्य म्हणून आणि या भोगाधिकार मुल्याच्या २०% इतकी रक्कम दंड म्हणून आकारून वसुल करण्यात यावी. तसेच, अशा अतिक्रमण धारकांकडून अतिक्रमणाच्या संपूर्ण कालावधीची आकारणी आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ५०, पोट कलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे दंड आकारुन वसुल करण्यात यावा. शैक्षणिक प्रयोजनाची दिनांक ०१ जानेवारी, २०१५ रोजी पर्यंतची शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचे प्रस्ताव प्रकरण परत्वे निर्णय घेण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांनी तातडीने शासनास सादर करावेत.

०७. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार शासकीय जमीन प्रदान करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी हे सदरहू शासन निर्णयाच्या अनुषंगाने प्रकरणपरत्वे कार्यवाही करण्यास सक्षम असतील. मात्र, अ.क्र. ०१ मधील अ.क्र. (ix) बाबत कार्यवाही करण्यास शासन सक्षम राहील व अ.क्र. ०१ मधील (viii) आणि अ.क्र.०५ बाबत कार्यवाही करण्यास संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी सक्षम राहतील.

तथापि, शासन निर्णयातील अ.क्र.०१ मधील (iii) ते (vi) ब येथे नमूद प्रकरणी सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्व मान्यतेशिवाय वापर सुरु झाला असल्यास अथवा (Viii) येथे नमूद केलेल्या प्रकरणी व्यवस्थापनात बदल झाला असल्यास, शासनाची पूर्व मान्यता घेवून त्यानंतर जिल्हाधिकारी यांनी अधिमूल्य आकारणे आवश्यक राहील.

०८. शासनाच्या प्रशासकिय विभागांना अथवा त्यांच्या नियंत्रणाखालील प्राधिकरण/ संस्था/ महामंडळ यांना शासनाने महसूल विभागामार्फत शासकिय जमीन प्रदान केलेली असल्यास, त्यांना अशी शासकीय जमीन थेट कोणत्याही व्यक्ती अथवा संस्था यांना शैक्षणिक अथवा अन्य कोणत्याही प्रयोजनार्थ परस्पर प्रदान करता येणार नाही. तथापि, सदर शासकीय जमीन शैक्षणिक अथवा अन्य प्रयोजनार्थ प्रदान करणे आवश्यकच असल्यास, अशी जमीन संबंधित प्रशासकीय विभाग अथवा त्यांच्या नियंत्रणाखालील प्राधिकरण /संस्था /महामंडळ यांना प्रथमत: शासनास प्रत्यार्पित करावी. तदनंतरच, अशी जमीन शासनाकडून संबंधित जमिनीची मागणी करणा-या व्यक्ती अथवा संस्था यांना शासनाचे जमीन प्रदानाच्या अनुषंगाने प्रचलित धोरण विचारात घेऊन, अशी जमीन प्रदान करण्याबाबत उचित निर्णय घेण्यात येईल.

०९. यापुढे शैक्षणिक प्रयोजनार्थ शासकीय जमीन प्रदान करतांना जमीन प्रदान आदेशात, जमीन प्रदानानंतर शर्तभंग केल्यास, आणि तो प्रचलित धोरणाप्रमाणे नियमानुकूल न केल्यास अशी प्रदान केलेली शासकीय जमीन शासन जमा करण्यास पात्र राहील, या अटीचा समावेश करण्यात यावा.

१०. यापुढे शैक्षणिक प्रयोजनासाठी ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी भाडेपट्टयाने मंजूर करण्यात येणाऱ्या शासकीय जमिनीचे भूईभाडे प्रति ५ वर्षांनी सुधारित करण्यात यावे. भुईभाडयामध्ये अशी सुधारणा करताना त्या-त्या वेळचे जमिनीचे बाजारमूल्य व या धोरणातील सवलतीचे दर विचारात घेवून भुईभाडे निश्चित करण्यात यावे. अशी अट जमीन प्रदान आदेशामध्ये निश्चित घातली जाईल, याची दक्षता घेण्यात यावी.

११. सदर शासन निर्णय मा.राज्य मंत्रिमंडळाच्या दि.१६/०७/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णयास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

१२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०७३११९०७४१६११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANTOSH VITHOBA GAWDE

Digitally signed by SANTOSH VITHOBA GAWDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=8e111cd4ca87dbe700ee92d0e1b3fd993c8b0952a368e400ed2af72cb5dd990c, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CA6A91A5EFCF2DDE6274B385D86F23914275B4E2B1125F6E74E6A1FAC7106C22, cn=SANTOSH VITHOBA GAWDE
Date: 2023.07.31 19:09:40 +05'30'

(संतोष वि. गावडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

विविध प्रयोजनासाठी व्यक्ती अथवा संस्था यांना भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनींच्या भाडेपट्टयाच्या दरात प्रति ५ वर्षांनी सुधारणा करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः जमीन-२६२१/प्र.क्र.०३ / ज-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ३१ जुलै, २०२३

संदर्भ :- शासन परिपत्रक क्र.जमीन-१०८८/२२२३३६/(२१६२)/ग-९, दिनांक २३/०१/१९८९.

प्रस्तावना :-

राज्य शासनाच्या मालकीच्या शासकीय जमिनीची फारच कमी उपलब्धता व मोठ्या प्रमाणात होणारी मागणी तसेच दिवसेंदिवस जमिनीच्या किंमतीत होणारी वाढ या बाबी विचारात घेऊन शासनाने संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये जमीन भाडेपट्टयाने देताना प्रति १० वर्षांनी भाडेपट्टयाच्या दराचे पुनर्विलोकन (सुधारणा) करण्याची अट निश्चित घातली जाईल याची दक्षता घेण्याचे निर्देश सर्व जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

शासनाने भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनीचा संपुष्टात आलेल्या भाडेपट्टयाचे नुतनीकरण करण्यासंदर्भात बृहन्मुंबई आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी अनुक्रमे शासन निर्णय क्र.जमीन-२५०५/ प्र.क्र.४०५/ ज-२, दिनांक १२/१२/२०१२ व शासन निर्णय क्र.जमीन-०३/ २०१३/ प्र.क्र.१५५/ ज-१, दिनांक ०१/०८/२०१९ अन्वये धोरण विहित केले आहे. सदर धोरणामध्ये भाडेपट्टयाचे नुतनीकरण केल्यानंतर ५ वर्षानंतर भाडेपट्टयाच्या दरात सुधारणा करण्याची तरतूद केलेली आहे. त्यामुळे भाडेपट्टयाच्या दरात सुधारणा करण्याच्या कालावधीमध्ये एकसुत्रता / साम्यता राहण्याच्या उद्देशाने उक्त नमूद शासन परिपत्रक दिनांक २३/०१/१९८९ अधिक्रमित करुन, सुधारित निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

संदर्भाधीन शासन परिपत्रक, क्र.जमीन-१०८८/२२२३३६/(२१६२)/ग-९, दिनांक २३/०१/१९८९ याद्वारे अधिक्रमित करण्यात येत आहे.

०२. व्यक्ती अथवा संस्था यांना विविध प्रयोजनासाठी ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी भाडेपट्टयाने मंजूर करण्यात येणाऱ्या शासकीय जमिनीचे भूईभाडे प्रति ५ वर्षांनी सुधारित करण्यात यावे. भुईभाडयामध्ये अशी सुधारणा करताना त्या-त्या वेळचे जमिनीचे बाजारमूल्य व अशा जमिनी सवलतीच्या दराने दिलेल्या असल्यास, त्या-त्या वेळेचे त्या प्रयोजनासाठीचे सवलतीचे दर विचारात घेवून भुईभाडे निश्चित करण्यात यावे. अशा आशयाची अट यापुढे जमीन प्रदान आदेशामध्ये निश्चित घातली जाईल, याची दक्षता घेण्यात यावी.

०३. सदर शासन निर्णय मा.राज्य मंत्रिमंडळाच्या दि.१६/०७/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णयास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

०४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०७३११९१३०३५८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANTOSH VITHOBA GAWDE

Digitally signed by SANTOSH VITHOBA GAWDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=8e111cd4ca87dbe700ee92d0e1b3fd993c8b0952a368e400ed2af72cb5dd990c, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CA6A91A5EFCF2DDE6274B385D86F23914275B4E2B1125F6E74E6A1FAC7106C22, cn=SANTOSH VITHOBA GAWDE
Date: 2023.07.31 19:14:13 +05'30'

(संतोष वि. गावडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उप मुख्यमंत्री यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) मा. अपर मुख्य सचिव, (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) अ.मु.स.(महसूल), महसूल व वन विभाग, यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
११) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
१२) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
१३) सर्व विभागीय आयुक्त.
१४) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५) सर्व जिल्हाधिकारी.
१६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१७) सर्व अधीक्षक, भूमि अभिलेख.
१८) सर्व कार्यासन अधिकारी/ उप सचिव /सह सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) निवड नस्ती (कार्यासन ज-३)

दिव्यांग व्यक्तींचा हक्क अधिनियम-२०१६ मधील कलम ३७ (क) च्या तरतुदीनुसार सवलतीने जमीन देण्यासाठी दिव्यांगांना ५% आरक्षण ठेवण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. जमीन-२०२३/प्र.क्र.२९४/ज-१
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०६ सप्टेंबर, २०२३

वाचा :-

१) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. जमीन १०/२००३/प्र.क्र.४०१/ज-१, दि. २५ जुलै, २००७.
३) शासन पत्र, महसूल व वन विभाग क्र.एलसीएस-१००३/प्र.क्र.४७८/ज-१, दि.२५.०७.२००७.
४) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत कलम ३७(क).

प्रस्तावना :-

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ मधील कलम ४३ अन्वये निवासी, वाणिज्यिक व औद्योगिक प्रयोजनासाठी, विशेष करमणूक केंद्र स्थापन करण्यासाठी, संशोधन केंद्रासाठी प्राधान्याने व सवलतीच्या दराने शासकीय जमीन मंजूर करणे बंधनकारक केले आहे. त्यानुसार, संदर्भिय क्र. ६ मधील शासन निर्णय दि.२५.०७.२००७ अन्वये उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अंध व अपंग व्यक्तींना तसेच अंध व अपंगांशी संबंधित संस्थांना सवलतीच्या दराने शासकीय जमीन मंजूर करण्याबाबत तसेच, निवासी प्रयोजनासाठी सदनिका/घरे बांधण्यासाठी, संस्थेला शासकीय जमीन मंजूर करतांना अशा प्रत्येक संस्थेने आपल्या सदस्यांच्या एकूण संख्येच्या ३% एवढे सदस्य अंध व अपंग प्रवर्ग मधून समाविष्ट करण्याचे धोरण निश्चित केलेले आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंमलात आला असून सदर अधिनियमातील कलम ३७(क) मधील तरतुदींनुसार दिव्यांग प्रवर्गासाठी उपरोक्त दि. २५.०७.२००७ च्या धोरणामधील निवासी / घरे बांधण्याच्या प्रयोजनासाठी संस्थेला शासकीय जमीन मंजूर करतांना अशा प्रत्येक संस्थेने आपल्या सदस्यांच्या एकूण संख्येच्या ५% एवढे सदस्य दिव्यांग प्रवर्गाकरीता आरक्षण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

उपरोक्त पार्श्वभूमीवर आता पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :-

शासन निर्णय :-

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ३७(क) मधील तरतुदींनुसार दि. २५.०७.२००७ च्या शासन निर्णयातील अ.क्र.१ येथे नमूद केलेल्या निवासी प्रयोजनासाठी आता ५% आरक्षण ठेवण्यात येत आहे. सदरहू ५% आरक्षणाची यापुढील वितरणाच्या वेळी अंमलबजावणी करण्याची दक्षता संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावी. उपरोक्त दि.२५.०७.२००७ च्या शासन निर्णयातील इतर अटी व शर्ती कायम राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२३०९०६१६४१३१३८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUHAS MADHAV MAMDAPURKAR

Digitally signed by SUHAS MADHAV MAMDAPURKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=15e9cd7730234dc2963eb61397dd04240c15d02a5a148c43a83593ac725fd19c, pseudonym=1A2F622DE5904FF048601C73A184349D5EEECBBB, serialNumber=F1B00E7181536EEDD7B08803397FED3A96870CA795C4D9384B72F43A5A066D99, cn=SUHAS MADHAV MAMDAPURKAR
Date: 2023.09.06 16:44:11 +05'30'

(सुहास ममदापूरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (गृह), यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार दिव्यांग व्यक्तींना प्राधान्याने व सवलतीने शासकीय जमीन देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- जमीन-२०२३/प्र.क्र.२९६/ज-१
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २५ सप्टेंबर, २०२३.

वाचा:- १) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६
२) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील नियम ३१(अ)
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. जमीन०१/२००८/प्र.क्र.१०/ज-१, दि. ०६ ऑगस्ट, २००८

प्रस्तावना :-

अपंग व्यक्तींना समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग कायदा, १९९५ या कलम १३ अन्वये स्थापन केलेल्या राज्य समन्वय समितीने अपंग व्यक्तींना जमीन देण्याची शिफारस केली होती. त्यानुसार, ७ जानेवारी २००८ रोजीच्या दुरुस्तीद्वारे महाराष्ट्र जमीन महसूल विल्हेवाट नियम, १९७१ मध्ये नियम ३१(अ) समाविष्ट करण्यात आला आणि पुढीलप्रमाणे तरतुद करण्यात आली आहे :-

Rule 31(A)- Grant of land to person with disability.

A building site to the extent of २०० sq. ft. may be granted on the recommendation of the State Coordination Committee duly constituted under Section 13 of the Persons with Disabilities (Equal Opportunities, Protection of Rights and Full Participation) Act, 1995 (Act No. 1 of 1996); to a person with disability, for construction of shop, if such person desires to start business of running a juice center, telephone booth, zerox center etc. Such site shall be granted in occupancy at concessional price as per the existing policy of current market value of land without auction or on lease by charging concessional annual rent.

त्याचप्रमाणे, शासन निर्णय, महसूल व वन विभाग दि.०६.०८.२००८ अन्वये दिव्यांग प्रवर्गास ३% शासकीय जमीन राखीव ठेवण्याबाबत तसेच, उपरोक्त प्रयोजनासाठी निवड समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

तथापि, आता अपंग व्यक्तींना समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग कायदा, १९९५ हा कायदा निरसीत करण्यात आला असून दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ लागू करण्यात आला आहे. सबब, उपरोक्त दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ३७ (क) ची अंमलबजावणी करण्याची आणि त्यामध्ये नमूद केलेल्या प्रयोजनासाठी शासकीय जमीन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

उपरोक्त पार्श्वभूमीवर आता पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

अपंग व्यक्तींचे अधिकार अधिनियम, २०१६ च्या कलम ३७(क) च्या अंमलबजावणीसाठी वर संदर्भ क्र. ३ येथे नमूद दि. ०६ ऑगस्ट, २००८ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन दिव्यांग प्रवर्गासाठी ३% ऐवजी आता ५% आरक्षण ठेवण्यात येत आहे. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांनी आरक्षणाबाबत दक्षता घ्यावी. दिव्यांग प्रवर्गासाठी लाभार्थी निवडण्याच्या प्रयोजनाकरीता लाभार्थींना महाराष्ट्र जमीन महसूल विल्हेवाट नियम, १९७१ मध्ये नियम ३१(अ) यातील तरतुदींनुसार २०० चौ. फुट पर्यंत शासकीय जमीन कब्जेहक्काने देण्याकरीता पुढील प्रमाणे निवड समिती स्थापन करण्यात येत आहे :-

(अ) महानगरपालिका क्षेत्रासाठी :-

i. आयुक्त, महानगरपालिका व संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांचेपैकी ज्येष्ठतम अधिकारी- अध्यक्ष
ii. (*i*) पैकी कनिष्ठ अधिकारी - सदस्य
iii. व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र - सदस्य
iv. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी - सदस्य
v. अपंग, मागासवर्गीय, औद्योगिक वित्त व विकास महामंडळाचे अधिकारी - सदस्य
vi. नगर रचनाकार अधिकारी - सदस्य
vii. आदिवासी प्रकल्प अधिकारी - सदस्य
viii. जिल्हा अग्रणी बँकेचे प्रतिनिधी - सदस्य
ix. विशेष व जिल्हा समाजकल्याण अधिकारी - सदस्य
x. महापालिका आयुक्तांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी - सदस्य सचिव

ब) नगरपालिका / ग्रामीण क्षेत्रासाठी :-

i. जिल्हाधिकारी - अध्यक्ष
ii. (अ) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद (ग्रामीण क्षेत्राकरीता) - सदस्य
(ब) मुख्य अधिकारी नगरपरिषद (नगरपरिषद क्षेत्राकरीता) - सदस्य
iii. व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र - सदस्य
iv. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी - सदस्य
v. सहायक संचालक नगररचना - सदस्य
vi. अपंग मागासवर्गीय, औद्योगिक वित्त व विकास महामंडळाचे अधिकारी - सदस्य
vii. आदिवासी प्रकल्प अधिकारी - सदस्य
viii. जिल्हा अग्रणी बँकेचे प्रतिनिधी - सदस्य
ix. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी - सदस्य सचिव

२) वैयक्तिक लाभार्थी करीता पुढीलप्रमाणे अटी व शर्ती विहित करण्यात येत आहेत :-

(१) अर्जदार हा महाराष्ट्रात १५ वर्षाचा रहिवासी असावा.
(२) अर्जदाराचे किमान वय १८ वर्ष असावे.
(३) लाभार्थी महिला असल्यास प्राधान्य द्यावे. तथापि, लाभार्थ्यांची एकंदरीत कौटुंबिक परिस्थिती लक्षांत घेता, लाभार्थ्याची निवड करण्याचे सर्वस्वी अधिकार निवड समितीस असतील.

(४) विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून शासकीय जमीन वितरीत करण्यात येईल.

(५) अपंग व्यक्तीकडे, अपंग व्यक्तीचे अधिकार अधिनियम, २०१६ च्या अंतर्गत किमान ४०% अपंगत्वाचे सक्षम प्राधिकाऱ्याकडील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

(६) संबंधित यंत्रणेच्या प्रचलित पध्दतीनुसार अर्जदारास जागा घेतांना करारनामा करून घेणे बंधनकारक असेल.

(७) जागेची मालकी कायमस्वरुपी शासनाची राहील.

(८) वीज बील, पाणी बील, संपत्ती कर व इतर तदनुषंगिक कर अर्जदारास भरावे लागतील.

(९) या योजनेंतर्गत मिळालेल्या जागेच्या ठिकाणी लाभार्थ्याने स्वतः व्यवसाय करणे बंधनकारक राहील. यासाठी नियमानुसार आवश्यक ते परवाने घेण्याची जबाबदारी लाभार्थ्याची राहील.

(१०) सदर जागा अन्य कोणत्याही व्यक्तिस भाडयाने, गहाण अथवा विक्री कराराने यापैकी अथवा अन्य कुठल्याही मार्गाने हस्तांतर करता येणार नाही.

(११) जागा वाटप करण्यात आलेल्या व्यक्तीने सदरहू जमिनीचा कोणत्याही प्रकारचा दुरुपयोग होणार नाही याची वैयक्तिकरित्या दक्षता घ्यावी. अशा प्रकरणी दुरुपयोग झाल्याचे निदर्शनास आल्यास सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत सदरहू जागा तातडीने शासनाच्या ताब्यात घेऊन संबंधित गाळेधारकाविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल.

(१२) कुटुंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ घेता येईल.

(१३) अर्जदाराला या योजनेचा महाराष्ट्र राज्यात कुठेही फक्त एकदाच लाभ घेता येईल.

(१४) असा कोणताही भूखंडाचे वाटप केवळ वरील नियमात परवानगी दिलेल्या प्रयोजनासाठी असेल.

(१५) बेंचमार्क ४०% किंवा त्याहून अधिक अपंगत्व असलेली शारीरिकदृष्ट्या दिव्यांग व्यक्ती, जी सरकारच्या अशा कोणत्याही समान योजनेचा लाभार्थी नाही आणि उत्पन्नाचे इतर कोणतेही स्रोत नाही, फक्त अशाच व्यक्ती अर्ज करण्यास पात्र असतील.

(१६) दर तीन महिन्यांनी समितीच्या बैठकीचे आयोजन करून अर्ज निकाली काढण्याची कार्यवाही समितीच्या अध्यक्षांमार्फत करण्यात येईल. तसेच, यासाठी आयुक्त, अपंग कल्याण हे वेळोवेळी आढावा घेऊन नियंत्रण ठेवतील व त्याबाबतचा अहवाल दिव्यांग कल्याण विभागास सादर करतील.

(१७) समितीने अर्जदारांच्या सत्यापित निवासस्थानाच्या विचार करून त्यांना त्यातल्या त्यात जवळचा भूखंड वाटप करण्याबाबत शिफारस करावी.

(१८) समितीने शिफारस केलेल्या व्यक्तीस अंतिमत: जमीन वाटप करण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी सक्षम राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३१००३१२०००८३४१९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUHAS MADHAV MAMDAPURKAR

Digitally signed by SUHAS MADHAV MAMDAPURKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=15e9cd7730234dc2963eb61397dd04240c15d02a5a148c43a83593ac725fd19c, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F1B00E7181536EEDD7B08803397FED3A96870CA79SC4D9384B72F43A5A066D99, cn=SUHAS MADHAV MAMDAPURKAR
Date: 2023.10.03 12:24:02 +05'30'

(सुहास ममदापुरकर)
अवर सचिव, महसूल व वन विभाग

प्रत :-

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

शासनाने वाटप केलेल्या जमिनीवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांना दिव्यांग संवर्गासाठी ५% जमीन राखीव ठेवणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. जमीन-२०२३/प्र.क्र.२९३/ज-१
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २७ सप्टेंबर, २०२३

वाचा :-

१) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एलसीएस-०६०६/प्र.क्र.५४/ज-१, दि. २५ मे २००७
२) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत कलम ३७(क)

प्रस्तावना :-

सहकारी गृहनिर्माण संस्थांना जमीन देण्याबाबत दि. २५ मे २००७ च्या शासन निर्णया अन्वये धोरण निश्चित करण्यात आले असून त्यातील तरतुदी नुसार सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या विविध गटांना उदा. स्वातंत्र्य सैनिक, सेवेतील राज्य / केंद्र शासनाचे कर्मचारी, अनुसूचीत जाती- जमाती, साहित्यिक, क्रीडापटू, लोकप्रतिनिधी ई. यांच्या गटांना वितरणाकरीता उपलब्ध असलेल्या भूखंडापैकी, वाटप करावयाच्या भूखंडाच्या प्रमाणाची टक्केवारी विविध अटी-शर्तींच्या अधीन राहून निश्चित करण्यात आली आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंमलात आला असून सदर अधिनियमातील कलम ३७(क) मधील तरतुदींनुसार दिव्यांग प्रवर्गासाठी उपरोक्त दि. २५ मे, २००७ च्या धोरणामधील वितरणासाठी उपलब्ध असलेल्या भूखडांना ५% आरक्षण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ३७(क) मधील तरतुदीनुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांना जमीन देण्याबाबतच्या दि. २५ मे, २००७ च्या शासन निर्णयामध्ये नमूद विविध सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या गटांना जमीन वाटपाच्या वेळी दिव्यांगासाठी ५% आरक्षण ठेवण्यात येत आहे. सदरहू ५% आरक्षणाची यापुढील वितरणाच्या वेळी अंमलबजावणी करण्याची दक्षता संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावी. उपरोक्त दि.२५.०५.२००७ च्या शासन निर्णयातील इतर अटी व शर्ती कायम राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२३१००३१२१७२४८८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUHAS MADHAV MAMDAPURKAR

Digitally signed by SUHAS MADHAV MAMDAPURKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=15e9cd7730234dc2963eb61397dd04240c15d02a5a148c43a83593ac725fd19c, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F1B00E7181536EEDD7B08803397FED3A96870CA795C4D9384B72F43A5A066D99, cn=SUHAS MADHAV MAMDAPURKAR
Date: 2023.10.03 12:20:30 +05'30'

(सुहास ममदापूरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (गृह), यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उपमुख्यमंत्री (वित्त), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

नागपूर व अमरावती विभागातील भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमिनी संदर्भातील मुद्यांबाबत सर्वकष अभ्यास करुन शासनास शिफारसी करण्याकरीता समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः- जमीन २०२२/प्र. क्र. १५३/ज-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ०९.११.२०२३.

वाचा-

१) शासन निर्णय क्रमांकः- जमीन २४९९/ प्र.क्र.१२५/ज-८, दि. २३.१२.२०१५
२) शासन निर्णय क्रमांकः- नझुल २०१६/प्र. क्र.१८६(अ)/ज-८, दि. ०२.०३.२०१९
३) शासन निर्णय क्रमांकः- नझुल २०१६/प्र. क्र.१८६(ब)/ज-८, दि. ०२.०३.२०१९

प्रस्तावना-

नागपूर व अमरावती विभागातील नझुल जमिनींच्या भाडेपट्टयांच्या नुतनीकरणाविषयी तसेच त्यासंदर्भातील शर्तभंग/ वापरात बदल /विनापरवानगी हस्तांतरण इ.विषयाबाबत शासन निर्णय क्रमांकः- जमीन २४९९/ प्र.क्र.१२५/ज-८, दि. २३.१२.२०१५ अन्वये सुधारीत धोरण निश्चित करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयान्वये नझुल भाडेपट्टयाचे हस्तांतरण, वापरात बदल, शर्तभंग नियमितीकरण इ.साठी विहीत अनर्जित रक्कमेचे दर जास्त असल्याने ते दर कमी करण्याबाबत शासनाकडे विविध घटकाकडून केलेल्या मागणीचा विचार करुन दि.२३.१२.२०१५ च्या शासन निर्णयात सुधारणा करुन शासन निर्णय क्र. नझुल २०१६/प्र. क्र.१८६(अ)/ज-८, दि. ०२.०३.२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनर्जित दरात सुधारणा करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय क्रमांकः- नझुल २०१६/प्र. क्र.१८६(ब)/ज-८, दि. ०२.०३.२०१९ अन्वये नागपूर व अमरावती विभागातील लिलावाव्दारे किंवा अन्य प्रकारे भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमीनी फ्री-होल्ड (भोगवटादार वर्ग-१) करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

सदर नझुल जमिनीबाबतच्या धोरणांच्या अनुषंगाने शर्तभंग प्रकरणे, निवासी प्रयोजनार्थ भूभाडे आकारणे तसेच भोगवटादार वर्ग-१ निवासी प्रयोजनाकरिता आकारण्यात येणा-या रुपांतरीत मूल्य दरात सुधारणा करण्याबाबत **मा.मंत्री(महसूल)** यांच्या अध्यक्षतेखाली दि.२४.०७.२०२३ रोजी विधानमंडळ, मुंबई येथील आयोजित बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशानुसार भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमिनी संदर्भातील मुद्यांबाबत सर्वकष अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी **विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली** पुढील प्रमाणे समिती गठीत करण्याची बाब विचाराधीन होती. त्याअनुषंगाने शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णयः-</u> नागपूर व अमरावती विभागातील भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमिनी संदर्भात खालील नमूद मुद्यांबाबत सर्वकष अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी **विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली** खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

<u>समितीची रचना</u>

१)	अध्यक्ष-	विभागीय आयुक्त,नागपूर विभाग, नागपूर
२)	सदस्य-	जिल्हाधिकारी, नागपूर
३)	सदस्य सचिव-	उपायुक्त (महसूल), नागपूर विभागीय आयुक्तालय, नागपूर

२. उपरोक्त समितीने खालील नमूद मुद्यांचा साकल्याने अभ्यास करुन शिफारसी कराव्या.

१) नझुल भाडेपट्टयाच्या जमिनीचे हस्तांतरण व वापरात बदल वगळता अन्य प्रकारच्या शर्तभंगाच्या प्रकरणात जसे विहीत कालावधीत नुतनीकरण अर्ज सादर न करणे व विना परवानगी झालेल्या बांधकाम प्रकरणी आकरणी करण्यात येणा-या दरात सुधारणा करण्याबाबत ची आवश्यकता तपासून सुयोग्य शिफारसी करणे.

प्रिमिअम/लिलावाने तसेच अन्यथा भाडेपट्टयाने प्रदान करण्यात आलेल्या सर्व नझुल भाडेपट्टयांना निवासी भुभाडे आकारणी बाबत

भोगवटदार वर्ग-१ मध्ये निवासी प्रयोजनाकरीता आकारण्यात येणारे रुपांतरीत अधिमुल्य आकारणी संदर्भात रास्त व किफायतशीर दरांबाबत शिफारस करणेबाबत

अ) उपरोक्त बाबत नझुल भाडेपट्याचे धोरणाचा सर्वकष अभ्यास करुन, शासनास शिफारशी करणे.

आ) उपरोक्त सुधारणांचा राज्याच्या आर्थिक हितावर तसेच अन्य क्षेत्रात दुरगामी परिणाम याबाबत सुध्दा अभ्यास करुन शिफारस करणे.

३. समितीने आपला अहवाल शासनास दोन महिन्यांच्या आत सादर करावा. आवश्यक असल्यास शासन मान्यतेने समितीचा कालावधी वाढविता येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३११०९१५२३३१२८१९ आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY SHANKARRAO INGLE

Digitally signed by SANJAY SHANKARRAO INGLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=f0d616600e4d2f510d1c8cc19813e070ad282d2275bf6fc132a2dee97f14e0a6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D337930B14433DC62C0154AF2BBC60BB5A6EDCAA66B7F34596C50A27EB0F6333, cn=SANJAY SHANKARRAO INGLE
Date: 2023.11.09 18:24:44 +05'30'

(संजय इंगळे)
शासनाचे सहसचिव

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (गृह)यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
६. अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांचे विकाअ/स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई -३२.
७. विभागीय आयुक्त,नागपूर / अमरावती
८. जिल्हाधिकारी, नागपूर
९. निवड नस्ती, कार्यासन ज-८, मंत्रालय, मुंबई -३२.

महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१(सुधारणा) अधिनियम २०२३ अन्वये कलम २८-१ अअ मध्ये केलेल्या सुधारणेच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक- मशेम-२०२०/प्र.क्र.५०/ल-७

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड

मंत्रालय, मुंबई ४०००३२

दिनांक : ०८ फेब्रुवारी, २०२४

वाचा:- १. महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: आयसीएच-१३७०/६८७२९-एम(Spl.) दि. १५/०५/१९७१

२. महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: आयसीएच-३४९८/प्र.क्र.२३/भाग-जी/ल-७, दि. ०४/०५/२०१२

३. महसूल व वन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक: आयसीएच-३४९८/प्र.क्र.२३/भाग-जी/ल-७, दि.०८/११/२०१२

४. महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: मशेम-२०२३/प्र.क्र.७५/ल-७, दि.२०/१०/२०२३

<u>प्रस्तावना:-</u>

महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (सुधारणा) अधिनियम, २०११ मधील कलम २८-१ (अअ) मधील पोट कलम (३) मध्ये केलेल्या सुधारणेनुसार माजी खंडकरी शेतकऱ्यांना वाटप करावयाच्या जमिनीसंदर्भात शासन परिपत्रक क्रमांक आयसीएच-३४९८/ प्र.क्र.२३/भाग-जी/ल-७, दिनांक ०४/०५/२०१२ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. उक्त मार्गदर्शक सुचनेतील सुचना क्र.९.१ "ज्या पात्र प्रतिग्रहीत्यास (पात्र माजी खंडक-यांस) (यापुढे ज्याचा उल्लेख प्रतिग्रहीता म्हणून असेल) वरील परिच्छेद ३ व ६ नुसार जमिनीचे वाटप करण्यात आले आहे तो सदर जमीन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार भोगवटदार वर्ग-१ म्हणून धारण करील." अशी होती. तद्नंतर उक्त मार्गदर्शक सुचनेतील सुचना क्र.९.१ मध्ये संदर्भ क्र.२ वरील शासन शुध्दीपत्रक क्र. आयसीएच-३४९८/प्र.क्र.२३/भाग-जी/ल-७, दि.०८/११/२०१२ अन्वये "ज्या पात्र प्रतिग्रहीत्यास (पात्र माजी खंडकऱ्यांस) (यापुढे ज्याचा उल्लेख प्रतिग्रहीता म्हणून असेल) वरील परिच्छेद ३ व ६ नुसार जमिनीचे वाटप करण्यात आले आहे, तो सदर जमीन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार भोगवटादार वर्ग-२ म्हणून धारण करील. अशा जमिनी भोगवटादार वर्ग-१ या सत्ताप्रकाराने देण्यासाठी आवश्यक त्या अधिनियमात स्वतंत्ररित्या सुधारणा करण्यात येतील," असे सुधारीत शासन शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले आहेत.

आता, महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (सुधारणा) अधिनियम, २०२३ अन्वये उक्त अधिनियमामध्ये कलम २८-१ (अअ) मधील पोट कलम (३) खाली नवीन पोटकलम (३-१अ) तसेच पुर्वीच्या पोटकलम (३अ) ऐवजी नवीन पोटकलम (३अ) अतंर्भुत करण्यात आलेले आहे.

सबब, महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (सुधारणा) अधिनियम, २०२३ मधील कलम २८-१ अअ मध्ये केलेल्या सुधारणेच्या अनुषंगाने सुधारीत मार्गदर्शक सूचना विहित करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

<u>शासन परिपत्रक:-</u>

अ) महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (सुधारणा) अधिनियम, २०२३ अन्वये उक्त अधिनियमामध्ये कलम २८-१ (अअ) मधील पोट कलम (३) खाली नवीन पोटकलम (३-१अ) अन्वये माजी खंडकरी शेतकरी अथवा त्यांचे कायदेशीर वारसांना वाटप करण्यात आलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग-१ करण्यासंदर्भात तरतूद करण्यात आलेली आहे.

सबब, माजी खंडकरी शेतकऱ्यांना वाटप करावयाच्या जमिनीसंदर्भात निर्गमित करण्यात आलेले संदर्भ क्र.२ वरील शासन शुध्दीपत्रक क्रमांक: आयसीएच-३४९८/प्र.क्र.२३/भाग-जी/ल-७, दि.०८/११/२०१२ रद्द करण्यात येत आहे. तसेच महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: आयसीएच-१३७०/६८७२९-एम(Spl.) दि. १५/०५/१९७१ व शासन परिपत्रक क्र.आयसीएच-३४९८/प्र.क्र.२३/ भाग-जी/ल-७ दि. ०४/०५/२०१२ मधील मार्गदर्शक सुचनेतील संबधित तरतूदी या परिपत्रकान्वये अधिक्रमित करण्यात येत आहेत.

ब) महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ मधील कलम २८-१ अअ मधील पोट कलम (३) मधील तरतूदीनुसार माजी खंडकरी यांना वाटप करण्यात आलेल्या जमीनी भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग-१ करण्यासंदर्भात महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (सुधारणा) अधिनियम, २०२३ मधील कलम २८-१ (अअ) मधील पोट कलम (३) खालील पोट कलम (३-१अ) मधील तरतुदीनुसार खालील प्रमाणे सुधारीत मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत, त्या विचारात घेऊन कार्यवाही करावी.

१) "ज्या व्यक्तीनीं (खंडकरी शेतकऱ्यांनी) औद्योगिक उपक्रमांना त्यांच्या पट्टयाने (खंडाने) दिलेल्या जमिनी वर्ग-१ भोगवट्याच्या होत्या अशा व्यक्तीस किंवा तिच्या कायदेशीर वारसांना वर्ग-२ भोगवट्यावर दिलेल्या जमिनी महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २०२३ महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रथम प्रसिध्द केलेल्या दिनांकापासुन त्यासाठी कोणतेही अधिमूल्य न आकारता, वर्ग-१ भोगवट्यावर देण्यात आले असल्याचे मानण्यात येतील. त्यानुसार संबधित तहसिलदार यांनी त्यांच्या स्तरावरुन गावनिहाय आढावा घेवुन या शासन परिपत्रकाच्या दिनांकापासुन एक महिन्याच्या कालावधीत गावनिहाय एकच आदेश करुन गावदप्तरी अंमल घ्यावा. (फेरफार, अधिकार अभिलेख इत्यादी बाबत)

२) ज्या व्यक्तीनीं (खंडकरी शेतकऱ्यांनी) औद्योगिक उपक्रमांना त्यांच्या पट्टयाने (खंडाने) दिलेल्या जमिनी वर्ग-२ भोगवट्याच्या होत्या अशा व्यक्तीस किंवा तिच्या कायदेशीर वारसांना वर्ग-२ भोगवट्यावर दिलेल्या जमिनी धारणाधिकार भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतर करता येईल. तथापि, त्यासाठी जर अशा जमिनींना लागू असलेल्या संबंधित कायद्यात किंवा त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांमध्ये संबधित अधिनियम व नियमांच्या तरतुदींनुसार अशा रूपांतरणाबाबत जी कायदेशीर तरतूद

असेल त्यानुसार कार्यवाही करणे व त्या कायद्यात निश्चित केलेल्या सक्षम प्राधिकारी यांची परवानगी घेवुन कार्यवाही करणे आवश्यक राहील.

३) ज्या खंडकरी शेतक-यांनी अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांनी वाटप केलेली जमीन परवानगी घेऊन विहीत अधिमुल्य रक्कम भरुन हस्तांतरित केली असेल अशा प्रकरणी प्रस्तुत जमीन भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग-१ रुपांतरित करण्याबाबत ज्या खंडकरी शेतकऱ्यांची जमीन खंडाने देतेवेळी भोगवटादार वर्ग-१ होती त्याबाबत संबधित तहसिलदार उपरोक्त नमुद (१) प्रमाणे कार्यवाही करतील व ज्या खंडकरी शेतकऱ्यांची जमीन खंडाने देतेवेळी भोगवटादार वर्ग-२ होती त्याबाबत उपरोक्त नमुद (२) प्रमाणे कार्यवाही करावी.

४) ज्या खंडकरी शेतक-यांनी अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांनी वाटप केलेली जमीन विनापरवानगी हस्तांतरित केली असेल किंवा विहीत अधिमुल्य रक्कम भरलेली नसेल अशा प्रकरणी झालेला शर्तभंग नियमानुकुल करताना उक्त अधिनियमातील कलम २९ मध्ये नमुद केलेली अधिमुल्य रक्कम भरल्यानंतर व जिल्हाधिकारी यांच्या पुर्वमान्यतेने भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग -१ रुपांतरित करण्याची कार्यवाही उपरोक्त क्र. १) व २) मधील तरतूदी विचारात घेवुन करण्यात यावी.

क) उक्त अधिनियमातील कलम २८-१ (अअ) मधील पोटकलम ३अ मध्ये महाराष्ट्र महसूल संहिता, १९६६ च्या कलम २ च्या खंड (१०) मध्ये परिभाषित केलेल्या गावठाण किंवा गावाच्या जागेच्या हद्दीपासुन ५ किलोमीटर अंतरातील शेती महामंडळाची जमीन सार्वजनिक प्रयोजनासाठी देण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर तरतुदीन्वये ग्रामपंचायतीकडुन केवळ गावठाण विस्तार, शासकीय घरकुल योजना, घनकचरा व्यवस्थापन किंवा पाणीपुरवठा योजना या सार्वजनिक प्रयोजनार्थच जमीन मागणी अनुज्ञेय राहील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक २०२४०२०९१०११५३४३१९ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

AJIT SOPANRAO DESHMUKH

Digitally signed by AJIT SOPANRAO DESHMUKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=d36a0a6455652c60ea76104dd537113a9ca67ab14a315b9cefc36fc9be2915f8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=704CB545C50221B15CDE7CCB8854E694C765DFB3A0240E891EBFB56EE79E3440, cn=AJIT SOPANRAO DESHMUKH
Date: 2024.02.09 10:22:10 +05'30'

(अजित देशमुख)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) सर्व विभागीय आयुक्त.
२) सर्व जिल्हाधिकारी.
३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत, पुणे,
४) उपजिल्हाधिकारी (जमीन धारणा). पुणे / सातारा / कोल्हापूर/ सोलापूर/ नाशिक / अहमदनगर/ औरंगाबाद,
५) निवडनस्ती (ल-७), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

नागपूर व अमरावती विभागातील निवासी प्रयोजनार्थ भाडेतत्वावर दिलेल्या नझूल जमिनी बाबत विशेष अभय योजना २०२४-२५.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः जमीन-२०२४/प्र.क्र.२८/ज-८.
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, १ ला मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १४ मार्च, २०२४.

संदर्भ :-१) शासन निर्णय क्र. महसूल व वन विभाग क्र. जमीन-२०२३/प्र.क्र.१५३/ज-८, दि. ९.११.२०२३
२) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र.जमीन/कार्या ९(१)/कावि-३२/२०२४,
दि.२३.०१.२०२४.

प्रस्तावना :-

नागपूर व अमरावती विभागातील नझुल जमिनींच्या भाडेपट्टयांच्या नुतनीकरणाविषयी तसेच त्यासंदर्भातील शर्तभंग/ वापरात बदल /विनापरवानगी हस्तांतरण इ.विषयाबाबत शासन निर्णय क्रमांकः- जमीन २४९९/ प्र.क्र.१२५/ज-८, दि. २३.१२.२०१५ अन्वये सुधारीत धोरण निश्चित करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयान्वये नझुल भाडेपट्टयाचे हस्तांतरण, वापरात बदल, शर्तभंग नियमितीकरण इ.साठी विहीत अनर्जित रक्कमेचे दर जास्त असल्याने ते दर कमी करण्याबाबत शासनाकडे विविध घटकाकडून केलेल्या मागणीचा विचार करुन दि.२३.१२.२०१५ च्या शासन निर्णयात सुधारणा करुन शासन निर्णय क्र. नझुल २०१६/प्र. क्र.१८६(अ)/ज-८, दि. ०२.०३.२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनर्जित दरात सुधारणा करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय क्रमांकः- नझुल २०१६/प्र. क्र.१८६(ब)/ज-८, दि.०२.०३.२०१९ अन्वये नागपूर व अमरावती विभागातील लिलावाव्दारे किंवा अन्य प्रकारे भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमीनी फ्री-होल्ड (भोगवटादार वर्ग-१) करण्याबाबतचा देखील निर्णय घेण्यात आला आहे.

२. सदर नझुल जमिनीबाबतच्या धोरणांच्या अनुषंगाने शर्तभंग प्रकरणे, निवासी प्रयोजनार्थ भूभाडे आकारणे तसेच भोगवटादार वर्ग-१ निवासी प्रयोजनाकरिता आकारण्यात येणा-या रुपांतरीत मूल्य दरात सुधारणा करण्याबाबत मा.मंत्री(महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२४.०७.२०२३ रोजी विधानमंडळ, मुंबई येथेील आयोजित बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशानुसार भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमिनी संदर्भातील मुद्यांबाबत सर्वकष अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली दि.०९.११.२०२३ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. प्रस्तुत समितीने शासनास दि.२३.०१.२०२४ रोजी आपला अहवाल सादर केला. सदर प्रकरणी नागपूर व अमरावती विभागातील निवासी प्रयोजनार्थ भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमिनीबाबत विशेष अभय योजना राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

१.१ नागपूर व अमरावती विभागातील निवासी प्रयोजनार्थ भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमिनीबाबत विशेष अभय योजना, २०२४-२०२५ च्या तरतूदी खालीलप्रमाणे विहीत करण्यात येत आहेत.

(अ) प्रस्तुत अभय योजना ज्या नझुल जमिनी निवासी प्रयोजनार्थ लिलावाद्वारे-प्रिमियम अथवा अन्य प्रकारे भाडे तत्त्वावर देण्यात आलेल्या आहेत, त्यांनाच लागू राहतील.

(आ) प्रस्तुत अभय योजना सन २०२४-२५ मध्ये दि. १.०४.२०२४ ते ३१.०७.२०२५ पर्यंत या कालावधीसाठीच लागू राहतील.

(इ) नझुल जमिनीच्या निवासी प्रयोजनार्थ प्रिमीयम/ लिलावाद्वारे अथवा अन्य प्रकारे भाडे तत्वावर दिलेल्या आहेत, त्यांना फ्रिहोल्ड करणे (भोगवटदार-१) करणे करीता अशा जमिनीच्या प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रातील येणाऱ्या बाजारमुल्याच्या २ टक्के एवढे अधिमुल्य आकारण्यात यावे.

फ्रिहोल्ड करणेकरीता अन्य अटी व शर्ती शासन निर्णय क्र. नझुल-२०१६/ प्र.क्र.१८६(ब)/ज-८, दि.०२.०३.२०१९ प्रमाणे पूर्वीचा भाडेपट्टा नियमित करणे, शर्तभंग नियमानुकूल करणे संदर्भात परि.क्र.२, ३ व ४ मधील अटी कायम राहतील. अभय योजनेत थकीत भाडेपट्टयाची रक्कम प्रचलित दराने आकारणी करण्यात यावी. तसेच शर्तभंग बाबत शेवटचा शर्तभंग केल्याच्या दिनांकाच्या वेळी त्या वर्षीच्या वार्षिक दरसूची प्रमाणे जमिनीच्या बाजारमूल्याच्या विहित दराने अनर्चित रक्कम आकारण्यात यावी.

(उ) निवासी प्रयोजनार्थ प्रिमियम लिलावाद्वारे व अन्यथा भाडेपट्टयाने दिलेल्या नझूल जमिनीचे वार्षिक भू-भाडे आकारणी विहित प्रचलित दराने व कालमर्यादेत भरणे अनिवार्य असेल. (दि. ३१ जुलै, २०२५ पूर्वी) दि. ३१.०७.२०२५ पर्यंत प्रलंबित भू-भाडे न भरल्यास थकीत भू-भाडे व त्यावर वार्षिक १० टक्के दंडनिय व्याज आकारणी करण्यात येईल.

(ऊ) प्रस्तुत नझुल जमिनीकरीता निवासी प्रयोजनार्थ भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनीकरीता विशेष अभय योजना समाप्तीनंतर दिनांक १.०८.२०२५ पासून शासन निर्णय दि. २३.१२.२०१५ व शासन निर्णय दि. ०२.०३.२०१९ च्या तरतूदी लागू राहतील.

१.२ सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ६३/२०२४, दि.१४.०२.२०२४ अन्वये व मा. मंत्रीमंडळाने दि. ११.०३.२०२४ रोजी झालेल्या बैठकीतील मान्यतेच्या अधिन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२४०३१४१९१६५१६३१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY SHANKARRAO INGLE

Digitally signed by SANJAY SHANKARRAO INGLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=f0d616600e4d2f510d1c8cc19813e070ad282d2275bf6fc132a2dee97f14e0a6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D337930B14433DC62C0154AF2BBC60BB5A6EDCAA66B7F34596C50A27EB0F6333, cn=SANJAY SHANKARRAO INGLE
Date: 2024.03.14 19:27:04 +05'30'

(संजय इंगळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
४) मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
५) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधान सभा, मुंबई

नागपूर व अमरावती विभागातील निवासी प्रयोजनार्थ भाडेतत्वावर दिलेल्या नझूल जमिनी बाबत विशेष अभय योजना २०२४-२५.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः जमीन-२०२४/प्र.क्र.२८/ज-८.

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, १ ला मजला,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : १६ मार्च, २०२४.

संदर्भ :-१) शासन निर्णय क्र. महसूल व वन विभाग क्र. जमीन-२०२३/प्र.क्र.१५३/ज-८, दि. ९.११.२०२३

२) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र.जमीन/कार्या ९(१)/कावि-३२/२०२४, दि.२३.०१.२०२४.

३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. जमीन-२०२४/प्र.क्र.२८/ज-८, दि. १४.०३.२०२४

<u>प्रस्तावना :-</u>

नागपूर व अमरावती विभागातील नझुल जमिनींच्या भाडेपट्टयांच्या नुतनीकरणाविषयी तसेच त्यासंदर्भातील शर्तभंग/ वापरात बदल /विनापरवानगी हस्तांतरण इ.विषयाबाबत शासन निर्णय क्रमांकः- जमीन २४९९/ प्र.क्र.१२५/ज-८, दि. २३.१२.२०१५ अन्वये सुधारीत धोरण निश्चित करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयान्वये नझुल भाडेपट्टयाचे हस्तांतरण, वापरात बदल, शर्तभंग नियमितीकरण इ.साठी विहीत अनर्जित रक्कमेचे दर जास्त असल्याने ते दर कमी करण्याबाबत शासनाकडे विविध घटकाकडून केलेल्या मागणीचा विचार करुन दि.२३.१२.२०१५ च्या शासन निर्णयात सुधारणा करुन शासन निर्णय क्र. नझुल २०१६/प्र. क्र.१८६(अ)/ज-८, दि. ०२.०३.२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनर्जित दरात सुधारणा करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय क्रमांकः- नझुल २०१६/प्र. क्र.१८६(ब)/ज-८, दि.०२.०३.२०१९ अन्वये नागपूर व अमरावती विभागातील लिलावाव्दारे किंवा अन्य प्रकारे भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमीनी फ्री-होल्ड (भोगवटादार वर्ग-१) करण्याबाबतचा देखील निर्णय घेण्यात आला आहे.

२. सदर नझुल जमिनीबाबतच्या धोरणांच्या अनुषंगाने शर्तभंग प्रकरणे, निवासी प्रयोजनार्थ भूभाडे आकारणे तसेच भोगवटादार वर्ग-१ निवासी प्रयोजनाकरिता आकारण्यात येणा-या रुपांतरीत मूल्य दरात सुधारणा करण्याबाबत मा.मंत्री(महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२४.०७.२०२३ रोजी विधानमंडळ, मुंबई येथील आयोजित बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशानुसार भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमिनी संदर्भातील मुद्यांबाबत सर्वकष अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली दि.०९.११.२०२३ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. प्रस्तुत समितीने शासनास दि.२३.०१.२०२४ रोजी आपला अहवाल सादर केला. सदर प्रकरणी नागपूर व अमरावती विभागातील निवासी

प्रयोजनार्थ भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमिनीबाबत विशेष अभय योजना राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय :-</u>

उपरोक्त विषयी मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीतील निर्देशांनुसार शासन निर्णय समक्रमांक दि.१४.०३.२०२४ अधिक्रमीत करून खालीलप्रमाणे सुधारित अभय योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे:-

१.१ नागपूर व अमरावती विभागातील निवासी प्रयोजनार्थ भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमिनीबाबत विशेष अभय योजना, २०२४-२०२५ च्या तरतूदी खालीलप्रमाणे विहीत करण्यात येत आहेत.

(अ) प्रस्तुत अभय योजना ज्या नझुल जमिनी निवासी प्रयोजनार्थ लिलावाद्वारे-प्रिमियम अथवा अन्य प्रकारे भाडे तत्त्वावर देण्यात आलेल्या आहेत, त्यांनाच लागू राहतील.

(आ) प्रस्तुत अभय योजना सन २०२४-२५ मध्ये दि. १.०४.२०२४ ते ३१.०७.२०२५ पर्यंत या कालावधीसाठीच लागू राहतील.

(इ) नझुल जमिनीच्या निवासी प्रयोजनार्थ प्रिमीयम/ लिलावाद्वारे अथवा अन्य प्रकारे भाडे तत्वावर दिलेल्या आहेत, त्यांना फ्रिहोल्ड करणे (भोगवटदार-१) करणे करीता अशा जमिनीच्या प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रातील येणाऱ्या बाजारमुल्याच्या २ टक्के एवढे अधिमुल्य आकारण्यात यावे.

फ्रिहोल्ड करणेकरीता अन्य अटी व शर्ती शासन निर्णय क्र. नझुल-२०१६/ प्र.क्र.१८६(ब)/ज-८, दि.०२.०३.२०१९ प्रमाणे पूर्वीचा भाडेपट्टा नियमित करणे, शर्तभंग नियमानुकूल करणे संदर्भात परि.क्र.२, ३ व ४ मधील अटी कायम राहतील. अभय योजनेत थकीत भाडेपट्टयाची रक्कम ०.०२% दराने आकारणी करण्यात यावी. तसेच शर्तभंग बाबत शेवटचा शर्तभंग केल्याच्या दिनांकाच्या वेळी त्या वर्षीच्या वार्षिक दरसूची प्रमाणे जमिनीच्या बाजारमूल्याच्या १% दराने अनर्चित रक्कम आकारण्यात यावी.

(उ) निवासी प्रयोजनार्थ प्रिमियम लिलावाद्वारे व अन्यथा भाडेपट्टयाने दिलेल्या नझूल जमिनीचे वार्षिक भू-भाडे आकारणी ०.०२% दराने व कालमर्यादेत भरणे अनिवार्य असेल. (दि. ३१ जुलै, २०२५ पूर्वी) दि. ३१.०७.२०२५ पर्यंत प्रलंबित भू-भाडे न भरल्यास थकीत भू-भाडे व त्यावर वार्षिक १० टक्के दंडनिय व्याज आकारणी करण्यात येईल.

(ऊ) प्रस्तुत नझुल जमिनीकरीता निवासी प्रयोजनार्थ भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनीकरीता विशेष अभय योजना समाप्तीनंतर दिनांक १.०८.२०२५ पासून शासन निर्णय दि. २३.१२.२०१५ व शासन निर्णय दि. ०२.०३.२०१९ च्या तरतूदी लागू राहतील.

१.२ सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ६३/२०२४, दि.१४.०२.२०२४ अन्वये व मा. मंत्रीमंडळाने दि. ११.०३.२०२४ व दि.१६.०३.२०२४ रोजी झालेल्या बैठकीतील मान्यतेच्या अधिन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२४०३२१६१५४०५२२६१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY
SHANKARRAO INGLE

Digitally signed by SANJAY SHANKARRAO INGLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=f0d616600e4d2f510d1c8cc19813e070ad282d2275bf6fc132a2dee97f14e0a6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D337930B14433DC62C0154AF2BBC60BB5A6EDCAA66B7F34596C50A27EB0F6333, cn=SANJAY SHANKARRAO INGLE
Date: 2024.03.16 15:51:14 +05'30'

(संजय इंगळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
४) मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
५) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधान सभा, मुंबई
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई -३२.
८) अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) मंत्रालय, मुंबई -३२.
९) अपर सचिव (महसूल) यांचे वि.का.अ./ स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई -३२.
१०) अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
११) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
१२) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) जिल्हाधिकारी, नागपूर, चंद्रपुर, गडचिरोली, गोंदीया, भंडारा, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा व वाशिम
१४) मा. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य (१), मुंबई -३२.
१५) मा. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य (२), नागपूर.
१६) वित्त विभाग (व्यय-९), मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
१७) सर्व सह सचिव / उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१८) निवड नस्ती, कार्यासन ज-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.

राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांना शासकीय जमीन प्रदान करण्याबाबत धोरण.....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक जमीन ३४२१/५३१/प्र.क्र.११०/ज-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दि. ०३/१०/२०२४

वाचा:-

१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. १०८९/प्र.क्र.८९/८९/ज-१, दि.२७/०३/१९९८.
२) मा. राज्य मंत्रिमंडळ बैठकीचे दि. २३/०९/२०२३ रोजीचे इतिवृत्त.

<u>प्रस्तावना:-</u>

राज्यात कृषि मालाच्या वितरणाकरीता एकाच ठिकाणी सुविधा/सोय व्हावी, तसेच याकामासाठी क्षेत्र निहाय स्वतंत्र यंत्रणा असावी, या उद्देशाने "कृषि उत्पन्न बाजार समिती" स्थापित करण्यात येते. अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांना बाजारकरीता जमिनीची आवश्यकता भासते. राज्यातील कृषि मालाच्या वितरण व्यवस्थेमध्ये सुसंगतता यावी आणि कृषि उत्पन्न बाजार समित्यांना किमान आवश्यक तितकी (Bona-fide Area Requirement) शासकीय जमीन सहजपणे प्रदान करणे शक्य व्हावे, याकरीता शासनाने शासन निर्णय दि. २७/०३/१९९८ अन्वये संबंधित शासकीय जमिनीचे वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दरांनुसार येणाऱ्या संपूर्ण मूल्यांकन इतकी रक्कम (संपूर्ण बाजारमूल्याची रक्कम) आकारून व वसूल करून शासकीय जमीन प्रदानाचे धोरण विहित केलेले आहे.

०२. आता, राज्यातील शेतीमालास सुलभतेने, सहज आणि जलदगतीने बाजारपेठ उपलब्ध करून देण्याची आवश्यकता तसेच, कृषि उत्पन्न बाजार समिती यांच्या विकासाकरीता मदत व्हावी, म्हणून उक्त धोरणात कालऔघात बदल करण्याची मागणी आहे. तसेच राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने, शासकीय जमीन, सदरहू कृषि उत्पन्न बाजार समिती या प्रयोजनासाठी नाममात्र दराने कब्जेहक्काने प्रदान करण्याच्या मागणी शासनाकडे वेळोवेळी करण्यात येत होती. सदर मागणीच्या अनुषंगाने "कृषि उत्पन्न बाजार समिती" ही बाब सार्वजनिक प्रयोजन आहे काय याबाबत विधी व न्याय विभागाने पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत:-

"Having considered the factual position stated in the forgoing para ८ of the present note and also the aforesaid provisions of the MLR Code, १९६६, RFCTLARR Act, २०१३ and the Maharashtra Agricultural Produce Market Act, १९६३ it is manifestly clear that, the

Baramati Agricultural Produce Market Committee is the statutory authority constituted under the State Statute. As such, the said Committee falls within the ambit of the "Public authority". Further, considering the proposed use of the land under reference it is clear that the purpose for which the land is proposed to be used is public purpose in view of aforesaid provisions of the RFCTLARR Act, २०१३."

०३. सबब, कृषि उत्पन्न बाजार समिती यांची मागणी त्यांचा उद्देश आणि विधी व न्याय विभागाचे अभिप्राय विचारात घेवून, कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सार्वजनिक प्रयोजनासाठी शासकीय जमीन प्रदानासंदर्भातील उक्त नमूद शासन निर्णय दि. २७/०३/१९९८ च्या धोरणात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

उपरोक्त पार्श्वभूमी विचारात घेवून, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २०, २२-अ व ४० आणि अन्य तरतूदी अन्वये प्राप्त अधिकारात, राज्यांमधील कृषि उत्पन्न बाजार समिती, या सार्वजनिक प्रयोजनासाठी शासकीय जमीन प्रदान करण्याच्या संदर्भात शासनाने आता पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

१) राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समिती या सार्वजनिक प्रयोजनासाठी यापुढे किमान आवश्यक मर्यादेत(Bona-fide Area Requirement) शासकीय जमीन नाममात्र रु. १/- या दराने कब्जेहक्काची रक्कम आकारून व वसूल करून **नेहमीच्या अटी व शर्तीवर** प्रदान करण्यात यावी.

२) संबंधित कृषि उत्पन्न बाजार समिती, ही ज्यावेळी अशा प्रदान केलेल्या जमिनीवरील गाळे/व्यावसायिक जागा भाडेपट्टयाने देईल अथवा विक्री करेल, त्या वेळी संबंधित भुईभाड्याच्या रकमेच्या / विक्री रकमेच्या ५० टक्के रक्कम अनर्जित रक्कम म्हणून शासनास जमा करणे कृषि उत्पन्न बाजार समिती यांच्यावर अनिवार्य राहील.

३) कृषि उत्पन्न बाजार समित्यांना शासकीय जमिनी मंजूर करताना, अशा संस्थांना किमान किती जागेची आवश्यकता आहे, याबाबतची शिफारस पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनास केल्यानंतरच, असा शासकीय जमीन मागणीचा प्रस्ताव विचारात घेऊन, जमीन प्रदान करण्याबाबत योग्य निर्णय घ्यावा.

४) कृषि उत्पन्न बाजार समिती यांनी धारण केलेल्या जमिनींना **"अकृषिक आकारणी"** तून सूट देण्यात येऊ नये.

०२. सदर शासन निर्णय हा राज्य मंत्रिमंडळाच्या दि. २३/०९/२०२४ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेस अनुसुरुन निर्गमित करण्यात येत आहे.

०३. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४१००३१५३७३६६५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SUNIL SHRIDHARRAO KOTHEKAR

Digitally signed by SUNIL SHRIDHARRAO KOTHEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=bc3e3742bf263c80937ab54c636ad893656171177467ba8656a12c226f3029a2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C55205CA6D1113BFAEC735BD2D1C5326D6B007C5CD3A46A6E4C4857E58AD2AFE, cn=SUNIL SHRIDHARRAO KOTHEKAR
Date: 2024.10.03 15:24:10 +05'30'

(सुनिल कोठेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री महोदय यांचे सचिव (गृह), उप मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उप मुख्यमंत्री महोदय यांचे उप सचिव (वित्त), उप मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा/परिषद, विधानभवन, मुंबई.
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव (महसूल), यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, (पणन), सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) विभागीय आयुक्त, पुणे, कोकण, औरंगाबाद, नाशिक, अमरावती व नागपूर.
१३) सर्व जिल्हाधिकारी
१४) सह सचिव, व्यय-९, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) उप सचिव, साधनसंपत्ती, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, सर्व.
१७) संचालक, (पणन) महाराष्ट्र राज्य, पुणे.
१७) मा.महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई (१) व नागपूर (२).
१८) सर्व सह सचिव / उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) उप सचिव (ज-५), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) निवडनस्ती, कार्यासन ज-५, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

घराची बोळकांडी किंवा सफाई गल्ली (conservancy lane) यांच्या खालील शासकीय किंवा नझूल जमीन प्रदानाकरीता आकारावयाच्या कब्जेहक्काची अथवा भुईभाड्याची रक्कम विहीत करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः जमीन-२०१८/प्र.क्र.०२/ज-१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- ०९ ऑक्टोबर, २०२४

वाचा :-

१) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४०.
२) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ चे नियम-३७अ व ५०.
३) महसूल व वन विभाग,शासन अधिसूचना क्र.जमीन-२०१८/प्र.क्र.०२/ज-१, दिनांक ६ नोव्हेंबर,२०१८.

प्रस्तावना :-

शासन राजपत्रातील अधिसूचना क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.०२/ज-१, दिनांक ६ नोव्हेंबर, २०१८ अन्वये, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम १९७१ च्या नियम ३७ नंतर "नियम ३७अ" आणि नियम ५० नंतर "परंतुक" समाविष्ट करण्यात आले आहेत. या नियमांन्वये महानगरपालिका किंवा नगरपरिषद क्षेत्रातील भूखंडालगत असलेल्या घराची बोळकांडी किंवा सफाई गल्ली (conservancy lane) ची शासकीय किंवा नझूल जमीन, लगतचा भूखंडधारक ज्या धारणाधिकारावर उक्त भूखंड तो धारण करीत असेल, त्याच धारणाधिकारावर प्रदान करण्यासंदर्भात तरतूद करण्यात आली आहे. त्यानुषंगाने, लगतच्या भूखंड धारकास, असा घराची बोळकांडी किंवा सफाई गल्ली (conservancy lane) या शासकीय किंवा नझूल जमिनीचा भूखंड भाडेपट्ट्याने अथवा कब्जेहक्काने अथवा भोगवटादार वर्ग-१ धारणाधिकाराने प्रदान करण्याकरीता आकारावयाच्या मुल्याबाबत धोरण विहीत करणे गरजेचे आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम १९७१ च्या नियम ३७अ अन्वये जमिनींच्या लहान पट्टयांची विल्हेवाट लावण्यासंदर्भात लगतचा भूखंडधारक ज्या धारणाधिकारावर उक्त भूखंड तो धारण करीत असेल, त्याच धारणाधिकारावर जमीन प्रदान करण्याची तरतूद आहे. त्याअर्थी, अशा जमिनीच्या प्रदानाकरीता जमीन प्रदानासमयी असलेल्या प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रातील दरानुसार अशा जमिनीची येणारी संपुर्ण किंमत विचारात घेणे आवश्यक आहे, त्यानुषंगाने धोरण विहीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ च्या नियम ३७अ मधील तरतुदीनुसार, लगतच्या भूखंड धारकांना प्रदान करावयाच्या, घराची बोळकांडी किंवा सफाई गल्ली (conservancy lane) यांच्या खालील शासकीय किंवा नझूल जमीन प्रदानाकरीता, वार्षिक भुईभाड्याची अथवा कब्जेहक्काची रक्कम तसेच भोगवटादार वर्ग-१ या धारणाधिकाराने जमीन प्रदानाची रक्कम पुढीलप्रमाणे आकारण्यात यावी, असे दिशानिर्देश या शासन निर्णयान्वये क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना देण्यात येत आहेत :-

(१) **"नियम ३७ अ" च्या प्रयोजनार्थ** -

(i) जर लगतच्या भूखंडधारकाने, धारण केलेला भूखंड हा शासकीय किंवा नझूल जमीन असुन, असा भूखंड संबंधितांनी भाडेपट्ट्याने धारण केलेला असल्यास, अशा लगतच्या भूखंडधारकांना घराची बोळकांडी किंवा सफाई गल्ली (conservancy lane) खालील जमीन प्रदान करतांना, अशा लगतच्या भूखंडधारकाच्या शासकीय किंवा नझूल जमिनीस ज्या प्रति चौ.मी. दराने वार्षिक भुईभाडे आकारण्यात येत असेल, त्याच दराने वार्षिक भुईभाडे आकारून भाडेपट्टयाने प्रदान करण्यात यावी.

वरीलप्रमाणे बोळकांडी किंवा सफाई गल्ली (conservancy lane) खालील जमीन भुईभाडे आकारून भाडेपट्टयाने प्रदान करताना भाडेपट्ट्याचा कालावधी आणि भाडेपट्ट्याच्या अटी व शर्ती या मुळ शासकीय किंवा नझूल जमिनीच्या भाडेपट्ट्याशी सुसंगत ठेवण्यात याव्यात.

(ii) जर लगतच्या भूखंडधारकाने, धारण केलेला भूखंड हा शासकीय किंवा नझूल जमीन असुन, असा भूखंड संबंधितांनी कब्जेहक्काने भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारावर धारण केलेला असल्यास, अशा लगतच्या भूखंडधारकांना घराची बोळकांडी किंवा सफाई गल्ली (conservancy lane) खालील जमीन प्रदान करतांना, अशा जमिनीची प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रातील दरानुसार येणारी संपुर्ण किंमत आकारून व वसूल करून कब्जेहक्काने भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारावर प्रदान करण्यात यावी.

(iii) जर लगतच्या भूखंडधारकाने, धारण केलेला भूखंड हा शासकीय किंवा नझूल जमीन असुन, असा भूखंड संबंधितांनी भोगवटादार वर्ग-१ या धारणाधिकारावर धारण केलेला असल्यास, अशा लगतच्या भूखंडधारकांना घराची बोळकांडी किंवा सफाई गल्ली (conservancy lane) खालील जमीन प्रदान करतांना, अशा जमिनीची प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रातील दरानुसार येणारी संपुर्ण किंमत अधिक अशा किमतीच्या २५% इतकी अधिमुल्याची रक्कम (म्हणजेच एकूण १२५%) आकारून व वसूल करून भोगवटादार वर्ग-१ या धारणाधिकारावर प्रदान करण्यात यावी.

(२) "नियम ३७अ" अन्वये घराची बोळकांडी किंवा सफाई गल्ली (conservancy lane) ची शासकीय जमीन किंवा नझूल जमीन प्रदान करण्यासंदर्भात, बोळकांडी किंवा सफाई गल्ली च्या दोन्ही बाजु लगत असलेल्या एक अथवा एकापेक्षा अधिक भूखंडधारकांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी केली असल्यास, अशी जमीन संबंधीत लगतच्या भूखंडधारकांना (त्यांच्या सीमेला लागून असलेल्या बाजूस समांतर) समप्रमाणात विभागून वरील परि. (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे किंमत आकारून प्रदान करण्यात यावी.

तसेच, भूखंडधारकाने धारण केलेल्या भूखंडाच्या सीमेला लागून असलेल्या बाजूस समांतर जमिनीची एकाच बाजूच्या भूखंडधारकाने मागणी केली तर अशा भूखंडधारकास घराची बोळकांडी किंवा सफाई गल्ली (conservancy lane) चे संपूर्ण क्षेत्र प्रदान न करता त्यापैकी ५० टक्के क्षेत्रामध्ये समोरील बाजुच्या भूखंडधारकाचा हितसंबंध राहील. जर दोन्ही बाजुच्या भूखंडधारकांनी घराची बोळकांडी किंवा सफाई गल्ली (conservancy lane) च्या क्षेत्राची मागणी केली असेल तर दोन्ही भूखंडधारकांना असे क्षेत्र समप्रमाणात प्रदान करण्यात यावे. तथापि, एकाच बाजुच्या भूखंडधारकाने घराची बोळकांडी किंवा सफाई गल्ली (conservancy lane) च्या संपूर्ण क्षेत्राची मागणी केली असल्यास असे क्षेत्र मागणी करणाऱ्या भूखंडधारकास प्रदान करण्यापुर्वी त्याच्या समोरील बाजुच्या भूखंडधारकाने त्याला सदर जमिनीची आवश्यकता नसल्याचे लेखी प्रतिवेदन सादर करणे आवश्यक राहील.

उदा. :-



वरील चित्रामध्ये दर्शविल्यानुसार **'अ'** व **'ब'** या दोन्ही भूखंडधारकांनी घराची बोळकांडी किंवा सफाई गल्ली (conservancy lane) च्या क्षेत्राची मागणी केली असेल तर **'अ'** व **'ब'** यांना असे क्षेत्र समप्रमाणात प्रदान करण्यात यावे. जर **'अ'** भूखंडधारकाने त्याच्या भूखंडाच्या सीमेला लागून असलेल्या बाजूस समांतर घराची बोळकांडी किंवा सफाई गल्ली (conservancy lane) च्या संपूर्ण क्षेत्राची मागणी केली असल्यास असे क्षेत्र **'अ'** ला प्रदान करण्यापूर्वी त्याच्या समोरील बाजुच्या **'ब'** भूखंडधारकाने त्याला सदर जमिनीची आवश्यकता नसल्याचे लेखी प्रतिवेदन सादर करणे आवश्यक राहील.

(३) एखाद्या भूखंडधारकाने मागणी केलेल्या -घराची बोळकांडी किंवा सफाई गल्ली (conservancy lane) ची शासकीय जमीन किंवा नझूल जमीन॰ इतर भूखंडधारकाने मागणी केली नसेल तरीही अशी जमीन प्रदान करण्यापूर्वी लगतच्या सर्व भूखंडधारकांची संमती घेणे आवश्यक राहील.

(४) अशी जागा प्रदान करण्यापूर्वी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची तसेच संबंधित नियोजन प्राधिकरणाची ना-हरकत मागणी करणाऱ्या भूखंडधारकाने प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

(५) घराची बोळकांडी किंवा सफाई गल्ली (conservancy lane) ची शासकीय जमीन किंवा नझूल जमीनीमध्ये दुरध्वनी केबल, तसेच उच्च दाबाच्या विद्युत तारा जात नसल्याबाबत संबंधीत विभागाचे सुस्पष्ट अभिप्राय अथवा तसा दाखला सादर करणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३७२/२०२४/व्यय-९/२०२४, दि.२३.०८.२०२४ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२४१००९१३०७५४९५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DHANANJAY SUKADEO NIKAM

Digitally signed by DHANANJAY SUKADEO NIKAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=252c78ac8d64427592538 3ca61a002efd810ba07ab021d80de93ceae2241264f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=023C7F2FB2F165CB6D952CA9235FB77D1A378B6608A63S8A1ECAC9BC7F81FBB, cn=DHANANJAY SUKADEO NIKAM
Date: 2024.10.09 12:56:22 +05'30'

(धनंजय निकम)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७. अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
९. अप्पर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर
११. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र१/२, मुंबई/ नागपूर
१२. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख,
१३. नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.

महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय,बुलढाणा

विषय क्र.६

नोंदणी व मुद्रांक विषयक धोरणात्मक शासन निर्णय

नोंदणी व मुद्रांक तसेच भुमि अभिलेख विभागातील कार्यालयांविषयीच्या तक्रारींचे निरसनासाठी त्रयस्थ तक्रार निवारण व्यवस्थेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : आस्थाप-२०२२/प्र.क्र.१४५/म-१

दालन क्र. म-७अ, पोटमाळा, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय (विस्तार इमारत), मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : १७ जून, २०२२

संदर्भ : १) शासन परिपत्रक क्र. आस्थाप-२०१९/३९७८/प्र.क्र.०२/म-१, दि. ०६.०२.२०१९.

२) शासन परिपत्रक क्र. आस्थाप-२०१९/३९७८/प्र.क्र.०२/म-१, दि. ०९.०३.२०२०.

प्रस्तावना :

नोंदणी व मुद्रांक विभागातील प्रशासकीय कामकाज व कार्यसूलभतेच्या संदर्भाने "आपले सरकार" पोर्टल अथवा इतर माध्यमातून नोंदणी व मुद्रांक विभागातील दुय्यम निबंधक, सह जिल्हा निबंधक वर्ग-२, मुद्रांक जिल्हाधिकारी, सह जिल्हा निबंधक, नोंदणी उपमहानिरीक्षक तथा मुद्रांक उपनियंत्रक व भूमी अभिलेख विभागातील नगर भूमापन अधिकारी, उप अधिक्षक, भूमी अभिलेख, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, उपसंचालक, भूमी अभिलेख या कार्यालयांच्या कामकाजाविषयी अर्ज/तक्रार/सूचना प्राप्त झाल्यास, सदर तक्रारीचे निरसन करण्यासाठी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या "Ease of Doing Business" बाबतच्या आढावा बैठकीमध्ये मा.मुख्य सचिव यांनी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील उपरोक्त नमुद कार्यालयांचे प्रशासकीय कामकाज व कार्यसुलभता यावी याद्दष्टिने त्रयस्थ तक्रार निवारण अधिकारी नेमण्याचे निर्देश दिले आहेत.

सदर निर्देशाचे अनुषंगाने नोंदणी व मुद्रांक विभाग तसेच भूमि अभिलेख विभागात तक्रार निवारण अधिकारी नेमण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :-

महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांतील नोंदणी व मुद्रांक विभागातील दुय्यम निबंधक, सह जिल्हा निबंधक वर्ग-२, मुद्रांक जिल्हाधिकारी, सह जिल्हा निबंधक, नोंदणी उपमहानिरीक्षक तथा मुद्रांक उपनियंत्रक व भूमी अभिलेख विभागातील नगर भूमापन अधिकारी, उप अधिक्षक, भूमी अभिलेख, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, उपसंचालक, भूमी अभिलेख यांचे कार्यालयातील **"प्रशासकीय कामकाज तसेच कार्यसुलभता"** या संदर्भाने काही तक्रार प्राप्त झाल्यास त्यासाठी त्रयस्थ तक्रार निवारण अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त (महसूल) यांची नेमणूक करण्यात येत आहे.

त्रयस्थ तक्रार निवारण अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त (महसूल) यांच्याकडे अर्ज आल्यास, विभागीय आयुक्त यांनी सदर तक्रारीची स्वतंत्र व नि:पक्षपणे चौकशीकरुन अर्जदारास / तक्रारदारास त्यांचे स्तरावरुन कळवावे.

सदरचे आदेश या शासन परिपत्रकाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२२०६१७१६०३५८७५१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shridhar Baburao Dube

Digitally signed by Shridhar Baburao Dube
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bfe7996a51d0fda36a9f4ef60d969b7ee904c5b75320a6a8a0bf60e2e9cbba06, pseudonym=EABFEBBD83697D3DF66A3DA7078B7DCCA230CEE8A, serialNumber=34CDB4C0A0CF400AD02CF1830E2F946F9CC0415A591E9A825D9E9B9AE62ED37F, cn=Shridhar Baburao Dube
Date: 2022.06.17 16:07:40 +05'30'

(श्रीधर डुबे पाटील)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत :-

१. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
२. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
३. सर्व विभागीय आयुक्त (महसूल)
४. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भुमी अभिलेख,
६. सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा निबंधक, महाराष्ट्र राज्य.
७. अपर मुद्रांक नियंत्रक प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई,
८. नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक
९. अधिक्षक, भुमी अभिलेख
१०. सह सचिव, (मुद्रांक) / सह सचिव (ई-६) महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. निवडनस्ती म-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन परिपत्रक क्र. जमीन-२०२२/ प्र.क्र.२६४/ज-१

पहिला मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक:- १३ जानेवारी, २०२३

वाचा:-

१) शासन परिपत्रक क्रमांक:- एलएनडी १०८१/३१९४९-प्र.क्र.-१५८१-ग-५, दि. १३ ऑक्टोबर, १९८१

२) शासन निर्णय क्रमांक:- एलबीएल १०८६/२६४४/प्र.क्र.१९६/ग-८, दिनांक १४ जून, १९८८

३) शासन निर्णय क्रमांक:- एलएनडी १०८५/१३४२२२/प्र.क्र.१८४/ज-२, दिनांक ०५ ऑक्टोबर, १९९९

४) शासन निर्णय क्रमांक:- जमीन १०/२००२/प्र.क्र.३८७/ज-१, दिनांक: २९ मे, २००६

५) शासन परिपत्रक क्रमांक:- संकिर्ण-०५/२००६/प्र.क्र.४३/ज-१, दिनांक: ३१ ऑक्टोबर, २००६

६) शासन परिपत्रक क्रमांक:- जमीन ११/२००७/प्र.क्र.९८/ज-१, दिनांक ३१ डिसेंबर, २००७

७) शासन निर्णय, म.व.व.वि.क्र.जमीन-११/२००७/प्र.क्र.९८/ज-१, दिनांक २९ एप्रिल, २००८

८) शासन पूरकपत्र क्र. जमीन १०/२००२/प्र.क्र.३८७/ज-१, दि. ६ मे, २००८

९) शासन निर्णय क्रमांक:- जमीन-२०१९/प्र.क्र.०१/ज-१, दिनांक १८ फेब्रुवारी, २०१९

१०) शासन परिपत्रक क्रमांक:- मुद्रांक-२०१७/अनौ.क्र.११/प्र.क्र.१३३/म-१ (धोरण) दिनांक: २४ डिसेंबर २०२०

प्रस्तावना:

शासकीय जमिनी विविध प्रयोजनासाठी कब्जेहक्काने/भाडेपट्टयाने देताना तसेच अनर्जित उत्पन्नाची परिगणना करण्यासाठी जमिनीचे मुल्यांकन करताना विविध कार्यपध्दतीसह वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यानुसार मुल्यांकन करण्याच्या सूचना वरील शासन निर्णय / परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. तसेच, संदर्भीय क्र. १० मधील शासन परिपत्रक दि. २४ डिसेंबर, २०२० अन्वये संदर्भीय क्र. ६ वरील शासन परिपत्रक दि. ३१ डिसेंबर, २००६ या प्रयोजनासाठी अधिक्रमित केले आहे.

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, विविध प्रयोजनसाठी शासनाने प्रदान केलेल्या जमिनीबाबत करारनामा करताना, त्यावर मुद्रांक शुल्क आकारताना वरील संदर्भाधीन शासन निर्णय/परिपत्रक यातील सूचनांचा विचार करुन मुद्रांक शुल्क ठरविले जात आहे. तथापि, एखादया दस्तावर किती रकमेचे मुद्रांक शुल्क आकारावे याबाबतच्या तरतुदी मुद्रांक शुल्क कायदा/मिळकतीचे खरे-खुरे बाजारमुल्य ठरविणेबाबतचे नियम व त्या अनुषंगाने निर्गमित केलेले शासन निर्णय परिपत्रक/ सूचना यानुसार आकारणे अपेक्षित आहे. या बाबींचा विचार करुन पुढील प्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन परिपत्रक :-

शासनाने कब्जेहक्काने/करारनाम्याने/भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या जमिनीचे दस्त/ करारनामे निष्पादन/ नोंदणी करताना आवश्यक मुद्रांक शुल्काची परिगणना करताना उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय/परिपत्रकान्वये दिलेल्या सुचनांनुसार मिळकतींचे मुल्यांकन न करता उक्त दस्तांवर/करारनाम्यावर आकारावयाचे मुद्रांक शुल्क हे महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम/ मिळकतीचे खरे- खुरे बाजारमुल्य निर्धारीत करणे नियम व त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय/ परिपत्रक/आदेश यामधील तरतुदींनुसार आकारण्यात यावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२३०११३१६३५१०८५१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUHAS MADHAV MAMDAPURKAR

Digitally signed by SUHAS MADHAV MAMDAPURKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=15e9cd7730234dc2963eb61397dd04240c15d02a5a148c43a83593ac725fd19c, pseudonym=1A2F622DE5904FF048601C73A1843490SEEEC888, serialNumber=F1B00E7181536EEDD7B08803397FED3A96870CA795C4D9384B72F43A5A066D99, cn=SUHAS MADHAV MAMDAPURKAR
Date: 2023.01.13 16:39:39 +05'30'

(सुहास ममदापूरकर)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहाय्यक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (१) मुंबई.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (२) नागपूर
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व सहसचिव / उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२. "ज" समुहातील सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई
१३. निवडनस्ती कार्यासन ज-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

राज्यातील नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकास प्रकल्पातील सहकारी गृहनिर्माण संस्था व मुळ सदनिका/ गाळेधारक/ सभासद यांच्यातील करारनाम्यावर मुद्रांक शुल्काची आकारणी करण्याबाबत ...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक:- मुद्रांक-२०२२/प्र.क्र.६१७/म-१ (धोरण)
दालन क्र.एम-७ए, पोटमाळा, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- १४ जुलै, २०२३.

वाचा- गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्रमांक:- संकिर्ण २०१९/प्र.क्र.१०/दुवपु-१, दिनांक १३.०९.२०१९.

प्रस्तावना:-

राज्यातील शासकीय / निमशासकीय / खाजगी जमिनीवरील सर्व नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या इमारतींचा स्वयंपुनर्विकास करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीकोनातून स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीच्या शिफारशीनुसार गृहनिर्माण विभागाने दिनांक १३.०९.२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक ९ (आ) खालीलप्रमाणे आहे.

मुद्दा क्रमांक ९ (आ) :- स्वयंपुनर्विकास प्रकल्पात अस्तित्त्वातील सहकारी गृहनिर्माण संस्थेव्यतिरिक्त कोणीही तिसरा लाभार्थी नसल्याने कुठलाही करारनामा करण्याची गरज नसते. त्यामुळे अस्तित्त्वातील गाळेधारकांना प्रस्तावित घरे ही स्वयंपुनर्विकासामार्फत उपलब्ध झाल्याने अशा नवीन गाळ्यांसाठीच्या करारनाम्यावर पंतप्रधान आवास योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पातील लाभार्थ्यांकडून ज्याप्रमाणे रुपये १०००/- एवढे मुद्रांक शुल्क आकारले जाते, त्याप्रमाणे स्वयंपुनर्विकास करणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सभासदांकडून मुद्रांक शुल्क आकारण्यात यावे. तथापि, स्वयंपुनर्विकासानंतर तयार होणाऱ्या नवीन इमारतीमधील मूळ सभासदासाठीच्या सदनिकाव्यतिरिक्त खुल्या बाजारात विक्रीस उपलब्ध होणाऱ्या गाळ्यांसाठीच्या करारनाम्यावर प्रचलित दराने मुद्रांक शुल्क लागू करण्यात यावा.

२. सदर शासन निर्णयातील तरतूदीच्या अनुषंगाने नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था व मुळ सदनिका/ गाळेधारक/सभासद यांच्यात होणाऱ्या करारनाम्यावर मुद्रांक शुल्क आकारण्याबाबत खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

१) राज्यातील नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकास प्रकल्पातील प्रस्तावित घरे ही स्वयंपुनर्विकासामार्फत मुळ सदनिका/गाळेधारक/सभासदांना (Bonafide Member) उपलब्ध होणार असल्यास सहकारी गृहनिर्माण संस्था व सदनिका/गाळेधारक/सभासद यांच्यात होणाऱ्या वितरणपत्र/करारनाम्यावर (Allotment Letter/ Agreement) रू. १०००/- (रुपये एक हजार) इतके मुद्रांक शुल्क आकारण्यात यावे.
२) मुळ सदनिका / गाळेधारक / सभासदाव्यतिरिक्त खुल्या बाजारात विक्रीस उपलब्ध होणाऱ्या सदनिका/ गाळ्यासाठीच्या करारनाम्यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील तरतुदीनुसार मुद्रांक शुल्क देय राहील.
३) संस्थेचा सभासद मूळ सदनिकेच्या/गाळ्याच्या बदल्यात स्वयंपुनर्विकसित प्रकल्पात विनामोबदला मिळणाऱ्या सदनिकेच्या/गाळ्याच्या क्षेत्राव्यतिरिक्त जादा क्षेत्र संस्थेकडून खरेदी करत असल्यास अशा खरेदी केलेल्या क्षेत्रावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील तरतुदीनुसार मुद्रांक शुल्क देय राहील.
४) नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकास प्रकल्पासाठी नियुक्त केलेला कंत्राटदार व संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्यातील कार्यकंत्राटावर (Work Contract) महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील तरतुदीनुसार मुद्रांक शुल्क देय राहील.

५) करारनाम्यामध्ये नमूद सदस्य हे मुळ सदनिका/गाळेधारक/सभासद (Bonafide Member) असल्याबाबत सभासदाने सहकारी गृहनिर्माण संस्थेचे शेअर सर्टिफिकेट किंवा संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचे प्रमाणपत्र करारनामा दस्ताचा भाग करावा.

६) सदर परिपत्रकाच्या दिनांकापुर्वी, कोणत्याही पात्र मुळ सदनिका/गाळेधारक/सभासद (Bonafide Member) यांचेकडून आधीच मुद्रांक शुल्क प्रदान करण्यात आले आहे त्या घटकांना, कोणताही परतावा दिला जाणार नाही.

७) सदर मुद्रांक शुल्काची सवलत प्रस्तूत परिपत्रकाच्या दिनांकापासून लागू राहील.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०७१४१७१९४९९८१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUNIL MALHARI JADHAV

Digitally signed by SUNIL MALHARI JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=a21caf384aa15b3f0e12f6f625410d8384fc1918599ab1b89ed39b6b8df74cd2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FD3ACD0AE1800C2E54A008316 2CA707A773B2FEF3AE4C523B53B902E3CF10460, cn=SUNIL MALHARI JADHAV
Date: 2023.07.14 17:27:54 +05'30'

(सुनिल जाधव)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई- ४०० ०३२.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
४. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
५. मा. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई-४०० ०३२.
६. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई- ४०० ०३२.
७. मा. उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई- ४०० ०३२.
८. मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई- ४०० ०३२.
९. मा.विरोधी पक्षनेता (विधानपरिषद/विधानसभा) यांचे खाजगी सचिव,विधान भवन,मुंबई-३२.
१०. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
११. अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
१३. महालेखापाल १ व २ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षण) महाराष्ट्र राज्य,मुंबई /नागपूर.
१४. अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई, प्रधान मुद्रांक कार्यालय, फोर्ट, मुंबई.
१५. सर्व नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक.
१६. निवडनस्ती, कार्यासन (म-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

महाराष्ट्र राज्यात "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना-२०२३" लागू करण्याबाबत शासनामार्फत शासन राजपत्रात दि. ०७ डिसेंबर, २०२३ रोजी अधिसूचित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मानक कार्यरत कार्यपध्दती निश्चित करुन स्पष्टीकरणात्मक सूचना निर्गमित करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
परिपत्रक क्रमांकः मुद्रांक-२०२३/प्र.क्र.३४२/म-१(धोरण)
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ११ डिसेंबर, २०२३

वाचा :-

१) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, महसूल व वन विभाग, शासन आदेश क्र.मुद्रांक-२०२३/ प्र.क्र.३४२/म-१ (धोरण), दि.०७ डिसेंबर, २०२३

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्यामध्ये निष्पादित झालेल्या तथा नोंदणी करिता संबंधित दुय्यम निबंधकाकडे दाखल होणाऱ्या दस्तांवर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतुदीनुसार मुद्रांक शुल्काची आकारणी केली जाते. उक्त प्रमाणे निष्पादित तथा नोंदणी झालेल्या दस्तांच्या अनुषंगाने नोंदणी व मुद्रांक विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयात नियमित तसेच, स्थानिक लेखापरीक्षक पथकाद्वारे तपासण्या केल्या जातात. याशिवाय, महाराष्ट्र राज्याच्या महालेखापाल कार्यालयाचे पथकाद्वारे देखील लेखापरीक्षण होत असते. उक्त लेखापरीक्षण तथा तपासण्यांमध्ये यथोचित मुद्रांक शुल्कापेक्षा कमी तथा न्यून मुद्रांक शुल्क भरली असल्याची बाब वेळोवेळी निर्देशनास येते. अशा न्युन मुद्रांकित दस्तऐवजांवर कमी भरलेले मुद्रांक शुल्क लागू असलेल्या दंडासह वसुली करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ३१ च्या पोट-कलम (४) च्या खंड (दोन), कलम ३२ अ च्या पोट-कलम (२)आणि पोट-कलम (४) तसेच कलम ३९ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) नुसार कार्यवाही पार पाडली जाते. अशा न्युन मुद्रांकीत परंतु, नोंदणी व मुद्रांक विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाकडे मुद्रांक शुल्काच्या वसुलीसाठी प्रलंबीत असलेल्या दस्तांची संख्या फार मोठी असल्याने तसेच, त्यामध्ये मुद्रांक शुल्करुपी महसूल मोठ्या प्रमाणात अडकला असल्याचे मत नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांनी अधोरेखीत केले आहे. त्यामुळे उक्त मुद्रांक शुल्करुपी अडकलेला महसूल शासनखाती जमा करणे आवश्यक आहे.

अशा न्युन मुद्रांकीत दस्तांमध्ये अडकलेल्या मुद्रांक शुल्काची वसूली करून राज्य शासनाच्या महसूली उत्पन्नात वाढ करण्यास सहायकारी म्हणून राज्यात कमी भरलेले मुद्रांक शुल्कासोबतच उक्त कमी भरलेले मुद्रांक शुल्कावरील दंड तथा शास्तीमध्ये सुट तथा सवलत देण्यास्तव नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनास केलेल्या विनंतीस अनुलक्षून शासनामार्फत संदर्भाधीन आदेश दि.०७ डिसेंबर, २०२३ शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहेत. उक्त आदेशांन्वये संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना- २०२३", दि.०१ डिसेंबर, २०२३ ते दि.३१ जानेवारी, २०२४ आणि दि.०१ फेब्रुवारी, २०२४ ते दि.३१ मार्च, २०२४ अशा दोन टप्प्यात राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. उक्त मुद्रांक शुल्क अभय योजनेच्या अनुषंगाने मानक कार्यरत कार्यपध्दती निश्चित करुन स्पष्टीकरणात्मक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन परिपत्रक:-</u>

"महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना२०२३ -" च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मानक कार्यरत कार्यपध्दती निश्चित करुन स्पष्टीकरणात्मक सुचना निर्गमित करण्यात येत आहे:-

१) उक्त अभय योजना ही केवळ शासनमान्य मुद्रांक विक्रेत्यांकडून किंवा मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या किंवा त्यांच्या अधिनस्त असलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याने मंजूर केलेल्या यंत्रणेमार्फत विक्री केलेल्या कोणत्याही रकमेच्या मुद्रांक पेपरवर निष्पादित केलेल्या दस्तांनाच लागु राहील.

२) स्टॅम्पड् पेपर म्हणजे महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम २ च्या पोट-कलम (के) "उमट मुद्रांक" मध्ये विनिर्दिष्ट केलेले मुद्रांक. यामध्ये योग्य अधिकाऱ्याने लावलेल्या व उमटवलेल्या खूणचिठ्ठया मुद्रांकित कागदावर उमटरेखन केलेले किंवा कोरलेले मुद्रांक, फ्रँकिग यंत्राने उमटवलेला ठसा, राज्यशासनाने अधिसूचनेव्दारे विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही यंत्राने उमटवलेला ठसा, इ-प्रदानाची पावती, इ-एसबीटीआर, ई-स्टॅम्प, चिकट मुद्रांक तसेच, ग्रास प्रणालीव्दारे मुद्रांक शुल्क भरल्याची पावती .

३) मुद्रांक न-लावलेले तसेच, साध्या कागदावर निष्पादित केलेले संलेख तथा दस्त, हे "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना- २०२३" खालील कोणत्याही लाभासाठी पात्र असणार नाहीत.

४) "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना- २०२३" खालील सवलत ही, केवळ दि.०१ जानेवारी, १९८० ते दि.३१ डिसेंबर,२०२० या कालावधीत निष्पादित केलेले परंतू, नोंदणीस दाखल केलेले किंवा न-केलेले दस्त यांनाच लागू असेल.

५) अ-निवासी (नॉन-रेसिडेंशिअल) सदराखालील दस्तांमध्ये शेतजमिनीच्या दस्तांचा देखिल समावेश असेल. उक्त दस्तांना "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना- २०२३" खालील लाभ देय ठरतील.

६) सदर आदेश महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापूर्वी, उक्त नमुद अशा कोणत्याही संलेख तथा दस्तावर देय होणाऱ्या मुद्रांक शुल्काच्या तुटीची रक्कम आणि/किंवा उक्त देय मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागावर देय असलेल्या दंडाची रक्कम आधीच भरण्यात आली असेल तर, त्याचा कोणताही परतावा दिला जाणार नाही.

७) संबंधित संलेख तथा दस्ताच्या पक्षकारास किंवा त्याच्या मालकी हक्काच्या उतराधिकाऱ्यास किंवा मुखत्यारनामाधारकास, या आदेशाखाली दंड कमी करण्यासाठी तथा सवलत/सुट मिळण्यासाठी अर्ज करता येईल.

८) अर्जदाराने उक्त कालावधीच्या शेवटच्या दिवशी किंवा त्यापूर्वी, मूळ संलेख आणि त्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक दस्तऐवजांच्या स्वयंस्वाक्षांकित प्रतींसह, यासोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्ये सादर करणे आवश्यक राहील. उक्त अर्ज हा ऑनलाईन स्वरुपात स्विकारण्यात येईल. त्याकरीता, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी तात्काळ व्यवस्था करावी तसेच, संलेखाच्या प्रकारानुसार केवळ उक्त अर्जाच्या तपशिलामध्ये आवश्यकतेनुसार उचित बदल करण्याची व्यवस्था करावी. तथापि, कोणत्याही परिस्थितीत "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना- २०२३" च्या मूळ संरचनेमध्ये तथा गाभ्यामध्ये बदल होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

९) "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना- २०२३" योजनेखालील सवलतीचा लाभ घेण्यासाठी अर्ज स्विकारण्याकरीता ऑनलाईन यंत्रणा तथा प्रणाली उपलब्ध करुन देण्यास नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना विलंब होणार असल्यास किंवा काही कारणांनी शक्य नसल्यास, त्याकरीता अर्जदाराला ऑफलाईन पध्दतीने देखिल अर्ज करण्याची मुभा राहील. केवळ ऑनलाईन अर्ज दाखल करण्याबाबत अर्जदाराला कोणत्याही प्रकारे सक्ती करु नये.

१०) दि.०१ जानेवारी,१९८० ते दि.३१ डिसेंबर,२००० या कालावधीत निष्पादित केलेले आणि नोंदणीस दाखल केलेले दस्त, यांच्याबाबतीत देय होणाऱ्या तथा वसुली पात्र मुद्रांक शुल्काची रक्कम ही रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख) पेक्षा कमी असेल तसेच, उक्त अडकलेल्या मुद्रांक शुल्क व दंडाची रक्कम शासनखाती भरणा करण्याच्या अनुषंगाने संबंधित पक्षकारांना नोंदणी व मुद्रांक विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाकडून डिमांड तथा मागणीची नोटीस निर्गत करुन देखिल संबंधित पक्षकारांकडून कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद देण्यात आला नसेल किंवा येत नसेल तर, अशा प्रकरणी संबंधित पक्षकारांना प्रस्तुत योजनेखालील सवलत तथा लाभाकरीता वेगळयाने अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही. तसेच, अशा प्रकरणी संबंधित अर्जदाराला लागु होणारे मुद्रांक शुल्क आणि त्यावरील दंड भरण्याकरीता देखिल वेगळयाने डिमांड तथा मागणीची नोटीस पाठविण्याची आवश्यकता असणार नाही. अशा दस्तांना लागु होणारे मुद्रांक शुल्क आणि त्यावरील दंड "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना- २०२३" योजनेच्या पहिल्या टप्प्यामध्ये म्हणजेच, दि.०१ डिसेंबर, २०२३ ते दि.३१ जानेवारी, २०२४ या कालावधीमध्ये १००% सुट दिली असल्याने अशी प्रकरणे पहिल्या टप्प्यामध्येच यथोचित मुद्रांकीत करण्याबाबत संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी तातडीने कार्यवाही करावी.

११) "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना- २०२३" योजनेखालील सवलतीचा लाभ मिळण्यासाठी अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित दुय्यम निबंधक यांनी सदर अर्ज तातडीने संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी/ सह जिल्हा निबंधक यांच्याकडे पाठवावेत. संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी/ सह जिल्हा निबंधक यांनी उक्त अर्जाच्या अनुषंगाने संबंधित अर्जामध्ये नमुद मिळकतीच्या तथा हस्तांतरणाच्या दस्तावर देय होणाऱ्या मुद्रांक शुल्काचे निर्धारण संबंधित दस्त निष्पादनाच्या दिवशी राज्यामध्ये लागु असलेल्या तरतूदीनुसार करणे क्रमप्राप्त आहे.

१२) उक्त प्रमाणे मुद्रांक शुल्काचे निर्धारण करण्याकरीता मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या आणि वार्षिक दर विवरणपात्रातील दरासह त्यासोबतच्या मार्गदर्शन तत्वांचे अनुसरन करुन संबंधित अर्जदाराच्या अर्जामध्ये नमुद संलेख तथा दस्तावर देय होणारे मुद्रांक शुल्क आणि त्यावरील दंड भरण्याकरीता डिमांड तथा मागणीची नोटीस पाठविण्याची संपूर्ण कार्यवाही ही संबंधित अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी/ सह जिल्हा निबंधक यांनी १५ दिवसांच्या कालावधीच्या आत पुर्ण करावी.

१३) ज्या प्रकरणांमध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी दस्तातील मिळकतीचे बाजारमुल्य निश्चित करुन मुद्रांक शुल्क व शास्तीच्या रक्कमेचे पूर्वीच निर्धारण केले आहे. अशा प्रकरणी संबंधित अर्जदार तथा पक्षकार यांनी "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना- २०२३" योजनेखालील सवलतीचा लाभ मिळण्यासाठी अर्ज

केला असेल तर, अशा प्रकरणी वेगळयाने मुद्रांक शुल्काचे निर्धारण करणे आवश्यक असणार नाही. तथापि, अशा प्रकरणी प्रस्तुत योजनेखाली संबंधित अर्जदाराच्या अर्जामध्ये नमुद संलेख तथा दस्तावर देय होणारे मुद्रांक शुल्क आणि त्यावरील दंड भरण्याकरीता नव्याने डिमांड तथा मागणीची नोटीस पाठविण्याची संपूर्ण कार्यवाही ही संबंधित अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांच्या कालावधीच्या आत पुर्ण करावी.

१४) "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना- २०२३" योजनेखालील सवलतीचा लाभ मिळण्यासाठी संबंधित अर्जदार तथा पक्षकार यांनी अर्ज केल्याच्या दिनांकापर्यंत उक्त अर्जामध्ये नमुद संलेख तथा दस्तावर देय होणाऱ्या दंडाचे निर्धारण करण्यात यावे.

१५) वर नमुद प्रमाणे निर्धारित केलेले मुद्रांक शुल्क आणि त्यावरील दंड भरण्याकरीता मागणीची नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या कालावधीच्या आत, संबंधित अर्जदाराने त्याप्रमाणे लागु होणारे मुद्रांक शुल्क आणि त्यावरील दंड शासनखाती भरणे आवश्यक आहे. उक्त प्रमाणे शासनास देय असलेल्या रक्कमेचा विहित कालावधीत संबंधित अर्जदाराने भरणा न-केल्यास असा अर्जदार हा प्रस्तुत योजनेअंतर्गत देय असलेल्या सवलत तथा लाभासाठी पात्र असणार नाही.

१६) सदरची रक्कम शासनखाती जमा झाल्यानंतर आणि त्याबाबतची खातरजमा झाल्यानंतरच त्यापुढील एक महिन्याच्या कालावधीच्या आत संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडुन संबंधित दस्त -यथोचित मुद्रांकित॰ म्हणुन प्रमाणित करणे क्रमप्राप्त राहील.

१७) उक्त योजनेखाली प्राप्त होणाऱ्या आणि निर्गत करण्यात येणाऱ्या अर्जांचा दैनिक तपशिल संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी/ सह जिल्हा निबंधक/ दुय्यम निबंधक यांनी ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी वेगळी नोंदवही ठेवावी. उक्त माहिती दर आठवडयाच्या प्रत्येक शुक्रवारी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाला न-चुकता सादर करावा. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उक्त तपशिल दर सोमवारी शासनाला सादर करावा. उक्त नोंदवहीमध्ये अर्जदाराचे नाव, अर्जदाराने दाखल केलेल्या दस्ताचा प्रकार, त्यावर लागु होणारे मुद्रांक शुल्क व दंडाची रक्कम आणि प्रस्तुत अभय योजनेखाली अर्जदाराला सवलत दिल्याने अर्जदाराला शासनखाती भरावे लागणारे मुद्रांक शुल्क व त्यावरील दंडाच्या रक्कमेचा समावेश असावा. जेणेकरुन योजनेच्या यशस्वीतेचे विश्लेषण करणे शासनाला शक्य होईल.

१८) सदर योजनेचे यशस्वीरित्या कार्यान्वय करुन जास्तीत जास्त जनतेला याचा लाभ होण्यासाठी योजनेच्या कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात संबंधित प्रत्येक मुद्रांक जिल्हाधिकारी/ सह जिल्हा निबंधक कार्यालयामध्ये विशेष कक्ष स्थापन करण्यात यावा. तसेच, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयामध्ये देखिल एक मध्यवर्ती विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात यावा.

१९) उक्त सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे. अन्यथा, संबंधितांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) आणि (वर्तणुक) नियमांनुसार शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

०२. प्रस्तुत शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२३१२१११६१६०४७७१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

JAWALE PRITAMKUMAR VASANTRAO

Digitally signed by JAWALE PRITAMKUMAR VASANTRAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRY ENERGY AND LABOUR DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fb143f6e3b0f3286f9831e9f9ab33d9b3297b5a4e9011af5c3e07f2712833050, pseudonym=2C9876838C96A640275D3C68D207FF28B896A20C, serialNumber=33778883391C7F72214 3D26EEEA9BEFCDAD091509EF5236580A7D753D8635115, cn=JAWALE PRITAMKUMAR VASANTRAO
Date: 2023.12.11 16:16:21 +05'30'

(प्रितमकुमार व. जावळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
३. मा.अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.उपमुख्यमंत्री (गृह) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.उपमुख्यमंत्री (वित्त) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
९. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य
१०. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
११. मा.अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. मा.महालेखापाल-१ व २ (मुंबई/नागपूर), महाराष्ट्र राज्य
१३. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
१४. महानगर आयुक्त, मुंबई/पुणे/नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
१५. सर्व विभागीय आयुक्त
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
१७. म्हाडा/सिडको/एसआरए इ. प्राधिकरणे
१८. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१९. महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण, मुंबई
२०. सर्व जिल्हाधिकारी
२१. सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२२. सर्व नियोजन प्राधिकरणे
२३. अपर मुद्रांक नियंत्रक, प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई
२४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२५. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
२६. सर्व नगरपालिका/नगर परिषद/नगरपंचायतींचे मुख्याधिकारी
२७. सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (विभागीय कार्यालये)
२८. निवडनस्ती, कार्यासन म-१ (धोरण), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

महाराष्ट्र राज्यात "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क "अभय योजना- २०२३" लागू करण्याबाबत शासनामार्फत शासन राजपत्रात दि. ०७ डिसेंबर, २०२३ रोजी अधिसूचित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मानक कार्यरत कार्यपध्दती निश्चित करुन स्पष्टीकरणात्मक सूचना निर्गमित करण्याबाबत (शुध्दिपत्रक)...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शुध्दिपत्रक क्रमांकः मुद्रांक-२०२३/प्र.क्र.३४२/म-१(धोरण)
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १३ डिसेंबर, २०२३

वाचा :-

१) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, महसूल व वन विभाग, शासन आदेश क्र.मुद्रांक-२०२३/ प्र.क्र.३४२/म-१ (धोरण), दि.०७ डिसेंबर, २०२३
२) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, परिपत्रक क्र.मुद्रांक-२०२३/ प्र.क्र.३४२/म-१ (धोरण), दि.११ डिसेंबर, २०२३

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्यामध्ये निष्पादित झालेल्या तथा नोंदणी करिता संबंधित दुय्यम निबंधकाकडे दाखल होणाऱ्या दस्तांवर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतुदीनुसार मुद्रांक शुल्काची आकारणी केली जाते. परंतु, नोंदणी व मुद्रांक विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाकडे मुद्रांक शुल्काच्या वसुलीसाठी प्रलंबीत असलेल्या दस्तांची संख्या फार मोठी असल्याने तसेच, त्यामध्ये अडकलेल्या मुद्रांक शुल्काची वसूली करून राज्य शासनाच्या महसूली उत्पन्नात वाढ करण्यास सहायकारी म्हणून शासनामार्फत संदर्भ क्र.१ मध्ये नमुद शासन राजपत्रात अधिसूचित दि.०७ डिसेंबर, २०२३ रोजीच्या आदेशांन्वये संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना- २०२३", दि.०१ डिसेंबर, २०२३ ते दि.३१ जानेवारी, २०२४ आणि दि.०१ फेब्रुवारी, २०२४ ते दि.३१ मार्च, २०२४ अशा दोन टप्प्यात राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. उक्त मुद्रांक शुल्क अभय योजनेच्या अनुषंगाने मानक कार्यरत कार्यपध्दती निश्चित करुन संदर्भ क्र.२ मध्ये नमुद शासन परिपत्रकांन्वये स्पष्टीकरणात्मक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

०२. वस्तुत: महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम १७ नुसार दस्त निष्पादनाच्या किंवा लगतच्या कामाच्या दिवशी लागु असलेल्या तरतूदीनुसार उक्त दस्त निष्पादित करणाऱ्या व्यक्तींने शासनखाती यथोचित मुद्रांक शुल्काचा भरणा करणे क्रमप्राप्त आहे. परंतू, त्याप्रमाणे मुद्रांक शुल्काचा भरणा न-केल्याने अशा प्रकरणी कमी भरलेले मुद्रांक शुल्क दंडासह वसुल करण्याची तरतूद उक्त अधिनियमाच्या कलम ३४ सह कलम ३९ मध्ये विहित करण्यात आलेली आहे. याशिवाय, वारंवार सुचना करुन देखिल अशा व्यक्ती उक्त अधिनियमाखाली भरावे लागणारे शुल्क किंवा शास्ती यांचा भरणा शासनखाती करत नसतील तर, महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या तरतूदीनुसार जमीन महसुलाची थकबाकी वसुल करण्यासाठी विहित केलेले अधिकार मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांच्यासह मुद्रांक जिल्हाधिकारी यांना उक्त अधिनियमाच्या कलम ४६ नुसार बहाल करण्यात आलेले आहेत. थोडक्यात, कमी भरलेल्या मुद्रांक शुल्काची आणि त्यावरील दंडाची सक्तीने वसुली करण्याची तरतूद कायद्याने संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेली आहे. तथापि, केवळ सहानुभूतीच्या दृष्टीकोन म्हणुन तसेच, कायद्याच्या अजाणतेपणाने मुद्रांक शुल्काचा कमी भरणा शासनखाती केला असल्याची शक्यता वर्तवुन अशा कमी भरलेल्या मुद्रांक शुल्काचा व त्यावरील दंडाचा शासनखाती भरणा करण्याकरीता संबंधित व्यक्तींना तथा पक्षकारांना संधी

वारंवार दिल्या गेल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणुन नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनास वेळोवेळी केलेल्या विनंतीस अनुलक्षून शासनामार्फत सन १९९४ पासुन ते आजरोजीपर्यंत वेगवेगळया कालावधीसाठी मुद्रांक शुल्क अभय योजना राबविल्या आहेत.

०३. उक्त मुद्रांक शुल्क अभय योजनांमुळे, नक्कीच राज्यशासनाच्या तिजोरीत अडकलेला मुद्रांक शुल्करुपी महसुल जमा करण्यास सहाय्य झाले आहे. तथापि, काही व्यक्तींकडून हेतुपुर्वक केवळ शासनाला ठकविण्याच्या उद्देशाने म्हणजेच मुद्रांक शुल्काची जाणीवपूर्वक चोरी करण्याच्या उद्देशाने देखिल दस्त निष्पादित करण्याची व नोंदविण्याची कार्यवाही केली जाते. अशा हेतूपूर्वक मुद्रांक शुल्काच्या चुकवेगिरीला आळा घालण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ५९ व कलम ६२ मध्ये अपराध सिध्दतेनंतर सक्षम कारावासाची शिक्षा देण्याबाबत देखिल स्पष्ट अशी तरतूद विहित करण्यात आलेली आहे. त्यामुळे, राज्यशासनाला मिळणाऱ्या महसूली उत्पनातुन सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध विकासात्मक व कल्याणकारी योजना राबविण्यासाठी जाणिवपूर्वक होणाऱ्या मुद्रांक शुल्क चुकवेगिरीला आळा घालण्याच्या उद्देशाने पर्यायाने, राज्यशासनास मिळणाऱ्या मुद्रांक शुल्करुपी महसूलाची शाश्वती होण्याकरीता संदर्भ क्र.२ मध्ये नमुद शासन परिपत्रकांन्वये देण्यात आलेल्या सुचनांमध्ये नवीन सुचना समाविष्ट करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शुध्दिपत्रक:-</u>

वर प्रस्तावनेमध्ये नमुद विवेचनास अनुलक्षून आणि राज्यशासनाला मिळणाऱ्या महसूली उत्पनातुन सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध विकासात्मक व कल्याणकारी योजना राबविण्यासाठी जाणिवपूर्वक होणाऱ्या मुद्रांक शुल्क चुकवेगिरीला आळा घालण्याच्या उद्देशाने पर्यायाने, राज्यशासनास मिळणाऱ्या मुद्रांक शुल्करुपी महसूलाची शाश्वती होण्याकरीता संदर्भ क्र.२ मध्ये नमुद शासन परिपत्रकांन्वये देण्यात आलेल्या सुचनांमध्ये प्रस्तुत शुध्दिपत्रकांन्वये खालीलप्रमाणे नवीन सुचना देण्यात येत आहेत;-

१) ज्याप्रकरणी शासनखाती जमा करावयाच्या मुद्रांक शुल्काची आणि त्यावरील दंडाची एकत्रित रक्कम ही रु.५ कोटी (अक्षरी रुपये पाच कोटी) आणि त्यापेक्षा अधिक असल्यास अशी सर्व प्रकरणे संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी यथोचित देय होणारे मुद्रांक शुल्क आणि त्यावरील दंडाच्या रकमेचे निर्धारण करुन त्यांच्या अभिप्रायासह शासनाच्या पूर्व मान्यतेसाठी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत सादर करावीत. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर प्रस्ताव त्यांना प्राप्त झाल्यापासुन तीन (०३) दिवसात शासनाकडे सादर करावेत. संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी उक्त संपूर्ण कार्यवाही ही संबंधित अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर आठ (०८) दिवसांच्या कालावधीच्या आत पुर्ण करावी. शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय अशा प्रकरणी संबंधित अर्जदाराला लागु होणारे मुद्रांक शुल्क आणि त्यावरील दंड भरण्याकरीता डिमांड तथा मागणीची नोटीस पाठविण्यात येऊ नये. शासनाची पूर्वमान्यता मिळाल्यानंतर संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी अशा प्रकरणी संबंधित अर्जदाराला लागु होणारे मुद्रांक शुल्क आणि त्यावरील दंड भरण्याकरीता डिमांड तथा मागणीची नोटीस पाठविण्याची कार्यवाही पुढील तीन (०३) दिवसांच्या कालावधीच्या आत पूर्ण करावी. तसेच, संबंधित अर्जदार तथा पक्षकार यांनी त्याप्रमाणे लागु होणारे मुद्रांक शुल्क व त्यावरील दंड हे शासनाखाती सात (०७) दिवसात भरणे बंधनकारक राहील.

२) या योजनेंतर्गत अर्जदाराने कोणत्याही परिस्थितीत दि.३१ मार्च, २०२४ पूर्वी त्यांना भरण्याकरीता बजावलेल्या डिमांड नोटीसव्दारे दिलेली रक्कम शासनखाती जमा करण्याची प्रक्रीया पूर्ण करणे बंधनकारक राहील.

३) महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना-२०२३ चा कालावधी संपल्यानंतर ज्या प्रकरणी राज्यशासनाचा मुद्रांक शुल्करुपी महसूल अडकलेला आहे असा दस्त निष्पादित करणाऱ्या संबंधित पक्षकारांच्या तथा व्यक्तींच्याविरुध्द महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ५९ व कलम ६२ नुसार कारवाई प्रस्तावित

करण्याबाबतचा प्रस्ताव संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत तातडीने शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा.

४) याशिवाय, ज्या प्रकरणी राज्यशासनाचे मुद्रांक शुल्क अडकले आहे अशा संपूर्ण शासकीय शुल्काची वसुली करण्यासाठी संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना-२०२३ चा कालावधी संपल्यानंतर लागलीच महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ४६ नुसार कारवाई करावी.

५) संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी उक्त प्रमाणे सुरु केलेल्या कारवाईचा नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी नियमित आढावा घेऊन त्याबाबतचा अनुपालनात्मक अहवाल नियमितपणे शासनास सादर करावा.

६) उक्त सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे. अन्यथा, संबंधितांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) आणि (वर्तणुक) नियमांनुसार शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

०२. प्रस्तुत शासन शुध्दिपत्रक (परिपत्रक) महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२३१२१३१४४२१५६४१९ असा आहे. हे शुध्दिपत्रक (परिपत्रक) डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

JAWALE PRITAMKUMAR VASANTRAO

Digitally signed by JAWALE PRITAMKUMAR VASANTRAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRY ENERGY AND LABOUR DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fb143f6e3b0f3286f9831e9f9ab33d9b3297b5a4e9011af5c3e07f2712833050, pseudonym=2C9876838C96A640275D3C68D207FF2BB896A20C, serialNumber=337788B3391C7F722143D26EEEA9BEFCDAD091509EF5236580A7D753D8635115, cn=JAWALE PRITAMKUMAR VASANTRAO
Date: 2023.12.13 14:44:20 +05'30'

(प्रितमकुमार व. जावळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
३. मा.अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.उपमुख्यमंत्री (गृह) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.उपमुख्यमंत्री (वित्त) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
९. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य
१०. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
११. मा.अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. मा.महालेखापाल-१ व २ (मुंबई/नागपूर), महाराष्ट्र राज्य
१३. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
१४. महानगर आयुक्त, मुंबई/पुणे/नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
१५. सर्व विभागीय आयुक्त
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
१७. म्हाडा/सिडको/एसआरए इ. प्राधिकरणे
१८. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे

शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालयातील नचित्रपट्टी व सीडी वरील जतन करुन ठेवण्यात आलेल्या अभिलेखांचे डिजिटायझेशन(digitisation)खर्चास मान्यता देणेबाबत

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक: मुद्रांक-२०२४/प्र.क्र.११/म-१(धोरण)
दालन क्र.एम-७ ए, पोटमाळा, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०००३२
दिनांक : २७ सप्टेंबर, २०२४.

वाचा : १) शासन ज्ञापन क्रमांक : आस्थापना -२००१/प्र.क्र.४१०/म-१, दि.३१.१०.२००१
२) शासन निर्णय क्रमांक: नोंदणी (संगणक)-२०१५/१५१७/प्र.क्र.४५२/म-१, दि.०८ ऑक्टोबर, २०१५.
३) शासन शुद्धिपत्रक क्रमांक: मुद्रांक-२०१७/३२६६/प्र.क्र.५०४/म-१, दि. १९ जून, २०१८
४) शासन शुध्दीपत्रक क्रमांक: मुद्रांक २०१७/३२६६/प्र.क्र.५०४/म-१(धोरण), दि.११.१.२०२१
५) शासन निर्णय क्रमांक : मुद्रांक-२०१७/३२६६/प्र.क्र.५०४/म-१(धोरण), दि.३१.३.२०२३
६) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र. का.४/प्र.क्र.१३५५/२०२३/३२, दि.०८ जानेवारी,२०२४ व दिनांक ३.७.२०२४

प्रस्तावना:-

महसूल व वन विभाग,शासन ज्ञापन दिनांक ३१.१०.२००१ अन्वये नोंदणी व मुद्रांक विभागाचे बांधा, वापरा, हस्तांतरण करा या तत्वावर संगणकीकरण करण्यासाठी "स्वीय प्रपंजी लेखे उघडण्यास मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्र. ४ अन्वये निर्गमित केलेल्या शासन निर्णयात निर्धारित केलेल्या "स्वीय प्रपंजी लेख्यात" जमा होणाऱ्या रकमेतून शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय दरमहा खर्च करण्याची मर्यादा रु. १० कोटी इतक्या रकमेच्या मर्यादेपर्यंत वाढविण्यात आली आहे.

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्याकडून प्राप्त संदर्भ क्र.६ अन्वये शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालयातील नचित्रपट्टी व सीडी वरील जतन करुन ठेवण्यात आलेल्या अभिलेखांचे डिजिटायजेशन (digitization) करण्याबाबच्या महत्वपूर्ण प्रकल्पास मंजूरी तसेच प्रकल्पास आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

सन १९२७ ते २००१ पर्यंतच्या उपलब्ध अभिलेखांचे डिजिटायजेशन (digitisation) केल्यास अभिलेख नागरिकांना संगणकावर ऑनलाईन उपलब्ध होवू शकतील. तसेच त्यामुळे जागेची कमतरता व वेळेचा अपव्यय टाळता येईल. नागरिकांना अभिलेख सहजपणे त्वरित उपलब्ध झाल्याने तक्रारींचे प्रमाण कमी होईल. तसेच अभिलेखांचे अत्यंत प्रभावी पध्दतीने कायमस्वरुपी जतन व संवर्धन होणार असल्याने, अभिलेख जतन, हया विभागाच्या महत्त्वाच्या उदिदष्टाची देखील पूर्तता होणार आहे.

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी संदर्भ क्र.६ अन्वये नोंदणी व मुद्रांक विभागातील सन १९२७ ते २००१ पर्यंतच्या अभिलेख्यांचे डिजीटायझेशन(digisation) महत्वपूर्ण प्रकल्पास मंजूरी देण्याबाबत तसेच सदर कार्यपध्दतीच्या अंमलबजावणीकरिता येणारा खर्च रु.२१,४१,००,०००/ (अक्षरी रु.एकवीस

कोटी एक्केचाळीस लाख रुपये) फक्त) स्वीय प्रपंजी लेख्यात जमा होणाऱ्या रकमेमधून माहे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या कालावधीत खर्च करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती

शासन निर्णय:-

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे अधिनस्त शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय,पुणे कार्यालयातील सन १९२७ ते २००१ पर्यंतच्या नचित्रपट्टी व सीडी वरील जतन करुन ठेवण्यात आलेल्या उपलब्ध अभिलेखांचे डिजीटायजेशन (digitisation) करण्याबाबतच्या महत्वपूर्ण प्रकल्पास शासन मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सदर प्रकलपाच्या अंमलबजावणीकरिता एकूण रु. २१,४१,००,०००/-(अक्षरी रु.एकवीस कोटी एक्केचाळीस लाख रुपये) फक्त) इतका माहे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या कालावधीत स्वीय प्रंपजी लेख्यातून कामाच्या प्रगतीनुसार टप्प्या-टप्प्याने प्रतिमहा रु. १० कोटीच्या मर्यादेत खर्च करण्यास एक विशेष बाब म्हणून या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर खर्च हा ज्या बाबींसाठी मंजूर करण्यात आला आहे, त्याच बाबींसाठी खर्च करण्यात यावा. खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करण्यात यावे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग, **अनौ.संदर्भ क्र.३३८/व्यय-१०, दिनांक २३.८.२०२४** अन्वये प्राप्त सहमतीस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक ---------- असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

२७/८/२०२४

(सुनिल जाधव)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
४. सर्व मा.मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
५. मा. सभापती. विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.
६. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
७. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
९. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई

महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय,बुलढाणा

विषय क्र.७

पुनर्वसन विषयक धोरणात्मक शासन निर्णय

जिल्हा महसूल प्रशासन,बुलढाणा

राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनींच्या ७/१२ च्या इतर हक्कातील पुनर्वसनासाठी राखीव असलेले शेरे उठविण्याची कार्यवाही करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्र:- आरपीए-२०२२/प्र.क.०९/र-१,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक:- १८ जानेवारी, २०२२

वाचा:- १. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९७६, १९८६ व १९९९ अन्वये प्रसिध्द केलेल्या अधिसूचना.

२. शासन निर्णय क्रमांक आरपीए/२०१९/प्र.क्र.१५१/र-१, दिनांक ०५.०८.२०१९

प्रस्तावना :-

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९७६, १९८६ व १९९९ अन्वये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनांनुसार राज्यातील पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनींच्या ७/१२ उताऱ्यामधील इतर हक्कातील नोंदीमध्ये "पुनर्वसनासाठी राखीव" असे शेरे नमुद करुन हस्तांतरण व्यवहारावर निर्बंध लादण्यात आले आहेत. त्यामुळे सदर प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील भुधारकांना अनेक वर्षांपासुन त्यांच्या जमिनी खरेदी-विक्री, खातेफोड आणी वारसा हक्कानुसार विभागणी करण्यास अडचणी येत आहेत.

प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी लाभक्षेत्रामध्ये जमिनींची आवश्यकता विचारात घेता, लाभक्षेत्रातील सर्व स्लॅबपात्र जमिनींवर असलेले निर्बंध उठविण्यास परवानगी देणे शक्य नाही. त्यामुळे लाभक्षेत्रातील खातेदारांनी त्यांच्या स्लॅबपात्र क्षेत्रावरील निर्बंध उठविण्याबाबत केलेल्या मागणीबाबत सर्वंकष धोरण निश्चित करण्याचे निर्देश मा. उच्च न्यायालयाने दिले होते. त्यास अनुसरुन राज्यातील ज्या पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रांमधील खातेदारांच्या जमिनींना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध नाहीत व भविष्यातही सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता नाही, याबाबत प्रकल्प यंत्रणेने खात्री करुन त्याबबात सादर केलेल्या तांत्रिक अहवालाचे आधारे, सदर लाभक्षेत्रातील भूधारकांच्या जमिनीच्या ७/१२ मधील इतर हक्कातील नोंदीमध्ये "पुनर्वसनासाठी राखीव" असलेले शेरे कमी करण्याबाबतची व जमिनी हस्तांतरण व्यवहारांवरील निर्बंध उठविण्याबाबत शासन निर्णय क्रमांक आरपीए/२०१९/प्र.क्र. १५१/र-१, दिनांक ०५.०८.२०१९ रोजी कार्यपध्दती निहीत केलेली आहे. सदर शासन निर्णयानुसार सबंधितांच्या अर्जावर कार्यवाही करण्याबाबत कालमर्यादा विहीत करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिले आहेत.

राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामधील ज्या स्लॅबपात्र खातेदारांच्या/भूधारकांच्या जमिनींना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध आहेत किंवा उपलब्ध होणार आहेत, परंतु सदर जमिनींचे संपादन अद्यापर्यंत करण्यात आलेले नाही, अशा प्रकरणी देखील संबंधित खातेदारांकडुन "पुनर्वसनासाठी राखीव" असे ७/१२ च्या इतर हक्कात नोंदविलेले शेरे कमी करण्याची मागणी करण्यात येत आहे, तसेच मा. उच्च न्यायालयात विविध याचिका दाखल केलेल्या आहेत. परंतु सदर जमिनींना सिंचन सुविधा उपलब्ध आहेत/होणार असल्याने अशा प्रकरणी उक्त दिनांक ०५.०८.२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करणे शक्य होत नाही.

यास्तव राज्यातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी लाभक्षेत्रामध्ये जमिनीची आवश्यकता विचारात घेता, पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामधील ज्या स्लॅबपात्र खातेदारांच्या/भुधारकांच्या जमिनींना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध आहेत किंवा उपलब्ध होणार आहेत, परंतु सदर जमिनींचे संपादन अद्यापर्यंत करण्यात आलेले नाही, अशा जमिनींच्या हस्तांतरणावरील निर्बंध लादण्यासाठी ७/१२ च्या इतर हक्कामध्ये नोंदविलेले "पुनर्वसनासाठी राखीव" असे शेरे कमी करण्यासंदर्भात उचित निर्णय घेणे, तसेच अशा प्रकरणी कार्यवाही करण्यासाठी कालमर्यादा विहीत करणे, या अनुषंगाने दिनांक ०५.०८.२०१९ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमीत करुन सर्वंकष शासन निर्णय निर्गमीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :</u>

१. राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात सिंचन सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत व भविष्यातही अशा सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता नाही, अशा प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनींच्या हस्तांतरण व्यवहारावरील असलेले निर्बंध उठविण्याबाबत शासन निर्णय क्रमांक आरपीए/२०१९/प्र.क्र. १५१/र-१, दिनांक ०५.०८.२०१९ या शासन निर्णयान्वये अधिक्रमीत करण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम, १९७६, १९८६ व १९९९ अन्वये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनांनुसार राज्यातील पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामधील स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनींवर हस्तांतरण निर्बंध लादण्यासाठी ७/१२ च्या इतर हक्कात "पुनर्वसनासाठी राखीव" असे शेरे ठेवण्यात आले आहेत, परंतु सदर जमिनींच्या संपादनाची कार्यवाही अद्यापपर्यंत करण्यात आलेली नाही, अशा खालील प्रकरणी पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामधील स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनींवर हस्तांतरणावरील निर्बंध लादण्यासाठी ७/१२ च्या इतर हक्कामध्ये नोंदविलेले "पुनर्वसनासाठी राखीव" असे शेरे कमी करण्यासंदर्भात विहीत कार्यपध्दती अनुसरून उचित निर्णय घेण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

   अ) राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामधील ज्या स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनींना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध नाहीत व भविष्यातही सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता नाही, अशा प्रकरणी ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्कामधील "पुनर्वसनासाठी राखीव" असे शेरे कमी करण्यासंदर्भात विहीत कार्यपध्दती अनुसरून उचित निर्णय घेणे.

   आ) राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामधील ज्या स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनींना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध आहेत किंवा भविष्यात सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होणार आहे, अशा लाभक्षेत्रामधील जमिनींच्या ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कामध्ये दिनांक ०१.०१.२००० पुर्वी "पुनर्वसनासाठी राखीव" असे शेरे नोंदविण्यात आलेले आहेत, अशा प्रकरणी "पुनर्वसनासाठी राखीव" असे शेरे कमी करण्यासंदर्भात विहीत कार्यपध्दती अनुसरून उचित निर्णय घेणे.

   इ) राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामधील ज्या स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनींना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध आहेत किंवा भविष्यात सिंचनाच्या सुविधा

उपलब्ध होणार आहे, अशा लाभक्षेत्रामधील जमिनींच्या ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कामध्ये दिनांक ०१.०१.२००० रोजी किंवा नंतर "पुनर्वसनासाठी राखीव" असे शेरे नोंदविण्यात आलेले आहेत, अशा प्रकरणी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१. अशा सर्व क्षेत्रांचा त्यांच्या अंदाजीत संपादन रकमेसह पुनर्वसनासाठीच्या भूसंचयामध्ये समावेश करुन सदर भूसंचय पात्र प्रकल्पग्रस्तांसाठी शासनाच्या विहीत संकेत स्थळावर प्रसिद्ध केला जाईल.

२. शासनाच्या विहीत संकेत स्थळावर प्रसिद्ध केल्यानंतर ६ महिन्यांच्या कालावधीत ज्या क्षेत्रासाठी प्रकल्पग्रस्त मागणी/अर्ज करतील, असे क्षेत्र प्रचलीत नियमानुसार संपादन करण्याची कार्यवाही करण्यात येईल. परंतु, ६ महिन्यांच्या कालावधीत ज्या क्षेत्रासाठी प्रकल्पग्रस्तांनी मागणी/अर्ज केला नाही, अशा प्रकरणी पुनर्वसनासाठी राखीव असे शेरे कमी करण्यासंदर्भात विहीत कार्यपध्दती अनुसरून उचित निर्णय घेणे.

३. उपरोक्त प्रकरणी जमिनींच्या हस्तांतरणावर निर्बंध लादण्यासाठी "पुनर्वसनासाठी राखीव" असे ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कामध्ये नोंदविलेले शेरे कमी करण्यासंदर्भात उचित निर्णय घेण्याबाबतचे प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

१. जिल्हाधिकारी :	अध्यक्ष
२. मुख्य अभियंता (जलसंपदा) :	सदस्य
३. उप आयुक्त (पुनर्वसन) :	सदस्य
४. संबंधित पाटबंधारे प्रकल्पाचे काम पाहणारे अधिक्षक अभियंता :	सदस्य
५. उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन) :	सदस्य सचिव

४. **<u>कालमर्यादा:-</u>**

उपरोक्त प्रकरणी जमिनींच्या हस्तांतरणावर निर्बंध लादण्यासाठी "पुनर्वसनासाठी राखीव" असे ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कामध्ये नोंदविलेले शेरे कमी करण्यासंदर्भात उचित निर्णय घेण्याबाबतचे प्रस्तावासंदर्भात खालील प्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत कार्यवाही करण्यात यावी.

अ.क्र.	करावयाची कार्यवाही	कालावधी
१.	प्रस्तावा सबंधित प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंता यांचेकडे अभिप्रायासाठी पाठवणे	१ आठवडा
२.	कार्यकारी अभियंता यांचे अभिप्राय	२ आठवडे
३.	अभिप्राय/अहवाल प्राप्त झाल्यानंतर आढावा समितीची बैठक घेणे	१ आठवडा
४.	आढावा समितीने (स्वयंस्पष्ट अभिप्रायासह व त्रुटीविरहीत) प्रस्ताव विभागीय आयुक्त यांना सादर करणे.	१ आठवडा
५.	विभागीय आयुक्त कार्यालयाने प्रस्ताव शासनास सादर करणे	२ आठवडे
६.	शासन स्तरावर निर्णय घेणे (स्वयंस्पष्ट अभिप्राय व त्रुटीविरहीत प्रस्तावावर)	५ आठवडे

जमिनींच्या हस्तांतरणावर निर्बंध लादण्यासाठी "पुनर्वसनासाठी राखीव" असे ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कामध्ये नोंदविलेले शेरे कमी करण्यासंदर्भात उचित निर्णय शासन मान्यतेने घेतल्यानंतर सदर आदेशाची अंमलबजावणी ८ दिवसांत करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करणे बंधनकारक राहील.

५. **<u>कार्यकक्षा :-</u>**

राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामधील स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनींच्या हस्तांतरणावर निर्बंध लादण्यासाठी ७/१२ च्या इतर हक्कामध्ये नोंदविलेले "पुनर्वसनासाठी राखीव" असे शेरे कमी करण्यासंदर्भात उचित निर्णय घेण्याबाबतच्या खालील प्रकरणांसंदर्भात परिच्छेद क्रमांक ६ मधील विहीत कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करणे.

(अ) राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामधील ज्या स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनींना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध नाहीत व भविष्यातही सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता नाही, अशी प्रकरणे.

(आ) राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामधील ज्या स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनींना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध आहेत किंवा भविष्यात सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होणार आहे, अशा लाभक्षेत्रामधील जमिनींच्या ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कामध्ये दिनांक ०१.०१.२००० पुर्वी पुनर्वसनासाठी राखीव असे शेरे नोंदविण्यात आलेले आहेत, अशी प्रकरणे.

(इ) राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामधील ज्या स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनींना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध आहेत किंवा भविष्यात सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होणार आहे, अशा लाभक्षेत्रामधील जमिनींच्या ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कामध्ये दिनांक ०१.०१.२००० रोजी किंवा नंतर "पुनर्वसनासाठी राखीव" असे शेरे नोंदविण्यात आलेले आहेत, अशा सर्व क्षेत्रांचा त्यांच्या अंदाजीत संपादन रकमेसह पुनर्वसनासाठीच्या भूसंचयामध्ये समावेश करुन सदर भूसंचय पात्र प्रकल्पग्रस्तांसाठी शासनाच्या विहीत संकेत स्थळावर प्रसिद्ध केला जाईल. शासनाच्या विहीत संकेत स्थळावर प्रसिद्ध केल्यानंतर ६ महिन्यांच्या कालावधीत ज्या क्षेत्रासाठी प्रकल्पग्रस्त मागणी/अर्ज करतील, असे क्षेत्र प्रचलीत नियमानुसार संपादन करण्याची कार्यवाही करण्यात येईल. परंतु, ६ महिन्यांच्या कालावधीत ज्या क्षेत्रासाठी प्रकल्पग्रस्तांनी मागणी/अर्ज केला नाही, अशी प्रकरणे.

६. **<u>कार्यपध्दती :-</u>**

ज्या पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील स्लॅबपात्र जमिनींच्या ७/१२ उताऱ्यावरील इतर हक्कामध्ये हस्तांतरण निर्बंधबाबतचे "पुनर्वसनासाठी राखीव" म्हणुन नोंदविण्यात आलेले शेरे कमी करणेसंदर्भात उचित निर्णय घेणे आवश्यक आहे, अशा प्रकरणांचा समिती आढावा घेऊन समितीच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह खालील विवरणपत्रामध्ये प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह विभागीय आयुक्तांमार्फत शासन मान्यतेसाठी सादर करील.

जिल्हा-तालुक्याचे नाव

अनुक्रमांक	गावांचे नाव	बंदी ठेवण्यात आलेले गट नं.	हस्तांतरण निर्बंध लादण्यासाठीच्या अधिसुचनेचा दिनांक	लाभक्षेत्रात सिंचन सुविधा उपलब्ध नाहीत व भविष्यातही उपलब्ध होण्याची शक्यता नाही, असे गट नं.	लाभक्षेत्रात सिंचन सुविधा उपलब्ध आहेत तसेच, काही क्षेत्रांना भविष्यात विविध मार्गाने सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होणे प्रस्तावित आहे, असे गट नं.	अभिप्राय

७. जिल्ह्यातील पुनर्वसन अधिनियमानुसार अधिसूचित झालेल्या पाटबंधारे प्रकल्पांतर्गत लाभक्षेत्रांमध्ये सिंचनाच्या सुविधा उपलब्ध नाहीत व भविष्यातही सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता नाही, त्याबाबत सबंधित प्रकल्प यंत्रणेच्या अधिकाऱ्यांकडुन अहवाल मागविणे तसेच राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामधील ज्या स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनींना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध आहेत किंवा भविष्यात सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होणार आहे, अशा जमिनींच्या हस्तांतरणास निर्बंध लादण्यासाठीच्या अधिसुचनेच्या दिनांकबाबतचा अहवाल संबंधित अधिकाऱ्यांकडुन मागविणे व सदर अहवालाचे आधारे लाभक्षेत्रांमधील स्लॅबपात्र जमिनीच्या ७/१२ मधील इतर हक्कातील "पुनर्वसनासाठी राखीव" असे शेरे कमी करण्यासंदर्भात उचित निर्णय घेण्याबाबतच्या प्रस्तावासंदर्भात शासन मान्यतेने वरील विहीत कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहे. त्याचा संकेतांक २०२२०११८१५४६१६६०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJAY MAROTI JAGTAP

Digitally signed by SANJAY MAROTI JAGTAP
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9ea94b7d58fc204d63a497943e6c56976c537462d5f2964980c30906051d44d7, pseudonym=CB263AE7A97BA5DB04805052B34A6E185702D5F9, serialNumber=2C1FC771D686D36A26A8AF979409826984378A73F9D4AEECA990209686CC25BD, cn=SANJAY MAROTI JAGTAP
Date: 2022.01.18 15:48:09 +05'30'

(संजय जगताप)
कक्ष अधिकारी, महसुल व वन विभाग

प्रति,

१) मा. राज्यपाल महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा. राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) प्रधान सचिव (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
६) प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७) महालेखापाल - १ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र, मुंबई,
८) महालेखापाल-२ (लेखापरीक्षा लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर
९) विभागीय आयुक्त (सर्व)

मा. उच्च न्यायालायाच्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम १६(२) ची नोटीस देऊन पर्यायी जमिनीचे वाटप केल्यानंतर अथवा त्यापुर्वी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केलेली विशेष अनुमती याचिका प्रलंबित असल्यास अशा जमिनीच्या ७/१२ मध्ये इतर हक्कात शेरे नोंदविण्याबाबत

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक- आरपीए-२०२१/प्र.क्र. १४४ /र-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- २७ जानेवारी, २०२२

वाचा:-
१. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम, १९७६
२. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम, १९८६
३. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम, १९९९

प्रस्तावना-

प्रचलित शासन निर्णय, पुनर्वसन अधिनियम १९७६,१९८६,१९९९ लागु असलेल्या पाटबंधारे प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या पात्र प्रकल्पबाधित शेतक-यांना पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात येते. पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम १०(१) मध्ये नमूद तरतुदीनुसार पाटबंधारे प्रकल्पामुळे बाधित झालेल्या व्यक्तींचे पुनर्वसन करण्यासाठी पुरेशी जमीन उपलब्ध झाल्यास अशा प्रकल्पासून लाभ मिळत असलेल्या गावातील जमिनीवर किंवा क्षेत्रांवर त्यांचे पुनर्वसन करण्यात येते. तथापि, काही बाधित शेतक-यांनी तब्बल १० ते ३० वर्षांचा प्रदीर्घ कालावधी उलटल्यानंतर पर्यायी जमिनीचे वाटप करण्याबाबत मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केल्या आहेत. मा. उच्च न्यायालयाने विविध याचिका प्रकरणी पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम १६ (२) अन्वये संबंधित बाधित शेतकऱ्यांस नोटीस देवून पर्यायी जमिनीच्या कब्जेहक्कापोटी पैसे जमा करुन पर्यायी जमिन देण्याबाबतचे आदेश पारीत केलेले आहेत. मा. उच्च न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशानुसार पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम १६ (२) अन्वये बाधित शेतक-यांना नोटीस देऊन त्यांनी कब्जेहक्काची रक्कम शासनाकडे जमा केल्यानंतर पर्यायी जमिनीचे वाटप करणे अभिप्रेत आहे. मा उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका न्यायप्रविष्ठ असतांना बाधित शेतक-याने त्यास वाटप केलेल्या पर्यायी जमिनीची खरेदी-विक्री, विभाजन, गहाण, हस्तांतरण इत्यादि व्यवहार केल्यास कायदेशीर गुंतागुंत निर्माण होईल व शासनाने

दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिकांमध्ये शासनाच्या बाजूने निकाल लागल्यास अशा जमिनी शासन जमा करण्यास अडचणी निर्माण होतील. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बाधीत शेतक-यांस वाटप केलेल्या पर्यायी जमिनीच्या सात-बारामध्ये इतर हक्कात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेल्या विशेष अनुमती याचिकेच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पर्यायी जमिनीचे वाटप केल्याबाबतचे शेरे नोंदविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>-

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९७६, १९८६ व १९९९ मधील व त्यापुर्वी अस्तित्वात असलेल्या प्रचलीत शासन धोरण/निर्णय यानुसार पात्र असलेल्या बाधित शेतकऱ्यांना त्यांची अनुज्ञेयता तपासून पर्यायी जमिनींचे वाटप करण्याकरीता त्यांनी संपादित जमिनीच्या मोबदल्याची रक्कम स्विकारतेवेळी पर्यायी जमिनीच्या संभाव्य कब्जेहक्काच्या रकमेपोटी ६५/७५ टक्के रक्कम शासनाकडे ठेव म्हणुन जमा करणे आवश्यक आहे. तथापि, काही शेतकऱ्यांनी संभाव्य कब्जेहक्काची रक्कम जमा केलेली नाही व आता त्यांच्याकडुन पर्यायी जमिनींची मागणी करण्यात येत असून संभाव्य कब्जेहक्काची रक्कम भरुन घ्यावी व पर्यायी जमिनीचे वाटप करावे, याबाबत मा.उच्च न्यायालयात बऱ्याच रिट याचिका दाखल झाल्या आहेत. बाधित शेतकऱ्यास पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम १६ (२) नुसार नोटीस द्यावी व त्याने नोटीस प्राप्त झाल्यानंतर शासनाकडे कब्जेहक्काची रक्कम जमा करावी व तद्नंतर शासनाने अशा बाधित शेतकऱ्यांना पर्यायी जमिनींचे वाटप करावे, असे न्यायनिर्णय विविध याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेले आहेत. ज्या रिट याचिका प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केल्या आहेत व अशा विशेष अनुमती याचिका न्यायप्रविष्ठ आहेत अशा सर्व प्रकरणी खालील प्रमाणे कार्यवाही करावी-

(अ) मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार बाधीत शेतकऱ्यास पर्यायी जमिनीचे वाटप करण्यासंबंधी निर्गमित करावयाच्या वाटप आदेशा मध्ये *"मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या विशेष अनुमती याचिकेच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आले आहे"* असे नमूद करुन करावे.

(ब) बाधित शेतक-यांना मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कलम १६(२) ची नोटीस देऊन वाटप केलेल्या पर्यायी जमिनीच्या सात - बारामध्ये इतर हक्कात *"मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या विशेष अनुमती याचिकेच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आले आहे."* असे शेरे नोंदविण्यात यावेत.

२. तसेच ज्या प्रकरणांमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केलेली नाही, अशा सर्व प्रकरणांमध्ये तात्काळ विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात यावी व तद्नंतर वरील प्रमाणे कार्यवाही करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०२२०१२७११५१८०१३११९ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Dhananjay Mahesh Nayak

Digitally signed by Dhananjay Mahesh Nayak
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6b0b3c8a4f4c652713fe2c8b99ad7967bd31987605a3a9e2101334fdc07193a3, serialNumber=cb5501110714de26ce81e7da03153eb0f69a36c6bdc2940d70cfee5ed94e63bf, cn=Dhananjay Mahesh Nayak
Date: 2022.01.27 15:18:20 +05'30'

(धनंजय महेश नायक)
उप सचिव, महसुल व वन विभाग

प्रति,

१) मा.राज्यपाल महोदयांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा.मंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५) प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६) महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
७) महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर,
८) सर्व विभागीय आयुक्त,
९) सर्व जिल्हाधिकारी,
१०) सर्व जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
११) सर्व कार्यासन (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२) निवड नस्ती, कार्यासन र-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय. मुंबई.

पुनर्वसन अधिनियमातील तरतूदीनुसार राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील स्लॅबपात्र भूधारकांच्या/ खातेदारांच्या जमिनींच्या ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्कातील नोंदीमध्ये पुनर्वसनासाठी राखीव किंवा इतर शेरे नमूद करून हस्तांतरण व्यवहारांवर लादलेले निर्बंध शिथिल करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र:- आरपीए-२०२२/प्र.क.०९/र-१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- ११ फेब्रुवारी, २०२२

वाचा:-

१. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९७६, १९८६ व १९९९ अन्वये प्रसिध्द केलेल्या अधिसूचना.
२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र:- आरपीए/२०१९/प्र.क.१५१/र-१, दि. ५.८.२०१९
३. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र:- आरपीए-२०२२/प्र.क.०९/र-१, दि.१८.०१.२०२२

प्रस्तावना:-

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९७६ १९८६ व १९९९ अन्वये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनांनुसार राज्यातील पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील स्लॅबपात्र भूधारकांच्या/ खातेदारांच्या जमिनींच्या ७/१२ उताऱ्यामधील इतर हक्कातील नोंदीमध्ये पुनर्वसनासाठी राखीव म्हणून शेरे नमूद करून हस्तांतरण व्यवहारावर निर्बंध लादण्यात आले आहेत. परंतु सदर जमिनींच्या संपादनाची (निवाडा घोषित करण्याची) कार्यवाही अद्यापपर्यंत करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील अशा भूधारकांना अनेक वर्षांपासून त्यांच्या जमिनीची खरेदी-विक्री आणि वारसा हक्कानुसार विभागणी करण्यास अडचणी येत आहेत. परंतु प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी लाभक्षेत्रामध्ये जमिनींची आवश्यकता विचारात घेता, लाभक्षेत्रातील सर्व स्लॅबपात्र जमिनींवर असलेले हस्तांतरण निर्बंध उठविण्यास किंवा शिथिल करण्यास सरसकट परवानगी देणे यथोचित ठरत नाही. पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील खातेदारांनी त्यांच्या स्लॅबपात्र क्षेत्रावरील उक्त हस्तांतरण निर्बंध उठविण्याबाबत केलेल्या मागणीसंदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेऊन यापूर्वी वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित करुन निर्बंध उठविण्याबाबत किंवा शिथिल करण्याबाबत कार्यपध्दती विहीत केलेली आहे.

राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामधील ज्या स्लॅबपात्र भूधारकांच्या/ खातेदारांच्या जमिनींच्या ७/१२ उताऱ्यांवर वरीलप्रमाणे इतर हक्कातील नोंदीमध्ये शेरे नमूद करून हस्तांतरण निर्बंध लादण्यात आले आहेत, अशा भूधारकांकडून/ खातेदारांकडून हस्तांतरण निर्बंध उठविण्यासाठी मा. उच्च न्यायालयात मोठ्या प्रमाणात याचिका दाखल केलेल्या आहेत. अशा बहुतांश न्यायालयीन प्रकरणी पुनर्वसनासाठी जमिनी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने हस्तांतरण निर्बंध लादण्यासाठी ७/१२ च्या इतर हक्कात नोंदविलेले शेरे कमी करण्याचे आदेश मा. उच्च

न्यायालयाने पारित केले आहेत. तथापि हस्तांतरण निर्बंध लादण्यासाठी ७/१२ च्या इतर हक्कात नोंदविलेले शेरे कमी केल्यानंतर भविष्यात आवश्यकता भासल्यास सदर जमिनी संपादित करण्यास राज्य शासनास मा. न्यायालयाच्या आदेशामुळे बाधा येणार नाही, असेही मा. उच्च न्यायालयाने बहुतांश प्रकरणी स्पष्ट केले आहे.

मा. उच्च न्यायालयाचे आदेश तसेच प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी लाभक्षेत्रामधील जमिनींची भविष्यातील आवश्यकता विचारात घेता, राज्यातील पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील ज्या स्लॅबपात्र भूधारकांच्या/ खातेदारांच्या जमिनी संपादित (निवाडा घोषित) करण्याची कार्यवाही अद्यापपर्यंत करण्यात आलेली नाही, परंतु पुनर्वसन अधिनियमातील तरतूदी अन्वये अशा जमिनींच्या ७/१२ च्या इतर हक्कामध्ये पुनर्वसनासाठी राखीव म्हणून शेरे नमूद करून हस्तांतरणावर लादलेले निर्बंध, राज्य शासनाचा भूसंपादनाचा अधिकार अबाधित ठेवून शेती वापरासाठी शिथिल करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९७६, १९८६ व १९९९ अन्वये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनांनुसार राज्यातील पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील स्लॅबपात्र भूधारकांच्या/ खातेदारांच्या जमिनींच्या हस्तांतरण व्यवहारांवर निर्बंध लादण्यासाठी ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्कामध्ये पुनर्वसनासाठी राखीव म्हणून शेरे नोंदविलेले आहेत. परंतु सदर जमिनींच्या संपादनाची प्रक्रिया तसेच निवाडा घोषित करण्याची कार्यवाही अद्यापपर्यंत करण्यात आलेली नाही, केवळ अशा प्रकरणी पुनर्वसन अधिनियमांतर्गत हस्तांतरण व्यवहारांवरील निर्बंध राज्य शासनाचा भूसंपादनाचा अधिकार अबाधित ठेवून शेती वापरासाठी शिथिल करण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे-

अ) पुनर्वसन अधिनियमातील तरतूदी अन्वये लादण्यात आलेले हस्तांतरण व्यवहारांवरील निर्बंध फक्त शेती वापरासाठीच्या हस्तांतरणा संदर्भात शिथिल करण्यात येत आहेत.

आ) अशा जमिनीचे हस्तांतरण व्यवहार झाल्यानंतर जर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी अशा जमिनींची भविष्यात आवश्यकता भासल्यास राज्य शासन संपादन पात्र क्षेत्र संपादित करू शकेल व अशा प्रकारे राज्य शासनाचा संपादन पात्र क्षेत्र संपादित करण्याचा अधिकार अबाधित राहील.

इ) पुनर्वसन अधिनियमातील तरतूदी अन्वये लादण्यात आलेले हस्तांतरण व्यवहारांवरील निर्बंध शिथिल करण्यास परवानगी देण्यापूर्वीचे संबंधित भूधारकाचे एकूण क्षेत्र व लागू असलेला स्लॅब विचारात घेऊन निश्चित केलेले संपादन पात्र क्षेत्र संपादना वेळी शासनास देण्याची जबाबदारी भूधारकाची आहे. सदर जबाबदारी हस्तांतरणानंतर नवीन भूधारकाची राहील. त्यामुळे हस्तांतरण झाल्यानंतर जरी संबंधित नवीन भूधारकाचे एकूण क्षेत्र लागू असलेल्या स्लॅब पेक्षा कमी असले तरी देखील संपादन पात्र क्षेत्र संपादना वेळी शासनास देण्याची जबाबदारी संबंधित नवीन भूधारकाची राहील. या स्वरुपाची हमी खरेदीखतात नमूद करण्याची जबाबदारी भूधारकांची राहील.

ई) पुनर्वसन अधिनियमातील तरतुदीनुसार राज्यातील पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील स्लॅब पात्र भूधारकांच्या/ खातेदारांच्या जमिनींच्या हस्तांतरण व्यवहारांवर निर्बंध

लादण्यासाठी जमिनीच्या ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्कांमध्ये संपादन पात्र क्षेत्राच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या हस्तांतरण निर्बंध विषयी नोंदी वगळून त्याऐवजी पुढील प्रमाणे नोंद घेण्याची कार्यवाही सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत करण्यात यावी-

"पुनर्वसन अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने राज्य शासनाचा भूसंपादनाचा अधिकार अबाधित ठेवून फक्त शेती वापरासाठी हस्तांतरण व्यवहार अनुज्ञेय"

पुनर्वसन अधिनियमातील तरतुदीनुसार राज्यातील पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील स्लॅब पात्र भूधारकांच्या/ खातेदारांच्या जमिनींच्या हस्तांतरण व्यवहारांवर जमिनीच्या ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्कांमध्ये कोणतीही नोंद न घेता काही प्रकरणी केवळ संबधित अधिसूचनेच्या आधारे निर्बंध लादण्यात आले आहेत, असेही शासनाच्या निदर्शनास आले आहे. अशा प्रकरणी देखील सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत स्लॅब पात्र क्षेत्राशी संबंधित ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्कांमध्ये उपरोक्त नोंद घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

उ) वरीलप्रमाणे नोंद घेण्याची कार्यवाही एक महिन्याच्या आत न केल्यामुळे या शासन निर्णयात नमूद अटींचे पूर्णत: पालन न होता हस्तांतरण व्यवहार झाल्यास संबंधितांना जबाबदार धरण्यात येईल.

ऊ) उपरोक्त **"ई)"** मध्ये नमूद केल्यानुसार घेण्यात आलेली **"पुनर्वसन अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने राज्य शासनाचा भूसंपादनाचा अधिकार अबाधित ठेवून फक्त शेती वापरासाठी हस्तांतरण व्यवहार अनुज्ञेय"** ही नोंद वगळून हस्तांतरण व्यवहारांवरील सर्व प्रकारचे निर्बंध उठविण्यास्तव प्राप्त अर्ज प्रकरणी संदर्भाधीन क्र. ३ येथील दि. १८.०१.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये योग्य कार्यवाही करण्यात यावी.

२. सदर शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. तसेच या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यास्तव कोणत्याही कार्यालयाची स्वतंत्ररित्या परवानगी अथवा ना-हरकत घेण्याची आवश्यकता असणार नाही. त्यामुळे सदर शासन निर्णयानुसार तात्काळ कार्यवाही करण्याची दक्षता सर्व जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहे. त्याचा संकेतांक २०२२०२१११५२६०८४४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJAY MAROTI JAGTAP

Digitally signed by SANJAY MAROTI JAGTAP
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9ea94b7d58fc204d63a497943e6c56976c537462d5f2964980c30906051d44d7, pseudonym=CB263AE7A97BA5DB04805052B34A6E185702D5F9, serialNumber=2C1FC771D686D36A26A8AF979409826984378A73F9D4AEECA990209686CC25BD, cn=SANJAY MAROTI JAGTAP
Date: 2022.02.11 15:27:48 +05'30'

(संजय जगताप)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रति,

१) मा. राज्यपाल महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

अतिवृष्टीमुळे आलेला पूर, जमिनीचे भूस्खलन किंवा जमिनीला मोठमोठ्या भेगा पडणे, डोंगर खचणे किंवा दरडी कोसळणे इ. कारणांमुळे बाधित तसेच या आपत्तीप्रवण गावांचे पुनर्वसन व नागरी सुविधा पुरविणे इत्यादीबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. एफएलडी-२०१९/प्र.क्र.१२९/र-१२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १४ ऑक्टोबर, २०२२

संदर्भ :- १) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र.जीटीएन-१०८३/२१७/र-१२, दि.१०/२/१९८३
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.सीएलएस-११-०५/प्र.क्र.२३९/म-३, दि.९/१/२००६
३) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र.प्रआयो-२०१७/प्रक्र.३४८/योजना -१०, दि.१६/२/२०१८

प्रस्तावना:-

अतिवृष्टीमुळे आलेला पूर, जमिनीचे भूस्खलन किंवा जमिनीला मोठमोठ्या भेगा पडणे, डोंगर खचणे किंवा दरडी कोसळणे इ. नैसर्गिक आपत्तींमध्ये घरांची पडझड होणे, नागरी सुविधांवर परिणाम होणे यामुळे सार्वजनिक मालमत्तेची मोठ्या प्रमाणावर हानी होते. या आपत्तींमुळे ज्या गावांचे / क्षेत्राचे / वाडीचे / तांड्याचे कायमस्वरुपी पुनर्वसन करणे आवश्यक आहे, अशा गावाचे / क्षेत्राचे / तांडयाचे / वस्तीचे पुनर्वसन करण्यासंदर्भात सर्वसमावेशक असे धोरण नाही. नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित गावांचे पुनर्वसन, घरदुरुस्ती, घरांची पुर्नबांधणी, नागरी सुविधा इ. बाबत शासन परिपत्रक क्र. सीटीएन-१०८३/२१७/र-१२, दि.१०/२/१९८३ अन्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या असून त्यामध्ये वेळोवेळी शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेऊन सदर बाधित गावांचे कशाप्रकारे पुनर्वसन करण्यात येईल याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच, यापुर्वी सन २००५ मधील अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थितीत बाधित पुरग्रस्त गावांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनस्तरावर धोरणात्मक निर्णय घेऊन शासन निर्णय दि.९/१/२००६ अन्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. परंतु शासनाचे सदरचे धोरण निश्चित होऊन जवळपास १५ वर्षांपेक्षा जास्त कालावधी झालेला असून सध्याची आर्थिक, भौतिक व सामाजिक परिस्थिती तसेच शासनाची प्रचलित धोरणे विचारात घेता, पुरामुळे तसेच इतरही नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित / आपत्ती प्रवण क्षेत्रातील गावांचे/ क्षेत्राचे / वाडीचे / तांडयाचे पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने फक्त ग्रामीण भागासाठी लागू असेल असे एक सर्वसमावेशक धोरण ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

शासन निर्णय :-

अतिवृष्टीमुळे आलेला पूर, जमिनीचे भूस्खलन किंवा जमिनीला मोठमोठ्या भेगा पडणे, डोंगर खचणे किंवा दरडी कोसळणे इ. नैसर्गिक आपत्तीच्या कारणामुळे फक्त ग्रामीण भागातील बाधित तसेच या आपत्तीप्रवण गावाचे / क्षेत्राचे / वाडीचे / तांड्याचे तातडीने नवीन जागेवर स्थलांतरीत करुन गावातील पात्र लाभधारकांच्या पुनर्वसनाकरीता खालीलप्रमाणे निकष विहित करण्यात येत आहेत.

१. अतिवृष्टीमुळे आलेला पूर, जमिनीचे भूस्खलन किंवा जमिनीला मोठमोठ्या भेगा पडणे, डोंगर खचणे किंवा दरडी कोसळणे इ. नैसर्गिक आपत्तीमुळे एखाद्या ग्रामीण भागातील बाधित गावाचे / क्षेत्राचे / वाडीचे / तांड्याचे नवीन ठिकाणी स्थलांतरीत करुन **कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यासंदर्भात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण** (District Disaster Management Authority) **निर्णय घेईल.**

२. तसेच उक्त बाबीमुळे बाधित गावांचे / क्षेत्राचे / वाडीचे / तांड्याचे कायमचे पुनर्वसन पूर्ण होण्यापूर्वी जर **तात्पुरते पुनर्वसन करणे आवश्यक असल्याचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे (DDMA) मत असल्यास, ते तसा प्रस्ताव राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडे (SDMA) पाठवतील** व राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (SDMA) त्यावर अंतिम निर्णय घेईल.

३. अतिवृष्टीमुळे आलेला पूर, जमिनीचे भूस्खलन किंवा जमिनीला मोठमोठ्या भेगा पडणे, डोंगर खचणे किंवा दरडी कोसळणे इ. नैसर्गिक आपत्तीमुळे **ज्या आपत्तीप्रवण गावांचे / क्षेत्राचे / वाडीचे / तांड्याचे कायमस्वरुपी पुनर्वसन करणे आवश्यक आहे. अशा गावांचे / क्षेत्राचे / तांडयाचे / वस्तीचे पुनर्वसन करण्यासंदर्भात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (DDMA) शासनास निर्णयासाठी प्रस्ताव सादर करेल. तदनंतर** महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र. आव्यप्र २०२१/ प्र.क्र.२०९/आव्यप्र-१, दि.२१/१०/२०२१ प्रमाणे गठीत करण्यात आलेली मंत्रीमंडळ उपसमिती सदर प्रस्तावावर अंतिम निर्णय घेईल व त्यास तज्ञ समिती सहाय्य करेल.

४. पुनर्वसनाची योजना तयार करताना बाधित लोकांच्या उपजीविकेवर पुनर्वसनामुळे नकारात्मक प्रभाव होत असेल, तर या प्रभावाच्या सौम्यीकरणाचे उपाय जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (DDMA) प्रस्तावात समावेश करेल.

५. वरीलप्रमाणे एखाद्या गावाचे / क्षेत्राचे / वाडीचे / तांड्याचे नवीन ठिकाणी पुनर्वसन करावयाचे ठरविल्यावर खालीलप्रमाणे नमूद बाबींचे पालन करुन प्रस्तावित पध्दतीने पुनर्वसन करण्यात यावे.

अ) भूसंपादनाची प्रक्रीया :-

पुनर्वसनाकरीता जागा शक्यतो शासकीय जमीन असावी, परंतु शासकीय जमीन उपलब्ध नसल्यास अथवा ती पुनर्वसनासाठी योग्य नसल्यास खाजगी जमीन संपादित करता येऊ शकेल. सदरची आवश्यकता विचारात घेता भूसंपादनाची प्रक्रिया करतांना भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम ११(१), १९(१), २१(१), ४०(१) व १०८ च्या तरतुदीनूसार सार्वजनिक प्रयोजनार्थ (Public Purpose) भूसंपादन करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. या करिता **नवीन/अन्य ठिकाणी पुनर्वसनाकरीता भूसंपादन प्रकरणी भूधारकांना अधिनियमानूसार / थेट खरेदी धोरणानुसार मिळणाऱ्या लाभांबाबत अवगत करुन भूधारकांना भूसंपादन अधिनियमानुसार / थेट खरेदी धोरणानूसार यापैकी एक पर्याय निवडण्याचे अधिकार असतील,** त्यानूसार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (District Disaster Manegement Authority) प्रस्तावित करेल.

ब) पुनर्वसनासाठी पात्र लाभार्थी :-

१. संबंधित गावाचे / क्षेत्राचे / तांडाचे / वस्तीचे सर्वेक्षण करुन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (DDMA) पुनर्वसनासाठी पात्र कुटुंबाची यादी तयार करेल व त्यास योग्य स्थानिकरित्या प्रसिध्दी देऊन हरकती आल्यास छाननी / तपासणी करुन अंतिम निर्णय घेईल.

२. "कुटुंब" या व्याख्येमध्ये कुटुंबातील एक व्यक्ती, त्याचा किंवा तिचा जोडीदार, अल्पवयीन मुले, त्याच्यावर अवलंबून असलेल्या अल्पवयीन भाऊ आणि अल्पवयीन बहिणींचा समावेश आहे. तसेच विधवा, घटस्फोटीत आणि कुटुंबांद्वारे निर्जन महिलांना स्वतंत्र कुटुंब मानले जाईल.

स्पष्टीकरण

अ) पती / पत्नी किंवा मुले किंवा आश्रित यांच्यासह किंवा त्याशिवाय असलेली प्रौढ व्यक्ती या कायद्यान्वये स्वतंत्र कुटुंब मानले जाईल.

आ) कुटुंब निश्चित करण्यासाठी जुन्या गावात एकाच घरात एकापेक्षा जास्त कुटुंबे राहत असतील व त्यांचे कुटुंब प्रमुख म्हणून स्वतंत्र रेशन कार्ड /विद्युत देयके / स्वतंत्र गॅस जोडणी असेल (नैसर्गिक आपत्ती पुर्वी) किंवा इतर असा पुरावा जो कुटुंब स्वतंत्र असल्याचे सिध्द करत असेल अशी कागदपत्रे सादर केल्यास अशी कुटुंबे स्वतंत्र समजण्यात येतील.

३. राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार अतिक्रमण नियमित करण्यासाठी पात्र अतिक्रमणधारक कुटुंबे या योजनेसाठी पात्र ठरतील.

४. राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार जे अतिक्रमण धारक अपात्र आहेत, त्यांना या योजनेचा लाभ देय ठरणार नाही आणि त्यांचे अतिक्रमण जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तात्काळ निष्काषित करेल.

५. पूर बाधित क्षेत्रामध्ये न येणारा पंरतु सामाजिक किंवा व्यावहारिक कारणामुळे काही **फ्रिंज क्षेत्रातील नागरिकांचे सुध्दा पुनर्वसन करणे आवश्यक राहील असे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे (DDMA) मत झाल्यास** अशा क्षेत्रातील कुटुंब पुनर्वसनासाठी पात्र ठरतील.

क) <u>पुनर्वसित ठिकाणामध्ये अनुज्ञेय भूखंड / घर</u> :-

१. प्रत्येक पात्र कुटुंब किमान स्वतंत्र ५०० चौ. फुटाचा भूखंड अनुज्ञेय असण्यास पात्र राहतील.

२. जर कुटुंबाची मुळ जागा ५०० चौ. फुट पेक्षा जास्त असल्यास, तर पर्यायी जागेत हया उरलेल्या जागेचे नियोजन शक्य असल्यास मुळ जागेएवढीच पर्यायी जागा दिली जाईल. परंतु जर पुरेशी जागा उपलब्ध नसल्यास पर्यायी जागेपेक्षा जास्त क्षेत्राचा मोबदला दिला जाईल.

स्पष्टीकरण :- जर पुनर्वसन करतांना लाभार्थ्यास प्रदान करण्यात आलेला अंतिम भूखंड, त्यांची मुळ जागा धारण केलेल्या क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे वाटप होत असल्यास मूळ धारण करीत असलेल्या क्षेत्रापेक्षा कमी प्रदान केलेल्या जमिनीच्या फरकाची रक्कम देय करताना महसुल व वन विभाग, शासन अधिसूचना दि. २७ ऑगस्ट, २०१४ नूसार ग्रामीण भागात संपादित करावयाच्या जमिनीच्या नुकसान भरपाईची (बाजार मूल्य x १.२० + जमिनीशी जोडलेल्या मत्ते किंवा इमारतीचे मूल्य) + (१००% दिलासा रक्कम) किंमत या सुत्रानूसार निर्धारित करण्यात येईल.

३. पुनर्वसित लाभार्थ्यांचा भूखंड जर भोगवटादार वर्ग-२ धारणाधिकार असलेला असेल तर त्याला भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकाराचाच भूखंड अनुज्ञेय असेल. सदर भूखंडाच्या धारणाधिकारामध्ये बदल करावयाचा झाल्यास महसुल व वन विभागाच्या दि.०८ मार्च, २०१९ च्या शासन अधिसूचनेतील तरतुदीप्रमाणे सक्षम प्राधिकारी यांचे मार्फत कार्यवाही करण्यात येईल. तसेच जर मुळ जागा वर्ग-१ धारणाधिकाराची असल्यास पर्यायी जागा सुध्दा वर्ग-१ धारणाधिकाराची असलेली देय राहील.

४. पर्यायी जागेच्या विकास आराखडयासाठी DSR प्रमाणे रक्कम देय राहील. तसेच जर हा विकास आराखडा मूळ गावठाणापासून दूर असल्यास जोड रस्त्यासाठी निधीची तरतूद करण्यात येईल.

५. पुनर्वसनासाठी पात्र ठरविण्यात आलेल्या कुटुंबांपैकी केंद्र पुरस्कृत अथवा राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांचे लाभार्थी नाहीत, अशा पात्र कुटुंबाना केंद्र पुरस्कृत अथवा राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांसाठी देय असलेला प्रती घरकुल इतका निधी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समिती प्रस्तावित करेल व सदरचा निधी मदत व पुनर्वसन विभागामार्फत ग्राम विकास विभागाच्या अधिपत्याखालील राज्य गृहव्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचेकडे वर्ग करण्यात येईल. हा कक्ष सर्वसाधारणपणे वरील नमूद योजनामध्ये निर्देशित प्रक्रियेप्रमाणे लाभार्थ्यांना सदरचा निधी देय करेल.

६. घर बांधणीसाठी प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) किंवा त्यावेळी अस्तित्वात असलेल्या केंद्र शासनाच्या गृहनिर्माण योजनेमध्ये वेळोवेळी बदलासह देय असलेली रक्कम अनुज्ञेय राहील.

७. पशुधन असलेले कुटुंबे, छोटे दुकानदार यांना रु. २५,०००/- व ग्रामीण कारागीर व छोटे व्यापारी यांना एकवेळची आर्थिक मदत म्हणून रु.५०,०००/- आणि घर बदलल्यानंतर बाधित कुटुंबाला एकदाच वाहतुक / पुनर्स्थापनेसाठी रु. ५०,०००/- देय राहतील.

८. स्वेच्छा पुनर्वसनासाठी इच्छुक असलेल्या बाधित लाभार्थ्यास शासन अधिसूचना दि.२७/०८/२०१४ मधील (बाजार मुल्य x १.२० + जमिनीशी जोडलेल्या मत्ते किंवा इमारतीचे मूल्य) + (१००% दिलासा रक्कम) सुत्राच्या आधारे निश्चित करुन लाभ अदा करण्यात येईल. अशा स्वेच्छा पुनर्वसन व्यक्तींसाठी सदरची रक्कम दोन टप्प्यात अदा करण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात अशा व्यक्तींनी त्यांची जमीन राज्य शासनाच्या नावावर केल्यानंतर त्यास घरबांधणीसाठी पहिला टप्पा अदा करण्यात येईल. दुसऱ्या टप्प्यामध्ये बाधित व्यक्ती स्थलांतरीत झाल्यानंतर त्याच्या मुळ जमिनीचा प्रत्यक्ष ताबा दिल्यानंतर उरलेली रक्कम देय राहील.–याव्यतिरिक्त स्वेच्छा पुनर्वसन स्विकारलेल्या व्यक्तीस पुनर्वसनाचा इतर कोणताही लाभ अनुज्ञेय ठरणार नाही.

९. जर कोणतीही संस्था / व्यक्ती / कंपनी / न्यास हे पुनर्वसित व्यक्तींना / पुनर्वसित क्षेत्रास मदत / निधी / देणगी देऊ इच्छित असेल तर अशी देणगी / मदत / निधी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत (DDMA) निधीच्या किंवा वास्तुच्या स्वरुपात देय करु शकतील.

१०. या योजनेखाली पुनर्वसन हे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी असल्याने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत प्रकल्पग्रस्त घोषित केले जाणार नाही. त्यांना प्रकल्पग्रस्तांचे कोणतेही लाभ / फायदे देय ठरणार नाहीत.

ड) पुनर्वसित ठिकाणामध्ये अनुज्ञेय नागरी सुविधा :-

१) पुनर्वसित ठिकाणात खालील नागरी सुविधा अनुज्ञेय असतील.

१. स्थायिक गावांमधील **अंतर्गत रस्ते आणि जवळच्या मुख्य रस्त्याशी जोडणारा बारमाही रस्ता.**

२. मलनिस्सारणाचा निचरा करण्यासाठी **बंदिस्त गटारे.**

३. केंद्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार प्रत्येक कुटूंबाला **स्वच्छ पाणीपुरवठा.**

४. गुरांच्या पिण्याच्या **पाण्यासाठी हौद.**

५. सुयोग्य **ग्रामपंचायत भवन**.

६. **सार्वजनिक शौचालय** (स्वच्छतागृहांसह स्वच्छतेच्या सुविधा).

७. **वैयक्तिक एकल विद्युत जोडणी** (किंवा सौर ऊर्जा सारख्या ऊर्जा संवर्धन स्त्रोतांशी जोडणी) प्रत्येक घरगुती आणि सार्वजनिक प्रकाश योजना.

८. **अंगणवाडी** (बालकांना आणि आईला पूरक पोषण सेवा अंतर्गत).

९. मुलांच्या "मोफत आणि सक्तीच्या शिक्षण कायदा २००९" च्या तरतुदीनुसार **शाळा** (कलम ३५/२००९ नूसार)

१०. मुलांच्या **खेळाचे मैदान.**

११. प्रत्येक १०० कुटूंबासाठी एक **समाजमंदीर.**

१२. वन रहिवासी कुटुंबांना शक्य असल्यास, लाकडाच्या नसलेल्या वन उत्पादनावरील त्यांच्या वन हक्कांसह आणि सामान्य मालमत्तेच्या संसाधनांवरील त्यांचे वन हक्क, वस्तीच्या नवीन ठिकाणा जवळ उपलब्ध असल्यास आणि जर असे कुटुंब अशा ठिकाणी प्रवेश किंवा प्रवेश चालू ठेवू शकत असेल तर प्रदान करणे आवश्यक आहे. बेदखलीच्या ठिकाणाजवळील जंगल किंवा सामान्य मालमत्ता, त्यांनी उपरोक्त उपजीविकेच्या स्त्रोतांवर त्यांचे पूर्वीचे अधिकार कायम राहतील.

२) सदर पुनर्वसित ठिकाणात नागरी सुविधा पुरविण्यासाठी सर्वसाधारणपणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाद्वारे (DDMA) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA) किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण महामंडळ (Maharashtra Housing Corporation) यांची एजन्सी म्हणून नेमणूक करण्यात येईल. ज्या ठिकाणी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA) किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण महामंडळ (Maharashtra Housing Corporation) हे नागरी सुविधा पुरविण्यास असमर्थ असेल किंवा इच्छुक नसेल अशा ठिकाणी शासकीय संस्था / जिल्हा परिषद / खाजगी एजन्सी यांची नेमणूक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (DDMA) करेल.

इ) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने करावयाची कार्यवाही :-

१. सर्वसाधारण :-

१. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (DDMA) पुनर्वसनाबाबत प्राथमिक अधिसूचना (Notification) काढतील व त्यास व्यापक स्थानिक प्रसिध्दी देतील.

२. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (DDMA) बाधित कुटुंबांशी चर्चा करुन संभाव्य पुनर्वसनाचा आराखडा अंतिम करेल. आराखडा अंतिम करतांना पर्यायी पुनर्वसन स्विकारणाऱ्या कुटुंबांची संख्या, स्व-पुनर्वसन स्विकारणाऱ्या कुटुंबाची संख्या आणि स्वेच्छा पुनर्वसन नाकारणाऱ्या कुटुंबाची संख्या अंतिम करेल.

३. पुनर्वसित करावयाच्या कुटुंबांची संख्या १५ किंवा त्यापेक्षा कमी असेल अशा प्रकरणी सर्वसाधारणपणे त्यांचे पुनर्वसन त्यांनी स्वत: करावयाचे आहे व त्यांना स्वेच्छा पुनर्वसनाचे लाभ अनुज्ञेय राहतील. स्थानिक परिस्थितीनुसार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (DDMA) त्यांच्यासाठी सुध्दा पर्यायी जागेवर पुनर्वसनाचा विचार करु शकेल.

४. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (DDMA) वाटप करावयाच्या भूखंडाचे क्षेत्र व नागरी सुविधेसाठी आवश्यक असलेल्या क्षेत्राची निश्चिती करेल.

५. पुनर्वसनाकरीता जागा शक्यतो शासकीय जमीन असावी, परंतु शासकीय जमीन उपलब्ध नसल्यास अथवा पुनर्वसनासाठी योग्य नसल्यास खाजगी जमीन संपादित करता येऊ शकेल. जागा संपादन करताना जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (DDMA) द्वारा सध्या प्रचलित असलेल्या धोरणानुसार भूसंपादन अधिनियमाप्रमाणे अथवा खाजगी वाटाघाटीने संपादन करता येईल. पुनर्वसनाची आवश्यकता विचारात घेता भूसंपादनाची प्रक्रिया करताना भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम ११(१), १९(१), २१(१), ४०(१) व १०८ च्या तरतुदीनूसार सार्वजनिक प्रयोजनार्थ (Public Purpose) भूसंपादन करण्याबाबतची तसेच **नैसर्गिक आपत्ती मुळे बाधीत गावांचे (ग्रामीण) नवीन / अन्य ठिकाणी पुनर्वसनाकरीता भूसंपादन प्रकरणी भूधारकांना अधिनियमानूसार / थेट खरेदी धोरणानुसार मिळणाऱ्या लाभांबाबत अवगत करुन भूधारकांना भूसंपादन अधिनियमानुसार / थेट खरेदी धोरणानूसार यापैकी एक पर्याय निवडण्याचे अधिकार असतील.** ज्या प्रकरणी खाजगी वाटाघाटीद्वारे देय असलेल्या जमिनीचा मोबदला हा भूसंपादन

अधिनिमातील मोबदल्यापेक्षा जास्त असल्यास जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने (DDMA) राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची (SDMA) पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. पर्यायी जमिनीबाबत पुनर्वसित होणाऱ्या कुटुंबात एकमत नसल्यास ५०% पेक्षा जास्त कुटुंबांना मान्य असलेली जागा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाद्वारे (DDMA) प्रस्तावित करेल. जर कोणत्याही पर्यायी जागेला ५०% पेक्षा जास्त कुटुंबाची सहमती मिळाली नाही, तर या कुटुंबाचे शक्य तितक्या लवकर पुनर्वसन करणे गरजेचे असल्यामुळे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (DDMA) पर्यायी जागेचा अंतिम निर्णय घेईल.

६. पर्यायी जमिनीवर पुनर्वसन केल्यानंतर तेथील स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायतीने / जिल्हा परिषद) नागरी सुविधा ताब्यात घेईल.

२. भूखंड वाटप व प्रक्रिया :-

१. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (DDMA) शासन मान्य पुनर्वसित जमिनीचा आराखडा, पर्यायी जमिनीचा आराखडा, नागरी सुविधा इ. गावात प्रसिध्द करेल.

२. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने (DDMA) सुनिश्चित केलेल्या सर्व पुनर्वसित कुटूंबांना आराखड्याबाबत माहिती देईल.

३. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (DDMA) सर्वसाधारणपणे सर्व कुटुंबांना एकमताने भूखंड वाटप करेल. अशी पूर्ण सहमती न झाल्यास जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (DDMA) लॉटरीद्वारे भूखंडाचे वाटप करेल व याबाबतचा अंतिम निर्णय जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचा (DDMA) राहील.

४. प्रदान करण्यात येणाऱ्या भूखंडांचे ताबापत्र संबंधित कुटुंबांना सोपविण्यापूर्वी, त्यांची मूळ जमीन त्या कुटूंबांनी शासनाच्या नावे करुन त्याचा ताबा देईल, अशी तरतूद ताबा पत्रात करणे आवश्यक राहील आणि तशी नोंद शासन दप्तरी घेण्यात येईल. अशा मूळ जागेचा वापर सामाजिक वनीकरणासाठी किंवा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाला (DDMA) योग्य वाटेल अशा सार्वजनिक उद्देशासाठी करता येईल.

३. पुनर्वसित जमिनीचा विकास :-

१. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (DDMA) पुनर्वसित जागेच्या विकासासाठी नागरी सुविधेच्या कामासह विकास आराखडयाचे अंदाजपत्रक तयार करुन राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या (SDMA) मंजूरीसाठी सादर करतील.

२. राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या (SDMA) मंजूरीनंतर आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाच्या दिशा-निर्देशानुसार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (DDMA) पुनर्वसित जागेचा विकास करतील.

३. पुनर्वसनाचे काम जलद गतीने व विहीत मर्यादेत करणे गरजेचे असून, शक्यतो तातडीने बाधित कुटूंबांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करणे क्रमप्राप्त आहे. विकल्पाच्या जागी नागरी सुविधा निर्माण झाल्यावर मुळ ठिकाणच्या नागरी सुविधा खंडीत करण्यात येतील.

४. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (DDMA) जागेचा संपूर्ण विकास झाल्यानंतर व भुखंड वाटपांनतर पुनर्वसन संपल्याचे घोषित करेल. अशा घोषनेनंतर आराखडयातील नागरी सुविधा ग्रामपंचायतीकडे सुपुर्द केल्याचे मानले जाईल.

अशा योजनेबाबत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (DDMA) तिमाही प्रगती अहवाल राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाला (SDMA) सादर करेल.

फ) निधीची उपलब्धता :-

पुनर्वसनासाठी लागणाऱ्या निधीसाठी खालील नमूद लेखाशीर्षातून खर्च भागविण्यात येईल.

१. **जमिनीचा रेखांकन व विकासाकरीता :-**

मागणी क्रमांक सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य (०२) पूर, चक्रीवादळे, इत्यादी १०१, अनुग्रह सहाय्य, (९२) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकाव्यतिरिक्त खर्च, (९२)(०३) पुरामुळे बाधित झालेल्या व्यक्तींच्या गृहनिर्माणासाठी जमिनीचा विकास करण्यावरील खर्च (अनिवार्य) (योजनेतर) (२२४५-२२११) ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)

मागणी क्रमांक सी-६, -२२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य (०२) पूर, चक्रीवादळे, इत्यादी १०१, अनुग्रह सहाय्य, (९३) इतर, (९३)(०४) पुरामुळे बाधित झालेल्या व्यक्तींच्या गृहनिर्माणासाठी जमिनीचा विकास करण्यावरील खर्च (अनिवार्य) (योजनेतर) (२२४५-०१९१) ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर).

२. **जमीन संपादनाकरीता** :-

मागणी क्रमांक - सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य (०२) पूर, चक्रीवादळे, इत्यादी १०१, अनुग्रह सहाय्य, (९२) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकाव्यतिरिक्त खर्च, (९२)(०२) पुरामुळे बाधित झालेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनाकरिता रस्ते व घरे इत्यादी बांधकामासाठी संपादन केलेल्या / अधिग्रहीत केलेल्या जमिनीबद्दल नुकसान भरपाई देणे (अनिवार्य) (योजनेतर) (२२४५ २२०२) ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर).

मागणी क्रमांक सी ६-२२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य (०२) पूर, चक्रीवादळे, इत्यादी १०१, अनुग्रह सहाय्य, (९३) इतर, (९३)(०३) पुरामुळे बाधित झालेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनाकरिता रस्ते व घरे इत्यादी बांधकामासाठी संपादन केलेल्या / अधिग्रहीत केलेल्या जमिनीबद्दल नुकसान भरपाई देणे (अनिवार्य) (योजनेतर) (२२४५ ०१८२) ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर).

३. **पुनर्वसनांतर्गत घरांच्या बांधणी / दुरुस्ती / पुनर्बांधणीकरीता**

मागणी क्रमांक सी-६, २२४५-नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी सहाय्य, ०२-पूर, चक्रीवादळे, इत्यादी, ११३, घरदुरुस्ती / पुनर्बांधणी यासाठी सहाय्य (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकांनूसार खर्च, (९१)(०१) घरांची दुरुस्ती / पुनर्बांधणी यासाठी सहाय्य (अनिवार्य) (योजनेतर) (२२४५ ०२७१) ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)

मागणी क्रमांक सी-६, २२४५-नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी सहाय्य, ०२-पूर, चक्रीवादळे, इत्यादी, ११३, घरदुरुस्ती / पुनर्बांधणी यासाठी सहाय्य (९२) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकाव्यतिरिक्त खर्च, (९२)(०१) घरांची दुरुस्ती / पुनर्बांधणी यासाठी सहाय्य (अनिवार्य) (योजनेतर) (२२४५ २३२७) ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)

४. **नागरी सुविधा कामाकरिता**

"मागणी क्रमांक सी-६, २२४५-नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी सहाय्य, ०२-पूर, चक्रीवादळे, इत्यादी, १०१, अनुग्रह सहाय्य (९२) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकाव्यतिरिक्त खर्च, (९२)(०४) पुरामुळे बाधीत झालेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनाकरिता रस्ते, पाणी पुरवठा, शाळा, चावडी,

विद्युत पुरवठा, नागरी सुविधावरील खर्च (अनिवार्य) (योजनेतर) (२२४५ २२२९) ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)"

"मागणी क्रमांक सी-६, २२४५-नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी सहाय्य, ०२-पूर, चक्रीवादळे, इत्यादी, १०१, अनुग्रह सहाय्य (९३) इतर, (९३)(०५) पुरामुळे बाधीत झालेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनाकरिता रस्ते, पाणी पुरवठा, शाळा, चावडी, विद्युत पुरवठा, नागरी सुविधावरील खर्च (अनिवार्य) (योजनेतर) (२२४५ ०९८८) ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)"

५. पुनर्वसनासाठीचा खर्च राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) मधून करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२१०१४१७२३५३१११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dhananjay Mahesh Nayak

Digitally signed by Dhananjay Mahesh Nayak
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6b0b3c8a4f4c652713fe2c8b99ad7967bd31987605a3a9e2101334fdc07193a3, serialNumber=cb5501110714de26ce81e7da03153eb0f69a36c6bdc2940d70cfee5ed94e63bf, cn=Dhananjay Mahesh Nayak
Date: 2022.10.14 17:26:44 +05'30'

(ध. म. नायक)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. विभागीय आयुक्त, कोकण विभाग/पुणे विभाग/नाशिक विभाग/औरंगाबाद विभाग/अमरावती विभाग/नागपूर विभाग.
१०. सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता-१/२) महाराष्ट्र राज्य, मुंबई /नागपूर
१३. महालेखापाल (लेखा परीक्षा-१/२) महाराष्ट्र राज्य, मुंबई /नागपूर
१४. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. वित्तीय सल्लागार तथा सहसचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, नवीन प्रशासन भवन, मुंबई.
१६. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).
१७. वित्त विभाग, कार्यासन व्यय-१०, अर्थसंकल्प-६, मंत्रालय, मुंबई-३२.
१८. महसूल व वन विभाग, कार्यासन ब-१/पी.ए.सी./अ व ज ची सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई.
१९. निवडनस्ती कार्यासन र-१२, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

******

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या परिशिष्ट-२ च्या प्रमाणित प्रतींबाबत .

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : अपील -२०२३/प्र.क्र.५८/झोपनि-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ०९ मार्च, २०२३

शासन परिपत्रक :-

झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत झोपडीधारकांची पुनर्विकसित सदनिका मिळण्यासाठी शासन अधिसूचना क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१८/झोपनि-२, दि.१२.०८.२०२१ व दि.११.०२.२०२२ अन्वये घोषित करण्यात आलेल्या संबंधित सक्षम प्राधिकारी यांच्याकडून पात्रता/अपात्रता निश्चित केली जाते व त्यासंबंधीची रितसर नोंद परिशिष्ट-२ या अभिलेखांमध्ये करण्यात येते. जे झोपडीधारक अपात्र ठरतात त्यांना महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्वसन) अधिनियम, १९७१ च्या कलम ३५ मधील तरतुदीनुसार उक्त दि.१२.०८.२०२१ व दि.११०२.२०२२ च्या शासन अधिसूचनेन्वये घोषीत केलेल्या अपिलीय अधिकाऱ्यांकडे अपील दाखल करता येते. अपिलीय प्राधिकाऱ्यांना त्यांच्यासमोर दाखल झालेले अपील निकाली काढताना, अर्जदार किंवा अपिलार्थी यांनी सादर केलेले परिशिष्ट-२ वैध/खरे आहे किंवा कसे? याची खातरजमा करणे आवश्यक असते. त्यासाठी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडून परिशिष्ट -२ च्या प्रमाणित प्रतीची अपिलार्थींकडे मागणी करण्यात येत असते. परंतु अपिलार्थी यांना सक्षम प्राधिकाऱ्यांकडून परिशिष्ट-२ च्या प्रमाणीत प्रती उपलब्ध करून दिल्या जात नाहीत. त्यामुळे त्यांना परिशिष्ट -२ च्या अपात्रतेसंदर्भात सक्षम अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील दाखल करताना परिशिष्ट-२ ची प्रमाणित प्रत सादर करण्यात अडचण निर्माण होते. शिवाय, परिशिष्ट-२ च्या प्रमाणित प्रती मिळविण्यात झोपडीधारकांचा बराच कालपव्यय होतो व त्यामुळे त्यांना अपिलीय अधिकारी यांच्याकडे विहित वेळेत अपील दाखल करण्यात अडचण निर्माण होते.

२. परिशिष्ट-२ ची प्रमाणित प्रत उपलब्ध करून घेण्यामधील/देण्यामधील झोपडीधारकांची वरील रास्त अडचण विचारात घेता ती दूर करणे आवश्यक आहे. त्यासाठी झोपडीधारकांच्या पात्र/अपात्रतेचे परिशिष्ट-२ तयार केल्यानंतर, त्याची प्रमाणित प्रत परिशिष्ट -२ निर्गमित केल्यापासून ८ दिवसांच्या आत संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी त्या- त्या संबंधित अपिलीय प्राधिकाऱ्यांना उपलब्ध करुन द्याव्यात. परिशिष्ट-२ च्या प्रमाणित प्रती सक्षम प्राधिकारी यांनी

संबंधित अपिलीय अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावयाच्या असल्याने, परिशिष्ट-२ च्या प्रमाणीत प्रतीची मागणी अपिलीय प्राधिकारी यांनी झोपडीधारकांकडे करू नये.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२३०३०९१८१९३२०६०९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARVIND TULSHIRAM SHETE

Digitally signed by ARVIND TULSHIRAM SHETE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOUSING DEPARTMENT, 2.5.4.20=d33ed79e4d2d2921d0ca79b9de78fffaa75e5ff9801ced3d15f5ca38bf6aab62, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=822DCC756FFE36BFE50F258EB6574FFEF985EA24E97243442A9C1B3323AACA40, cn=ARVIND TULSHIRAM SHETE
Date: 2023.03.10 18:30:14 +05'30'

(अरविंद शेटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२) मा. उपमुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे सचिव.
३) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
४) अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई,
५) अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (१/२), मंत्रालय, मुंबई,
६) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई,
७) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, वांद्रे, मुंबई,
८) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे, मुंबई
९) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई,
१०) जिल्हाधिकारी, मुंबई शहर व उपनगर, मुंबई,
११) अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर व उपनगर, मुंबई,
१२) अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन), पुर्व उपनगरे, मुंबई
१३) अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन), पश्चिम उपनगरे, मुंबई
१४) अपर जिल्हाधिकारी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई
१५) सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६) सक्षम प्राधिकारी - १ ते १०, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे, मुंबई
१७) निवडनस्ती, कार्यासन-झोपनि-२, संग्रहार्थ.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत सशुल्क पुनर्वसन सदनिकांचे शुल्क निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृहनिर्माण विभाग

शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.५४(भाग-१)/झोपसु-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

दिनांक :- २५ मे, २०२३.

वाचा :-

गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय, क्रमांक-झोपुधो-०८१०/प्र.क्र.९६/२०१८/झोपसु-१, दि.१६ मे, २०१८

प्रस्तावना :-

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत दि.०१.०१.२००० पासून दि.०१.०१.२०११ पर्यंत अस्तित्वात असलेल्या झोपडीच्या संदर्भात अशा झोपडीत प्रत्यक्ष राहणाऱ्या झोपडीधारकांचे सशुल्क पुनर्वसन करण्याचे धोरण शासनाने दि.१६ मे, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्विकारले आहे. त्यानुषंगाने सशुल्क पुनर्वसन योग्य झोपडीधारकांच्या पुनर्वसन सदनिकेचे शुल्क निश्चित करण्यासाठी मा.मंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने केलेल्या शिफारसीस मा.मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत सशुल्क पुनर्वसन सदनिकेचे शुल्क निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

गृहनिर्माण विभागाच्या दि.१६ मे, २०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत सशुल्क पुनर्वसन योग्य झोपडीधारकांच्या पुनर्वसन सदनिकेची किंमत रु.२.५ लाख इतकी निश्चित करण्यात येत आहे.

यासंदर्भात आवश्यक अटी व शर्ती मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांनी शासनाच्या पूर्वमान्यतेने निश्चित कराव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२३०५२५१३२०००९५०९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

TUMBARE SUNIL BABURAO

Digitally signed by TUMBARE SUNIL BABURAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOUSING DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6db48f86ab804a2f08a49a53d5dddd92f7dca38c78a21ad05da451e33813593c, pseudonym=5F8C97B9A647BD157380B244EF62BE228705D065, serialNumber=4E35B68528305D98FA8F8D62D295D490751E30D94B9E433CB0CC3714A0098215, cn=TUMBARE SUNIL BABURAO
Date: 2023.05.25 13:20:48 +05'30'

(सु.बा.तुंबारे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई- ३२.
३. मा.उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मुख्य सचिव, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
७. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
८. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू.), मुंबई
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, अनंत काणेकरमार्ग, वांद्रे (पूर्व) मुंबई-५१.
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे.
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
१३. निवड नस्ती/ झोपसु-१.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत सशुल्क पुनर्वसन सदनिकांच्या वितरणाबाबत मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.५४(भाग-१)/झोपसु-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- १४ ऑगस्ट, २०२३.

वाचा :-

१) गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय, क्रमांक-झोपुधो-०८१०/प्र.क्र.९६/२०१८/झोपसु-१, दि.१६ मे, २०१८

२) गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय, क्रमांक- संकीर्ण-२०२२/प्र.क्र.५४(भाग-१)/झोपसु-१, दि.२५.०५.२०२३

प्रस्तावना :-

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत दि.०१.०१.२००० पासून दि.०१.०१.२०११ पर्यंत अस्तित्वात असलेल्या झोपडीच्या संदर्भात अशा झोपडीत प्रत्यक्ष राहणाऱ्या झोपडीधारकांचे सशुल्क पुनर्वसन करण्याचे धोरण शासनाने दि.१६ मे, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्विकारले आहे. तसेच दि.२५.०५.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत सशुल्क पुनर्वसन सदनिकेचे शुल्क निश्चित करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर दि.१६.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील काही तरतुदींमध्ये सुधारणा करण्याची तसेच काही तरतुदींचा नव्याने समावेश करुन मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

१) गृहनिर्माण विभागाच्या दि.१६.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील सशुल्क पुनर्वसनयोग्य झोपडी/झोपडीधारक यांच्या पात्र/अपात्रतेसंदर्भातील सर्व अटी/शर्ती तसेच शासन निर्णयासोबतची परिशिष्टे कायम राहतील.

२) सशुल्क पुनर्वसनयोग्य सदनिकेचे शुल्क सरसकट रु.२.५० लक्ष इतके निश्चित करण्यात आलेले असल्याने त्यासंदर्भात दि.२६.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.७ अन्वये करण्यात आलेली तरतुद वगळण्यात येत आहे. तसेच कालानुरुप सशुल्क सदनिकांच्या शुल्कात सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील.

३) दि.१६/०५/२०१८ च्या शासन निर्णयानुसार सशुल्क पुनर्वसन हे "सर्वांसाठी घरे" या अभियानांतर्गत असल्यामुळे शासन निर्णयाचा उद्देश विचारात घेता, सशुल्क पुनर्वसन हे फक्त निवासी कारणास्तव राहील. वाणिज्यीक/औद्योगीक कारणास्तव झोपडीधारकांना सशुल्क पुनर्वसनाचा लाभ देण्यात येणार नाही.

४) दि.२५.०५.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेले सशुल्क पुनर्वसनयोग्य सदनिकेचे रु.२.५० लक्ष इतके शुल्क अत्यंत माफक असल्याने सदरच्या सदनिकांच्या खरेदी/विक्रीद्वारे हस्तांतरणास महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ई च्या तरतुदी लागू राहतील.

५) दि.१६/०५/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.१२ मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील मोफत पुनर्वसन सदनिका मिळण्यास पात्र ठरलेला झोपडीधारक त्याचा अशा सदनिकेवरील हक्क सोडून देऊन सशुल्क पुनर्वसन सदनिकेच्या योजनेत सहभागी होऊ शकेल, असे नमूद करण्यात आले आहे. सदरची तरतूद वगळण्यात येत असून आता मोफत पुनर्वसन सदनिका मिळण्यास पात्र ठरलेला झोपडीधारक सशुल्क पुनर्वसन योजनेत सहभागी होऊ शकणार नाही.

६) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील सशुल्क पुनर्वसन सदनिकेचे क्षेत्रफळ प्रचलित कायदे/नियमांतील तरतुदींनुसार राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२३०८१४१८१७२१०६०९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

TUMBARE SUNIL BABURAO

Digitally signed by TUMBARE SUNIL BABURAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOUSING DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6db48f86ab804a2f08a49a53d5dddd92f7dca38c78a21ad05da451e33813593c, pseudonym=5F8C97B9A647BD157380B244EF62BE228705D065, serialNumber=4E35B68528305D98FA8F8D62D295D490751E30D94B9E433CB0CC3714A0098215, cn=TUMBARE SUNIL BABURAO
Date: 2023.08.14 18:24:24 +05'30'

(सु.बा.तुंबारे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई- ३२.
३. मा.उप मुख्यमंत्री (जलसंपदा,विधि व न्याय) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ लागू असलेल्या पाटबंधारे प्रकल्पाच्या बाधित परिमंडलातील गावठाणामधून स्थलांतरीत न झालेल्या गावठाणातील प्रकल्पग्रस्तांना नवीन पुनर्वसित गावठाणाऐवजी रोख रक्कम स्वरुपात आर्थिक पॅकेज देण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक- आरपीए-२०२३/प्र.क्र.१५८ /र-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक- ८ फेब्रुवारी, २०२४

वाचा:- १. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९
२. भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३
३. शासन अधिसुचना दि २७.०८.२०१४

<u>प्रस्तावना-</u>

महाराष्ट्र राज्यामध्ये दि.०१.०१.२०१४ पुर्वी पाटबंधारे प्रकल्पाच्या बाधित परिमंडळातील गावठाणासह जमिनी भूमिसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम ४ अन्वये अधिसुचना प्रसिध्द करुन संपादित करण्यात येतात आणि महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ च्या कलम ११ अन्वये बाधित व लाभधारक क्षेत्र अधिसुचना प्रसिध्द करुन अधिसुचित करण्यात येते. त्यामुळे सदर प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ नुसार करणे आवश्यक आहे.

२. तसेच ज्या प्रकल्पांकरिता बाधित क्षेत्रातील जमिनींचे संपादन दि.०१.०१.२०१४ नंतर भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क्र अधिनियम, २०१३ नुसार करण्यात आले आहे, केवळ अशाच प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना सदर अधिनियमाच्या अनुसूची-दोन नुसार पुनर्वसनाचे लाभ व भत्ते आणि कलम १०८ अन्वये ऐच्छिक पुनर्वसनाचे लाभ अनुज्ञेय ठरतात. या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पबाधित कुटुंबांना ऐच्छिक पुनर्वसनाचे लाभ देण्याबाबत शासन अधिसूचना दि.२७.०८.२०१४ अन्वये धोरण विहित करण्यात आले आहे.

३. तथापि, ज्या पाटबंधारे प्रकल्पांना महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ च्या तरतुदी लागू असुन दि.०१.०१.२०१४ पुर्वी या प्रकल्पाकरिता जमिनी भूमिसंपादन अधिनियम, १८९४ नुसार संपादित करण्यात आल्या आहेत, अशा प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांना शासन अधिसूचना दि.२७.०८.२०१४ नुसार ऐच्छिक पुनर्वसनाचे लाभ देय ठरत नाही.

४. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मध्ये पर्यायी शेतजमीनीच्या ऐवजी अथवा पुनर्वसित गावठाणातील भूखंडाऐवजी अथवा पुनर्वसनाऐवजी आर्थिक पॅकेज देण्याबाबत स्वयंस्पष्ट तरतुद नाही. दि.०१.०१.२०१४ पुर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पांतर्गत बाधित गावठाणातील प्रकल्पबाधित कुटूंबांना पुनर्वसित गावठाणाऐवजी आर्थिक पॅकेज द्यावयाचे असल्यास सर्वांसाठी एक रक्कम ठरवावी लागेल. कारण, जो पर्यंत प्रत्यक्षात, बाधित कुटुंबांना अन्य ठिकाणी स्थलांतरीत करत नाही, तो पर्यंत प्रकल्पाचे काम सुरु करता येत नाही. परिणामी प्रकल्पाचे काम पुर्ण करण्यास विलंब होतो आणि

प्रकल्पाच्या खर्चामध्ये या कालावधीत लक्षणीय वाढ होते. त्यामुळे पुनर्वसित गावठाण तयार करण्याऐवजी आर्थिक पॅकेज अदा करण्याबाबत विचार करता येईल.

५. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ नुसार दि.०१.०१.२०१४ पुर्वी ज्या पाटबंधारे प्रकल्पाच्या बाधित परिमंडलातील क्षेत्र अधिसुचित करण्यात आले आहे, अशा बाधित क्षेत्रातील गावठाणातील प्रकल्पबाधित व्यक्ती अन्य ठिकाणी स्थलांतरीत होण्यास तयार नसल्यामुळे किंवा त्यांच्याकरिता पुनर्वसित गावठाण निर्माण करण्यासाठी जमिन उपलब्ध नसल्यास, प्रकल्पाच्या बाधित परिमंडलातील गावठाणामधील प्रकल्पबाधित कुटुंबांचे स्थलांतरण करणे शक्य होत नाही. तसेच प्रकल्पाच्या बाधित क्षेत्रातील गावठाणांचे पुनर्वसन करण्यासाठी जमिन उपलब्ध होत नाही व जमिन उपलब्ध झाल्यास संपादन प्रक्रिया पुर्ण करण्यास पुष्कळ कालावधी लागतो. परिणामी प्रकल्पाचे कामाच्या पुर्णत्वास विलंब होतो व प्रकल्पाच्या खर्चामध्ये लक्षणीय वाढ होते. तसेच बाधित गावठाणातील प्रकल्पबाधित कुटुंबांचे पुनर्वसन धरणाच्या घळभरणी पुर्वी करणे शक्य होत नाही. या सर्व बाबीं विचारात घेऊन बाधित गावठाणातील प्रकल्पबाधित कुटुंबांचे स्थलांतरण करण्याकरिता अशा प्रकल्पग्रस्तांसाठी पुनर्वसित गावठाण तयार करण्याऐवजी देय असणाऱ्या नागरी सुविधांऐवजी तसेच पुनर्वसन व पुन:र्स्थापनाबाबतचे लाभ व अनुषंगिक भत्ते आर्थिक पॅकेज म्हणून अदा करुन त्यांचे पुनर्वसन शिघ्रतेने करणे, प्रकल्पाच्या पूर्णत्वाचा कालावधी कमी करुन व प्रकल्पाच्या किंमतीत होणारी लक्षणीय वाढ रोखून शासनावर पडणारा आर्थिक भार कमी करणे. याद्वारे प्रकल्पाचे लाभव्यय गुणोत्तर अनुकूल राखणे साध्य होईल.

६. प्रकल्पाच्या पूर्णत्वाच्या अनुषंगाने व किंमतीत वाढ न होण्याच्या दृष्टीने ज्या प्रकल्पग्रस्तांना शासन अधिसुचना दि.२७.०८.२०१४ नुसार ऐच्छिक पुनर्वसनाचे लाभ देय ठरत नाही, अशा प्रकल्पग्रस्तांसाठी पुनर्वसित गावठाण तयार करण्याऐवजी देय असणाऱ्या नागरी सुविधांऐवजी तसेच पुनर्वसन व पुन:र्स्थापनाबाबतचे लाभ व अनुषंगिक भत्ते आर्थिक पॅकेज म्हणून देणे संयुक्तिक ठरेल.

७. उक्त नमूद वस्तुस्थिती विचारात घेऊन त्यानुसार सर्वसमावेशक धोरण तयार करणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि.२६.०७.२०२३ रोजी झालेल्या महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीच्या बैठकीमध्ये धोरण प्रस्तावित करण्यात आले होते. तसेच दि १८.१२.२०२३ रोजीच्या महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीच्या बैठकीमध्ये सदर प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

८. यास्तव दि.०१.०१.२०१४ पुर्वीच्या व पुनर्वसन अधिनियम, १९९९ लागू असलेल्या पाटबंधारे प्रकल्पातंर्गत बाधित क्षेत्रातील स्थलांतरित न झालेल्या गावठाणातील प्रकल्पवाधित कुटुंबांना घराच्या बांधकामाचा खर्च, सर्व नागरी सुविधा विकसित करण्यासाठी लागणारा खर्च व स्थलांतरित करतांना देय असलेले भत्ते यापोटी विशेष वाव म्हणुन आर्थिक पॅकेज अनुज्ञेय करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मध्ये पर्यायी जमिनीच्या ऐवजी अथवा पुनर्वसित गावठाणातील भूखंडाऐवजी अथवा पुनर्वसनाऐवजी आर्थिक पॅकेज देण्याबाबत स्वयंस्पष्ट तरतूद नाही. परंतु, प्रकल्पाच्या पूर्णत्वाच्या व किंमतीत वाढ न होण्याच्या दृष्टीने प्रकल्पग्रस्ताच्या इच्छुकतेनुसार प्रकल्पातील बाधित क्षेत्रातील स्थलांतरीत न झालेल्या गावठाणातील प्रकल्पग्रस्तांना भूमि संपादन, पुनर्वसन करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा अधिनियम, २०१३ च्या अनुषंगाने शासन अधिसुचना दि.२७.०८.२०१४ च्या धर्तीवर गावठाण ऐवजी रोख रक्कम स्वरुपात आर्थिक पॅकेज देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. राज्यामध्ये दि.०१.०१.२०१४ पुर्वीच्या व पुनर्वसन अधिनियम, १९९९ लागू असलेल्या पाटबंधारे प्रकल्पातंर्गत बाधित गावठाणातील प्रकल्पबाधित कुटुंबांना घराच्या बांधकामाचा खर्च, सर्व नागरी सुविधा विकसित करण्यासाठी लागणारा खर्च व स्थलांतरित करतांना देय असलेले भत्ते यापोटी खालील प्रमाणे आर्थिक पॅकेज अनुज्ञेय करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रधानमंत्री (ग्रामिण) आवास योजनेतील निकषाप्रमाणे बांधलेल्या घराऐवजी	रु.१,६५,०००/-
निर्वाह भत्ता अ) बाधित स्थलांतरीत कुटुंबाला दरमहा एक वर्षासाठी ब) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना अतिरिक्त	 अ) रु. ३,०००/- ब)रु.५०,०००/-
वाहतुक भत्ता प्रत्येक बाधित स्थलांतरीत कुटूंबाला वाहतूक खर्च	रु.५०,०००/
पशुधन असणाऱ्यांना किंवा छोटया दुकानदारांना दयावयाची आर्थिक मदत गोठा किंवा छोटे दुकान असणाऱ्या कुटुंबाला एकवेळची आर्थिक मदत	रु.२५,०००/-
कारागीर/छोटे व्यापारी यांना एकवेळचे अनुदान	रु. ५०,०००/-
पुनर्स्थापना भत्ता घर बदलल्यानंतर एकवेळचे पुनर्स्थापना भत्ता	रु.५०,०००/-

३. वरीलप्रमाणे दर्शविण्यात आलेली रक्कम तसेच नागरी सुविधांवर अपेक्षित एकूण खर्च (प्रती भूखंड प्रमाणे) व त्या व्यतिरिक्त त्यावर २५% वाढीव रक्कम याप्रमाणे आर्थिक पॅकेज म्हणून देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

ज्या बाधित गावठाणांसाठी नवीन गावठाण विकसित झालेले असेल परंतु प्रकल्पग्रस्त स्थलांतरीत झालेले नाही, अशा प्रकरणी जे प्रकल्पग्रस्त आर्थिक पॅकेज घेतील त्यासाठी तयार करण्यात आलेला भूखंड लिलाव करून त्यामधील उत्पन्न प्रकल्पाच्या संस्थेला (ज्यांनी प्रकल्पासाठी खर्च केला असे) परत करण्यात येईल.

४. पेढी बॅरेज मध्यम प्रकल्प उपसा सिंचन योजना या प्रकल्पांतर्गत बाधित होणाऱ्या मौजा रोहणखेड व मौजा पर्वतापूर ता. जि. अमरावती या गावातील बाधित कुटुंब यांना नागरी सुविधा व पुनर्वसन विषयक इतर लाभ प्रस्तावित केल्याप्रमाणे रोख स्वरुपात पुर्वोदाहरण म्हणुन वापरण्यात येणार नाही, अशा स्वरुपात विशेष बाब आर्थिक पॅकेज म्हणून देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

५. कोथेरी लघुपाटबंधारे योजना, ता. महाड, जि. रायगड या प्रकल्पांतर्गत बाधित होणाऱ्या शिरगांव येथील प्रकल्पबाधित कुटुंब यांना नागरी सुविधा व पुनर्वसन विषयक इतर लाभ प्रस्तावित केल्याप्रमाणे रोख स्वरुपात पुर्वोदाहरण म्हणून वापरण्यात येणार नाही, अशा स्वरुपात विशेष बाब आर्थिक पॅकेज म्हणून देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

६. महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीच्या दि.२६.०७.२०२३ व दि. १८.१२.२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये सदर प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

७. त्याअनुषंगाने या दोन्ही प्रकल्पांना आर्थिक पॅकेजसाठी आवश्यक रकमेची परिगणना करणे, निधी उपलब्ध करणे आणि अंमलबजावणी करणे या बाबी प्रकल्प यंत्रणा जलसंपदा विभाग यांनी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०२४०२०८१६२१२८४०१९ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

SHRINIVAS PUNDLIKRAO KOTWAL

Digitally signed by SHRINIVAS PUNDLIKRAO KOTWAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=d32b061d22e577cf43207f6a86cadc4ce1798644845edd3b3fb5ef54c3051c62, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=30EC04F686F0E87515C68A42BC5DF9353C8AF939EF1A35539184495DA3E943C6, cn=SHRINIVAS PUNDLIKRAO KOTWAL
Date: 2024.02.08 16:30:37 +05'30'

(डॉ. श्रीनिवास कोतवाल)
उप सचिव, महसुल व वन विभाग

प्रति,

१) मा. राज्यपाल महोदयांचे सचिव, मंत्रालय , मुंबई.
२) मा. सभापती, विधान परिषद, महाराष्ट्र राज्य विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
३) मा. अध्यक्ष, विधान सभा, महाराष्ट्र राज्य विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
४) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय , मुंबई.
५) मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय , मुंबई.
६) मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय , मुंबई.
७) सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय , मुंबई.
८) मा. मंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) अ.मु.स. (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
११) महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई.
१२) महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर.
१३) सर्व विभागीय आयुक्त.
१४) सर्व जिल्हाधिकारी.
१५) सर्व जिल्हा पुनर्वसन अधिकारी.
१६) सर्व कार्यासन (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) निवड नस्ती, कार्यासन र-१ , महसूल व वन विभाग, मंत्रालय. मुंबई.

भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ नुसार पाटबंधारे प्रकल्पाव्यतिरीक्त अन्य प्रकल्पाच्या अनुषंगाने प्रशासक नियुक्तीबाबत

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन)

शासन परिपत्रक क्रमांक : आरपीए-२०२४/प्र.क्र. ७१/र-१

मंत्रालय, मुंबई -४०००३२.

दिनांक :- १४.०८.२०२४

वाचा:-

१.महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक-आरपीए-१०१९/सीआर-२३३/र-१, दि.१५.११.१९९१

२. भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३

३. राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समिती बैठक दि.२६.०७.२०२३ चे इतिवृत्त

प्रस्तावना:-

भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ कलम ४३ (१) मध्ये, ज्या भूसंपादनामुळे बाधित व्यक्तींचे अनैच्छिक विस्थापन प्रकरणी राज्य शासनाला प्रशासक नियुक्तीबाबत अधिसूचना निर्गमित करण्याबाबत तरतूद आहे. सदर अधिनियमाच्या कलम १०९ अंतर्गत प्रदान अधिकारानुसार राज्य शासनाने भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४, प्रकरण-४, "पुनर्वसन व पुनर्स्थापना योजना" मध्ये भूसंपादनाची प्रारंभिक अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर करावयाच्या कामाबाबत तरतूद केली आहे.

सद्यस्थितीत राज्यातील पाटबंधारे प्रकल्पाकरीता भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम ४३ (१) अन्वये प्रशासक नियुक्त करण्याबाबत अधिसूचना या विभागाकडून निर्गमित करण्यात येते. परंतु, अन्य प्रशासकीय विभागाच्या अन्य प्रकल्पाकरीता होणा-या भूसंपादनाला सुद्धा सदर तरतूदी लागू होत असतात. त्यामुळे, राज्यातील केंद्र शासनाच्या अथवा राज्य शासनाच्या अन्य प्रकल्पाच्या अनुषंगाने प्रशासक नियुक्तीची कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागाने करण्याबाबतचा शसन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :-

भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम ४३ (१) नुसार ज्या भूसंपादनामुळे बाधित व्यक्तींचे अनैच्छिक विस्थापन (involuntary displacement) प्रकरणी प्रशासक नियुक्ती करणे आवश्यक आहे.

सदर तरतूदी अनुषंगाने पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी:-

०१. राज्यातील पाटबंधारे प्रकल्पाकरीता होणा-या भूसंपादनामुळे बाधित व्यक्तींचे अनैच्छिक विस्थापन (involuntary displacement) होणा-या प्रकरणी, प्रशासक नियुक्तीची अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही महसूल व वन (मदत व पुनर्वसन) विभागाकडून शासन मान्यतेने करण्यात यावी.

०२. पाटबंधारे प्रकल्पाव्यतिरिक्त राज्यातील केंद्र शासनाच्या अथवा राज्य शासनाच्या अन्य प्रकल्पाकरीता होणा-या भूसंपादनामुळे बाधित व्यक्तींचे अनैच्छिक विस्थापन (involuntary displacement) होणा-या प्रकरणी, प्रशासक नियुक्तीची अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही प्रकल्पाशी संबंधित प्रशासकीय विभागामार्फत शासन मान्यतेने करण्यात यावी.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०८१४१५१६०२२०१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KEDARPRATAP
JAYSING PATIL

Digitally signed by KEDARPRATAP JAYSING PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=8a304b555c16c6333932e94031b478a58b30bb35922ff7cfdc101bf31d56ff8d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=384716037 4ED91C72AF7F541ED588SA54E39968A0CDDD47C85355D5B730A40BF, cn=KEDARPRATAP JAYSING PATIL
Date: 2024.08.14 15:31:23 +05'30'

(केदारप्रताप पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई.
२) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
३) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई
४) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अ.मु.स., मंत्रालय, मुंबई.
५) मा. उप मुख्यमंत्री (गृह, जलसंपदा, वि.व न्याय) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई.
९) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
१०) महालेखापाल-१, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), मुंबई.
११) महालेखापाल २, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), नागपूर.
१२) सर्व मंत्रालयीन विभागाचे अ.मु.स/प्र.स./सचिव
१३) सर्व विभागीय आयुक्त.
१४) सर्व जिल्हाधिकारी.
१५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१६) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१७) सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
१८) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१९) निवडनस्ती

प्रकल्पबाधित व्यक्तींना व त्यांनी नामनिर्देशित केलेल्या त्यांच्या कुटुंबांतील व्यक्तींना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र निर्गमित करतांना अनुसरवयाची कार्यपध्दती.....

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन निर्णय क्रमांक- आरपीए-२०२५/प्र.क्र.१५/र-१

मदाम कामा मार्गा हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय,मुंबई ४०० ०३२

दिनांक- २९ जानेवारी , २०२५

वाचा:- १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र एईएमृ१०९०/३५/१६-अ, दि २१ जानेवारी १९८०

२. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम, १९७६

३. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम, १९८६

४. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम, १९९९

५. महसूल व वन विभाग, शासन निर्णय आरपीए-२००६/ प्र.क्र. १(३)/ र-१, दि १७.०४.२००६

६. महसूल व वन विभाग,शासन निर्णय आरपीए-०६०९/ प्र.क्र. २००/ र-१, दि ०३.०५.२०१०

७. महसूल व वन विभाग,शासन निर्णय आरपीए-२०१६/ प्र.क्र. ९२/ र-१, दि ०२.०५.२०१६

प्रस्तावना-

शासनाच्या पुनर्वसनविषयक धोरणानुसार भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये सार्वजनिक हिताच्या प्रकल्पांसाठी भूसंपादनाच्या अनुषंगाने विस्थापित प्रकल्पग्रस्तांसाठी व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुंटुंबातील सदस्यांना शासकीय सेवेत वर्ग -३ व वर्ग-४ संवर्गातील पदांनवर सरळसेवेने नियुक्ती करिता प्रकल्पग्रस्तांनसाठी विहित आरक्षित पदांवर अर्ज करण्यासाठी प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्याची तरतुद करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम,१९७६,१९८६,१९९९ अन्वये अधिसुचित केलेल्या पाटबंधारे प्रकल्पाच्या बाधित क्षेत्रातील ज्या भूधारकांच्या जमिनी संपादित केल्या आहेत अशा प्रकल्पबाधित भूधरकांना व त्यांच्या वर अवलंबुन असलेल्या कुटुंबांतील सदस्यांना नोकरीसाठीचे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र अनुज्ञेय ठरते.

सदर प्रकल्पग्रस्त व्यक्तींना व त्यांच्यावर अवलंबित कुंटुंबातील सदस्याना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र निर्गमित करतांना अनुसरवयाची कार्यपध्दती व निकष याबाबत कालपरत्वये झालेले बदल लक्षात घेऊन सर्वकष कार्यपध्द्ती विहित करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती. त्यानुसार राज्यातील प्रकल्पग्रस्तांना नोकरीसाठीचे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र निर्गमित करतांना खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

शासन निर्णय

भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये सार्वजनिक हिताच्या प्रकल्पांसाठी भूसंपादनाच्या अनुषंगाने मुळ बाधित भूधारक तसेच पुनर्वसन अधिनियम १९७६,१९८६,१९९९ च्या तरतुदी लागु असलेल्या पाटबंधारे प्रकल्पातील बुडीत क्षेत्रातील मुळ बाधित भूधारकांच्या कुटुंबातील नामनिर्देशित सदस्यास नोकरीसाठीचे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र निर्गमित करतांना त्याची पात्रता, अनुज्ञेयता याबाबत तपासणी करतांना पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरण्यात यावी :-

१. भूमिसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम ४ अन्वये अधिसूचना प्रसिध्द होऊन भूसंपादन निवाडा दिनांकाच्या वेळी अथवा मोबदला स्वीकारलेल्या दिनांकास मुळ प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यावर अवलंबून व्यक्तीना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र अनुज्ञेय राहिल.

२. सन १९७६ पुर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पाच्या बुडित क्षेत्रामधील ज्या भोगवटादाराची जमीन संपादित करण्यात आली आहे अशा बाधित भोगवटादाराच्या कुटुंबांतील नामनिर्देशित व्यक्तींना (पत्नी, मुलगा,

अविवाहित मुलगी,अज्ञान भाऊ/बहिण आई व वडिल, भावाची मुले, बहिणीची मुले) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि २१ जानेवारी, १९८० नुसार प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्यात यावे.

३. शासन निर्णय दि. २१/०१/१९८० नूसार वीज प्रकल्पाच्या तसेच पाटबंधारे प्रकल्पाच्या बाधित परीमंडळातील भूधारकाची जमीन संपादीत करण्यासाठी भूसंपादन अधिनियम १८९४ च्या कलम ४ अन्वये राजपत्रामध्ये ज्या तारखेस अधिसूचना प्रसिध्द करण्यात येते त्या तारखेस किंवा संपादित जमिनीचा निवाडा ज्या तारखेस घोषित करण्यात आला आहे त्या तारखेस, अशा भूधारकाच्या कुटूंबामध्ये हयात असलेले व त्याच्यावर अवलंबून असलेले पती, पत्नी, अविवाहित बहिण, भाऊ, भावांची मुले, बहिणीची मुले यांना प्रकल्पाबाधित कुटूंबातील सदस्य या नात्यानी प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र अनुज्ञेय आहे.

४. त्यानुसार मुळ प्रकल्पग्रस्त व्यक्तीचा व्यक्तीचा पती अथवा अशा व्यक्तीची पत्नी, अशा व्यक्तीचे अज्ञान मुलगे, अशा व्यक्तींच्या अविवाहित मुली, अशा व्यक्तींचे अज्ञान भाऊ किंवा बहिणी, तसेच अशा व्यक्तीचे आई व वडील यांना नोकरीसाठीचे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे. मुळ प्रकल्पग्रस्त व त्याच्यावर अवलंबुन असलेलेल व त्यासोबत राहाणा-या कुटुंबातील त्याच्या सदस्यांना जर निवाडा पारित झाल्यावरही प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र निर्गमित केले नसेल तर अशा मुळ प्रकल्पग्रस्ताने नोकरीसाठीचे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची मागणी केल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि २१ जानेवारी, १९८० नुसार अशा मुळ प्रकल्पग्रस्ताच्या नावे अथवा जमिन संपादित होते वेळी त्याच्यावर अवलंबून असलेल्या त्याच्या कुटुंबातील ज्या सदस्यास त्याने नामनिर्देशित केले आहे, अशा सदस्यांच्या नावे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे. तसेच मुळ प्रकल्पग्रस्त हयात नसल्यास संपादनावेळी त्यावर अवलंबुन असलेले व त्यासोबत राहाणा-या त्याच्या कुटुंबातील एका सदस्याच्या नावे नोकरीसाठीचे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र शासन निर्णय दि २१, जानेवारी १९८० नुसार निर्गमित करण्यात यावे.

५. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ दि.०१/०४/२००२ रोजी अंमलात आल्यानंतर सदर अधिनियमाच्या कलम ११ व १३ नुसार जे प्रकल्प अधिसूचित करण्यात आले आहेत, अशा प्रकल्पाच्या बाधित क्षेत्रातील भूधारकाची जमीन संपादीत करण्यात आली असल्यास, अशा प्रकल्प बाधित व्यक्तीच्या कुटूंबातील व त्याच्यावर अवलंबून असलेल्या सदस्यांना पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम २ (२)(अ),२(२) (क) (एक) (दोन) (तीन), ६ (क) व ५(क) मधील तरतुदीमध्ये विहीत केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या अधिन राहून प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

६. शासन निर्णय दि २ मे २०१६ नुसार प्रकल्पग्रस्त प्रमाण्पत्र हस्तांतरित करतांना मुळ भूधारक हयात असणे आवश्यक नसुन प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रधारक व्यक्तीस त्याच्या इच्छेनुसार त्याच्या कुटुंबातील कोणत्याही एका व्यक्तीच्या नावे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र हस्तांतरित करण्याची त्यास मुभा असेल. तसेच मुळ भूधारक किंवा प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रधारक व्यक्ती हयात नसेल तर त्याच्या वारस प्रमाणपत्राच्या आधारे अवलंबित सर्व वारसांचे नाहरकत घेऊन एका नामनिर्देशित वारसाच्या नावे (वर्ग-१ संवर्गातील वारस/Class I Legal Heir) शासन निर्णय दि २ मे २०१६ नुसार प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र हस्तांतरित करण्यात यावे.

७. शासन निर्णय दि १७.०४.२००६ व शासन निर्णय दि ३.५.२०१० अन्वये नोकरीसाठीचे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्याबाबत विहित केलेले निकष महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ च्या कलम २ (२)(अ),२(२) (क) (एक) (दोन) (तीन) मध्ये नमूद तरतुदींशी सुसंगत नसुन अधिनियमाच्या कलम ५(क) अन्वये प्रकल्पबाधित व्यक्तीने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीस प्रमाणपत्र देतांना कलम २ (२)(अ), २ (२) (क) (एक) (दोन) (तीन) मधील निकष विचारात घेणे बंधनकारक आहे. यास्तव शंभर टक्के जमिन भूसंपादन अथवा किमान भूसंपादनाची मर्यादा लागू ठरत नाही.

८. शासन निर्णय दि ३.५.२०१० अधिक्रमित करण्यात येत आहेत.

९. शासन निर्णय दि १७.०४.२००६ मधील परिच्छेद ४ वगळण्यात येत आहे.

१०. भूसंपादन अधिनियम १८९४ व्यतिरिक्त खाजगी वाटाघाटीने खेरदी केलेल्या जमिनीकरिता प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र अनुज्ञेय नाही.

११. ज्या प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनाच्या ऐवजी एकमुस्त मोबदला देण्यात आला असेल त्यांना देखील प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र अनुज्ञेय राहणार नाही.

वरील कार्यपध्दतीचा अवलंब करुन प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०१२९१८१७३०७६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

SANJAY SHANKARRAO INGLE

Digitally signed by SANJAY SHANKARRAO INGLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=f0d616600e4d2f510d1c8cc19813e070ad282d2275bf6fc132a2dee97f14e0a6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D337930B14433DC62C0154AF2BBC60BB5A6EDCAA66B7F34596C50A27EB0F6333, cn=SANJAY SHANKARRAO INGLE
Date: 2025.01.29 18:21:05 +05'30'

(संजय इंगळे)

सह सचिव, महसुल व वन विभाग

प्रति,

१) मा.राज्यपाल महोदयांचे सचिव,
२) मा. सभापती, विधान परिषद,महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
३) मा. अध्यक्ष, विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
४) मा.मुख्यमंत्री यांचे अ.मु.स. , मंत्रालय , मुंबई.
५) मा. उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. उप मुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा.मंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) मा. राज्य मंत्री मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९) अ.मु.स. (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
१०) अ.मु.स. (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
११) महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
११) महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर,
१२) सर्व विभागीय आयुक्त,
१३) सव जिल्हाधिकारी,
१४) सर्व जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
१५) सर्व कार्यासन (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६) निवड नस्ती, कार्यासन र-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय. मुंबई.

प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र दाखला हस्तांतरित न करण्याबाबतची कालमर्यादेची शिथील बाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन निर्णय क्रमांक- आरपीए-२०१६/प्र.क्र.९२/र-१

मदाम कामा मार्गा हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय,मुंबई ४०० ०३२

दिनांक- २५ .०२.२०२५

वाचा:- १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र एईएमृ१०९०/३५/१६-अ, दि. २१ जानेवारी १९८०

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ, दि.२७.१०.२००९

३. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम, १९८६

४. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम, १९९९

५. शासन निर्णय आरपीए-२०१६/ प्र.क्र. ९२/ र-१, दि ०२.०५.२०१६

प्रस्तावना-

राज्यातील पाटबंधारे व वीज प्रकल्प तसेच पुनर्वसन अधिनियम १९९९ अन्वये अधिसूचित झालेल्या प्रकल्पांकरिता भूमीसंपादन अधिनियम १८९४ प्रकल्पाच्या बाधित क्षेत्रातील जमीन संपादित केल्यामुळे ज्या भूधारकांचे अनऐच्छिक विस्थापन झाले आहे व त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन हिरवल्या गेले आहे, अशा सर्व पात्र प्रकल्पग्रस्त व्यक्तींना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २१ जानेवारी १९८० तसेच पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम ५(क) अन्वये प्रकल्पबाधित व्यक्तीने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीस प्रमाणपत्र देतांना कलम २ (२)(अ), २ (२) (क) (एक) (दोन) (तीन) मधील निकष विचारात घेऊन नोकरीसाठीचे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्यात येते. प्रकल्पबाधीत कुटुंबातील एका व्यक्तीस गट क व गट ड संवर्गातील पदाच्या पदभरतीमध्ये आरक्षण असुन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक २७.१०.२००९ अन्वये स्पर्धा परीक्षा देवुन नियुक्ती करण्यात येते. प्रकल्पग्रस्त प्रवर्गाकरिता राखीव असलेल्या पदांवर प्रकल्पबाधीत उमेदवारांकरीता ५ टक्के आरक्षणाची तरतुद आहे. सदर पदांवर नियुक्ती करण्यासाठी शैक्षणिक अर्हता विहीत केली असुन प्रकल्पबाधित उमेदवाराने वयोमर्यादेची अट उलटुन गेल्यास त्याला नोकरीसाठी अर्ज करता येत नाही. तसेच प्रकल्पबाधीत व्यक्तीकडे शैक्षणिक अर्हता नसल्यास किंवा पदभरतीच्या जहिरातीमध्ये प्रकल्पग्रस्त प्रवर्गाकरिता अल्प प्रमाणात जागा उपलब्ध असल्यास त्यांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राच्या आधारे आरक्षणाचा लाभ घेऊन प्रकल्पग्रस्त प्रवर्गातून शासकीय नोकरी मिळवणे शक्य होत नाही. त्याचप्रमाणे प्रकल्पग्रस्ताचा मृत्यु झाल्यास त्यांच्या वारसांना प्रकल्पग्रस्त दाखला बदलुन मिळण्यासाठी अडचणी येतात, या सर्व बाबींचा विचार करुन दाखल्याचे हस्तांतरण करतांना प्रकल्पग्रस्त दाखला निर्गमित झाल्याच्या दिनांकापसून प्रकल्पग्रस्त दाखला ६ महिन्यांच्या आत बदलता येणार नाही, अशी अट शासन निर्णय दिनांक २.५.२०१६ नुसार विहित केल्यामुळे मुळ प्रकल्पग्रस्त दाखलाधारकास त्याच्या कुटुंबातील एका व्यक्तीस

दाखल्याचे हस्तांतरण करण्यास नाहक विलंब होऊन त्याला प्रकल्पग्रस्त प्रवर्गातून शासकीय सेवेत नियुक्ती मिळवणे शक्य होत नाही व परिणामी संबंधीत प्रकल्पग्रस्त कुटुंबाचे पुनर्वसन ख-या अर्थाने पुर्ण होत नाही. यास्तव प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र धारकास त्यांचे पात्र एका नामनिर्देशित वारसास हस्तांतरण करण्याची कालमर्यदा शिथिल करण्याची बाब विचाराधीन होती. उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता शासन या आदेशान्वये पुढीलप्रमाणे निर्देश देत आहे.

शासन निर्णय

प्रकल्पग्रस्त व्यक्तीस प्रदान केलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र हस्तांतरण करणे बाबत शासन निर्णय दिनांक २.०५.२०१६ च्या परिच्छेद-१ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे-

पात्र प्रकल्पग्रस्त व्यक्तीस प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र दिल्यानंतर प्रथम नामनिर्देशित वारसदारास हस्तांतरणास कालमर्यदा राहणार नाही; तथापि तदनंतर मात्र नामनिर्देशित विहीत वारसदारास हस्तांतरण करावयाचे झाल्यास सहा महिन्याची मर्यादा लागू राहील. सदर प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र हस्तांतरण पात्र एकाच नामनिर्देशित व्यक्तीस देण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०२५०२२७११२६२४५५१९ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

SANJAY SHANKARRAO INGLE

Digitally signed by SANJAY SHANKARRAO INGLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=f0d616600e4d2f510d1c8cc19813e070ad282d2275bf6fc132a2dee97f14e0a6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D337930B14433DC62C0154AF2BBC60BB5A6EDCAA66B7F34596C50A27EB0F6333, cn=SANJAY SHANKARRAO INGLE
Date: 2025.02.27 11:28:00 +05'30'

(संजय इंगळे)

सहसचिव, महसूल व वन विभाग

प्रति,

१) मा.राज्यपाल महोदयांचे सचिव,
२) मा. सभापती, विधान परिषद,महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
३) मा. अध्यक्ष, विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
४) मा.मुख्यमंत्री यांचे अ.मु.स. , मंत्रालय , मुंबई.
५) मा. उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. उप मुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा.मंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
९) सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१०) महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
११) महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर,
१२) सर्व विभागीय आयुक्त,
१३) सव जिल्हाधिकारी,
१४) सर्व जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
१५) सर्व कार्यासन (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६) निवड नस्ती, कार्यासन र-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय. मुंबई.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय,बुलढाणा

विषय क्र.८

भूसंपादन विषयक धोरणात्मक शासन निर्णय

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या भूसंपादन प्रकरणी सादर करावयाचा प्रस्तावासंदर्भात घ्यावयाची खबरदारी.

महाराष्ट्र शासन,

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक : आयडीसी २०२०/(प्र.क्र.३३०)/उद्योग-१४,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : ३ फेब्रुवारी, २०२१

प्रस्तावना :

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूसंपादन प्रकरणी म. औ. वि. अधिनियम १९६१ अन्वये भूसंपादनाचे प्रकरण ६, ३२ (१), विनाअधिसूचित करण्याचा प्रस्ताव, दुरुस्तीपत्रक, एकात्मिक औद्योगिक क्षेत्र, एकात्मिक लॉजिस्टिक पार्क इ. प्रस्ताव सादर करताना सोबत आवश्यक प्रपत्रे जोडण्यात येत नाहीत. परिणामी सदर प्रस्ताव छाननी करुन शासन मान्यतेस्तव सादर करण्यास विलंब होतो. सदर कालापव्यवय टाळण्याकरीता व कामकाज सुलभ होण्यासाठी महामंडळाच्या प्रस्तावासोबत आवश्यक सर्व कागदपत्रे सोबत जोडून प्रस्ताव सादर करण्याचे व कार्य सुलभतेच्या अनुषंगाने सुचनांचे शासन परिपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

शासन परिपत्रक :-

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूसंपादन प्रकरणी म. औ. वि. अधिनियम १९६१ नुसार भूसंपादनाचे प्रकरण ६, ३२ (१), विनाअधिसूचित करण्याचा प्रस्ताव, दुरुस्तीपत्रक, एकात्मिक औद्योगिक क्षेत्र, एकात्मिक लॉजिस्टिक पार्क इ. प्रस्ताव सादर करताना खालील कागदपत्रे सोबत जोडून प्रस्ताव सादर करण्याची खबरदारी महामंडळाने घ्यावी. तसेच विविध प्रयोजनार्थ प्रस्ताव सादर करताना पुढील सूचनांचे पालन करण्यात यावे.

प्रकरण ६ चा प्रस्ताव :-

स्थळपाहणी अहवाल, उच्चाधिकार समितीच्या बैठकीचे इतिवृत्त, उच्चाधिकार समितीच्या निर्देशानुसार संबंधीत विभाग / खाते यांचे नाहरकत प्रमाणपत्र, मुलभूत सुविधा (वीज, पाणी, दळणवळण), लाभक्षेत्र, वन जमीनी, आदिवासी जमीनी, प्रस्तावित जमीनीचे स्वरुप, विकास झोन, संवेदनशील क्षेत्राचा समावेशबाबत आवश्यक माहिती, खातेदार, (अल्प, भूमीहीन, मागासवर्गीय), नुकसान भरपाईकरीता शिघ्रसिध्द गणकांची महसूल विभागाकडून माहिती व कागदपत्रे, त्या ठिकाणी / जिल्ह्यात असलेली औद्योगिक क्षेत्राची माहिती व भूखंड वाटपाची सद्य:स्थिती, इत्यादी बुलेट पॉईंट माहिती, नकाशा, अधिसूचनेचे जबाबदार अधिकारी महाव्यवस्थापक (भूसंपादन) यांनी स्वाक्षरीत (साक्षांकित) इंग्रजी व मराठी अद्यावत प्रारुप मसुदा.

विनाअधिसूचनेचा प्रस्ताव :-

क्षेत्र अधिसूचित झाल्यापासून विनाअधिसूचनेचा प्रस्ताव सादर केल्यापर्यंतची भूसंपादनाची सर्वकष केलेली माहिती, विनाअधिसूचित करण्याची कारणमिमांसा, स्थळपाहणी अहवाल, उच्चाधिकार समितीची मान्यतेचे इतिवृत्त, त्या क्षेत्राची प्रकरण ६ ची अधिसूचना, ३२(२) व ३२(१) झालेले असल्यास त्याची प्रत, क्षेत्र ज्या कलमान्वये विनाअधिसूचित करण्याचे प्रस्तावित आहे. उदा. १ (३), ३२(४) व ३९(२ब) त्या कलमानुसार अधिसूचनेचा सांक्षाकित इंग्रजी व मराठी मसुदा.

कलम ३२(१) चा प्रस्ताव :-

अधिसूचित क्षेत्राचा तपशिलवार माहिती, प्रकरण ६ ची अधिसूचना, संयुक्त मोजणी अहवाल, प्रादेशिक अधिकारी व भूसंपादन अधिकारी यांचा संयुक्त हरकती साक्षांकित अहवाल, (प्रत्येक पृष्ठावर स्वाक्षरी असावी), कलम ३२(२) ची अधिसूचना प्रसिध्द केल्याची प्रत, वर्तमान पत्रात प्रसिध्द केल्याची प्रत, कलम ३२(१) करावयाचा क्षेत्राची गट नंबर, सर्व्हे नंबरसह तपशिल साक्षांकित यादी, सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी अथवा सक्षम प्राधिकारी यांच्या सहमतीने सादर केलेला असावा. महामंडळाचे स्वंयस्पष्ट अभिप्राय, मुळ अधिसूचित क्षेत्राचा प्रस्तावित क्षेत्राचा ताळमेळ तपशिल सादर करावा.

दुरुस्ती पत्रक / सुधारणापत्रक प्रस्ताव :-

क्षेत्र अधिसूचित झाल्यापासून प्रस्ताव सादर केल्यापर्यंतची भूसंपादनाची केलेली सविस्तर माहिती, सुधारणा अथवा दुरुस्ती करण्याची कारणमिमांसा, संयुक्त मोजणी अहवाल, प्रकरण ६ ची अधिसूचनाची प्रत, ३२(२) व ३२(१) झालेले असल्यास त्याची प्रत, अलिकडच्या काळात विधी व न्याय विभागाने तपासून दिलेल्या प्रारुपातील प्रसिध्द केलेली सुधारणापत्रक मसुद्याच्या प्रारुप अधिसूचनेच्या साक्षांकित इंग्रजी व मराठी मसुदा.

एकात्मिक औद्योगिक क्षेत्र :-

शासन निर्णयामधील एकूण १६ बाबीसंर्दभात नाहरकत तसेच माहिती, पायाभूत सुविधा (वीज, पाणी, दळणवळण), जमीनी विकास झोन दाखला, आदिवासी जमीनी, लाभक्षेत्र, वन जमीनी, संवेदनशील क्षेत्र, सीआरझेड, रिवर पॉलीसीमधील क्षेत्र, इत्यादी सविस्तर माहिती नमूद करावी. अधिसूचित करावयाच्या क्षेत्राचा महसूल अभिलेख (७/१२), कन्व्हर्शन शुल्क भरणा केल्याची माहीती व पावती, प्रकल्प अहवाल, नकाशा, पोहोच रस्ताबाबत रुंदी व जोडणी बाबत ना हरकत. महामार्गाला जोडणी करीता सार्वजनिक बांधकाम विभागाचे अथवा राष्ट्रीय महामार्ग विभागाचे नाहरकत, विकासकाचे हमीपत्र व प्रतिज्ञापत्र, अधिसूचित करावयाचे एकाच क्षेत्रामध्ये अनेक वापर (औद्योगिक, व्यापारी व निवासी) करावयाचे असल्यास त्याबाबत प्रारुप बहुत आराखडा, वीज उत्पादक करणार किंवा कसे स्पष्ट उल्लेख.

एकात्मिक लॉजिस्टिक पार्क :-

शासन निर्णयामधील एकूण १६ बाबीसंर्दभात नाहरकत तसेच माहिती, पायाभूत सुविधा (वीज, पाणी, दळणवळण), जमीनी विकास झोन दाखला, आदिवासी जमीनी, लाभक्षेत्र, वन जमीनी, संवेदनशील क्षेत्र, सीआरझेड, रिवर पॉलीसीमधील क्षेत्र, इत्यादी सविस्तर माहिती नमूद करावी. अधिसूचित करावयाच्या क्षेत्राचा महसूल अभिलेख (७/१२), कन्व्हर्शन शुल्क भरणा केल्याची माहीती व पावती, प्रकल्प अहवाल, नकाशा, पोहोच रस्ताबाबत रुंदी व जोडणी बाबत ना हरकत, हमीपत्र व प्रतिज्ञापत्र, अधिसूचित करावयाचे क्षेत्राचा प्रारुप बहुत आराखडा, वीज उत्पादक करणार किंवा कसे स्पष्ट उल्लेख.

उच्चाधिकार समिती समोर प्रस्ताव सादर करावयाच्या प्रस्तावातील सुधारणा :-

आयआयए / आयएलपी व आयआयटीटी चे प्रस्ताव प्रधान सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीसमोर सादर करावयाच्या प्रस्तावासंदर्भात अद्ययावत शासन निर्णयातील आवश्यक बाबींचा व सदर आवश्यक बाबीचा तक्त्यामध्ये तपशिलही बनवून सादर करावा. महामंडळाच्या प्रस्तावात बऱ्याच वेळी कागदपत्रांअभावी HPC समोर परिपुर्ण प्रस्ताव येत नाही, अशा वेळी कागदपत्रांच्या अधीन राहून HPC ची मान्यता अपेक्षित केली जाते. पर्यायाने पुढील टप्प्यात या कागदपत्रांची पूर्तता केली आहे किंवा कसे याबाबत MIDC कडून प्रमाणित देखील केले जात नाही. सबब परिपूर्ण प्रस्ताव HPC समोर सादर करावेत.

<u>अधिसूचनेचे प्रारुप :-</u>

महामंडळाकडून भूसंपादन प्रकरणी अधिसूचनेचा मसुदा सादर करताना मोठ्या अधिसूचना हा जबाबदार अधिकारी यांनी प्रमाणित केल्या जात नसल्याने परिणामी अशा प्रसिध्द करण्यात येत असलेल्या गट नंबर / हिस्सा नंबर अथवा क्षेत्र, तपशिल यांच्यामध्ये तफावत येऊन वारंवार दुरुस्तीपत्रक / सुधारणापत्रक प्रसिध्द करण्यात वेळ येत असल्याने शासनास जाणीव झाली आहे. या करीता सर्व भूसंपादन प्रकरणी शासनास अधिसूचनेचा मसुदा सादर करताना पुढील प्रमाणे जबाबदारी घ्यावी.

१. प्रकरण ६, विनाअधिसूचित करावयाची अधिसूचना, दुरुस्ती/सुधारणा पत्रक , आयआयए, आयएलपी, अधिसूचनेचा मसुदा शासनाने नुकताच प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रारुपा समान असावा, जुन्या प्रारुपामध्ये मसुदा बनविण्यात येऊ नये.

२. प्रकरण ६, आयआयए, आयएलपी, व विनाअधिसूचित करावयाचा क्षेत्राचा अधिसूचनेमध्ये गटांचा अनुक्रमांक रकाना एकाच पृष्ठावर एकाखाली एकच असावा. दोन टेबल रकाना असता कामा नये.

३. सदर क्षेत्राचा हिस्सा नंबर महसूली अभिलेखाशी (७/१२) व भूसंपादन अधिकारी यांच्या कडून तपासून नोंद करण्यात यावी.

४. अधिसूचनेच्या प्रत्येक पृष्ठावर महामंडळाच्या प्रथम श्रेणीतील जबाबदार अधिकारी यांनी सांक्षाकित करुन प्रमाणित केलेल्या असाव्यात.

५. विनाअधिसूचनेच्या मसुद्याच्या ज्या अधिसूचनेमध्ये जुन्या प्रकरण ६ अथवा ३२ (१) च्या अधिसूचनेची नोंद असेल अशा अधिसूचना सोबत पाठविण्यात याव्यात.

६. अधिसूचनेमधील एकूण क्षेत्राची बेरीज तपासून खाली नोंद करण्यात यावी.

७. इंग्रजी व मराठी अधिसूचना यामध्ये हिस्सा नंबरमध्ये तफावत वा टंकलेखनात चूका असता कामा नये.

८. प्रकरण ६ च्या अधिसूचनेमध्ये प्राधिकृत भूसंपादन अधिकारी यांना महसूल विभागाकडून खातरजमा करुन प्राधिकृत करावे.

२. वरील प्रमाणे म. औ. वि. अधिनियम १९६१ च्या महामंडळाच्या भूसंपादन प्रकरणी अतिरिक्त नव्याने प्रकरण ६, दुरुस्तीपत्रक, ३२(१), अथवा विनाअधिसूचित क्षेत्राचा प्रस्ताव सादर करताना प्रस्तावात मुळ अधिसूचित क्षेत्रास सादर केलेल्या प्रस्तावानुसार होणारा बदल तक्तामध्ये सादर करणे आवश्यक राहील.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२१०२०९११४५२५७७१० असा आहे. तसेच सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay Shamkant Degaonkar

Digitally signed by Sanjay Shamkant Degaonkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=INDUSTRY, ENERGY AND LABOUR DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=de0a2ca7914a3c02f24aaa23655f609f41f2d36b0ec57da4c71f19aaf08230a79, serialNumber=56cf8c8577584adc42f070185c585c41084cc34f668553d21ccacbfa33d4d1f, cn=Sanjay Shamkant Degaonkar
Date: 2021.02.09 11:52:06 +05'30'

(संजय देगांवकर)

शासनाचे सह सचिव

प्रति,

१) मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा.राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. प्रधान सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.

राष्ट्रीय/ राज्य महामार्ग प्रकल्पाच्या भूसंपादन प्रकरणी मोबदल्याच्या रकमेची परिगणना करताना अवलंबावयाच्या कार्यपद्धतीबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्र. एलक्युएन १२/२०१३/प्र.क्र.१९० (भाग-१५)/अ-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक:- ०६ ऑक्टोबर, २०२१.

वाचा :-१) शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. एलक्युएन १२/२०१३/प्र.क्र.१९० (भाग-१५) / अ-२, दि.२६.५.२०१५, दि.७.१०.२०१५, दि.२४.४.२०१७, दि.२९.८.२०१७ आणि दि.२४.११.२०१७

२) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-०३/२०१८/प्र.क्र.४३/अ-२, दि.१३ ऑगस्ट, २०१८

३) शासन शुद्धीपत्रक क्र.संकीर्ण-०३/२०१८/प्र.क्र.४३/अ-२, दि.१० सप्टेंबर, २०१८

प्रस्तावना :

शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.एलक्युएन १२/२०१३/प्र.क्र.१९०(भाग-१५)/अ-२, दि.०५.१०.२०२१ निर्गमित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने राष्ट्रीय/ राज्य महामार्ग प्रकल्पाच्या भूसंपादन प्रकरणी मोबदल्याच्या रकमेची परिगणना करताना अवलंबावयाच्या कार्यपद्धतीबाबत निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार सर्वंकष विचारविनिमय करुन शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :

राष्ट्रीय/ राज्य महामार्ग प्रकल्पाच्या भूसंपादन प्रकरणी मोबदल्याच्या रकमेची परिगणना करताना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत-

१.१ शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. एलक्युएन १२/२०१३/प्र.क्र. १९० (भाग-१५) /अ-२, दि.०५.१०.२०२१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, राष्ट्रीय/ राज्य महामार्ग प्रकल्पाच्या भूसंपादन प्रकरणी मोबदल्याच्या रकमेची परिगणना करताना गुणक घटक १.०० राहील.

१.२ महामार्ग प्रकल्पाकरीता भूसंपादन करताना एकसमान निकष लागू करण्याच्या दृष्टीने, महामार्ग सन्मुख जमिनीचे मूल्यांकन करताना नोंदणी महानिरीक्षक यांचेकडून दर वर्षी जाहीर होणाऱ्या मार्गदर्शक सूचना क्र. २९ (ब) मधील तक्त्यात अ.क्र. २ येथे नमूद केलेल्या टप्पा पद्धतीच्या धर्तीवर जमिनीच्या निर्धारीत बाजार दर मूल्यांकनात २०% कपात करण्यात येईल.

१.३ महामार्ग सन्मुख असलेले जमिनीचे मूल्यांकन करताना उक्त नमूद १.१ व.१.२ मधील प्रस्ताव विचारात घेतल्याने ग्रामीण व क वर्ग नगरपालिका क्षेत्र आणि नगरपंचायत क्षेत्रात मिळणाऱ्या

मोबदल्यामध्ये तफावत राहणार नाही. त्यामुळे शासन निर्णय दिनांक १६.३.२०२० चा हेतू साध्य होत असल्याने तो रद्द करण्यात येत आहे.

१.४ उपरोक्त नमूद मुद्दा क्र. **१.१** व **१.२** मध्ये नमूद सुधारणा संदर्भात शासन अधिसूचना दिनांक ०५.१०.२०२१ प्रकाशित झाल्याच्या दिनांकानंतर राष्ट्रीय/ राज्य महामार्ग प्रकल्पाच्या ज्या भूसंपादन प्रकरणी ३ (A) ची अधिसूचना प्रकाशित होईल अशा प्रकल्पांना लागू करणे संयुक्तिक ठरेल. तथापि, प्रगतीपथावरील राष्ट्रीय/ राज्य महामार्ग प्रकल्पाच्या भूसंपादन प्रकरणी सदर अधिसूचना दि.०५.१०.२०२१ लागू होणार नाही. शासन अधिसूचना दिनांक ०५.१०.२०२१ निर्गमित झाल्यानंतर ज्या राष्ट्रीय/ राज्य महामार्ग प्रकल्पांमध्ये पूर्वी भूसंपादनासाठी संपूर्ण प्रकल्पासाठी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ च्या कलम ३ (A) व महाराष्ट्र महामार्ग अधिनियम,१९५५ मधील कलम १५ ची अधिसूचना निर्गमित केली होती व ती व्यपगत झाली असल्यास असे प्रकरण नवीन प्रकल्प म्हणून विषयांकित प्रकरणी पात्र ठरतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२११००६१७३०४६२२१९ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SANJAY SHANKARRAO INGLE
Date: 2021.10.06 17:33:43 +05'30'

(संजय इंगळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१) मा.मंत्री (महसूल) / मा.राज्यमंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
३) विभागीय आयुक्त, सर्व
४) जिल्हाधिकारी, सर्व
५) आयुक्त, महानगरपालिका सर्व
६) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
७) व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र
८) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
९) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

राष्ट्रीय/ राज्य महामार्ग सन्मुख जमिनीच्या भूसंपादन प्रकरणी मोबदल्याच्या रकमेची परिगणना करताना अवलंबावयाच्या कार्यपद्धतीबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्र. एलक्युएन १२/२०१३/प्र.क्र.१९० (भाग-१५)/अ-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक:- १४.०१.२०२२

वाचा :१) शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.एलक्युएन १२/२०१३/प्र.क्र.१९०(भाग-१५)/ अ-२, दि.२६.५.२०१५, दि.७.१०.२०१५, दि.२४.४.२०१७, दि.२९.८.२०१७, दि.२४.११.२०१७ आणि दि.५.१०.२०२१

२) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-०३/२०१८/प्र.क्र.४३/अ-२, दि.१३ ऑगस्ट, २०१८

३) शासन शुद्धीपत्रक क्र.संकीर्ण-०३/२०१८/प्र.क्र.४३/अ-२, दि.१० सप्टेंबर, २०१८

४) शासन निर्णय क्र.एलक्युएन १२/२०१३/प्र.क्र.१९० (भाग-१५)/अ-२, दि.०६ ऑक्टोबर,२०२१

प्रस्तावना :

उपरोक्त संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णय दि.६.१०.२०२१ मध्ये काही अंशत: बदल करुन प्रस्तुत शासन निर्णय सुधारीतरित्या पुनश्च: निर्गमित करण्यात येत आहे.

शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.एलक्युएन १२/२०१३/प्र.क्र.१९०(भाग-१५)/अ-२, दि.०५.१०.२०२१ निर्गमित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने राष्ट्रीय/ राज्य महामार्ग सन्मुख जमिनीच्या भूसंपादन प्रकरणी मोबदल्याच्या रकमेची परिगणना करताना अवलंबावयाच्या कार्यपद्धतीबाबत निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार सर्वंकष विचारविनिमय करुन शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :

राष्ट्रीय/ राज्य महामार्ग सन्मुख जमिनीच्या भूसंपादन प्रकरणी मोबदल्याच्या रकमेची परिगणना करताना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत-

१.१ शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. एलक्युएन १२/२०१३/प्र.क्र. १९० (भाग-१५) /अ-२, दि.०५.१०.२०२१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, राष्ट्रीय/ राज्य महामार्ग सन्मुख जमिनीच्या भूसंपादन प्रकरणी तसेच विकास नियोजन क्षेत्रातील आणि प्रादेशिक नियोजन क्षेत्रातील ज्या जमिनीचा नोंदणी महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य यांनी प्रसिद्ध केलेल्या दरांच्या वार्षिक विवरणपत्रांमध्ये बिगर कृषीदर विहित केला आहे अशी जमीन संपादन प्रकरणी मोबदल्याच्या रकमेची परिगणना करताना गुणक घटक १.०० राहील.

१.२ प्रकल्पाकरीता भूसंपादन करताना एकसमान निकष लागू करण्याच्या दृष्टीने, महामार्ग सन्मुख जमिनीचे मूल्यांकन करताना नोंदणी महानिरीक्षक यांचेकडून दर वर्षी जाहीर होणाऱ्या मार्गदर्शक सूचना क्र. २९ (ब) मधील तक्त्यात अ.क्र. २ येथे नमूद केलेल्या टप्पा पद्धतीच्या धर्तीवर जमिनीच्या निर्धारीत बाजार दर मूल्यांकनात २०% कपात करण्यात येईल.

१.३ महामार्ग सन्मुख असलेले जमिनीचे मूल्यांकन करताना उक्त नमूद १.१ व.१.२ मधील प्रस्ताव विचारात घेतल्याने ग्रामीण व क वर्ग नगरपालिका क्षेत्र आणि नगरपंचायत क्षेत्रात मिळणाऱ्या मोबदल्यामध्ये तफावत राहणार नाही. त्यामुळे शासन निर्णय दिनांक १६.३.२०२० चा हेतू साध्य होत असल्याने तो रद्द करण्यात येत आहे.

१.४ उपरोक्त नमूद मुद्दा क्र. १.१ व १.२ मध्ये नमूद सुधारणा संदर्भात शासन अधिसूचना दिनांक ०५.१०.२०२१ प्रकाशित झाल्याच्या दिनांकानंतर राष्ट्रीय/ राज्य महामार्ग प्रकल्पाच्या ज्या भूसंपादन प्रकरणी ३ (A) ची अधिसूचना प्रकाशित होईल अशा प्रकल्पांना लागू करणे संयुक्तिक ठरेल. तथापि, प्रगतीपथावरील राष्ट्रीय/ राज्य महामार्ग प्रकल्पाच्या भूसंपादन प्रकरणी सदर अधिसूचना दि.०५.१०.२०२१ लागू होणार नाही. शासन अधिसूचना दिनांक ०५.१०.२०२१ निर्गमित झाल्यानंतर ज्या राष्ट्रीय/ राज्य महामार्ग प्रकल्पांमध्ये पूर्वी भूसंपादनासाठी संपूर्ण प्रकल्पासाठी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ च्या कलम ३ (A) व महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ मधील कलम १५ ची अधिसूचना निर्गमित केली होती व ती व्यपगत झाली असल्यास असे प्रकरण नवीन प्रकल्प म्हणून विषयांकित प्रकरणी पात्र ठरतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२२०११४१५२९४७६४१९ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SANJAY SHANKARRAO INGLE
Date: 2022.01.14 15:30:56 +05'30'

(संजय इंगळे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१) मा.मंत्री (महसूल) / मा.राज्यमंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
३) विभागीय आयुक्त, सर्व
४) जिल्हाधिकारी, सर्व
५) आयुक्त, महानगरपालिका सर्व
६) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
७) व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र

पृष्ठ **३** पैकी **२**

भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील भाग-सात खाली कंपन्यांसाठी औद्योगिक प्रयोजनासाठी संपादित जमिनीच्या विक्री/वापर बदलाच्या अनुषंगाने सुधारित धोरण.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२२/प्र.क्र.५४/अ-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई -४०००३२.
दिनांक: २९ जून, २०२२

वाचा:- शासन निर्णय क्र.संकिर्ण-०१/२०१७/प्र.क्र.११/अ-२, दि.११.०१.२०१८

प्रस्तावना :-

विविध औद्योगिक प्रयोजनासाठी भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या भाग-७ अंतर्गत कंपन्यांसाठी भूखंड संपादित करण्यात आले होते. अशा कंपन्या बंद पडल्यामुळे नागरी भागात विनावापर असलेल्या जमिनींचा सार्वजनिक प्रयोजनार्थ वापर करण्याबाबत सर्वंकष धोरण निश्चित करण्याकरिता अप्पर मुख्य सचिव वित्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-११/२०१५/प्र.क्र.१६२/अ-२, दि.२६.१२.२०१६ व शासन शुध्दीपत्रक दि.११.०१.२०१७ अन्वये गठीत करण्यात आली आहे.

सदर समितीच्या शिफारसीवरून मा.मंत्री मंडळाच्या दि.०२.०१.२०१८ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार भूंसपादन अधिनियम, १८९४ भाग-७ अंतर्गत कंपन्यांसाठी संपादित जमिनीच्या विक्री / वापरबदल संदर्भात शासन निर्णय महसूल विभाग दि.११.०१.२०१८ अन्वये धोरण निश्चित करण्यात आले आहे. प्रस्तुत दि.०२.०१.२०१८ रोजी झालेल्या मंत्री मंडळ बैठकीच्या इतिवृत्तानुसार खालील दोन बाबींवर निर्णय घेणे आवश्यक आहे.

अ) Additional Incentive देउन संबंधित कंपनीने अधिकाधिक रोजगार निर्मिती करावी यासाठी स्वतंत्र Ancillary Policy उद्योग विभागाच्या धोरणाप्रमाणे विभागाने तयार करावी.

आ) ज्या कंपन्यांना जमिनीच्या औद्योगिकेतर वापरासाठी या धोरणापूर्वी परवानगी दिलेली आहे, परंतु त्याची अंमलबजावणी अजून पूर्ण झालेली नाही (transition cases), अशा कंपनीच्याबाबत हे नवीन धोरण कोणत्या पध्दतीने लागू राहील याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील समितीला देण्यास मान्यता देण्यात यावी.

२. प्रस्तुत धोरणाप्रमाणे कार्यवाही करताना काही बाबींची स्पष्टता येणे आवश्यक असल्याचे दिसून येते. या संदर्भात मा.मंत्री (महसूल) यांनी सूचित केलेल्या बाबी तसेच विभागास निदर्शनास आलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने सदर धोरणात सुधारणा /स्पष्टता आणण्याबाबतचा प्रस्ताव अपर मुख्य सचिव

(वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या दि.३०.०५.२०२२ रोजीच्या बैठकीत ठेवण्यात आला. त्यावर समितीने सांगोपांग चर्चा केली. चर्चेअंती समितीने शिफारशीकरीता विचारात घेतलेल्या बाबी व केलेली शिफारस याबाबतचे इतिवृत्त निर्गमित करण्यात आले आहे. समितीने केलेल्या शिफारशीनुसार शासन निर्णय दि.११.०१.२०१८ अन्वये विहीत धोरणात सुधारणा /स्पष्टता करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय:-</u>

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता कंपन्यांसाठी अधिग्रहीत जमिनींच्या विक्री, वापरबदल, पुनर्हस्तांतरण व पुनर्वापर बदल याकरिता गठित समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने शासन निर्णय दि.११.०१.२०१८ मधील परिच्छेद 'अ' 'ब' 'क' १) २) ३) ४) आणि 'ड' च्या तरतूदी कायम ठेवून परिच्छेद क्र. क) ५ (i) (ii) निरसीत करुन त्याऐवजी खालीलप्रमाणे सुधारित परिच्छेद क्र. क) ५ समाविष्ट करण्याचे निर्देश देत आहे.

५.१ **अधिमूल्य आकारणीबाबत :-** शासन निर्णय दि.११.०१.२०१८, मुद्दा क्र.क) मधील अ.क्र.५ i) मध्ये असलेली एकमूष्ठ ४०% अधिमूल्य आकारणी ऐवजी खालील तक्ता क्र:१ प्रमाणे अधिमूल्य आकारणीचे प्रयोजननिहाय विगतवारी निश्चित करण्यात येत आहे.

तक्ता क्र:१ अधिमूल्य आकारणीचे प्रयोजननिहाय विगतवारी :-

अ.क्र.	प्रयोजन	अधिमूल्य % (जमीन मुल्याच्या)
i)	**वापर बदल :-**	
	i) औद्योगिकेतर / गृहनिर्माण प्रकल्प	२०
	ii) निर्मिती उद्योग	०
	iii) माहिती तंत्रज्ञान व संलग्न सेवा उद्योग	१०
ii)	**विक्री**	२०
iii)	**विक्री व वापर बदल (दोन्ही एकत्रित)**	
	i) औद्योगिकेतर /गृहनिर्माण प्रकल्प	४०
	ii) निर्मिती उद्योग	२०
	iii) माहिती तंत्रज्ञान व सहाय्यभूत सेवा (सेवा उद्योग)	३०
iv)	तारण ठेवणेसाठी शुल्क कर्ज रकमेच्या (शासन निर्णय क्र. जमिन ०२/२०१४/ प्र.क्र.४५/ ज-१ दि. २६.०६.२०१८ प्रमाणे)	०.५ % (कर्ज रकमेच्या)

५.१.१ अधिमूल्य परिगणना करण्याची कार्यपध्दती :-

अधिमूल्य परिगणना करताना एकसूत्रता व पारदर्शकता राहण्याकरिता जमिनीचे मूल्यांकन करताना महाराष्ट्र मुद्रांक (संपत्तीचे वास्तविक बाजारमूल्य ठरविणे) नियम १९९५ व सुधारित नियम २०१७ अंतर्गत वार्षिक दर विवरणपत्राच्या आधारे मूल्यांकन करण्यात यावे.

एकूण अधिमूल्य परिगणित करताना राज्य शासनास यापूर्वी सदर प्रयोजनासाठी भरणा केलेल्या अधिमूल्यांची/अनर्जित रकमेची वजावट अनुज्ञेय राहील. तथापि शर्तभंगापोटी भरणा केलेल्या अधिमूल्याची वजावट अनुज्ञेय राहणार नाही.

५.१.२ शर्तभंग नियमानुकूल करण्यासाठी दंडात्मक अधिमूल्याची परिगणना करणे:-

शासन निर्णय दि.११.०१.२०१८, मुद्दा क्र.क) मधील अ.क्र.५ ii) मध्ये शर्तभंगापोटी असलेली एकमूष्ठ ७५% अधिमूल्य आकारणी ऐवजी खालीलप्रमाणे अधिमूल्य आकारणीचे प्रयोजननिहाय विगतवारी करण्यात येत आहे.

तक्ता क्र:२

अ.क्र.	**प्रयोजन**	**शर्तभंगापोटी दंडनीय अधिमूल्य % (जमीन मुल्याच्या)**
i)	विक्री	१५
ii)	वापर बदल	१५
iii)	विक्री व वापर बदल (दोन्ही एकत्रित)	३०
iv)	तारण ठेवणे कर्ज रकमेच्या	१% कर्ज रकमेच्या

टिप:

i) शर्तभंग संदर्भात बाबनिहाय दंडनीय अधिमूल्य आकारण्यात यावे.

ii) तद्नंतर उपरोक्त परिच्छेद क्र.१ अ) मधील प्रयोजननिहाय अधिमूल्य आकारणी करण्यात येईल, तद्नंतरच प्रकरण नियमानुकूल होईल.

स्पष्टीकरण:- जर वापर बदलासाठी शर्तभंग झाला असेल तर प्रथम उपरोक्त तक्ता क्र.२ मधील अ.क्र.ii) प्रमाणे १५% शर्तभंग वसुल करण्यात येईल व वापर बदलासाठी परिच्छेद ५.१ मधील तक्ता क्र.१ मधील अ.क्र.i) मध्ये नमूद प्रयोजन निहाय अधिमूल्य वसुल करण्यात यावे.

५.२ शासन निर्णय दि.११.०१.२०१८ नूसार वा त्यापूर्वी मान्यता दिलेल्या प्रकरणी जमिनीचे पुनर्हस्तांतरण व पुनर्वापर बदल करण्यास अनुमतीबाबत स्पष्ट तरतूद नसल्याने पुढील तक्ता क्र:३ प्रमाणे अधिमूल्य आकारण्यात यावे.

तक्ता क्र:३ पुनर्हस्तांतरण / पुनर्वापर बाबत अधिमूल्याची आकारणी :-

अ.क्र.	**प्रयोजन**	**अधिमूल्य % (जमीन मुल्याच्या)**
१	पुनर्हस्तांतरण	२०% वजा (राज्य शासनास पुर्वी भरणा केलेल्या अधिमूल्याच्या ५०% रक्कम)
२	पुनर्वापर बदल	
अ	निर्मिती / उत्पादन उद्योग (Manufacturing)	०
ब	माहिती तंत्रज्ञान, एकात्मिक आद्योगिक वसाहत, लॉजिस्टीक पार्क इ.	१० % वजा (राज्य शासनास पुर्वी भरणा केलेल्या अधिमूल्याच्या ५०% रक्कम)
क	बिगर औद्योगिक / गृहनिर्माण प्रयोजनासाठी	२०% वजा (राज्य शासनास पुर्वी भरणा केलेल्या अधिमूल्याच्या ५०% रक्कम)

टिप:

i) वापरबदल व पुनर्हस्तांतरण एकत्रित परवानगी देण्याच्या प्रकरणी अधिमूल्य आकारणी करताना पूर्वी राज्स शासनास भरणा केलेल्या अधिमूल्य / अनर्जित रक्कमेची संपूर्ण वजावट अनुज्ञेय राहील. (वजावटीनंतर एकूण अधिमूल्य ऋण येत असल्यास शून्य अधिमूल्य राहील.)

ii) भविष्यात सदर सुधारित धोरणानुसार जमिनीच्या पुनर्वापर अथवा पुनर्हस्तांतरण याकरिता परवानगी देताना प्रयोजन निहाय यापूर्वी वापरबदल अथवा हस्तांतरण याकरिता भरणा केलेल्या अधिमूल्याची/अनर्जित रकमेची वजावट अनुज्ञेय राहील. ज्या प्रकरणी शासन निर्णय दि.११.०१.२०१८ च्या तरतुदीप्रमाणे अथवा सदर धोरणापूर्वी मान्यता दिलेल्या प्रकरणात एकमुष्ट पध्दतीने अधिमूल्य / अनर्जित रक्कम भरणा केली असेल तर प्रकरण निहाय वापरबदलासाठी ५०% व पुनर्हस्तांतरणकरिता ५०% अधिमूल्य असल्याचे गृहीत धरुन प्रकरण निहाय वजावट देण्यात येईल.

iii) तथापि शर्तभंगापोटी भरणा केलेल्या अधिमूल्याची वजावट कोणत्याही प्रकरणी अनुज्ञेय राहणार नाही .

iv) औद्योगिक (निर्मिती उद्योग) अथवा माहिती तंत्रज्ञान व इतर सहाय्यभूत सेवा (सेवा उद्योग) याकरीता हस्तांतरण/पुनर्हस्तांतरण/वापरबदल याकरीता परवानगी दिल्यास शासन निर्णय दि.११.०१.२०१८, मुद्दा क्र.क) मधील अ.क्र.२ व ३ मधील परवडणारी घरे, अल्प उत्पन्न गटासाठी घरकुले व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकरिताच्या तरतूदी लागू राहणार नाहीत.

५.३ हस्तांतरित भूखंडावर विहित वापराच्या परवानगीनुसार निर्माण होणाऱ्या सदनिका, वाणिज्य गाळे च्या विक्रीबाबत:-

औद्योगिक वापराकरिता भूसंपादित जमिनीच्या सार्वजनिक गृहनिर्माण वापराकरिता विक्री अनुमती दिलेली आहे. अशा प्रकरणी प्रकल्प विकसित झाल्यानंतर तेथील सदनिका, गाळे, गृहनिर्माण संस्था, कॉडोमिनीयम ऑफ अपार्टमेंटस/कंपन्या तत्सम आस्थापना इ. यांना हस्तांतरण/विक्री करण्याकिरता शासनाच्या पुर्नमान्यतेची आवश्यकता राहणार नाही.

५.४ शासन धोरण दि.११.०१.२०१८ पूर्वी परवानगी दिलेली आहे परंतु, त्याची अंमलबजावणी अजून पुर्ण झालेली नाही अशा प्रकरणांबाबत (Transition cases):-

शासन धोरण दि.११.०१.२०१८ पूर्वी मान्यता दिलेल्या परंतु, मान्यतेनुसार दि.११.०१.२०१८ पूर्वी अधिमूल्य भरणा न केलेल्या संक्रमण प्रकरणी, सदर सुधारीत शासन धोरणानुसार अधिमूल्य अदा करण्याच्या दिनांकास लागू असलेले वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यातील दरानुसार परिगणित होणारे अधिमूल्य भरुन प्रकरणे नियमानुकुल करण्यात यावीत.

५.५ संकीर्ण बाबी :-

५.५.१) सब-स्टेशन / ट्रान्सफॉर्मर उभारणीसाठी:- हस्तांतरण /पुनर्हस्तांतरण/ वापर बदल बाबत शासनाने मान्यता दिलेल्या प्रकरणी भूखंड विकासादरम्यान महावितरण, स्थानिक वीज

वितरण कंपनी, स्थानिक नियोजन प्राधीकरण यांना सब-स्टेशन / ट्रान्सफॉर्मर उभारणीसाठी आवश्यक जमीन सदर प्रकल्पाचा भाग म्हणून भाडेपट्टयाने देता येईल.

५.५.२) प्रत्यक्षात रूढार्थाने औद्योगिक/उत्पादन स्वरूपाचे प्रयोजन नसणाऱ्या काही कंपन्यासाठीही भूसंपादन अधिनियमातील तरतुदीनुसार संपादीत केलेल्या जमिनींच्या विक्री/वापरातील बदलास परवानगीबाबत.

प्रत्यक्षात रूढार्थाने औद्योगिक / उत्पादन स्वरूपाचे प्रयोजन नसणाऱ्या काही कंपन्यासाठीही भूसंपादन अधिनियमातील तरतुदीनुसार संपादीत केलेल्या जमिनींच्या विक्री / वापरातील बदलास परवानगी देण्यासाठी भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या भाग-७ अन्वये औद्योगिक वापरासाठी भूसंपादित जमिनीच्या विक्री व वापर बदल संदर्भात प्रचलित असलेले धोरण लागू करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संकेतांक क्र. २०२२०६२९१७१८०८१४१९ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SANJAY SHANKARRAO INGLE
Date: 2022.06.29 18:36:21 +05'30'

(संजय इंगळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,राजभवन मलबा हिल,मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई
३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई
४) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
५) अपर मुख्य सचिव (उद्योग),उ.उ.व का.विभाग, मंत्रालय,मुंबई.
६) अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण), गृहनिर्माण विभाग,मंत्रालय,मुंबई
७) प्रधान सचिव (महसूल, मुं.शु. व नों.), महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई
८) प्रधान सचिव (नवि-१), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव (वि.व न्या.विभाग),विधी व न्याय विभाग,मंत्रालय, मुंबई
१०) सचिव (वने), महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई
११) मा.मंत्री (महसूल)यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
१२) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र ½, मुंबई/नागपूर.
१४) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र ½, मुंबई/नागपूर
१५) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१६) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे

राज्यातील ६६ के.व्ही. व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या अति उच्चदाब पारेषण वाहिन्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या मनोऱ्याने व्याप्त जागेचा तसेच अति उच्चदाब पारेषण वाहिनीच्या पट्टयाखालील जमिनीचा नुकसान भरपाईपोटी मोबदला देण्यासंदर्भात सुधारित धोरण.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक - पावामो-२०२१/प्र.क्र.१७०/ऊर्जा-४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय ,मुंबई- ४०००३२.
दिनांक :- ०२ नोव्हेंबर,२०२२

संदर्भ : १) शासन निर्णय क्रमांक: धोरण-२०१६/प्र.क्र.५२०/ऊर्जा-४, दि. ३१.०५.२०१७.
२) केंद्र शासनाचे पत्र क्र. ३/७/२०१५ - पारेषण, दि. १६.०७.२०२०.
३) महापारेषण कंपनीचे पत्र क्र. मराविपाकंम/सांक/१३२७९, दि. ०८.०२.२०२२.

प्रस्तावना :-

भारतीय विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १६४ तसेच टेलिग्राफ अधिनियम, १८८५ कलम १० (ड) अनुसार व महाराष्ट्र शासनाच्या आदेश क्र. ०६/सीआर ३१२/४, दि. २४.०८.२००६ अन्वये महापारेषण कंपनीला पारेषण वाहिन्या व मनोऱ्यांच्या उभारणी संबंधात अधिकार प्राप्त आहेत. तसेच सदर अधिकारांचा वापर करत असतांना वाहिनी उभारताना जमिनीचे झालेल्या नुकसानीबद्दल संबंधितांना नुकसान भरपाईपोटी मोबदला अदा करण्याचीही तरतूद आहे.

राज्यात परवानाधारक शासकीय व खाजगी वीज पारेषण कंपन्यामार्फत ६६ के.व्ही. व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या वीज पारेषण वाहिनी उभारणी आणि अस्तित्वात असलेल्या वाहिन्यांची श्रेणीवाढ, दुरुस्ती, नूतनीकरणाची कामे करण्यात येतात. प्रत्यक्ष कामाच्यावेळी बरेचदा पारेषण वाहिन्यांची उभारणी व अस्तित्वात असलेल्या वाहिन्यांचे नूतनीकरण व दुरुस्तीची कामे करीत असतांना शेतकरी व जमीनधारकांकडून नुकसान भरपाईपोटी मोबदल्याच्या अनुषंगाने विरोध होत असतो. महापारेषण कंपनीकडून व इतर पारेषण परवानाधारक कंपन्याकडून अति उच्चदाब पारेषण वाहिन्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या मनोऱ्यामुळे व्यापलेल्या जमिनीचा नुकसान भरपाईपोटी मोबदला वरील संदर्भ क्र. १ येथील दिनांक ३१.०५.२०१७ च्या शासन निर्णयानुसार देण्यात येत आहे. तथापि सदरचा जमिनीचा नुकसान भरपाईपोटी मोबदला अत्यल्प असुन तो वाढवून मिळावा व त्याबरोबरच अति उच्च दाब वाहिनीच्या पट्टयाखालील जमिनीच्या नुकसान भरपाईपोटी वाढीव मोबदला मिळावा अशी मागणी संबंधित शेतकरी/जमिनधारक तसेच लोकप्रतिनिधी व सामान्य नागरिक यांचेकडून शासनाकडे सातत्याने होत आहे. त्यामुळे नुकसान भरपाईपोटी मोबदल्यामध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत संदर्भ क्र. २ अन्वये केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, शेतकरी/जमीन मालक यांची मागणी, राज्यातील परवानाधारक पारेषण कंपन्यांची मागणी इत्यादी विचारात घेऊन महापारेषण कंपनीने उपरोक्त संदर्भ क्र. ३ अन्वये शासनास प्रस्ताव सादर केला होता. तद्नंतर दिनांक १२.१०.२०२२ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सुधारित धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मंत्रीमंडळ प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर झालेल्या मंत्रीमंडळ निर्णयाच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन संपुर्ण महाराष्ट्र राज्यासाठी (शहरी व ग्रामीण भाग) पुढीलप्रमाणे सुधारित धोरण निश्चित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

अति उच्चदाब पारेषण वाहिन्या उभारणीमुळे जमिनीच्या होणाऱ्या नुकसान भरपाईपोटी मोबदला देण्यासंदर्भात ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना व विविध पारेषण परवानाधारक यांना पारेषणवाहिनी उभारताना येणाऱ्या अडीअडचणी तसेच जमिनीच्या नुकसान भरपाईपोटी देण्यात येणारा मोबदला वाढवून देण्याबाबत राज्यातील महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, लोकप्रतिनिधी, शेतकरी, जमिनधारक, सामान्य नागरिक व विविध पारेषण परवानाधारक यांनी केलेल्या विनंतीस अनुसरुन संदर्भ क्रमांक १ येथील दि. ३१.०५.२०१७ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन अति उच्चदाब पारेषण वाहिनींच्या उभारणीसाठी मनोऱ्याने व्याप्त तसेच अति उच्चदाब पारेषण वाहिनीच्या पट्ट्याखालील जमिनीचा नुकसान भरपाईपोटी मोबदला देण्याचे सुधारीत धोरण संपुर्ण महाराष्ट्र राज्यासाठी (सर्व शहरी व ग्रामीण भाग) लागु करण्यास खालीलप्रमाणे शासनाची मंजुरी देण्यात येत आहे:-

१) अति उच्चदाब मनोऱ्याने व्याप्त जमिनीच्या मोजणीप्रमाणे आलेल्या क्षेत्रफळाचे, जिल्हास्तरीय / उपविभागीय स्तरीय मुल्यांकन समितीने त्या-त्या वेळी प्रचलित असलेल्या, संबंधित भागातील शासनाच्या बाजार मुल्यदर पत्रकामध्ये (Ready Reckoner) किंवा मागील ३ वर्षातील झालेल्या जमिनीच्या खरेदी/ विक्री व्यवहाराच्या आधारे निश्चित होणारा सरासरी दर यापैकी जो दर अधिक असेल त्या दराच्या दुप्पट दराने मोबदला देण्यात यावा.

२) अति उच्चदाब पारेषण वाहिनीच्या पट्टयाखालील (Line Corridor) जमिनीच्या मोजणीप्रमाणे आलेल्या क्षेत्रफळाचे, प्रचलित असलेल्या संबंधित भागातील शासनाच्या बाजार मुल्यदर पत्रकाच्या (Ready Reckoner) किंवा मागील ३ वर्षातील झालेल्या जमिनीच्या खरेदी/ विक्री व्यवहाराच्या आधारे निश्चित होणारा सरासरी दर यापैकी जो दर अधिक असेल त्या दराच्या १५% दराने मोबदला देण्यात यावा.

३) वरील २ मध्ये दर्शविलेल्या मोबदल्या व्यतिरीक्त "ना-उपयोगिता भत्ता" स्वरुपात अति उच्चदाब पारेषण वाहिनीच्या पट्टयाखालील (Line corridor) जमिनीच्या क्षेत्रफळाचे, त्या-त्या वेळी प्रचलित असलेल्या संबंधित भागातील शासनाच्या बाजार मुल्यदर पत्रकाच्या (Ready Reckoner) किंवा मागील ३ वर्षातील झालेल्या जमिनीच्या खरेदी/ विक्री व्यवहाराच्या आधारे निश्चित होणारा सरासरी दर यापैकी जो दर अधिक असेल त्या दराच्या १५% दराने अतिरिक्त मोबदला देण्यात यावा.

४) थोडक्यात, अति उच्चदाब पारेषण वाहिन्याच्या पट्टयाखाली (Line Corridor) येणाऱ्या क्षेत्रासाठी वरील २ प्रमाणे १५% व वरील ३ प्रमाणे अतिरिक्त १५% असा एकूण ३० % दराने मोबदला देय राहील.

५) उपरोक्त प्रमाणे मनोऱ्याने व्याप्त जागेचा व अति उच्च दाब पारेषण वाहिनीच्या पट्टयाखालील जमीनीच्या नुकसान भरपाई पोटी मोबदला उपविभागीय स्तरीय मुल्यांकन समिती ठरवेल.

६) तसेच अपवादात्मक/ असाधारण परिस्थितीत पारेषण परवानाधारक यांच्या सल्लामसलतीने बाधित जागेचा योग्य तो मोबदला ठरविण्याचा अधिकार उपविभागीय स्तरीय स्तरावरील उपविभागीय मुल्यांकन समितीस राहतील.

७) मुल्यांकन समितीने निश्चित केलेला जमिनीचा नुकसान भरपाईपोटी मोबदला, बाधित शेतकरी/ जमीन मालकास किंवा पारेषण परवाना धारकास मान्य नसल्यास अशी व्यक्ती/ संस्था संबंधित

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गठीत अपिलीय समितीकडे अपिल अर्जाद्वारे दाद मागू शकते.

८) अति उच्चदाब पारेषण वाहिनीच्या विहित केलेल्या मार्गात कोणतेही बांधकाम कार्य करण्याची अनुमती असणार नाही.

९) पिके, फळझाडे किंवा इतर झाडांसाठीची नुकसान भरपाई शासनाच्या संबंधित विभागाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे देण्यात यावी.

१०) उपरोक्त धोरण मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यांसह संपूर्ण महाराष्ट्र राज्यास (संपुर्ण शहरी व ग्रामीण भाग) लागू राहील.

११) अस्तित्वात असलेल्या वाहिन्यांची क्षमता वाढ व आधुनिकीकरण करावयाचे असल्यास, मनोऱ्याने व्याप्त व अति उच्चदाब पारेषण वाहिनीच्या पट्ट्याखालील वाढीव/ बाधित क्षेत्रासाठीच जमिनीच्या नुकसान भरपाईपोटी मोबदला देय राहिल.

१२) संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीमार्फत उभारण्यात येणाऱ्या अति उच्चदाब पारेषण वाहिनी व त्याकरिता लागणाऱ्या मनोऱ्याने बाधित झालेल्या जमिनीच्या नुकसान भरपाईपोटी मोबदला अदा करण्यासाठी ऑनलाईन (आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी. इत्यादी) पध्दतीचा वापर करुन सदर नुकसान भरपाईपोटी मोबदला थेट संबंधित बाधित शेतकऱ्याच्या तथा जमीन मालकाच्या तथा जमिनधारकाच्या बँक खात्यात जमा करावा. मात्र अपवादात्मक परिस्थीतीत सदर मोबदला संबंधित जमीन मालकाला/ जमीन धारकाला धनादेशाद्वारे अदा करण्याची मुभा संबंधित पारेषण परवानाधारकास राहील.

१३) राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्थानिक प्राधिकरणे, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत, महानगरपालिका, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हापरिषद, एम.एम.आर.डी.ए., पी.एम.आर.डी.ए., एन.एम.आर.डी.ए., राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, सार्वजनिक बागा, शासकीय/निमशासकीय करमणूक केंद्र, केंद्र व राज्य शासनाची मिठागरे, शासकीय/निमशासकीय विशेष आर्थिक क्षेत्रे, शासकीय/निमशासकीय मुख्य/किरकोळ बंदरे, नदी व खाडी, शासकीय/निमशासकीय क्रीडा संकुल, शासकीय/निमशासकीय संस्था यांच्या मालकीची जमीन असेल तर त्यांना मनोऱ्याने व्याप्त तथा अति उच्चदाब पारेषण वाहिनीखालील (Line Corridor) जमिनीच्या नुकसान भरपाईपोटी मोबदला अनुज्ञेय राहणार नाही. मात्र उपरोक्त शासकीय/निमशासकीय संस्थेने त्यांची जागा भाडे तत्वावर खाजगी व्यक्ती/संस्था यांना दिली असेल तर अशा जागेस उपरोक्त प्रमाणे जमिनीच्या नुकसान भरपाईपोटी मोबदला संबंधित पट्टाधारक/ लिजधारक यांना देय ठरेल. तथापि केंद्र शासन तथा केंद्र शासनाची प्राधिकरणे यांच्या मालकीच्या जमिनी संदर्भात केंद्र शासनाच्या संबंधित मंत्रालयाच्या प्रचलित /विहित नियमानुसार व कार्यपध्दती नुसार जमिनीच्या नुकसान भरपाईपोटी मोबदला देय राहील.

१४) वन विभागाच्या जमिनीतून जाणाऱ्या अति उच्चदाब पारेषण वाहिनी संदर्भात वन विभागाच्या प्रचलित नियमानुसार संबंधित पारेषण कंपनीकडून वन विभागाने निर्धारित केलेली रक्कम वन विभागास अदा करावी.

१५) अति उच्चदाब पारेषण मनोरे व अति उच्चदाब पारेषण वाहिन्याखाली येणारे बेकायदेशीर/अनधिकृत बांधकामे काढून टाकण्या संदर्भात संबंधित विभागाच्या सल्ल्याने/ धोरणानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१६) सदर सुधारित धोरण हा शासन निर्णय जाहीर झाल्याच्या दिनांकाला काम सुरु असलेल्या तसेच नवीन प्रस्तावित असलेल्या अशा सर्व अति उच्चदाब पारेषण वाहिनी प्रकल्पांना लागू राहिल. तसेच, सदर शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकास काम सुरु असलेल्या (Under Construction) म्हणजेच कार्यान्वित होणे बाकी असलेल्या अति उच्चदाब पारेषण वाहिनी उभारणीच्या सर्व प्रकल्पांस देखील हा शासन निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहील. तथापि काम सुरु असलेल्या (Under Construction) म्हणजेच कार्यान्वित होणे बाकी असलेल्या अति उच्चदाब पारेषण वाहिनीच्या प्रकल्पातील ज्या अति उच्चदाब मनोऱ्यांनी किंवा अति उच्चदाब पारेषण वाहिन्यांमुळे बाधीत झालेल्या जमिनीच्या नुकसान भरपाईपोटी मोबदला अंतिम करुन तो अदा करण्यात आला असेल व सुधारित धोरणानुसार अशा अति उच्चदाब मनोरे तथा अति उच्चदाब पारेषण वाहिन्या यामुळे बाधित झालेल्या जमिनीचा नुकसान भरपाईचा मोबदला जास्त येत असेल तर त्या संबंधित जमीन मालकास फरकाची रक्कम देय राहिल. मात्र जर सुधारित धोरणानुसार जमिनीच्या नुकसान भरपाईपोटी मोबदला कमी येत असेल तर फरकाची रक्कम संबंधित जमीन मालकाकडुन वसुल केली जाणार नाही.

१७) सदर शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकास कार्यान्वित झालेल्या (Commissioned) अति उच्चदाब पारेषण वाहिनी प्रकल्पांस लागू राहणार नाही.

१८) उपरोक्त धोरण शासकीय/निमशासकीय तथा खाजगी पारेषण परवानाधारक कंपन्या/ संस्था यांना लागू राहील.

१९) उपरोक्त सुधारीत धोरणानुसार ठरविण्यात आलेला जमिनीचा नुकसान भरपाईचा मोबदला संबंधित शासकीय/निमशासकीय तथा खाजगी पारेषण परवानाधारक कंपन्या त्यांच्या महसुलामधुन तसेच त्यांच्या वार्षीक महसुल गरजेच्या प्रतीपुर्तीतून (ARR) देतील/ भागवतील.

२. उप विभागीय स्तरावरील मुल्यांकन व जिल्हास्तरीय अपिलीय समितीचे गठन :-

२.१ अति उच्चदाब पारेषण वाहिनी व त्याकरिता लागणाऱ्या मनोऱ्याने बाधित होणाऱ्या तथा झालेल्या जमिनीच्या नुकसान भरपाईपोटी मोबदला ठरविण्यासाठी जिल्हातील उप विभाग निहाय उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे उप विभागीय स्तरीय मुल्यांकन समिती स्थापन करण्यात येत आहे :-

अ.क्र.	पदनाम	समितीतील पद
१	उप विभागीय अधिकारी (प्रांताधिकारी)	अध्यक्ष
२	उप अधीक्षक भूमी अभिलेख	सदस्य
३	सहायक संचालक, नगर रचना मुल्यांकन (संबंधित विभाग)	सदस्य
४	तालुका/उपविभागीय कृषि अधिकारी	सदस्य
५	संबंधित दुय्यम निबंधक	सदस्य
६	संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीचे प्रतिनिधी	सदस्य
७	राज्य पारेषण उपक्रम (महापारेषण) यांनी उपविभाग निहाय प्राधिकृत केलेला किमान कार्यकारी अभियंता दर्जाचा अधिकारी	सदस्य सचिव

२.२ संबंधित उप विभागांतर्गत उभारलेल्या अति उच्चदाब मनोऱ्याने व्याप्त व अति उच्चदाब पारेषण वाहिनीच्या पट्टयाखालील (Line Corridor) जमिनीची मोजणी पारेषण परवानाधारकांनी भुमी अभिलेख विभागामार्फत करावी व नविन सुधारित धोरणानुसार उपरोक्त २.१ मधील संदर्भीय समितीने मूल्यांकन करुन जमिनीच्या नुकसान भरपाईपोटी मोबदला निश्चित करावा.

२.३ उपरोक्त समितीने निश्चित केलेला जमिनीचा नुकसान भरपाईपोटी मोबदला, बाधित शेतकरी/ जमीन मालकास किंवा पारेषण परवानाधारकास मान्य नसल्यास अशी व्यक्ती/ संस्था संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गठीत अपिलीय समितीकडे अपिल अर्जाद्वारे दाद मागू शकते.

२.४ सदर अपिलीय समितीत संबंधित जिल्हाधिकारी, संबंधित उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी), राज्य पारेषण उपक्रम यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी, संबंधित पारेषण कंपनीचा प्रतिनिधी यांचा समावेश असेल.

२.५ जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील अपिलीय समितीस सदर अपिलात तथ्य वाटल्यास उपरोक्त समिती पुर्नमुल्यांकन करेल किंवा अपिल पुर्नविचारार्थ उपविभागीय स्तरीय मुल्यांकन समितीकडे पाठवेल किंवा अपिल फेटाळेल.

२.६ उपविभागीय स्तरीय मुल्यांकन समिती व जिल्हास्तरीय अपिलीय समितीची सविस्तर कार्यकक्षा व कार्यपध्दती शासनामार्फत स्वतंत्रपणे निश्चित करण्यात येईल.

३. सदर धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये अडचण आल्यास त्यासंदर्भात फक्त धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने सचिव/ प्रधान सचिव/ अपर मुख्य सचिव (ऊर्जा), यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

अ.क्र.	**पदनाम**	**हुद्दा**
१	सचिव/ प्रधान सचिव/ अपर मुख्य सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग	अध्यक्ष
२	सचिव/ प्रधान सचिव/ अपर मुख्य सचिव (वने) किंवा त्यांचे प्रतिनिधी	सदस्य
३	सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, (कृषी), कृषी व पदुम विभाग किंवा त्यांचे प्रतिनिधी	सदस्य
४	सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग किंवा त्यांचे प्रतिनिधी	सदस्य
५	सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव (नवि-२), नगर विकास विभाग किंवा त्यांचे प्रतिनिधी	सदस्य
६	सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव (ग्राम विकास), ग्राम विकास विभाग किंवा त्यांचे प्रतिनिधी	सदस्य
७	सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा त्यांचे प्रतिनिधी	सदस्य
८	संचालक (प्रकल्प), महापारेषण कंपनी	सदस्य
९	मुख्य अभियंता, राज्य पारेषण उपक्रम (STU)	सदस्य सचिव

४. या सुधारित धोरणाच्या अनुषंगाने अनुसरावयाची कार्यपध्दती ऊर्जा विभागामार्फत स्वतंत्रपणे निश्चित करण्यात येईल व तसे आदेश यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

५. हा शासन निर्णय, कृषी व पदुम, नगर विकास, महसूल व वने, सार्वजनिक बांधकाम विभाग, नियोजन विभाग, गृह निर्माण विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने व सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक दि. २५.०८.२०१५ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharshtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२११०२१८०९३२२८१० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीन साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SURESH DNYANDEO REDEKAR
Date: 2022.11.02 18:13:34 +05'30'

(सुरेश रेडेकर)
उप सचिव महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य.
८) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव
९) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
१०) मा. उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
११) सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
१२) मा. मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१३) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
१४) प्रधान सचिव, विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
१५) मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
१६) राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई.
१७) प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय,१ ला मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई- ४०० ०३२
१८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महा संचालनालय, मुंबई.
१९) सर्व विभागीय आयुक्त.
२०) सर्व जिल्हाधिकारी.
२१) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२२) सर्व आयुक्त,महानगरपालिका.
२३) मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख.
२४) महालेखापाल लेखा-१ (लेखापरिक्षा), महाराष्ट्र, मुंबई- ४०० ०२०
२५) महालेखापाल लेखा-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई- ४०० ०२०

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५५ च्या, कलम ३(H)(३), (४) अनुषंगाने सक्षम प्राधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत अंतरिम मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्र: याचिका-२०२२/प्र.क्र.१४३/अ-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दि. १८.११.२०२२

<u>प्रस्तावना</u> :-

मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल रिट याचिका नं. ३५५१/२०२१ व अन्य याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. २१.१०.२०२२ रोजी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्गाकरीतासंपादित होणाऱ्या जमिनीच्या मोबदला निर्धारणानंतर उद्भवणाऱ्या अडचणींबाबत (contingency). राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५५ च्या, कलम ३ H (३), ३ H (४) अनुषंगाने सक्षम प्राधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. वरील बाबतीत अंतिम मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यापूर्वी अंतरिम मार्गदर्शक सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे अंतिम मार्गदर्शक सूचना तयार करीत असताना दरम्यानच्या काळामध्ये निरनिराळी न्यायालयीन प्रकरणे विनाकारण उद्भवण्याची शक्यता आहे. त्यामुळे अंतिम मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यापूर्वी याखाली नमूद अंतरिम मार्गदर्शक सूचना सर्व संबंधितांना देण्यात येत आहे. त्यानुसार शासन खालीलप्रमाणे निर्देश देत आहे.

शासन परिपत्रक:-

राष्ट्रीय महामार्गाकरीतासंपादितहोणाऱ्या जमिनीच्या मोबदला निर्धारणानंतर उद्भवणाऱ्या अडचणींबाबत (contingency)राष्ट्रीय महामार्गअधिनियम १९५५ च्या, कलम ३ H (३), ३ H (४) अनुषंगाने सक्षम प्राधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत अंतरिम मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे विहीत करण्यात येत आहेत व त्याप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता सर्व विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी /भूसंपादन अधिकारी यांनी घ्यावी.

1. The Competent Authority is required to determine not only the entitlement but also apportionment amongst several claimants claiming interest in the amount of compensation that is determined by the Competent Authority.

2. Once such determination takes place, each of the claimants ought to be informed/intimated of such determination and ought to be given time of at least four weeks after receipt of the intimation, either to accept the same or dispute the same.

3. In the meanwhile, the Competent Authority cannot act upon such determination and distribute the amount in accordance with the same. If within the period of four weeks of the receipt of intimation, referred to hereinabove, either all the claimants accept such determination or do not communicate in writing, after obtaining in writing the acknowledgment in that regard, of their dispute and/or disagreement of such determination, the Competent Authority ought to make payment in accordance with the same.

4. Whereas, if an objection and/or dispute is raised in respect of such determination by any of the claimants, within four weeks of the date of receipt of such intimation, the Competent Authority will have to refer it to the competent Civil Court in terms of sub-section (4) of Section 3H of the Act.

5. The Competent Authority will have to give adequate time of at least four weeks to the claimants, either for agreeing with such determination or for disputing with the same. Resultantly, the Competent Authority ought not to act upon its determination and distribution of amount of compensation amongst the claimants unless the claimants get a reasonable time or opportunity to take appropriate steps in that regard, including raising of a dispute.

सदरहू अंतरिम मार्गदर्शक सूचना ह्या अंतिम मार्गदर्शक सूचना, ज्या इथून पुढे निर्गमित केल्या जातील, त्यांच्या अधीन असतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२२१११८१२५७३२१३१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SANJAY SHANKARRAO INGLE
Date: 2022.11.18 12:58:35 +05'30'

(संजय इंगळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,राजभवन मलबार हिल,मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई
३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई
४) अपर मुख्य सचिव(वित्त), वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
५) अपर मुख्य सचिव(उद्योग),उ.उ.व का.विभाग,मंत्रालय,मुंबई.
६) अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण),गृहनिर्माण विभाग,मंत्रालय,मुंबई
७) प्रधान सचिव (महसूल, मुं.शु. व नों.), महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई

६६ के.व्ही व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या अति उच्चदाब पारेषण वाहिन्यांसाठी उभारण्यात येणा-या मनो-याने व्याप्त जमिन व वाहिनीच्या पट्ट्याखालील जमिनीच्या नुकसानभरपाईपोटी देण्यात येणा-या मोबदल्याबाबत सुधारित धोरणाच्या अनुषंगाने अनुसरावयाची कार्यपद्धती निश्चित करणेबाबत.....

महाराष्ट्र शासन

उद्योग, उर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक- पावामो-२०२१/प्र.क्र.१७०/उर्जा-४

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक:- ०१ डिसेंबर, २०२२

वाचा:- १) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्रमांक: पावामो-२०२१/प्र.क्र.१७०/उर्जा-४, दिनांक ०२.११.२०२२.

२) मुख्य अभियंता, राज्य पारेषण उपक्रम यांचे पत्र क्र. म.रा.वि.पा.कं.म/ सां.का./ मु.अ./ रा.पा.ऊ/ ७८९९, दिनांक १०.११.२०२२

प्रस्तावना:-

राज्यात वीज पारेषण परवानाधारक शासकीय/निमशासकीय तसेच खाजगी वीज पारेषण कंपन्यांमार्फत ६६ के.व्ही व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या अति उच्चदाब पारेषण वाहिन्या उभारल्या जातात. तसेच अस्तित्वात असलेल्या वाहिन्यांची श्रेणीवाढ, दुरुस्ती व नुतनीकरणाची कामे करण्यात येतात. मनोरा व वाहिनी उभारताना तसेच वाहिन्यांची श्रेणीवाढ, दुरुस्ती व नुतनीकरणाची कामे करताना शेतीच्या/जमिनीच्या होणा-या नुकसानभरपाईपोटी मोबदला देण्यासंदर्भात उर्जा मंत्रालय, भारत सरकार यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचना व विविध पारेषण परवानाधारक यांना पारेषण वाहिनी उभारताना येणा-या अडी-अडचणी तसेच जमिनीच्या नुकसानभरपाईपोटी संबंधित शेतकरी व जमिनधारकांना देण्यात येणा-या मोबदल्यात वाढ करण्याबाबत राज्यातील महापारेषण कंपनी, लोकप्रतिनिधी, शेतकरी/जमिन धारक, सामान्य नागरीक व विविध पारेषण परवानाधारक यांनी केलेल्या मागणी/विनंतीच्या अनुषंगाने शासनाने वाचा येथील दि. ०२.११.२०२२ च्या शासन निर्णय अन्वये सुधारित धोरण निर्गमित केले आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र. २.६ व ४ येथे अनुक्रमे उप विभागीय स्तरीय मुल्यांकन समिती व जिल्हास्तरीय अपिलीय समितीची सविस्तर कार्यकक्षा व कार्यपद्धती व सुधारित धोरणाच्या अनुषंगाने अनुसरावयाची कार्यपद्धती उर्जा विभागामार्फत स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल व तसे आदेश निर्गमित करण्यात येतील असे नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार राज्य पारेषण उपक्रमाने त्यांच्या स्तरावर शासनाने कळविल्याप्रमाणे मुख्य अभियंता (कंत्राटे

व अनुश्रवण) यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यीय समिती गठीत केली होती. राज्य पारेषण उपक्रमाने सदर समितीचा शिफारशीसह अहवाल दि. १०.११.२०२२ च्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे. शासनाने घोषित केलेले धोरण व त्या अनुषंगाने राज्य पारेषण उपक्रमाने सादर केलेल्या अहवालानुसार उप विभागीय स्तरीय मुल्यांकन समिती व जिल्हास्तरीय अपिलिय समितीची कार्यकक्षा व कार्यपद्धती आणि सुधारित धोरणाच्या अनुषंगाने अनुसरावयाची सर्वसाधारण कार्यपद्धती निश्चित करुन आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय:-

शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. पावामो-२०२१/प्र.क्र.१७०/उर्जा-४, दि.०२.११.२०२२ अन्वये महापारेषण व इतर पारेषण परवानाधारक कंपन्यांकडून अति उच्चदाब पारेषण वाहिन्यांसाठी उभारण्यात येणा-या मनो-यामुळे व्यापलेल्या जमिनीच्या नुकसानभरपाईपोटीचा व वाहिनीच्या पट्ट्याखालील जमिनीच्या होणा-या नुकसानभरपाईपोटीचा मोबदला देण्याच्या सुधारित धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने उप विभागीय स्तरीय मुल्यांकन समिती व जिल्हास्तरीय अपिलीय समितीची कार्यकक्षा व कार्यपद्धती खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

अ) **सुधारित धोरणाची अंमलबजावणीबाबत खालील प्रमाणे सर्वसाधारण कार्यपद्धती राहिल:-**

१) या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेली कार्यपद्धती सर्व शासकीय/निमशासकीय तथा खाजगी पारेषण परवानाधारक कंपन्यांमार्फत उभारण्यात येणा-या/उभारणीचे काम सुरु असलेल्या सर्व अति उच्चदाब पारेषण वाहिन्यांना लागू राहिल.

२) शासन निर्णय दि. ०२.११.२०२२ मधील अनुक्रमांक १ ते ३ येथे विहित केल्यानुसार अति उच्चदाब पारेषण वाहिन्या उभारताना संबंधित शेतकरी/जमिन मालकांच्या जमिनीच्या होणा-या नुकसानभरपाईपोटी देण्यात येणारा मोबदला निश्चित केलेल्या दराप्रमाणे संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीने त्यांच्या महसूलातून संबंधित शेत/जमीन मालक/धारकांना अदा करावा.

३) नुकसान झालेल्या जमिनीचे मोजमाप झाल्यानंतर आकारण्यात येणारे दर हे शेतजमिनीसाठी हेक्टर मध्ये विहित केलेले दर व अकृषक झालेल्या जमिनीचे चौरस मिटर मध्ये विहित केलेले दर विचारात घ्यावे.

४) संबंधित शेतकरी/जमिन मालकांच्या जमिनीची आवश्यक असलेली कागदपत्रे, गांव नमुना नंबर सात-बारा, रु. १००/- च्या स्टॅम्पपेपरवर संमतीपत्र/प्रतिज्ञापत्र/मुखत्यारपत्र/नोटरीकृत हमीपत्र संबंधित शेतकरी / जमिन मालकांकडून संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीने प्राप्त करुन घ्यावीत.

५) (अ) अति उच्चदाब वाहिनीची ज्या शेत वा इतर जमिनीतून उभारणी करण्यात येणार आहे/उभारणीचे काम सुरु आहे अशा भागातील शेत वा अन्य जमिनीचे मुद्रांक शुल्क विभागाने ठरविलेले बाजारमुल्य दर-पत्रक (रेडी रेकनर) समितीने प्राप्त करुन घ्यावे.

(ब) अति उच्चदाब वाहिनीच्या प्रकल्पाचे संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीने काम सुरु केल्याच्या दिनांकालगतच्या मागील तीन वर्षात त्या त्या भागात/लगतच्या गट/ सर्व्हे नंबर मध्ये झालेल्या जमिनीचे एकूण खरेदी-विक्रीचे व्यवहार मुद्रांक शुल्क विभागाकडून प्राप्त करुन घ्यावे व या तीन वर्षातील खरेदी-विक्री व्यवहाराची सरासरी काढावी.

(क) मुद्रांक शुल्क विभागाकडुन प्राप्त झालेले बाजारमुल्य दर पत्रकानुसारचा दर (रेडी रेकनर दर) व मागील तीन वर्षात त्या त्या भागात/लगतच्या गट/ सर्व्हे नंबर मध्ये झालेल्या जमिनीचे एकूण खरेदी-विक्रीचे व्यवहारानुसार आलेला सरासरी दर यापैकी जो दर जास्त असेल तो दर मुल्यांकन निश्चित करण्यासाठी विचारात घेऊन मुल्यांकन समितीने अति उच्चदाब मनोरा व वाहिनी उभारणीसाठी झालेल्या जमिनीच्या नुकसानभरपाईपोटी मोबदला निश्चित करावा.

(ड) अति उच्चदाब वाहिनीच्या प्रकल्पास संबंधित पारेषण कंपनीने काम सुरु केल्याच्या दिनांकालगतच्या मागील तीन वर्षात त्या त्या भागात/लगतच्या गट/ सर्व्हे नंबर मध्ये खरेदी-विक्री व्यवहार झाले नसतील अशा शेत/बिगर शेत जमिनीचे मुल्यांकन मुद्रांक शुल्क विभागाने निश्चित केलेल्या बाजारमुल्य दर-पत्रकानुसारच्या दराने (रेडी रेकनर दर) निश्चित करावे.

६) अति उच्चदाब मनोऱ्याने व्याप्त जमिनीच्या क्षेत्राचे मुल्यांकन ठरविताना पुढे नमूद केलेल्या "ब" प्रमाणे व अति उच्चदाब वाहिनीखालील पट्ट्याचे मुल्यांकन ठरविताना पुढे नमूद केलेल्या "क" प्रमाणे वरील (५) च्या अनुषंगाने शेत व बिगर शेत जमिनीचे मुल्यांकन कसे करावे या बाबतचे स्पष्टीकरणात्मक उदाहरण सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** मध्ये देण्यात आले आहे.

७) उप विभागीय स्तरीय मूल्यांकन समितीने विहित कार्यपद्धतीनुसार संबंधित शेत जमिन/इतर जमिनीचे मूल्यांकन करुन ते संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीस व शेत/जमिन मालकास कळवावे.

८) जमिनीच्या मालकी हक्कासंदर्भात व क्षेत्रफळाबाबत वाद उद्भवल्यास शेत/इतर जमिनीची मोजणी व मालकी हक्काबाबत शासन निर्णय दि. ०२.११.२०२२ मधील परिच्छेद क्र. २.२ नुसार तालुका भूमी अभिलेख कार्यालयाकडून खात्री करुन घेण्यात यावी. ज्या ठिकाणी या शासन निर्णयाच्या "ब (३) " किंवा "क (५)" नुसार मोका पंचनामानंतर संबंधित शेत/इतर जमिन मालक

व संबंधित पारेषण कंपनींचा जमिनीचा मालकी हक्क व क्षेत्रफळाबाबत सहमती असेल त्या ठिकाणी भूमी अभिलेख विभागाकडून खात्री करुन घेण्याची आवश्यकता राहणार नाही.

९) नुकसानभरपाईपोटीच्या मोबदल्याचा आदेश पारित झाल्यानंतर आदेशामध्ये समाविष्ट असलेल्या व्यक्तीचा जर मृत्यू झाल्यास सदर मोबदला आवश्यक कागदपत्रांची [वारस दाखला (Heirship Certificate)/उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate)] पूर्तता करुन त्यांच्या कायदेशीर वारसास पारित केलेल्या आदेशानुसार अदा करावा.

१०) अति उच्चदाब मनो-याखालील जमिनीच्या मोबदल्याची रक्कम समान दोन टप्प्यात देण्यात यावी. पहिल्या टप्प्यात मोबदला मनोरा पायाभरणीच्यावेळी व दुस-या टप्प्यात मोबदला मनोरा उभारणीच्यावेळी देण्यात यावा.

११) ज्या जमिनीतून अति उच्चदाब वाहिनी उभारण्यात आली आहे अशा ठिकाणी वाहिनीच्या पट्ट्याखालील जमिनीचा मोबदला प्रत्यक्ष वाहिनी उभारणीच्यावेळी (तारा ओढण्याच्यावेळी- Stringing) देण्यात यावा.

१२) अति उच्चदाब मनोरा व वाहिनी उभारणीचे काम सुरु असताना जमिनीच्या मालकी हक्कात जर बदल झाल्यास नवीन मालकास उर्वरीत नुकसानभरपाईपोटीचा मोबदला देय राहील. म्हणजेच जमिनीच्या नुकसानभरपाईपोटीचा मोबदला विहित पद्धतीनुसार टप्प्या टप्प्याने देताना त्या त्या वेळी जमिन ज्याचे नावे असेल त्या जमिन मालकास देण्यात यावा. तसेच पिकांच्या/ फळझाडांच्या नुकसानभरपाईपोटीच्या मोबदल्यास त्या त्या वेळचा जमिन मालक / वहिवाटदार पात्र असेल. मात्र असा मोबदला यापूर्वी दिला गेला नसल्याची खात्री करण्यात यावी.

१३) कार्यान्वित झालेल्या (Commissioned) अति उच्चदाब पारेषण वाहिन्यांची क्षमतावाढ व आधुनिकीकरण करताना वाढीव बाधित क्षेत्राचा मोबदला देय राहिल. मात्र उपरोक्त अति उच्चदाब पारेषण वाहिन्यांच्या पूर्वीच उभारलेल्या मनो-याचा व वाहिनीच्या पट्ट्याखालील जमिनीचा मोबदला देय राहणार नाही. कोणत्याही परिस्थितीत बाधित जमिनीचा मोबदला एकदाच दिला जाईल याची सर्व संबंधित सक्षम अधिकारी/पारेषण परवानाधारक कंपनी यांनी खबरदारी घ्यावी.

१४) सदर सुधारित धोरण जाहिर झाल्याच्या दिनांकाला म्हणजेच शासन निर्णय दि. ०२.११.२०२२ रोजी किंवा त्यानंतर सुरु असलेल्या तसेच नविन प्रस्तावित असलेल्या अशा सर्व अति उच्चदाब पारेषण वाहिनी प्रकल्पांना लागू राहिल. तसेच सदर शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकास सुरु असलेल्या (Under Construction) म्हणजे कार्यान्वित होणे बाकी असलेल्या अति उच्चदाब पारेषण वाहिनी उभारणीच्या सर्व प्रकल्पास देखील पूर्वलक्षी प्रभावाने लागू

राहिल. तथापि, काम सुरु असलेल्या म्हणजेच कार्यन्वित होणे बाकी असलेल्या अति उच्चदाब पारेषण वाहिनीच्या प्रकल्पातील ज्या अति उच्चदाब मनो-यांची किंवा अति उच्चदाब पारेषण वाहिन्यांमुळे बाधित झालेल्या जमिनीच्या नुकसानभरपाईपोटी मोबदला अंतिम करुन तो अदा करण्यात आला असेल व सुधारित धोरणानुसार अशा अति उच्चदाब मनोरे तथा अति उच्चदाब पारेषण वाहिन्या यामुळे बाधित झालेल्या जमिनीचा नुकसानभरपाईचा मोबदला जास्त येत असेल तर त्या संबंधित जमिन मालकास फरकाची रक्कम देय राहिल. मात्र जर सुधारित धोरणानुसार जमिनीच्या नुकसानभरपाईपोटी मोबदला कमी येत असेल तर फरकाची रक्कम संबंधित शेत/जमिन मालकाकडून वसूल केली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

१५) अति उच्चदाब पारेषण वाहिनीच्या मार्गात अनधिकृत बांधकाम करणा-या व्यक्ती/संस्था यांना स्वखर्चाने अनधिकृत/बेकायदेशीर बांधकामे विनाविलंब निष्कासित करण्याबाबत लेखी नोटीस संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीकडून देण्यात यावी. जर अशा अनधिकृत बांधकाम करणाऱ्या व्यक्ती/संस्था यांनी स्वखर्चाने अशी बांधकामे निष्कासित न केल्यास अशी बेकायदेशीर/अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याची कार्यवाही करण्यासंदर्भात संबंधित विभाग/यंत्रणा/स्थानिक स्वराज्य संस्था/प्राधिकरणे यांना संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीकडून विनाविलंब कळविण्यात यावे. अशा अनधिकृत / बेकायदेशीर बांधकामांमुळे जिवित अथवा वित्त हानी झाल्यास संबंधित पारेषण कंपनी जवाबदार राहणार नाही.

१७) नुकसानभरपाईपोटी देय होणारा मोबदला संबंधित शेतकरी/जमिन मालक यांच्या बँक खात्यात NEFT/RTGS च्या माध्यामातून जमा करावा. अपवादात्मक / असाधारण परिस्थितीत धनादेशाद्वारे नुकसानभरपाईपोटी देय होणारा मोबदला अदा करावा.

१८) एखाद्या जमिनीच्या मोबदल्यासंदर्भात एकापेक्षा जास्त व्यक्तिंचा समावेश असल्यास, सदर शेत/जमिन मालक/धारक यांनी रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर संमतीपत्र/ प्रतिज्ञापत्र/ मुखत्यारपत्र/नोटरीकृत हमीपत्र लिहून दिलेल्या संबंधित व्यक्तिंपैकी एका व्यक्तीच्या नावावर ऑनलाईन (RTGS/NEFT) पद्धतीचा वापर करुन संबंधिताच्या बँक खात्यात जमा करावा. अपवादात्मक परिस्थितीत असा मोबदला धनादेशाद्वारेसुद्धा अदा करता येईल.

१९) अति उच्चदाब वाहिनी उभारणीचा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर संबंधित जमिन मालकास मोबदला अदा केल्याची नोंद त्यांच्या जमिनीच्या सात-बारा उता-यावर घेण्याकरिता महसूल विभागास संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीने कळवावे.

२०)उप विभागीय स्तरीय मुल्यांकन समिती किंवा जिल्हास्तरीय अपिलिय समितीकडून सुधारित धोरणानुसार ठरविण्यात आलेला जमिनीच्या नुकसानभरपाईपोटीचा मोबदला संबंधित

शेत/जमिन मालकांना संबंधित शासकीय/निमशासकीय/खाजगी पारेषण परवानाधारक कंपन्या त्यांच्या महसूलातून अदा करतील.

ब) मनो-याने व्याप्त जमिनीचे क्षेत्रफळ, ते मोजण्याची व त्या क्षेत्रफळाच्या मुल्यांकनाची कार्यपद्धती:

(१) अति उच्चदाब मनो-याने व्याप्त जमिनीची मोजणी करताना मनो-याच्या पायाभरणीसाठी असलेल्या अभिकल्प/अभियांत्रिकी विभागाकडून (डिझाइन डिपार्टमेंट) नामांकित करुन दिलेल्या तांत्रिक मानांकनाच्या अधिन राहून केलेल्या मनो-याच्या आरेखनाप्रमाणे (डिझाइन / ड्रॉइंग) चारही पायथ्यांच्या खोदकामाचे क्षेत्रफळ विचारात घ्यावे.

(२) अति उच्चदाब मनो-याच्या पायथ्याची लांबी व रुंदी ही मिटर या एककात मोजण्यात यावी.

(३) सदरच्या मोजमापासाठी संबंधित शेतकरी/जमिन मालक/धारक यांच्या समक्ष पंचनामा करुन पायथ्याच्या संयुक्त मोजणीस सबंधित पारेषण कंपनीचे प्रतिनिधी व स्थानिक भागातील कोणत्याही दोन व्यक्ती साक्षीदार म्हणून हजर राहतील.

(४) नुकसान झालेल्या जमिनीचे मोजमाप झाल्यानंतर संबंधित पारेषण परवानाधारक कंपनी अति उच्चदाब मनो-याने व्याप्त जमिनीच्या मोबदल्याचा प्रस्ताव संबंधित उप विभागीय स्तरीय मुल्यांकन समितीकडे पाठवतील.

(५) सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-ब** येथील उदाहरणादाखल दिलेल्या स्पष्टीकरणात्मक रेखाचित्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे अति उच्चदाब मनो-याच्या पायथ्याच्या मोबदल्याची गणना खालील सूत्राप्रमाणे करावी.

सूत्र - एकूण मनो-याने व्याप्त बाधित क्षेत्राचा मोबदला = (खोदकामाची लांबी X खोदकामाची रुंदी) X [(बाजार मुल्य दर पत्राकानुसारचा दर (रेडी रेकनर दर)) किंवा (मागील तीन वर्षात झालेल्या जमिन खरेदी विक्री व्यवहाराच्या आधारे अ (५) अनुसार येणारा सरासरी दर) या पैकी जो अधिक असेल तो दर] X २.

(६) जमिनीची मोजणी केल्यानंतर जमिनीचे क्षेत्रफळ अपूर्णांकात येत असेल तर ती पुढील पूर्णांकास समायोजित करण्यात यावी. (उदा. १२५.२ चौ.मी = १२६ चौ.मी)

क) व्होल्टता स्तरानुसार अति उच्चदाब वाहिनीच्या पट्ट्याखालील जमिनीच्या क्षेत्रफळाची गणना तसेच त्या क्षेत्रफळाच्या मुल्यांकनाची कार्यपद्धती:

सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-क** (१, २ व ३) येथील उदाहरणादाखल दिलेल्या स्पष्टीकरणात्मक रेखाचित्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे अति उच्चदाब पारेषण वाहिनी उभारण्याकरिता उभारण्यात येणा-या मनो-याच्या दोन्ही बाजुकडील प्रत्यक्ष वाहिनीखालील जमिनीचा व्याप्त भाग

तसेच रेखाचित्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे पारेषण वाहिन्यांच्या आडव्या झोक्यामधील अंतराने व्याप्त भाग, यात वाहिनीजवळील झाडे, विद्यमान व भविष्यातील संभाव्य विविध बांधकामे इत्यादीमुळे वाहिनीस नुकसान तथा मनुष्यहानी तथा इतर नुकसान होऊ नये यासाठी आवश्यक सुरक्षीत अंतर (RoW Line corridor) राखण्यात येते.

या अनुषंगाने:

(१) केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने विहित केल्यानुसार वाहिनीच्या पट्ट्याखालील (Line Corridor)जमिनीची रुंदी उदाहरणादाखल सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-ड** प्रमाणे राहील. व्होल्टतास्तरानुसार वाहिनीच्या पट्ट्याखालील जमिनीची रुंदी खालीलप्रमाणे राहिल.

व्होल्टता स्तर	**वाहिनीच्या पट्ट्याखालील (Line Corridor) जमिनीची रुंदी (मीटर मध्ये)**
६६ के.व्ही.	१८
११० के.व्ही.	२२
१३२ के.व्ही.	२७
२२० के.व्ही.	३५
४०० के.व्ही. एकपथ वाहिनी	४६
४०० के.व्ही. द्विपथ वाहिनी	४६
+/- ५०० के.व्ही. एच.व्ही.डी.सी	५२
७६५ के.व्ही. एकपथ वाहिनी	६४
७६५ के.व्ही. द्विपथ वाहिनी	६७
+/- ८०० के.व्ही. एच.व्ही.डी.सी	६९
१२०० के.व्ही.	८९

(२) ज्या जमिनीतून फक्त अति उच्चदाब वाहिनीच्या तारा गेलेल्या आहेत अशा ठिकाणी फक्त वाहिनीच्या पट्ट्याखाली (Line Corridor) येणा-या जमिनीचा मोबदला अनुज्ञेय राहिल.

(३) एकपथ/द्विपथ/बहुपथ अति उच्चदाब मनो-यांवरील उजव्या व डाव्या बाजुस असणा-या तारांसाठी मनो-याची मध्य रेषा व व्होल्टता स्तरानुसार असलेल्या वाहिनीच्या पट्ट्यामधील उजव्या व डाव्या बाजुचे समसमान अंतर म्हणजेच रुंदी म्हणून समजण्यात यावी.

(४) अति उच्चदाब मनो-याच्या मध्य रेषेस शेतातील / जमिनीवरील बांध/ सीमा/ हद्द जेथे छेदतील त्यांच्यातील अंतर हे लांबी म्हणून समजण्यात यावी.

(५) सदरच्या मोजमापासाठी संबंधित शेतकरी/जमिन मालक/धारक यांच्या समक्ष पंचनामा करुन अति उच्चदाब वाहिनीच्या पट्ट्याखालील जमिनीच्या संयुक्त मोजणीस सबंधित पारेषण कंपनीचे प्रतिनिधी व स्थानिक भागातील कोणत्याही दोन व्यक्ती साक्षीदार म्हणून हजर राहतील.

(६) अति उच्चदाब वाहिनीच्या पट्ट्याखालील जमिनीची लांबी व रुंदी ही मीटर या एककात मोजण्यात यावी.

(७) जर द्विपथ अथवा बहुपथ अति उच्चदाब मनो-यावर एकाबाजुस अति उच्चदाब वाहिनीचे काम होत असल्यास, वाहिनीच्या पट्ट्याखालील क्षेत्रफळ व मोबदल्याची गणना खालील मुद्दा क्र. ८ (ब) मधील सूत्रानुसार करण्यात यावी. तसेच पूर्वी उभारलेल्या मनोऱ्यावर भविष्यात ज्यावेळी मनोऱ्याच्या दुसऱ्या बाजुस तारा ओढण्याचे काम होईल त्यावेळी वाहिनीच्या पट्ट्याखालील उर्वरीत रुंदीची (Line Corridor ची) नुकसानभरपाई देण्यात यावी. मात्र दोन्ही बाजूस एकाच वेळी तारा ओढल्यास बाधित जमिनीचा मोबदला खालील मुद्दा क्र. ८ (अ) मधील सूत्रानुसार देय राहील.

(८) अति उच्चदाब वाहिनीच्या पट्ट्याखालील क्षेत्रफळ व मोबदल्याची गणना खालील सूत्रानुसार करण्यात यावी.

अ) **द्विपथ मनोऱ्यावरील द्विपथ वाहिनी/ बहुपथ मनोऱ्यावरील बहुपथ वाहनी (For DCDC Line/MCMC Line):**

सूत्र - एकूण बाधित क्षेत्रफळाचा मोबदला = [लांबी X (रुंदी X २)] X [बाजार मुल्य दरपत्रकानुसारचा दर (रेडी रेकनर दर) किंवा (मागील तीन वर्षात झालेल्या खरेदी विक्री व्यवहाराच्या आधारे अ (५) अनुसार येणारा सरासरी दर) या पैकी जो अधिक असेल तो दर] X ३०%.*

ब) **द्विपथ मनोऱ्यावरील एकपथ वाहिनी म्हणजेच (SCDC Line) /पुर्वी उभारलेल्या द्विपथ मनोऱ्यावर दुसऱ्या बाजूस तारा ओढणे (२nd Ckt Stringing):**

सूत्र - एकूण बाधित क्षेत्रफळाचा मोबदला = [लांबी X रुंदी] X [बाजार मुल्य दरपत्रकानुसारचा दर (रेडी रेकनर दर) किंवा (मागील तीन वर्षात झालेल्या खरेदी विक्री व्यवहाराच्या आधारे अ (५) अनुसार येणारा सरासरी दर) या पैकी जो अधिक असेल तो दर] X ३०%.*

(* टिप- वाहिनीच्या पट्ट्याखालील जमिनीच्या मोजणीप्रमाणे आलेल्या क्षेत्रफळाचा मोबदला १५% + जमिनीच्या क्षेत्रफळाच्या मोबदल्या व्यतिरिक्त **ना- उपयोगिता भत्ता** स्वरुपात अतिरिक्त १५% मोबदला असा एकूण ३०% मोबदला)

ड) पिक, फळे व इतर झाडांची नुकसानभरपाई निश्चित करण्याची कार्यपद्धती:

अति उच्चदाब वीज पारेषण वाहिनी उभारताना संबंधित शेतकरी / जमिन मालकांच्या जमिनीवरील पिके, फळझाडे किंवा इतर झाडांचे नुकसान होते. अशा नुकसानभरपाईपोटी मोबदला दिला जातो. अशा नुकसानभरपाईपोटीचा मोबदला देताना संबंधित विभागाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे सक्षम अधिका-याने प्रमाणित केल्यानंतर मोबदला संबंधित शेतकरी / जमिन मालकांना देण्यात येतो. या अनुषंगाने-

(१) अति उच्चदाब मनोरा पायाभरणी, मनोरा उभारणी व तारा ओढताना संबंधित जमिनीवरील बाधित क्षेत्रातील पीक/फळझाडे/इतर झाडांचे नुकसान झाल्यास संबंधित जमीन मालकास नुकसानभरपाई देण्यात यावी.

(२) अस्तित्वात असलेल्या अति उच्चदाब वाहिन्यांची क्षमतावाढ वा आधुनिकीकरण करताना संबंधित जमिनीवरील बाधित क्षेत्रातील पीक /फळझाडे/इतर झाडांचे नुकसान झाल्यास नुकसानभरपाई देण्यात यावी.

(३) अति उच्चदाब मनोरा अथवा वाहिनी उभारणी करताना शेतातील / जमिनीवरील बाधित क्षेत्रात होणा-या फळे वा इतर झाडांच्या नुकसानीचा पंचनामा फलोत्पादन अधिकारी, संबंधित शेतकरी, दोन साक्षीदार व संबंधित पारेषण कंपनीचे अधिकारी यांच्या समक्ष करण्यात यावा.

(४) अति उच्चदाब मनोरा पायाभरणी, मनोरा उभारणी व तारा ओढताना नुकसान झालेल्या पिकांचा पंचनामा संबंधित शेतकरी, दोन साक्षीदार व पारेषण परवानाधारक कंपनीचे अधिकारी यांच्या समक्ष करण्यात यावा. सदर पंचनामाच्या क्षेत्रफळावरुन व शासनाच्या संबंधित विभागाच्या प्रचलित धोरणानुसार नुकसानभरपाईची रक्कम निश्चित करण्यात यावी व त्यानुसार मोबदला संबंधित शेत/जमिन मालकास संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीने त्यांच्या महसूलातून अदा करावा.

(५) फळझाडांच्या बाबतीत तालुका कृषी अधिकारी/फलोत्पादन अधिकारी यांचे समक्ष मोका पंचनामा करताना फळ झाडांची संख्या, बुंध्याची जाडी, झाडांचे भविष्यातील उर्वरीत वय, सरासरी वार्षिक उत्पादन व त्यापासून मिळणारे उत्पन्न इ. बाबी विचारात घेऊन प्रती झाडांची किंमत निश्चित करावी व त्या आधारे एकूण नुकसान होणा-या झाडांचे मूल्यांकन तालुका कृषी अधिकारी / फलोत्पादन अधिकारी यांच्या कडून कृषी/फलोत्पादन विभागाच्या प्रचलित धोरणानुसार निश्चित करुन घ्यावे व त्यानुसार मोबदला संबंधित शेत/जमिन मालकास संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीने त्यांच्या महसूलातून अदा करावा.

(६) फळ झाडांच्या व्यतिरिक्त बाधित क्षेत्रातील इतर झाडांच्या (वन विभागाच्या घोषित यादीमध्ये समावेश नसलेली झाडे) होणा-या नुकसानभरपाईपोटी देय होणारा मोबदला संबंधित

विभागाकडून मुल्यांकन प्राप्त करुन घेऊन संबंधित शेत/जमिन मालकास संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीने त्यांच्या महसूलातून अदा करावा.

(७) खाजगी जमिनीवर वन विभागाच्या घोषित यादीमध्ये (वर्गीकृत) समावेश असलेल्या बाधित क्षेत्रातील झाडांच्या होणा-या नुकसानापोटी देय होणारा मोबदला संबंधित वन विभागाकडून मुल्यांकन प्राप्त करुन घेऊन तो संबंधित शेत/जमिन मालकास संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीने त्यांच्या महसूलातून अदा करावा.

इ) वन/केंद्र/राज्य/केंद्र शासनाचे अंगीकृत प्राधिकरणाच्या जमिनीबाबत:

(१) वन विभागाच्या जमिनीतून अति उच्चदाब पारेषण वाहिन्या उभारल्या जात असतील तर अशा वन जमिनीच्या नुकसानापोटी वन विभागाच्या प्रचलित नियमानुसार देय होणारा मोबदला संबंधित वन प्राधिकाऱ्याने मुल्यांकन करुन प्रमाणित केल्यानंतर तो संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीने वन विभागास त्यांच्या महसूलातून अदा करावा.

(२) वन विभागाने वाटप केलेल्या वनपट्टाधारक जमिनीसंबंधात वन विभागाच्या अटी व शर्तींच्या अधिन राहून संबंधित वनपट्टाधारकास नुकसानभरपाईचा मोबदला संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीने त्यांच्या महसूलातून अदा करावा.

(३) केंद्र शासन तथा केंद्र शासनाची प्राधिकरणे यांच्या मालकीच्या जमिनीसंदर्भात केंद्र शासनाच्या संबंधित मंत्रालयाच्या प्रचलित/विहित नियमानुसार व कार्यपद्धतीनुसार जमिनीच्या नुकसानापोटीचा मोबदला संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीने त्यांच्या महसूलातून अदा करावा.

(४) शासकीय / निम-शासकीय संस्थेने त्यांची जागा/जमिन भाडेतत्वावर खाजगी व्यक्ती/संस्था यांना दिली असल्यास अशा जागेच्या/जमिनीच्या नुकसानापोटीचा मोबदला संबंधित पट्टाधारक/लीज धारक यांना सदर शासन निर्णयामध्ये विहित कार्यपद्धतीनुसार संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीने त्यांच्या महसूलातून अदा करावा.

ई) उप विभागीय स्तरीय मुल्यांकन समितीची कार्यकक्षा व कार्यपद्धती:

(१) अति उच्चदाब पारेषण वाहिनी व त्याकरिता लागणा-या मनो-याने बाधित होणा-या तथा झालेल्या जमिनीच्या नुकसानभरपाईपोटी मोबदला ठरविण्यासाठी जिल्हातील उप विभाग निहाय उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली उप विभागीय स्तरीय मुल्यांकन समिती दि. ०२.११.२०२२ च्या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे स्थापन करण्यात आली आहे:-

अ.क्र.	पदनाम	समितीतील पद
१	उप विभागीय अधिकारी (प्रांताधिकारी)	अध्यक्ष
२	उप अधीक्षक भूमी अभिलेख	सदस्य
३	सहाय्यक संचालक, नगर रचना मुल्यांकन (संबंधित विभाग)	सदस्य
४	तालुका / उप विभागीय कृषी अधिकारी	सदस्य
५	संबंधित दुय्यम निबंधक	सदस्य
६	संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीचे प्रतिनिधी	सदस्य
७	राज्य पारेषण उपक्रम (महापारेषण) यांनी उपविभाग निहाय प्राधिकृत केलेला, किमान कार्यकारी अभियंता दर्जाचा अधिकारी	सदस्य सचिव

(२) राज्य पारेषण उपक्रमाने वरील उप विभागीय स्तरीय मुल्यांकन समितीसाठी अ. क्र. ७ नुसार उप विभागनिहाय कार्यकारी अभियंता/ तत्सम दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नियुक्तीचे आदेश हा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर विनाविलंब पारित करावेत.

(३) संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीमार्फत अति उच्चदाब मनो-याने व्याप्त जमिनीचा तसेच वाहिनीच्या पट्ट्याखाली येणा-या जमिनीचे मोजमाप वरील "ब (३)" व "क (५)" नुसार पंचनामा करुन उक्त समितीच्या सदस्य सचिव यांनी संबंधित उप विभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी) तथा समिती अध्यक्ष यांच्याकडे जमिनीच्या नुकसानभरपाईपोटीचा मोबदला निश्चितीचा प्रस्ताव सादर करावा.

(४) प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी) तथा समिती अध्यक्ष यांनी सदर प्रस्ताव समितीमधील इतर सदस्य यांची ३० दिवसांत बैठक आयोजित करुन त्यावर समितीने विनाविलंब निर्णय घ्यावा.

(५) उप विभागीय स्तरीय मुल्यांकन समितीने मुल्यांकन निश्चित केल्यानंतर मुल्यांकनाबाबतच्या सर्व बाबी योग्य असल्यास संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीला शेत/जमिन मालकास/धारकास निश्चित केलेला मोबदला अदा करण्यासाठी ७ दिवसांच्या आत आदेश पारित करावेत.

(६) उप विभागीय स्तरीय मुल्यांकन समितीच्या अध्यक्षाने आदेश पारित केल्यानुसार संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीने ३० दिवसात संबंधित शेत/जमिन मालकास नुकसानभरपाईपोटीचा देय होणारा मोबदला त्यांच्या महसूलातून अदा करावा.

उ) जिल्हास्तरीय अपिलिय समितीची कार्यकक्षा व कार्यपद्धती:

(१) अति उच्चदाब पारेषण वाहिनी व त्याकरिता लागणा-या मनो-याने बाधित होणा-या तथा झालेल्या जमिनीच्या नुकसानभरपाईपोटी मोबदल्या संदर्भात जिल्हास्तरीय अपिलीय समिती

संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०२.११.२०२२ च्या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे स्थापन करण्यात आली आहे:-

अ.क्र.	पदनाम	समितीतील पद
१	जिल्हाधिकारी	अध्यक्ष
२	संबंधित उप विभागीय अधिकारी (प्रांताधिकारी)	सदस्य
३	राज्य पारेषण उपक्रम (महापारेषण) यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी	सदस्य
४	संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीचा प्रतिनिधी	सदस्य

(२) राज्य पारेषण उपक्रमाने वरील जिल्हा स्तरीय अपिलीय समितीसाठी अ. क्र. ३ नुसार जिल्हा निहाय अधिक्षक अभियंता/ तत्सम दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नियुक्तीचे आदेश हा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर विनाविलंब पारित करावेत.

(३) उप विभागीय स्तरावरील मुल्याकंन समितीने जमिनीच्या नुकसानभरपाईपोटीच्या मोबदल्या संदर्भात दिलेल्या आदेशाविरुद्ध संबंधित शेत/जमिन मालकास/धारकास किंवा पारेषण परवानाधारक कंपनीस आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसात संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या अपिलीय समितीकडे लेखी अपील दाखल करता येईल.

(४) सदर अपिलिय समितीने दाखल अपिलावर उप विभागीय स्तरावरील मुल्यांकन समितीकडून अहवाल मागवून रितसर सर्व संबंधितांची सुनावणी घ्यावी.

(५) सुनावणी दरम्यान अपिलार्थींची बाजु ऐकून शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. पावामो-२०२१/प्र.क्र.१७०/उर्जा-४, दिनांक ०२ नोव्हेंबर २०२२ मधील तरतुदींनुसार सखोल तपासणी करावी.

(६) संबंधित अपिलार्थींना आपली बाजु मांडण्यासाठी पुरेशी संधी दिल्यानंतर अपिलात तथ्य वाटल्यास अपिलीय समिती उप विभागीय स्तरीय समितीने पारित केलेल्या आदेशाचे स्वत: पुर्नमुल्यांकन करेल किंवा प्रकरण पुर्नविचारार्थ उप विभागीय स्तरीय मुल्यांकन समितीकडे पाठवेल किंवा अपिल फेटाळेल. जिल्हा स्तरीय अपिलीय समिती त्यांचा आदेश उचित कारणमिमांसेसह (Speaking Order) निर्गमित करेल.

(७) जिल्हास्तरीय अपिलीय समितीने समितीकडे अपिल दाखल झाल्यानंतर अपिल जास्तीत जास्त ६० दिवसात निकाली काढावे.

(८) अपिलीय समितीने जमिनीच्या नुकसानभरपाईपोटी मोबदल्यासंदर्भात पारित केलेल्या आदेश/निर्णयाविरुद्ध संबंधित शेतक-यास/जमिन मालकास/धारकास/पारेषण परवानाधारक

कंपनीस संबंधित सक्षम न्यायालयाकडे दाद मागता येईल. **अन्य ठिकाणी अपिल / निवेदन दाखल केल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही.**

ऊ) अपवादात्मक / असाधारण परिस्थितीबाबत:

उप विभागीय स्तरीय मूल्यांकन समितीने अपवादात्मक/असाधारण परिस्थिती, प्रकल्पाचे महत्व व प्रकल्पास होणारा विलंब विचारात घेऊन जमिनीच्या मूल्यांकनाबाबत जमिनीच्या नुकसानभरपाईपोटी मोबदल्याबाबत उचित निर्णय घेऊन मोबदल्याचे आदेश पारित करावेत.

२. वरीलप्रमाणे निश्चित केलेल्या कार्यकक्षा व कार्यपद्धतीनुसार ६६ के.व्ही. व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या अति उच्चदाब पारेषण वाहिन्यांसाठी उभारण्यात येणा-या मनो-याने व्याप्त जमिनीचा तसेच अति उच्चदाब पारेषण वाहिनीच्या पट्ट्याखालील जमिनीचा नुकसानभरपाईपोटी मोबदला संबंधित शेतकरी/जमिन मालक यांना विहित मुदतीत अदा करण्याबाबत सर्व संबंधितांनी आवश्यक ती कार्यवाही करावी असे आदेश या शासन निर्णयान्वये देण्यात येत आहेत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२२१२०११२४८५९९६१० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by SURESH DNYANDEO REDEKAR
Date: 2022.12.01 12:58:25 +05'30'

(सुरेश रेडेकर)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्रे :- परिशिष्ट अ, ब, क (१,२,३) व ड

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य.
८) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव
९) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
१०) मा. उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
११) सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
१२) मा. मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

शासन निर्णय क्र. पावामो-२०२१/प्र.क्र.१७०/ऊर्जा-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०२२ चे सहपत्र

परिशिष्ट - अ

अति उच्चदाब वाहिनीच्या मनोऱ्याने व्याप्त व वाहिनीच्या पट्ट्याखालील बाधित होणा-या शेत/ बिगर शेत (अकृषक) जमिनीचे मुल्यांकन कसे करावे या बाबतचे स्पष्टीकरणात्मक उदाहरण

समजा: १) ४०० के.व्ही. डी.सी. लाईनच्या "डी टाईप" मनोऱ्याच्या पायथ्याचे क्षेत्रफळ= १८ X १८ = ३२४ चौ.मी.

२) वाहिनीखालील पट्ट्याच्या बाधित जमिनीचे क्षेत्रफळ = १०००० चौ.मी.

३) शेतजमिनीचा रेडी रेकनर हेक्टरी दर रुपये ३ लाख म्हणजेच शेत जमिनीचा चौरस मीटरचा दर = ३००००० / १०००० = ३० रु. प्रती चौ.मी.

४) शेतजमिनीचा गेल्या तीन वर्षात झालेल्या खरेदी-विक्री व्यवहाराचा सरासरी दर = रुपये ४ लाख प्रती हेक्टर म्हणजेच शेत जमिनीचा खरेदी-विक्री व्यवहारानुसार आलेला सरासरी प्रती चौरस मीटर दर = ४००००० / १०००० = ४० रु. प्रती चौ.मी.

५) बिगर शेतजमिनीचा (अकृषक) रेडी रेकनर दर = रुपये १०००/- प्रती चौ.मी.

६) मागील तीन वर्षात बिगर शेत जमिनीचे झालेल्या खरेदी-विक्री व्यवहाराचा सरासरी दर = रुपये ९००/- प्रती चौ.मी.

अ)मनोऱ्याने व्याप्त जमिनीच्या नुकसानभरपाईपोटी देय मोबदल्याचे मुल्यांकन:

१) शेत जमिनीसाठी-

i) अति उच्चदाब पारेषण वाहिनी ज्या शेत जमिनीतून जाते त्या शेताचे मनोऱ्याने व्याप्त जमिनीचे क्षेत्रफळ= ३२४ चौ.मी. ---- वरील समजा येथील १ प्रमाणे

ii) वरील समजा ३ व ४ येथील शेतीचे हेक्टरी रेडी रेकनर दर व मागील ३ वर्षातील खरेदी-विक्री व्यवहाराच्या आधारे आलेला सरासरी दर यांची तुलना केल्यास सरासरी दर अधिक असल्याने, ४०० के.व्ही. डी.सी.क्यु. लाईनच्या डी टाईप मनो-याने व्याप्त जमिनीचे मुल्यांकन = ३२४ चौ.मिटर X ४० X २ = रू. २५,९२०/-

२) बिगर शेत (अकृषक) जमिनीसाठी-

i) अति उच्चदाब पारेषण वाहिनी ज्या बिगर शेत जमिनीतून जाते त्या जमिनीचे मनोऱ्याने व्याप्त जमिनीचे क्षेत्रफळ= ३२४ चौ.मी. ---- वरील समजा येथील १ प्रमाणे

ii) वरील समजा ४ येथील बिगर शेतजमिनीचा रेडी रेकनर दर= रुपये १०००/- प्रती चौ.मी.

iii) ४०० के.व्ही. डी.सी.क्यु. लाईनच्या डी टाईप मनो-याने व्याप्त जमिनीचे मुल्यांकन = ३२४ चौ.मिटर X १०००* X २ = रू. ६,४८,०००/-

(* वरील समजा येथील ५ व ६ दरातील तुलनेनंतर असलेला अधिकचा दर)

ब) वाहिनीच्या पट्ट्याने व्याप्त जमिनीच्या नुकसानभरपाईपोटी देय मोबदल्याचे मुल्यांकन:

१) शेत जमिनीसाठी-

i) वाहिनीच्या पट्ट्याने बाधित झालेल्या जमिनीचे क्षेत्रफळ = १०००० चौ.मी.--- वरील समजा २ प्रमाणे

ii) वाहिनीच्या पट्ट्याने बाधित झालेल्या शेत जमिनीचे मुल्यांकन=१००००X४०*X३०%= रु. १,२०,०००/-

(*वरील समजा येथील ३ व ४ च्या दरातील तुलनेनंतर असलेला अधिकचा दर)

२) बिगर शेत (अकृषक) जमिनीसाठी-

i) वाहिनीच्या पट्ट्याने बाधित झालेल्या बिगर शेत (अकृषक) जमिनीचे क्षेत्रफळ = १०००० चौ.मी. --- वरील समजा २ प्रमाणे

ii) वाहिनीच्या पट्ट्याने बाधित झालेल्या बिगर शेत (अकृषक) जमिनीचे मुल्यांकन=१००००X१०००*X३०%= रु. ३०,००,०००/-

(*वरील समजा येथील ५ व ६ च्या दरातील तुलनेनंतर असलेला अधिकचा दर)

टीप: वरील समजा येथील १ ते ६ मध्ये नमुद केलेली आकडेवारी ही स्पष्टीकरणात्मक उदाहरणासाठी घेतली असुन त्याचा प्रत्यक्ष मोजमाप, दर व मुल्यांकन यांच्याशी संबंध नाही.

****

शासन निर्णय क्र. पावामो-२०२१/प्र.क्र.१७०/ऊर्जा-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०२२ चे सहपत्र

परिशिष्ट - ब

मनोऱ्याने व्याप्त जमिनीचे क्षेत्रफळ मोजणीची कार्यपद्धती :

६६ के.व्ही. व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या पारेषण वाहिन्यांची मनोऱ्याने व्याप्त जमिनीच्या मोजणीबाबतचे उदाहरणादाखल स्पष्टीकरणात्मक रेखाचित्र.



मनोऱ्याने व्याप्त जमिनीचे क्षेत्रफळ (A-B-C-D) = खोदकामाची लांबी (A-B) X खोदकामाची रुंदी (B-C)

शासन निर्णय क्र. पावामो-२०२१/प्र.क्र.१७०/ऊर्जा-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०२२ चे सहपत्र

परिशिष्ट - क (१)

वाहिनीचा पट्टयाखालील बाधित क्षेत्राच्या मोजणीची कार्यपद्धतीः-
६६ के.व्ही. व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या पारेषण वाहिनीच्या पट्टयाखालील बाधित क्षेत्राच्या जमिनीच्या मोजणीबाबतचे उदाहरणादाखल स्पष्टीकरणात्मक रेखाचित्र.



शेत नं.१ येथील जमिनीच्या नुकसान भरपाई पोटीचा मोबदला देण्यासाठी वाहीनीच्या पट्टयाने व्यापलेले क्षेत्रफळ (N-C-G-J-N)
= लांबी (L-E) x रुंदी (C-E किंवा E-G किंवा- N-L किंवा L-J) x २

शासन निर्णय क्र. पावामो-२०२१/प्र.क्र.१७०/ऊर्जा-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०२२ चे सहपत्र

परिशिष्ट - क (२)

वाहिनीचा पट्ट्याखालील बाधित क्षेत्राच्या मोजणीची कार्यपद्धतीः-
६६ के.व्ही. व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या पारेषण वाहिनीच्या पट्ट्याखालील बाधित क्षेत्राच्या जमिनीच्या मोजणीबाबतचे उदाहरणादाखल स्पष्टीकरणात्मक रेखाचित्र.



शेत नं.२ येथील जमिनीच्या नुकसान भरपाई पोटीचा मोबदला देण्यासाठी वाहीनीच्या पट्ट्याने व्यापलेले क्षेत्रफळ (N-C-G-J-N)
= लांबी (L-E) x रुंदी (C-E किंवा E-G किंवा- N-L किंवा L-J) x २

शासन निर्णय क्र. पावामो-२०२१/प्र.क्र.१७०/ऊर्जा-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०२२ चे सहपत्र

परिशिष्ट - क (३)

वाहिनीचा पट्टयाखालील बाधित क्षेत्राच्या मोजणीची कार्यपद्धतीः-
६६ के.व्ही. व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या पारेषण वाहिनीच्या पट्टयाखालील बाधित क्षेत्राच्या जमिनीच्या मोजणीबाबतचे उदाहरणादाखल स्पष्टीकरणात्मक रेखाचित्र.



शेत नं.३ येथील जमिनीच्या नुकसान भरपाई पोटीचा मोबदला देण्यासाठी वाहीनीच्या पट्टयाने व्यापलेले क्षेत्रफळ (N-C-G-J-N)
= लांबी (L-E) x रुंदी (C-E किंवा E-G किंवा- N-L किंवा L-J) x २ = [मनोऱ्याने व्याप्त जमिनीचे क्षेत्रफळ (P-Q-R-S-P)]

शासन निर्णय क्र. पावामो-२०२१/प्र.क्र.१७०/ऊर्जा-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०२२ चे सहपत्र

परिशिष्ट - ड



औद्योगिक किंवा वाणिज्यिक आस्थापना उभारण्यासाठी मागणी केलेली जमीन थेट खरेदीने /भूसंपादन करून सार्वजनिक निविदा अथवा लिलावाशिवाय मागणी करणाऱ्या हितसंबंधित व्यक्तीला भाडेपट्ट्याने देणेबाबतची योजना...

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन निर्णय क्रमांक : खाक्षेस-२०१६/प्र.क्र.२५१- एलबी-४/रस्ते-८,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक : ०२ डिसेंबर, २०२२

वाचा : १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२ मे, २०१५
२) शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. खाक्षेस-२०१६/प्र.क्र.२५१/रस्ते-८, दिनांक ५ जुलै, २०१६
३) शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. खाक्षेस-२०१६/प्र.क्र.२५१/रस्ते-८, दिनांक ४ जानेवारी, २०१७
४) शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एलक्यूएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५जानेवारी, २०१७

प्रस्तावना :-

हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग हा प्रकल्प राज्य शासनाचा महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. सदर प्रकल्पाकरीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित ही -कार्यान्वयीन यंत्रणा॰ आहे. तसेच सदर अधिनियमाच्या कलम ५ अन्वये महामार्ग प्राधिकरणाच्या कार्यांमध्ये (Duties of Highway Authority) नवीन नगरांचा विकास करणे (Devlopment of New Towns) या बाबीचा अंतर्भाव करण्यात आला आहे. त्यामुळे शासनाने सदर द्रुतगती मार्गावर २४ ठिकाणी नवनगरे (कृषी समृद्धी केंद्रे) स्थापित करण्याचा निर्णय घेतला आहे व त्याकरिता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांस -नवनगर विकास प्राधिकरण॰ म्हणून घोषित केले आहे. सदर नवनगरांसाठी लँड पुलिंग योजनेद्वारे जमीन प्राप्त करण्यास शासनाने दिनांक ५ जुलै, २०१६ व दिनांक ४ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.

भविष्यकाळात संपूर्ण राज्यामध्ये द्रुतगती मार्गांचे जाळे तयार करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत विविध शीघ्रसंचार द्रुतगती मार्गांचे काम देखील हाती घेण्यात आले आहे.

महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ मधील कलम ४ अन्वये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या सर्व प्रकल्पांसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ हे -महामार्ग प्राधिकरण॰ आहे. विविध शीघ्रसंचार द्रुतगती मार्ग व नवनगरांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात वाणिज्यिक व औद्योगिक गुंतवणुक आकृष्ट करुन राज्याचा संतुलीत विकास करण्याचा शासनाचा मानस आहे.

लँड पुलिंग योजनेद्वारे नवनगरांसाठी जमीनी प्राप्त करण्याचा प्रयत्न केला असता त्यास लोकांचा प्रतिसाद लाभला नाही. हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग प्रकल्प कार्यान्वित करण्यास विलंब होऊ नये म्हणून दिनांक १२ मे, २०१५ च्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयातील कार्यपद्धतीचा अवलंब करून दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदीने जमिनी खरेदी करण्याचे आदेश देण्यात आले. सदर पद्धतीने अतिशय कमी कालावधीत आवश्यक जमिनी ताब्यात घेण्यात आल्यामुळे प्रचलित पद्धतीने लागणारा भूसंपादनाच्या कालावधीमध्ये व नवीन भूसंपादन कायद्यानुसार जमिनी ताब्यात घेतल्यामुळे उद्भवणाऱ्या भूसंपादन संदर्भांच्या व अन्य कायदेशीर दाव्यांच्या संख्येतही लक्षणीय घट झाली आहे.

महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाच्या कलम ६३अ नुसार महामार्ग प्राधिकरणास त्यांच्याकडे निहित झालेल्या जमिनीची विहित रीतीने विल्हेवाट लावता येते. उक्त अधिनियमाच्या कलम ६३अ व कलम ७१ च्या तरतुदीनुसार राज्य शासनाने महाराष्ट्र महामार्ग (महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडील जमिनींची विल्हेवाट लावणे) नियम, २०१८ शासन राजपत्रात प्रसिद्ध केले आहे. महाराष्ट्र महामार्ग (महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडील जमिनींची विल्हेवाट लावणे) नियम, २०१८ मधील भूखंडांच्या विल्हेवाटी संदर्भातील नियम ५च्या उप-नियम (१) मधील प्रवर्ग (ङ) मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे.

‘ (ङ) महामंडळाकडून वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येईल अशा योजनेस अनुरुप असलेले उद्योग किंवा वाणिज्य आस्थापना उभारण्यासाठी, कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीला, अशा भूखंडाच्या मागणीवर आधारित, जमीन विषयक धोरण व वार्षिक भाडे यानुसार एकरकमी भाडेपट्टा अधिमुल्याच्या विनिर्दिष्ट दराने वाटप.’ ’

उपरोक्त नियम विचारात घेता महामंडळाच्या मालकीच्या जमिनी सार्वजनिक निविदा अथवा लिलावाशिवाय हितसंबंधित व्यक्तिला औद्योगिक किंवा वाणिज्यिक आस्थापना उभारण्यासाठी एकरकमी भाडेपट्ट्याने देण्याची कायदेशीर तरतूद असल्याचे स्पष्ट होते.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या विविध महामार्गांलगतच्या परिसरात रोजगाराच्या व्यापक संधी निर्माण करणे, स्थानिक परिसरातील लोकांच्या जीवनमानाचा स्तर उंचावणे व पर्यायाने राज्याचा आर्थिक विकासाचा वेग वाढविणे यासाठी विविध औद्योगिक व वाणिज्यिक घटकांनी नवनगरांच्या विकासासाठी गुंतवणुक करणे आवश्यक आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने अर्जदाराने मागणी केलेली जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे खरेदी करुन /भूसंपादन करुन उपरोक्त नियम ५च्या उप-नियम (१) मधील प्रवर्ग (ङ) नुसार सार्वजनिक निविदा अथवा लिलावाशिवाय जमीन मागणी करणाऱ्या हितसंबंधित व्यक्तिला भाडेपट्ट्याने देणे क्रमप्राप्त आहे. काही औद्योगिक व वाणिज्यिक घटकांकडून औद्योगिक अथवा वाणिज्यिक आस्थापना प्रकल्पांसाठी विशिष्ट क्षेत्रांची मागणी देखील होत आहे.

त्यामुळे राज्याच्या आर्थिक व औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी, वर नमूद केल्याप्रमाणे सार्वजनिक निविदा अथवा लिलावाशिवाय जमीन मागणी करणाऱ्या हितसंबंधित व्यक्तिला भाडेपट्ट्याने भूखंड वाटप करण्याबाबतची योजना निश्चित करुन सदर प्रक्रियेमध्ये सुलभता आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. उपरोक्त संबधित शासन निर्णय व कायदेशीर तरतुदी विचारात घेऊन शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय :</u>

(१) एखाद्या औद्योगिक अथवा वाणिज्यिक घटकाने महामंडळाने (महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ) विकसित केलेल्या महामार्गांलगतच्या परिसरातील विशिष्ट क्षेत्राची औद्योगिक किंवा वाणिज्यिक आस्थापना उभारण्यासाठी मागणी केली असता सदर क्षेत्र थेट खरेदीने / भूसंपादन करून सार्वजनिक निविदा अथवा लिलावाशिवाय, महामंडळ निश्चित करेल असे अधिमुल्य आकारून महाराष्ट्र महामार्ग (महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडील जमिनींची विल्हेवाट लावणे) नियम, २०१८ मधील तरतुदींनुसार संबंधित घटकाला भाडेपट्ट्याने देण्याच्या योजनेस शासन मान्यता देण्यात येत आहे.

(२) सदर प्रक्रिया सुलभपणे पार पाडण्यासाठी खालील कार्यपद्धती निश्चित करण्यात येत आहे.

(I) <u>प्रस्ताव</u>

संबधित वाणिज्यिक अथवा औद्योगिक घटकाने प्रस्तावित गुंतवणुकीच्या अनुषंगाने आवश्यक ती कागदपत्रे सविस्तर प्रकल्प अहवालासह विहित नमुन्यातील प्रस्ताव महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे सादर करावा.

(II) <u>प्रस्तावाची छाननी</u>

रोजगार निर्मिती तसेच परिसरातील लोकांचा आर्थिक स्तर उंचावण्यातील व राज्याच्या आर्थिक किंवा औद्योगिक विकासातील सदर प्रकल्पाचे संभाव्य योगदान, मागणी केलेल्या क्षेत्राचे अधिकार अभिलेख, प्रत्यक्ष जागेवरील परिस्थिती, अन्य तांत्रिक बाबी इ. तसेच महामंडळास योग्य वाटतील असे अन्य निकष विचारात घेऊन खालील नमूद समितीने सदर प्रस्तावाची काटेकोरपणे छाननी करावी.

अ. क्र.	समिती सदस्य	पदनाम
१	सहव्यवस्थापकीय संचालक	अध्यक्ष
२	मुख्य महाव्यवस्थापक (भूमी व सर्व्हेक्षण)	सदस्य
३	अधीक्षक अभियंता (संबंधित)	सदस्य
४	मुख्य नियोजनकार, विशेष नियोजन प्राधिकरण	सदस्य
५	उपमहाव्यवस्थापक (भूमी व वाणिज्य)	सदस्य सचिव

(III) <u>संचालक मंडळाची मान्यता</u>

प्राप्त प्रस्तावाची छाननी केल्यावर पात्र प्रस्ताव हा ' मागणी केलेल्या जमिनी थेट खरेदीने / भूसंपादन करून सार्वजनिक निविदा अथवा लिलावाशिवाय थेट संबंधित अर्जदारास भाडेपट्ट्याने देण्याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी ' संचालक मंडळाची तत्वतः मान्यता प्राप्त करून घ्यावी. विशिष्ट क्षेत्रासाठी एकापेक्षा अधिक घटकांचे प्रस्ताव पात्र असल्यास सदर क्षेत्र कोणत्या अर्जदारास भाडेपट्ट्याने द्यायचे याबाबत संचालक मंडळाचा निर्णय अंतिम राहील.

(IV) **सामंजस्य करार**

महामंडळाच्या संचालक मंडळाने प्रस्तावास तत्वतः मान्यता दिल्यानंतर महामंडळाने निश्चित केलेल्या विविध अटी व शर्तींचा समावेश करून अर्जदार व महामंडळ यांच्यामध्ये विहीत नमुन्यातील सामंजस्य करार करण्यात यावा.

(V) **जमिनीचे मुल्यांकन**

अर्जदार यांनी मागणी केलेल्या खाजगी जमिनीचे दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजीच्या शासन परिपत्रकात नमूद तरतूदींप्रमाणे जिल्हास्तरीय समितीकडून मुल्यांकन करून घ्यावे.

शासकीय जमीन - औद्योगिक व वाणिज्यिक अस्थापनाकरीता निवडलेल्या क्षेत्रामध्ये शासकीय जमीन येत असल्यास, अशी जमीन महामंडळाकडे हस्तांतरीत करण्यात येईल. खाजगी जमिनीकरीता वरीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेला जमीन दर हा शासकीय जमीन वाटपाकरीता विचारात घेण्यात येईल.

(VI) **मोबदला रक्कमेची आगाऊ वसुली**

अर्जदार यांचेकडून त्यांनी मागणी केलेल्या जमिनीची एकूण मोबदला रक्कम आगाऊ स्वरुपात प्राप्त करून घ्यावी. सदर एकूण मोबदला रक्कम परीगणित करताना खालील बाबी विचारात घ्याव्यात.

अ) जमीन धारकांना अदा करावयाची रक्कम,

ब) महसूल विभागास देय आस्थापना खर्च व कार्यालयीन सोई-सुविधा खर्च

क) संयुक्त मोजणी शुल्क,

ड) कायदेशीर शोध अहवालापोटी देय शुल्क,

इ) खरेदी दस्त नोंदणीसाठी देय मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क,

फ) महामंडळाचा आस्थापना खर्च

ग) महामंडळ ठरवेल असे अन्य शुल्क

भविष्यकाळात जमीन खरेदी /संपादनाबाबत जमीन धारकास न्यायालयाकडून काही वाढीव नुकसान भरपाई मंजूर केल्यास, अशी वाढीव नुकसान भरपाईची रक्कम

अधिक महामंडळाचा आस्थापना खर्च संबंधित औद्योगिक व वाणिज्यिक आस्थापना यांचे कडून वसूल करावा. तसेच उपरोक्त एकूण मोबदला रक्कम आगाऊ स्वरुपात जमा करण्याबाबतच्या अन्य अटी व शर्ती महामंडळाने निश्चित कराव्यात.

(VII) <u>'नवनगर' व –नवनगर विकास प्राधिकरणा◦ची घोषणा</u>

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील संबधित तरतुदीनुसार अर्जदार यांनी मागणी केलेले विशिष्ट क्षेत्र हे 'प्रस्तावित नवनगर' म्हणून निर्देशित करण्यासाठी व प्रस्तावित नवनगराचे अधिसूचित क्षेत्रासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला 'नवनगर विकास प्राधिकरण' म्हणून घोषित करण्यासाठी अधिसूचना प्रसिद्ध करावी. तसेच अधिसूचित क्षेत्रातील जमिनी शासनाच्या वतीने संपादित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला प्राधिकृत केल्याचेही सदर अधिसूचनेद्वारे घोषित करावे.

(VIII) <u>खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी / भूसंपादन</u>

महसूल व वन विभागाकडील दिनांक १२ मे २०१५ व दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजीच्या संबधित शासन निर्णय/ परिपत्रकातील तरतुदीनुसार अर्जदार यांनी मागणी केलेली जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने खरेदी करण्यात यावी अथवा महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५५ मधील तरतुदीनुसार संपादित करण्यात यावी.

(IX) <u>अधिकार अभिलेख अद्यावतीकरण</u>

महामंडळाने थेट खरेदी पद्धतीने खरेदी केलेल्या जमिनींचे अधिकार अभिलेख अद्यावत करून सदर जमिनींच्या कब्जेदार सदरी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे नाव दाखल करावे.

(X) <u>अधिमुल्य वसुली व भाडेपट्टा करार</u>

मागणी करणाऱ्या अर्जदारास सदर जमीन भाडेपट्ट्याने देण्यासाठी महामंडळाने योग्य ते अधिमुल्य व वार्षिक भाडेपट्टा निश्चित करून त्याची सदर अर्जदाराकडून वसुली करावी. त्या नंतर महामंडळास योग्य वाटेल अशा अटी व शर्ती नमूद करून अर्जदारासमवेत विहित नमुन्यातील भाडेपट्टा करार नोंदणीकृत करावा.

(XI) <u>ताबा</u>

महामंडळाने निश्चित केलेल्या अधिमुल्याची व वार्षिक भाडेपट्ट्याची वसुली केल्यानंतर व संबधित अर्जदाराने भाडेपट्टा करार निष्पादित केल्यानंतर सदर जमिनीचा ताबा अर्जदार यांना देण्यात यावा.

(XII) <u>प्रकल्प उभारण्यासाठी परवानगी</u>

सदर जागेवर प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या अर्जदार यांनी यथास्थिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून तसेच अन्य संबधित विभागाकडून प्राप्त करून घ्याव्यात.

(३) अर्जदार यांनी मागणी केलेली जमीन त्यांना सार्वजनिक निविदा अथवा लिलावाशिवाय भाडेपट्ट्याने देण्याचे बाबतीत महाराष्ट्र महामार्ग (महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडील जमिनींची विल्हेवाट लावणे) नियम, २०१८ मधील, उपरोक्त कार्यपद्धतीशी विसंगत असलेल्या तरतुदी वगळून, इतर सर्व तरतुदी लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२१२०२१७३०२७२४१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DAYANAND BHIMRAO VIBHUTE

Digitally signed by DAYANAND BHIMRAO VIBHUTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC WORKS DEPARTMENT, 2.5.4.20=7f281e553ac60e478f917ca8b9c580d59ee079e592bb718cff3dac8871723222, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FCF44E71C1E1F2602A06CF85298C146027C54E457EA362906E8F8FEF8D7C5827, cn=DAYANAND BHIMRAO VIBHUTE
Date: 2022.12.02 17:34:20 +05'30'

(डि. बी. विभुते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

१) 'मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.उप मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळुन), मंत्रालय, मुंबई
५) मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)
६) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
७) सर्व विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य.
८) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

महसूल विभागांतर्गत भूसंपादन शाखा (कार्यासन अ-१, अ-२, अ-३, अ-४) ही सचिव (वने) यांच्या प्रशासकीय नियंत्राणाखाली कार्यरत असल्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्र: संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१६०/अ-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दि. ०४.०१.२०२३

प्रस्तावना :-

भूसंपादन हा विषय महसूल व वन विभागाच्या अखत्यारीत आहे. परंतु, भूसंपादन शाखा ही महसूल विभागाचा भाग असल्याने मा.मंत्री (महसूल) यांच्या अधिनस्त आहे. व सचिव (वने) यांच्या प्रत्यक्ष प्रशासकीय नियंत्राणाखाली कार्यरत आहे. तथापि भुसंपादनाशी निगडीत विविध यंत्रणांकडून होणारा पत्र व्यवहार महसूल विभाग मंत्रालय असा मोघम स्वरुपात करण्यात येतो. त्यामुळे असे पत्रव्यवहार प्राप्त होण्यास विलंब होतो. सदर बाब मा.उच्च न्यायालय, विधानमंडळ, महालेखापाल, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, महसूल विभागाची क्षेत्रीय कार्यालये, विविध प्राधिकरणे (ज्यांच्याकरीता भूसंपादन केले जाते) इ. यांच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. सदर वस्तुस्थिती परिपत्रकाद्वारे सर्वांच्या निदर्शनास आणून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्याअनुषंगाने शासन खालीलप्रमाणे माहिती देत आहे.

शासन परिपत्रक:-

१) भूसंपादन विषयी सर्व पत्रव्यवहार प्रधान सचिव (वने) यांचे दालन क्र.१०३, (दुरध्वनी क्र.०२२ २२०२ ३३६३), पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई यांना अग्रेषित करण्यात यावा.

२) भूसंपादन शाखेत चार कार्यासने (अ-१, अ-२, अ-३, अ-४) आहेत. भूसंपादन शाखा कक्ष क्र.४५१ (सहसचिव यांचे दालन), ४५२ व ४५३, चौथा मजला, मंत्रालय, मुंबई येथे कार्यरत आहे.

३) भूसंपादन विषयक सर्व पत्रव्यवहार (प्रशासकीय, न्यायालय, विधीमंडळ) उपरोक्त नमूद वस्तुस्थिती विचारात घेऊन करण्यात यावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्र. २०२३०१०४१६२४२८४२१९ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(केदारप्रताप पाटील)
कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रत,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,राजभवन मलबार हिल,मुंबई
२) सर्व अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्र: संकीर्ण-२०२३/प्र.क्र.०२ /अ-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दि. २४.०१.२०२३

संदर्भ: मरारविम/०२/भूमी विभाक/जालना-नांदेड द्रुतगतीमार्ग/२०२२/८२४९ दि.१४.१२.२०२२

प्रस्तावना :-

महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ यांचे दि.१४.१२.२०२२ पत्रान्वये राज्यातील विविध प्रकल्पांच्या भूसंपादन प्रक्रियेसंदर्भात जमिनीचे मूल्यांकन करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दतीत जमिनीची सरासरी किंमत काढतांना त्या गावातील अथवा लगतच्या गावातील सारख्या भुप्रकाराच्या लगतच्या तीन वर्षातील विचारात घ्यावयाच्या नोंदणीकृत दस्ताऐवजांची निश्चिती करताना कोणता कालावधी पासून गणना करावी, याबाबत मार्गदर्शन करण्याची विनंती केली आहे. त्याअनुषंगाने सर्वंकष विचारांती पुढीलप्रमाणे कार्यवाहीचे निर्देश देत आहे.

परिपत्रक:-

भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम 26(1)(c) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

(c) Consented amount of compensation as agreed upon under sub-section (२) of section 2 in case of acquisition of land for private companies or for public private partnership projects.

Whichever is higher:

Provide that the date for determination of market value shall be the date on which the notification has been issued under section 11.

Explanation 1 - The average sale price referred to in clause (b) shall be determined taking into account the sale deeds or the agreements to sell registered for similar type of area in the near village or near vicinity area during immediately preceding three years of the year in which such acquisition of land is proposed to be made.

२. प्रस्तुत विषयी श्रीमती चंदेर कांता व इतर विरुध्द हरयाणा शासन, याचिका क्र . ३४६९/२०१९ मध्ये मा. उच्च न्यायालय हरयाणा यांनी दि .२५.०४.२०२२ रोजी दिलेल्या निर्णयातील परिशिष्ट-७ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद केले आहे.

"Thus there is substantial difference between assessment under old act and under the new act in RFCTLARR ACT, २०१३ the basis of sale deeds or registered agreements sell with respect to period three years preceding the year in which such acquisition is proposed to be made. It is provided that sale deeds of years in which notification U/s ४ of the RFCTLARR ACT, २०१३ has been issued shall be required to be excluded"

३. अधिनियमातील तरतूद व मा. न्यायालयाने केलेली स्पष्टता विचारात घेता, भूसंपादनाची अधिसुचना निर्गमित झालेल्या दिनांकाचे एका वर्षातील खरेदी विक्री व्यवहार वगळावे लागतील, जेणेकरुन भूसंपादनाच्या पार्श्वभूमीवर झालेले वाढीव दराचे खरेदी व्यवहार वगळून वास्तविक व प्रत्यक्ष दराच्या आधारे वाजवी दर निश्चित करणे शक्य होईल.

उदा. भूसंपादनाची अधिसुचनेचा प्रकाशित केलेला दि.०५.०१.२०२३ असल्यास दि. ०४.०१.२०२३ ते दि. ०४.०१.२०२२ चे खरेदी विक्री व्यवहार वगळण्यात यावेत.

वरीलप्रमाणे महामार्ग प्रकल्पांसह सर्व प्रकल्पांच्या भूसंपादन प्रक्रियेत सर्व सक्षम प्राधिकारी यांनी कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२३०१२५१२४१३४०६१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

KEDARPRATAP JAYSING PATIL

Digitally signed by KEDARPRATAP JAYSING PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a304b555c16c6333932e94031b478a58b30bb35922ff7cfdc101bf31d56ff8d, pseudonym=B44BF888097D80ECCD98ZD4359D4A688B806CD57C, serialNumber=3847160374ED91C72AF7F541ED5885A54E39968A0CDDD47C8535SD5B730A40BF, cn=KEDARPRATAP JAYSING PATIL
Date: 2023.01.25 12:48:54 +05'30'

(केदारप्रताप पाटील)
कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रत,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,राजभवन मलबार हिल,मुंबई
२) मा. मुख्यमंत्री / मा. उपमुख्यमंत्री, मंत्रालय, मुंबई
३) सर्व अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.मंत्री) महसूल(यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई
५) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
७) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
८) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
९) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे
१०) नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
११) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
१२) सर्व विभागीय आयुक्त
१३) सर्व जिल्हाधिकारी
१४) सर्व सक्षम प्राधिकारी भूसंपादन, भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,मुंबई
१५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१६) निवासी लेखाधिकारी, मुंबई
१७) सर्व सहसचिव / उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
१९) अ-१/अ-३/अ-४ कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
२०) निवडनस्ती (अ-२).

भूमिसंपादन.....अधिनियम, २०१३ वा अन्य अधिनियमानुसार संपादक संस्थेकडून प्राप्त भूसंपादन प्रस्तावाबाबत प्राथमिक अधिसूचनेनंतर करावयाच्या संयुक्त मोजणी व त्यानुसार अचूक नोंदी घेण्याची कार्यपद्धती या कार्यवाही अनुषंगाने मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक, क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.३०/अ-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दि.३१.०१.२०२३

<u>प्रस्तावना :-</u>

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ तसेच राज्यामध्ये सदर अधिनियमाच्या अनुसूची ४ व अनुसूची ५ मध्ये नमूद अधिनियमांनुसार भूसंपादन आणि सार्वजनिक प्रयोजनाकरीता थेट खरेदी धोरणानुसार जमीन ताब्यात घेण्याची कार्यवाही केली जाते संपादन होणाऱ्या जमिनीबाबत क्षेत्र, वहिवाट व जमिनीवरील फळझाडे, बांधकामे यांची अचूक नोंद होऊन योग्य तो मोबदला भूधारकास/हितसंबंधितास मिळावा व जास्तीचा मोबदला गैरप्रकारे मिळविण्याच्या हेतूने प्राथमिक अधिसूचनेनंतर जमिनीवर केलेले बदल/घटक यांना अटकाव करण्यासाठी ड्रोन रोव्हर व उपग्रह छायाचित्रांसह KML फाईल्सचा वापर करणे आवश्यक बनले आहे.

त्यासंदर्भात संपादक संस्थेकडून प्राप्त भूसंपादन प्रस्तावाबाबत प्राथमिक अधिसूचनेनंतर करावयाची संयुक्त मोजणी व त्यानुसार अचूक नोंदी घेण्याची कार्यपद्धती बाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार सर्वंकष विचारविनिमय करुन शासन खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देत आहे.

<u>शासन परिपत्रक :-</u>

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ तसेच अन्य अधिनियमांनुसार सार्वजनिक प्रयोजनाकरिता भूसंपादन आणि थेट खरेदी धोरणानुसार जमीन ताब्यात घेण्याची कार्यवाहीबाबत संपादक संस्थेकडून प्राप्त भूसंपादन प्रस्तावाबाबत प्राथमिक अधिसूचनेनंतर करावयाची संयुक्त मोजणी व त्यानुसार अचूक नोंदी घेताना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात यावी.

१. कोणत्याही अधिनियमांतर्गत भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना सादर करताना प्रस्तावासोबत संपादन संस्थेने प्रस्ताव दिनांकापासूनचे अद्ययावत ७/१२ उतारे व ड्रोन द्वारे केलेले छायाचित्रण सादर करावे.

२. प्राथमिक अधिसुचने नंतर करण्यात येणाऱ्या संयुक्त मोजणीचे छायाचित्रण करण्यात यावे व त्यावेळी स्थानिक प्रकल्पबाधित भूधारक तसेच संयुक्त मोजणीशी संबंधित सर्व प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती अनिवार्य आहे.

३. संयुक्त मोजणी वेळी ड्रोन द्वारे जमिनीची घेतलेली छायाचित्रे (Photographs) व D.G.P.S (रोव्हर व बेस) (Differential Global Positioning System) यंत्राद्वारे भूमापन अधिकारी / सर्वेअर यांनी घेतलेली अक्षांश रेखांक्ष यांचा वापर करुन सद्यस्थितीत इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या Software द्वारे सहाय्याने KML Files तयार करणे शक्य आहे, त्याचा वापर करावा. राज्यात ७७ ठिकाणी CORS- Station स्थापित करण्यात आले आहे. प्रत्येक जिल्हयामध्ये यापुढे ROVER उपलब्ध होणार आहेत. त्या ठिकाणी भूसंपादन मोजणी ROVER च्याच सहाय्याने करण्यात याव्यात तसेच अंतिम निवाडा (Award) मंजूर करतांना सदर गट/भूमापन क्रमांकापुढे Co-ordinates निवाडयामध्ये समाविष्ट करणे आवश्यक राहिल. तसेच या प्रकरणी झालेले अंतिम निवाडा (Award) व मोजणी नकाशा व Co-ordinates हा Scan करुन Cloud वर ज्या दिवशी Award घोषीत होत आहे त्याच दिवशी Upload करावा.

४. तांत्रिक बाबींसाठी Nodal Agency म्हणून भूमि अभिलेख विभाग यासाठी सक्षम असल्याने नेमणूक करण्यात यावी अन्य अशा संस्थेच्या नेमणुकीची आवश्यकता नाही.

५. संयुक्त मोजणीस लागणारी Laptop / Rover & Controller/Plotter यासारखी आधुनिक यंत्रसामुग्री संबंधित भूसंपादन अधिकाऱ्याच्या स्वीय प्रपंजी खात्यात जमा सोई-सुविधा शुल्कातून भूमि अभिलेख कार्यालयास उपलब्ध करुन देण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले असून त्याचा संकेतांक क्र २०२३०२०११८०२४६६८१९ असा आहे. सदर परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

KEDARPRATAP JAYSING PATIL

Digitally signed by KEDARPRATAP JAYSING PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a304b555c16c6333932e94031b478a58b30bb35922ff7cfdc101bf31d56ff8d, pseudonym=B44BF888097D80ECCD982D439D4A688B06CD57C, serialNumber=384716037 4ED91C72AF7F541ED5885A54E39968A0CDDD47C85355D5B730A40BF, cn=KEDARPRATAP JAYSING PATIL
Date: 2023.02.01 18:08:03 +05'30'

(केदारप्रताप पाटील)
कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अ.मु.स., मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (वित्त व वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

प्रकरण दोन (सामाजिक आघात निर्धारण) व तीन (अन्न सुरक्षा विषयक तरतूदी) च्या तरतूदी लागू करण्यापासून सूट देण्याच्या प्रस्तावास शासन मान्यता देण्याचे अधिकार प्रत्यायोजित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन स्थायी आदेश क्रमांक- एसआयए-२०२३/प्र.क्र.१०५/अ-२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तारीत इमारत ४ था मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०८ जून, २०२३.

स्थायी आदेश:-

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १६६ अन्वये तयार करण्यात आलेल्या, महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीतील नियम १५ खाली महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी महाराष्ट्र राज्याचे कामकाज अधिक सोयीस्कर रितीने चालण्यासाठी दिलेल्या अनुदेशातील भाग-दोन, सर्वसाधारण मधील अनुदेश क्र. ४ अन्वये मा. मंत्री (महसूल) यांनी असे निर्देशित केले आहे की, भूसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ या मूळ अधिनियमामध्ये राज्य शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम (महाराष्ट्र सुधारणा), २०१८ अन्वये महाराष्ट्र राज्यासाठी केलेल्या अतिरिक्त तरतुदी अन्वये राज्यात विविध प्रकल्पांकरीता खाजगी जमिनी संपादित करण्यात येतात. अशा संपादनाच्या प्रसंगी उक्त नमूद अधिनियमाच्या कलम १० क अन्वये "प्रकरण दोन (सामाजिक आघात निर्धारण) व तीन (अन्न सुरक्षा विषयक तरतूदी)" पासून सूट देण्याचे प्रस्ताव शासनास वेळोवेळी प्राप्त होतात. अशा प्रकरणांचा त्वरेने निपटारा होणे आवश्यक आहे.

यास्तव, उक्त नमूद अधिनियमाच्या कलम १० क अन्वये "प्रकरण दोन (सामाजिक आघात निर्धारण) व तीन (अन्न सुरक्षा विषयक तरतूदी)" या पासून सूट देण्याकरीता शासनाच्या मान्यतेस्तव प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची गुणवत्ता तपासून, त्याबाबतची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यास शासन मान्यता देण्याचे मा. मंत्री (महसूल) यांचे अधिकार प्रधान सचिव (वने, भूसंपादन) यांना या आदेशाव्दारे प्रत्यायोजित करण्यात येत आहेत.

०२. सदरचे स्थायी आदेश हे तात्काळ अंमलात येतील.

०३. सदर स्थायी आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२३०६०८१७४८३३४५१९ असा आहे. सदर स्थायी आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुनिल कोठेकर)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ३२

महाराष्ट्र कोषागार नियम,१९६८ मधील नियम ४९५ अन्वये विहित करण्यात आलेल्या तरतूदीमधून महसूल व वन विभागाच्या अधिनस्त उप विभागीय अधिकारी आणि विशेष भूसंपादन अधिकारी यांच्या नांवे असलेली वैयक्तिक ठेव लेखा खाती (P.L.A.) वगळण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०२२/प्र.क्र.८४/कोषा-प्रशा५

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: १९ जून, २०२३

संदर्भ : वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण १०१४/प्र.क्र.५/कोषा प्रशा ५ दि. २४ जानेवारी, २०१४.

प्रस्तावना :

महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम ४९५ अन्वये एक पूर्ण लेखा वर्षापेक्षा अधिक कालावधीपर्यत ज्या वैयक्तिक ठेव लेखा खाते (P. L. A.) मध्ये कोणताही व्यवहार झालेला नसेल अशी वैयक्तिक ठेव लेखा खाती बंद करण्यात यावी आणि प्रत्येक वर्षी मार्च अखेर ज्या रकमा अशा खात्यांमध्ये शिल्लक राहतील त्या शासनाकडे जमा करण्यात याव्यात; अशी तरतूद आहे.

२. विविध प्रकल्पांकरीता जमिन अधिग्रहण करताना जमिन धारकांना भुसंपादनाचा मोबदला वितरीत करण्याच्या प्रयोजनासाठी उप विभागीय अधिकारी आणि विशेष भुसंपादन अधिकारी यांच्या नांवे वैयक्तिक ठेव लेखा खाती निर्माण करण्यात आली आहेत . तथापि, काही प्रकरणी वाद उत्पन्न झाल्यास अशी प्रकरणे न्यायप्रविष्ठ झाल्याने भूमिसंपादन लाभाची रक्कम जमिन मालकांना त्वरित वितरीत केली जात नाही. अशा रकमा न्यायालयीन आदेश होईपर्यंत सदर वैयक्तिक ठेव लेखा खात्यातच जमा राहतात. न्यायालयाच्या आदेशानंतर विहित कालावधीमध्ये न्यायनिर्णयानुसार सदर रकमांचे वाटप भूमी मालकांना करणे अभिप्रेत आहे. तथापि, महाराष्ट्र कोषागार नियम क्र. ४९५ मधील उपरोक्त तरतूदी अन्वये एक पूर्ण लेखा वर्षापर्यंत व्यवहार न झालेली वैयक्तिक ठेव लेखा खाती बंद करणे अनिवार्य करण्यात आले आहे. परिणामी न्यायालयाच्या आदेशानंतर विहित कालावधीत भुसंपादनाच्या रकमांचे वाटप जमिन मालकांना करता येत नाही. अशा वेळी पुढील आर्थिक वर्षात पुन्हा अर्थसंकल्पीय तरतूद करुन कोषागारातून रकमा आहरीत करुन , वैयक्तिक ठेव लेखा खाते पुनरुज्जीवीत करुन त्यामध्ये जमा कराव्या लागतात. या प्रक्रियेमध्ये कालापव्यय होतो. न्यायालयाच्या आदेशाचे पालन न झाल्याने अनेकदा शासकीय मालमत्तेवर जप्तीची कार्यवाही होण्याची नामुष्की ओढावते. सदर अडचणींवर उपाययोजना करण्याकरिता उप विभागीय अधिकारी , तसेच विशेष भुसंपादन अधिकारी यांच्या नांवे असलेल्या वैयक्तिक ठेव लेखा खात्यांना महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम क्र. ४९५ अन्वये विहित करण्यात आलेल्या तरतूदींमधून सूट देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

(१) विविध प्रकल्पांकरीता जमिन अधिग्रहण करताना जमिन धारकांना भुसंपादनाचा मोबदला वितरीत करण्याच्या प्रयोजनासाठी महसूल व वन विभागाकडील उप विभागीय अधिकारी तसेच विशेष भूसंपादन अधिकारी यांच्या नांवे असलेल्या वैयक्तिक ठेव लेखा खात्यांना महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम ४९५ अन्वये विहित करण्यात आलेल्या तरतूदींमधून वगळण्यात येत आहे.

(२) अशी वैयक्तिक ठेव लेखा खाते आता भुसंपादन मोबदल्याच्या रकमा सर्व जमीन मालकांना वितरीत होईपर्यंत चालू राहतील.

(३) तथापि अशा वैयक्तिक ठेव लेखा खात्याचे प्रयोजन संपुष्टात आल्यास, प्रचलित विहित कार्यपध्दतीस अनुसरुन असे वैयक्तिक ठेव लेखा खाते बंद करणे अनिवार्य राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२३०६२०११५५२६६७०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR

Digitally signed by DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=b8e8c3a034acb70f16af6f81c69ca038ff6f25ff78cfc9e6d815fd95b5367b07, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=37A42E182BACE4C129ABBEB54E27836D32D401560638F644A547867205474EE5, cn=DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
Date: 2023.06.20 11:57:08 +05'30'

(डॉ. राजेंद्र गाडेकर)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
४. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
६. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
८. मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख
९. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१०.प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई
११.प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१२.महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१४.आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२
१५.आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन*, नागपूर ४४४००१

अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ अंतर्गत प्राप्त वैयक्तिक वन हक्क पट्टेधारकांना भूमिसंपादन अधिनियम, २०१३ मधील तरतूदींनुसार जमिन संपादित करताना भूसंपादन अधिनियमान्वये देण्यात येणारी नुकसान भरपाईची रक्कम व अन्य पुनर्वसन व पुनर्वसाहत विषयक <u>लाभ निश्चित करण्याबाबत.</u>

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन परिपत्रक, क्र.वजधो-२०२२/प्र.क्र.८६/अ-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक:- २६.०९.२०२३

वाचा:- १. शासन पत्र समक्रमांक दि.८.०३.२०२३

२. शासन निर्णय क्रं.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.०८/ज-१अ, दि.२४.०३.२०२३

<u>प्रस्तावना :-</u>

अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक व वन निवासी यांना "अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक व वन निवासी (वन हक्क मान्यता) अधिनियम, २००६" या अधिनियमाखाली वनपट्टे देण्यात आलेले आहेत. तथापि, राज्यात विविध सार्वजनिक प्रकल्पांसाठी अशा वनपट्टेधारकांकडील जमीन भूसंपादित होत असतांना त्यांना द्यावयाच्या नुकसानभरपाई संदर्भात यापुर्वी शासनाकडे विचारणा करण्यात आली होती. त्यावेळी संदर्भाधीन क्र.१ येथे नमुद शासन पत्र दि.८.०३.२०२३ अन्वये "अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक व वन निवासी (वन हक्क मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत प्राप्त वैयक्तिक वनहक्क धारक यांना भूमी संपादन पुनर्वसन व पुर्नवसाहत करताना नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत कलम-३ (C) नुसार भूधारक ठरत आहेत. त्यामुळे भूधारक म्हणून अनुज्ञेय असणारे सर्व लाभाकरीता ते पात्र ठरत आहेत." असे धोरणात्मक दिशानिर्देश देण्यात आले आहेत.

०२. दरम्यानच्या कालावधीत, "अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक व वन निवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम- २०१२ च्या राज्यातील अंमलबजावणीच्या" अनुषंगाने शासन निर्णय दि.२४.०३.२०२३ अन्वये गठीत मा.मंत्री, महसूल यांच्या अध्यक्षतेखालील

अभ्यास समितीची दि.१६.०५.२०२३ रोजीच्या बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये वन पट्टेधारकांना भूसंपादनाचा मोबदला/नुकसान भरपाईची रक्कम देताना अडचणी येत असल्याबाबतची चर्चा झाली. सदर बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने मा. मंत्री (महसूल) यांनी दिलेल्या निर्देशाबाबत या बैठकीचे इतिवृत्त निर्गमित करण्यात आले आहे. सदर इतिवृत्तामध्ये विषयाधीन मुद्यांसंदर्भात पुढीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत:-

"सदर शासन पत्र दि.८.०३.२०२३ च्या अनुषंगाने पुढील सविस्तर मार्गदर्शक सूचना (जसे की, मोबदला कसा व किती द्यावा वगैरे) महसूल व वन विभागाने निर्गमित कराव्यात" असे निर्देशित करण्यात आले. त्यानुषंगाने, सर्वंकष विचारविनिमय करुन उपरोक्त विषयासंदर्भात क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना वैयक्तिक वनहक्क धारक यांनी धारण केलेल्या वनपट्ट्यांच्या जमिनी संपादित करताना देय होणाऱ्या नुकसान भरपाई संदर्भात दिशा निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन परिपत्रक :-</u>

राज्यातील विविध प्रकल्पाकरीता भूमी संपादन पुनर्वसन व पुर्नवसाहत करताना नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये वनहक्क धारकांच्या, वनपट्टयांच्या जमिनी संपादित करताना, त्यांना द्यावयाच्या नुकसान भरपाई व अन्य देय लाभ यासंदर्भात सर्व संबंधित क्षेत्रीय महसूली अधिकारी, प्राधिकारी यांना याव्दारे पुढीलप्रमाणे दिशा निर्देश देण्यात येत आहेत:-

१. अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक व वन निवासी (वन हक्क मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत प्राप्त वैयक्तिक वनहक्क धारक यांना भूमी संपादन पुनर्वसन व पुर्नवसाहत करताना नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत कलम-३ (C) नुसार "भूधारक" ठरत आहेत. त्यामुळे "भूधारक" म्हणून अनुज्ञेय असणारे सर्व लाभाकरीता ते पात्र ठरत आहेत.

२. ज्याअर्थी, भूसंपादन अधिनियमानुसार भूधारकास त्याच्या संपादित होणाऱ्या जमीनीपोटी मिळणारी नुकसानभरपाईची रक्कम तसेच अन्य पुनर्वसन विषयक व पुर्नवसाहत विषयक लाभ अनुज्ञेय ठरतात. आणि ज्याअर्थी, वैयक्तिक वनहक्क धारक यांना भूधारक म्हणून मान्यता देण्याबाबत शासनाकडून स्पष्टता करण्यात आली आहे. त्याअर्थी, वैयक्तिक वनहक्क धारकांनी अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक व वन निवासी (वन हक्क मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत धारण केलेल्या जमिनी भूसंपादन अधिनियमान्वये संपादित करताना भूसंपादन अधिनियमान्वये देण्यात येणारी नुकसान भरपाईची रक्कम व अन्य पुनर्वसन व पुनर्वसाहत विषयक लाभ देण्यात यावेत.

०२. सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

०३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले असून त्याचा संकेतांक क्र २०२३०९२६१७४९०६६७१९ असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

MANIK VITTHAL DHAMALE

Digitally signed by MANIK VITTHAL DHAMALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=56ec16312a634dd1d6237d2d17aa0f5fb47d9a2353765a9688e57f460b5271d9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D2C09929ACAFC324A4E5E44875953A3AEF77C004844BEE29381808FC25AAC97F, cn=MANIK VITTHAL DHAMALE
Date: 2023.09.26 17:52:08 +05'30'

(माणिक ढमाले)
कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अ.मु.स., मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
३. मा.उप मुख्यमंत्री (गृह व जलसंपदा) यांचे सचिव उप मुख्यमंत्री कार्यालय, मुंबई
४. मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, उप मुख्यमंत्री कार्यालय, मुंबई
५. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
९. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१०.अ.मु.स. (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
११.अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.प्रधान सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.प्रधान सचिव (वने, भूसंपादन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१६.उप सचिव (भूसंपादन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१७.व्यवस्थापकीय संचालक सिडको, सिडकोभवन, सि.बी.डी. बेलापूर, नवी मंबई
१८. मा.महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई
१९.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ, मुंबई
२०.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
२१.सर्व विभागीय आयुक्त
२२.सर्व जिल्हाधिकारी

नदी/नाले पात्रात हाती घेण्यात येणाऱ्या कोल्हापूर पध्दतीचे बंधारे/ द्वारयुक्त सिमेंट साठवण बंधारे/ सिमेंट साठवण बंधारे/ सिमेंट नाला बांध या कामांची अंमलबजावणी करताना भूसंपादनाबाबत घ्यावयाची दक्षता..

महाराष्ट्र शासन
मृद व जलसंधारण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : संकिर्ण-२०२३/प्र.क्र.१३०/जल-१
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : ०२ नोव्हेंबर, २०२३.

वाचा- १. मृद व जलसंधारण विभाग, शा.नि. क्र. कोपबं-२०२२/प्र.क्र.०१/जल-१, दि. ११-०२-२०२२
२. मृद व जलसंधारण विभाग, शा.नि. क्र. सिबांका-२०२२/प्र.क्र.२१२/जल-१, दि. ३१-०५-२०२२.

संदर्भ:- मा. उपलोकायुक्त यांच्याकडे दि. १६/०१/२०२३ रोजी मौ. चिंचोशी, खेड, पुणे येथील कामाच्या भुसंपादनाबाबत झालेली सुनावणी.

प्रस्तावना:-

राज्यात मृद व जलसंधारण विभागाकडून ० ते ६०० हेक्टर सिंचन क्षमतेचे विविध प्रकारचे जलसंधारण उपचार बांधकाम हाती घेण्यात येतात. यापैकी ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या कोल्हापूर पध्दतीचे बंधारे/ द्वारयुक्त सिमेंट साठवण बंधारे/ सिमेंट साठवण बंधारे/ सिमेंट नाला बांध या कामांची शासन/महामंडळ/जिल्हा परिषद/जिल्हा वार्षिक योजना इ. निधीतून जलसंधारण/जिल्हा परिषद विभागांकडून अंमलबजावणी करण्यात येते. स्थानिक पातळीवरील मागणी व भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन अशा प्रकारातील बांधकामे ही नदी किंवा नाले पात्रात जेथे भुसंपादनाची आवश्यकता नाही अशा ठिकाणी बांधली जातात. सद्य:स्थितीत असे प्रकल्प हाती घेत असताना तांत्रिक बाबींची तपासणी न करता भुसंपादन करण्यात येत असल्याचे प्रकार निदर्शनास आले आहेत. त्याअनुषंगाने व संदर्भातील प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान मा. उपलोकायुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार शासन परिपत्रकाच्या स्वरूपात मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक:

नदी/नाले/खाजगी क्षेत्रातील नाले यांवर बांधण्यात येणाऱ्या कोल्हापूर पध्दतीचे बंधारे/ द्वारयुक्त सिमेंट साठवण बंधारे/ सिमेंट साठवण बंधारे/ सिमेंट नाला बांध या कामांची अंमलबजावणी करण्याआधी खालील मार्गदर्शक तत्वे/सूचना यांचा अवलंब करण्यात यावा.

१. ज्या प्रकल्पस्थळी भुसंपादन आवश्यक नाही अशाच ठिकाणी कोल्हापूर पध्दतीचे बंधारे/ द्वारयुक्त सिमेंट साठवण बंधारे/ सिमेंट साठवण बंधारे/ सिमेंट नाला बांध अशा प्रकारची कामे हाती घेण्यात यावीत.

२. Second order व Third order नाले हे बहुतांशी खाजगी मालकीचे असल्यामुळे अशा नाल्यांवर कोल्हापूर पध्दतीचे बंधारे/ द्वारयुक्त सिमेंट साठवण बंधारे/ सिमेंट साठवण बंधारे/ सिमेंट नाला बांध प्रस्तावित करण्यापूर्वी अ. क्र. ३ प्रमाणे कार्यवाही करून प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या क्षेत्रासंबंधित हितसंबंध असलेल्या भोगवटादाराकडून स्टँप पेपरवर पुर्वपरवानगीसंमती/ घेऊन त्याची नोटरी करण्यात यावी.

३. सदर कामांचे प्रस्ताव तयार करताना संबंधित ग्रामपंचायत ठराव/ग्रामसभेचे ठराव घेऊन प्रस्तावासोबत जोडण्यात यावा.

४. सिमेंट काँक्रीट नाला बंधाऱ्याचे स्थळ निश्चित करताना-

i. बंधाऱ्याच्या स्थळाबाबत अचुकता साध्य होण्यासाठी १:२५००० (Topo Sheet) या प्रमाणाचे नकाशे वापरण्यात यावेत.

ii. नाला उतार २% पेक्षा कमी असावा.

प्रस्तुत परिपत्रक, प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींनुसार निर्गमित करण्यात येत असून, डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित केलेले हे आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहेत. त्यांचा संकेतांक २०२३११०२१५१७३९६४२६ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

PRAKASH NILKANTHRAO PATIL

Digitally signed by PRAKASH NILKANTHRAO PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOIL AND WATER CONSERVATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7dc90f966c671a9acd0a599ee5fc497272e775d33643b14725c6a77432c673f, pseudonym=7A263A50DECC4DF4A50ACE0F85129E700569E90D, serialNumber=F1EC28A96B2A52575AE4CCCA512D1723F249D503AE71CF458BA4863AACFFBF62, cn=PRAKASH NILKANTHRAO PATIL
Date: 2023.11.02 15:18:04 +05'30'

(प्र. नि पाटील)
कार्यकारी अभियंता तथा अवर सचिव
महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३) मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/विधान सभा, विधान मंडळ, सचिवालय, विधानभवन, मुंबई.
४) सर्व मा. संसद सदस्य, विधान मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
५) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
७) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
८) मा. मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
९) सचिव (मृद व जलसंधारण) यांचे स्वीय सहाय्यक.
१०) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

भूसंपादन अधिनियम अन्वये दिवाणी न्यायालयाने वाढीव मोबदला देण्याबाबत पारित केलेल्या आदेशाविरुद्ध अपिल दाखल करणे/ न करणे याबाबतीतील जमिनीचे "मुळ मुल्यांकन"या शब्दाबाबत अधिक स्पष्टता करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्र. बैठक-२०२४/प्र.क्र.२१/अ-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक:-२२ .०२.२०२४

वाचा:- १. शासन निर्णय क्रं.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.४१/भाग-१/अ-४, दि.०३.११.२०१६
२. शासन शुद्धिपत्रक क्रं.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.४१/भाग-१/अ- ४, दि .२३.०२.२०१७
३. शासन शुद्धिपत्रक क्रं.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.४१/भाग-१/अ-४, दि.१३.०८.२०१८

<u>प्रस्तावना :-</u>

मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि.२४.०१.२०२४ रोजी "मा.लोक अदालत यांनी दि.०९.१२.२०२३ रोजी पारित केलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने आढावा बैठक झाली. सदर बैठकीमध्ये, मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी, "दिवाणी न्यायालयाने वाढीव भूसंपादन मोबदल्यासंदर्भात पारित केलेल्या आदेशाविरुद्ध अपिल दाखल करणे/ न करणे याबाबत संदर्भाधीन शासन निर्णय व शासन शुद्धिपत्रकान्वये दिलेल्या निर्देशातील जमिनीचे "मुळ मुल्यांकन"या शब्दाच्या अधिक स्पष्टतेसाठी विभागाने "मुळ मुल्यांकन" या शब्दाची व्याख्या निश्चित करुन संबंधितांना अवगत करणेबाबत" निर्देश दिलेले आहेत.

०२. संदर्भाधीन क्र.१ येथे नमूद शासन निर्णय दि.०३.११.२०१६ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार, भूसंपादन अधिनियम १८९४ च्या कलम १८ खालील भूसंदर्भात मा. दिवाणी न्यायालयाने वाढीव भूसंपादन मोबदल्याच्या अनुषंगाने दिलेल्या आदेशाविरुध्द अपिल दाखल करणेसंदर्भात पुढील निर्देश दिलेले आहेत:-

"मा.दिवाणी न्यायालयातील कलम १८ खालील भूसंदर्भातील जमिनीचा कलम ४ च्या अधिसूचनेच्या दिनांकास प्रचलित रेडी रेकनर दर विचारात घेता, वाढीव मोबदल्याच्या आदेशातील रक्कम जर नागरी भागात दुप्पट व ग्रामीण भागात चौपट या मर्यादेत व्याजासह येत असेल, तर मा. दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपीलात

जाण्याची आवश्यकता नाही. तसेच सदरची रक्कम "भूमी संपादन, पूनर्वसन व पूनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ नुसार देय असलेल्या नुकसान भरपाई रकमेपेक्षा जास्त असू नये."

तसेच, शासन शुध्दिपत्रक दि.२३.०२.२०१७ अन्वये ,शासन निर्णय दि.०३.११.२०१६ मध्ये नमूद केलेले निकष क्र.१ ऐवजी "मा. दिवाणी न्यायालयातील कलम १८ खालील भूसंदर्भातील जमिनीचा कलम ४ च्या अधिसूचनेच्या दिनांकास प्रचलित रेडीरेकनर दर विचारात घेता, वाढीव मोबदल्याच्या आदेशातील रक्कम जर नागरी भागात दुप्पट व ग्रामीण भागात चौपट या मर्यादेत (व्याज,सोलेशियम इ.वगळून) येत असेल तर मा.दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध वरिष्ठ न्यायालयात अपीलात जाण्याची आवश्यकता नाही" अशी सुधारणा करण्यात आली आहे.

तसेच, संदर्भाधीन क्र.३ येथील दि.१३.०८.२०१८ रोजीच्या शासन शुद्धिपत्रकान्वये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे:-

"मा.दिवाणी न्यायालयातील कलम १८ खालील भूसंदर्भातील जमिनीचा कलम ४ च्या अधिसूचनेच्या दिनांकास प्रचलित रेडीरेकनर दर" या ऐवजी,"मा.दिवाणी न्यायालयातील कलम १८ खालील भूसंदर्भातील जमिनीचा कलम ४ च्या अधिसूचनेच्या दिनांकास असलेल्या जमिनीचे मुळ मुल्यांकन" अशी दुरुस्ती करण्यात आली आहे.

०३. त्यानुषंगाने संदर्भाधीन क्र.३ येथील दि.१३.०८.२०१८ च्या शासन शुद्धिपत्रकामध्ये नमूद केलेल्या जमिनीच्या मुळ मुल्यांकनाबाबत अधिक स्पष्टता येण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय महसुली अधिकारी व प्राधिकारी यांना दिशानिर्देश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन परिपत्रक :-</u>

उपरोक्त विषयासंदर्भात निर्गमित केलेल्या संदर्भाधीन क्र.३ येथे नमूद शासन निर्णयातील निर्देशांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने तसेच "मा.दिवाणी न्यायालयातील कलम १८ खालील भूसंदर्भातील जमिनीचा कलम ४ च्या अधिसूचनेच्या दिनांकास असलेल्या जमिनीचे "मुळ मुल्यांकन" या शब्दाबाबत अधिक स्पष्टता येण्याच्या अनुषंगाने खालील प्रमाणे नमूद करण्यात येत आहे:-

भूसंपादन अधिनियम १८९४ च्या कलम ४ च्या अधिसूचनेच्या दिनांकास असलेल्या जमिनीचे "मुळ मुल्यांकन" म्हणजे, "भूसंपादन अधिनियम १८९४ च्या कलम ११ अन्वये घोषित केलेल्या अंतिम निवाड्यातील व्याज, सोलेशियम, इतर घटक- बांधकामे, पिके, फळझाडे, वनझाडे विहीर, बोअरवेल व पाईपलाईन या घटकांचे मुल्यांकन वगळून एकूण जमिनीचे कलम ४ च्या अधिसूचनेच्या दिनांकास असलेले निव्वळ मूल्य म्हणजे जमिनीचे "मुळ मुल्यांकन"असा अर्थ अभिप्रेत आहे.

०२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले असून त्याचा संकेतांक क्र २०२४०२२२१८४१११५३१९ असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

MOHASIN
RAJMAHMAD SHAIKH

Digitally signed by MOHASIN RAJMAHMAD SHAIKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=613d5f4e81161c3485310241b06dd6ce7372ad8baf95f5ae576d53ac61afe62b, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=74CDE6704F3FD0A42314F2424B55F3CFA18AE8A657DC2FC61B51901A90B029D5, cn=MOHASIN RAJMAHMAD SHAIKH
Date: 2024.02.22 18:50:55 +05'30'

(मोहसिन रा. शेख)
कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अ.मु.स., मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
३. मा.उप मुख्यमंत्री (गृह व जलसंपदा) यांचे सचिव उप मुख्यमंत्री कार्यालय, मुंबई
४. मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, उप मुख्यमंत्री कार्यालय, मुंबई
५. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव (वने, भूसंपादन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. उप सचिव (भूसंपादन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
११. व्यवस्थापकीय संचालक सिडको, सिडकोभवन, सि.बी.डी. बेलापूर, नवी मंबई
१२. मा.महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई
१४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
१५. सर्व विभागीय आयुक्त,
१६. सर्व जिल्हाधिकारी,
१७. प्रादेशिक अधिकारी, मुंबई, महाराष्ट्र,भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रादेशिक कार्यालय, नवी मुंबई.
१८. महाव्यवस्थापक (भूमि व सर्वेक्षण), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या.,मुंबई
१९. सर्व अधिक्षक अभियंता, (सार्वजनिक बांधकाम / जलसंपदा)
२०.निवडनस्ती (अ-२)

भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील भाग-सात खाली कंपन्यांसाठी औद्योगिक प्रयोजनासाठी संपादित जमिनीच्या विक्री/वापर बदलाच्या अनुषंगाने सुधारित धोरण.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२२/प्र.क्र.५४/अ-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक: १६ मार्च, २०२४

वाचा:- १) शासन निर्णय क्र.संकिर्ण-०१/२०१७/प्र.क्र.११/अ-२, दि.११.०१.२०१८
२) शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२२/प्र.क्र.५४/अ-२, दि.२९.०६.२०२२

<u>प्रस्तावना</u> :-

विविध औद्योगिक प्रयोजनासाठी भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या भाग-७ अंतर्गत कंपन्यांसाठी भूखंड संपादित करण्यात आले होते. अशा कंपन्या बंद पडल्यामुळे नागरी भागात विनावापर असलेल्या जमिनींचा सार्वजनिक प्रयोजनार्थ वापर करण्याबाबत सर्वंकष धोरण निश्चित करण्याकरिता अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली समिती शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-११/२०१५/प्र.क्र.१६२/अ-२, दि.२६.१२.२०१६ व शासन शुध्दीपत्रक दि.११.०१.२०१७ अन्वये गठीत करण्यात आली आहे. तद्नंतर, अशा औद्योगिक प्रयोजनार्थ संपादित जमिनीच्या वापरात बदल/विक्री यांस मान्यता देण्याची कार्यपद्धती व धोरणावरील शासन निर्णय दि.११.०१.२०१८ आणि दि.२९.०६.२०२२ अन्वये विहित केले आहे.

२. प्रस्तुत धोरणाप्रमाणे कार्यवाही करताना काही बाबींची स्पष्टता येणे आवश्यक असल्याचे दिसून येते. या संदर्भात मा.मंत्री (महसूल) यांनी सूचित केलेल्या बाबी तसेच विभागास निदर्शनास आलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने शासन निर्णय दि.२९.०६.२०२२ च्या अंमलबजावणी करीता क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना नव्याने दिशा निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

उपरोक्त वाचा येथील संदर्भ क्र.२ शासन निर्णय दि.२९.०६.२०२२ अन्वये भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील भाग-सात खाली कंपन्यांसाठी औद्योगिक प्रयोजनासाठी संपादित जमिनीच्या विक्री/वापर बदलाच्या अनुषंगाने सुधारित धोरण विहीत केले आहे. त्यानुषंगाने शासन निर्णय दि.११.०१.२०१८ आणि दि.२९.०६.२०२२ च्या अंमलबजावणी करीता भूसंपादन

अधिनियमांन्वये शासनास प्राप्त असलेल्या अधिकारांत याद्वारे क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना पुढीलप्रमाणे नव्याने अधिकचे दिशानिर्देश देण्यात येत आहेत:-

(अ) शासन निर्णय, दि.११.०१.२०१८ मधील तरतूदीनुसार औद्यगिक प्रयोजनासाठी संपादित केलेल्या जमिनीची विक्री/वापरात बदल करण्याची शासनाने परवानगी दिलेल्या आणि शासन निर्णय, दि.२९.०६.२०२२ अन्वये नव्याने निश्चित केलले धोरण अस्तित्वात आल्यानंतर, संबंधितांकडून प्रशासकीय यंत्रणेने शासन निर्णय दि.११.०१.२०१८ नुसार अधिमूल्याची रक्कम भरून घेतली असल्यास, आणि संबंधितांना दि.२९.०६.२०२२ च्या नविन धोरणाप्रमाणे देय असणाऱ्या रकमेपेक्षा अतिरिक्त भरलेल्या अधिमूल्याची रक्कम परत मिळण्याबाबतचा स्वत:चा हक्क आबाधीत ठेवून (Under protest) अधिमूल्याची रक्कम शासन जमा केलेली आहे, अशी वस्तुस्थिती असलेल्या प्रकरणी, सुधारित शासन निर्णय, दि.२९.०६.२०२२ अन्वये विहीत केलेल्या धोरणानुसार कंपनीला विक्री/वापरातील बदल/शर्तभंग यासाठी देय असणाऱ्या मान्यतेच्या विवक्षित बाबी करीता अनुज्ञेय असणाऱ्या अधिमूल्य रकमेची परिगणना करावी. सदर परिगणनेतून येणारी रक्कम, यापूर्वी शासनास भरणा केलेल्या अधिमूल्यातून वजा केली असता येणारी उर्वरित रक्कम संबंधितास परत करावी.

(ब) तसेच, वरील **(अ)** प्रमाणे, शासन निर्णय दि.२९.०६.२०२२ नुसार स्वत:चा हक्क आबाधीत ठेवून (Under protest) शासन जमा केलेल्या ज्यादा रक्कमेसंदर्भात परतावा मिळण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला असल्यास अथवा झाल्यास अशा प्रकरणात, विभागाने प्रशासकीय प्रस्ताव शासनास सादर करून, शासन मान्यतेने अधिकचे अधिमूल्य परत करण्याची कार्यवाही विभागाने करावी.

(क) वरील **(अ) व (ब)** अन्वये संबंधितांना परत करावयाच्या रकमेवरील खर्च हा "२०२९ महसूली जमा या लेखाशीर्षामधून वजा करुन २०२९०००० (५०) (१४) जमीन महसूल" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. यासाठी अर्थसंकल्पीय तरतुद करण्याची कार्यवाही विभागाने करावी.

(ड) शासन निर्णय दि.११.०१.२०१८ अन्वये, औद्योगिक प्रयोजनासाठी संपादित केलेल्या जमिनीचा, औद्यौगिकेत्तर प्रयोजनासाठी वापरात बदल करण्यात मंजुरी दिलेल्या प्रकरणी, नवीन सुधारित धोरणाचा शासन निर्णय दि.२९.०६.२०२२ अस्तित्वात आल्यानंतर देखील पूर्वीच्या दि.११.०१.२०१८च्या धोरणानुसार देय होणाऱ्या रकमेपेक्षा कमी रक्कम भरणा केल्याचे निदर्शनास आल्यास, कमी भरणा केलेली रक्कम संबंधितांकडून, त्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी वसूल करतील.

तसेच प्रसंगवत: औद्योगिक प्रयोजनाकरीता संपादित करून दिलेल्या जमिनींचा औद्योगिकेत्तर अकृषिक/ वाणिज्यिक /निवासी वापराकरीता शासनाकडून मान्यता देताना, मान्यतेच्या आदेशात देखील वरील सूचनेप्रमाणे अट अंतर्भुत करण्यात यावी.

०२. शासन निर्णय दि.११.०१.२०१८ व दि.२९.०६.२०२२ मधील इतर सर्व मजकूर कायम ठेवण्यात येत आहे.

०३. सदर शासन निर्णयास मा.मंत्री मंडळाच्या दि.१६.०३.२०२४ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे.

०४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संकेतांक क्र. २०२४०३१६१६०४५९४८१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUNIL
SHRIDHARRAO
KOTHEKAR

Digitally signed by SUNIL SHRIDHARRAO KOTHEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=bc3e3742bf263c80937ab54c636ad893656171177467ba8656a12c226f3029a2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C55205CA6D1113BFAEC735BD2D1C5326D6B007C5CD3A46A6E4C4857E58AD2AFE, cn=SUNIL SHRIDHARRAO KOTHEKAR
Date: 2024.03.16 16:14:12 +05'30'

(**सुनिल कोठेकर**)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,राजभवन मलबार हिल,मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई
३) मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
४) मा. उप मुख्यमंत्री (गृह व जलसंपदा) यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
५) मा.अध्यक्ष, विधानसभा /विधानपरिषद यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६) मा.उपाध्यक्ष, विधानसभा /विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा /विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
११) अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) अपर मुख्य सचिव (उद्योग), उ.उ.व का.विभाग, मंत्रालय,मुंबई.
१३) अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण), गृहनिर्माण विभाग,मंत्रालय,मुंबई
१४) प्रधान सचिव (वने, भूसंपादन), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई
१५) प्रधान सचिव (नवि-१/२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) प्रधान सचिव (वि.व न्या.विभाग), विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
१७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र ½, मुंबई/नागपूर.
१८) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र ½, मुंबई/नागपूर
१९) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२०) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे
२१) नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
२२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांकडून भूसंपादनाशी संबंधित न्यायालयीन प्रकरणे हाताळतांना घ्यावयाची दक्षता ...

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन परिपत्रक क्रमांक:-भुभाडे - २०२५ / प्र. क्र. ०५ / रस्ते- ०७.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक:- ०४ फेब्रुवारी, २०२५.

प्रस्तावना :-

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यान्वित करण्यात येणा- या रस्ते, पुल इमारती व त्याअनुषंगिक इतर कामांकरिता खाजगी जमीन संपादित करुन त्याचा भूसंपादन मोबदला संबंधित भूधारकांना अदा करावा लागतो. अशा जमिनींचे भूसंपादन महसूल व वन विभागाने विहित केलेल्या प्रक्रियेनुसार भूसंपादन होऊन संबंधित भूधारकांना त्याचा मोबदला अदा करणे गरजेचे असते. अशा भूसंपादन प्रक्रिया राबवितांना बरेचदा संबंधित भूधारक भूसंपादन मोबदला समाधानकारक न मिळाल्याने मा. न्यायालयाकडे धाव घेतात. एकदा प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्यानंतर सदर प्रकरणामध्ये सक्षम प्राधिका-याची नियुक्ती करणे, याचिकेतील मुद्यांच्या अनुषंगाने शपथपत्र दाखल करणे, मा. न्यायालयामध्ये सततचा पाठपुरावा करणे, मा. कनिष्ठ न्यायालयात शासनाच्या विरोधात निकाल लागल्यास त्याविरुध्द मा. वरिष्ठ न्यायालयात अपिल दाखल् करण्याकरिता सहाय्यक शासकीय अभियोक्ता यांचे अभिप्राय मिळविणे, प्रकरणी विहित मुदतीत अपिल दाखल करणे, इत्यादी बाबी तातडीने करणे आवश्यक असते. क्षेत्रीय स्तरावर अशी प्रकरणे तातडीने हाताळण्याच्या संदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक:-

क्षेत्रीय स्तरावरील प्रदीर्घ कालावधीपासून प्रलंबित असलेल्या भूसंपादनाशी संबंधीत प्रकरणे हाताळतांना खालीलप्रमाणे दक्षता घेण्यात यावी :-

१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रीय स्तरावरील कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात भूसंपादनाशी संबंधित न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याकरीता स्वतंत्र कार्यासनास ही जबाबदारी देण्यात यावी.

२) सर्व न्यायालयीन प्रकरणात शासनाच्या वतीने तात्काळ शपथपत्र दाखल करण्याकरिता सक्षम प्राधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी. तसेच मा.न्यायालयात शासनाच्या वतीने दाखल करावयाच्या शपथपत्राच्या प्रारुपास मुख्य अभियंता यांची मान्यता घेण्यात यावी. ज्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये शपथपत्र सादर करतांना त्यामध्ये काही धोरणात्मक बाबींवर अभिप्राय हवे असतील अशी प्रारुप शपथपत्रे शासनाच्या मान्यतेकरिता सादर करण्यात यावीत.

३) भूसंपादनाच्या काही प्रकरणांत असे आढळून आलेले आहे की, शासन स्तरावरुन सक्षम नियुक्ती प्राधिकारी नेमण्याबाबत तसेच शपथपत्र दाखल करण्याचे निर्देश दिलेले असतांनाही क्षेत्रीय कार्यालयांकडून

त्याची अंमलबजावणी केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अशा प्रकारची दिरंगाई भविष्यात होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

४) क्षेत्रीय स्तरावर ब-याच न्यायालयीन प्रकरणांमध्ये पाठपुरावा केला जात नसल्याचे दिसून येते. त्यामुळे कोणत्या न्यायालयात, कोणत्या प्रकरणावर, कधी सुनावणी आहे याबाबतची कोणतीच माहिती / संकलन संबंधित जबाबदार व्यक्तीकडे नसते. परिणामी एखाद्या प्रकरणी मा. न्यायालयाने दिलेला निर्णय संबंधित कार्यालयाला शासकीय अभियोक्त्याचे पत्र प्राप्त झाल्यानंतरच माहिती होतो. त्याचप्रमाणे मा. न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार विहित मुदतीत कार्यवाही न झाल्याने त्याविरोधात अवमान याचिका दाखल केली जाते. सबब, अशा प्रकरणांची अद्ययावत माहिती क्षेत्रीय स्तरावर ठेवण्यात यावी.

५) ब-याच न्यायालयीन प्रकरणांमध्ये मा. न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरोधात अपिल दाखल करावे किंवा कसे याबाबत शासकीय अभियोक्ता किंवा शासनाचे अभिप्राय घेणे आवश्यक असतात. परंतु अशा प्रकरणी वेळीच कार्यवाही न झाल्याने अभिप्राय प्राप्त करुन घेण्यास दीर्घकाळ झालेला असतो. परिणामी सदर निर्णयाविरुध्द अपिल करण्याचा विहित कालावधी निघून गेलेला असतो. त्यामुळे अपिलाची विहित मुदत संपल्यानंतर शासनाला नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो. भविष्यात असे प्रसंग टाळण्याकरिता पुरेपुर दक्षता घेण्यात यावी.

६) प्राप्त अभिप्राय विचारात घेऊन दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे तसेच विहित मुदतीत पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. त्यामध्ये दिरंगाई आढळून आल्यास संबंधितांस व्यक्तिश: जबाबदार धरुन शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०२०४१५१४५८७३१८ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

PRADEEP PUNAJI TIRLOTKAR

Digitally signed by PRADEEP PUNAJI TIRLOTKAR
DN: CN = PRADEEP PUNAJI TIRLOTKAR, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = PUBLIC WORKS DEPARTMENT
Date: 2025.02.04 15:20:00 +05'30'

(प्रदीप पु. तिर्लोटकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत:-

१) अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
२) सचिव (रस्ते / बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
३) सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग.
४) सर्व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळे.
५) सर्व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
६) निवड नस्ती - (रस्ते- ०७)

राज्यातील ६६ के.व्ही. व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या अति उच्चदाब पारेषण वाहिन्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या मनोऱ्याने व्याप्त जमिन व वाहिनीच्या पट्टयाखालील जमिनीच्या नुकसान भरपाईपोटी देण्यात येणाऱ्या मोबदल्याबाबत सुधारित धोरणाच्या अनुषंगाने अनुसरावयाची कार्यपध्दती निश्चित करणेबाबत. (शुध्दिपत्रक)

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,

शासन शुध्दिपत्रक क्रमांक - पावामो-२०२१/प्र.क्र.१७०(भाग-१)/ऊर्जा-४,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०००३२.

दिनांक :- ०७ फेब्रुवारी, २०२५

संदर्भ : शासन निर्णय क्रमांक पावामो-२०२१/प्र.क्र.१७०/ऊर्जा-४, दि. ०१.१२.२०२२.

शासन शुध्दिपत्रक:-

संदर्भाधिन दिनांक ०१.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. "ई (१) मधील उप विभागीय स्तरीय मुल्यांकन समिती मध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	समितीतील पद
३	सहायक संचालक, नगर रचना मुल्यांकन (संबंधित विभाग)	सदस्य

याऐवजी

अ.क्र.	पदनाम	समितीतील पद
३	सहायक संचालक, नगर रचना, (संबंधित जिल्हयातील शाखा कार्यालय)	सदस्य

असे वाचावे."

सदर शासन शुध्दिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharshtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२५०२०७१२१८४१७७१० असा आहे. हे शासन शुध्दिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by UDDHAV RABHAJI DAHIPHALE
Date: 2025.02.07 12:21:16 +05'30'

(उध्दव. र. दहिफळे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव

२) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

राज्यातील ६६ के.व्ही. व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या अति उच्चदाब पारेषण वाहिन्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या मनोऱ्याने व्याप्त जागेचा तसेच अति उच्चदाब पारेषण वाहिनीच्या पट्टयाखालील जमिनीचा नुकसान भरपाईपोटी मोबदला देण्यासंदर्भात सुधारित धोरण. (शुध्दिपत्रक)

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,

शासन शुध्दिपत्रक क्रमांक - पावामो-२०२१/प्र.क्र.१७०(भाग-१)/ऊर्जा-४,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय ,मुंबई- ४०००३२.

दिनांक :- ०७ फेब्रुवारी, २०२५

संदर्भ : शासन निर्णय क्रमांक पावामो-२०२१/प्र.क्र.१७०/ऊर्जा-४, दि. ०२.११.२०२२.

शासन शुध्दिपत्रक:-

संदर्भाधिन दिनांक ०२.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. "२.१ मधील उप विभागीय स्तरीय मुल्यांकन समिती व जिल्हास्तरीय अपिलीय समिती मध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	समितीतील पद
३	सहायक संचालक, नगर रचना मुल्यांकन (संबंधित विभाग)	सदस्य

याऐवजी

अ.क्र.	पदनाम	समितीतील पद
३	सहायक संचालक, नगर रचना, (संबंधित जिल्हयातील शाखा कार्यालय)	सदस्य

असे वाचावे."

सदर शासन शुध्दिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharshtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२५०२०७१२१८०७९७१० असा आहे. हे शासन शुध्दिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by UDDHAV RABHAJI DAHIPHALE
Date: 2025.02.07 12:20:26 +05'30'

(उध्दव.र. दहिफळे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय,बुलढाणा

विषय क्र.९

आस्थापना विषयक धोरणात्मक शासन निर्णय

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१०६/ई-१०

पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२

दिनांक : २३ मे, २०२२

वाचा - सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१६ / प्र.क्र.५०९/कार्या.१२, दि.१५/०५/२०१९

प्रस्तावना :-

सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१५/०५/२०१९ च्या शासन निर्णयान्वये शासकीय कर्मचाऱ्याच्या विनंतीनुसार संवर्गाअंतर्गत एका नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या आस्थापनेवरुन दुसऱ्या नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी समावेशन करण्याबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

सदर धोरण निश्चित करतांना बदली अधिनियमानुसार गट-क मधील शासकीय कर्मचाऱ्याची ज्येष्ठतायादी ज्या स्तरावर ठेवली जाते त्या जिल्हास्तर, महसूल विभाग स्तर, राज्यस्तर या तीन स्तराचा विचार करुन, सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.६ (२) मध्ये एकाच जिल्ह्यामधील एका नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून त्याच जिल्ह्यातील दुसऱ्या नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे कायमस्वरुपी समावेशन करता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले होते. तथापि, गट क मधील "तलाठी" या संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी हे उपविभागीय अधिकारी असल्याने, सदर संवर्गाची ज्येष्ठतायादी ही जिल्हास्तरापेक्षा खालच्या स्तरावर म्हणजे उपविभागीय स्तरावर ठेवली जाते. त्यामुळे दि.१५/०५/२०१९ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.६ (२) नुसार तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांचे त्यांच्या विनंती वरुन जिल्हांतर्गत एका उपविभागातून दुसऱ्या उपविभागात कायमस्वरुपी समावेशन करता येत नव्हते. सदर तांत्रिक अडचण विचारात घेता, दि.१५/०५/२०१९ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.६ (२) मधील अट "तलाठी" गट क या संवर्गाकरीता शिथील करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रस्तावनेत नमूद बाब विचारात घेता, सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन दि.१५/०५/२०१९ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.६ (२) येथे नमूद अट केवळ "तलाठी गट-(क)"

संवर्गाकरिता शिथील करुन एका उपविभाग स्तरावरील नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून दुसऱ्या उपविभाग स्तरावरील नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे कायमस्वरुपी समावेशन करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. मात्र, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१५/०५/२०१९ च्या शासन निर्णयातील इतर सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

२. सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.१३१३/का.१२/२०२१ दि.२१/१२/२०२१ व क्र.१००/का.१२/२०२२ दि.०९/०२/२०२२ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२२०५२३१६५७०९४६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षाकिंत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SANJAY BANKAR

Digitally signed by SANJAY BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c8a7d6860ff227fd9e69a02e9ca5dfb2ccb25eda92d749629970f349fc6ed260, pseudonym=B37546F6A6BD466ED45270ED708F924F51A07EA8, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY BANKAR
Date: 2022.05.23 17:00:11 +05'30'

(संजय बनकर)
शासनाचे उप सचिव

प्रत,

(१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई-३२.
(२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
(३) मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
(४) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
(५) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई.
(६) सर्व मा. संसद सदस्य / विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
(७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई-३२.
(८) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
(९) सर्व मंत्रालयीन विभाग.
(१०) सर्व सह सचिव / उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
(११) सर्व विभागीय आयुक्त.
(१२) सर्व जिल्हाधिकारी .
(१३) सर्व उपविभागीय अधिकारी.
(१४) कार्यासन-१२, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
(१५) निवडनस्ती (कार्यासन ई-१०), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

जिल्हा वार्षिक योजनेखाली महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावर "गतिमान प्रशासन तथा आपात्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण" या स्वरुपाची नियमित योजना सुरु करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-संकीर्ण-२०२२/प्र.क्र.४०/ई-८
मंत्रालय, पहिला मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक :- २७ जून, २०२२.

प्रस्तावना:

महसूल विभागासाठी मुलभूत व पायभूत सुविधा निर्माण करणे, तलाठी/मंडळ अधिकारी कार्यालय/ निवासी इमारत बांधकाम करणे, तलाठी/मंडळ/अपर तहसिल/ तहसिल/उपविभागीय अधिकारी/ जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त कार्यालय/जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख तसेच नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये / निवासस्थानांची दुरुस्ती, तहसिल/ उपविभागीय अधिकारी/ जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त/ जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख व नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयातील वाहन अनुज्ञेय अधिका-यांसाठी निर्लेखित वाहना ऐवजी नविन वाहन खरेदी करणे, महसूल विभाग/ जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख तसेच नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांसाठी आवश्यक फर्निचर खरेदी करणे, गतिमान प्रशासनाच्या दृष्टीने तसेच आपात्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी अत्याधुनिक उपकरणे/ साधनसामुग्री खरेदी करणे, इत्यादी प्रयोजनासाठी स्थानिक पातळीवर निधी उपलब्ध झाल्यास उपरोक्त बाबी तत्परतेने पुर्ण करता येतील. यास्तव, जिल्हा वार्षिक योजनेखाली एक नियमित योजना सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावर **"गतिमान प्रशासन तथा आपात्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण"** ही नवीन योजना, जिल्हा वार्षिक योजनेखाली नियमित योजना म्हणुन सुरु करण्यास, याव्दारे, मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत खालील बाबींचा अंतर्भाव करण्यात येत आहे.

१. **महसूल विभागासाठी मुलभूत व पायाभूत सुविधा निर्माण करणे.**
२. **क्षेत्रिय स्तरावरील तलाठी/ मंडळ कार्यालय/ निवासी इमारत बांधकामासाठी सदरहू योजनेंतर्गत निधी उपलब्ध करुन देणे.**
३. **तलाठी/मंडळ/अपर तहसिल/तहसिल/उपविभागीय अधिकारी/ जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त तसेच जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख व नोंदणी**

महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये तसेच सदर कार्यालयातील अधिका-यांच्या शासकीय निवासस्थानांची दुरुस्ती करणे.

४. तहसिल/उपविभागीय अधिकारी/ जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त कार्यालये तसेच जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख व नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयातील वाहन अनुज्ञेय असलेल्या अधिका-यांसाठी वाहन खरेदी करणे.

५. महसूल विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयांसाठी आवश्यक फर्निचर खरेदी करणे.

६. गतिमान प्रशासनाच्या दृष्टीने तसेच आपात्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी अत्याधुनिक उपकरणे/ साधनसामुग्री खरेदी करणे.

२. सदर योजनेतंर्गत उपरोक्त नमूद बाबींच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे आहेत.

१-अ) महसूल विभागासाठी मुलभूत व पायभूत सुविधा निर्माण करणे याअंतर्गत कार्यालयामध्ये अभ्यागत कक्ष, अभ्यागतांसाठी स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, कार्यालयीन महिला कर्मचा-यांसाठी स्वतंत्रे स्वच्छतागृहे, बैठकीसाठी दालन, दिव्यांग कर्मचारी/ अभ्यागत यांच्यासाठी रॅम्प, कार्यालयीन सुरक्षिततेसाठी अग्नीशमन यंत्रणा, सी.सी.टी.व्ही. व तत्सम सुविधा प्राथम्याने उपलब्ध करुन द्याव्यात.

२-ब) क्षेत्रिय स्तरावरील तलाठी/ मंडळ कार्यालयांचे/ निवासी इमारत बांधकाम सदर योजनेंतर्गत अनुज्ञेय करण्यात येत आहे.

३-क) तलाठी/मंडळ/अपर तहसिल/तहसिल/उपविभागीय अधिकारी/ जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त तसेच जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख व नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये तसेच सदर कार्यालयातील अधिका-यांच्या शासकीय निवासस्थानांची दुरुस्ती सदर योजनेंतर्गत उपलब्ध होणा-या निधीच्या **कमाल १५ टक्के पर्यंतच्या मर्यादेत** करता येईल.

४-ड) सदर योजनेंतर्गत तहसिल/उपविभागीय अधिकारी/ जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त तसेच जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख व नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्या अधिनस्त कार्यालयातील वाहन अनुज्ञेय असलेल्या अधिका-यांसाठी वाहन खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. नवीन वाहने खरेदी करण्याकरिता वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना लागू राहतील. त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या दिनांक २८/०७/२०२० च्या शासकीय वाहनांचे किंमत मर्यादा धोरणास अनुसरुन वाहने खरेदी करणे

आवश्यक राहील. तसेच वाहने खरेदी करताना उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.२४.०८.२०१७ च्या धोरणानुसार खरेदी GEM Portal च्या माध्यमातून ई-निविदा प्रक्रिया राबवून करण्यात यावी.

५-इ) महसूल विभागाच्या तहसिल/उपविभागीय अधिकारी/ जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त तसेच जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख व नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांसाठी सदर योजनेंर्तगत आवश्यक फर्निचर खरेदी करताना सार्वजनिक बांधकाम विभागाने तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना विचारात घ्याव्यात.

६-ई) गतिमान प्रशासनाच्या दृष्टीने तसेच आपात्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी सदर योजनेच्या माध्यमातून अत्याधुनिक उपकरणे/ साधनसामुग्री खरेदी अनुज्ञेय करण्यात येत आहे.

३. उक्त योजनेस महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावर "गतिमान प्रशासन तथा आपात्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण" या नावाने आणि महसूल विभागाच्या सर्व साधारण नियंत्रणाखाली क्षेत्रिय स्तरावरील महसूल, भूमि अभिलेख तसेच मुद्रांक व नोंदणी उपविभाग यांच्याकडून कार्यान्वित करण्यात येईल.

४. जिल्हा नियोजन समितीस मिळणा-या एकूण नियतव्ययाच्या **कमाल ५ टक्के पर्यंत** निधी सबंधित जिल्हयाच्या आवश्यकतेनुसार नियोजन विभागामार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल.

५. उक्त योजनेतील नमूद बाबी अनुषंगाने करावयाची कामे, त्यांचे स्वरुप, व त्यांना प्रशासकीय / तांत्रिक मान्यता देणारे प्राधिकरण व अंमलबजावणी यंत्रणा हे या **सोबतच्या जोडपत्रात** निर्दिष्ट केल्याप्रमाणे राहतील.

६. उक्त योजनेखालील कामांना **प्रशासकीय मान्यता** प्रदान करण्याचे अधिकार हे जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांना राहतील.

७. उक्त योजनेखालील कामांना **तांत्रिक मान्यता** प्रदान करण्याचे अधिकार हे या सोबतच्या जोडपत्रात निर्दिष्ट केल्याप्रमाणे राहतील.

८. सदर योजनेसाठी प्रधान लेखाशिर्ष, मुख्य लेखाशिर्ष, उपशिर्ष महसूल विभागाने प्रस्तावित केल्यानंतर नियोजन विभागामार्फत ३६ जिल्हयांसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष घेण्यात येतील.

९. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक "२८४ दिनांक ०९/०३/२०२२ आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक"१४९/ २०२२/व्यय-९", दिनांक २२/०४/२०२२, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२२०६३०१५२५१६२२१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dr.SHWETA SAWDEKAR BAIG

Digitally signed by Dr.SHWETA SAWDEKAR BAIG
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6281ac1913ceb1456ffcfd8e5d3dbe032cfa746426763d6351cb898b72986801, pseudonym=7EEE8BAF53B2BFC59945DABFC99C96C2C2709F7F, serialNumber=2FA86D3D30D0DE896CC35E8F420B067861B1ECA1D14FF010A5202C61E6ADC6FE, cn=Dr.SHWETA SAWDEKAR BAIG
Date: 2022.06.30 15:27:58 +05'30'

(डॉ.श्वेता सावदेकर-बेग)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई.
५. विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य,
६. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई.
११. विभागीय आयुक्त (सर्व),
१२. जिल्हाधिकारी (सर्व),
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१४. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१६. जिल्हा नियोजन अधिकारी (सर्व),
१७. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व),
१८. कार्यासन अधिकारी (ब-१), महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई.
१९. वित्त विभाग (कार्यासन व्यय -९/अर्थ-६), मंत्रालय, मुंबई.
२०. नियोजन विभाग (कार्यासन १४८१) मंत्रालय, मुंबई.
२१. निवड नस्ती (कार्यासन/ई-८)

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.संकिर्ण-२०२२/प्र.क्र.४०/ई-८ सोबतचे जोडपत्र

जिल्हा वार्षिक योजनेखाली महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावर "गतिमान प्रशासन तथा आपात्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण" या स्वरुपाची नियमित योजना.

अ.क्र.	योजनेतील बाबी	
१.	**महसूल विभागासाठी प्रशासनिक नियंत्रणाखालील इमारतींमध्ये मुलभूत व पायाभूत सुविधा निर्माण करणे.**	
	कामे	अपर तहसिल / तहसिल / उपविभागीय अधिकारी कार्यालय/जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त तसेच जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख व नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयामध्ये मुलभूत व पायाभूत सुविधा निर्माण करणे.
	कामाचे स्वरूप	पिण्याच्या पाण्याची व्यवस्था,दिव्यांगासाठी रॅम्प तयार करणे, दिव्यांगासाठी स्वच्छतागृहे, अभ्यागतांसाठी स्वतंत्र कक्ष व स्वच्छतागृहे निर्माण करणे,महिला कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे, बैठकीसाठी दालन,सी.सी.टी.व्ही.पार्किंग इ. कार्यालयानुसार अनुषंगिक बाबी.
	अमंलबजावणी यंत्रणा	विभागीय आयुक्त किंवा यथास्थिती जिल्हाधिकारी/नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक/जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख आणि सार्वजनिक बांधकाम विभाग.
	तांत्रिक मान्यता	सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत प्रचलित स्थायी आदेशानुसार क्षेत्रीय स्तरावरील सक्षम प्राधिकारी.
२.	**तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालयीन तथा निवासी इमारतींचे बांधकाम.**	
	कामे	तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालय / निवासी इमारतींचे बांधकाम.
	कामाचे स्वरूप	स्थापत्य व विद्युत विषयक कामे.
	अमंलबजावणी यंत्रणा	सार्वजनिक बांधकाम विभाग आणि विभागीय आयुक्त किंवा यथास्थिती जिल्हाधिकारी.
	तांत्रिक मान्यता	सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत प्रचलित स्थायी आदेशानुसार क्षेत्रीय स्तरावरील सक्षम प्राधिकारी.

३.	**महसूल विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील असलेल्या शासकीय इमारतींची दुरूस्ती.**	
	कामे	तलाठी/मंडळ अधिकारी/अपर तहसिल/तहसिल/उपविभागीय अधिकारी/जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त तसेच जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख व नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयीन इमारतींची दुरूस्ती.
	कामाचे स्वरूप	स्थापत्य व विद्युत विषयक कामे.
	अमंलबजावणी यंत्रणा	सार्वजनिक बांधकाम विभाग / विभागीय आयुक्त किंवा जिल्हाधिकारी/ नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक / जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख यांच्या अखत्यारितील कार्यालये.
	तांत्रिक मान्यता	सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत प्रचलित स्थायी आदेशानुसार सक्षम प्राधिकारी.
४.	**वाहतूक व्यवस्थेचे बळकटीकरण**	
	कामे	तहसिल/उपविभागीय अधिकारी/ जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त तसेच जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख व नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयातील वाहन अनुज्ञेय असलेल्या अधिका-यांसाठी निर्लेखित वाहना ऐवजी नविन वाहन खरेदी करणे.
	कामाचे स्वरूप	मोटार वाहन खरेदी.
	अमंलबजावणी यंत्रणा	विभागीय आयुक्त किंवा जिल्हाधिकारी/ नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक/ जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमि अभिलेख.
	तांत्रिक मान्यता	महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन.
५.	**महसूल विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या शासकीय कार्यालयांकरीता फर्निचर खरेदी करणे.**	
	कामे	अपर तहसिल/ तहसिल/उपविभागीय अधिकारी/ जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त तसेच जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख व नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयांकरीता नविन फर्निचर खरेदी करणे.
	कामाचे स्वरूप	नविन फर्निचर खरेदी करणे.
	अमंलबजावणी यंत्रणा	सार्वजनिक बांधकाम विभाग आणि विभागीय आयुक्त किंवा जिल्हाधिकारी/ नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक / जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख.
	तांत्रिक मान्यता	सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत प्रचलित स्थायी आदेशानुसार सक्षम प्राधिकारी.

६.	**महसूल विभागाचे आधुनिकीकरण, गतिमान प्रशासन तसेच आपात्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी अत्याधुनिक उपकरणे/साधनसामुग्री खरेदी करणे**	
	कामे	रोव्हर्स अँड कंट्रोलर्स(पोर्स प्रोसेसिंग सॉफ्टवेअरसह), ईटीएस मशीन्स, संगणक,स्कॅनर्स,कॉम्पॅक्टर,प्लॉटर्स,जीआयएस सॉफ्टवेअर,लॅपटॉप,प्रिंटर, युपीएस इ. उपकरणाची खरेदी,अभिलेखाच्या संस्करणासाठी तसेच साठवणुकीसाठी आवश्यक यंत्रसामुग्रीची खरेदी.
	कामाचे स्वरूप	उपरोक्त यंत्रसामुग्रीची खरेदी.
	अमंलबजावणी यंत्रणा	विभागीय आयुक्त किंवा जिल्हाधिकारी /नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक/ जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे.
	तांत्रिक मान्यता	विभागीय आयुक्त किंवा जिल्हाधिकारी /नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक/ जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे.

कोतवालांच्या मानधनात वाढ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१९१/ई-१०
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०६ एप्रिल, २०२३

वाचा : (१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.बैठक-२०१६/प्र.क्र.५८१/ई-१०, दि.१८/०३/२०१७

(२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.बैठक-२०१६/प्र.क्र.५८१/ई-१०, दि.०६/०२/२०१९ व दि.०१/०३/२०१९

(३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१२५/ई-१०, दि.१३/०१/२०१४

प्रस्तावना :-

राज्यातील कोतवालांनी विविध निवेदनाव्दारे, कोतवाल हे शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच २४ तास शासकीय कामास बांधिल असून कोतवालांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आलेल्या आहेत. कोतवालांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या तसेच कामाच्या स्वरुपाचा विचार करता, राज्यातील कोतवालांना मिळणारे मानधन हे तुटपंजे स्वरुपाचे असल्याने त्याचप्रमाणे महसूल व वन विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक (२) येथील शासन निर्णयान्वये कोतवालांना लागू करण्यात आलेल्या मानधनवाढीत वय वर्षे ५० वर्षावरील आणि वय वर्ष-५० च्या आतील कार्यरत कोतवालांच्या सेवाकालावधीनुसार देण्यात येणाऱ्या मानधनात तफावत असल्याने सदरची तफावत दूर करण्याबाबत राज्यातील कोतवालांनी मा. मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.मंत्री महोदय व मा.लोकप्रतिनिधींना वारंवार भेटून कोतवालांना सरसकट एक समान पंधरा हजार रुपये इतके मानधन देण्याची मागणी करीत असतात. त्यानुषंगाने मा.उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री महोदय यांनी दि.०९/०३/२०२३ रोजी राज्याचा सन २०२३-२४ करीताचा अर्थसंकल्प सादर करतांना अर्थसंकल्पीय भाषणात केलेल्या घोषणेप्रमाणे राज्यातील कोतवालांना मानधनवाढीचा प्रस्ताव गुरुवार, दि.१७/०३/२०२३ रोजीच्या मा. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला असता, मा. मंत्रिमंडळाने यासंदर्भात घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील कोतवालांच्या मानधनात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

कोतवाल संवर्गाच्या बाबतीत "एका साझास एक कोतवाल" असे धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्याप्रमाणे राज्यातील कोतवालांची संख्या-१२,३२७ व संदर्भीय क्रमांक (३) येथील दिनांक १३/०१/२०१४ च्या शासन निर्णयान्वये, गडचिरोली जिल्ह्यातील संवेदनशिल गावांकरीता कोतवाल संवर्गाच्या ४६६ अतिरिक्त पदांना मंजूरी देण्यात आलेली आहे. महसूल व वन विभागाच्या संदर्भीय क्रमांक (२) येथील दि.०६/०२/२०१९ व दि.०१/०३/२०१९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद-१ मधील नमूद मानधनाऐवजी आता वर नमूद केल्याप्रमाणे राज्यातील एकूण १२,७९३ कोतवालांना यापुढे दरमहा रु.१५,०००/- (रुपये पंधरा हजार फक्त) इतके मानधन दि.०१/०४/२०२३ पासून लागू करण्यात येत आहे.

२. महसूल व वन विभागाच्या संदर्भीय क्रमांक (२) येथील दि.०६/०२/२०१९ व दि.०१/०३/२०१९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद-२ मधील "जे कोतवाल वरीलप्रमाणे वर्ग-ड च्या सदर कोट्यातील पदांवर पदोन्नतीस पात्र ठरतील त्यांना सदर पदावर नियुक्ती होईपर्यंत दरमहा रु.१५,०००/- इतके मानधन देण्यात यावे" ही तरतूद वगळण्यात येत आहे. तसेच उक्त शासन निर्णयांतील उर्वरित तरतूदींमध्ये कोणताही फेरबदल केला नसून सदरच्या तरतूदी जशाच्या तशाच लागू राहतील.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१७४५२, दि.०९/११/२०२२ व अनौ.संदर्भ क्र.१२३, दि.०९/१२/२०२२ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२३०४०६१९१२१३९७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJAY BANKAR

Digitally signed by SANJAY BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c8a7d6860ff227fd9e69a02e9ca5dfb2ccb25eda92d749629970f349fc6ed260, pseudonym=B37546F6A6BD466ED45270ED708F924F51A07EA8, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY BANKAR
Date: 2023.04.06 19:17:39 +05'30'

(संजय बनकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त,
२. सर्व जिल्हाधिकारी,
३. महालेखापाल, १/२ (लेखापरिक्षक) मुंबई / नागपूर
४. महालेखापल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर
५. अवर सचिव (कार्यासन व्यय-९), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७. कार्यासन अधिकारी (कार्यासन ब-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८. कार्यासन अधिकारी (कार्यासन ई-७), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९. निवडनस्ती (कार्यासन- ई-१०)

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१७/ई-१०
पहिला मजला, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- १७ मे, २०२३

वाचा : शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.केओटी-२०१२/प्र.क्र.४३२/ई-१०, दिनांक ०५ सप्टेंबर, २०१३

<u>प्रस्तावना</u> :-

राज्यातील महसूल विभागाच्या अखत्यारीत कार्यरत असलेला कोतवाल संवर्ग हा अवर्गीकृत मानधन तत्वावरील पद असून शासकीय कर्मचारी नाही. कोतवाल संवर्गाकरीता दिनांक ०७ मे, १९५९ च्या शासन निर्णयान्वये स्वतंत्र सेवाप्रवेश नियम विहित करण्यात आलेले आहेत. तसेच कोतवाल संवर्गाची पदे भरतांना राज्यात सर्व ठिकाणी समानता येण्यासाठी महसूल व वन विभागाच्या दिनांक ०५ सप्टेंबर, २०१३ च्या शासन निर्णयान्वये सुधारीत नियम व मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तथापि, आता शासनाने भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील नामनिर्देशनाच्या कोट्यातील पदे भरतांना मौखिक परीक्षा / मुलाखत न घेण्याबाबतचे धोरण ठरविले आहे. तसेच शासनाने सरळसेवा भरतीसाठी नामनिर्देशनाव्दारे पदभरती करताना वेळोवेळी सुधारित केलेल्या बिंदुनामावलीची अंमलबजावणी व आरक्षण कायद्यातील तरतुदींचे पालन करणे आवश्यक आहे. सबब, सदरच्या बाबी विचारात घेता, कोतवाल संवर्गाच्या पदभरतीसंदर्भात महसूल व वन विभागाच्या दिनांक ०५ सप्टेंबर, २०१३ च्या शासन निर्णयातील सुधारित नियम व मार्गदर्शक तत्वांमधील अनुक्रमांक (४) व (५) मध्ये योग्य त्या सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

महसूल व वन विभागाच्या संदर्भीय शासन निर्णय क्र.केओटी-२०१२/प्र.क्र.४३२/ई-१०, दिनांक ०५ सप्टेंबर, २०१३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद-१ येथील सुधारित नियम व मार्गदर्शक तत्वांमधील अनुक्रमांक (४) व (५) च्या तरतूदी अधिक्रमित करण्यात येत असून त्याऐवजी पुढीलप्रमाणे तरतूदी लागू करण्यात येत आहेत :-

(४) कोतवाल संवर्गाची पदे नामनिर्देशनाने भरतांना १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात यावी. लेखी परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाचे ५० प्रश्न असावेत. त्यानुसार सदर लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवडसूची तयार करुन निवडसूचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात यावी.

(५) नामनिर्देशनाव्दारे पदभरती करतांना बिंदुनामावलीची अंमलबजावणी संदर्भात शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या प्रचलित शासन निर्णयातील तरतूदींची अंमलबजावणी करावी व आरक्षण कायद्यातील तरतुदींचे पालन करावे.

२. महसूल व वन विभागाच्या संदर्भीय शासन निर्णय दिनांक ०५ सप्टेंबर, २०१३ च्या शासन निर्णयातील उर्वरित तरतूदींमध्ये कोणताही फेरबदल केला नसून सदरच्या तरतूदी जशाच्या तशाच लागू राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२३०५१७११२८०४८२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SANJAY BANKAR

Digitally signed by SANJAY BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c8a7d6860ff227fd9e69a02e9ca5dfb2ccb25eda92d74962997 0f349fc6ed260, pseudonym=B37546F6A6BD466ED45270ED708F924F51A07EA8, serialNumber=C5917E56B0DA516AB259DB46D516CB0584DCE5E9A2E 73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY BANKAR
Date: 2023.05.17 11:30:26 +05'30'

(संजय बनकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.

तलाठी (गट-क) संवर्गाची आस्थापना जिल्हास्तरावर निश्चित करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.तलाठी-२०२३/प्र.क्र.०८/ई-१०
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- १८ सप्टेंबर, २०२३

वाचा:- शासन अधिसूचना क्र.सेप्रनि-२००८/प्र.क्र.४०६/ई-१०, दि.०१ जुलै, २०१०

प्रस्तावना:-

सन-२०१३ पासून उपविभागीय अधिकारी कार्यालयांची पुनर्रचना होवून एका उपविभागीय अधिकारी कार्यालयांतर्गत एक किंवा दोन तालुक्यांचे कार्यक्षेत्र निश्चित करण्यात आलेले आहे. गट-क मधील तलाठी या संवर्गाची आस्थापना उपविभागीय कार्यालयाच्या स्तरावर असून आस्थापना विषयक बाबी, बिंदुनामावली, बदली इत्यादी बाबत उपविभागीय अधिकारी स्तरावर कार्यवाही करण्यात येते. उपविभागीय अधिकारी कार्यालयांच्या पुनर्रचनेनंतर काही उपविभागांचे क्षेत्र एका तालुक्यासाठी निश्चित झालेले आहे. त्यानुसार तलाठी यांना केवळ एकाच तालुक्यामध्ये पूर्ण सेवा कालावधीमध्ये काम करावे लागते.

उक्त नमूद केल्याप्रमाणे केवळ एक किंवा दोन तालुक्याच्या कार्यक्षेत्रामध्ये पूर्ण सेवा कालावधीमध्ये काम करणे अनिवार्य असल्याने कामामध्ये सारखेपणा येऊन नाविन्यता व उपक्रमशीलता याचा अभाव दिसून येतो. त्याचप्रमाणे अनेक तलाठी उपविभागाबाहेर बदलीसाठी प्रयत्न करत असतात. तथापि, उपविभागीय स्तरावर असलेल्या आस्थापनेमुळे ते शक्य होत नाही. त्यामुळे सेवाज्येष्ठतेबाबत गुंतागुत निर्माण होवून काही तलाठी उपविभागाबाहेर जाण्यास इच्छूक असल्यास त्यांची सेवाज्येष्ठता गमावली जाते. तसेच सेवाज्येष्ठतेबाबत विविध न्यायालयीन प्रकरणेदेखिल उद्ववत असतात.

तलाठी संवर्गाची पदभरती प्रक्रिया जिल्हास्तरावरुन होत असल्याने तलाठी संवर्गाची आस्थापना जिल्हास्तरावर ठेवल्यास तलाठ्यांना संपूर्ण जिल्ह्यात वेगवेगळ्या तालुक्यांमध्ये काम करण्याची संधी मिळू शकते. वेगवेगळ्या तालुक्यांतील वेगवेगळ्या भौगोलिक, सामाजिक व आर्थिक परिस्थतीनुसार उपक्रमशीलतेने काम करण्यास तलाठी संवर्गातील कर्मचारी प्रवृत्त होतील. सदर बाब विचारात घेऊन तलाठी संवर्गाची आस्थापना जिल्हास्तरावर निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> -

या शासन निर्णयाव्दारे तलाठी (गट-क) संवर्गाची उपविभागीय अधिकारी स्तरावरील आस्थापना जिल्हास्तरावर निश्चित करण्याबाबत पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे :-

(अ) तलाठी (गट-क) संवर्गाचे "नियुक्ती प्राधिकारी" हे जिल्हाधिकारी राहतील.

(ब) तलाठी (गट-क) संवर्गाच्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती संबंधित जिल्ह्यात बदलीस पात्र राहील.

(क) तलाठी (गट-क) संवर्गाच्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तींची सेवाज्येष्ठतासूची जिल्हास्तर ठेवण्यात यईल.

२. सदर शासन निर्णयापुर्वीच्या प्रचलित धोरणानुसार तलाठी व मंडळ अधिकारी संवर्गाच्या ज्येष्ठतासूचीवर कोणताही परिणाम न करता, सुधारीत धोरण हे शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून पुढे लागू राहील.

३. या शासन निर्णयानुसार तलाठी (गट-क) संवर्गाच्या दि.०१ जुलै, २०१० च्या सेवाप्रवेश नियमातील तरतूदींमध्ये सुधारणा करण्यात येईल. सदर सुधारणा होईपर्यंत या शासन निर्णयातील तरतूदी लागू राहतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०९१८१९०४४८७८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

RAMESH NAMDEO JAGTAP

Digitally signed by RAMESH NAMDEO JAGTAP
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=0c19f5aff07e8e032316c50df2eee86d4eadc6e4ac1e502c4ce53a7762e7e059, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B42F1BB542CD2BC481C3C6F994B28EBD58BB368E14A9C6CBD23808C8315A965C, cn=RAMESH NAMDEO JAGTAP
Date: 2023.09.18 19:08:27 +05'30'

(रमेश जगताप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.

कोतवालांना गट-ड (वर्ग-४) मधील पदांवरील नियुक्तीसाठी मौखिक परीक्षा न घेण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.कोतवा -२०२३/प्र.क्र.१५८/ई-१०
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- २२ नोव्हेंबर, २०२३

वाचा:- १) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र.स-३०/४२००/प्र.क्र.६२५/ई-१०, दि.२२/०३/२००१
२) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र.स-३०/४२००/प्र.क्र.६२५/ई-१०, दि.१९/०७/२००१
३) शासन निर्णय, सा. प्र. वि., क्र.प्रानिमं -१२१५/प्र.क्र.(१०९/१५)/१३-अ,दि.०५/१०/२०१५
४)शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.बैठक-२०१६/प्र.क्र.५८१/ई-१०, दि.०६.०२.२०१९

प्रास्ताविक:-

उपरोक्त संदर्भाधीन अनुक्रमांक १) व २) येथील दिनांक २२.०३.२००१ व दिनांक १९.०७.२००१ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये, कोतवाल गट-ड (वर्ग-४) मधील पदांवरील नियुक्तीसाठी प्राधान्य देण्याबाबत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. उपरोक्त संदर्भाधीन अनुक्रमांक ४) येथील दिनांक ०६.०२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये, महसूल विभागांतर्गत असणा-या गट-ड च्या प्रथम नियुक्तीच्या पदांपैकी नियमित पदांमधून ४० टक्के पदे कोतवालांसाठी राखीव ठेवण्यात आलेली आहेत. उपरोक्त संदर्भाधीन अनुक्रमांक ३) येथील सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०५.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, गट-ड मधील पदे नामनिर्देशनाद्वारे भरतांना मौखिक परीक्षा न घेण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने दिनांक १९.०७.२००१ रोजीच्या शासन परिपत्रकामधील कोतवालांना गट-ड (वर्ग-४) मधील पदांवरील नियुक्तीसाठी प्राधान्य देण्याबाबत निश्चित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीमधील "मौखिक / व्यक्तिमत्व चाचणी" हा मुद्दा वगळण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

दिनांक १९.०७.२००१ रोजीच्या शासन निर्णयानुसार कोतवालांना गट-ड (वर्ग-४) मधील पदांवरील नियुक्तीसाठी प्राधान्य देण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे-

१) जिल्हा हे एक घटक (Unit) गृहीत धरण्यात यावे व कोतवालांची जिल्हास्तरीय ज्येष्ठता यादी तयार करण्यात यावी. सुरुवातीला ही यादी तयार करुन त्याबाबतच्या हरकती (Objection) मागविण्यात याव्यात. त्या तपासून यादीला अंतिम स्वरुप देण्यात यावे व ती प्रसिध्द कण्यात यावी.

२) उच्चतम वयोमर्यादेपेक्षा जास्त वय असलेल्या कोतवालांची नावे या यादीमधून वगळण्यात यावीत. उर्वरित कोतवालांकडून (कमीत कमी पाच वर्षे सेवा झालेल्या) वर्ग-४ मध्ये नियुक्तीसाठी ते इच्छुक आहेत काय याबाबत त्यांचेकडून माहिती घेण्यात यावी. जे इच्छुक नसतील यांची नावे वगळण्यात यावीत.

३) त्यानंतर किती पदे भरावयाची आहेत हे निश्चित करुन १ : ५ या प्रमाणात विचाररक्षेत्रात येणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करावी. (Zone of Consideration) कोतवालांना वर्ग-४ च्या पदावर पदोन्नती देतांना वर्ग-४ च्या मंजूर पदांची संख्या लक्षात घेऊन (Percentage) निश्चित करण्यात यावे.

यानंतर जे कोतवाल विचार क्षेत्रात येत असतील त्यांची यादी तयार करुन वर्ग-४ च्या पदावरील नियुक्तीसाठी पुढीलप्रमाणे १०० गुणांपैकी गुण देऊन पुढील मुद्दे विचारात घेऊन गुणवत्तेनुसार वर्ग-४ साठी निवड करण्यात यावी.

अ) विचार क्षेत्रात येणारे उमेदवार ------- ३५ गुण

ब) शैक्षणिक अर्हता, एस.एस.सी. व अधिक---- १० गुण

क) पाच वर्षावरील सेवा

प्रत्येक वर्षाच्या सेवेकरीता ---- ३ गुण

ड) मौखिक / व्यक्तिमत्व चाचणी --- १० गुण

(यामध्ये कोणत्याही उमेदवारास ३ पेक्षा कमी व आठ पेक्षा जास्त गुणे देण्यात येऊ नयेत)

वरीलप्रमाणे गुणानुक्रमे उमेदवारांची यादी तयार करून त्यांना वर्ग-४ च्या पदावर नियुक्ती देण्यात यावी.

२. उपरोक्त परिच्छेदामधील "**अनुक्रमांक ३) ड) मौखिक / व्यक्तिमत्व चाचणी -- १० गुण**

(यामध्ये कोणत्याही उमेदवारास ३ पेक्षा कमी व आठ पेक्षा जास्त गुणे देण्यात येऊ नयेत)" हा मुद्दा वगळण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३११२२१९१५५३६०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=c8a7d6860ff227fd9e69a02e9ca5dfb2ccb25eda92d749629970f349fc6ed260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2023.11.22 19:15:43 +05'30'

(संजय बनकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३) मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४) मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान भवन, मुंबई
६) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन,मुंबई

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१२/ई-७
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : २५ जानेवारी, २०२४.

वाचा :- महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-२०२३/प्र.क्र.९१/ई-१०, दि.१८.०८.२०२३.

शासन परिपत्रक :-

तलाठी व मंडळ अधिकारी हे क्षेत्रीय स्तरावरील सर्व सामान्य नागरिकांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे पद असून जनतेस आवश्यक असलेल्या विविध प्रकारच्या दाखल्यांसाठी तलाठी व मंडळ कार्यालयाशी संपर्क साधावा लागतो. तसेच शेतकऱ्यांशी निगडीत पीक पाहणीची ई-पीक पाहणी या मोबाईल ॲप द्वारे नोंदणी करणे, नुकसानीचे पंचनामे करणे, दुष्काळ, अतिवृष्टी, नैसर्गिक आपत्ती इत्यादी प्रसंगी मदत व पुर्नवसनाचे काम करणे यासाठी तलाठी व मंडळ अधिकारी हे अतिशय महत्वाचा दुवा आहेत. परंतु तलाठी व मंडळ अधिकारी हे त्यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी उपलब्ध राहत नसलेबाबत जनतेकडून तसेच लोकप्रतिनिधींकडून वारंवार शासनास तक्रारवजा सूचना प्राप्त होत आहेत.

वाचा येथील शासन परिपत्रक दि.१८.०८.२०२३ अन्वये, जनतेची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याकरिता सर्व तलाठी यांनी सज्जाच्या ठिकाणी उपस्थित राहण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. असे असले तरी तहसिल कार्यालय, उपविभागीय कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित करण्याऱ्या बैठका ह्या दुपारच्या सत्रात आयोजित करण्यात येत असल्याने, सदर बैठकीस उपस्थित राहण्याकरिता संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी हे सकाळपासूनच त्यांच्या मुख्यालयात उपस्थित नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. तलाठी व मंडळ अधिकारी यांच्याकडे कामानिमित्त येणाऱ्या जनतेस आवश्यक त्या वेळेत त्यांच्या सेवा उपलब्ध होत नसल्याने जनतेची गैरसोय होत असल्याने, याबाबत सामान्य जनतेत शासनाच्या विरोधात असंतोष निर्माण होत आहे. तथापि जनतेची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याकरीता सर्व तलाठी व मंडळ अधिकारी यांनी जास्तीत जास्त वेळ त्यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी उपस्थित राहण्याबाबत सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने शासन खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करीत आहे :-

(१) जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय कार्यालय व तहसिल कार्यालय यांनी त्यांच्याकडील आयोजित केलेल्या बैठकीस तलाठी व मंडळ अधिकारी यांना निमंत्रित करावयाचे असल्यास, सदरच्या बैठका ह्या सकाळच्या सत्रात आयोजित कराव्यात. बैठकीनंतर तलाठी व मंडळ अधिकारी हे दुपारच्या कामकाजाच्या सत्रात त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहतील यांची त्यांनी दक्षता घ्यावी.

(२) जनतेस कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.

(३) वाचा येथील शासन परिपत्रक दि.१८.०८.२०२३ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी.

२. सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख / कार्यालयीन प्रमुख तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालये यांच्या निदर्शनास सदर निर्देश आणावेत.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२४०१२५१९५५२१०५१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=c8a7d6860ff227fd9e69a02e9ca5dfb2ccb25eda92d749629970f349fc6ed260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2024.01.25 19:57:53 +05'30'

(संजय बनकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४) मा.सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
५) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
६) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. उपमुख्यमंत्री (गृह / वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.
९) सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११) सर्व विभागीय आयुक्त/ सर्व जिल्हाधिकारी.
१२) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
१३) निवड नस्ती (कार्या.ई-७).

महसूल विभागाच्या मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालयांसाठीच्या नमुना नकाशास (Type Plan) शासनाची मान्यता देणेबाबत....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक: बीएलडी - २०२३/प्र.क्र.६६ /ई-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १२ जुलै, २०२४

संदर्भ:-१) शासन परिपत्रक,सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र. बीडीजी-१०८९/प्र.क्र.५४/इमा-१ दि.०८/०३/१९८९.
२) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्र.मुवाशा/T-ADM-५५२५/प ३/६६८, दि.१३/०७/२०२३.
३) सार्वजनि बांधकाम विभाग, पत्र क्र.बैठक-२०२४/प्र.क्र.०९/इमा-१,दि.२६/०२/२०२४.

प्रस्तावना:-

महसूल विभाग हा राज्य शासनाचा महसूली प्रशासनाचा आणि स्त्रोताचा अत्यंत महत्वाचा विभाग आहे. तसेच जन्मापासून मृत्युपर्यंत प्रत्येक व्यक्तीचा महसूल विभागाशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध येत असतो. नागरिकांना चांगल्या सुविधा देण्यासाठी पर्यायाने सर्व पातळीवरील महसूली कार्यालये सुस्थितीत असणे आवश्यक आहे. यामध्ये स्थानिक पातळीवरील तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालयास जनसंपर्क व अभिलेख जतन याअनुषंगाने अत्यंत महत्वाची ठरतात. यास्तव, संपूर्ण राज्यभरातून अशा मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालय बांधकामाकरीता अंदाजपत्रकासहीत प्रस्ताव शासनास प्राप्त होत आहेत.

०२. राज्यातील विविध जिल्ह्यातून शासन स्तरावर प्राप्त झालेल्या/होत असलेल्या अशा कार्यालयांच्या बांधकामांच्या अंदाजपत्रकाच्या किंमतीमध्ये मोठया प्रमाणात तफावत असल्याची, बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. त्यामुळे, संपूर्ण राज्याकरीता मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालयाच्या इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकात एकसमानता यावी, यासाठी एक नमुना नकाशा (टाईप प्लान) करण्याचा शासनाचा मानस होता. याकरीता मुख्य वास्तुशास्त्रज्ञ,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी तयार केलेल्या नकाशांना मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या मंत्रालयातील दालनात उच्च स्तरीय सचिव समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीअंती आदर्श नमुना नकाशास मान्यता प्रदान केली आहे.

शासन निर्णय:-

मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता प्रदान केल्यानुसार, महसूल विभागाच्या क्षेत्रीय मंडळ अधिकारी व तलाठी या कार्यालयांसाठी पुढीलप्रमाणे बांधकाम क्षेत्रफळ मर्यादा खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून खालील आदर्श नकाशांस याद्वारे शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ.क्र.	कार्यालयाचे नाव	क्षेत्रफळ (चौ.मी.)	कामाची किंमत (रू. लक्ष)
१	मंडळ अधिकारी कार्यालय.	४३.०३	२२.०२
२	तलाठी कार्यालय.	२८.२६	१४.८९

०२. उक्त नमूद कार्यालयांसाठीचे नमुना नकाशे (Type Plan) व अंदाजपत्रक (Recapitulation Sheet) या शासन निर्णयासोबत जोडलाआहे.

(०१) नमुना नकाशातील मंडळ अधिकारी कार्यालयाचे बांधकाम G-Floor असे असून त्याचे एकूण क्षेत्रफळ ४३.०३ चौ.मी व तलाठी कार्यालयाचे बांधकाम G-Floor असे असून त्याचे एकूण क्षेत्रफळ २८.२६ चौ.मी. व. एवढे असेल.

(०२) सदर कामाचे दर रू.२८,०००/- प्रति चौ.मी. असून, ते सन २०२३-२४ च्या दरसूचीवर आधारीत आहे.

(०३) सदर अंदाजपत्रकात विद्युतीकरण, पाणीपुरवठा (किमान १५०० लि. टाकी), बोअरवेल तसेच कार्यालयीन फर्निचर यांचा समावेश आहे. आकस्मिक निधी, वस्तु सेवा कर यांचा समावेश असल्याचेही प्रशासकीय मान्यता आदेशात समाविष्ट राहील.

०३. सदर शासन निर्णय दि.१६/०२/२०२४ रोजी झालेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये मान्यता दिल्यानुसार, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ४५-अ/इमा-१, दि. ०१ /०९/२०२३ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

०४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२४०७१२१७५७३३४५१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUNIL SHRIDHARRAO KOTHEKAR

Digitally signed by SUNIL SHRIDHARRAO KOTHEKAR
DN: CN = SUNIL SHRIDHARRAO KOTHEKAR, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = REVENUE AND FORESTS DEPARTMENT
Date: 2024.07.12 18:10:29 +05'30'

(सुनिल कोठेकर)
उपसचिव , महाराष्ट्र शासन

सोबत: आदर्श नमुना नकाशा/अंदाजपत्रक.

प्रति,

१. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
२. अपर मुख्य सचिव (महसूल), यांचे विशेष कार्य अधिकारी,मंत्रालय,मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई.
४. विभागीय आयुक्त, पुणे/अमरावती/कोकण /छत्रपती संभाजीनगर/नाशिक/नागपूर विभाग
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा), महाराष्ट्र - १/२, नागपूर/मुंबई.
६. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
७. जिल्हाधिकारी, (सर्व)
८. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, (सर्व)
९. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१०. उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-३/ अर्थ-२) मंत्रालय, मुंबई - ३२.
११. सह सचिव / उप सचिव, नियोजन विभाग, कार्यासन १४७५, मंत्रालय, मुंबई - ३२.
१२. सह सचिव / उप सचिव, वित्त विभाग, (व्यय-९/अर्थ-१२),मंत्रालय,मुंबई.
१३. कार्यासन अधिकारी (ब-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, -३२
१४. निवड नस्ती, ई-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.





Builtup Area = 43.03 sqmts

PROPOSED TYPE DESIGN OF TALATHI OFFICE AND MANDAL ADHIKARI OFFICE

OFFICE OF THE CHIEF ARCHITECT,
P.W.D., M. S.,

371

99e/48





Builtup Area = 28.26 sqmts

372

PROPOSED TYPE DESIGN OF TALATHI OFFICE

OFFICE OF THE CHIEF ARCHITECT,
P.W.D., M. S.,

9/9/48



PROPOSED TYPE DESIGN OF TALATHI OFFICE

PROPOSED TYPE DESIGN OF TALATHI OFFICE

OFFICE OF THE CHIEF ARCHITECT,
P.W.D., M. S.,

920/4Ps

Name of the Department : Revenue and Forest Department

Name of Work : Construction of Talathi Office

Executing Agency - Public Works Department

RECAPITULATION SHEET

Sr. No.	Particulars of Scope			Unit Rate Norms Rs Per (Sqmt./ Meter/ LumpSum etc.)	Cost Rs. Component Wise	Cost Rs. Total
(A)	**ESSENTIAL ITEMS (Components)**					
1	**Building proper (Built Up Area - Sq.m)**					
	Ground Floor	28.26	Sq. M	28,000	7,91,280	
	Total B.U.A. =	**28.26**	**Sq. M**		**Sub Total (A-1)**	**7,91,280**
2	Electrification					
	Internal			5% of (A-1)	39,564	
	External (Including Fire fighting)			6% of (A-1)	47,477	
	Pump house, bore well etc			L.S.	1,00,000	
					Sub Total (2)	**1,87,041**
					Sub Total (3)	**39,564**
3	Water Supply & Sanitary Works			5% of (A-1)	**Sub Total (4)**	**98,910**
4	Furniture	19.78	Sq. M	5000	**Sub Total (A)**	**11,16,795**
(B)	**MISCELLANEOUS ITEMS**					
	Water Main Storage	1000	Litres	23	23,000	
	Internal /Approach Roads, Land Development, Parking, Land Scaping Etc.			4.5% of (1)	35,608	
					Sub Total (B)	**58,608**
					Project Cost (P)= (A) + (B)	**11,75,402**
(C)	**PROVISIONS**					
	(i) Contingencies			4% on (sub total A-1)	31,651	
	(ii) GST			18% on (P)	2,11,572	
	(iii) Price Escalation			5% on (P)	58,770	
	(vii) Labour Insurance			1% on (P)	11,754	
					Sub Total (C)	**3,13,748**
					TOTAL COST OF PROJECT (TPC) (A+B+C)	**14,89,150**
					Say Rs. Lakhs	**14.89**

PLINTH AREA RATES FOR

1	Bldg Proper Cost	`=	Rs 28,000	/Sqm
2	Elect. Work	`=	Rs 6,619	/Sqm
3	Water Supply	`=	Rs 1,400	/Sqm
4	Furniture	`=	Rs 5,000	/Sqm
	Overall Construction Rate (Project Cost P/BUA)		**41,592**	/Sqm

Name of the Department : Revenue and Forest Department

Name of Work : Construction of Mandal Office

Executing Agency - Public Works Department

RECAPITULATION SHEET

Sr. No.	Particulars of Scope			Unit Rate Norms Rs Per (Sqmt./ Meter/ LumpSum etc.)		Cost Rs. Component Wise	Cost Rs. Total
(A)	ESSENTIAL ITEMS (Components)						
1	Building proper (Built Up Area - Sq.m)					12,04,840	
	Ground Floor	43.03	Sq. M	28,000			
	Total B.U.A. =	43.03	Sq. M			Sub Total (1)	12,04,840
2	Electrification	Internal		5% of (a)		60,242	
		External (Including Fire fighting)		6% of (a)		72,290	
	Pump house, bore well etc			L.S.		1,00,000	
						Sub Total (2)	2,32,532
				5% of (a)		Sub Total (3)	60,242
3	Water Supply & Sanitary Works	30.12	Sq. M	5000		Sub Total (4)	1,50,605
4	Furniture					Sub Total (A)	16,48,219
(B)	MISCELLANEOUS ITEMS						
	Water Main Storage	1500	Litres	23		34,500	
	Internal /Approach Roads, Land Development, Parking, Land Scaping Etc.			4.5% of (1)		54,218	
						Sub Total (B)	88,718
						Project Cost (P)= (A) + (B)	17,36,937
(D)	PROVISIONS						
	(i) Contingencies			4% on (sub total A1)		48,194	
	(ii) GST			18% on (P)		3,12,649	
	(iii) Price Escalation			5% on (P)		86,847	
	(vii) Labour Insurance			1% on (P)		17,369	
						Sub Total (D)	4,65,059
						TOTAL COST OF PROJECT (TPC) (A+B+C+D)	22,01,996
						Say Rs. Lakhs	22.02

	PLINTH AREA RATES FOR			
1	Bldg Proper Cost	=	Rs	28,000 /Sqm
2	Elect. Work	=	Rs	5,404 /Sqm
3	Water Supply	=	Rs	1,400 /Sqm
4	Furniture	=	Rs	5,000 /Sqm
	Construction Rate Excluding Misc.&Optional Items			38,304 /Sqm
	Overall Construction Rate			40,366 /Sqm

तलाठी (गट क) संवर्गातील कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या पायाभूत प्रशिक्षणामध्ये सुधारणा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.तलाठी-२०२४/प्र.क्र.१८१/ई-१०
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- ३ सप्टेंबर, २०२४

वाचा:- (१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: तप्रशि-२०१२/ प्र.क्र.२४२-अ/ई-१०, दि.२४.३.२०१४

प्रस्तावना:-

शासनाने राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत तलाठी पदावर प्रथम नियुक्ती देण्यापूर्वी नवनियुक्त तलाठी कर्मचाऱ्यांना सहा महिन्याचे पायाभूत प्रशिक्षण देण्याबाबत संदर्भाधिन शासन निर्णय दि.२४.३.२०१४ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. सद्य:स्थितीत शासकीय कामकाजात वाढलेला आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर तसेच डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती आणि मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी, छत्रपती संभाजीनगर यांनी प्रशिक्षणाचा आजपर्यंतचा अनुभव याबाबतचा आढावा घेऊन तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांना द्यावयाचे पायाभूत प्रशिक्षण यामध्ये सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने तलाठी (गट क) संवर्गातील कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या पायाभूत प्रशिक्षणामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

तलाठी पदावर प्रथम नियुक्ती देण्यापूर्वी तलाठ्यांना द्यावयाच्या प्रशिक्षणासंबंधी महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दि.२४.३.२०१४ मधील परिच्छेद क्र.(१) मधील तक्त्यात पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.:-

अ.क्र.	प्रशिक्षणाचे ठिकाण	प्रशिक्षणाचा कालावधी
१	महसूल प्रबोधिनी येथे पायाभूत प्रशिक्षण	२ महिने
२	एका अनुभवी तलाठी यांचे कार्यालय	१ महिने
	एकूण प्रशिक्षण कालावधी	३ महिने

वरील सुधारित प्रशिक्षण कालावधीनुसार तलाठ्यांना प्रशिक्षण देण्याबाबत कार्यक्रम निश्चित करण्यात यावा. उपरोक्त सुधारणा वगळता महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दि.२४.३.२०१४ मधील अन्य सर्व सूचना कायम राहतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०९०३१०५५५१६३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=c8a7d6860ff227fd9e69a02e9ca5dfb2ccb25eda92d749629970f349fc6ed260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2024.09.03 10:56:34 +05'30'

(संजय बनकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र १, मुंबई
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र २, नागपूर
३) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
४) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
५) सर्व विभागीय आयुक्त
६) सर्व जिल्हाधिकारी
७) निवडनस्ती (कार्यासन ई-१०) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

कोतवाल कर्मचाऱ्यांना अनुकंपा धोरण लागू करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२९२/ई-१०
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- ०७ ऑक्टोबर, २०२४

संदर्भ:- मा.मंत्रिमंडळाची दि.३०.९.२०२४ रोजीची बैठक

प्रस्तावना:-

राज्यातील कोतवालांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.मंत्री महोदय व मा.लोकप्रतिनिधींना केलेल्या विविध मागण्यांमध्ये कोतवालांना अनुकंपा धोरण लागू करावे, अशी मागणी केलेली आहे. कोतवालांना चतुर्थ वर्ग श्रेणी लागू करणे व इतर मागण्यांच्या संदर्भात मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दि.३.७.२०२४ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या निदेशानुसार अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय सचिव समितीची गुरूवार, दि.२९.८.२०२४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत समितीने केलेल्या शिफारशींनुसार व मा.मंत्रिमंडळाने दि.३०.९.२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील कोतवालांना अनुकंपा धोरण लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

कोतवाल कर्मचारी सेवेत असताना दिवंगत झाल्यास किंवा गंभीर आजार, अपघात यामुळे शासकीय सेवा करण्यास वैद्यकीय दृष्टया कायमचा असमर्थ ठरल्यामुळे रूग्णता सेवानिवृत्त झाल्यास त्याच्या कुटुंबावर ओढावणाऱ्या आर्थिक आपत्तीत त्याच्या कुटुंबियांना तातडीने मदत मिळण्याच्या उद्देशाने त्यांच्या वारसांना कोतवाल पदावरील नियुक्तीसाठी असलेल्या अर्हतेनुसार अनुकंपा तत्वावर कोतवाल पदावर नियुक्ती देणेबाबत या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर अनुकंपा धोरण राबविण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे व सविस्तर कार्यपद्धती स्वतंत्र शासन निर्णयान्वये ठरविण्यात येईल.

३. सदरचे अनुकंपा धोरण या शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१००७१५४५५८१११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=c8a7d6860ff227fd9e69a02e9ca5dfb2ccb25eda92d74962997 0f349fc6ed260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E 73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2024.10.07 15:32:14 +05'30'

(संजय बनकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
२) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
३) सर्व विभागीय आयुक्त
४) सर्व जिल्हाधिकारी
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र १, मुंबई
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र २, नागपूर
७) निवडनस्ती (कार्यासन ई-१०) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२९२/ई-१०
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- ०७ ऑक्टोबर, २०२४

संदर्भ:- (१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: बैठक-२०१६/ प्र.क्र.५८१/ई-१०,दि.६.२.२०१९
(२) महसूल व वन विभाग, शासन शुद्धीपत्रक, क्रमांक: बैठक-२०१६/ प्र.क्र.५८१/ई-१०,दि.१.३.२०१९
(३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: संकीर्ण-२०२२/ प्र.क्र.१९१/ई-१०,दि.६.४.२०२३

प्रस्तावना:-

संदर्भ क्र.३ येथील दि.६.४.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील एकूण १२,७९३ कोतवालांना दरमहा रू.१५,०००/- इतके मानधन दि.१.४.२०२३ पासून लागू करण्यात आले आहे. राज्यातील कोतवालांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.मंत्री महोदय व मा.लोकप्रतिनिधींना केलेल्या विविध मागण्यांमध्ये त्यांची प्रमुख मागणी ही चतुर्थ वर्ग श्रेणी लागू करण्याबाबतची आहे. याबाबत, कोतवालांना चतुर्थ वर्ग श्रेणी लागू करणे व इतर मागण्यांच्या संदर्भात मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दि.३.७.२०२४ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या निदेशानुसार अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय सचिव समितीची गुरूवार, दि.२९.८.२०२४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत समितीने केलेल्या शिफारशींनुसार व मा.मंत्रिमंडळाने दि.३०.९.२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील कोतवालांच्या मानधनात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

राज्यातील एकूण १२७९३ कोतवालांना संदर्भाधिन क्र.३ येथील दि.६.४.२०२३ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरून सध्या लागू असलेल्या दरमहा रु.१५,०००/- इतक्या मानधनामध्ये दि.१.४.२०२६ रोजीपासून १० टक्के इतकी वाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानंतर दर ३ वर्षांनी दि.१ एप्रिलपासून त्यांना मिळणाऱ्या एकूण मानधनामध्ये १० टक्के इतकी वाढ देण्यासही या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. तसेच, संदर्भ क्र.१ व संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३, ४ व ५ मधील तरतूदींमध्ये कोणताही फेरबदल केला नसून सदरच्या तरतूदी जशाच्या तशा लागू राहतील.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४२४/२०२४/व्यय-९, दि.२०.९.२०२४ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१००७१५४९१९३२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=c8a7d6860ff227fd9e69a02e9ca5dfb2ccb25eda92d749629970f349fc6ed260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516C80584DCE5E9A2E73C0A15FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2024.10.07 15:35:39 +05'30'

(संजय बनकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
२) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
३) सर्व विभागीय आयुक्त
४) सर्व जिल्हाधिकारी
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र १, मुंबई
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र २, नागपूर
७) निवडनस्ती (कार्यासन ई-१०) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण -२०२४/प्र.क्र.७८/ई-१०
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- ०८ ऑक्टोबर, २०२४

वाचा :- शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक केओटी-२०१३/प्र.क्र.३९४/ई-१०, दि.२८.१०.२०१६

प्रस्तावना:-

राज्यातील कोतवालांना संदर्भाधिन शासन निर्णयाच्या अनुषंगाने सण अग्रिम रुपये २०००/- एवढे देण्यात येत आहे. कोतवाल यांच्या उक्त सण अग्रिमामध्ये वाढ करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने सदर अग्रिमाच्या रकमेमध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

शासन आता असे आदेश देत आहे की, राज्यातील कोतवालांना महत्वाच्या सणानिमित्त देण्यांत येणाऱ्या सण अग्रिमाच्या रकमेत वाढ करुन रुपये २०००/- (अक्षरी दोन हजार फक्त) या ऐवजी रुपये १०,०००/- (अक्षरी दहा हजार फक्त) इतके सण अग्रिम प्रत्येक कोतवालास देण्यात यावे. सदर सण अग्रिमाची रक्कम दहा समान हप्त्यात त्यांना देय मानधनातून वळती करुन घेण्यात यावी.

२. सण अग्रिम फक्त पुढील सणांना तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी घोषित करण्यात येणाऱ्या सणांसाठीच अनुज्ञेय राहील:-

(१) दिवाळी
(२) रमझान ईद
(३) ख्रिसमस
(४) पारसी नववर्ष
(५) संवत्सरी
(६) रोश - होशना
(७) वैशाखी पोर्णिमा (भगवान बुध्द जयंती)
(८) स्वातंत्र्य दिन
(९) प्रजासत्ताक दिन
(१०) डॉ.आंबेडकर जयंती

तथापि पूर्वी घेतलेले सण अग्रिम वसूल केल्यानंतरच पुढील सण अग्रिम मंजूर करता येईल.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३९९/२०२४/व्यय-९, दिनांक २५.०९.२०२४ अन्वये दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे. हे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१००८१२२३२१४६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=c8a7d6860ff227fd9e69a02e9ca5dfb2ccb25eda92d749629970f349fc6ed260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2024.10.08 12:09:59 +05'30'

(संजय बनकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र १, मुंबई
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र २, नागपूर
३) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५) सर्व कोषागार अधिकारी
६) सर्व विभागीय आयुक्त
७) सर्व जिल्हाधिकारी
८) सर्व उपविभागीय अधिकारी
९) सर्व तहसिलदार
१०) सह सचिव, वित्त विभाग (व्यय-९), मंत्रालय, मुंबई
११) निवडनस्ती (कार्यासन ई-१०) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

नायब तहसिलदार संवर्गामध्ये पदोन्नती देण्यासाठी अव्वल कारकुन व मंडळ अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांचे प्रमाण ठरवून देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही-२०२२/प्र.क्र.३०३/ई-९

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: ०९ ऑक्टोबर, २०२४

वाचा:-

१) शासन अधिसूचना महसूल व वन विभाग क्र.एसआरव्ही-१४९६/प्र.क्र.४७०/ई-७, दि.१३.१०.१९९८
२) शासन निर्णय महसून व वन विभाग क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.८३७/ई-७, दि.२०.११.१९९८
३) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.३९५/ई-९, दि.०६.०७.२०१३
४) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.३९५/ई-९, दि.०२.०१.२०१४

प्रस्तावना:-

उपरोक्त वाचा अ.क्र. १ येथील अधिसूचनान्वये नायब तहसिलदार संवर्गासाठी सुधारित सेवा प्रवेश नियम विहित करण्यात आलेले आहेत. सदर सेवा प्रवेश नियमातील नियम ५ मध्ये नायब तहसिलदार संवर्गामध्ये पदोन्नतीने व नामनिर्देशनाने नियुक्ती करण्याचे प्रमाण ६७:३३ राहील, अशी तरतूद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे नियम ४(१) मध्ये "अव्वल कारकून व मंडळ अधिकारी या संवर्गातील व्यक्तींना कोणत्या प्रमाणात पदोन्नती द्यावयाची हे संबंधित संवर्गातील कर्मचाऱ्यांची संख्या विचारात घेतल्यानंतर शासनाकडून प्रत्येक विभागासाठी कार्यकारी आदेशाद्वारे विहित करण्यात येईल" असे नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार राज्यातील सहा महसूल विभागांसाठी अव्वल कारकून व मंडळ अधिकारी या दोन संवर्गातून नायब तहसिलदार संवर्गामध्ये पदोन्नतीने भरावयाच्या पदांचे प्रमाण वाचा क्र. २, ३ व ४ येथील शासन निर्णयान्वये वेळोवेळी निश्चित केलेले आहेत. आता सन २०१४ नंतर विभागातील अव्वल कारकुन व मंडळ अधिकारी या संवर्गातील पदांचा आढावा घेवून विभागातील अव्वल कारकुन व मंडळ अधिकारी या दोन संवर्गातून नायब तहसिलदार संवर्गामध्ये पदोन्नतीने भरावयाच्य पदांचे प्रमाण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महसूल व वन विभागाच्या वाचा क्र. २, ३ व ४ येथील शासन निर्णयान्वये अव्वल कारकून व मंडळ अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांना नायब तहसिलदार संवर्गामध्ये पदोन्नती देण्यासाठी निश्चित केलेल्या प्रमाणाचा फेर आढावा घेऊन पदोन्नतीच्या प्रमाणात बदल करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. सदर शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी उक्त वाचा अ. क्र. २, ३ व ४ येथील शासन निर्णय याद्वारे अधिक्रमित करण्यात येत आहेत. तसेच, राज्यातील सहाही महसूली विभागांसाठी नायब तहसिलदार संवर्गामध्ये अव्वल कारकुन व मंडळ अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने भरावयाच्या पदांचे प्रमाण खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

अ.क्र.	विभागाचे नाव	अव्वल कारकुन	मंडळ अधिकारी
१.	कोंकण	२.६२	१
२.	नाशिक	१.५६	१
३.	पुणे	१.४०	१
४.	नागपुर	१.९३	१
५.	अमरावती	१.६५	१
६.	छत्रपती संभाजीनगर	१.७७	१

३. वरील परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे पदोन्नतीने भरावयाच्या पदांचे प्रमाण हे नायब तहसिलदार संवार्गामध्ये रिक्त होणाऱ्या पदांसाठी लागू करावयाचे नसून, ते नायब तहसिलदार संवर्गातील पदोन्नतीने भरावयाच्या एकूण पदसंख्येला लागू करावयाचे आहे.

४. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी सन २०२४-२०२५ या निवडसूची वर्षापासून लागू करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१००९२०००४८४५१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRIKANT MADHUKAR MOHITE

Digitally signed by SHRIKANT MADHUKAR MOHITE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=5b514d2c3257bba976c5a2de42be8a635bba691c05d1f65ed0ead155a190e90e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5F152866E6FC64E39CF88B9CB27AE0169A65B00003 9B269233C42B5B77F06B31, cn=SHRIKANT MADHUKAR MOHITE
Date: 2024.10.09 19:47:55 +05'30'

(श्रीकांत म. मोहिते)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
२) मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३) मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
५) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई ३२.
६) सर्व विभागीय आयुक्त.
७) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (पत्राने).
८) सर्व जिल्हाधिकारी.
९) सह सचिव (सेवा-१), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०) सह सचिव (आरक्षण-२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११) सह सचिव (ई-७, ई-९ व ई-१०), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२) निवडनस्ती, कार्यासन ई-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

शासन शुद्धीपत्रक

कोतवालांच्या मानधनात वाढ करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन निर्णय क्र.कोतवा-२०२४/प्र.क्र.११८/ई-१०

मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दिनांक :- १० ऑक्टोबर, २०२४

वाचा:- (१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: बैठक-२०१६/ प्र.क्र.५८१/ई-१०, दि.६.२.२०१९

(२) महसूल व वन विभाग, शासन शुद्धीपत्रक, क्रमांक: बैठक-२०१६/ प्र.क्र.५८१/ई-१०, दि.१.३.२०१९

शासन निर्णय:-

महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दि.६.२.२०१९ आणि शासन शुद्धीपत्रक दि.१.३.२०१९ मधील परिच्छेद क्र.३ अन्वये सर्व कोतवालांना "राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात योजना", "अटल निवृत्तीवेतन योजना" व "महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना" या योजनांचा लाभ त्या-त्या योजनांमधील अटींनुसार देण्यात यावा व त्याकरिता येणारे योजनेचे हप्ते शासनाकडून भरण्यात यावे. सदर हप्ते संबंधित कोतवालांनी भरल्यास त्यांना सदर हप्त्यांऐवढी वाढीव रक्कम देण्यात यावी, असे नमूद केले आहे. तसेच, सदर शासन निर्णयांतील परिच्छेद क्र.४ अन्वये याबाबत होणारा खर्च "मागणी क्र.सी-६, २०५३ जिल्हाप्रशासन" या मुख्य लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा, असे नमूद केले आहे.

आता, महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दि.६.२.२०१९ आणि शासन शुद्धीपत्रक दि.१.३.२०१९ मधील परिच्छेद क्र.४ मध्ये "याबाबत होणारा खर्च "मागणी क्र.सी-६, २०५३ जिल्हाप्रशासन" या मुख्य लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा," याऐवजी **"याबाबत होणारा खर्च मागणी क्र.सी-१, मुख्यलेखाशिर्ष "२०५३ जिल्हाप्रशासन" अंतर्गत "०१-वेतन" या उद्दीष्टाखाली मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा**, "अशी सुधारणा करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३७/२०२४/कोषा प्रशा-४, दि.८.१०.२०२४ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१०१०१९४३५११४९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=c8a7d6860ff227fd9e69a02e9ca5dfb2ccb25eda92d749629970f349fc6ed260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2024.10.10 19:30:32 +05'30'

(संजय बनकर)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त

२) सर्व जिल्हाधिकारी

महसुल विभागांतर्गत क्षेत्रिय कार्यालयातील "अव्वल कारकून" गट-क पदाचे पदनाम बदलून "सहाय्यक महसुल अधिकारी" करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.९३/ई-७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १४ ऑक्टोबर, २०२४.

वाचा : महसूल व वन विभाग, शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही-१४९४/प्र.क्र.८६३/(१)/ई-७, दि.२७ नोव्हेंबर, १९९६.

प्रस्तावना :- महसूल विभाग हा शासनाचा कणा असून जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त स्तरावर कामकाज करण्यात येते. सदर कार्यालयांमध्ये विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत असून, अव्वल कारकून या संवर्गास महसूल विभागामार्फत, मदत व पुनर्वसन विभागामार्फत, पाणी, पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत, गृह विभागामार्फत, सामाजिक न्याय विभागामार्फत - अ) राज्य पुरस्कृत योजना व ब) केंद्र पुरस्कृत योजना, सामान्य प्रशासन विभागामार्फत, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत, रोजगार हमी योजना विभागामार्फत, राजशिष्टाचार विभागामार्फत, UPSC / MPSC तथा विविध केंद्रीय व राज्य स्तरीय स्पर्धा परीक्षा विभागामार्फत, नगर विकास विभागामार्फत, भारत / राज्य निवडणूक आयोगामार्फत, कार्यकारी दंडाधिकारी म्हणून तसेच इतर विविध विभागामार्फत नेमून दिलेली कामे व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. यामध्ये प्रामुख्याने जिल्हाधिकारी यांना कराव्या लागणाऱ्या सर्व कामांमध्ये मूलभूत माहितीचे संकलन करून त्यावर टिप्पणी सादर करणे, विविध मसुदे तयार करणे, महसूल विभागातील जमीन महसूलाचे दस्तऐवज / लेखे यांच्या नोंदी, एकत्रिकरण, अद्यावतीकरण करणे, शासनातर्फे नागरीकांना देण्यात येणारे विविध प्रमाणपत्रांची उदा. जात प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, राष्ट्रीय प्रमाणपत्र इ. तपासणी करणे, नैसर्गिक आपत्ती काळात आपात्कालीन परिस्थितीच्या वेळी मदत व पुनर्वसनाचे कामे करणे, शेतकरी कर्जमाफी योजनेच्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणे इत्यादी स्वरूपांची काम अव्वल कारकून या संवर्गास पार पाडावी लागतात. या सर्व कामकाजांचे नियंत्रण करताना संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संपर्क साधताना महसूल विभागातील अव्वल कारकून संवर्गास एक विशिष्ट पदनाम असणे आवश्यक आहे. याकरिता महसूल विभागातील अव्वल कारकून यांचे पदनाम बदलून त्याला "सहाय्यक महसुल अधिकारी" असे पदनाम करण्याबाबतची मागणी महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेद्वारे बऱ्याच कालावधी पासून करण्यात येत होती. महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेची सदर मागणी मान्य करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :- महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेची महसुल विभागांतर्गत क्षेत्रिय कार्यालयातील "अव्वल कारकून" गट-क कर्मचाऱ्यांची "अव्वल कारकून" ऐवजी "सहाय्यक महसुल अधिकारी" असे पदनाम करण्याची मागणी, अव्वल कारकून या पदाची वेतनश्रेणी ६ व्या वेतन आयोगानुसार - वेतनबँड रू.५२००-२०२००, ग्रेड पे रू.३५००/- अशी असून, ७ व्या वेतन आयोगानुसार

- वेतनबँड एस-१२ रू.३२०००-१०१६०० इतके आहे. सदर पदनामामध्ये बदल केल्यामुळे कोणतीही वेगळी वेतनश्रेणी वा वेतनवाढ देय होणार नाही व वेतनामध्ये कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे शासनावर कोणताही वित्तीय भार पडणार नाही किंवा त्यांच्या सेवा विषयक बाबींमध्येही कोणताही बदल होणार नाही या अधिन मान्य करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार खालील अटीच्या अधिन राहून महसुल विभागांतर्गत क्षेत्रिय कार्यालयातील "अव्वल कारकून" पदाचे पदनाम "सहाय्यक महसुल अधिकारी" असे करण्यात येत आहे.

अ) वरीलप्रमाणे पदनाम बदलामुळे भविष्यात वेतनश्रेणी वाढी संदर्भात प्राप्त होणारी कोणतीही मागणी विचारात घेतली जाणार नाही.

ब) सातव्या वेतन आयोगानुसार महसुल विभागांतर्गत अव्वल कारकून, गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांना लागू असलेली एस-१२ (S-१२ : रू.३२०००-१०१६००) ही वेतनश्रेणी पदनाम बदलानंतर "सहाय्यक महसुल अधिकारी" यांना लागू राहील. या वेतनस्तरामध्ये अथवा वेतनश्रेणीमध्ये बदल करण्याची वा वेगळ्याने वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी विचारांत घेतली जाणार नाही.

क) वरीलप्रमाणे पदनाम बदलानंतर सध्याच्या गट-क संवर्गामध्ये कोणताही बदल होणार नाही वा गट बदला संदर्भातील कोणतीही मागणी विचारांत घेतली जाणार नाही.

ड) महसूल विभागांतर्गत "अव्वल कारकून" गट-क संवर्गाचे पदनाम "सहाय्यक महसुल अधिकारी" असे बदलानंतर अन्य संवर्गातील "सहायक अधिकारी" पदासाठी असणारी वेतनश्रेणी / वेतनस्तर देण्याच्या अनुषंगाने भविष्यात वेतनत्रुटी समितीपुढे मागणी करता येणार नाही व अशी मागणी विचारात घेतली जाणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१०१४१६०६३३७८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

SAMEER RAMESH DALVI

Digitally signed by SAMEER RAMESH DALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=ec5cd266e548ab04f15ae6ce4de05c2244562ad52592c29f739895bab7109cb9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A937D4E8F808398F59B67D3D3E3E7A5AAF17257D2611DE6CCEA14B0234621F61, cn=SAMEER RAMESH DALVI
Date: 2024.10.14 16:07:21 +05'30'

(समीर दळवी)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त.
२. सर्व जिल्हाधिकारी.
३. महालेखापाल, १ / २ (लेखापरिक्षक) मुंबई / नागपूर.
४. महालेखापाल, १ / २ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर.
५. अवर सचिव (कार्यासन सेवा-९), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अवर सचिव (कार्यासन - १२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. निवडनस्ती (कार्यासन ई-७).

महसूल विभागातील कोतवाल पदाचे पदनाम बदलून "महसूल सेवक" करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२४/प्र.क्र.४१२/ई-१०
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- १४ ऑक्टोबर, २०२४

प्रस्तावना:-

राज्यातील कोतवालांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.मंत्री महोदय व मा.लोकप्रतिनिधींना केलेल्या विविध मागण्यांमध्ये कोतवाल पदाचे पदनाम बदलून "महसूल सेवक" करावे, अशी मागणी केलेली आहे. कोतवालांना चतुर्थ वर्ग श्रेणी लागू करणे व इतर मागण्यांच्या संदर्भात मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दि.३.७.२०२४ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या निदेशानुसार अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय सचिव समितीची गुरूवार, दि.२९.८.२०२४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत समितीने कोतवाल पद हे ब्रिटीश काळापासून अस्तित्वात असल्याने कोतवाल पदाचे पदनाम महसूल सेवक करण्यात यावे, अशी शिफारस केली आहे. त्यानुषंगाने कोतवाल पदाचे पदनाम बदलून महसूल सेवक करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या शिफारशीनुसार व कोतवालांची विनंती विचारात घेता, पुढील अटींच्या अधिन राहून महसूल विभागातील कोतवालांच्या पदनामात बदल करून "महसूल सेवक" असे पदनाम करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.:-

(१) वरीलप्रमाणे पदनाम बदलामुळे भविष्यात शासकीय कर्मचाऱ्यांनुसार वेतनश्रेणी लागू करण्याबाबतची कोणतीही मागणी विचारात घेतली जाणार नाही.

(२) वरीलप्रमाणे पदनामामध्ये बदल केल्यामुळे कोतवालांच्या मानधनामध्ये तसेच सेवाविषयक बाबींमध्येही कोणताही बदल होणार नाही वा यासंदर्भातील कोणतीही मागणी विचारात घेतली जाणार नाही.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१०१४१५५३२५७९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=c8a7d6860ff227fd9e69a02e9ca5dfb2ccb25eda92d749629970f349fc6ed260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2024.10.14 15:54:42 +05'30'

(संजय बनकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र १, मुंबई
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र २, नागपूर
३) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
४) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
५) सर्व विभागीय आयुक्त
६) सर्व जिल्हाधिकारी
७) निवडनस्ती (कार्यासन ई-१०) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

महसूल विभागातील तलाठी पदाचे पदनाम बदलून "ग्राम महसूल अधिकारी" करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२४/प्र.क्र.२१३/ई-१०
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- १४ ऑक्टोबर, २०२४

प्रस्तावना:-

तलाठ्यास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम १४ , ७६, १४९, १५०, १५१, १५३, १५४ या कलमात नमूद केलेली कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. जिल्हाधिकारी याने नमूद केलेली नोंदणीपत्रके, रजिस्टरे व जमाखर्च लिहिण्याचे काम तलाठ्याकडे असते. जमीन महसूल व जमीन महसूल थकबाकी म्हणून सर्व रकमा त्यास गोळा कराव्या लागतात. कोणत्याही वरिष्ठ महसूल अधिकारी किंवा पोलीस सांगेल ते गावासंबंधी लिहिण्याचे काम तलाठयास करावे लागते. महसूल विभागातील तलाठी संवर्गाच्या पदनामात बदल करून "ग्राम महसूल अधिकारी" असे पदनाम करण्याची विनंती महाराष्ट्र राज्य तलाठी संघ यांच्याद्वारे करण्यात येत होती. महसूल विभागातील तलाठी संवर्गाच्या पदनामात बदल करून "ग्राम महसूल अधिकारी" असे पदनाम करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

महसूल विभागातील तलाठी (गट-क) संवर्गाच्या पदनामात बदल करून "ग्राम महसूल अधिकारी" असे पदनाम करण्यास पुढील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.:-

(१) वरीलप्रमाणे पदनाम बदलामुळे भविष्यात वेतनश्रेणी वाढी संदर्भात प्राप्त होणारी कोणतीही मागणी विचारात घेतली जाणार नाही. तसेच, पदनाम बदलानंतर वेतनश्रेणी/ वेतनस्तर देण्याच्या अनुषंगाने भविष्यात वेतनत्रुटी समितीपुढे मागणी करता येणार नाही व अशी मागणी विचारात घेतली जाणार नाही.

(२) सातव्या वेतन आयोगानुसार "तलाठी" या पदाची वेतनश्रेणी एस-८, रू.२५५००-८११००/- अशी आहे. तलाठी या पदनामामध्ये बदल केल्यामुळे या वेतनस्तरामध्ये अथवा वेतनश्रेणीमध्ये बदल करण्याची वा वेगळयाने वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी विचारात घेतली जाणार नाही.

(३) वरीलप्रमाणे पदनाम बदलानंतर सध्याच्या गट-क संवर्गामध्ये कोणताही बदल होणार नाही वा गट बदला संदर्भातील कोणतीही मागणी विचारात घेतली जाणार नाही.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१०१४१५५७४६३९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=c8a7d6860ff227fd9e69a02e9ca5dfb2ccb25eda92d749629970f349fc6ed260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2024.10.14 15:58:23 +05'30'

(संजय बनकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र १, मुंबई
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र २, नागपूर
३) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
४) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
५) सर्व विभागीय आयुक्त
६) सर्व जिल्हाधिकारी
७) निवडनस्ती (कार्यासन ई-१०) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

जिल्हा वार्षिक योजनेखाली महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावर "गतिमान प्रशासन तथा आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण" या स्वरुपाची नियमित योजना सुरु करण्याबाबत. (पुरकपत्र)

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन पुरकपत्र, क्रमांक-संकीर्ण-२०२२/प्र.क्र.४०/ई-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २५ मार्च, २०२५.

वाचा :-

१. महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक-संकीर्ण-२०२२/प्र.क्र.४०/ई-८,दि.२७/०६/२०२२.
२. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे पत्र क्र.राजस्व/ब-३/कावि-१०८/२०२५, दि.०७/०३/२०२५

प्रस्तावना :-

संदर्भाधिन महसूल विभाग, शासन निर्णय, क्रमांक-संकीर्ण-२०२२/प्र.क्र.४०/ई-८, दिनांक २७/०६/२०२२ जिल्हा वार्षिक योजनेखाली महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावर "गतिमान प्रशासन तथा आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण" या स्वरुपाची नियमित योजना सोबतच्या **जोडपत्रातील अनुक्रमांक ०६ च्या पुढे फक्त सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षापुरता अनुक्रमांक ०७ पुरकपत्रात खालीलप्रमाणे परिच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे.**

अ.क.	योजनेतील बाबी	
०७	कामे	महूसली मंडळ स्तरावरील "श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान" वर्षातून चार वेळा आयोजित करणे.
	कामाचे स्वरुप	ग्रामिण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी यांचे महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय कार्यालयाशी संबंधित महसूली विविध प्रमाणपत्रांचे वाटप, महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय कार्यालयाशी संबंधित महसूली विविध प्रमाणपत्रांचे वाटप, प्रमाणपत्राबाबत जनतेच्या तक्रारी सत्वर निकालात काढणे.
	अमंलबजावणी यंत्रणा	उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी (ग्राम महसूल सहायक)
	तांत्रिक मान्यता	जिल्हाधिकारी

सदर पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२५०३२६१२३१२४५६१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ

Digitally signed by SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=559498df564ab1121a356349085c1b8e3cc0f12569ba0f7f2090386d4dccb333, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F7145AF5949FB706E2DCB06C2B209B58FFA369F6E085E02041722C90F0528791, cn=SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
Date: 2025.03.26 12:37:38 +05'30'

(सत्यनारायण बजाज)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय,बुलढाणा

विषय क्र.१०

संकीर्ण शासन निर्णय

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग, रोहयो प्रभाग

शासन निर्णय क्रमांक- मग्रारो-२०२१/प्र.क्र.२९/रोहयो-१०अ

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- ११/११/२०२१

वाचा:-

१) शासन निर्णय क्रमांक-रोहयो-२०१७/प्र.क्र.२७९/रोहयो-१०अ, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८
२) शासन शुध्दीपत्रक क्रमांक-रोहयो-२०१७/प्र.क्र.२७९/रोहयो-१०अ, दिनांक १२ ऑक्टोबर, २०१८
३) शासन शुध्दीपत्रक क्रमांक-रोहयो-२०१७/प्र.क्र.२७९/रोहयो-१०अ, दिनांक ६ फेब्रुवारी, २०१९
४) शासन शुध्दीपत्रक क्रमांक-रोहयो-२०१७/प्र.क्र.२७९/रोहयो-१०अ, दिनांक ९ सप्टेंबर, २०१९
५) शासन शुध्दीपत्रक क्रमांक-रोहयो-२०१७/प्र.क्र.२७९/रोहयो-१०अ, दिनांक १६ सप्टेंबर, २०२०
६) शासन निर्णय क्रमांक-मग्रारो२०२१/प्र.क्र.२६/रोहयो-१०अ, दिनांक ३० मार्च, २०२१

प्रस्तावना :-

शेतीमधील कमी होणाऱ्या मनुष्यबळाच्या उपलब्धतेमुळे तसेच यांत्रिकीकरणामुळे शेतीमध्ये पेरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी व इतर कामे यंत्रांमार्फत करण्यात येत असल्यामुळे व शेतीमाल बाजारात पोहचविण्याकरीता व यंत्रसामुग्री शेतीपर्यंत जाण्यासाठी शेतीला बारमाही शेतरस्त्यांची आवश्यकता असल्यामुळे तसेच शेतरस्ते हे रस्ते योजनेमध्ये येत नसल्याने वाचा येथील क्रमांक १ येथील दिनांक २७.२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विविध योजनांच्या अभिसरणामधून "पालकमंत्री शेत/पाणंद रस्ते योजना" राज्यात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच वाचा येथील क्रमांक (२) ते (५) येथील शासन शुध्दीपत्रकान्वये योजनेत वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

सदर योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करीत असताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी विचारात घेऊन तसेच सदर योजनेत तयार होणाऱ्या रस्त्यांची गुणवत्ता परिभाषित केलेली नसल्यामुळे बऱ्याच ठिकाणी शेत रस्त्यांची कामे होवूनही रस्त्याचा प्रश्न कायमस्वरुपी सुटत नाही. रस्त्याची गुणवत्ता परिभाषित नसल्यामुळे काही ठिकाणी अतिक्रमण काढून रस्त्यावर फक्त माती टाकली जाते. याने रस्ता रुंद झालेला दिसून येतो मात्र पाऊस पडल्यावर तेथे चिखल होऊन रस्ता वापरणे दुसह्य होते. तसेच अधिक पाऊस झाल्यास असे मातीचे रस्ते वाहून जातात व केलेल्या कामाचा परिणाम शून्यावर येतो.

महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक शेतकरी आणि गावकरी समृद्ध होतील हे स्वप्न पाहणे आवश्यक आहे. राज्यात 'मी समृद्ध तर गाव समृद्ध' आणि 'गाव समृद्ध तर माझा महाराष्ट्र समृद्ध' ही संकल्पना

मग्रारोहयोतून राबविण्यात येत आहे. त्यासाठी शेत रस्ते सुद्धा अन्य महामार्ग एवढेच महत्त्वाचे आहेत. शेतात पीक तयार होताच ते काढून योग्य ठिकाणी साठवले गेले पाहिजेत किंवा बाजारात विकले गेले पाहिजेत. रस्त्या अभावी शेतकऱ्यांना ते करणे शक्य होत नाही. राज्याने 'विकेल ते पिकेल' असे घोषवाक्य दिले आहे. पावसाळ्यात निघणारी पिकं मग आर्थिक दृष्ट्या कितीही फायदेशीर असो रस्त्या अभावी ती पिकवण्याचा विचार करता येत नाही. पाणंद रस्त्याची अनुपलब्धता crop diversification ला मोठा अडथळा आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या श्रीमंतीचा मार्ग अवरुद्ध करणारा हा एक मोठा घटक आहे. म्हणूनच राज्यात सर्वदूर शेतकरी लोक प्रतिनिधींकडे शेत रस्त्याची मागणी करत आहेत. राज्यातील काही जिल्हयात या कामाकडे अधिक लक्ष गेले आहे. त्यामुळे हळू-हळू या कामास चळवळीचे स्वरुप येत आहे. त्यातच आता प्रत्येक ग्रामीण कुटुंबास लखपती करण्याचे उद्दीष्ट सुध्दा रुजत चालले आहे. अशा परिस्थितीत शेत/पाणंद रस्ते उच्च गुणवत्तापूर्ण आणि बारामाही वापरायोग्य असणे आवश्यक आहे. त्यामुळे "पालकमंत्री शेत/पाणंद रस्ते योजना" राबविणेबाबतचा दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ चा शासन निर्णय व वाचा क्र.२ ते ५ येथील शासन शुध्दीपत्रके अधिक्रमित करुन शेत/पाणंद रस्ते गुणवत्तापूर्वक तयार करण्यासाठी सर्वंकष बाबी विचारात घेऊन एकत्रित सूचना निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती. याबाबतच्या प्रस्तावास मा.मंत्रीमंडळाने मान्यता दिली असून त्यानुसार शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

१. विविध योजनांच्या अभिसरणामधून "पालकमंत्री शेत/ पाणंद रस्ते योजना" राबविण्यासाठी निर्गमित केलेला वाचा क्र.१ येथील दि. २७/१२/२०१८ चा शासन निर्णय व वाचा क्र. (२) ते (५) येथील शासन शुध्दीपत्रक याद्वारे अधिक्रमित करण्यात येत आहेत.

२. महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक शेतकरी आणि सर्व गावकरी समृध्द व्हावेत या दृष्टीकोनातून **"मी समृध्द तर गाव समृध्द"** आणि **"गाव समृध्द तर माझा महाराष्ट्र समृध्द"** ही संकल्पना मनरेगा व राज्य रोहयोच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. शेत/पाणंद रस्ते हे प्रामुख्याने शेतीमधील कामाकरीता आवश्यक असणाऱ्या साधनांची ने-आण करण्याकरीता उपयोगात येतात. यांत्रिकीकरणामुळे शेतीमध्ये पेरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी व इतर कामे यंत्रामार्फत करण्यात येतात. या यंत्रसामुग्रीची वाहतुक करण्याकरीता, बारमाही वापराकरीता शेत/पाणंद रस्ते सुयोग्य असणे गरजेचे आहे. त्याचाच एक भाग म्हणून प्रमाणित दर्जाचे शेत/पाणंद रस्ते तयार करण्याकरिता **"मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजना"** राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजना" कार्यक्षमतेने राबविण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

३. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. भूमापन १०८०/६८/४९६६/ल-१, दिनांक ४ नोव्हेंबर, १९८७ अन्वये ग्रामीण भागातील रस्त्यांची वर्गवारी पुढीलप्रमाणे करण्यात आलेली आहे.

i) **एका गावावरुन दुसऱ्या गावास जाणारे रस्ते**

ग्रामीण रस्ते व हद्दीचे ग्रामीण रस्ते (गाव नकाशामध्ये दोन भरीव रेषाने दाखविले असून या रस्त्याची जमीन कोणत्याही भूमापन क्रमांकामध्ये समाविष्ट केलेली नाही.)

ग्रामीण गाडीमार्ग (गाव नकाशामध्ये तुटक दुबार रेषाने दाखविले असून ज्या भूमापन क्षेत्रामधून जाते त्यामध्ये पोट खराब म्हणून दर्शविलेले आहे, अशा रस्त्यांची नोंदणी साडेसोळा ते एकवीस फूट आहे.)

पाय मार्ग (गाव नकाशामध्ये तुटक रेषेने दर्शविले असून ज्या भूमापन क्षेत्रामधून जातो त्यामध्ये पोट खराब म्हणून दर्शविलेले आहे अशा रस्त्यांची रुंदी सव्वा आठ फूट आहे.)

ii) **शेतावर जाण्याचे पाय मार्ग व गाडी मार्ग**

हे रस्ते नकाशावर दर्शविलेले नाहीत. परंतु, वाद निर्माण झाल्यास अशा रस्त्यांबाबत निर्णय देण्याचे अधिकार कलम १४३ नुसार तहसिलदारांना दिलेले आहेत. त्यानुसार वहिवाटीचे विहित असलेले रस्ते.

iii) **इतर ग्रामीण रस्ते**

४. या योजने अंतर्गत पुढीलप्रमाणे शेत/पाणंद रस्त्यांची कामे घेता येतील.

i) अस्तित्वातील शेत/पाणंद कच्च्या रस्त्यांचे मजबुतीकरण करणे.

ii) शेत/पाणंद रस्ता अतिक्रमणमुक्त करुन कच्चा व पक्का रस्ता एकत्रितपणे करणे.

५. राज्यातील सर्व शेत/पाणंद रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाचे (जिल्हा परिषद आणि शासन) मापदंडाप्रमाणे बांधण्यात यावेत. यात फक्त जागेच्या उपलब्धतेप्रमाणे रुंदीमध्ये फरक पडेल. मात्र रस्त्यांची उंची, खडीचे आकार, खडीच्या परताची जाडी, रस्त्याच्या दोन्ही बाजूचे निचऱ्यासाठीचे नाले, रस्त्यांच्या बाजूला वृक्ष लागवड, गुणवत्तेची चाचणी इत्यादी सर्व बाबी मानक मापदंडाचे असावे.

६. "मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजना", मनरेगा व राज्य रोहयो या दोन्ही योजनांचा मुख्य उद्देश मागेल त्याला अकुशल रोजगार उपलब्ध करुन देणे असा असून त्यासोबतच ग्रामीण भागात सामूहिक उत्पादक मत्ता व मुलभूत सुविधा निर्माण करणे हे ही तेवढेच महत्वाचे उद्दीष्ट आहे. मनरेगा अंतर्गत केंद्र शासना मार्फत निधी उपलब्ध करुन दिला जातो. मात्र विविध कामे करताना अकुशल : कुशल खर्चाचे प्रमाण ६०:४० या प्रमाणात राखणे आवश्यक असल्यामुळे ज्या कामावर हे प्रमाण राखले जाऊ शकत नाही अशी कामे विशेषत: रस्त्याची कामे हाती घेण्यास अडचणी येतात आणि शेत/पाणंद रस्त्यांची तर प्रचंड मागणी आहे आणि गरजही आहे ही बाब विचारात घेवून प्रत्येक रस्त्याच्या कामावर

अकुशल:कुशल खर्चाचे प्रमाण ६०:४० राखण्यासाठी राज्य रोहयोतून पूरक कुशल निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

७. या कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मानकाप्रमाणे प्रस्तावित दर्जाचे रस्ते खालील नमुना अंदाजपत्रकाप्रमाणे तयार करण्यात यावेत. तथापि ज्या ज्या वेळी DSR बदलेल त्याप्रमाणे अंदाजपत्रक बदलेल.

शेत /पाणंद रस्ते हे सुध्दा अन्य महामार्ग/रस्ते एवढेच महत्त्वाचे आहेत. त्यामुळे गुणवत्तापूर्ण शेत/पाणंद रस्ते तयार करणे आवश्यक ठरते. यास्तव उच्च गुणवत्तेसह रस्त्यांचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद/शासन आणि वन जमीन असल्यास वन विभागाद्वारे तयार करण्यात येऊन त्यास तांत्रिक मान्यता देण्यात यावी. शेत/पाणंद रस्ता तयार करण्यासाठीचे मापदंड निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे. दरम्यानच्या कालावधीत ग्राम विकास विभागाने ग्रामीण रस्ते तयार करण्यासाठी विहित केलेले मापदंड लागू राहतील.

शेत/पाणंद कच्चा रस्ता मजबुतीकरण करताना दोन्ही बाजूने चर खोदून त्यामधून निघणारी माती/मुरुम ही शेत/पाणंद रस्त्यामधील भागात टाकण्यात येऊन त्यावर व्यवस्थित रोलरने दबाई करावी. रस्त्याचा भाग हा काळया मातीतून जात असल्यास भरावावर किमान ३०० मि.मी. जाडीचा कठीण मुरुम टाकण्यात यावा व त्यावर रोलरने व्यवस्थितरित्या पाणी शिंपडून दबाई करावी. स्थानिक भौगोलिक स्थितीचा विचार करता जर मुरूमीकरण करून पक्का रस्ता बारमाही वापराकरिता तयार होणार असेल तर तसा पक्का रस्ता तयार करण्यात यावा अन्यथा मुरुमावर खडीकरण करणे आवश्यक आहे. त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या खडीची एकूण जाडी २२५ मि.मी. असावी. त्यातील खालच्या थराच्या खडीची जाडी १५० मि.मी. असावी व त्या खडीचा आकार ग्रामीण रस्ते संहिता (Rural Road Manual) नुसार Grading I (७५mm to ४.७५mm) असावी व वरील थराच्या खडीची जाडी ७५ मि.मी. असून त्या खडीचा आकार Grading II (५३mm to ४.७५mm) असावी. सदर खडी ही जवळपासच्या खदानीतून उपलब्ध होणारी असावी. खडी ही योग्य आकारमानाची फोडून घ्यावी व त्यानंतरच वापरावी. प्रत्येक Layer मधील खडी पसरविल्यानंतर योग्य प्रकारे कोरडी व त्यानंतर पाणी मारुन रोलरने दबाई करावी. वेगवेगळ्या कामातून उपलब्ध होणाऱ्या दगड/माती/मुरुम यांचा कल्पकतेने वापर करताना दगड हा काळा व वजनदार असावा तो दगड योग्य आकारमानाचा फोडून घ्यावा. शक्यतो दगड फोडल्यानंतर १०० टक्के वापर होईल हे बघावे. शक्यतो काळया मातीचा भराव करणे टाळावे. भरावात वापरण्यात येत असलेला मुरुम कठीण असावा व खडीकरणासाठी ३०% पर्यंत पकडीसाठी वापरण्यात येणारा मुरुम हलका असावा.

CD Work- नळकांडी पुल बांधताना शक्यतो सिमेंट पाईपचा वापर करावा तथापि सिमेंट पाईप टाकल्यानंतर दोन्ही बाजूने किमान M-१० काँक्रिटच्या भिंती (Head Wall) असाव्यात त्यामुळे रस्त्याचा भराव खचणार नाही व CD Work चे आयुष्य वाढेल. शक्यतो पाणंद रस्त्यासाठी मुरुमी रस्तेच पुरेसे

आहेत. खडीचे रस्ते बांधकाम केल्यास पुढील २-३ वर्षात त्यावर डांबरीकरण करणे आवश्यक आहे. अन्यथा वाहतुकीमुळे खडी रस्त्यावर पसरुन रस्ता वाहतुकीस योग्य राहणार नाही. माती मुरुमाचा भराव करताना रस्त्याच्या मध्यापासून दोन्ही बाजूने उतार (Camber) देणे आवश्यक आहे. त्यामुळे रस्त्यावर पावसाचे पाणी साचणार नाही.

८. <u>नमुना अंदाजपत्रक :-</u>

शेत/पाणंद रस्ते तयार करण्यासाठी शासन निर्णयात नमूद केलेल्या आवश्यक बाबी विचारात घेतल्यास

i) एक किमी खडीकरणासह पक्कया रस्त्याचे अंदाजपत्रक आज रोजी अंदाजे रु.२३,८४,८५६ रकमेचे होते.

<u>मनरेगा - अकुशल</u> - रु. ९,०२,८७९

<u>मनरेगा - कुशल</u> - रु. ६,०१,९१९

<u>राज्य रोहयो - कुशल</u> - <u>रु. ८,८०,०५८</u>

एकुण - रु. २३,८४,८५६

स्थानिक भौगोलिक परिस्थिती, मुरुम व खडी वाहतुकीचे अंतर इत्यादी बाबीं मुळे अंदाजपत्रकाची रक्कम कमी-जास्त होऊ शकेल. तसेच, DSR बदलल्याने सुध्दा हे बदलेल. सदर अंदाजपत्रकात पुढील रकमांचाही समावेश आहे.

रॉयल्टी -रु. २,०४,३४७

जी.एस.टी -<u>रु. १,५१,६२७</u>

एकूण -रु. ३,५५,९७४

म्हणजेच अकुशल कामासाठी रु.९,०२,८७९ व त्या प्रमाणात कुशल कामासाठी रु.६,०१,९१९ हे मनरेगातून अनुज्ञेय होतील आणि पूरक कुशल खर्चासाठी रु.८,८०,०५८ हे राज्य रोहयोतून उपलब्ध करुन दिले जातील. पूरक कुशल निधीची तरतुद "शेत/पाणंद रस्ते योजना" या लेखाशिर्षात करण्यात येईल व मागणी प्रमाणे निधी वितरित करण्यासाठी ऑनलाईन (ONLINE) प्रणाली विकसित करण्यात येईल. अथवा सध्याच्या नरेगा पोर्टलवर वेगळी लिंक(LINK) उपलब्ध करुन देण्यात येईल.

ii) एक किलोमीटर मुरुमाच्या पक्क्या रस्त्याचे अंदाजपत्रक आज रोजी अंदाजे रू.९,७६,४२०/- इतक्या रकमेचे होते.

<u>मनरेगा अकुशल</u>- रु. ७,५८,६८३/-

<u>मनरेगा कुशल - रु. २,१७,७३७/-</u>

एकुण - रु. ९,७६,४२०/-

स्थानिक भौगोलिक परिस्थिती, तसेच DSR बदलल्याने अंदाजपत्रकाची रक्कम कमी-जास्त होवु शकेल.

९. कार्यान्वयीन यंत्रणा :-

"मातोश्री ग्रामसमृध्दी शेत / पाणंद रस्ते योजना" कार्यक्रमांतर्गत रस्त्यांची कामे पुढीलपैकी कोणत्याही यंत्रणे मार्फत करता येतील.

i) ग्राम पंचायत/

ii) जिल्हा परिषद बांधकाम विभाग / उप विभाग

iii) सार्वजनिक बांधकाम विभाग / उप विभाग

iv) वनविभाग (वन जमीन असेल तेथे)

१०. आराखडा मंजूरी :-

i. ग्राम पंचायत अंतर्गत सर्व गावांमध्ये आवश्यक असलेल्या शेत/पाणंद रस्त्यांचा आराखडा (यादी) ग्राम सभेच्या मंजुरीने ग्राम पंचायत तयार करेल. (दिनांक ३१ मे पर्यंत)

ii. वरील प्रमाणे तयार करण्यात आलेली प्रत्येक ग्रामपंचायतीची शेत / पाणंद रस्त्यांची यादी गट विकास अधिकारी एकत्रित करतील व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करतील. (१५ जून पर्यंत)

iii. मुख्य कार्यकारी अधिकारी हे जिल्हयातील सर्व तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींची यादी एकत्रित करुन आराखडा सचिव (रोहयो) यांच्याकडे सादर करतील. (३० जून पर्यंत)

iv. सचिव (रोहयो) हे सर्व जिल्हयांच्या प्राप्त आराखडयानुसार उपलब्ध निधीच्या मर्यादेत पुरक निधी मंजुरीचा प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी मा.मंत्री रोहयो यांच्याकडे सादर करतील. (३१ जुलै पर्यंत)

v. मा.मंत्री रोहयो हे जिल्हानिहाय, ग्रामपंचायत निहाय, शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांना पूरक निधी मंजुर करावयाच्या यादीस मान्यता देतील. (१५ ऑगस्ट पर्यंत)

११. तांत्रिक मान्यता :-

मा.मंत्री रोहयो यांनी मान्यता दिलेल्या रस्त्यांच्या कामांच्या आराखड्याची यादी रोहयो विभागामार्फत जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना व त्यांचे मार्फत तहसिलदार/ गट विकास अधिकारी यांचेकडे पाठविण्यात येईल.

मान्यता प्राप्त आराखडयातील रस्त्यांच्या कामाची स्थानिक भौगोलिक परिस्थितीनुसार सविस्तर अंदाजपत्रके कार्यान्वयीन यंत्रणेचे तांत्रिक अधिकारी (शाखा अभियंता/ कनिष्ठ अभियंता किंवा कंत्राटी तांत्रिक सहायक) तयार करतील.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे/ जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे/ वन विभागाचे सक्षम अधिकारी अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता प्रदान करतील.

१२. प्रशासकिय मान्यता-:

मनरेगाच्या प्रचलित मार्गदर्शक सुचनांनुसार सक्षम अधिकारी (जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी /तहसिलदार /गट विकास अधिकारी) तांत्रिक मान्यता प्राप्त रस्त्यांच्या कामांना प्रशासकिय मान्यता प्रदान करतील.

प्रशासकिय मान्यतेच्या आदेशामध्ये पुढीलप्रमाणे प्रशासकिय मान्यतेची रक्कम नमूद करण्यात यावी.

कामाचे नाव :-					
मनरेगा अंतर्गत निधी		**राज्य रोहयो अंतर्गत पूरक कुशल निधी**	**प्र.मा.ची एकूण रक्कम**		
अकुशल निधी (६०%)	**कुशल निधी (४०%)**		**अकुशल निधी**	**कुशल निधी**	**एकूण रक्कम**

१३. निधीची उपलब्धता -:

प्रशासकिय मान्यता आदेशात नमुद करण्यात आलेला मनरेगा योजने अंतर्गत अनुज्ञेय अकुशल / कुशल निधी प्रचलित पध्दतीनुसार उपलब्ध करुन देण्यात येईल. तर पूरक कुशल खर्चाची रक्कम राज्य रोहयो अंतर्गत "शेत / पाणंद रस्ते योजने करीता अनुदान" (लेखाशिर्ष-२५०५A०६७) या लेखाशिर्षातून उपलब्ध करून देण्यात येईल.

१४. अंमलबजावणीची कार्यपध्दती व राज्य रोहयो निधीचे वितरण :-

i) सध्या अस्तित्वात असलेल्या मनरेगा योजनेच्या कार्यपध्दतीनुसार कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतर संबंधित यंत्रणेमार्फत कामाला सुरुवात करण्यात येईल.

ii) कामाच्या ठिकाणचे Geo Tagging करणे, काम सुरु करण्यापूर्वी, काम सुरु असताना, व काम पूर्ण झाल्यानंतर फोटो काढणे बंधनकारक राहील.

iii) अकुशल मजुरीचे प्रदान हजेरी पत्रकाप्रमाणे थेट मजुरांच्या खात्यावर करण्यात येईल.

iv) मनरेगा अंतर्गत कुशल खर्चाच्या देयकांचे प्रदान प्रचलित पध्दतीनुसार करण्यात येईल.

v) कार्यान्वयीन यंत्रणेने राज्य रोहयो अंतर्गत कामनिहाय पूरक कुशल निधीची मागणी गट विकास अधिकारी यांचे मार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करावी.

vi) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आयुक्त, मनरेगा यांचेकडे जिल्ह्याची पूरक कुशल निधीची मागणी करावी.

vii) आयुक्त, मनरेगा यांनी शासनाकडे जिल्हानिहाय निधीची मागणी करावी.

viii) आयुक्त, मनरेगा यांचे मागणीप्रमाणे शासन स्तरावरुन निधी वितरीत करण्यात येईल.

ix) राज्य रोहयो अंतर्गत-पूरक कुशल खर्चाच्या देयकांचे प्रदान करण्यासाठी online प्रणाली विकसित करण्यात येईल किंवा मनरेगा पोर्टल वर link उपलब्ध करून देण्यात येईल.

x) मनरेगा योजनेच्या संबंधातील सर्व नियम या योजने अंतर्गत रस्त्याच्या कामांना लागू राहतील .

१५. इतर बाबी :-

i. शेत/ पाणंद रस्त्याकरीता गौण खनिज स्वामित्व शुल्क यामधून सूट देण्यात येत आहे.

ii. प्रस्तावित रस्त्यांच्या कामांचा समावेश मनरेगाच्या लेबर बजेट मध्ये करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची राहील.

iii. शेत/ पाणंद रस्त्यांकरीता मोजणी ही तातडीची मोजणी म्हणून करावी. मोजणी करीता भूमी अभिलेख विभागामार्फत कोणतेही मागणी शुल्क आकारण्यात येवू नये. ज्या ठिकाणी खाजगी मोजणी धारकाची आवश्यकता आहे, अशा ठिकाणी खाजगी मोजणी धारकाकडून मोजणी करण्यात यावी. खाजगी मोजनीधारकाने साक्षांकित केलेली मोजणी ग्राह्य धरण्यात यावी. खाजगी मोजणी करिता लागणारा निधी या योजनेतून उपलब्ध करून द्यावा.

iv. तहसिलदार यांनी आदेशित केल्यानंतर मोजणी, अतिक्रमण काढणे, रस्ता बांधकाम या करीता पोलीस बंदोबस्ताकरीता कोणतेही शुल्क आकारण्यात येवू नये.

v. शेत / पाणंद रस्त्याकरीता कोणत्याही प्रकारचे भूसंपादन अनुज्ञेय असणार नाही.

vi. रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर ५ वर्षापर्यंत या वा इतर योजनेतून दुरुस्तीसाठी खर्च करता येणार नाही. ५ वर्षानंतर केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे दुरुस्ती करता येईल.

vii. या योजने अंतर्गत पुलाची कामे घेता येणार नाहीत. आवश्यक तेथे CD Work घेता येतील.

viii. शेत/ पाणंद रस्त्याच्या दुतर्फा मनरेगा अंतर्गत वृक्ष लागवड /बिहार पॅटर्न नुसार वृक्ष लागवड करणे आवश्यक राहील.

ix. पूर्ण झालेल्या शेत/ पाणंद रस्त्यांची नोंद मनरेगाच्या मत्ता नोंदवहीत तसेच ग्राम पंचायतीच्या रस्ते नोंदवहीत घेण्यात येईल.

x. मनरेगाच्या संकेतस्थळावर मनरेगा अंतर्गत करण्यात आलेल्या अकुशल व कुशल खर्चाची नोंद करावी. त्यामध्ये राज्य-रोहयो अंतर्गत करण्यात आलेल्या पूरक कुशल निधीच्या खर्चाची नोंद करण्यात येवू नये. त्याची स्वतंत्र नोंद ठेवण्यात यावी.

१६. ग्राम पंचायतीची जबाबदारी :-

i) "मातोश्री ग्राम समृध्दी शेत / पाणंद रस्ते योजना" कार्यक्रमांतर्गत शेतक-यांच्या मागणी नुसार शेत / पाणंद रस्त्यांचा आराखडा तयार करणे.

ii) ज्या ठिकाणी शेतक-यांनी रस्त्यावर अतिक्रमण केलेले आहे अशा ठिकाणी शेतक-यांची बैठक घेवून शेतक-यांना समजावून सांगणे व अतिक्रमण दूर करणे.

iii) ग्राम पंचायत स्तरावर प्रकरण निकाली लागत नसल्यास अशी प्रकरणे तालुका स्तरीय समितीकडे सादर करून तालुकास्तरीय समितीच्या निर्देशानुसार नियमानुसार पोलीस यंत्रणेची मदत घेणे.

१७. महसूल यंत्रणेची जबाबदारी : -

ज्या ठिकाणी अतिक्रमण आहे, असा रस्ता अतिक्रमण मुक्त करण्यासाठी ग्रामपंचायतीकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तहसिलदार यांनी ज्या शेतक-याने रस्ता अतिक्रमण केला आहे. त्या शेतक-यांची बैठक घेवून अतिक्रमण दूर करण्याबाबत सुचित करण्यात यावे. अतिक्रमण धारक शेतकरी अतिक्रमण काढण्यास तयार नसल्यास, महसूल नियमावलीचा अवलंब करून अतिक्रमण मुक्त करण्याची कार्यवाही करण्यात यावी. या साठी अतिक्रमण निश्चीत करण्याकरीता मोजणी आवश्यक असल्यास शासकिय खर्चाने मोजणी करावी. त्याकरीता कोणतेकी शुल्क आकारण्यात येवू नये. ही मोजणी करताना तातडीची मोजणी म्हणून करण्यात यावी. मोजणी झाल्यानंतर त्या ठिकाणी तात्काळ खुणा निश्चित करण्यात याव्यात. निश्चित केलेल्या खुणांनुसार जेसीबी, पोकलेन इत्यादी यंत्रांव्दारे चर खोदण्याचे किंवा भरावाचे काम सुरु असताना महसुल यंत्रणांचे तलाठी किंवा महसूल यंत्रणेचे तत्सम दर्जाचे अधिकारी यांनी उपस्थित रहावे जेणे करून अतिक्रमण काढणे सुलभ होईल.

१८. पोलीस यंत्रणेची जबाबदारी :-

ज्या ठिकाणी अतिक्रमण धारक शेतकरी हे नियमानुसार कार्यवाहीस प्रतिसाद देत नाहीत. अशा ठिकाणी पोलीस बंदोबस्तामध्ये अतिक्रमण काढण्यात यावे. या बंदोबस्तासाठी पोलीस यंत्रणेकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येवू नये.

१९. "मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजना" कार्यक्रम राबविण्याकरिता विविध यंत्रणेमध्ये सुसूत्रता व जबाबदारीच्या स्पष्टतेसाठी पुढीलप्रमाणे समित्या स्थापना करण्यात येत आहेत.

- **राज्यस्तरीय समिती :**

१) मंत्री (रोहयो)	: अध्यक्ष
२) राज्यमंत्री (रोहयो)	: सदस्य
३) अ.मु.स. / प्र.स./सचिव (वित्त)	: सदस्य
४) अ.मु.स. / प्र.स./सचिव (गृह)	: सदस्य
५) अ.मु.स / प्र.स./सचिव (नियोजन)	: सदस्य
६) अ.मु.स / प्र.स./सचिव (उद्योग)	: सदस्य
७) अ.मु.स / प्र.स./सचिव (महसूल)	: सदस्य
८) अ.मु.स / प्र.स./ सचिव (सा.बां.)	: सदस्य
९) अ.मु.स / प्र.स./सचिव (आदिवासी विकास)	: सदस्य
१०) अ.मु.स / प्र.स./सचिव (ग्राम विकास)	: सदस्य
११) अ.मु.स./ प्र.स. /सचिव (रोहयो)	: सदस्य सचिव

- **राज्यस्तरीय समितीची कार्यकक्षा :-**

१. योजनेचा वेळोवेळी आढावा घेऊन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या सुधारणा करणे.

२. योजनेसंदर्भातील क्षेत्रीय स्तरावरील अडचणींचे निराकरण करणे.

- **जिल्हास्तरीय कार्यकारी समिती :-**

१) जिल्हाधिकारी	: अध्यक्ष
२) मुख्य कार्यकारी अधिकारी	: सह अध्यक्ष
३) जिल्हा पोलीस अधिक्षक	: सदस्य
४) प्रकल्प संचालक, (जि.ग्रा.वि.यं.)/ उपमुख्य कार्यकारी अधिकारी(नरेगा)	: सदस्य
५) कार्यकारी अभियंता(बांधकाम), सा.बां. विभाग	: सदस्य
६) कार्यकारी अभियंता (PMGSY)	: सदस्य
७) उप जिल्हाधिकारी (रोहयो)	: सदस्य
८) जिल्हा नियोजन अधिकारी	: सदस्य
९) जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख	: सदस्य
१०)कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद	: सदस्य सचिव

- **जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची कार्यकक्षा** :

i) पाणंदरस्ते कार्यक्रमास व्यापक प्रसिध्दी देवून जास्तीत जास्त ग्राम पंचायतीना यामध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत करणे, शेत रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याकरीता ग्राम पंचायत, महसूल यंत्रणा, भूमी अभिलेख विभाग, पोलीस विभाग इत्यादी विभागाच्या नियमित बैठका घेवून त्यामध्ये आकस्मित उदभवणारे प्रश्न सोडविणे.

ii) कार्यक्रमाचा वेळोवेळी आढावा घेणे व क्षेत्रिय स्तरावरील अडचणींचे निराकरण करणे .

iii) परिच्छेद क्र. २० व २१ मध्ये नमूद केल्यानुसार संयोजनातून तसेच, अभिसरणातून अधिकाधिक निधी उपलब्ध करुन घेऊन जिल्ह्यात अधिकाधिक लांबीचे रस्ते तयार करणे.

iv) अर्थमुव्हर उत्खनन यंत्रसामुग्री (खोदकाम करणारे यंत्र, माती/मुरुम पसरवण्यासह व रोड रोलरचे पाणी टाकून दबाईसह प्रती तास तालुकानिहाय जिल्हास्तरावर दर निश्चित करणे (मशीन + डिझेलसह) व काम करणाऱ्या यंत्र धारकांचे पॅनल तयार करणे.

v) ज्या ठिकाणी सीएसआर/एनजीओ यांच्या माध्यमातून उत्खनन यंत्रसामुग्री, रोडरोलर, दगड,मुरुम वाहतुकीकरीता लागणारी यंत्रसामुग्री विनामोबदला उपलब्ध होत असल्यास त्याकरीता डिझेल उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यपध्दती निश्चित करुन डिझेलसाठी निधी उपलब्ध करुन देणे.

- **तालुका स्तरीय समिती –:**

१ .तहसिलदार	: अध्यक्ष
२.गट विकास अधिकारी	: सह अध्यक्ष
३.तालुका अधिक्षक भूमी अभिलेख	: सदस्य
४.उप अभियंता (बांधकाम), सा.बां. विभाग	: सदस्य
५. पोलीस निरिक्षक / उपनिरिक्षक	: सदस्य
६. उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद	: सदस्य सचिव

- **तालुकास्तरीय समितीची कार्यकक्षा**–:

१. पाणंद रस्ते कार्यक्रमाला व्यापक प्रसिध्दी देवून ग्राम पंचायतीकडून शेतरस्ते अतिक्रमण मुक्त करणे करीता प्रस्ताव प्राप्त करुन घेणे.

२. ज्या ठिकाणी रस्ते अतिक्रमण केले आहे, अशा ठिकाणी शेतक-यांची बैठक घेणे व शेतक-यांना समजावून सांगणे.

३. वरील प्रमाणे प्रकरण निकाली लागत नसल्यास अशा ठिकाणी नियमानुसार पोलीस यंत्रणेची मदत घेणे.

४. आवश्यकता असल्यास गौण खनिज खाणपट्टयातून दगड/मुरुम उपलब्ध करुन देणे.

२०. संयोजनातून शेत/पाणंद रस्ते तयार करणे:

रस्त्यांचे १००% काम मग्रारोहयोतून करणे शक्य आहे. मात्र त्याकरीता शेत/पांणद रस्त्याच्या कामासोबतच अधिक अकुशलचे प्रमाण देऊ शकणारी कामेसुध्दा करावी लागतात. त्यानुसार वाचा क्रमांक ६ येथील दिनांक ३० मार्च, २०२१ च्या शासन निर्णयामधील तरतुदींनुसार कार्यवाही करावी. अशी कार्यवाही केल्याने मग्रारोहयोतील अकुशल कामाचे प्रमाण वाढेल व रस्त्याच्या कुशल कामासाठी राज्य रोहयोमार्फत लागणारा पुरक निधी कमीत कमी लागेल.

२१. **अभिसरणातून शेत/पाणंद रस्ते तयार करणे:**

मग्रारोहयोसह राज्याचे इतर सर्व योजनांच्या निधींच्या वापरातून रस्त्यांची कामे करणे. याकरीता खालील स्त्रोतातील निधीचा वापर करावा.

१. १५ वा वित्त आयोग
२. खासदार/आमदार स्थानिक विकास निधी
३. ग्रामपंचायतीला जनसुविधांकरीता मिळणारे अनुदान
४. मोठया ग्रामपंचायतीला नागरी सुविधांसाठी विशेष अनुदान
५. गौण खनिज विकास निधी/जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी
६. ग्रामपंचायतींना मिळणारे महसूली अनुदान
७. जिल्हा परिषद/पंचायत समिती सेस मधून उपलब्ध होणारा निधी
८. ग्रामपंचायतीचे स्व-उत्पन्न
९. पेसा अंतर्गत उपलब्ध होणारा निधी (अनुसूचित क्षेत्रातील गावाकरीता)
१०. ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार कार्यक्रम (आदिवासी उपयोजना गावाकरीता)
११. नाविन्यपूर्ण योजना
१२. इतर जिल्हा योजना (Other District Scheme)

मनरेगा अंतर्गत रस्त्याचे काम करताना मनरेगा Master Circular २०१७-१८ व त्यानंतर केंद्र शासनामार्फत वेळोवेळी जाहीर केलेल्या मनरेगा Master Circular मधील तरतुदींचे व मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक राहील. जिल्हास्तरीय समिती/ जिल्हाधिकारी/मुख्यकार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांच्या निदर्शनास अन्य निधी उपलब्ध होत असल्याचे लक्षात आल्यास त्याचाही वापर करण्यात यावा. अभिसरणाद्वारे उपलब्ध होणाऱ्या निधीच्या माध्यमातून मंजूर करावयाच्या कामांचे प्रस्ताव शासनाकडे पाठवू नयेत. जिल्हास्तरीय समितीमध्ये त्यास मंजूरी देण्यात यावी.

संयोजनातून व अभिसरणातून दोनही प्रकारे निधी उपलब्ध करुन रस्त्याची कामे होत असल्यास त्या रस्त्यांबाबत आराखडा मंजूरी करिता शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता नाही. तसेच अशा कामांची प्रशासकीय मान्यता प्रचलीत प्रक्रियेप्रमाणे करुन घेण्यात यावी.

२२. शेत/पाणंद रस्ता अतिक्रमणमुक्त करुन कच्चा रस्ता तयार करणे.

ज्या ठिकाणी शेतकऱ्याची सहमती आहे, अशा ठिकाणी अर्थमुव्हर उत्खनन यंत्राच्या सहाय्याने योग्य आखणी करुन दोन्ही बाजूने चर खोदून त्यामधून निघणारी माती/मुरुम शेत/पाणंद रस्त्यामधील भागात टाकण्यात यावी. तसेच चरात खोदून निघालेली माती/मुरुम योग्य प्रमाणात पसरवून रस्त्यांचा कच्चा भराव तयार करण्यात यावा. असा कच्चा रस्ता तयार करण्याकरीता टायर असलेले बॅकहो लोडर व एक्सकॅव्हेटर (७० HP पेक्षा अधिक क्षमता असलेले जेसीबी इत्यादी अर्थमुव्हर) याकरीता १०० तास प्रति किलोमीटर व चेन असलेले एक्सकॅव्हेटर (२०० HP पेक्षा अधिक क्षमता असलेले पोकलेन इत्यादी अर्थमुव्हर) करीता ४० तास प्रति किलोमीटर अनुज्ञेय राहील. यापेक्षा प्रति किलोमीटर अधिक तास लागत असल्यास तालुकास्तरीय समितीची मान्यता आवश्यक राहील.

शेत/पाणंद रस्ता अतिक्रमणमुक्त करुन कच्चा रस्ता तयार करताना शेत/पाणंद रस्त्याची भरावाची रुंदी पुरेशी असावी. त्यातून किमान दोन ट्रॅक्टरची वाहतूक होईल अशाप्रकारे असावी. खडीकरणाची रुंदी किमान ३.०० मी. असावी. दोन्ही बाजूने चर खोदल्यामुळे भरावाची रुंदी पुरेशी असावी. तसेच खोदकाम झालेल्या चरातून पावसाचे पाणी व्यवस्थित वाहून निघेल अशाप्रकारची चराची रुंदी असावी.

कच्चा रस्ता तयार करण्याकरीता लागणाऱ्या यंत्रसामुग्री निधी खर्चाची कार्यपध्दती :-

i) अतिक्रमण काढणे, कच्चा रस्ता तयार करणे व इतर कामे उत्खनन यंत्राद्वारे करण्यात यावीत. याकरीता विविध स्त्रोतामधून उपलब्ध होणारा अनुज्ञेय निधी वापरण्यात यावा. अतिक्रमण काढणे, दोन्ही बाजूने चर खोदणे, चरामधून उपलब्ध होणाऱ्या मातीमधून कच्चा रस्ता तयार करणे इ. करीता उत्खनन यंत्रसामुग्रीचा (जेसीबी, पोकलेन इत्यादी यंत्राचा) वापर करण्यात यावा. ही उत्खनन यंत्रसामुग्री उपलब्ध होण्याकरीता तालुकानिहाय जिल्हास्तरावर प्रति तास याप्रमाणे दर (यंत्र व इंधनासह) निश्चित करण्यात यावे. यामध्ये स्थानिक उत्खनन यंत्रधारकास प्राधान्य देण्यात यावे. प्रतितासामध्ये सर्वसाधारणपणे किती घनमीटर किमान उत्खनन होईल याचा विचार करण्यात यावा.

ii) अतिक्रमण काढणे व कच्चा रस्ता करण्याकरीता उपयोगात आणलेल्या उत्खनन यंत्रसामुग्रीच्या देयकाकरीता खालील पध्दतीचा अवलंब करण्यात यावा:- रस्त्याचे अतिक्रमण काढण्याकरीता, "कच्चा रस्ता तयार करण्याकरीता" प्रत्यक्षात उत्खनन यंत्रसामुग्रीचा वापर किती तास करण्यात आला हे ग्रामसेवक व तलाठी यांनी संयुक्तपणे प्रमाणित करण्यात यावे. ज्या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात

आले आहे, त्या शेतरस्त्याच्या लगतच्या शेतकऱ्यांनी उत्खनन यंत्रसामुग्री वापरण्याचे प्रत्यक्ष तास योग्य असल्याबाबतचा पंचनामा सोबत जोडण्यात यावा. उत्खनन यंत्रसामुग्री तास वापर प्रमाणपत्र (ग्रामसेवक व तलाठी यांचे संयुक्त स्वाक्षरी असलेले) व शेतकरी पंचनामा यावरुन देयक अदा करणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांनी देयके अदा करावीत. इतर मोजमापांची आवश्यकता नाही. देयकाचा नमुना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

iii) असा कच्चा रस्ता तयार करण्याकरीता टायर असलेले बॅकहो लोडर व एक्सकॅव्हेटर (७० HP पेक्षा अधिक क्षमता असलेले जेसीबी इत्यादी अर्थमुव्हर) याकरिता १०० तास प्रति किलोमीटर किंवा चेन असलेले एक्सकॅव्हेटर (२०० HP पेक्षा अधिक क्षमता असलेले पोकलेन इत्यादी अर्थमुव्हर) याकरिता ४० तास प्रति किलोमीटर अनुज्ञेय राहील. यापेक्षा प्रति किलोमीटर अधिक तास लागत असल्यास तालुकास्तरीय समितीची मान्यता आवश्यक राहील.

iv) कच्चा रस्ता तयार करताना काही ठिकाणी दोन्ही बाजूच्या चरामधून मुरुम उपलब्ध होतो. तसेच शेतकरीसुध्दा लोकसहभागातून रस्त्याकरीता मुरुम व दगड उपलब्ध करुन देतात. अशा ठिकाणी उपलब्ध मुरुम व दगड दबाईकरीता शेतकऱ्याकडून रोडरोलरची मागणी करण्यात येते, जेणेकरुन कच्चा रस्ता पक्का होण्यास मदत होते. ही बाब विचारात घेता, जिल्हास्तरीय समितीने दबाईवर पाणी टाकून रोडरोलरचे प्रती तास दर व प्रती किलोमीटर कमाल खर्च मर्यादा (यंत्र व इंधनासह) निश्चित करावी. रोडरोलर या यंत्राकरीता निधी खर्चाची कार्यपध्दतीही वर नमूद (i) (ii) (iii) परिच्छेदातील उत्खनन यंत्रसामुग्री निधी खर्च करण्याच्या कार्यपध्दतीप्रमाणे राहील. रोडरोलर या यंत्राकरीता येणारा खर्च हा उत्खनन यंत्राकरीता अनुज्ञेय असणाऱ्या खर्चाच्या व्यतिरिक्त राहील.

v) ज्या ठिकाणी सीएसआर/एनजीओ यांच्या माध्यमातून उत्खनन यंत्रसामुग्री, रोडरोलर, दगड मुरुम वाहतुकीकरीता लागणारी यंत्रसामुग्री विनामोबदला उपलब्ध होत असल्यास त्याकरीता डिझेल उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हास्तरीय समितीने कार्यपध्दती निश्चित करावी. डिझेलसाठी लागणारा निधी परिच्छेद क्र.२१ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अनुज्ञेय योजनेतून उपलब्ध करुन देण्यात यावा.

vi) शेत/पाणंद रस्त्यांमधील अतिक्रमण काढण्याकरीता राज्य रोहयोमधील काही निधी राखून ठेवण्यात येईल आणि वर्षाच्या सुरुवातीस तालुकानिहाय वाटप करण्यात येईल. अशा पध्दतीने अतिक्रमण मुक्त करुन कच्चा रस्ता तयार करुन घेण्यात यावा. त्यानंतर रस्त्यांचे पुढील कार्य वेगळा टप्पा गृहित धरुन रस्ता मजबुतीकरणाचे काम तात्काळ हाती घेण्यात यावे.

vii) शेत/ पाणंद रस्ता पक्का करण्याकरीता जवळपास उपलब्ध असणाऱ्या दगड/ मुरुम/ मातीचा वापर करावा. याकरीता शासनाच्या विविध योजनेअंतर्गत सुरु असलेल्या जलसिंचन विहिरीतील दगड/मुरुम उपलब्ध असल्यास वापरण्यात यावा. कार्यान्वयन यंत्रणेने वेगवेगळया कामामधून उपलब्ध होणाऱ्या दगड/मुरुम/माती याचा कल्पकतेने रस्ता मजबुतीकरणाकरीता वापर करण्यात यावा.

अत्यावश्यक असल्यास तालुकास्तरीय समितीच्या मान्यतेने विनिर्दिष्टीत खाणपट्टयांमधून गौण खनिज उपलब्ध करुन घ्यावे. शेतरस्ता/पाणंद रस्ता बांधकामासाठी उपयोगात येणाऱ्या गौण खनिजाकरीता कोणत्याही प्रकारचे गौण खनिज स्वामीत्व शुल्क आकारण्यात येवू नये.

२३. प्रगती अहवाल :

मान्यता प्रदान करण्यात आलेल्या कामांचा प्रगती अहवाल संबंधित यंत्रणेने दरमहा गट विकास अधिकारी यांचेकडे सादर करावा. गट विकास अधिका-यांनी तालुक्याचा एकत्रित अहवाल मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे सादर करावा व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, अपर मुख्य सचिव, रोहयो यांचेकडे सादर करावा.

२४. दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ चा शासन निर्णय व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार "पालकमंत्री शेत/पाणंद रस्ते योजना" अंतर्गत ज्या शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांसंदर्भात कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले आहेत अशी कामे सुरु राहतील. तथापि, शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांसंदर्भात कार्यारंभ आदेश निर्गमित झालेले नाहीत अशा कामांच्याबाबतीत प्रस्तुत शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२१११११११२५६३७८९१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NANDKUMAR VERMA

Digitally signed by NANDKUMAR VERMA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOIL AND WATER CONSERVATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c98b875883e76c14d91ed7b89546e6c11e439cad32d7f5cff487862cc567ee39, pseudonym=8DD51EE304775C22C23852DC8597F84B9FEF8A01, serialNumber=DC3577EBF0E05E2A8B57095C152DC6CFB37C2BB83DA19778864SDD8A362EBC5, cn=NANDKUMAR VERMA
Date: 2021.11.11 16:11:06 +0530

(नंद कुमार)
अपर मुख्य सचिव, (रोहयो)

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा.मंत्री (रोहयो)/मा. राज्यमंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव,
४. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मा.समिती प्रमुख,महाराष्ट्र विधानमंडळ रोहयो समिती,विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मुख्य सचिव यांचे सहसचिव
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधानसचिव/सचिव,मंत्रालयीन विभाग
८. सर्व विभागीय आयुक्त,

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत कृषी वाहिनीचे सौर उर्जीकरण करण्याच्या दृष्टीने लागणाऱ्या जमीनीचा भाडेपट्टा निश्चित करण्याचे सुधारित धोरण व आवश्यक जमीनी सुलभरित्या व शिघ्रगतीने उपलब्ध करण्याबाबत आवश्यक सहाय देण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन

उद्योग, उर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक : सौरप्र-२०२२/प्र.क्र.१५५/ऊर्जा-७

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : ०२ नोव्हेंबर, २०२२.

संदर्भ:-१) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक सौरप्र- २०१६/प्र.क्र.३५४/ऊर्जा-७, दि. १४ जून,२०१७

२) शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्रमांक जमिन- २०१७/प्र.क्र.१९७/ऊर्जा-७, दि. २९ नोव्हेंबर,२०१७

३) शासन परिपत्रक, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक साबांज- २०१५/प्र.क्र.२४९/मिव्य-१, दि. १८ऑक्टोबर,२०१७

४) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक सौरप्र- २०१८/प्र.क्र.८७/ऊर्जा-७, दि. २७ फेब्रुवारी,२०१८

५) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक सौरप्र- २०१८/प्र.क्र.२६/ऊर्जा-७, दि. १७ मार्च, २०१८

६) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक अपाऊ- २०२०/प्र.क्र.१३७/ऊर्जा-७, दि. ३१ डिसेंबर,२०२०

७) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक सौरप्र- २०२२/प्र.क्र.१५५/ऊर्जा-७, दि. १५ सप्टेंबर,२०२२

८) अपर मुख्य सचिव (महसुल) यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या दिनांक २७ सप्टेंबर, २०२२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त(शासन पत्र उ.ऊ. व का. विभाग, क्र.सौरप्र-२०२२/प्र.क्र.१५५(भाग-१)/ऊर्जा-७, दि.११.१०.२०२२)

प्रस्तावना :-

राज्यातील ग्रामीण भागामध्ये वीजेच्या गावठाण व कृषी वाहिनीचे विलगीकरण झाले आहे, अशा ठिकाणी कृषी वाहिनीचे सौर ऊर्जाद्वारे विद्युतीकरण करण्याबाबत दिनांक १४ जून, २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्यात "मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना" सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी दिनांक १७ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत सुधारणा करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत प्रकल्पाकरीता शासकीय जमीन नाममात्र वार्षिक रु.१/- या दराने ३० वर्षांच्या कालावधीकरीता भाडेपट्टयाने देण्याची अथवा योजनेची अंमलबजावणी यंत्रणा / खाजगी गुंतवणूकदार यांना प्रकल्पासाठी खाजगी जमीन / पडीक जमीन भाडे कराराने घेण्याची संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक १७.०३.२०१८ मध्ये तरतूद आहे. तसेच या योजनेंतर्गत प्रकल्पासाठी उपलब्ध करुन देण्यात येणारी जमीन अकृषिक करण्याची गरज राहणार नाही, अशीही तरतूद शासन निर्णयामध्ये करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेचा आढावा घेण्यासाठी मा. उपमुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दिनांक १३ जुलै, २०२२ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीतील निर्णयानुसार कृषी वाहिनीचे सौर उर्जीकरण करण्याच्या दृष्टीने लागणारी जमीन महसुल विभागाद्वारे उपलब्ध करुन घेण्याच्या अनुषंगाने दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये अप्पर मुख्य सचिव (महसुल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली. सदर समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना व कुसुम योजनेसाठी शासकीय तसेच खाजगी जमीन सुलभतेने व शिघ्रगतीने उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी व त्यासाठी लागणारी जमीन सुलभतेने उपलब्ध होण्यासाठी खालील निर्णयांना शासन मान्यता देण्यात येत आहे:-

१. **<u>जमिनीचा भाडेपट्टा दर :-</u>**

अ) मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत कृषी वाहिनीचे सौर उर्जीकरण करण्याच्या दृष्टीने लागणारी खाजगी जमीन महावितरण/ महानिर्मिती कंपनीला तसेच महाउर्जा संस्थेस भाडेपट्ट्याने उपलब्ध करुन देताना जागेची त्या वर्षीच्या नोदणी व मुद्रांक विभागाने निर्धारित केलेल्या किंमतीच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक १८ ऑक्टोबर, २०१७ चे शासन परिपत्रकातील नमूद केलेल्या ६ टक्के दरानुसार परिगणित केलेला दर किंवा प्रतिवर्ष रु.७५,०००/- प्रति हेक्टर यापैकी जी रक्कम जास्त असेल त्या दराने वार्षिक भाडेपट्टयाचा दर निश्चित करण्यात यावा.

ब) अशा प्रकारे प्रथमवर्षी आलेल्या पायाभूत वार्षिक भाडेपट्टी दरावर (Base Rate) प्रत्येक वर्षी ३ टक्के सरळ पद्धतीने भाडेपट्टी दरात वाढ करण्यात यावी.

क) महावितरण/ महानिर्मिती/ महाऊर्जाद्वारे निश्चित केलेल्या जमिनींना निविदा प्रक्रियेमध्ये समाविष्ट करण्यात येईल. सदर जमिनीची निवड सौर ऊर्जा प्रकल्प धारक करतील. जमीन भाडेपट्टीचा करार हा जमीन धारक व महावितरण /महानिर्मिती /महाऊर्जा यांच्याद्वारे प्रकाशित निविदामध्ये यशस्वी झालेल्या सौर ऊर्जा प्रकल्प धारकामध्ये होईल. सदर जमिनीवर सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित होईपर्यंत उपरोक्त प्रमाणे निश्चित झालेला भाडेपट्टीच्या दरानुसार झालेल्या जमिनीची भाडेपट्टी करारानुसार भाडीपट्टीची रक्कम जमीनधारकास (व्यक्ती/संस्था) सौर ऊर्जा प्रकल्प धारकाद्वारे अदा करण्यात यावी. तसेच प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर जमीन धारकास (व्यक्ती/संस्था) भाडेपट्टी महावितरणद्वारे जमीन धारकाच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर सदर जमिनीवर सौर ऊर्जा निर्मितीचे देयक भाडेपट्टीपेक्षा कमी असल्यास भाडेपट्टीची रक्कम जमीनधारकास (व्यक्ती/संस्था) अदा करण्याची जबाबदारी सौर ऊर्जा प्रकल्प धारक याची राहील.

२. **<u>महावितरणच्या कृषिवाहिन्यांचे सौर उर्जीकरण करण्यासाठी उद्दिष्ट:-</u>**

प्रत्येक जिल्हयातील महावितरण कडील एकूण कृषी वाहिन्यांपैकी किमान ३० % कृषी वाहिन्यांचे सौर उर्जीकरण महावितरण ने जलद गतीने करावे.

३. **<u>मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनीसाठी जमीन उपलब्धतेत सहाय्य करण्यासाठी समिती</u>**:-

३.१ मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत कृषी वाहिन्यांचे सौर उर्जीकरण करण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्हयातील ३०% कृषी वाहिन्या ह्या सौर ऊर्जेवर आणण्याबाबतचे निश्चित करण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारी जमीन तातडीने उपलब्ध व्हावी याकरिता सहाय्य करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.:-

१) जिल्हाधिकारी	-	अध्यक्ष
२) अधिक्षक अभियंता, (संवसु) महावितरण कंपनी	-	सदस्य सचिव
३) सहायक संचालक, नगर रचना	-	सदस्य
४) महाऊर्जाचा प्रतिनिधी	-	सदस्य

३.२ प्रत्येक जिल्हयातील महावितरण कंपनीच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी उपकेंद्राचे स्थळ निश्चित करावे. सदर उपकेंद्राचे स्थळ व उपकेंद्रापासून किती परिघामध्ये जमिन आवश्यक आहे, याचा तपशिल महावितरणचे अधिकारी त्या त्या जिल्ह्याच्या उपरोक्त समितीस सादर करतील. उपकेंद्रच्या परीघातील जमीन निश्चित करण्यासाठी आवश्यकतेनुसार GIS नकाशांचा सुध्दा वापर करण्यात यावा.

३.३ उपरोक्त समिती महावितरण कंपनीने सादर केलेल्या प्रस्तावाची छाननी करुन सौर कृषी वाहिनी योजना तसेच अन्य सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी खाजगी, शासकीय जमीन, महामंडळे/ कृषी विद्यापीठ /शासकीय विभाग यांच्याकडील उपलब्ध असलेल्या विनावापर/ पडीक जमीन महावितरण / महानिमिती / महाउर्जा कंपनीला भाडेपट्ट्यावर उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने आवश्यक ते सर्व सहाय्य करेल.

४. **<u>अकृषिक सनद</u>** :-

सौर ऊर्जा प्रकल्पासाठी जी जमीन निश्चित होईल त्या ठिकाणी महावितरण/महानिर्मिती कंपनीद्वारे / महाउर्जा संस्थेव्दारे आस्थापित करण्यात येणाऱ्या सौर ऊर्जा प्रकल्पास महावितरण / महानिर्मिती / महाउर्जा यांचेसोबत वीज खरेदी करार करण्यास (PPA) मान्यता मिळाल्यानंतर त्या जमिनीवर प्रकल्प उभारण्यास महावितरण / महानिर्मिती / महाउर्जा यांचेकडून परवानगी देण्यात येईल व तद्नंतर त्या जमीनीच्या अकृषिक वापराच्या परवानगीची सनद महसूल यंत्रणा तातडीने जारी करेल.

५. उपरोक्त निर्णय केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडून शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवंम उत्थान महाभियान (कुसुम) अंतर्गत घटक "अ"व "क" योजनेला सुध्दा लागू राहील.

सदर शासन निर्णय महसूल व वन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत असून सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक क्रमांक २०२२११०२१७३०३१८५१० असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

NANASAHEB RAJARAM DHANE

Digitally signed by NANASAHEB RAJARAM DHANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a71698611123263cde9d32423e9bb73044d91ed0cffad3b626719 8ee5014159f, pseudonym=5DD23ACB82750B55FAC0D076A4719888SE07A4B6, serialNumber=6C39E2858150DBDFCFE6CD25ED08ADF59F4D2FDBC1EDE 1730735F604904BF3BB, cn=NANASAHEB RAJARAM DHANE
Date: 2022.11.02 17:34:06 +05'30'

(ना. रा. ढाणे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२) मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधान भवन मुंबई,
४) सर्व मंत्री / सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मुंबई,
५) सर्व विधानमंडळ सदस्य,विधान भवन, मुंबई,
६) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
७) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,

गावोगावी इंटरनेटच्या सुविधा पोहचण्यासंदर्भात "डिजिटल इंडिया" या योजनेअंतर्गत "GROUND BASED TOWER AND HOISTING OF EQUIPMENT" या प्रयोजनासाठी भारत संचार निगम लिमिटेड (BSNL) यांना जागा उपलब्ध करून देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक:- जमीन-२०२२/प्र.क्र.१८८/ज-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- २९ नोव्हेंबर, २०२२

संदर्भ:-

१. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४०.
२. महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे), नियम १९७१ मधील नियम ६ व नियम ३१.
३. महाप्रबंधक, भारत संचार निगम लिमिटेड (BSNL) यांचे पत्र क्र.No.MHCO-NOCM/१२(११)/२/२०२२-O/OPGM CM, दि.१६/०८/२०२२

प्रस्तावना:-

इंटरनेट सुविधांपासून वंचित राहिलेल्या राज्यातील एकूण २३८६ गावांमध्ये ४G सर्व्हीसेसच्या सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र शासनामार्फत योजना राबविण्यात येत असून दि. ०९ डिसेंबर २०२३ रोजी पर्यंत योजना पूर्णत्वास नेण्याचे लक्ष्य आहे व उपरोक्त प्रयोजनासाठी गावोगावी इंटरनेटच्या सुविधा पोहचण्यासंदर्भात **"डिजीटल इंडिया"** बाबतच्या मा. पंतप्रधान महोदयांच्या दूरदृष्टीनुसार सदर कार्यक्रम राबविणे कामी दि. २७ जुलै २०२२ रोजी मा. पंतप्रधान महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. २७ जुलै २०२२ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीतील निर्णयास अनुलक्षून मुख्य महाप्रबंधक, BSNL यांनी दि. १६ ऑगस्ट २०२२ च्या पत्राद्वारे सादर केलेला महाराष्ट्रातील दूरक्षेत्रातील (remote villages) २३८६ विशिष्ट गावांमध्ये "GROUND BASED TOWER AND HOISTING OF EQUIPMENT" या प्रयोजनासाठी २०० चौ.मी. जागा ही विना मोबदला उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

भारत संचार निगम लिमिटेड (BSNL) या केंद्रशासनाच्या संस्थेस दूरक्षेत्रातील गावांमध्ये दूरसंचार व इंटरनेट सेवा पुरविणे या सार्वजनिक प्रयोजनासाठी जमीन उपलब्ध करण्याच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेणेत येत आहे :-

अ) "GROUND BASED TOWER AND HOISTING OF EQUIPMENT" या प्रयोजनासाठी **परिशिष्ट "अ"** येथे नमूद केलेल्या सर्व गावांमध्ये २०० चौ.मी. निर्बाध्यरित्या उपलब्ध असलेली खुली जागा अथवा गायरान जमीन विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी यांचेकडे असे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी १५ दिवसांत जमीन मंजूरी व Tower उभारणीस मंजूरी देणे आवश्यक राहील.

ब) "GROUND BASED TOWER AND HOISTING OF EQUIPMENT" या प्रयोजनासाठी उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या २०० चौ.मी. जागेस ऊर्जा विभागाने MSEDCL च्या निधीतून प्राधान्याने २ ते ३ महिन्यांच्या कालावधीत पायाभूत सुविधा उपलब्ध करुन वीज पुरवठा व जोडणी देण्यात यावी. त्यानंतर वीज वापरानुसार मासिक देयक उपभोक्ता यांनी भरावे.

क) "GROUND BASED TOWER AND HOISTING OF EQUIPMENT" या प्रयोजनासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या २०० चौ.मी. या जागेपर्यंत OFC केबल टाकण्यासाठी रस्त्याचा वापर **(Right of Way)** उपलब्ध करुन देण्याबाबत BSNL ने OFC केबल टाकण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील रस्ते पूर्ववत करण्याच्या अटीच्या अधीन राहून उपरोक्त प्रयोजनासाठी उपलब्ध करून दिलेल्या जागेपर्यंत OFC केबल टाकण्यासाठी रस्त्याचा वापर (Right of Way) विनामूल्य उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ड) ऑप्टिकल फायबर(OFC) केबलसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून आकारण्यात येणा-या नाममात्र भाड्यातून पूर्ण सूट देण्यात येत आहे.

इ) "GROUND BASED TOWER AND HOISTING OF EQUIPMENT" या प्रयोजनासाठी दुरक्षेत्रातील टॉवर उभारणीसाठी संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे **"नोडल अधिकारी"** म्हणून समन्वय साधतील.

०२. सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचेकडील अनौपचारीक संदर्भ क्र.३०७/२०२२/व्यय-९, दिनांक १०/११/२०२२ अन्वये आणि दि. २९/११/२०२२ च्या मा. मंत्रीमंडळ बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२२११२९१९१८२८०११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

SUHAS MADHAV MAMDAPURKAR

Digitally signed by SUHAS MADHAV MAMDAPURKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=15e9cd7730234dc2963eb61397dd04240c15d02a5a148c43a83593ac725fd19c, pseudonym=1A2F622DE5904FF048601C73A184349D5EEECBBB, serialNumber=F1B00E7181536EEDD7B08803397FED3A96870CA795C4D9384B72F43ASA066D99, cn=SUHAS MADHAV MAMDAPURKAR
Date: 2022.11.29 19:26:11 +05'30'

(सुहास ममदापूरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

- सोबत - परिशिष्ट - "अ"

प्रत:-

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.मंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव, (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) अप्पर मुख्य सचिव (ग्राम विकास विभाग), मंत्रालय, मुंबई
८) अप्पर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग), मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव (नवि-२), (नगर विकास विभाग), मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव (ऊर्जा विभाग), मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
१२) अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
१४) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
१५) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे.
१६) नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१८) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
१९) सर्व विभागीय आयुक्त.
२०) सर्व जिल्हाधिकारी.
२१) सर्व सहसचिव/उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.
२२) सर्व अवरसचिव/कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.
२३) सहसचिव (ज-१), यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२४) निवड नस्ती (ज-१).

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना - २.०
"शेतकऱ्यांच्या शेतीपंपांना दिवसा अखंडीत व
शाश्वत वीज पुरवठा करण्याचे अभियान"

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक : सौरप्र-२०२३/प्र.क्र.९५/ऊर्जा-७

तिसरा मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०८ मे, २०२३.

संदर्भ :-

१) शासन निर्णय, उद्योग उर्जा व कामगार विभाग, क्र.सौरप्र-२०१५/प्र.क्र.३५४/उर्जा-७, दिनांक १४.०६.२०१७.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.जमीन-२०१७/प्र.क्र.१९७/ज-१, दिनांक २९.११. २०१७.
३) शासन निर्णय, उद्योग उर्जा व कामगार विभाग, क्र.सौरप्र-२०१/प्र.क्र.३५४/उर्जा-७, दिनांक २७.०२.२०१८.
४) शासन निर्णय, उद्योग उर्जा व कामगार विभाग, क्र.सौरप्र-२०१८/प्र.क्र.२६/उर्जा-७, दिनांक १७.०३.२०१८.
५) शासन निर्णय, उद्योग उर्जा व कामगार विभाग, क्र.अपाऊ-२०२०/प्र.क्र.१३७/उर्जा-७, दिनांक ३१.१२.२०२०
६) शासन निर्णय, उद्योग उर्जा व कामगार विभाग, क्र.अपाऊ-२०२०/प्र.क्र.१३७(अ)/उर्जा-७, दिनांक ११.०५.२०२२
७) शासन निर्णय, उद्योग उर्जा व कामगार विभाग, क्र.अपाऊ-२०२१/प्र.क्र.२२४/उर्जा-७, दिनांक ३०.०६.२०२२
८) शासन निर्णय, उद्योग उर्जा व कामगार विभाग, क्र.अपाऊ-२०२१/प्र.क्र.२२४ (भाग-४)/उर्जा-७, दिनांक ३०.०९.२०२२
९) शासन निर्णय, उद्योग उर्जा व कामगार विभाग, क्र.सौरप्र-२०२२/प्र.क्र.१५५/उर्जा-७, दिनांक २.११. २०२२.

प्रस्तावना :-

१. महाराष्ट्र राज्यात सुमारे ४५ लाख कृषी वीज ग्राहक आहेत. देशातील शेतीच्या विद्युत पंपांमध्ये महाराष्ट्राचा वाटा सर्वात मोठा आहे. राज्यामध्ये ऊर्जेच्या एकूण वापरापैकी कृषी क्षेत्रासाठी सुमारे २२% ऊर्जेचा वापर होत असून प्रामुख्याने सदर वीजेचा वापर कृषी पंपास वीज पुरवठा करण्यासाठी होतो. सध्या शेतकऱ्यांना चक्रीय पध्दतीने दिवसा व रात्री वीजपुरवठा केला जातो. अशाप्रकारे वीजपुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांची खूप गैरसोय होते, रात्रीच्या वेळी शेतात सिंचन करताना वन्य प्राणी, साप चावणे, इत्यादी धोक्यांचा सामना करावा लागतो, या समस्या सोडविण्यासाठी दिवसा वीजपुरवठा करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून सातत्याने होत असते.

२. राज्यातील शेतकऱ्यांना माफक दरात व त्यांच्या सोयीनुसार वीज पुरवठा उपलब्ध व्हावा या दृष्टीकोनातून गावठाण व कृषी वीज वाहिनीचे विलगीकरण झाले त्याठिकाणी कृषी वीज वाहिनीचे सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्यासाठी संदर्भाधीन दिनांक १४ जून, २०१७ च्या शासन निर्णयान्वये "मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना" सुरु करण्यात आली. सदर योजनेच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन संदर्भाधीन दिनांक १७ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयान्वये त्यात सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यानंतर मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत सौर ऊर्जा प्रकल्पासाठी लागणाऱ्या जमिनीबाबत सुधारित धोरण संदर्भाधीन दिनांक २ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले आहे.

३. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या अनुषंगाने सौर प्रकल्प विकासकांशी सविस्तर चर्चा आणि आस्थापित सौर प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. त्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेची जलद गतीने व प्रभावी अंमलबजावणी करण्यामध्ये खालील प्रमुख आव्हाने आढळून आली आहेत:-

१) **तांत्रिक आव्हाने-**

प्रकल्प विकासकांच्या दृष्टीने प्रकल्प उभारण्यासाठी ग्रीड कनेक्टीव्हीटी हे महत्वाचे आव्हान आहे. ११के.व्ही./२२ के.व्ही. वाहिनीवरील ग्रीडची अपुरी उपलब्धता, संयंत्रामधील त्रुटी व आवश्यक देखभालीचा अभाव, असंतुलित वीज भार, इ. बाबी सौर प्रकल्प विकसीत करण्यास अडचणीच्या ठरतात.

२) **आर्थिक आव्हाने**-

प्रकल्पांची किंमत त्या ठिकाणाच्या जमिनीचा प्रकार, स्थान, निष्कासन व्यवस्था, स्थानिक समर्थन, वीज उपकेंद्राची स्थिती, प्रकल्प पूर्ण होण्याच्या कालावधीत अनावश्यक विलंब, अतिरिक्त खर्चात वाढ, तुलनेने लहान आकाराचे (क्षमतेचे) प्रकल्प असल्यामुळे सुरुवातीला खर्चांचा अचूक अंदाज न येणे, काही विशिष्ट परिस्थितीमध्ये विशेषत: सुरुवातीच्या वर्षांत जास्तीचा खर्च होणे, इत्यादी परिस्थितीवर अवलंबून असते. त्यामुळे विकासकाला प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते.

३) **कार्यपध्दती विषयक आव्हाने**-

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी वीज उपकेंद्रांजवळ जमिनीची उपलब्धता ही महत्त्वाची गरज आहे. जमीन उपलब्ध होण्यासाठी विविध स्तरांवर आवश्यक असलेल्या परवानग्या, मान्यता, प्रकल्प नोंदणी पध्दत या कारणांमुळे प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब होतो.

४) **अकृषिक परवानगी व महसूल/स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या करातून सूट बाबतची अंमलबजावणी**-

प्रकल्प उभारण्यासाठी लागणारी जमीन अकृषिक (NA) करण्याची गरज नसणे, या जमिनींना महसूल व स्थानिक स्वराज्य संस्थांकडून आकारण्यात येणाऱ्या सर्व करांतून/ फीमधून सूट देणे या तरतुदी संदर्भाधीन दिनांक १४ जून, २०१७ व दिनांक ३० जून, २०२२ च्या शासन निर्णयांमध्ये अंतर्भूत असूनही सदर तरतुदींची काटेकोरपणे अंमलबजावणी संबंधित यंत्रणेकडून होत नाही. याबाबत विकासकांना मोठया प्रमाणावर अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

४. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या अंमलबजावणीचा अनुभव व आव्हाने पाहता, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत कृषी वीज वाहिन्यांचे जलद गतीने सौर उर्जीकरण करण्यासाठी या योजनेची अंमलबजावणी अभियान तत्वावर (Mission Mode) करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्या दृष्टीने तांत्रिक व माहितीच्या स्वरुपात सहाय्य घेऊन मिशन-२०२५ चे नियोजन आणि आराखडा तयार करण्यासाठी महाराष्ट्र शासन (ऊर्जा विभाग) आणि प्रयास संस्था (ऊर्जा गट) यांच्यात दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी सामंजस्य करार करण्यात आला. तसेच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेचे सुधारित स्वरुप निश्चित करण्यासाठी महानिर्मिती, महावितरण व महापारेषण कंपनी, महाऊर्जा आणि PWC संस्था यांच्या प्रतिनिधींचा एक अभ्यासगट मा.प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आला. सदर अभ्यासगटाच्या शिफारशी व मिशन २०२५ संदर्भात प्रयास संस्थेचा अहवाल विचारात घेऊन अस्तित्वातील मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमध्ये सुधारणा करुन या योजनेची अंमलबजावणी मिशन मोडमध्ये करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शेतकऱ्यांच्या शेतीपंपाना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी कृषी फिडर्सचे सौर ऊर्जीकरण मिशन मोडमध्ये करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० "शेतकऱ्यांच्या शेतीपंपांना दिवसा अखंडीत व शाश्वत वीज पुरवठा करण्याचे अभियान" या योजनेस पुढीलप्रमाणे शासन मान्यता देण्यात येत आहे:-

१} योजनेचे उद्दिष्टे :-

या अभियानांतर्गत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना अधिक सक्षम आणि सुव्यवस्थित करणे, राज्यात सन २०२५ पर्यंत किमान ३० टक्के कृषी वीज वाहिनींचे सौर ऊर्जीकरण करण्यासाठी तांत्रिक, आर्थिक, कार्यपद्धती आणि देखरेखीचा आवश्यक आराखडा तयार करणे तसेच शेतकऱ्यांना दिवसा अखंडीत व शाश्वत वीजपुरवठा करता यावा यासाठी किमान ७००० मेगावॉट सौर ऊर्जा क्षमता निर्माण करणे, इ. या अभियानाच्या उद्दिष्टांस मान्यता देण्यात येत आहे.

२} अंमलबजावणी यंत्रणा व घटक :-

महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सुत्रधारी कंपनी या योजनेची नोडल एजन्सी राहील. या योजनेची अंमलबजावणी शासन नामनिर्देशित करेल त्या यंत्रणेमार्फत केली जाईल. तोपर्यंत अंमलबजावणीची सर्वस्वी जबाबदारी महावितरण कंपनीची राहील. भविष्यात कृषी क्षेत्रात वीज पुरवठ्यासाठी स्वतंत्र कंपनी स्थापन करण्याचा शासनाचा मानस आहे. तद्नंतर सदर योजनेची अंमलबजावणी त्या कंपनीमार्फत करण्यात येईल.

या अभियानांतर्गत खालील पध्दतीने सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येतील :-

२.१) नोडल एजन्सी/ महावितरण कंपनी किंवा नामनिर्देशीत यंत्रणेद्वारे खुल्या निविदेमार्फत Tariff Based Bidding च्या आधारावर निवडलेल्या विकासकांबरोबर वीज खरेदी करारनामा (PPA) करुन आणि महावितरण कंपनीसोबत वीज विक्री करारनामा (PSA) करुन,

२.२) भविष्यात कृषी वीज कंपनी स्थापित झाल्यानंतर त्या कंपनी / नोडल एजन्सीद्वारे खुल्या निविदेमार्फत Tariff Based Bidding च्या आधारावर निवडलेल्या विकासकांबरोबर वीज खरेदी करारनामा (PPA) आणि महावितरण कंपनीसोबत वीज विक्री करारनामा (PSA) करुन,

२.३) शक्य असेल तिथे विशेष हेतू वाहन (Special Purpose Vehicle) तयार करुन प्रकल्पासाठी लागणारी जमीन व परवानग्या SPV च्या नावाने प्राप्त केल्या जातील. Tariff Based Bidding मार्फत निवडलेले निविदा बोलीधारक विशेष हेतू वाहन (SPV) अधिग्रहण करतील व महावितरण कंपनीशी वीज खरेदी करारनामा (PPA) करुन,

२.४) प्रकल्प अंमलबजावणीनंतर ज्या कृषी वाहिन्या कोणत्याही प्रकल्प समुहामध्ये समाविष्ट झालेल्या नाहीत, अशा कृषी वाहिनीवरील प्रकल्पासाठी मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून Feed in Tariff नुसार व EPC तत्वावर आवश्यकतेनुसार प्रकल्प आस्थापित करण्यात येतील.

या अभियानांतर्गत निविदा प्रक्रियेमध्ये प्रवर्तक, सहकारी संस्था, खाजगी विकासक (राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय), राज्य शासन / केंद्र शासन यांच्या सार्वजनिक उपक्रम कंपनी, वैयक्तिक विकासक, शेतकरी, शेतकऱ्यांचा गट, Farmers Producer Company इ. सहभाग घेण्यास पात्र राहतील.

३} योजनेचा आराखडा :-

या अभियानाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी खालील घटकांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी:-

३.१) <u>प्रकल्प आकारमान आणि वीज खरेदी धोरण-</u>

या अभियानांतर्गत विकेंद्रित प्रकल्प आस्थापित करण्यासाठी वीज उपकेंद्रांच्या परिघातील जमिनीची उपलब्धता, वीज उपकेंद्रांवरील ग्रीड-कनेक्टिव्हिटी आणि प्रकल्पाचे आकारमान हे प्रकल्पांच्या आर्थिक व्यवहार्यतेच्या दृष्टीने महत्त्वाचे घटक आहेत. हे घटक परिस्थितीनुरुप बदलतात आणि म्हणून सर्व प्रकल्पांसाठी एकच मापदंड असणे योग्य होणार नाही. यासाठी प्रकल्प आकारमान आणि वीज खरेदी धोरणामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी खालील तरतुदींचा अवलंब करण्यात येईल:-

३.१.१) महावितरण कंपनीच्या वीज उपकेंद्राच्या परिघात ०.५ मेगावॅट ते १० (२x५) मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित करुन ११ के.व्ही./२२ के.व्ही.स्तरावर जोडण्यात येतील.

३.१.२) महावितरण / महापारेषण कंपनीच्या वीज उपकेंद्राच्या परिघात ५ मेगावॅट ते २५ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित करुन ३३ के.व्ही. स्तरावर जोडण्यात येतील.

Capacity (MW)	750	1250	2000	3000	7000
Early commissioning generation incentive (Rs Cr)	73	122	195	292	**682**
System strengthening grant (Rs Cr)	38	63	100	150	**351**
Social benefit grant to the gram panchayat (Rs Cr)	23	38	60	90	**211**
Total	**134**	**223**	**355**	**532**	**1,244**

Note: The numbers denote financial burden over the lifecycle of project for the capacities commissioned in respective years. For instance, for the 750 MW capacity commissioned in 2023, early commissioning generation incentive shall be Rs 73 Cr over 3 years

12.2. Summary of benefits to GoMH

a) Revenue from GST on the capital expenditure incurred by project developers – Benefit of Rs 1,533 Cr

b) Revenue from GST on annual operations and maintenance expenditure incurred by project developers – Benefit of Rs 945 Cr

Summary of benefits to GoMH over lifecycle of project

	2023	2024	2025	2026	Total
Capacity (MW)	750	1,250	2,000	3,000	7,000
Revenue from GST on capex (Rs Cr)	164	274	438	657	**1,533**
Revenue from GST on O&M (Rs Cr)	101	169	270	405	**945**
Total	**265**	**443**	**708**	**1,062**	**2,478**

Note: The numbers denote financial benefit over the lifecycle of project for the capacities commissioned in respective years. For instance, for the 750 MW capacity commissioned in 2023, revenue from GST on O&M shall be Rs 101 Cr over 25 years

Summary of net benefits to GoMH over lifecycle of project

	2023	2024	2025	2026	Total
On annual cash flow basis					
Burden on GoMH (Rs Cr)	134	223	355	532	1,244
Benefits to GoMH (Rs Cr)	265	443	708	1,062	2,478
Net benefits to GoMH (Rs Cr)	**131**	**220**	**353**	**530**	**1,234**
On Net Present Value (NPV) basis					
Burden on GoMH (Rs Cr)	124	206	330	495	1155
Benefits to GoMH (Rs Cr)	202	336	538	806	1882
Net benefits to GoMH (Rs Cr)	**78**	**130**	**208**	**311**	**727**

12.3. Yearly budgetary provision needed and benefits to GoMH

	2023	2024	2025	2026	2027	2028	Total
Annual capacity (MW)	750	1,250	2,000	3,000	-	-	7,000
Cumulative capacity till the year (MW)	750	2,000	4,000	7,000	-	-	
Cost of incentives							
Early commissioning generation incentive (Rs Cr)	25	65	130	203	162	96	**682**
System strengthening grant (Rs Cr)	38	63	100	150	**-**	**-**	**351**
Social benefit grant to the gram panchayat (Rs Cr)	8	20	40	63	50	30	**211**
Annual cost of incentives (A)	**70**	**148**	**270**	**416**	**212**	**126**	**1,244**
Provision for revolving payment security fund as per Clause 4.3 (a)b	100	200	400	700	700	700	
Annual budgetary provision	170	348	670	1116	912	926	
Benefits to GoMH							
Revenue from GST on capex (Rs Cr)	164	274	438	657	-	-	1,533
Revenue from GST on O&M (Rs Cr)	4	11	22	38	38	38*	945
Annual benefits to GoMH (B)	**168**	**284**	**459**	**694**	**38**	**834^**	**2,478**

**For each year up to 25th year; ^Cumulative up to 25th year*

12.4. Other benefits

a) Reduction in cost of supply of MSEDCL resulting in reduction in cross-subsidy burden on industrial and commercial consumers to the tune of nearly **Rs 20,000 Cr over** the lifecycle of projects; Shall aid

reduction in tariffs/ avoided tariff hikes for a prolonged period and savings in GoMH subsidy for industries

a) Avoided cost of RPO compliance for MSEDCL since solar power from such projects shall aid in meeting RPO – **Benefit of nearly Rs 2,000 Cr over** the lifecycle of projects

b) Agriculture consumers: Day time reliable and quality power supply, and possibility of reducing the electricity tariffs paid by farmers

महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१५७/१०-अे,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

दिनांक:- १४ ऑक्टोबर, २०२४

संदर्भ: १) सचिव, कृषि व किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे दिनांक १४ जून, २०२२ आणि दिनांक २२ जून, २०२२ चे पत्र

२) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२२/प्र.क्र.३१३/ल-१, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२२

३) राज्यात योजना राज्यात राबविण्याच्या अनुषंगाने केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्यात झालेला सामंजस्य करार दिनांक ११ जुलै, २०२३

४) केंद्र शासनाचे अ.शा. पत्र दिनांक ०३ एप्रिल, २०२४

५) राज्यात ॲग्रिस्टॅक योजना राबविण्याच्या अनुषंगाने मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १५.०७.२०२४ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त, महसूल व वन विभागाचे पत्र क्र.संकिर्ण-२०२२/प्र.क्र.३१३/ल-१, दिनांक २१ ऑगस्ट, २०२४

६) जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.रा.भू.३/AgriStack/प्रस्ताव/पुणे, दिनांक २३ सप्टेंबर, २०२४

७) केंद्र शासनाच्या डिजीटल कृषि अभियान संदर्भातील मार्गदर्शक सूचना

८)कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र जा.क्र.कृषिआ/कृ.ग./ॲग्रीस्टॅक/२४५२४/२०२४, दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२४.

प्रस्तावना :

भारत एक कृषिप्रधान देश असून, देशाची अर्थव्यवस्था मुख्यत: कृषि क्षेत्रावर अवलंबून आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास कृषि क्षेत्राच्या विकासामुळेच शक्य होणार आहे. वाढत्या लोकसंख्येचा विचार करता अन्नधान्य उपलब्धता, शेती आणि शेती संलग्न व्यवसाय इ. जोपासणे, कृषि मालास साठवणूक सुविधा, योग्य बाजारपेठ, भाव तसेच कृषि प्रक्रिया उद्योगांना चालना देणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात कृषि क्षेत्राशी संबंधित लोकसंख्या ५५ टक्के आहे. कृषि क्षेत्राच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य शासनाद्वारे अनेक महत्त्वपूर्ण योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपलब्ध संसाधनांचा उचित विनियोग करुन योग्य व पात्र लाभार्थ्यांपर्यंत लाभ पोहचवून कृषि क्षेत्राचा अधिकाधिक विकास शक्य आहे.

केंद्र शासनाने ॲग्रिस्टॅक योजनेच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

ॲग्रिस्टॅक हे कृषि क्षेत्रात डेटा आणि डिजिटल सेवा वापरुन शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यत जलद गतीने व परिणामकारकरित्या पोहचण्यासाठी स्थापित केले जाणारे डिजिटल फाउंडेशन आहे. कृषि क्षेत्रासाठी सर्वसमावेशक डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करणे हा ॲग्रिस्टॅक उपक्रमाचा उद्देश आहे. या प्रकल्पामुळे माहिती आधारित योग्य निर्णय घेणे, गरजू शेतकऱ्यांना योग्य वेळी सेवा प्रदान करणे, कृषि उपक्रमांची कार्यक्षमता सुधारणे शक्य होईल. विविध शेतकरी आणि कृषि-केंद्रित योजनांची आखणी करणे व अंमलबजावणी करणे सुलभ होईल.

विविध योजनांतर्गत शेतकऱ्यांना लाभ देताना आधार प्रणालीचा वापर करुन लाभार्थींची ओळख पटविण्यात येते. तसेच महसूल विभागाने त्यांच्याकडील अधिकार अभिलेखाचे तसेच गाव नकाशांचे संगणकीकरणाचे काम पूर्ण केले आहे. सदर अभिलेखांपैकी अधिकार अभिलेख हे संगणकीय पद्धतीने अद्ययावत केले जात असल्याकारणाने तात्काळ उपलब्ध होऊ शकतात. याशिवाय महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग संस्थेने राज्यातील जमिनींचे भू संदर्भीकरण (जिओ रेफरन्सिंग) करुन दिले आहे. यामुळे शेत जमिनीची इत्यंभूत अद्ययावत माहिती डिजिटाईज स्वरुपात तात्काळ उपलब्ध होत आहे.

त्यामुळे राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री), शेतकऱ्यांच्या शेतातील हंगामी पिकांचा माहिती संच (क्रॉप सोन रजिस्ट्री) व शेतांचे भू संदर्भिकृत (जिओ रेफरन्स लँड पार्सल) यांचा माहिती संच तयार करण्यासाठी आवश्यक मूलभूत माहिती उपलब्ध आहे. याचा वापर करुन केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन ॲग्रिस्टॅक योजना राज्यात राबविणे शक्य आहे.

बीड जिल्ह्यात २०२३-२४ या वर्षात ॲग्रिस्टॅक अंतर्गत शेतकऱ्यांचा आधार जोडणी केलेला माहिती संच निर्मिती करण्याचा पथदर्शी कार्यक्रम राज्यात राबविण्यात आला आहे. बीड जिल्ह्यात संकलित शेतकरी माहिती संचाच्या आधारे जनसमर्थ योजनेच्या माध्यमातून राज्याचे मा. मुख्यमंत्री यांचे हस्ते प्रायोगिक स्वरुपात १५ ते ४५ मिनिटांत ६ शेतकऱ्यांना ऑनलाईन किसान क्रेडिट कार्ड (पीक कर्ज) उपलब्ध करुन देण्यात आले. बीड जिल्ह्यातील पथदर्शी कार्यक्रमातील या आशादायक व दूरगामी परिणाम करणाऱ्या अनुभवावरुन महाराष्ट्र शासनाने संपूर्ण महाराष्ट्रात कालबद्ध पद्धतीने ॲग्रिस्टॅक योजना अंमलबजावणी करण्याचे निश्चित केले आहे. यासाठी केंद्र शासनाचे मार्गदर्शक सूचनानुसार आवश्यक तांत्रिक बाबींची पूर्वतयारी जमाबंदी आयुक्त व कृषि आयुक्त स्तरावर करण्यात आली आहे.

त्यानुषंगाने कृषि आयुक्त कार्यालयाने संदर्भिय पत्र क्र. १० येथील दिनांक ०३.१०.२०२४ च्या पत्रान्वये ॲग्रिस्टॅक योजनेचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

उपरोक्त अनुसार केंद्र शासनाची ॲग्रिस्टॅक (Agristack) (Digital Public Infrastructure for Agriculture) योजना राज्यात राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय:

राज्यातील कृषि क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करुन शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने व परिणामकारकरित्या लाभ शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे याकरीता केंद्र शासनाची ॲग्रिस्टॅक (Agristack) (Digital Public Infrastructure for Agriculture) योजना राज्यात राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. ॲग्रिस्टॅक योजनेची उद्दिष्टे:-

२.१ राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री), शेतकऱ्यांच्या शेतातील हंगामी पिकांचा माहिती संच (क्रॉप सोन रजिस्ट्री) व शेतांचे भू संदर्भिकृत (जिओ रेफरन्स लँड पार्सल) यांचा माहिती संच एकत्रितरित्या तयार करणे व सातत्याने अद्ययावत करणे.

२.२ राज्यातील शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केंद्र-राज्य शासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांना सुलभ, पारदर्शक पद्धतीने तसेच वेळेवर उपलब्ध करणे.

२.३ शेतकऱ्यांना स्वस्त कर्ज, उच्च-गुणवत्तेची कृषि निविष्ठा, विपणन, स्थानिक आणि विशिष्ट तज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करुन देणे.

२.४ शेतकऱ्यांना बाजारपेठेपर्यंत अधिक माहितीपूर्ण आणि सोयीस्कर प्रवेश मिळवून देणे.

२.५ शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ जलदगतीने देण्यासाठी शेतकऱ्यांची ओळख पटवण्याची पारदर्शक व सोपी पद्धत विकसीत करणे तसेच प्रमाणिकरणाची सुलभ पद्धत विकसित करणे.

२.६ राज्यातील शेतकऱ्यांना अधिक चांगल्या प्रकारे सेवा देण्यासाठी कृषि व संलग्न विभाग यांच्यात विविध योजनांच्या अभिसरण प्रक्रियेत सुलभता आणणे.

२.७ उच्च-गुणवत्तेचा डेटा व ॲग्रि-टेकद्वारे कृषि उत्पादने आणि सेवांमध्ये नवकल्पना वाढविणे.

३. योजनेचे अपेक्षित फायदे:

३.१ पीएम किसान योजनेंतर्गत अनुदान प्राप्त करण्यासाठी आवश्यकतेच्या अटी पूर्ण करून लाभ प्राप्त करण्यामध्ये सुलभता येईल.

३.२ पीएम किसान योजनेंतर्गत पात्र सर्व लाभार्थी समाविष्ट करुन घेण्यास सहाय्य मिळेल.

३.३ शेतकऱ्यांना पिकासाठी कर्ज मिळवण्यासाठी किसान क्रेडिट कार्ड आणि कृषि इन्फ्रास्ट्रक्चर फंड व शेतीच्या विकासासाठी इतर कर्जे उपलब्ध करुन घेण्यात सुलभता राहील.

३.४ पिक विमा तसेच आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत शेतकऱ्यांचे देय नुकसान भरपाईसाठी शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करण्यात सुलभता येईल.

३.५ किमान आधारभूत किंमतीवर खरेदीमध्ये शेतकऱ्यांचे नोंदणीकरण ऑनलाईन पध्दतीने होऊ शकेल.

३.६ शेतकऱ्यांसाठी कृषि कर्ज, वित्त, निविष्ठा आणि इतर सेवा देणाऱ्या यंत्रणांना कृषि सेवा सहजपणे उपलब्ध करुन देण्यासाठी सुलभता येईल.

३.७ शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी, कृषि व संलग्न विभागांना शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री) च्या उपलब्ध आकडेवारीच्या आधारे योजनांचा लाभ वितरीत करण्यामध्ये सुलभता येईल आणि लाभार्थ्यांची वारंवार प्रमाणिकरणाची आवश्यकता राहणार नाही.

३.८ शेतकऱ्यांना वेळेवर कृषि विषयक सल्ले, विविध संस्थांकडून शेतकऱ्यांना संपर्क करण्याच्या संधीमध्ये वाढीसह नाविन्यपूर्ण कार्यक्रमांच्या विस्तार-प्रचारात सफलता प्राप्त होईल.

उपरोक्त बाबी लक्षात घेता ॲग्रिस्टॅक योजनेची राज्यात सुयोग्य अंमलबजावणी कार्यान्वित करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने भारत सरकार सोबत सामंजस्य करार (MoU) दिनांक ११ जुलै, २०२३ रोजी केला आहे.

४. ॲग्रिस्टॅक योजनेचे प्रमुख्य घटक:-

AgriStack योजनेअंतर्गत पुढीलप्रमाणे तीन पायाभूत माहिती संच निर्माण करण्यात येणार आहेत. सदर तीनही पायाभूत माहिती संच हे ॲग्रिस्टॅक योजनेसाठी आवश्यक इतर माहिती संच जसे बियाण्यांचा माहिती संच, कीटकनाशकांचा माहिती संच, मागणी बाबतचा माहिती संच, पुरवठ्याचा माहिती संच आदी कृषि विषयक धोरण आखणे व सबसिडी आधारीत योजना निर्मितीसाठी आवश्यक आहे.

अ) शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच (Farmers Registry).

ब) हंगामी पिकांचा माहिती संच (Crop Sown Registry)

क) भू संदर्भिकृत भूभाग असणारे गाव नकाशे यांचा माहिती संच (Geo- Referenced Land Parcel Cadastral Map)

५. ॲग्रिस्टॅक योजनेचे संनियंत्रण व अंमलबजावणी:

ॲग्रिस्टॅक योजनेच्या यशस्वी अंमलबजावणी, नियमित संनियंत्रण आणि आवश्यक प्रशासकीय आणि वित्तीय धोरण आखणीसाठी महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.३१३/ल-१, दिनांक ४ ऑक्टोबर २०२२ अन्वये संनियंत्रण समिती (Steering Committee) व अंमलबजावणी समितीचे (Implementing Committee) गठित करण्यात आली होती. उक्त शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे आणि पुढीलप्रमाणे सुधारणेसह सुकाणू समिती व अंमलबजावणी समिती गठित करण्यात येत आहेत.

५.१ सुकाणू समिती (Steering Committee) :

अ.क्र.	अधिकाऱ्याचे पदनाम	समितीतील पदनाम
१.	मा. मुख्य सचिव	अध्यक्ष
२.	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय	सदस्य
३.	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव वित्त विभाग, मंत्रालय	सदस्य
४.	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव नियोजन विभाग, मंत्रालय	सदस्य
५.	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय	सदस्य सचिव
६.	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय	सदस्य
७.	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय	सदस्य
८.	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई	सदस्य
९.	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (माहिती व तंत्रज्ञान), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय	सदस्य
१०.	प्रतिनिधी, कृषि व किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार.	सदस्य
११.	इतर सचिव / प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव आवश्यकतेनुसार.	निमंत्रित सदस्य

सुकाणू समितीची कार्यकक्षा:

१. सदर समितीस ॲग्रिस्टॅक योजनेच्या योग्य परिणामकारक अंमलबजावणी व यशस्वितेसाठी आवश्यक धोरण आखणीसाठी प्रशासकीय-आर्थिक बाबींसह सर्व प्रकारचे अधिकार असतील.

२. ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत निर्माण होणाऱ्या माहितीचा वापर करण्यासाठी कृषि विभागाशिवाय इतर विभागांना अथवा संस्थांना परवानगी देणे. तसेच माहितीच्या वापरासंदर्भात अंतिम अधिकार सुकाणू समितीस राहतील.

३. योजनेच्या अंमलबजावणीचा व कामकाजाचा आढावा घेणे व सनियंत्रण करणे.

४. सदर समितीची किमान त्रैमासिक बैठक घेणे.

५.२ अंमलबजावणी समिती (Implementing Committee):

उपरोक्त सुकाणू समितीने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी खालील प्रमाणे अंमलबजावणी समिती (Implementation Committee) गठीत करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे पदनाम	समितीतील पदनाम
१	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय	अध्यक्ष
२	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय	सदस्य
३	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय	सदस्य
४	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय	सदस्य
५	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई	सदस्य
६	जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.	सदस्य
७	संचालक (माहिती व तंत्रज्ञान), माहिती व तंत्रज्ञान विभाग.	सदस्य
८	आयुक्त (कृषि), कृषि व पदुम विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.	सदस्य
९	आयुक्त (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.	सदस्य
१०	सह सचिव (ल-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय	सदस्य सचिव

अंमलबजावणी समितीची कार्यकक्षा:

सुकाणू समितीकडून प्राप्त निर्देशानुसार ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत विविध माहिती संच निर्मिती व त्यांचा वापर करणे याबाबत अंमलबजावणी समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल:-

१. योजना अंमलबजावणीसाठी कार्यपद्धती निश्चित करणे.
२. क्षेत्रिय स्तरावर अंमलबजावणी मार्गदर्शन व संनियंत्रण करणे.
३. माहिती संच निर्मिती व माहिती संच वापर कक्ष गठन आणि कामकाज सनियंत्रण करणे.
४. माहिती संचाच्या विनियोगासाठी कार्यपद्धती निश्चित करणे.
५. सदर समितीची किमान द्विमासिक बैठक घेणे.

क्षेत्रिय स्तरावर ॲग्रिस्टॅक योजनेसाठी विविध माहिती संचांची निर्मिती करताना जिल्हा निहाय परिस्थितीनुसार नियोजन, प्रभावी अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी विभाग, जिल्हा व तालुका स्तरावर समितीचे गठन खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

५.३ विभागस्तरीय अंमलबजावणी समिती:

अ.क्र.	अधिकाऱ्याचे पदनाम	समितीतील पदनाम
१	विभागीय आयुक्त	अध्यक्ष (संबंधित महसूल विभाग)
२	जिल्हाधिकारी	सदस्य (संबंधित जिल्हा)

अ.क्र.	अधिकाऱ्याचे पदनाम	समितीतील पदनाम
३	मुख्य कार्यकारी अधिकारी	सदस्य
४	विभागीय कृषि सहसंचालक	सदस्य (संबंधित विभाग)
५	उप आयुक्त महसूल	सदस्य सचिव (संबंधित महसूल विभाग)

विभागस्तरीय अंमलबजावणी समितीची कार्यकक्षा:

१. विभागातील तीनही पायाभूत माहिती संच निर्मिती संदर्भातील अंमलबजावणीचे नियोजन करणे.

२. तीनही पायाभूत माहिती संच निर्मितीसाठी मनुष्यबळ, प्रशिक्षण, प्रचार प्रसिद्धी यांचे संनियंत्रण करणे.

३. विभागातील तीनही पायाभूत माहिती संच निर्मिती मोहिमेचा नियमित आढावा घेणे आणि संनियंत्रण करणे.

४. राज्य अंमलबजावणी समितीस विभागातील तीनही पायाभूत माहिती संच निर्मिती मोहिमेचे प्रगतीचे अहवाल सादर करणे.

५. सदर समितीची किमान एक मासिक बैठक घेणे.

५.४ जिल्हास्तरीय अंमलबजावणी समिती:

अ.क्र.	अधिकाऱ्याचे पदनाम	समितीतील पदनाम
१	जिल्हाधिकारी	अध्यक्ष
२	मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद	सदस्य
३	जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी	सदस्य
४	उप-विभागीय अधिकारी (सर्व)	सदस्य
५	डिस्ट्रिक्ट इन्फॉर्मेशन ऑफिसर,राष्ट्रीय सुचना केंद्र	सदस्य
६	जिल्हाधिकारी यांनी नामांकन केलेले इतर निमंत्रित	सदस्य
७	निवासी उपजिल्हाधिकारी	सदस्य सचिव

जिल्हास्तरीय अंमलबजावणी समितीची कार्यकक्षा:

१. जिल्ह्यातील तीनही पायाभूत माहिती संच निर्मिती संदर्भातील अंमलबजावणीचे नियोजन करणे.

२. तीनही पायाभूत माहिती संच निर्मितीसाठी मनुष्यबळ, प्रशिक्षण, प्रचार प्रसिद्धी यांचे संनियंत्रण करणे

३. जिल्ह्यातील तीनही पायाभूत माहिती संच निर्मिती मोहिमेचा नियमित आढावा आणि संनियंत्रण करणे.

४. राज्य अंमलबजावणी समितीस जिल्ह्यातील तीनही पायाभूत माहिती संच निर्मिती मोहिमेचे प्रगतीचे अहवाल सादर करणे.

५. सदर समितीची किमान एक मासिक बैठक घेणे.

५.५ तालुकास्तरीय अंमलबजावणी समिती :

अ.क्र.	अधिकाऱ्याचे पदनाम	समितीतील पदनाम
१	उपविभागीय अधिकारी	अध्यक्ष
२	गटविकास अधिकारी	सदस्य
३	तालुका कृषि अधिकारी	सदस्य
४	तहसिलदार	सदस्य सचिव
५	इतर निमंत्रित सदस्य	सदस्य

तालुकास्तरीय अंमलबजावणी समितीची कार्यकक्षा:

१. तालुक्यातील तीनही पायाभूत माहिती संच निर्मिती संदर्भातील अंमलबजावणीचे सविस्तर नियोजन करणे.
२. तीनही पायाभूत माहिती संच निर्मितीसाठी मनुष्यबळ नियुक्ती, प्रशिक्षण, प्रचार प्रसिद्धी करणे.
३. तालुक्यातील तीनही पायाभूत माहिती संच निर्मिती मोहिम अंमलबजावणीचा आढावा आणि संनियंत्रण करणे.
४. सदर समितीची किमान एक मासिक बैठक घेणे.

६. राज्य स्तरीय योजना व्यवस्थापन केंद्राअंतर्गत माहिती निर्मिती कक्ष (Data Creation Unit) व माहिती वापर कक्ष (Data Usage Unit) स्थापना:

राज्य स्तरीय योजना व्यवस्थापन केंद्राअंतर्गत ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत माहिती निर्मिती कक्ष (Data Creation Unit) व माहिती वापर कक्ष (Data Usage Unit) स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. माहिती निर्मिती कक्षाकडून माहिती संच निर्मिती व संचांचे अद्ययावतीकरणासाठी आवश्यक संगणक प्रणाली विकसन, व्यवस्थापन करण्याची कार्यवाही करण्यात येईल. तर माहिती वापर कक्षाकडून माहिती संचांच्या माध्यमातून शेतकरी केंद्रित सेवा सुविधा विकसित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

६.१ माहिती निर्मिती कक्ष (Data Creation Unit):

माहिती निर्मिती कक्ष हा जमाबंदी आयुक्त यांच्या अधिनस्त असेल व राज्य संचालक, जमाबंदी आयुक्त कार्यालय हे माहिती निर्मिती कक्षाचे नियंत्रक असतील. ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत माहिती निर्मिती कक्षासाठी पुढीलप्रमाणे आवश्यक मनुष्यबळ बाह्य स्त्रोतामार्फत कंत्राटी पध्दतीने तसेच आवश्यकतेनुसार बाह्यस्त्रोताद्वारे उपलब्ध न झाल्यास सामान्य प्रशासन विभागाच्या धोरणानुसार सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर कक्षाचे कामकाज कक्ष निर्मितीपासून तीन वर्षे चालू राहील.

अ.क्र.	पदनाम	स्तर	संख्या
१	प्रकल्प व्यवस्थापक	राज्य स्तर	१
२	वरिष्ठ प्रणाली विकासक	राज्य स्तर	१
३	डेटा विशेषज्ञ	राज्य स्तर	१
४	प्रचार प्रसिद्धी विशेषज्ञ	राज्य स्तर	१
५	विभागीय समन्वयक	सर्व विभाग	६
६	जिल्हा समन्वयक	३४ जिल्हे	३४

उक्त मनुष्यबळ नियुक्ती, त्याचे निकष, त्यासाठी आवश्यक मानधन, मनुष्यबळात आवश्यकतेनुसार वाढ व अनुषंगिक खर्च तसेच उपरोक्त मनुष्यबळाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या इत्यादीस सुकाणू समितीची मान्यता घेण्यात यावी. कृषि विभागाने सदर कक्षातील मनुष्यबळाच्या मानधनासाठी आवश्यक निधी केंद्र शासनाच्या PM-KISAN Administrative Fund/Digital Agriculture Mission मधून तीन वर्ष जमाबंदी आयुक्त यांना उपलब्ध करुन द्यावा. उपरोक्त मनुष्यबळाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या महसूल विभागाने स्वतंत्रपणे निश्चित कराव्यात.

६.२ माहिती वापर कक्ष (Data Usage Unit):

माहिती वापर कक्ष हा कृषि आयुक्त यांच्या अधिनस्त असेल व संचालक, (विस्तार व प्रशिक्षण) कृषि आयुक्त कार्यालय हे माहिती वापर कक्षाचे नियंत्रक असतील. ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत माहिती निर्मिती कक्षासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे आवश्यक मनुष्यबळ बाह्य स्त्रोतामार्फत कंत्राटी पध्दतीने तसेच आवश्यकतेनुसार बाह्यस्त्रोताद्वारे उपलब्ध न झाल्यास सामान्य प्रशासन विभागाच्या धोरणानुसार सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर कक्षाचे कामकाज कक्ष निर्मितीपासून तीन वर्षे चालू राहील.

अ.क्र.	पदनाम	स्तर	संख्या
१	वरिष्ठ प्रणाली विकासक	राज्य स्तर	१
२	कनिष्ठ प्रणाली विकासक	राज्य स्तर	१
३	डेटा विकासक	राज्य स्तर	१
४	डेटा विशेषज्ञ	राज्य स्तर	१
५	वरिष्ठ सल्लागार	राज्य स्तर	१
६	कनिष्ठ सल्लागार	राज्य स्तर	१
७	माहिती व्यवस्थापक	राज्य स्तर	१

उक्त मनुष्यबळ नियुक्ती, त्याचे निकष, त्यासाठी आवश्यक मानधन, मनुष्यबळात आवश्यकतेनुसार वाढ व अनुषंगिक खर्च तसेच उपरोक्त मनुष्यबळाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या इत्यादीस सुकाणू समितीची स्वतंत्रपणे मान्यता घेण्यात यावी. सदर कक्षातील मनुष्यबळाच्या

मानधनासाठी आवश्यक निधी केंद्र शासनाच्या PM-KISAN Administrative Fund/Digital Agriculture Mission मधून उपलब्ध करण्यात येईल. उपरोक्त मनुष्यबळाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या कृषि विभागाने स्वतंत्रपणे निश्चित कराव्यात.

७. शेतकरी माहिती संच (Farmer Registry):-

शेतकऱ्याचा माहिती संच तयार करण्यासाठी महसूल अधिकार अभिलेखातील शेतकऱ्याची आणि शेताची माहिती घेऊन त्यानुसार शेतकऱ्याचा आधार क्रमांक हा त्या माहितीशी जोडावयाचा आहे. या अंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांची नावे आणि ओळख आदि माहिती ही त्यांच्या शेतांच्या माहितीसह संकलित केली जाईल. यासाठी महसूल विभागाकडील अधिकार अभिलेखात नमूद शेतकऱ्यांची नावे व त्यांची शेती या डेटाबेसचा वापर करण्यात येईल. शेतकऱ्याची ओळख पटविणारा आधार क्रमांक हा त्याच्या मालकीच्या शेतांशी जोडून प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या शेतांसह एकत्रितरीत्या शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) देण्यात येईल. माहिती संच निर्मितीची प्रक्रिया ही महसूल विभाग, कृषि विभाग व ग्राम विकास विभागाकडील ग्रामस्तरीय कर्मचाऱ्यांकडून भारत सरकारने विकसित केलेल्या मोबाइल ॲपचा वापर करुन करण्यात येईल. प्रथम जास्तीत जास्त शेतकरी ओळख क्रमांक निर्मितीची कार्यवाही मोहीम स्वरुपात पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर शेतकरी ओळख क्रमांक मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना ग्राहकसेवा केंद्रे जसे व्हीएलई, महा ई सेवा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र इत्यादी द्वारे अर्ज करता येईल. सदर माहिती संच निर्मितीसाठी चार प्रमुख प्रक्रिया राबवावयच्या आहेत:-

i. शेतकऱ्यांच्या माहिती संचासाठी सॉफ्टवेअर प्रणाली (तलाठी व कृषि सहाय्यक /ग्रामसेवक यांचेसाठी मोबाईल ॲप्लीकेशन्स)
ii. शेतकऱ्याचा माहिती संच निर्मिती साठी काम करणाऱ्या कर्मचारी यांचे प्रशिक्षण.
iii. शेतकरी माहिती संच निर्मितीची क्षेत्रीय स्तरावरील माहिती गोळा व पडताळणी प्रक्रिया.
iv. माहिती संच निर्मिती नंतर त्याची देखभाल दुरुस्ती आणि अद्ययावतीकरण.

८. शेतकरी माहिती संच (Farmer Registry) निर्मिती कार्यपद्धती:

८.१ शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच तयार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने केंद्र सरकारला अधिकार अभिलेखांचा माहिती संच उपलब्ध करुन दिला असून, हा माहिती संच API द्वारे सातत्याने अद्ययावत करण्यात येईल. केंद्र शासनाने विकसित केलेल्या बकेटिंग सॉफ्टवेअर प्रणालीने प्रत्येक गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी या माहिती संचाच्या आधारे एकत्रित

केल्या आहेत. तसेच राज्यात कृषि विभागाच्या विविध योजना अंमलबजावणी करताना निर्माण करण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या माहिती संचांमधून शेतकऱ्यांचे उपलब्ध झालेले आधार व इतर माहिती जोडण्यात आली आहे. अशी प्रत्येक शेतकऱ्याची एकत्रिकृत माहिती याला त्या शेतकऱ्यांची फार्मर्स बकेट असे म्हणण्यात येते. केंद्र शासनाकडून प्राप्त गाव निहाय फार्मर्स बकेटचा डेटा हा शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच तयार करण्यासाठी माहितीचा मसुदा म्हणून वापरण्यात येईल.

८.२ वर नमूद केल्यानुसार फार्मर्स बकेटची माहिती क्षेत्रिय स्तरावरुन तलाठ्यामार्फत शेतकऱ्याची व त्याच्या शेतांची ओळख पटवून निश्चित केली जाईल. कृषि विभागाकडून शेतकऱ्याचा आधार जोडणी घेतली जाईल. त्यानंतर संबंधित शेतकऱ्यास शेतकरी ओळख क्रमांक (Farmer Id) देण्यात येईल. शेतकऱ्यांना ओळख क्रमांक देण्याचे (Farmer Id Creation) कामकाज मोहीम स्वरुपात राबविण्यात यावे. या मोहिमेसाठी संबंधित महसूल विभागाचे विभागीय आयुक्त हे त्यांच्या विभागाचे नोडल अधिकारी म्हणून कामकाज करतील व सर्व जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अंमलबजावणी अधिकारी असतील.

८.३ मोहिमेसाठी जिल्हाधिकारी यांच्या निर्देशाखाली सर्व तहसीलदार त्यांच्या तालुक्यातील गावांचे तालुका गावनिहाय पथक निर्माण करतील. प्रत्येक पथकामध्ये तलाठी आणि ग्रामसेवक/कृषि सहाय्यक असे दोन अधिकारी नियुक्त करण्यात येतील. तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये हे पथक तीन दिवस उपस्थित राहील या प्रमाणे तहसिलदार यांनी नियोजन करावे. सदर पथक हे तीन दिवस गावामध्ये निवासी राहून ॲग्रिस्टॅक योजनेची प्रचार व प्रसिद्धी करेल आणि जास्तीत जास्त शेतकरी ओळख क्रमांक (Farmer Id) तयार करण्याची कार्यवाही पूर्ण करेल.

८.४ मोहिमेच्या आदल्या सायंकाळी निवासी पथकाने संबंधित गावामध्ये शक्यतो मुक्कामी जावे, जेणे करुन गावात ग्राम सभा आयोजित करुन ॲग्रिस्टॅक योजनेची माहिती व त्याचे फायदे हे कृषि सहाय्यक / ग्राम सेवक यांच्या मदतीने तलाठी सर्व गावाला सांगतील.

८.५ पहिला व दुसरा दिवस मोहीम स्वरुपात गावातल्या सार्वजनिक ठिकाणी तलाठी व कृषि सहाय्यक / ग्राम सेवक यांनी कॅम्प निर्माण करावयचा आहे. सदर कॅम्प ॲग्रिस्टॅक योजनेचा असल्याबाबत आवश्यक जनजागृती कण्यासाठी विविध फलक सर्व लोकांना दिसतील अशा ठिकाणी लावणे, त्याबाबतची शेतकऱ्यांना माहिती देणे व त्यांना शेतकरी ओळख क्रमांक घेण्यास प्रवृत्त करणे हे कामकाज मोहिमेच्या पहिल्या व दुसऱ्या दिवशी तलाठी व कृषि सहाय्यक / ग्राम सेवक यांनी करावाचे आहे.

८.६ तिसऱ्या दिवशी उर्वरीत शेतकरी विशेषतः महिला शेतकरी यांना घरोघरी भेटी देऊन

त्यांचे शेतकरी ओळख क्रमांक (Farmer Id) तयार करणे व गावातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक तयार करणे यावर भर द्यावा.

८.७ शेतकरी ओळख क्रमांक (Farmer Id) तयार करण्यासाठी तलाठी व कृषि सहाय्यक / ग्राम सेवक यांना त्यांच्या मोबाईल वर मोबाईल ॲप प्रस्थापित करुन देण्यात येईल.

८.८ मोबाईल ॲप प्रस्थापित करणे व त्या संबंधित प्रशिक्षण ही कार्यवाही तहसिलदार यांनी ॲग्रिस्टॅक योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्राप्त मॅन्युअल नुसार पूर्ण करावयाची आहे.

८.९ तलाठी मोबाईल ॲप द्वारे उपस्थित शेतकऱ्याची ओळख पटवून त्याच्या शेत जमिनीची पडताळणी करतील. ही निश्चिती झाल्यानंतर कृषि सहाय्यक / ग्राम सेवक हे शेतकऱ्याची मोबाईल ॲप द्वारे फार्मर रजिस्ट्रीमध्ये आधार जोडणीसाठी सहमती घेऊन शेतकरी ओळख क्रमांक (Farmer Id) तयार करतील.

९. शेतकरी माहिती संच -प्रशिक्षण व प्रचार प्रसिद्धी : राज्यस्तरावर प्रति महसूल विभाग कृषि विभागाकडून १ व महसूल विभागाकडून १ अश्या एकूण १२ अधिकाऱ्यांची मास्टर ट्रेनर म्हणून निवड करण्यात यावी. तसेच मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळता प्रत्येक जिल्ह्यातून एक कृषि विभागाचा अधिकारी व एक महसूल विभागाचा अधिकारी यांची जिल्हास्तरीय मास्टर ट्रेनर म्हणून निवड करण्यात यावी. या सर्व मास्टर ट्रेनर्सना जमाबंदी आयुक्त व कृषि आयक्त यांचे कार्यालया मार्फत संयुक्तरित्या प्रशिक्षण दिले जाईल. हे मास्टर ट्रेनर्स विविध स्तरांवर आणि तालुका व गावात प्रत्यक्ष पथकांना व ट्रेनर्सना आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देतील तसेच आवश्यकतेनुसार समस्या निवारण करतील.

१० शेतकरी माहिती संच साठवणूक:

राज्य प्रकल्प व्यवस्थापन केंद्राअंतर्गत कामकाज करण्यासाठी या शासन निर्णयाद्वारे तयार केलेला माहिती निर्मिती कक्ष हा सदर माहिती संचाची साठवणूक करण्यासाठी योग्य ती क्लाऊड सेवा घेईल. तसेच माहिती संच निर्मिती, देखभाल व अद्यावतीकरण याबाबतची आवश्यक तजवीज करेल.

११ आर्थिक तजवीज: शेतकरी माहिती संच निर्मितीसाठी आवश्यक १००% निधी केंद्र शासनाच्या PM-KISAN Administrative Funds/Digital Agriculture Mission योजनेमधून करण्यात येणार आहे. सदर खर्च सुकाणू समितीच्या मान्यतेने करण्यात यावा.

१२. हंगामी पिकांचा माहिती संच (Seasonal Crops Registry):-

महाराष्ट्र राज्यात ई-पीक पाहणी ही संकल्पना २०२१ पासून यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे. ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत पीक पाहणी अधिक सुयोग्य व खात्रीशीर होण्याच्या दृष्टीने काही बदल सुचविण्यात आले आहेत. या बदलानंतर ॲग्रिस्टॅक योजनेतील दुसरा महत्त्वाचा माहिती संच म्हणजेच हंगामी पिकांचा माहिती संच तयार होणार आहे. यासाठी मूळ ई-पीक पाहणी मोबाईल ॲपमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार ई-पीक पाहणीस यापुढे "डिजिटल क्रॉप सर्व्हे" असे संबोधित करणेत येईल. डिजिटल क्रॉप सर्व्हे साठी वापरावयाच्या

शेतकऱ्यांच्या हातातील मोबाईल ॲपचे नाव आता "ई-पीक पाहणी डीसीएस" असे करण्यात येत आहे.

डिजिटल क्रॉप सर्व्हे अंतर्गत राज्यातील सर्व शेतांमध्ये पेरलेल्या पिकांचे खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामातील पीक पाहणी या ई-पीक पाहणी डीसीएस मोबाइल ॲपच्या माध्यमातून करण्यात येईल. ही डिजिटल स्वरुपातील पिक पाहणी प्रत्येक वर्षी खरीप, रब्बी, उन्हाळी हंगाम, तसेच संपूर्ण वर्ष पिके यासाठी महसूल विभागामार्फत करण्यात येईल.

ई-पीक पाहणी डीसीएस या मोबाईल ॲपचा प्रत्येक हंगामामध्ये शेतकऱ्याद्वारे प्रथम वापर करण्यात येईल (सुमारे दीड महिना कालावधी) त्यानंतर उर्वरित कालावधीमध्ये तलाठी (सुमारे एक महिना कालावधी) यांनी त्यांच्या गावात तालुक्याच्या तहसिलदारांकडून नेमलेल्या सहायकाच्या माध्यमातून उर्वरित पीक पाहणी पूर्ण करुन घ्यावयाची आहे. मोबाईल ॲपच्या माध्यमातून करावयाच्या पीक पाहणी साठी सहाय्यकाची नेमणूक ही तहसिलदारांनी ग्राम स्तरावरील कोतवाल, ग्राम रोजगार सेवक, आशा सेविका किंवा तत्सम मानधनावर कामकाज करणारे ग्रामस्तरीय मनुष्यबळ यांचेतून करावयाची आहे.

सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्यात महसुली गाव नमुना-१२ पिकांची नोंदवही मधील पीक पेरा नोंदी ई-पीकपाहणी या Mobile App मधून शेतकरी स्वतः करतात व उरलेली माहिती तलाठी Software प्रणालीद्वारे दाखल करतात. आता, भारत सरकारने या कामासाठी निश्चित केलेल्या डिजीटल क्रॉप सर्व्हे (DCS) या प्रणालीच्या मापदंडानुसार पीक पाहणीसाठी दर हंगामाला खालील प्रमाणे प्रक्रिया महसूल व वन विभागाने राबवायच्या आहेत.

१३. हंगामी पिकांचा माहिती संच (Seasonal Crops Registry) कार्यपद्धती:-

१३.१ पीक पाहणी नोंदविण्याची कार्यपद्धती:

१. शेतकरी दर हंगामाच्या सुरुवातीला त्यांना विहित करुन दिलेल्या कालावधी मध्ये (सुमारे ४५ दिवस) शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करुन दिलेल्या "ई-पीक पाहणी डीसीएस" मोबाईल ॲपद्वारे पीक पाहणी नोंद करण्यासाठी स्वतःचे नाव ॲपमध्ये नोंदवून नोंदणी पूर्ण करतील. शेतकऱ्यांनी एकदा मोबाईल ॲपवर स्वतःची नाव नोंदणी मोबाईल क्रमांकासह केल्यानंतर पुढील हंगामात नोंदणी करणे आवश्यक नाही.

२. शेतकरी स्तरावरील पीक पाहणीच्या कालावधी मध्ये पीक पाहणी करणेसाठी सहाय्यक यांनी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करणे तसेच शेतकऱ्यांना पीक पाहणी करण्याचे प्रशिक्षण देणे व प्रत्यक्ष पीक पाहणी करताना येणाऱ्या समस्या सोडविणे अशी कार्यवाही करावी.

३. प्रत्येक गावात शेतकऱ्याच्या अनेक शेत जमिनी असतात व त्या शेत जमिनीमध्ये शेतकरी विविध पिकांची लागवड करत असतो. शेतकऱ्याने त्याच्या एका शेतात लावलेली विविध पिके नोंदणी करतील त्या शेत जमिनीस "ओनर्स प्लॉट" म्हणण्यात येते. म्हणजेच शेतकऱ्याचे एका ठिकाणी असलेले जमिनीचे क्षेत्र म्हणजे त्या शेतकऱ्याची एक शेत जमीन याला "ओनर्स प्लॉट" म्हणण्यात येते.

४. हंगामी पिकांचा माहिती संच निर्मिती करताना करावयाची पीक पाहणी ही ओनर्स प्लॉट प्रमाणे करावयची आहे.

५. शेतकरी पीक पाहणी कालावधी संपल्यानंतर सहाय्यकाकडून गावातील उर्वरित पीक पाहणी पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी ही संबंधित तलाठ्याची असेल.

६. सहाय्यकांना ही पीक पाहणी नोंदविण्यासाठी ई-पीक पाहणी (DCS) मोबाईल ॲप उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर मोबाईल ॲप मध्ये शेतकऱ्यांनी न केलेली पीक पाहणी करण्यासाठी उर्वरित ओनर्स प्लॉट उपलब्ध असतील.

७. सहाय्यकाने प्रत्येक शेतजमिनीवर जाऊन पीक पाहणी करावयाची आहे.

१३.२ शेतकरी स्तरावरील पीक पाहणी:

१. शेतकरी ई-पीक पाहणी (DCS) मोबाईल ॲपद्वारे नाव नोंदणी करुन ई-पीक पाहणी नोंद करतील.

२. शेतकरी मोबाईल क्रमांक प्रविष्ट करुन आपली नोंदणी करतील.

३. शेतकऱ्यांनी नोंदणी केल्यानंतर त्यांनी आपला खाता क्रमांक निवडून व पुढे सर्व्हे क्रमांक / गट क्रमांक निवडून नोंदणी पूर्ण करावी.

४. ई-पीक पाहणी (DCS) मोबाईल ॲपमध्ये जिओ फेन्सिंग असल्यामुळे पीक पाहणी नोंदविण्याकरिता शेतकऱ्यांना आपल्या गटामध्ये जाणे अनिवार्य असेल.

५. शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी (DCS) मोबाईल ॲपद्वारे पीक नोंदविण्याकरिता पिकाचे फोटो घेऊन अपलोड करणे अनिवार्य आहे.

६. हंगामी चालू पड किंवा कायम पड नोंदविण्यासाठी सुद्धा गटाच्या हद्दीवर आधारित जिओ फेन्सिंग असल्यामुळे गटामध्ये जाऊन नोंद करणे अनिवार्य असेल.

१३.३ सहाय्यक नेमणूक करण्यासाठी तहसिलदार स्तरावरील कार्यपद्धत्ती:

१. तहसिलदार प्रत्येक गावासाठी कोतवाल, ग्राम रोजगार सेवक, आशा सेविका व ग्रामस्तरीय मानधनावर कार्यरत इतर विभागांचे कर्मचारी यामधून एका सहाय्यकाची नियुक्ती करतील.

२. जास्तीत जास्त १५०० ओनर्स प्लॉट करिता एक सहाय्यक या प्रमाणे सहाय्यकाची नियुक्ती करण्यात येईल.

३. एक गाव किंवा अनेक गावे एकत्र करुन जास्तीत जास्त १५०० ओनर्स प्लॉट संख्ये पर्यंत पीक पाहणीसाठी सहाय्य करणे व उर्वरित पीक पाहणी नोंदविणे हे कामकाज एका सहाय्यकाला देता येईल.

४. कमी ओनर्स प्लॉट असणाऱ्या गावांचे एकत्रीकरण करुन २ किंवा त्यापेक्षा जास्त गावे एका सहाय्यकास नेमून देण्यात येतील.

५. ज्या गावांमध्ये १५०० पेक्षा जास्त ओनर्स प्लॉट आहेत त्या गावांमध्ये १ पेक्षा अधिक सहाय्यकांची नेमणूक करता येईल.

६. कोणत्याही परिस्थितीमध्ये एका सहाय्यकाकडे १५०० ओनर्स प्लॉट पेक्षा जास्त ओनर्स प्लॉटचे कामकाज देता येणार नाही.

७. सहाय्यक नेमणूक केल्यानंतर सहाय्यक म्हणून काम करण्यासाठी संबंधित कर्मचारी डिजिटल क्रॉप सर्व्हे (DCS) मोबाईल ॲप मधून नोंदणी करतील.

८. सहाय्यक नाव नोंदणीस तलाठी हे त्यांचे वेब पोर्टल मधून मंजुरी देतील व त्या नंतरच सहाय्यक मोबाईल ॲप द्वारे पीक पाहणी नोंदवू शकतील.

१३.४ सहाय्यकाची जबाबदारी:

१. सहाय्यक हा शेतकरी स्तरावरील पीक पाहणी कालावधीमध्ये शेतकऱ्यांना पीक पाहणीसाठी मदत करेल, त्यांना येणाऱ्या अडचणी सोडवेल.

२. शेतकरी स्तरावरुन किमान ८० % पीक पाहणी पूर्ण होईल याची खात्री करेल.

३. शेतकरी स्तरावरील पीक पाहणी कालावधी संपल्यावर उर्वरित खातेदारांची पीक पाहणी, ई-पीक पाहणी डीसीएस मोबाईल ॲप मधून त्यांचे लॉगीन ने पूर्ण करणे इत्यादी जबाबदाऱ्या पार पाडेल.

४. शेतकरी स्तरावरुन नोंदवण्यात आलेल्या पीक नोंदीपैकी १००% पडताळणी सहाय्यक स्तरावरुन करण्यात येईल.

५. सहाय्यक स्तरावरुन नोंदविण्यात आलेल्या नोंदीची १००% पडताळणी तलाठी यांचेमार्फत करण्यात येईल. त्यानंतर ई-पीक पाहणी गांव नमुना-१२ वर प्रतिबिंबित करण्यात येईल.

६. शेतकरी स्तरावरील नोंद केलेली पीक पाहणी ४८ तासांपर्यंत मोबाईल ॲपमध्ये दुरुस्त अथवा नष्ट करु शकतील.

७. शेतकरी स्तरावरुन गाव नमुना-१२ वर प्रतिबिंबित करण्यात आलेल्या ई-पीक पाहणी मध्ये आवश्यक असल्यास तलाठी दुरुस्ती अथवा पीक नोंद नष्ट करतील. तलाठी यांनी नष्ट केलेली ई-पीक पाहणी सहायक स्तरावरुन पुनः ई-पीक पाहणी नोंद करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

८. सहायक स्तरावरून नोंद करण्यात आलेली ई-पीक पाहणी तलाठी स्तरावरून नष्ट केल्यास पुनः सहायकांना मोबाईल ॲप द्वारे ऑनलाईन पीक नोंदणीसाठी उपलब्ध होईल.

९. मंडळ अधिकारी मोबाईल ॲपद्वारे व्हेरीफायर म्हणून लॉगिन करतील. तलाठी यांनी दोनदा नाकारलेल्या सर्व पीक पाहणीच्या नोंदीची पडताळणी करुन मोबाईल ॲप द्वारे नोंदी करतील.

१३.५ सहाय्यक मानधन:

१. सहाय्यक यांना ओनर्स प्लॉट निहाय हंगाम निहाय प्रति ओनर्स प्लॉट रु.५/- एवढे मानधन देण्यात येईल (गावातील किमान ६०% पीकपाहणी शेतकऱ्यांकडून झाली असल्यास हे मानधन अदा करण्यात येईल). सहाय्यक यांचे मानधन हे तहसिलदार स्तरावरुन सहाय्यक यांनी मोबाईल ॲप मध्ये नोंदणी करते वेळी दिलेल्या बँक खात्याच्या माहिती नुसार त्यांच्या बँक खात्यावर ऑनलाईन पद्धतीने हंगाम संपल्यावर जमा करण्यात येईल.

१३.६ महाराष्ट्र राज्यामध्ये दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजीच्या ओनर्स प्लॉटच्या संख्येनुसार "**परिशिष्ट-अ**" प्रमाणे तिन्ही हंगामात मिळून रु.८१,८३,९६,२५०/- (अक्षरी रुपये एक्याऐंशी कोटी त्र्याऐंशी लाख शह्याण्णव हजार दोनशे पन्नास) इतका खर्च दरवर्षी अपेक्षित आहे. सदर खर्चाच्या ६० टक्के निधी केंद्र शासन डिजिटल ॲग्रिकल्चर मिशन योजनेतून उपलब्ध करुन देणार आहे. उर्वरीत ४० टक्के हिस्सा राज्य शासनाचा राहील. सदरचा निधी कृषि विभागाने जमाबंदी आयुक्त यांना दरवर्षी उपलब्ध करुन द्यावा. तसेच, प्रशिक्षण, प्रचार-प्रसिद्धी, कार्यालयीन खर्च, संगणक प्रणाली विकसन व अनुषंगिक खर्च आणि भविष्यात ओनर्स प्लॉटच्या संख्येत वाढीमुळे होणारी खर्चात वाढ इत्यादी खर्चास मान्यता देण्याचे अधिकार सुकाणू समितीस राहील.

१४. भूसंदर्भाकीत भूभाग असणारे गाव नकाशे (Geo- Referenced Land Parcel Cadastral Map) यांचा माहिती संचः-

महाराष्ट्र राज्यामध्ये भूसंदर्भाकीत भूभाग असणारे गाव नकाशे हे सर्वे क्रमांकांच्या माहितीसह उपलब्ध आहेत. सदर भूसंदर्भाकीत गाव नकाशे सद्यस्थितीत पिकपहाणीसाठी वापरण्यात येतात. 'ई मोजणी २.०' या नवीन मोजणीच्या Software प्रणालीचा वापर करुन जे भूभाग नव्याने मोजण्यात येतील त्यांचे भूसंदर्भ देखील या गाव नकाशांमध्ये समाविष्ट करण्याचे कामकाज महसूल व वन विभागाने करावे. यासाठी वेगळ्या खर्चाची आवश्यकता नाही.

१५. सदर योजनेंतर्गत Data Creation च्या अनुषंगाने आवश्यक त्या सविस्तर मार्गदर्शक सूचना महसूल व वन विभागाने निर्गमित कराव्यात. तसेच Data Usage च्या अनुषंगाने आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासन मान्यतेने निर्गमित कराव्यात.

१६. शेतकरी माहिती संच, माहिती निर्मिती कक्ष व माहिती वापर कक्ष यासाठी आवश्यक मनुष्यबळ व त्यांचे मानधन, कार्यालयीन खर्च, प्रशिक्षण, प्रचार-प्रसिद्धी, संगणक प्रणाली विकसन, क्लाऊड सेवा, योजना मोहिम स्वरुपात राबविणे इत्यादी बाबींसाठी आवश्यक निधी सुकाणू समितीच्या मान्यतेने निश्चित करण्यात येईल. यासाठी आवश्यक निधी केंद्र शासनाच्या

PM-KISAN योजनेच्या Administrative Fund मधून जमाबंदी आयुक्त व आयुक्त, कृषि यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

१७. ॲग्रिस्टॅक (डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर फॉर ॲग्रीकल्चर) या योजनेचे महत्व व उपयुक्तता लक्षात घेऊन उपरोक्त योजना राज्यात निश्चित कालबद्ध पद्धतीने राबविण्यासाठी आणि जिल्ह्यातील विविध विभागातील अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

१८. ॲग्रिस्टॅक योजनेसंदर्भात केंद्र शासनाकडून वेळोवेळी प्राप्त निर्देश, मार्गदर्शक सूचना इत्यादीच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत महसूल/कृषि विभाग यांच्या स्तरावरुन क्षेत्रिय कार्यालयांना कार्यवाही करण्याचे निर्देश द्यावेत.

१९. ॲग्रिस्टॅक योजनेसाठी कृषि विभाग हा नोडल विभाग असेल. तर जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे हे सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य नोडल अधिकारी असतील.

२०. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४९५/२०२४/कार्यासन १४३१, दिनांक ०७.१०.२०२४ अन्वये व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३६५/२०२४/व्यय-१, दिनांक ०७.१०.२०२४ अन्वये प्राप्त अभिप्रायांनुसार तसेच मा.मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

२१. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२४१०१४०८५९४०८००१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUJATA MANOJ SAUNIK

Digitally signed by SUJATA MANOJ SAUNIK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=04f6ff0d1ef522f4e19358cfac66e30d146fa47249c32a356455a756d05ec1a9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F49173DCDA3F795FF41A69777F5A6C2DED24F621CD434ABBB169565D1ABDAA1F, cn=SUJATA MANOJ SAUNIK
Date: 2024.10.14 13:50:59 +05'30'

(सुजाता सौनिक)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव
५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव

६. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
७. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
८. मा. विरोधीपक्षनेता, विधान परिषद/विधानसभा, विधानमंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. सर्व सन्माननीय विधानपरिषद/विधानसभा सदस्य
१०. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक
११. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. संचालक, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, महाराष्ट्र, मुंबई
१३. संचालक लेखा व कोषागारे, मुंबई
१४. सर्व विभागीय आयुक्त
१५. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे
१६. जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७. अधिदान व लेखा अधिकारी, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई
१८. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१९. महालेखापाल (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई /नागपूर
२०. सर्व जिल्हाधिकारी
२१. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी
२२. संचालक (सर्व), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२३. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२४. सर्व विभागीय कृषि सह संचालक, महाराष्ट्र राज्य
२५. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
२६. सर्व तहसिलदार
२७. उप सचिव (सर्व), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
२८. अवर सचिव / कक्ष अधिकारी (२-अे, ११-अे, १४-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
२९. निवडनस्ती -१० अे.

******

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१५७/१०-अे, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ सोबतचे परिशिष्ट

परिशिष्ट-अ

एकूण गावांची संख्या	एकूण ओनर्स प्लॉट संख्या	खरीप	रब्बी	उन्हाळी	मानधन
		रु. ५ प्रमाणे मानधन (x ५)	रु. ५ प्रमाणे मानधन (x ५)	रु. ५ प्रमाणे मानधन (x ५)	एकूण (x १५)
११,११५	२५०	१,३८,९३,७५०	१,३८,९३,७५०	१,३८,९३,७५०	४,१६,७१,२५०
१०,४११	५००	२,६०,२७,५००	२,६०,२७,५००	२,६०,२७,५००	७,८०,८२,५००
१०,४५८	१,०००	५,२२,९०,०००	५,२२,९०,०००	५,२२,९०,०००	१५,६८,७०,०००
४,७८४	१,५००	३,५८,८०,०००	३,५८,८०,०००	३,५८,८०,०००	१०,७६,४०,०००
४,८२०	३,०००	७,२३,००,०००	७,२३,००,०००	७,२३,००,०००	२१,६९,००,०००
१,३९७	४,५००	३,१४,३२,५००	३,१४,३२,५००	३,१४,३२,५००	९,४२,९७,५००
५४८	६,०००	१,६४,४०,०००	१,६४,४०,०००	१,६४,४०,०००	४,९३,२०,०००
२४४	७,५००	९१,५०,०००	९१,५०,०००	९१,५०,०००	२,७४,५०,०००
१२३	९,०००	५५,३५,०००	५५,३५,०००	५५,३५,०००	१,६६,०५,०००
१९७	१०,०००	९८,५०,०००	९८,५०,०००	९८,५०,०००	२,९५,५०,०००
		२७,२७,९८,७५०	**२७,२७,९८,७५०**	**२७,२७,९८,७५०**	**८१,८३,९६,२५०**
				Central Govt. ६०%	**४९,१०,३७,७५०**
				State Govt. ४० %	**३२,७३,५८,५००**

******

महाराष्ट्र राज्याची विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाची यादी.

महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक- संकीर्ण-२०२४/प्र.क्र.३०८/मावक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०९ जानेवारी, २०२५.

संदर्भ : १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन पत्र क्र.संकीर्ण-२००८/यादी/प्र.क्र.५५३/मावक-५, दि.२६ सप्टेंबर २००८

२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सीबीसी-१०/२०१०/प्र.क्र.१०४/मावक-५, दि.१९ जुलै २०११

३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन पत्र क्र.सीबीसी-१०/२०१२/प्र.क्र.१९४/मावक, दि.०१ सप्टेंबर २०१२

४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन पत्र क्र.सीबीसी-१०/२०१२/प्र.क्र.३१७/मावक, दि.१८ ऑक्टोबर २०१२

५) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन पत्र क्र.सीबीसी-१०/२०१२/प्र.क्र.३८/मावक, दि.०६ मार्च २०१३

६) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सीबीसी-१०/२००८/प्र.क्र.५९७/मावक, दि.१८ ऑक्टोबर २०१३

७) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सीबीसी-१०/२००८/प्र.क्र.५९७ सुधारित/मावक, दि.३० जानेवारी २०१४

८) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सीबीसी-१०/२०१४/प्र.क्र.०९/मावक, दि.०१ मार्च २०१४

९) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/मावक, दि.१५ जुलै २०१४

१०) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सीबीसी-१०/२०१४/प्र.क्र.८८/मावक, दि.०४ सप्टेंबर २०१४

११) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र.सीबीसी-१०/२००८/प्र.क्र.५९७/मावक, दि.११ सप्टेंबर २०१४

१२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन शुद्धीपत्र क्र.विपताप्र/२०१५/प्र.क्र.६२/मावक, दि.०७ जुलै २०१५

१३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र.सीबीसी-१०/२०१७/प्र.क्र.८७/मावक, दि.३० डिसेंबर २०१७

१४) विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, शासन निर्णय क्र.सीबीसी-२०१९/प्र.क्र.७२/मावक, दि.०४ जून २०१९

१५) विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, शासन निर्णय क्र.सीबीसी-२०१९/प्र.क्र.७२/मावक, दि.१३ जून २०१९

१६) विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र.सीबीसी-२०१९/प्र.क्र.७२/मावक, दि.२८ जून २०१९

१७) इतर मागासवर्ग सामाजकि शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, शासन निर्णय क्र.बैठक-२०१८/प्र.क्र.४७/मावक, दि.०१ ऑगस्ट २०१९

१८) इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्र.आयोग-२०२४/प्र.क्र.६०/मावक, दि.०६ ऑगस्ट २०२४ (१)

१९) इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्र.आयोग-२०२४/प्र.क्र.६०/मावक, दि.०६ ऑगस्ट २०२४ (२)

२०) इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्र.आयोग-२०२४/प्र.क्र.२३२/मावक, दि.२४ सप्टेंबर २०२४

शासन परिपत्रक :-

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गाची अद्ययावत यादी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने संदर्भ क्रमांक-१, दि.२६ सप्टेंबर २००८ च्या शासन पत्रान्वये प्रसिद्ध केली आहे.

२. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील जाती जमाती संदर्भातील नियमन **इतर मागास बहुजन कल्याण** विभागामार्फत करण्यात येते. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गाचे जाती प्रमाणपत्र देणाऱ्या व त्यांची पडताळणी करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यांना तसेच मागासवर्गीयांचे लाभ लागू करताना सदरहू यादीचा उपयोग व्हावा याकरीता सुलभ संदर्भासाठी एकत्रित संकलन स्वरूपाची यादी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

३. सदर यादी ही संकलन स्वरूपाची असून, मागासवर्गीय जाती जमातीच्या निश्चितीसाठी तसेच त्या त्या मागासप्रवर्गाचे लाभ लागू करताना, सदर जाती जमातींचा ज्या शासन निर्णय वा आदेशान्वये समावेश केलेला आहे ते शासन निर्णय व आदेश ग्राह्य धरण्यात यावेत.

४. सदरहू शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून, त्याचा संकेताक २०२५०१०९११२९०५५६३४ असा आहे. सदर शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAVINDRA RAMDAS PETKAR

Digitally signed by RAVINDRA RAMDAS PETKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=02221e63deda18472966f6ceba0e52b81716756b206278e1f5bd437fe438c944, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=93D05A1F2A6CEAD3ED9E358A4D06E909B2A25FE9A918A443E6204CD5D72B0ED9, cn=RAVINDRA RAMDAS PETKAR
Date: 2025.01.09 11:30:26 +05'30'

(र. रा. पेटकर)
उप सचिव ,महाराष्ट्र शासन

सहपत्र:- वरीलप्रमाणे

प्रत:-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. सभापती, विधान परिषद यांचे खासगी सचिव.
३. मा. अध्यक्ष, विभानसभा यांचे खासगी सचिव.

<u>शासन परिपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांक: संकीर्ण-२०२४/प.क्र.३०८/मावक, दि.०९.०१.२०२५ सोबतचे सहपत्र</u>

विमुक्त जाती -अ (V.J.-A)- आरक्षण (३ %)

अ.क्र	जाती	तत्सम जाती
१	बेरड	१) अ) ****, ब) नाईकवाडी, क) तलवार, ड)वाल्मिकी
२	बेस्तर	२) संचलू वड्डार
३	भामटा	३) अ) भामटी, ब)गिरणी वड्डार ,क) कामाटी, ड)पाथरुट, इ) टकारी (मुस्लिम धर्मीयांसह), फ) उचले, ग)घंटीचोर
४	कैकाडी (मुंबई, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, नाशिक, धुळे, जळगाव, पुणे, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बीड, परभणी, धाराशीव (उस्मानाबाद), नांदेड जिल्हे व चंद्रपूर जिल्ह्यातील राजूरा तालुका यात)	४) अ) धोंतले , ब) कोरवा,क) माकडवाले किंवा कोंचीकोरवा, ड) पामलोर, इ) कोरवी
५	कंजारभाट	५) अ) छारा, ब) कंजार , क) नात
६	कटाबू	-
७	बंजारा	७) अ) गोर बंजारा, ब) लंबाडा/लंबारा, क) लंभाणी, ड)चरण बंजारा, इ) लभाण, फ) मथुरा लभाण, ग)कचकीवाले बंजारा, ह)लमान बंजारा, इ) लमाण/लमाणी, ज) लबान, क)******, ल) धाली/धालीया, ग) धाडी/धारी, न) सिंगारी, व) नावी बंजारा, प) जोगी बंजारा , क्यु) *****, र)****, स)बंजारी
८	*****	पाल पारधी
९	राज पारधी	अ)*****, ब) गाव पारधी , क) हरण शिकारी, ड) ****
१०	राजपूत भामटा	अ) परदेशी भामटा, ब) परदेशी भामटी
११	रामोशी	-
१२	वडार	अ) गाडी वड्डर, ब) जाती वड्डर , क) माती वड्डर, ड)पाथरवट, इ) संगतराश /दगडफोडू, ई) वड्डर
१३	वाघरी	अ)सलात, ब) सलात वाघरी
१४	छप्परबंद (मुस्लीम धर्मीयासह)	

भटक्या जमाती- ब (N.T.-B)- आरक्षण (२.५ %)

अ.क्र	जाती	तत्सम जाती
१	गोसावी	१) बावा, २) बैरागी, ३) भारती , ४) गिरी गोसावी, ५)भारती गोसावी ६) सरस्वती पर्वत, ७) सागर, ८)बान किंवा वान, ९) तीर्थ आश्रम, १०) अरण्य घरभारी, ११) संन्यासी, १२) नाथपंथी गोसावी, १३)पुरी
२	बेलदार	ओड, मुस्लीम बेलदार, कापेवार, मुन्नर कापेवार, मुन्नर कापु, तेलंगा, तेलंगी, पेंटरेड्डी, बुकेकरी, मुस्लीम राज, मुसलमान राज, मुस्लीम मेमार, मेमार, मुस्लीम गवंडी, कुमावत
३	भराडी	अ) बाळ संतोशी, ब) किंगरीवाले, क) नाथबावा ड)नाथ जोगी, गारपगारी इ) नाथपंथी डवरी गोसावी ई) नाथ, जोगी, नाथपंथी उ) डवरी
४	भुते	भोपे
५	**	-----
६	चित्रकथी	हरदास (मुस्लीम धर्मीय वगळून)
७	गारूडी	सापगारुडी (मुस्लीम धर्मियांसह)
८	लोहार	घिसाडी, घिसाडी लोहार किंवा गाडी लोहार किंवा चितोडी लोहार, रजपूत लोहार, पांचाळ लोहार, खाती, खातवाढी, चितारी / जिनगर (सोमवंशीय आर्य क्षत्रिय, सोमवंशी, आर्य क्षत्रिय हे जिनगर आहेत असे समजण्यात यावे), चितोडीया-लोहार
९	गोल्ला	गोल्लेवार, गोलेर, गोलकर
१०	गोंधळी	-----
११	गोपाळ	अ) गोपाल भोरपी ब) खेळकरी
१२	हेळवे	१२) हिलव
१३	जोशी	अ) बुडबुडकी, ब) डमरुवाले, क) कुडमुडे, ड) मेंढगी, इ) सरोदे, सरोदी, फ) सहदेव जोशी, म) सरवदे, ह)सरोदा
१४	काशी कापडी	-----
१५	कोल्हाटी	डोंबारी
१६	मैराळ	अ) दांगट, ब) वीर
१७	मसनजोगी	१) सुदगडसिध्द, २) मपनजोशी, ३) शारदाकार /शार्दाकार/शारदाकाळ/बालासंतु

१८	नंदीवाले	तिरमल
१९	पांगूळ	----
२०	रावळ	राऊळ किंवा रावळयोगी
२१	सिक्कलगर	कटारी, सेक्क्लगर (मुस्लीम धर्मिय), शिख-शिकलीगार, शिख-शिकलीकर, कातारी शिकलगार, मुस्लिम शिकलगार, शिकलीगार, शिकलीगर, शिकलगार, शिकीलगर, शिकलकर, शिकलीकर, शिकलकरी, सिकलकर, सिकलीकर, सिकीलगर, सिकीलकर, सिकलीघर, सिक्कलकर, सिकलीगर, सिकलगर, सिक्कलीगर, सायकलगर, सैकलकर, सैकलगर, कातारी-शिकलकर (शिकलीकरी) (हिंदू धर्मियांसह)
२२	वगळले	----
२३	वैदू	----
२४	वासुदेव	----
२५	भोई	१) झिंगा भोई २) परदेशी भोई ३) राजभोई ४) भोई ५)कहार ६)गोडिया कहार ७) धुरिया कहार ८)किरात / किराड ९) मछुआ १०) मांझी ११) जातिया १२)केवट, केवट-तागवाली / केवट-तागवाले / तागवाले / तागवाली / तागवाला १३) ढीवर १४) धीवर १५) धीमर १६)पालेवार १७) मछेंद्र १८) नावाडी (“लिंगायत आंबी” हे नावाडी जातीचे असल्यामुळे नावाडी जातीचे दाखले त्यांना देण्यात यावेत.), भोई नावाडी, तारु-नावाडी १९) मल्हार २०) मल्हाव २१) बोई २२)गाढव भोई २३) खाडी भोई २४) खारे भोई २५)ढेवरा २६) भनारा, भनारी, भनारे, भनार २७) निषाद, मल्ला, मल्लाह, नावीक २८) ओडा, ओडेवार, ओडेलू २९) बेस्तार, बेस्ता, बेस्ती, बेस्तालु,
२६	बहुरूपी	अ) बोहरशी, ब) बहुरुपिया, क) भोरपी, ड) रायरंध्र, इ) अय्यार व अय्यारी
२७	वगळले	-
२८	ओतारी	अ) ओतनकर, ब) ओतकर, क) वतारी, ड) ओझारी इ) वतकर, वतकरी, वतनकर, वतोकर, ओतकरी, ओतोकार इ) वतोकार

३१	मरीआईवाले, कडकलक्ष्मीवाले, मरगम्मावाले	----
३२	गिहरा / गहरा	----
३३	गुसाई / गोसाई	----
३४	मुस्लीम मदारी, गारुडी, सापवाले व जादूगर	----
३५	भारतीय इराणी	----
३६	गवळी, मुस्लीम गवळी, गवलान, ग्वालवंश, गोपाल-गवळी, गवळी-गोपाल	----
३७	दरवेशी, वाघवाले-शाह (मुस्लीम धर्मीय), अस्वलवाले	----
३८	बागडी	----

भटक्या जमाती -क (N.T.-C)- आरक्षण (३.५ %)

अ.क्र	जाती	तत्सम जाती
२९	धनगर	१) अहिर, धनगर अहिर २) डांगे ३) गटरी ४) हंडे ५) तेलवर ६)हटकर ७) हाटकर ८) शेगर, सगर, सेगर ९)खुटेकर १०) तेलंगी ११) तेल्लारी १२) कोकणी - धनगर १३) कानडे १४) व-हाडे धनगर १५) झाडे १६) झेंडे १७) कुरमार १८) माहुरे १९) लाडसे २०)सनगर २१) धनवर २२) गडारिया २३) गड्री २४)गढरी २५) डंगेधनगर व डोंगरी धनगर २६) गडरिया / गडारिया २७) ठेलारी

भटक्या जमाती- ड (N.T.-D)- आरक्षण (२ %)

अ.क्र	जाती	तत्सम जाती
३०	वंजारी	वंजार, वंजारा, लाड वंजारी

इतर मागास वर्ग (O.B.C.) (आरक्षण-१९%)

अ.क्र	जाती	अ.क्र	जाती
१	अलितकार	३०	ढोली, हश्मी /डफली
२	वगळले	३१	वगळले
३	वगळले	३२	वगळले
४	बडीआ	३३	वगळले
५	बजानिआ	३४	वगळले
६	बाजीगर	३५	गंधारप
७	बुट्टाल	३६	गुजराथ बोरी
८	भांड, छप्परभांड, मुस्लीम भांड	३७	वगळले
९	भवैया किंवा तारगल	३८	वगळले
१०	भाविण	३९	गढवी
११	भिस्ती किंवा पखाली, सक्का	४०	वगळले
१२	वगळले	४१	वगळले
१३	बारी किंवा बारई	४२	गोचाकी
१४	बेरीया	४३	गुरव, लिंगायत गुरव
१५	बेसदेवा	४४	वगळले,
१६	भडभुंजा, भूजवा, भूंजवा, भूर्जी, भरडभूंजा, भूरंजी, भूंज	४५	गवंडी, गुर्जर-कडीया
१७	भांटा	४६	हलेपैक
१८	भट, भाट	४७	वगळले
१९	चमथा	४८	वगळले
२०	चांदलगडा	४९	जगीयासी
२१	चरण किंवा गढवी	५०	जजाक
२२	चारोडी	५१	जतिया
२३	चिप्पा, छिपा	५२	जातिगर
२४	दास किंवा दांगडीदास	५३	जव्हेरी, परजीया सोनी
२५	दावगर	५४	वगळले
२६	देपला	५५	जोगीण
२७	देवळी	५६	जोहारी
२८	देवदिग, देवाडिगा, शेरीगार, मोईली	५७	जुलाहा, अन्सारी
२९	वगळले	५८	जंगम, मालाजंगम (विरभद्र), लिंगायत जंगम

५९	वगळले, चितारी - जिनगर	८७	कासार (पोटजाती- कंचार, कचारी)
६०	जाडी	८८	लाभा
६१	वगळले	८९	लडीया, लढीया, लरिया
६२	कम्मी	९०	लडाफ, लइडाफ (नद्दाफ), मन्सुरी
६३	कापडी	९१	लखेरीया
६४	वगळले	९२	वगळले, हडाड/मिस्त्री (लुहार, लुवार)
६५	खाटी	९३	वगळले
६६	वगळले	९४	मानभाव, महानुभाव भोपी, मानभाव भोपी
६७	वगळले	९५	वगळले
६८	वगळले	९६	मारवार बोरी
६९	कोंगाडी	९७	मे
७०	कोर्चर	९८	मिना
७१	वगळले	९९	महली
७२	कचोरा	१००	मेदार
७३	कादेरा	१०१	म्हाली
७४	वगळले	१०२	मिठा
७५	कसबी	१०३	वगळले
७६	वगळले	१०४	मथुरा
७७	वगळले	१०५	नामधारी
७८	वगळले	१०६	नामधारी पैक
७९	वगळले	१०७	निरशिकारी
८०	कुचबंध	१०८	नावी, न्हावी (सलमानी, हजाम), वारिक, नाभिक, नापित, म्हाली, वालंद, हडपद, हज्जाम, नावीसेन, सलमानियॉ, लिंगायत न्हावी
८१	कुछारिया	१०९	नेथुरा
८२	कुंभार किंवा कुम्हार, कुंबारा, कुंभारा, कुलाला, मूल्या, लिंगायत कुंभार	११०	नोनीया, लोनिया, लुनिया, नुनिया
८३	कुणबी (पोटजाती-लेवा कुणबी, लेवा पाटील, लेवा पटीदार, मराठा कुणबी व कुणबी मराठा, तिलोरी कुणबी, तिल्लोरी कुणबी, ति.कुणबी)	१११	नक्काशी
८४	वगळले	११२	नीली
८५	कची / कच्ची / कच्छी, कोइरी, कोईरी, कोयरी, कुशवाहा, काछी, कुशवाह, शाक्य, मौर्य, मुराई, सैनी	११३	नीलकांती
८६	काठी	११४	नेकार जाडा

११५	पधारिया	१४३	वगळले
११६	पडीयार	१४४	वगळले
११७	पात्रदावरु	१४५	सुप्पालिग, सपलिग, सपलिगा, सपालिगा, सपालिग, सुपलिग, सुप्पलिग, सुप्पलिगा (Suppalig, Sappaliga)
११८	फासेचरी	१४६	सुथारिया (सिंधमधील)
११९	फुडगी	१४७	साहिस, साईस, शिस
१२०	पखाली, सक्का	१४८	सपेरा
१२१	पांचाळ	१४९	शिलावट
१२२	पांका	१५०	****
१२३	पेर्की, पेरकेवाड, पेरीका, पेरीके, पेरका	१५१	वगळले
१२४	पुतली गर	१५२	वगळले
१२५	परीट किंवा धोबी, तेलगू मडेलवार (परीट), धोबी, परीट, मडवळ, वट्टी (वॅटस), रजक, लिंगायत परीट, लिंगायत धोबी	१५३	शिंपी, इद्रिसी / दर्जी, साईसुतार, जैन शिंपी, श्रावक शिंपी, शेतवाळ, शेतवाल, सैतवाळ, सैतवाल, मेरु शिंपी / मेरु क्षत्रिय शिंपी, तेलगु दर्जी, तेलगु शिंपी, नामदेव शिंपी
१२६	पाटकर, सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय, पटवेकरी, पटवेगार, पटेगार, पट्टेगार, पटवी, क्षत्रिय पाटकर, खत्री, क्षत्रिय	१५४	सोनार, मारवाडी सोनार, मारवाडी सुनार, मारवाडी स्वर्णकार
१२७	फुलारी, लिंगायत फुलारी	१५५	तांडेल
१२८	राचेवर	१५६	वगळले
१२९	राईकरी, रायीकर	१५७	तारगला
१३०	बंडी	१५८	थेटवार
१३१	रचबंधिया	१५९	थोरीया
१३२	वगळले	१६०	तांबट, त्वष्टा कासार, कासार
१३३	वगळले	१६१	थोग्ती
१३४	राओत, रावत, राऊतीया	१६२	वडी
१३५	वगळले	१६३	वगळले
१३६	वगळले	१६४	वंसफोड, हिंदू धरकार
१३७	वगळले	१६५	वगळले
१३८	वगळले	१६६	वरठी
१३९	वगळले	१६७	वगळले
१४०	संजोगी	१६८	येरकुला
१४१	सरानिया	१६९	आगरी, आगळे किंवा काळण
१४२	वगळले	१७०	भावसार, रंगारी, भावसार क्षत्रिय शिंपी, रँग्रेझ, रँग्रेज (भावसार, रंगारी)

१७१	कुरहीनशेट्टी	१८५	तलवार-कानडे/कानडी
१७२	नीलगार, निली, निराळी	१८६	रघवी (विदर्भ जिल्हयातील)
१७३	कोसकांती देवांग	१८७	भंडारी, बावर्ची/भटीयारा (मुस्लीम धर्मीय)
१७४	सुतार, सुथार, वाढई, बाढी, वढई, बाढई, बढई, वाढी, वाडी, वधाई, पोटजाती : झाडे सुतार, पांचाळ सुतार, लिंगायत सुतार	१८८	गानली किंवा गांडली
१७५	फुतगुडी	१८९	पोवार किंवा पवार (पोवार किंवा पवारआडनावे) भोयर, भोइर, भोयीर
१७६	वगळले	१९०	काथार, काथार वाणी, कंठहार वाणी, वैश्यवाणी, वैश्य-वाणी, वै.वाणी, वैश्य वाणी, V.Wani, पानारी, कुलवंत वाणी, कु.वाणी, वाणी (कुलवंत), कुलवंत-वाणी, कुणबी वाणी, लाडशाखीय वाणी, नेवी, धाकड, मिटकरीवाणी, वाणी, बोरळ (लिंगायत वाणी किंवा लाडवाणी सोडून), बोराळ, बोरुळ, बोरड, तांबोळी, लिंगायत वाणी, लिंगायत तांबोळी
१७७	पिंजारा, पिंजारी, मन्सुरी	१९१	मोमीन, वगळले
१७८	वगळले	१९२	फकीर बंदरवाला
१७९	भिलाला	१९३	वगळले
१८०	वगळले	१९४	घडशी
१८१	तेली, तिळवण तेली, मराठा तेली, तराणे तेली, देशकर तेली, एरंडेल तेली, लिंगायत तेली, एकबैल तेली, दोन बैल तेली सावतेली, एक बहिया तेली, घाँची	१९५	तांबोळी, (मुस्लीम धर्मीय पानफरोश)
१८२	माळी (पोटजाती-फुलमाळी, फुले, हळदे, काचा, कडू, बावने, अधप्रभू, अधशेटी, जिरे, उंडे, लिंगायत माळी इ.) बागवान (मुस्लीम धर्मीय), भारत बागवान, मरार, मारळ, कोसरे, गासे, वनमाळी, सावतामाळी, पाचकळशी, चौकळशी, वाडवळ, राईन (बागवान), कुंजडा (मुस्लीमधर्मीय), तत्सम जाती : सोमवंशीय-पाठारे क्षत्रिय, पाठारे-क्षत्रिय-पाचकळशी, पाठारे क्षत्रिय, सुतार, सास्टीकर, घोडेखाउ, एस.के.पी.	१९६	अनुसूचित जातीतून ख्रिश्चन धर्म स्विकारलेले
१८३	लोणारी	१९७	लंझाड, लझाड
१८४	वगळले	१९८	यादव, अहिर

१९९	लाडसी	२३१	चांडाळ
२००	वगळले	२३२	चेन्चू किंवा चेन्चवार
२०१	वगळले	२३३	चिमूर
२०२	अतार	२३४	चिंताला
२०३	औधिया	२३५	डाकालेरु
२०४	बादक, बारव	२३६	दर्जी
२०५	बगळू	२३७	वगळले
२०६	मारवार बाओरी, मारबार वाघरी	२३८	कुरबा, कुरुबार
२०७	उदासी, वगळले	२३९	हरकांत्रा, मांगेली, मांगेले, पागे, संदुरी
२०८	बालसंथनम	२४०	वगळले
२०९	मथुरा बंजारा	२४१	डोम्मारा
२१०	शिंगाडे बंजारा	२४२	गाडाबा किंवा गोडबा
२११	लंबाडे	२४३	गंगाणी
२१२	फानडे बंजारा	२४४	गारोडी
२१३	सुनार बंजारा	२४५	गोल्लेर
२१४	धालिया बंजारा	२४६	गोदळा
२१५	शिंगाडया बंजारा	२४७	हाबुरा
२१६	बाओंरिया	२४८	हरणी
२१७	कोळी बारीया	२४९	हिल-रेडिडस
२१८	बथिनी	२५०	देवेरी
२१९	बेगरी	२५१	विनकर, वन्या, बनकर, बुनकर
२२०	वगळले, परदेशी	२५२	काछिया
२२१	पोंग	२५३	कोराच, पाडलोर
२२२	दासर	२५४	कलाल, कलार, लाड, लाडवक, गौड कलाल, शिव्हारे, जैन कलार (लाड ब्राम्हण वगळून)
२२३	उचिला	२५५	कांदेल
२२४	भांडदुरा, बिल्लवा, थिया, बेलछेडा	२५६	कसेरा
२२५	खारवी, धीवर भोई	२५७	कसाई, कसाब, कुरेशी
२२६	वगळले	२५८	कटीपामुला
२२७	बिंदली	२५९	किरार
२२८	बुरबुक	२६०	ख्रिश्चन कोळी
२२९	चादर	२६१	कोराचार किंवा कोरवे
२३०	चक्रवदय-दासर	२६२	कोडकू सह कोरवा

२६३	कोमाकपु	२९२	सारे
२६४	कोंडू	२९३	भावगर, शिव शिंपी, नामदेव
२६५	लखारी	२९४	शिंगडाव किंवा शिंगाड्या
२६६	लोहार-गाडा, दोडी, खतवली, पांचाळ, पंचाल	२९५	सिंधूर
२६७	चुनारी, चुनेवाला, चुनेवाले	२९६	सोरें
२६८	वगळले	२९७	सुन्ना
२६९	माहिल	२९८	सुन्नाई
२७०	मैदासी	२९९	भडाई
२७१	माझवार	३००	गंणिगा, गांची
२७२	मतियारा, मतिहारा	३०१	थोटेवाडू
२७३	मानकर खालु	३०२	तिमाली
२७४	मोंडीवार, मोंडीवारा	३०३	वालवाई
२७५	मुंडा	३०४	वडडेर (कालावडेर किंवा पाथरोड)
२७६	हजाम, कालसेरु, नावलिगा, कान्शी, नाभिक, नाई, वालंद	३०५	वनाडी
२७७	पाचभोटला, पाचबोटला	३०६	येनाडिवाड्स
२७८	पदमपारि	३०७	येरगोलावाड किंवा थेल्ला पामालवाडस
२७९	भिस्ती	३०८	ओडेवार
२८०	पामूला	३०९	मण्यार (बांगडीवाला), मण्यार, मणियार व मणेरी
२८१	पंचमा, पंचम	३१०	जातगार
२८२	पंडा	३११	कराडी
२८३	फर	३१२	कुंकूवाले
२८४	पिंजारी	३१३	वगळले / वगळले/खातवाढई
२८५	पुरवाली	३१४	वगळले
२८६	राचभोया	३१५	कोहळी
२८७	राउतिया	३१६	खाटिक, कुरेशी खाटिक, कसाई
२८८	संगारी	३१७	डांगरी
२८९	संताल	३१८	वेडू (वाघरी)
२९०	साऊन्ता किंवा सोन्ता	३१९	धावड
२९१	सावतेली	३२०	निन्हाळी (निराळी)

३२१	चित्रकथी हरदास	३३७	नालबंद
३२२	बेस्ता, बेस्ती, बेस्तल्लू	३३८	कुलेकडगी, कुल्लेकडगी, कुलाकडगी, कुल्लाकडगी, लिंगायत कुल्लेकडगी
३२३	परिवार	३३९	मुजावर
३२४	सावकलार	३४०	मुलाणा, मुलाणी, मुलाणे
३२५	हणबर	३४१	ईस्ट इंडियन, ईस्ट इंडियन ख्रिश्चन, ईस्ट इंडियन कॅथॉलिक
३२६	दोडे गुजर, गुजर, लेवे गुजर, रेवे गुजर, रेवा गुजर, सुर्यवंशी गुजर, बडगुजर, तत्सम जाती :- लोंढारी / पेंढारी	३४२	नेवेवाणी
३२७	पहाड / पहाडी	३४३	वगळले
३२८	वगळले	३४४	मुस्लीमधर्मीय काकर
३२९	मच्छिमार (दाल्दी)	३४५	दोरीक
३३०	भालदार	३४६	पटवा
३३१	अलकरी	३४७	राठोड (आर्थिक निकषाच्या अधिन राहून)
३३२	पेंढारी	३४८	मारवाडी न्हावी
३३३	यलम / येलम / यल्लम	३४९	गुरडी, गुरडी-कापेवार, गुराडी, गुर्डा-कापेवार, गुरड-कापू, गुरडी-रेड्डि
३३४	महात / माहूत, महावत	३५०	गावडा, गावडे (GAWADA, GAVADA, GAWADE, GAVADE)
३३५	फकीर	३५१	कानोडी / कानडी
३३६	लोध, लोधा, लोधी	-	-

विशेष मागास प्रवर्ग (S.B.C.) (आरक्षण - २%)

अ.क्र.	जातीचे नाव
१	गोवारी, गवारी
२	वगळले
३	१) कोष्टी, हडगर, २) हलबा कोष्टी, ३) वगळले, ४) साळी, स्वकुळ साळी ५) लाडकोष्टी, ६)गढेवाल कोष्टी, ७) देशकर, ८) वगळले, ९) पद्म शाली, तत्सम जात: सालेवार, चेनेवार, चनेवार, चेन्नेवार १०) देवांग, ११) काची बंधे, १२) पटवीस,१३) सतसाले, १४)साडे, १५) जैनकोष्टी, १६) लिंगायत कोष्टी, लिंगायत देवांग, लिंगायत साळी
४	१) कोळी, तत्सम जाती, २) मच्छिमार कोळी, ३) अहीर कोळी, ४) खानदेशी कोळी, ५)पानकोळी, ६) ख्रिश्चन कोळी, ७) चुंबळे कोळी, ८) पानभरे कोळी, ९) कोळी सुर्यवंशी, १०) मांगेला, ११) सोनकोळी, १२) वैती, १३) खारवा, खारवी, १४) अनुसूचित जमातीमध्ये समावेश नसलेले कोळी, १५) माच्छी, मिटना, माच्छी-मिटना
५	१) मुन्नेरवार, २) मुन्नुरवार, ३) मुन्नुर, ४) तेलगु मुन्नुर, ५) मुन्नुरवार तेलगु, ६)वगळले, ७)वगळले, ८) तेलगु कापेवार, ९) मुन्नरवाड, १०) तेलगु फुलमाळी,
६	गाबीत
७	मुस्लीम धर्मीय भंगी / मेहतर / लालबेग / हलालखोर / खाकरोब

जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार यांनी क्षेत्रीय भेटी देणेबाबत..

महाराष्ट्र शासन

महसुल व वन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक :- क्षेत्रभे:-२०२५/प्र.क्र.१०/म-८

हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक:-२९.०१.२०२५

परिपत्रक

महाराष्ट्र राज्याची विविध शासकीय धोरणे, उपाययोजना, महत्वाच्या योजना तसेच केंद्र शासनाच्या राज्यात सुरु असणाऱ्या महत्वाच्या योजना इत्यादीची अंमलबजावणी राज्यातील अंतिम घटकांपर्यत व्यवस्थितरित्या पोहचण्यासाठी राज्यातील महसुल यंत्रणा ही जिल्हाधिकारी ते कोतवाल स्तरापर्यंत कार्यरत असते. महसूल विभाग हा राज्य शासनाचा क्षेत्रीय योजना राबविणारा सर्वांत प्रमुख विभाग आहे. महसूली कामाबरोबरच विविध प्रमाणपत्रे देणे, कृषी गटांना शासनाच्या विविध योजना, अभियान व मोहिमांचे समन्वयन, आपत्ती, टंचाई, जनगणना, निवडणूका, राजशिष्टाचार, विविध जात प्रमाणपत्रे देणे अशा अनेक बिगर महसूली कामांची जबाबदारी महसूल विभागावर असते. त्याअर्थी सर्वसामान्य जनतेच्या दैनंदिन गरजांशी निगडीत असलेला आणि त्यामुळे शासनाची प्रतिमा प्रतिबिंबित करणारा हा विभाग आहे. क्षेत्रीय कार्यालयांच्या कामांचा आढावा हा बहुतांशत: क्षेत्रीय कार्यालयांच्या येणाऱ्या अहवालावर अवलंबून असतो. बऱ्याचदा क्षेत्रीय बाबी या अहवालापेक्षा वेगळया असल्याची बाब निदर्शनास येते. कार्यालयातून काम करत असताना शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी आखणी केल्यानुसारच होत आहे की, नाही याची खातरजमा वेळोवेळी त्या त्या स्तरावरील महसुली अधिकाऱ्यांनी क्षेत्रीय भेटी देवून पाहणी करुन स्थानिक लोकांचे अभिप्राय घेवून केल्यास शासनाच्या उपाययोजना व्यवस्थितरित्या पूर्णत्वास जातील. तसेच अशा क्षेत्रीय भेटीच्या माध्यमातून शासन व सर्व सामान्य जनता यांच्यामध्ये सुसंवाद साधून शासनाची प्रतिमा उंचावण्यास मदत होईल.

०२. सबब, शासनाने असे ठरविले आहे की, राज्यातील सुशासन लोकाभिमुख होण्यासाठी व शासनाच्या कल्याणकारी योजना जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी **प्रत्येक जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार यांनी अनुक्रमे त्यांच्या जिल्हयात, उपविभागात व तालुक स्तरावर,**

नियतकालिक दौरे करणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी महिन्यातील किमान प्रत्येकी १ दिवस, उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार यांनी प्रत्येकी दोन दिवस क्षेत्रीय भेटी द्याव्यात.

- सदर भेटी दरम्यान क्षेत्रीय कार्यालयांचे कामकाज यादृच्छिकरित्या व अचानक तंत्राचा वापर करुन तपासावे. सर्व शासकीय योजनांची अंमलबजावणी व्यवस्थितरित्या पार पडत आहे याची सकारात्मक खातरजमा करावी. यात केवळ औपचारिकता न ठेवता क्षेत्रीय यंत्रणेवर नियंत्रण राहील असे नियोजन करावे व दौ-यामध्ये सकारात्मक फलित निघेल याची कटाक्षाने दक्षता घ्यावी.
- ग्रामपातळीवरील लोकांशी सुसंवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घ्याव्यात व त्यांचे निराकरण करण्याचे प्रयत्न करावेत. संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची सर्वसामान्यांशी वागणूक सौजन्यपूर्ण व संवेदनशीलतेची आहे, याबाबत जनसंवादातून खात्री करावी.
- गावपातळीवरील तसेच इतर अधिकारी/ कर्मचारी नियमानुसार कार्यक्षेत्रात राहून आपले कर्तव्य निभावत असल्याची खात्री करावी.
- गौण खनिज व महसुली उत्पन्न वाढविण्यासाठी नाविन्यपुर्ण संकल्पना राबविणे. तसेच, वाळू व गौण खनिज उत्पन्न तपासणी शासकीय धोरणानुसार अंमलबजावणी होत असल्याची खातरजमा क्षेत्रीय भेटी दरम्यान करावी.
- क्षेत्रीय भेटी देवून नैसर्गिक आपत्तीप्रवण भागात भविष्यात आपत्ती कशी टाळता येईल याच्या उपाययोजना ,भौगोलिक व स्थानिक परिस्थिती विचारात घेवून काय उपाययोजना करता येईल याबाबत वेळोवेळी त्या त्या मंत्रालयीन विभागास सुचित करुन जिल्हा, उपविभागीय तसेच तालुका पातळीवरील त्या त्या विभागाच्या अधिकाऱ्यांना सुचित करुन कामे करुन घ्यावीत.
- मा. मुख्यमंत्री महोदयांनी १०० दिवस कृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने महसुली विभागास दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी काटेकोरपणे होत असल्याचा वेळोवेळी आढावा घ्यावा.
- सर्व कार्यालयांमध्ये कामकाज प्राधान्याने e-Office प्रणाली मध्ये होत आहे याची तपासणी करावी.
- सेवा हक्क कायदा पोर्टल, आपले सरकार पोर्टल, पी.जी. पोर्टल, पी.एम.जी पोर्टल, e-mutation, ई-पिकपाणी, e.Qj court इ. ऑनलाईन सुविधेमधील क्षेत्रीय कार्यालयाच्या कामकाजास अनुसरून निर्गतीचा आढावा घ्यावा.
- सेतु कार्यालयाची तपासणी करावी व आवश्यक त्या सुचना संबंधितांना कराव्यात.

- कार्यालयांची तपासणी करत असताना कार्यालयीन इमारतीतील स्वच्छता, सुविधा इत्यादीची तपासणी करावी.
- कार्यालयाच्या समोर कार्यालयाचे नाव दर्शविणारे दर्शनीय व सुस्पष्ट नामफलक असल्याची तसेच नागरिकांची सनद, जनतेसाठी त्या कार्यालयामार्फ़त उपलब्ध होणा-या सुविधा व संपर्क क्रमांक हे त्या त्या कार्यालयासमोर लावण्यात आल्याची खात्री करावी.

०३. क्षेत्रीय भेटी झाल्यानंतर त्याचा लेखाजोखा जिल्हाधिकारी अधिनस्त अधिका-यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे व जिल्हाधिकारी यांनी त्यांचा क्षेत्रीय भेटीचा आढावा विभागीय आयुक्तांकडे वेळोवेळी द्यावा.

०४. क्षेत्रीय भेटी दौ-याचे मॉनिटर करण्यासाठी ऑनलाईन प्रणाली तयार करून त्याद्वारे दौ-याचे नियोजन ठेवावे. याविषयी समन्वय करण्याची जबाबदारी संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयाची राहील.

सदर आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निदेशान्वये निर्गमित करण्यात येत आहेत. यात कुचराई केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधिताविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले असून त्याचा संकेतांक २०२५०१२९१८१०२३६२१९ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT SOPANRAO DESHMUKH

Digitally signed by AJIT SOPANRAO DESHMUKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=d36a0a6455652c60ea76104dd537113a9ca67ab14a315b9cefc36fc9be2915f8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=704CB545C50221B15CDE7CCB8854E694C765DFB3A0240E891EBFB56EE79E3440, cn=AJIT SOPANRAO DESHMUKH
Date: 2025.01.29 18:12:33 +05'30'

(अजित देशमुख)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:-

१) सर्व विभागीय आयुक्त
२) सर्व जिल्हाधिकारी
३) सर्व उप विभागीय अधिकारी
४) सर्व तहसिलदार

जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम,१९६९ व सुधारणा अधिनियम, २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यू नोंदीबाबतची कार्यपध्दती निश्चित करणे बाबत.....

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः जमृनों २५२५/(ई .ऑ.९९११८१)/प्र.क्र.२२/कु.क.

१० वा मजला, बी विंग, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत

नवीन मंत्रालय, लो.टि. मार्ग, मुंबई- ४०० ००१

दिनांक : १२ मार्च, २०२५.

वाचा - १) विधि व न्याय विभाग, भारत सरकार,नवी दिल्ली, जन्म - मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९

२) महाराष्ट्र जन्म - मृत्यू नोंदणी नियम, २०००, दि. २०/०४/२००० ची अधिसूचना.

३) विधि व न्याय विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली, यांची अधिसूचना दि. ११/०८/२०२३.

<u>प्रस्तावना -</u>

वाचा क्र. १ येथील अधिनियमान्वये राज्यात दि. ०१/११/१९७७ पासून जन्म-मृत्यूच्या नोंदणी करण्यात येतात. सदर अधिनियमाच्या कलम ३० अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन केंद्र शासनाच्या मान्यतेने वाचा क्र. २ येथील महाराष्ट्र जन्म - मृत्यू नोंदणी नियम अंमलात असून राज्यातील जन्म-मृत्यूच्या नोंदी सदर नियमांतर्गत घेण्यात येतात. वाचा क्र. ३ येथील

अधिसूचनेन्वये जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

त्यानुसार, ज्या जन्म व मृत्यूच्या नोंदणीबाबत एक वर्षापेक्षा अधिक कालावधीने सूचना प्राप्त होते, अशा प्रकरणात नोंदी घेण्यासाठी जिल्हा दंडाधिकारी किंवा उप विभागीय दंडाधिकारी किंवा कार्यकारी दंडाधिकारी, ज्यांना जिल्हा दंडाधिकारी यांनी प्राधिकृत केले आहे, अशा कार्यक्षेत्रासाठी ज्या ठिकाणी अशा व्यक्तीचा जन्म व मृत्यू झाला आहे, त्याबाबतच्या अचूकतेबाबत खात्री करुन विलंब शुल्क आकारुन अशा नोंदी घेण्याबाबत आदेशित करण्याची सुधारीत तरतूद करण्यात आली आहे.

काही परकीय नागरिकांकडून विलंबाने जन्म नोंदी करुन घेतल्या जात असल्याबाबतच्या तक्रारी शासनाच्या निदर्शनास आल्या आहेत. अशा प्रकरणांना वेळीच प्रतिबंध करण्यासाठी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील तरतूदीनुसार तसेच महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम, २००० नुसार एका वर्षापेक्षा जास्त विलंबाच्या जन्म-मृत्यू नोंदी घेण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम, २००० मधील नियम १३ (३) नुसार जन्म व मृत्यू घटना नोंदणी संदर्भातील निबंधक, जन्म व मृत्यू यांनी अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार आता जन्म व मृत्यू नोंदणीसंदर्भात निबंधक तसेच जिल्हा दंडाधिकारी किंवा उप विभागीय दंडाधिकारी किंवा कार्यकारी दंडाधिकारी, ज्यांना जिल्हा दंडाधिकारी यांनी

प्राधिकृत केले आहे, त्यांनी अनुसरावयाची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

जन्म-मृत्यू नोंद नसल्याचे अनुपलब्धता प्रमाणपत्र देतांना निबंधकाने अनुसरावयाची कार्यपध्दती :-

१) निबंधकाच्या कार्यक्षेत्रात नागरीकांच्या जन्म-मृत्यूबाबतची घटना घडली असल्यास त्याबाबतचा सबळ पुरावा (उदा. शव विच्छेदन अहवाल, प्रथम खबरी अहवाल, जन्म घरी झाल्यास अंगणवाडी सेविका व तत्सम अन्य कर्मचारी यांचे जवाब/प्रतिज्ञापत्र,रुग्णालयीन नोंदीचे कागदपत्र, अन्य शासकीय अभिलेखे इ.) प्राप्त करुन तसेच त्याबाबतची खात्री करुनच जन्म - मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे.

२) जन्म - मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्राकरीता किंवा जन्म -मृत्यूची नोंद घेण्यास १ वर्षापेक्षा जास्त उशीर झालेला आहे अशा प्रकरणी प्राप्त मागणी अर्जासोबत ज्यांची जन्म-मृत्यूची नोंद घ्यावयाची आहे त्यांचे रुग्णालयाचे प्रमाणपत्र, आरोग्य विषयक नोंदीचे पुरावे (उदा. लसीकरण, शाळा प्रवेश-निर्गम उतारा इ.) त्यांच्या आई-वडील, रक्ताच्या नातेवाईकांचे अधिवास प्रमाणपत्र, जन्म प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, जमीन उतारा, खरेदी खत, कर पावती, आधार कार्ड, पॅन कार्ड अन्य शासकीय ओळखपत्र इत्यादी पुराव्यांचा विचार करुन तसेच अर्जदाराची वंशावळ आणि त्यांची ओळख पटविणारे शासकीय अभिलेखे तसेच रहिवासाबाबतचे शासकीय दस्तऐवज

(उदा. वीज पावती, कर पावती इ.) यावरुन सत्यता पटवूनच खात्री झाल्यानंतर जन्म - मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे.

३) अर्जदार स्थानिक रहिवाशी असल्याची पडताळणी करुनच निबंधकाने जन्म - मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र द्यावे. अन्यथा स्थानिक रहिवाशी नसेल तर जन्म - मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यात येऊ नये. याकरीता स्थानिक चौकशी / पंचनामा करुन खात्री करावी.

४) विलंबाने जन्म-मृत्यू नोंदीबाबत कारणमिमांसेसह पडताळणी करावी. तसेच एकाच कुटुंबातील अनेक सदस्य एकाच वेळी नोंदी घेण्याबाबत अर्ज सादर करीत असतील अशावेळी अधिक सखोल चौकशी करण्यात यावी.

५) जन्म-मृत्यूच्या विलंबाने नोंदीबाबत पुरावे उपलब्ध झाल्यास आणि पडताळणी व खात्री झाल्यानंतरच निबंधकाने अनुपलब्धता प्रमाणपत्र अर्जदारास द्यावे तसेच याबाबत आदेशास्तव संपूर्ण प्रस्तावाची एक प्रत स्वयंस्पष्ट अभिप्रायासह जिल्हा दंडाधिकारी /उप विभागीय दंडाधिकारी / तालुका दंडाधिकारी/ ज्यांना जिल्हा दंडाधिकारी यांनी प्राधिकृत केले आहे त्यांना सादर करावी.

६) ज्या प्रकरणी सबळ पुरावे उपलब्ध होत नाहीत, खोटे/बनावट पुरावे प्राप्त झाल्याचे निदर्शनास आल्यावर अशा प्रकरणांची माहिती तात्काळ पोलीस विभागास देण्यात यावी.

जन्म - मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्राच्या आधारे पारीत करावयाच्या आदेशाबाबत जिल्हा दंडाधिकारी, उप विभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी, ज्यांना जिल्हा दंडाधिकारी यांनी प्राधिकृत केले आहे त्यांनी अनुसरावयाची कार्यपध्दती:-

पृष्ठ ९ पैकी ४

१) विलंबाने जन्म-मृत्यू नोंद घेण्याबाबतची प्रकरणे **"अर्ध-न्यायिक (Quasi-Judicial)"** स्वरुपाची असल्याने त्यांची रितसर नोंदणी करुन आवश्यक कार्यपध्दती अनुसरावी.

२) अर्जदाराकडून प्राप्त अर्ज व निबंधकाद्वारे प्राप्त प्रस्तावानुसार जिल्हा दंडाधिकारी, उप विभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी ज्यांना जिल्हा दंडाधिकारी यांनी प्राधिकृत केले आहे, त्यांनी १५ दिवसांचे जाहीर प्रगटन **स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयामध्ये, कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय, संबंधित जन्म मृत्यू निबंधक यांचे कार्यालय इ. कार्यालये तसेच, स्थानिक वृत्तपत्रामध्ये** अर्जदाराच्या खर्चाने प्रसिध्द करावे.

३) अर्जदाराच्या विलंबाच्या जन्म-मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे पुरावे उपलब्ध करुन घेण्यात यावेत:-

(अ) जन्माच्या अनुषंगाने (जसे: रुग्णालयाच्या नोंदीचे, लसीकरणाचे पुरावे),

(ब) मृत्यूच्या अनुषंगाने (जसे : शव विच्छेदन अहवाल, प्रथम खबरी अहवाल, रुग्णालयीन कागदपत्रे, इ.)

(क)शैक्षणिक पुरावे (जसे: शाळेच्या प्रवेश-निर्गम रजिस्टरचा उतारा, बोनाफाईड प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला इ.),

(ड) रहिवासाचे पुरावे (जसे : मालमत्ता कराची पावती, पाणीपट्टी, विज बील इ.),

(इ) मालमत्तेचे पुरावे (जसे: सातबारा उतारा, नमुना ८-अ चा उतारा, वारस नोंदीचे फेरफार, मिळकत उतारा, नोंदणीकृत दस्त इ.),

(फ) ओळखीबाबतचे पुरावे (जसे- वाहन परवाना, मतदान ओळखपत्र, पारपत्र, आधार कार्ड, बँक / पोस्ट पासबुक, पॅन कार्ड, जॉब कार्ड, इत्यादी),

(ग) कौटुंबिक पुरावे (जसे : परिवारातील सदस्यांचे जन्म प्रमाणपत्र, शिधापत्रिका, विवाह प्रमाणपत्र इ.) ,

४) प्राप्त अर्जासोबतचे उपरोक्त कागदपत्रे बनावट/अवैध असण्याची शक्यता विचारात घेवून त्यांच्या सत्यतेबाबत पडताळणी होणे आवश्यक आहे. याकरीता संबंधित कार्यालयाकडून त्याबाबतच्या पडताळणीचे लेखी अभिप्राय १५ दिवसांच्या आत मागविण्यात यावेत.

५) अर्जदाराच्या स्वयंघोषणापत्र / शपथपत्रावर दोन स्थानिक प्रतिष्ठीत नागरीक, पोलीस पाटील, विशेष कार्यकारी अधिकारी, तंटामुक्ती अध्यक्ष, राजपत्रित अधिकारी यांची साक्षीदार म्हणून स्वाक्षरी घेण्यात यावी.

६) अर्जदाराच्या विलंबाच्या नोंदीबाबत निर्णय घेतांना त्याच्या जन्माच्या वेळी त्याच्या कुटुंबाच्या रहिवासाची व कुटुंबातील सदस्यांच्या जन्माच्या पुराव्याची माहिती घेण्यात यावी. तसेच, अर्जदाराने जन्म झाल्यापासून ते विलंबाच्या जन्म नोंदीच्या अनुषंगाने अर्ज सादर करेपर्यंतच्या कालावधीत कोठे वास्तव्य केले याबाबतचे पुरावे घेण्यात यावेत.

७) अर्जदाराच्या स्थानिक रहिवासाच्या ठिकाणी तलाठी / ग्रामसेवक यांचेमार्फत स्थानिक चौकशी / पंचनामा करुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागविण्यात यावा.

८) अर्जदाराच्या स्थानिक जन्माच्या ठिकाणचा व रहिवासाचा तपास करुन चौकशी अहवाल पोलीस विभागाकडून मागविण्यात यावा.

पृष्ठ ९ पैकी ६

९) अर्जदाराच्या शाळेच्या दाखल्यात, पॅन कार्ड, आधार कार्ड, पासपोर्ट, मतदान ओळखपत्र, वाहन चालविण्याचा परवाना, इत्यादी मध्ये नोंदविलेली जन्मतारीख ही जन्म तारखेचा पुरावा म्हणून विचारात घेता येत नाही, असे मा. उच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदविलेले असल्याने प्रकरण परत्वे निर्णय घेताना या बाबीचा विचार करावा.

१०) अर्जदाराच्या जन्म-मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने तत्कालीन पुरावे जसे रुग्णालयाचे पुरावे, रहिवासाचे पुरावे, कुटुंबातील अन्य सदस्यांचे जन्माचे व रहिवासाचे पुरावे घेणे अत्यावश्यक आहे, तसेच त्यांचे कौटुंबिक नातेसंबंध तपासूनच अशा व्यक्तीच्या जन्म-मृत्यूच्या विलंबाने नोंद घेण्याबाबत आदेशित करणे आवश्यक आहे.

११) ज्या व्यक्तीची विलंबाने जन्म नोंद घ्यावयाची आहे अशा सज्ञान व्यक्तीनेच अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. त्याबाबत अर्जदाराकडून अर्ज, शपथपत्र, घोषणापत्र, जबाब व तपासणी समक्ष करणे आवश्यक राहील. अन्य व्यक्ती मार्फत तसेच, बनावटी व्यक्तीच्या नावे विलंबाने जन्म नोंदी घेतल्या जाणार नाहीत, याची खातरजमा करण्यात यावी.

१२) जाहीर प्रगटनानुसार प्राप्त हरकती / तक्रारींच्या अनुषंगाने आणि उपलब्ध कागदपत्रे / पुरावे यांच्या आधारे सुनावणी घेऊन विलंबाच्या जन्म-मृत्यू नोंदीच्या सिध्दतेबाबत सविस्तर आदेश पारीत करावा व या आदेशाची प्रत निबंधकांना अग्रेषित करण्यात यावी.

१३) ज्या प्रकरणात नोंदणी घेण्यासाठी सबळ पुरावे नसतील, खोटे व बनावट पुरावे तयार करुन सादर केल्याचे निदर्शनास आल्यास, अशा प्रकरणांत आदेश पारित करुन

त्याबाबतची माहिती तात्काळ पोलीस विभागाला देण्यात यावी. तसेच, खोट्या / बनावटी पुरावे दाखल केल्याबाबत अशा अर्जदाराविरुध्द फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्यात यावी.

जन्म-मृत्यू नोंदीचे कामकाज हाताळणाऱ्या सर्व संबंधितांनी सर्व यंत्रणांशी समन्वय साधून उपरोक्त कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करावे.

सदर शासन निर्णय महसूल व वन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत असून, तो महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२५०३१२०८५५०९०४१७ आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NIPUN UMESH VINAYAK

Digitally signed by NIPUN UMESH VINAYAK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=9ed2330e7f56d2d0585292018f6841d4842107b421a1acd728d23f3c62c246a7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=66DB581AFF2FBF0992FD5CC282AED74F38288CA8FE0226DC0A3C67A2DD50A6BD, cn=NIPUN UMESH VINAYAK
Date: 2025.03.12 11:24:41 +05'30'

(डॉ. निपुण विनायक)
सचिव (१), महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
२. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सचिव (१) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई

आपले सरकार सेवा केंद्रांची संख्या दुप्पट करणे, सेवा केंद्रांवरुन देण्यात येणाऱ्या सेवांच्या दरात सुधारणा करणे व घरपोच सेवेबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक- आसेकें-१७२५/प्र.क्र. ८६/मातं(३९)
हूतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक :- २७ मार्च, २०२५

संदर्भ :- १) शासन निर्णय, सिओएम १००२/प्र.क्र.२४०/०२/३९, दि. २३ ऑगस्ट, २००२
२) शासन निर्णय, क्रमांक क्र. मातंसं/प्र.क्र. २८/३९, दिनांक ३ डिसेंबर, २००८
३) शासन निर्णय, क्रमांक मातंसं २०१२/प्र.क्र. १५२/३९, दिनांक २३ मे, २०१२
४) शासन निर्णय, क्रमांक मातंसं ०४७/१/२०१४/३९, दिनांक ५ सप्टेबर, २०१४
५) शासन निर्णय, क्रमांक मातंसं १७१६/प्र.क्र. ५१७/३९ दिनांक ५ डिसेंबर, २०१६
६) शासन निर्णय, क्रमांक मातंसं १७१६/प्र.क्र. ५१७/३९ दिनांक १९ जानेवारी, २०१८

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्याचे झपाट्याने डिजिटायझेशन होणे ही काळाची गरज आहे. त्याचाच एक भाग म्हणून राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना विविध शासकीय सेवा/लाभ मिळविण्यासाठी लागणारा श्रम,निधी व वेळ यांचा अपव्यय टाळता यावा व त्यांना माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विहित मुदतीत विविध विभागांच्या सुविधा मिळाव्यात यासाठी राज्यामध्ये आपले सरकार सेवा केंद्रांची स्थापना करण्यात आलेली आहे. लोकसंख्येच्या तुलनेत आपले सरकार सेवा केंद्रांची संख्या कमी असल्याकारणाने सन २०११ ची जनगणना प्रमाण मानून संदर्भाधिन क्र. ६ येथील शासन निर्णय क्र. मातंसं-१७१६/प्र.क्र.५१७/३९, दि. १९ जानेवारी, २०१८ मधील परिच्छेद क्र.१ अन्वये आपले सरकार सेवा केंद्र स्थापना करण्याचे निकष ठरविण्यात आले आहेत. सदर शासन निर्णय निर्गमित होऊन साडेसहा वर्षापेक्षाही जास्त कालावधी उलटून गेला आहे. दरम्यान दिवसेंदिवस लोकसंख्येमध्ये झालेली वाढ आणि त्यामुळे आपले सरकार सेवा केंद्रांमध्ये वाढ करण्याची आवश्यकता विचारात घेता, संदर्भाधीन शासन निर्णय दि.१९ जानेवारी,२०१८ मधील परिच्छेद क्र. १ अन्वये ठरवून दिलेल्या आपले सरकार सेवा केंद्रे स्थापन करण्याच्या निकषात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

त्याचप्रमाणे आपले सरकार सेवा केंद्रांवरुन नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांचे दर शासन निर्णय दि. ०३.१२.२००८ अन्वये रु.२०/- ठरविण्यात आले होते. दिवसेंदिवस महागाईमध्ये झालेली वाढ आणि महाआयटी आणि आपले सरकार सेवा केंद्र चालक यांचेकडून सेवांचे दर वाढविणेबाबत करण्यात आलेली विनंती विचारात घेऊन सध्याच्या सेवा दरामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करणे आवश्यक झाले. तसेच, आपले सरकार सेवा केंद्रांतर्गत नागरीकांना त्यांच्या मागणीनुसार आपले सरकार पोर्टलवर प्रत्येक घरपोच सेवा पुरविणेबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यानुषंगाने मा.मंत्री, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य यांनी विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात निवेदनही केलेले आहे.

शासन निर्णय:-

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मातंसं-१७१६/ प्र.क्र.५१७/३९, दिनांक १९ जानेवारी, २०१८ मधील परिच्छेद क्र.१ अन्वये ठरवून दिलेली लोकसंख्या आणि आपले सरकार सेवा केंद्रांची संख्या याबाबतच्या निकषात खालीलप्रमाणे बदल करुन आपले सरकार सेवांची संख्या वाढविण्यात येत आहे.:-

अ) प्रत्येक ग्राम पंचायत क्षेत्रात २ आपले सरकार सेवा केंद्रे स्थापन करण्यात येईल. मात्र, ५००० पेक्षा अधिक लोकसंख्या (२०११ च्या जनगणनेनुसार) असलेल्या ग्राम पंचायतीत किमान ४ केंद्रे स्थापन करण्यात येईल.

आ) शहरी भागांसाठी आपले सरकार सेवा केंद्रासाठी खालील निकष राहतील. (२०११ च्या जनगणनेनुसार):-

- बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र- २५००० लोकसंख्येसाठी २ केंद्र
- इतर महानगरपालिका व नगरपरिषद- १०००० लोकसंख्येसाठी २ केंद्र
- प्रत्येक नगर पंचायत क्षेत्रात किमान दोन आपले सरकार सेवा केंद्रे स्थापन करण्यात येईल. मात्र, ५००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या नगर पंचायतीत किमान ४ केंद्रे स्थापन करण्यात येईल.
- वरील निकषात आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी बदल करण्यात येईल.

शहरी भागात स्थापन करावयाच्या "आपले सरकार सेवा केंद्रांची" संख्या महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायत इ. यांच्या प्रत्येक झोन/वार्ड (प्रशासकीय) मध्ये शक्यतो समप्रमाणात विभागण्यात यावी. सदर कार्यवाही अध्यक्ष, जिल्हा सेतू समिती/ (जिल्हा ई-गर्व्हनन्स सोसायटी (DeGS)) तथा जिल्हाधिकारी यांचेमार्फत, या शासन निर्णयाच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत करण्यात यावी. तसेच, वेळोवेळी शासनाच्या सुचनेनुसार या संख्येमध्ये आवश्यक तो बदल जिल्हाधिकारी यांच्या मार्फत करण्यात यावा.

२. **सेवा दरांच्या वाढीबाबत**

आपले सरकार सेवा केंद्रांवरुन नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांच्या सध्याच्या सेवा दरामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.:-

सेवा शुल्क (अर्जाची फी)	राज्य सेतू केंद्रांचा वाटा	महाआयटीचा वाटा	जिल्हा सेतूसोसायटीचा वाटा	आपले सरकार सेवा केंद्र चालकाचा वाटा (VLE)
रु ५०/-	**रु. २.५/- (५%)**	**रु.१०/- (२०%)**	**रु.५/- (१०%)**	**रु.३२.५०/- (६५%)**

३. आपले सरकार सेवा केंद्र चालकाद्वारे नागरिकांना घरपोच वितरण:-

आपले सरकार सेवा केंद्रांतर्गत नागरीकांना त्यांच्या मागणीनुसार आपले सरकार पोर्टलवर प्रत्येक घरपोच सेवेच्या नोंदणीसाठी रु.१००/- (कर वगळून) एवढे शुल्क निश्चित करण्यात येत आहे. सदर शुल्क आपले सरकार सेवा केंद्र चालकामार्फत नागरिकांकडून गोळा करण्यात येईल. *रु.१००/- (कर वगळून) दरामधील हिस्सेदारी पुढीलप्रमाणे राहिल:-

अ.क्र.		वाटा (एकूण दराच्या)	
१	महाआयटीचा सेवा दर	२०%	प्रत्येक ऑनलाइन सेवा बुकिंगसाठी
२.	आपले सरकार सेवा केंद्रचालकासाठी सेवा दर	८०%	घरपोच भेटीसाठी

*वरील दराव्यतिरिक्त प्रती अर्ज फी रु.५०/-(सुधारीत दर) या प्रमाणे अर्जदाराकडून सेवाशुल्क घेण्यात येईल.

सदर शासन निर्णयातील तरतूदी या आदेशाच्या दिनांकापासून लागू राहतील सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०३२७१८२५५०८३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुदाम ए. आंधळे)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
५. सर्व अपर मुख्य सचिव/ सर्व प्रधान सचिव/विशेष सचिव/सचिव
६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
७. प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा), मुंबई,
८. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई,
९. प्रबंधक, लोक आयुक्त/उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१०. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
११. महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१२. महालेखापाल १/२ लेखा व परिक्षा महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१३. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
१४. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य,
१५. सर्व महानगरपालिका आयुक्त
१६. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७. सर्व उप मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषदा
१८. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख
२०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२३. निवड नस्ती (का.३९).

ePCIS अंतर्गत तयार होणारे संगणकीकृत फेरफार नोंदवहीचा उतारा, परिशिष्ट अ, परिशिष्ट ब, नमुना ९ नोटीस व इतर संगणकीकृत तयार होणारे अभिलेख यांची नक्कल फी व सेवा केंद्रामार्फत द्यावयाच्या सेवांचे दर ठरविणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०२३/प्र.क्र.०५/ल-१.

पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : २८ मार्च २०२५.

वाचा :-

१. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र. सीएलआर-२००१/प्र.क्र.४८/ल-१, दि.१३/११/२००१.

२. माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, शासन निर्णय क्र. मातंसं/नस्ती २०१०/प्र.क्र.३४/३९, दि.०९/०२/२०१५.

३. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र. रा.भू.अ./२०१९/प्र.क्र.२८९/ल-१, दि.०२/०७/२०२०.

४. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र. राभुअ-२०२१/प्र.क्र.२११/ल-१, दि. ०५/१२/२०२३.

५. जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र दि.२५.०६.२०२४.

प्रस्तावना :-

संगणकीकृत गाव नमुना नं. ७/१२ व मिळकतपत्रिका निवडक ८३ ठिकाणी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये निर्णय घेतला आहे व त्या ठिकाणी सदरचे संगणकीकृत उतारे मागणीप्रमाणे खातेदारांना उपलब्ध करुन देण्यासाठी सेतू केंद्राची उभारणी आणि त्या मार्फत देण्यात येणा-या अधिकार अभिलेखाच्या नक्कल फी बाबत निर्णय घेण्यात आला आहे. भूमि अभिलेख विभागाच्या सेवा तहसिल कार्यालयांमध्ये सुरु असलेल्या सेतू सेवा केंद्र / आपले सरकार सेवा केंद्र / महा ई-सेवा केंद्र यांच्यामार्फत देण्याची बाब आणि भूमि अभिलेख विभागातील उप अधिक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी यांचे कार्यालयात सेतू कार्यालयांच्या धर्तीवर सेतु सुविधा केंद्र सुरु करून सदर केंद्रामध्ये भूमि अभिलेखाच्या विभागाच्या सेवा उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

तहसिल कार्यालयांमध्ये सुरु असलेल्या सेतू सेवा कार्यालयांच्या धर्तीवर भूमि अभिलेख विभागातील उप अधिक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी यांचे कार्यालयात सेतु सुविधा केंद्र

स्थापन करण्यास आणि सदर केंद्रास "भू-प्रणाम केंद्र" या नावाने संबोधण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर केंद्रामार्फत माहिती तंत्रज्ञान विभागाकडून सेतू सेवा केंद्रासाठी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामध्ये नमूद सर्व सेवाही देण्यात याव्यात.

२. भूमि अभिलेख विभागाच्या भू-प्रणाम केंद्रांमध्ये तसेच सेतू सेवा केंद्र / आपले सरकार सेवा केंद्र / महा ई-सेवा केंद्र या केंद्रांमध्ये संगणकीकृत मिळकतपत्रिका, मिळकत पत्रिकेत फेरफार, सर्व प्रकारच्या फेरफारांसाठी अर्ज, ई मोजणी VER. २ मधील सर्व प्रकारच्या मोजणी नकाशे, मिळकतीचा डिजीटली साईन्ड केलेले सर्व प्रकारचे नकाशे इत्यादी सेवा उपल्बध करून देण्यात येतील. त्यासाठी सदर सेवांचे दर निश्चित करण्यात येत आहेत.

अ) ePCIS प्रकल्पा अंतर्गत फेरफार नोंदवहीचा उतारा, परिशिष्ट अ, परिशिष्ट ब, नमुना ९ ची नोटीस, नमुना १२ ची नोटीस, अर्जाची पोच, रिजेक्शान पत्र, त्रुटी पत्र, निकाली पत्र, विवादग्रस्त नोंदवहीचा उतारा, सर्व प्रकारच्या अपील निर्णयाच्या प्रती व इतर संगणकीकृत अभिलेख इत्यादी अभिलेखांच्या नकलांसाठी खालील तक्त्यामध्ये नमुद दरास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	अभिलेख	पहिल्या २ पृष्ठांसाठी दर*	विविध घटकांचा हिस्सा		
			राज्य शासन	ज. आ. आणि सं. भू. अ. यांचे स्विय प्रपंजी लेखा खाते	सेवा केंद्र चालक
१	फेरफार नोंदवहीचा उतारा	रु.३५/-	रु.१०/-	रु.५/-	रु.२०/-
२	परिशिष्ट अ	रु.३५/-	रु.१०/-	रु.५/-	रु.२०/-
३	परिशिष्ट ब	रु.३५/-	रु.१०/-	रु.५/-	रु.२०/-
४	नमुना ९ ची नोटीस	रु.३५/-	रु.१०/-	रु.५/-	रु.२०/-
५	नमुना १२ ची नोटीस	रु.३५/-	रु.१०/-	रु.५/-	रु.२०/-
६	अर्जाची पोच	रु.३५/-	रु.१०/-	रु.५/-	रु.२०/-
७	रिजेक्शान पत्र	रु.३५/-	रु.१०/-	रु.५/-	रु.२०/-
८	त्रुटी पत्र	रु.३५/-	रु.१०/-	रु.५/-	रु.२०/-
९	निकाली पत्र	रु.३५/-	रु.१०/-	रु.५/-	रु.२०/-
१०	विवादग्रस्त नोंदवहीचा उतारा	रु.३५/-	रु.१०/-	रु.५/-	रु.२०/-
११	अपील निर्णयाची प्रत	रु.३५/-	रु.१०/-	रु.५/-	रु.२०/-
१२	१ ते ११ व्यतिरीक्त इतर ३०x२१ से.मी. आकाराचा उपलब्ध इतर अभिलेख	रु.३५/-	रु.१०/-	रु.५/-	रु.२०/-
*वर नमुद अभिलेखांच्या डिजीटली साईन केलेल्या नकला प्रिंट करुन जनतेस उपलब्ध करुन देण्यासाठी सेतू केंद्र/आपले सरकार सेवा केंद्र/ महा ई सेवा केंद्र/ भूप्रणाम केंद्र- यांना २ पेक्षा अधिक पृष्ठे असल्यास प्रती पृष्ठ रु. २/- (अधिक कर) एवढे सेवा शुल्क घेता येईल.					

ब) मिळकत पत्रिका :-

संगणकीकृत व डिजीटल स्वाक्षरीत मिळकत पत्रिका खाली नमुद केलेल्या दरानुसार भू-प्रणाम केंद्र /सेतू सेवा केंद्र /आपले सरकार सेवा केंद्र / महा ई सेवा केंद्र यांचे मार्फत उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

अ.क्र.	वितरणाचे ठिकाण	क्षेत्र निहाय प्रती पुरवठा करण्याची फी (आकडे रुपयात) व त्यामधील विविध घटकांचा हिस्सा		
		महानगरपालिका क्षेत्र	अ, ब, क वर्ग नगरपालिका/नगरपंचायत	ग्रामीण क्षेत्र
१	महाभूमि संकेत स्थळावरुन प्राप्त डिजीटल मिळकत पत्रिका	रु.१५५/-	रु.११०/-	रु.६५/-
२	विविध घटकांचा हिस्सा			
	१) महाराष्ट्र शासन	रु.९०/-	रु.६०/-	रु.३०/-
	२) ज.आ.आणि सं.भू.अ. यांचे स्विय प्रपंजी लेखा खाते	रु.४५/-	रु.३०/-	रु.१५/-
	३) सेवा केंद्र चालक	रु.२०/-	रु.२०/-	रु.२०/-
भूप्रणाम केंद्र- /सेतू सेवा केंद्र / आपले सरकार सेवा केंद्र / महा ई सेवा केंद्र यांना पहिल्या दोन पृष्ठांसाठी रु.१५५/११०/६५/- अधिक सेवा शुल्क राहिल व दोन पेक्षा अतिरिक्त पृष्ठ असल्यास प्रती पृष्ठ रु.२/- (अधिक कर) प्रमाणे सेवा शुल्क केंद्र चालकास घेता येईल.				

क) ऑनलाईन अर्ज करणेची सुविधा :-

महसूल विभागांतर्गत उपलब्ध असलेले अभिलेख प्राप्त करून घेण्यासाठी भू-प्रणाम केंद्र /सेतू सेवा केंद्र / आपले सरकार सेवा केंद्र/महा ई सेवा केंद्र यांचेमार्फत अर्ज सादर केल्यास त्यासाठी खालील प्रमाणे शुल्क निश्चित करण्यात येत आहेत.

अ.क्र.	अभिलेख	संबंधित पोर्टलवर अर्ज भरण्याच्या शुल्काची रक्कम (रू.)	विविध घटकांचा हिस्सा	
			ज.आ.आणि सं.भू.अ. यांचे स्विय प्रपंजी लेखा खाते	सेवा केंद्र चालक
१	सर्व प्रकारचे फेरफार अर्ज	रु.२५/-	रु.५/-	रु.२०/-
२	सर्व प्रकारचे मोजणी अर्ज	रु.२५/-	रु.५/-	रु.२०/-
तथापि, कोणत्याही खातेदार नागरीकाने वैयक्तिकरित्या सदर कागदपत्रे PDE (Public Data Entry) सुविधेवर अपलोड केल्यास किंवा ई मोजणी आज्ञावलीद्वारे ऑनलाईन अर्ज केल्यास सदर सेवा खातेदार नागरिकास निःशुल्क राहील.				

ड) नकाशे व स्कॅनिंग अभिलेख यांचे दर निश्चित करणे-

ePCIS अंतर्गत स्कॅनिंग अभिलेख व संगणकीकृत नकाशाच्या प्रती जनतेस उपलब्ध करुन देण्याबाबत संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयाव्दारे घेण्यात आला आहे. सदर स्कॅनिंग अभिलेख व संगणकीकृत नकाशाच्या प्रती डिजीटल स्वाक्षरीने भू-प्रणाम केंद्र /सेतू केंद्र / आपले सरकार सेवा केंद्र / महा ई-सेवा केंद्रामार्फत खालीलप्रमाणे सेवा शुल्क आकारून जनतेस उपल्बध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

i) स्कॅन अभिलेख :-

अ. क्र.	अभिलेखाचा प्रकार	निश्चित केलेले दर प्रती फाईल	विविध घटकांचा हिस्सा		
			राज्य शासन	ज.आ. आणि सं.भू.अ. यांचे स्विय प्रपंजी लेखा खाते	सेवा केंद्र चालक
१	सॉफ्ट कॉपी स्वरूपात	रु.५०/- प्रती फाईल (JPG/PDF)	रु.२०/-	रु.१०/-	रु.२०/-
२	मुद्रण/छापील स्वरूपात	पहिल्या दोन पृष्ठांसाठी रु.३५/-*	रु.१०/-	रु.५/-	रु.२०/-
*वर नमुद अभिलेखांच्या डिजीटली साईन केलेल्या नकला प्रिंट करुन जनतेस उपलब्ध करुन देण्यासाठी सेतू केंद्र/आपले सरकार सेवा केंद्र/ महा ई सेवा केंद्र/ भूप्रणाम केंद्र- यांना २ पेक्षा अधिक पृष्ठे असल्यास प्रती पृष्ठ रु. २/- (अधिक कर) एवढे सेवा शुल्क घेता येईल.					

ii) नकाशा :-

डिजीटाईज नकाशाच्या नकला प्लॉटरव्दारे नकाशाच्या आकारमानानुसार उपलब्ध करून देण्यासाठी खालीलप्रमाणे शुल्क निश्चित करण्यात येत आहे.

अ.क्र.	अभिलेखाचा प्रकार	रंगीत नकाशाचा आकार	निश्चित केलेले दर प्रती फाईल	विविध घटकांचा हिस्सा		
				राज्य शासन	ज.आ.आणि सं.भू.अ. यांचे स्विय प्रपंजी लेखा खाते	सेवा केंद्र चालक
१	नकाशा	A0	रु.२५५/-	रु.२०/-	रु.१०/-	रु.२२५/-
२		A१/A२	रु.१५५/-	रु.२०/-	रु.१०/-	रु.१२५/-
३		A३/A४	रु.५०/-	रु.२०/-	रु.१०/-	रु.२०/-

३. वरील सुविधा पुरविण्यासाठी सेतू केंद्र / आपले सरकार सेवा केंद्र / महा ई-सेवा केंद्र आणि भूमि अभिलेख कार्यालयातील भू-प्रणाम केंद्र चालकांनी सेवा पुरविण्याचे वरीलप्रमाणे शुल्क अधिक सेवा कराची रक्कम आकारावी.

४. वरील सर्व सेवा उपलब्ध करून देताना करावयाच्या प्रिंटसाठी वापरण्यात येणाऱ्या कागदाचा दर्जा ८० GSM पेक्षा कमी नसावा.

५. केंद्र चालकांकडून आकारण्यात येणाऱ्या सेवा शुल्काचे महसूल वाटप माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रचलित धोरणानुसार असेल.

६. शुल्काची रकमेमध्ये क्युआर कोड व सोळा अंकी पडताळणी क्रमांकासह Digital sign डेटाबेस आधारीत संगणकीकृत अभिलेख दिनांक २३/११/२०२० च्या शासन परिपत्रकान्वये सर्व कायदेशीर व शासकीय कामकाजासाठी ग्राहय समजण्यात यावेत.

७. भूमि अभिलेख विभागाच्या www.mahabhumi.gov.in या संकेतस्थळावरून विनाशुल्क उपलब्ध होणारे, क्युआर कोड किंवा सोळा अंकी पडताळणी क्रमांकाविना असलेले आणि महाभूमिचा वॉटरमार्क असलेले विनास्वाक्षरीत अधिकार अभिलेख केवळ माहितीसाठी असून सदर अभिलेख कोणत्याही कायदेशीर व शासकीय कामकाजासाठी अवैध समजण्यात येतील. सदर विना स्वाक्षरीत अभिलेख कोणत्याही सेतू सेवा केंद्र / आपले सरकार सेवा केंद्र / महा ई सेवा केंद्र अथवा संग्राम सेवा चालक यांना त्यांच्या सही शिक्क्याने विक्री / वितरण करता येणार नाही. याबाबत सविस्तर सूचना माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दिनांक १९/१२/२०१९ रोजीचे शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

८. भूमि अभिलेख विभागाच्या संकेतस्थळावरुन डिजीटल स्वाक्षरीने वितरीत होणा-या नकलेची नक्कल फी जमाबंदी आयुक्त यांचे स्वीय प्रपंजी लेखा खात्यात जमा होईल व प्रत्येक महिना अखेरीस प्राप्त नक्कल फी पैकी शासनाचा हिस्सा नक्कल फी व्यवस्थापन प्रणाली (Online Accounting System) मधून प्राप्त अहवालाप्रमाणे GRAS प्रणालीद्वारे शासनाच्या विहित लेखा शीर्षाखाली जमा करणे आवश्यक राहील.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०३२८१४५५१८००१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=c8a7d6860ff227fd9e69a02e9ca5dfb2ccb25eda92d749629970f349fc6ed260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2025.03.28 14:56:30 +05'30'

(संजय बनकर)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री [नगरविकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.)] यांचे सचिव.
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क) यांचे सचिव.
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
८. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय,बुलढाणा

विषय क्र.११

जमीन विषयक अधिनियम सुधारणा अधिसूचना

जिल्हा महसूल प्रशासन,बुलढाणा

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक ६७] शुक्रवार, जून ४, २०२१/ज्येष्ठ १४, शके १९४३ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १४६

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ जून २०२१

अधिसूचना

खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७.

क्रमांक गौखनि-१०/०२२०/प्र.क्र.३९/ख-२.—खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) याच्या कलम १५ ची पोट-कलमे (१) आणि (३) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहे : —

१. या नियमांना महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) (सुधारणा) नियम, २०२१ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ याच्या अखेरीस असलेल्या अनुसूची १ व अनुसूची २ ऐवजी पुढील अनुसूची दि. १ जुलै २०२१ पासून लागू करण्याकरिता समाविष्ट करण्यात येत आहे :—

अनुसूची एक

स्वामित्वधनाचे दर

[नियम ४६ (एक) आणि ५९ (१) पहा].

अ.क्र. (१)	गौण खनिजे (२)	स्वामित्वधनाचे दर (३)
१	बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात येणारा चुना तयार करण्यासाठी भट्टयांमध्ये वापरण्यात येणारी चुनखडी व शिंपल्यापासून केलेला चुना.	रुपये ६००/- प्रति ब्रास
२	उत्खननाद्वारे किंवा गोळा करून काढलेले सर्व दगड मग त्याचा आकार केवढाही असो आणि दगडाची भुकटी.	रुपये ६००/- प्रति ब्रास
३	बांधकामासाठी वापरण्यात येणारा जांभा दगड (लॅटराईट स्टोन)	रुपये १५०/- प्रति ब्रास

४	(क) उत्खननाद्वारे काढलेले किंवा गोळा केलेले गोटे, बारीक खडी , मुरूम , कंकर.	रुपये ६००/-प्रति ब्रास
	(ख) केवळ बॉलमिल्सच्या प्रयोजनाकरिता वापरण्यात येणारे चॅल्सेडोनी खडे	रुपये ३०००/- प्रति ब्रास
	(ग) पुढील प्रयोजनाकरिता वापरण्यात न येणारी सर्वसामान्य वाळू :- (एक) सिरामिक किंवा मृतिकाशिल्पे तयार करण्याच्या प्रयोजनार्थ (दोन) धातुशास्त्रीय प्रयोजनार्थ (तीन) दृष्टिविषयक प्रयोजनार्थ (चार) कोळसा खाणीमध्ये साठवून ठेवण्याच्या प्रयोजनार्थ (पाच) सिल्व्हीक्रेट सिमेंट तयार करण्यासाठी (सहा) मातीची भांडी व काच सामान तयार करण्यासाठी.	(१) मुंबई महानगर प्रदेश क्षेत्राकरिता रुपये १२००/-प्रति ब्रास. (२) मुंबई महानगर प्रदेश क्षेत्र वगळून इतर क्षेत्राकरिता रुपये ६००/-प्रति ब्रास.
५	कौले (मंगलोरी किंवा अन्य कोणत्याही प्रयोजनाची) तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी साधी चिकणमाती.	रुपये ६००/- प्रति ब्रास
६	अंतर्गत बंधारे, रस्ते, लोहमार्ग व इमारती यांचे बांधकाम करताना भरणा करण्यासाठी/भूपृष्ठ सपाट करण्यासाठी वापरण्यात येणारी साधी माती.	रुपये ६००/- प्रति ब्रास
७	बांधकामाचे साहित्य म्हणून वापरण्यात येते, त्यावेळी पाटीचा दगड किंवा नरम खडक.	रुपये ६००/- प्रति ब्रास
८	विटा तयार करण्याच्या व इतर प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी साधी माती, गाळ व सर्व प्रकारची चिकणमाती, इत्यादी.	रुपये २४०/- प्रति ब्रास
९	फुलरची माती किंवा बेटोनाईट	रुपये १५००/- प्रति ब्रास
१०	सजावटीच्या प्रयोजनासाठी वापरावयाचे इतर सर्व प्रकारचे दगड (ग्रॅनाईट वगळून.	रुपये ३०००/- प्रति ब्रास
११	इतर सर्व गौण खनिज (ग्रॅनाईट वगळून व केंद्र शासनाने दिनांक १० फेब्रुवारी २०१५ अन्वये घोषित केलेली गौण खनिजे वगळून).	रुपये ६००/- प्रति ब्रास

अनुसूची दोन

ठोकबंद भाडे

[नियम ४६ (पाच) पहा]

गौण खनिजे (ग्रॅनाईट वगळून व केंद्र शासनाने दिनांक १० फेब्रुवारी २०१५ अन्वये घोषित केलेली गौण खनिजे वगळून).	रु . ९,००० प्रति हेक्टर किंवा त्याच्या भागासाठी

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रमेश चव्हाण,
शासनाचे सहसचिव.

REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 4th June 2021

NOTIFICATION

MINES AND MINERALS (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1957.

No. gaukhni-10/0220/C.R.39/kh-2.— In exercise of the powers conferred by sub- sections *(1)* and (*3*) of section 15 of the Mines and Minerals (Development and Regulation) Act, 1957 *(*67 of 1957*),* and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Minor Mineral Extraction (Development and Regulation) Rules, 2013, as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Minor Mineral Extraction (Development and Regulation) *(*Amendment) Rules, 2021.

2. For Schedule I and Schedule II appended to the Maharashtra Minor Mineral Extraction (Development and Regulation) Rules, 2013, the following Schedules shall be substituted with effect from the 1st July *2*021, namely :—

SCHEDULE-I

Rates of Royalties
[See rule 46 (*i*) and 59 (*1*)*]*

Sr. No. (1)	Minor Minerals (2)	Rate of Royalty (3)
1	Limestone and lime shell used in kilns for manufacture of lime used as building material.	Rs.600 per brass
2	All Stones removed irrespective of size including stone dust either by excavation or collection.	Rs.600 per brass
3	Laterite Stone used for building purpose (Jambha Stone)	Rs 150 per brass
4	(a) Shingle, Gravel, Murum, Kankar all removed either by excavation or collection.	Rs.600 per brass
	(b) Chalcedony pebbles used for ball mill purposes only.	Rs.3,000 per brass
	(c) Ordinary sand not used for the following purposes, namely :— (i) Purposes of refractory and manufacture of ceramic (ii) Metallurgical purposes (iii) Optical purposes (iv) Purposes of stowing in coal mines (v) For manufacture of silvicrete cement (vi) For manufacture of pottery and glass.	(i) Rs. 1200 per brass in the area of Mumbai Metropolitan Region. (ii) Rs. 600 per brass in the area other than Mumbai Metropolitan Region.
5	Ordinary clay, when used for manufacture of tiles (Mangalore pattern or any other purpose).	Rs.600 per brass
6	Ordinary earth used for filling or levelling purpose in construction of embankment, Roads, Railways and Building.	Rs.600 per brass
7	Slate and Shale when used for building material	Rs.600 per brass
8	Earth, Silt and all types of clays etc. used for manufacture of bricks and other purposes.	Rs.240 per brass

9	Fullers earth or Bentonite	Rs. 1500 per brass
10	All stones (excluding Granite) intended for use for decorative purposes.	Rs.3000 per brass
11	All other minor minerals (excluding Granite and minor minerals declared by Central Government Notification dated 10th February 2015).	Rs.600 per brass

SCHEDULE-II

Dead Rent

[*See* rule 46 (*v*)]

All Minor Minerals (Excluding Granite and minor minerals declared by Central Government Notification dated 10th February 2015).	Rs. 9000 per hectare or portion thereof.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAMESH CHAVAN,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHBIL/2009/31733

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-अ

वर्ष ७, अंक ६९] बुधवार, जुलै १४, २०२१/आषाढ २३, शके १९४३ [पृष्ठे १८, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक १२०

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

सामान्य प्रशासन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि. १४ जुलै, २०२१

अधिसूचना

भारताचे संविधान.

क्रमांक.- एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२ - भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान केलेल्या प्राधिकाराचा वापर करुन महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, "महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम, २०१५" आणि या संदर्भात अस्तित्वात असलेल्या किंवा निर्गमित केलेल्या सर्व शासन अधिसूचना, आदेश किंवा अभिलेख अधिक्रमित करुन पुढीलप्रमाणे गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम करीत आहेत :-

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ -** (१) या नियमांस " महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम**,** २०२१ " असे म्हणावे.

(२) हे नियम ज्या दिनांकास **शासकीय राजपत्रात** अधिसूचित होतील, त्या दिनांकापासून लागू होतील.

२. **प्रयुक्ति**.-

(१) हे नियम लागू होतील ,-

(क) गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) मधील पदे;

(ख) ज्या पदांची सेवाज्येष्ठतायादी राज्यस्तरावर ठेवण्यात येते अशी पदे;

(ग) ज्या संवर्गातील मंजूर पदसंख्या तीस किंवा त्यापेक्षा जास्त आहे, अशी पदे.

(२) हे नियम लागू होणार नाहीत,-

(क) विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन अध्यापकीय पदे;

(ख) नक्षलग्रस्त भागात व राज्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी तरुण अधिकाऱ्यांना प्राधान्याने नियुक्ती देण्याच्या अनुषंगाने राज्य पोलीस दलातील गट "अ" व गट "ब" मधील सरळसेवेने नियुक्त होणारे अधिकारी;

(ग) राज्याच्या महसूल विभागाच्या अधिपत्याखालील अतिरिक्त जिल्हाधिकारी व अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या संवर्गाला

(घ) राज्याच्या वित्त विभागाच्या अधिपत्याखालील राज्य वस्तू व सेवा कर विभागातील पदांना;

३. **व्याख्या :-** या नियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(क) "प्रशासकीय विभाग" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाच्या कार्यनियमावलीत नमूद केलेले राज्य शासनाचे मंत्रालयीन विभाग;

(ख) " नियुक्ती प्राधिकारी " याचा अर्थ "गट अ" आणि "गट ब" (राजपत्रित व अराजपत्रित) सेवेत किंवा त्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत नेमणूक करण्यास सक्षम असलेला प्राधिकारी, असा आहे;

(ग) " आयोग " याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, असा आहे;

(घ) "शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(ङ) "गट अ" व "गट ब" पदे याचा अर्थ पदनिर्मितीच्या आदेशात किंवा आकृतीबंधाच्या आदेशात किंवा सेवाप्रवेश नियमात विवक्षितपणे गट अ,/गट ब म्हणून वर्गीकृत केलेली, शासनाच्या नियंत्रणाखालील पदे असा आहे ;

(च) "महसुल विभाग" याचा अर्थ, महसूल विभाग वाटपाच्या प्रयोजनार्थ शासनाने निश्चित केलेले नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नाशिक , कोकण-१ (पालघर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग हे तीन जिल्हे) , कोकण-२ (रायगड, ठाणे, मुंबई उपनगर व मुंबई शहर हे चार जिल्हे) आणि पुणे हे सात महसूल विभाग असा आहे.

(छ) "निवडसमिती" याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आायोगाच्या कक्षेतून महाराष्ट्र लोकसेवा आयोग (विचारविनियमापासून सूट) विनियम, १९६५ नुसार वगळलेल्या गट "अ" व गट "ब" मधील पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी स्थापन केलेली निवडसमिती, असा आहे;

(ज) "एकल पालकत्व " याचा अर्थ कायदेशीररित्या जी व्यक्ती त्याच्या पाल्याचे जोडीदाराच्या शिवाय (पती किंवा पत्नी) एकट्यानेच पालनपोषण करीत आहे .

(झ) "राज्य" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे;

(ञ) "राज्यस्तरीय विभागप्रमुख" म्हणजे राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखाली असलेल्या राज्यस्तरीय यंत्रणेचे प्रमुख असा आहे;

(ट) "अध्यापकीय पदे" याचा अर्थ ज्या पदांवरील शासकीय कर्मचारी शाळा/महाविद्यालय/ विद्यापीठ/ तंत्रनिकेतन यामध्ये प्रत्यक्ष अध्यापनाचे काम करतात अशी पदे असा आहे.

४. **महसूल विभागात नियुक्ती-** गट "अ" व गट "ब (राजपत्रित व अराजपत्रित) " मधील पदांवर सरळसेवेद्वारे आणि पदोन्नतीद्वारे नियुक्ती, या नियमानुसार महसूल विभागांमध्ये करण्यात येईल.

५. **महसूल विभागनिहाय पदसंख्या निश्चित करणे-** अशी नियुक्ती करण्यापूर्वी , शासनाचा प्रत्येक प्रशासकीय विभाग त्यांच्याकडील गट "अ" व गट "ब" मधील प्रत्येक संवर्गातील एकूण मंजूर पदांची महसूल विभागनिहाय पदसंख्या निश्चित करेल.

६. **महसूल विभाग वाटप करताना अनुसरावयाची कार्यपध्दती:-** गट "अ" व गट "ब" मधील पदांवर सरळसेवेद्वारे आणि पदोन्नतीद्वारे विहित कार्यपध्दतीनुसार नियुक्ती करताना, सदर नियमावली नुसार पुढीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करुन महसूल विभाग वाटप करण्यात येईल.

अ.क्र. (१)	महसूल विभाग वाटपाचे टप्पे (२)
(१)	**महसूल विभाग वाटपासाठी पात्र उमेदवार/अधिकाऱ्यांची पदसंख्या :-** (क) सरळसेवेने नियुक्तीकरिता, यथास्थिती, आयोग किंवा निवडसमिती यांच्याकडून प्राप्त शिफारस किंवा गुणवत्ता यादी नुसार प्रत्यक्ष रुजू होणाऱ्या व नियुक्तीसाठी पात्र असणाऱ्या उमेदवारांची संख्या म्हणजेच महसूल विभाग वाटपासाठी पात्र उमेदवारांची पदसंख्या होय. (ख) पदोन्नतीने नियुक्तीकरिता, निवडसूचीनुसार उपलब्ध अधिकाऱ्यांची संख्या म्हणजेच महसूल विभाग वाटपासाठी पात्र अधिकाऱ्यांची पदसंख्या होय.
(२)	**रिक्त पदांची संख्या :-** महसूल विभाग वाटपाच्या वेळेस, नियम ५ नुसार महसूल विभाग निहाय निश्चित केलेल्या मंजूर पदांपैकी प्रत्यक्षात भरलेली पदे वगळून महसूल विभाग निहाय रिक्त पदे.
(३)	**गुणवत्तायादी/ निवडसूचीतील संबंधित अधिकाऱ्यांना कळविण्याच्या बाबी :-** (क) नियम ६(१) नुसार महसूल विभाग वाटपासाठी अधिकाऱ्यांची पदसंख्या (ख) नियम ६(२) नुसार महसूल विभाग निहाय रिक्त पदांची संख्या (ग) वाटप करण्यासाठी उपलब्ध असणारी पदे ही महसूल विभागनिहाय रिक्त पदांच्या समप्रमाणात वाटप करण्यात येतील. (घ) संबंधित अधिकाऱ्यांकडून केवळ **एकाच** महसूल विभागाची पसंती मागविण्यात येईल. (ङ) संबंधित अधिकाऱ्यांकडून अशी पसंती मागविताना नियम ७ नुसार त्यांना महसूल विभाग वाटपातून सूट अनुज्ञेय आहे किंवा कसे याची माहिती मागविण्यात येईल. जर सूट अनुज्ञेय असेल तर त्या बाबतचे कारण व त्या पुष्ट्यर्थ कागदपत्रेही संबंधितांकडून मागविण्यात येईल.
(४)	**महसूल विभागनिहाय वाटप करावयाच्या पदांची संख्या निश्चित करणे :-** **(क) वाटपामधून सूट दयावयाची प्रकरणे** -सर्वप्रथम नियम ७ नुसार महसूल विभाग वाटपातून सूट अनुज्ञेय असणाऱ्या अधिकाऱ्यांना, त्यांनी पसंती दिलेला महसूल विभाग वाटप करण्यात येईल.

	(ख) वाटप करावयाच्या पदांची संख्या निश्चित करणे - उपरोक्त नियम ६ (१) नुसार महसूल विभाग वाटपासाठी पात्र उमेदवार/अधिकाऱ्यांच्या पदसंख्येतून वरील नियम ६(४) (क)नुसार सूट द्यावयाच्या पदांची संख्या वजा केल्यानंतर जी पदे शिल्लक राहतात ती पदे म्हणजे वाटप करावयाच्या पदांची संख्या होय. **(ग) महसूल विभाग निहाय शिल्लक रिक्त पदांची संख्या निश्चित करणे -** उपरोक्त नियम ६(२) नुसार महसूल विभागनिहाय रिक्त पदांच्या संख्येतून, नियम ६ (४)(क) नुसार सूट दिलेल्या प्रकरणांची महसूल विभाग निहाय पदांची संख्या वजा करुन, महसूल विभाग निहाय शिल्लक रिक्त पदांची संख्या निश्चित येईल. **(घ) वाटप करावयाची पदे महसूल विभागनिहाय शिल्लक रिक्त पदांच्या समप्रमाणात निश्चित करणे-** वरील नियम ६(४) (ख) नुसार वाटप करावयाची पदे, ही उपरोक्त नियम ६ (४) (ग) नुसार महसूल विभाग निहाय रिक्त पदांच्या समप्रमाणात वाटप करण्यासाठी निश्चित करण्यात येतील.
(५)	**महसूल विभाग निहाय वाटपाची कार्यवाही-** उपरोक्त नियम ६(४) नुसार, महसूल विभागनिहाय वाटप करावयाच्या पदांची संख्या निश्चित झाल्यानंतर खालीलप्रमाणे महसूल विभाग निहाय वाटपाची कार्यवाही करण्यात येईल. **(क) पसंतीनुसार महसूल विभाग वाटप-** वरील नियम ६ (४)(घ) नुसार महसूल विभागनिहाय रिक्त पदांच्या समप्रमाणात वाटपासाठी निश्चित केलेल्या पदसंख्येच्या मर्यादेत, गुणवत्ता यादीतील क्रमानुसार /निवडसूचीतील क्रमानुसार अधिकाऱ्यांची पसंती विचारात घेऊन महसूल विभाग वाटप करण्यात येईल. **(ख) चक्राकार पध्दतीने महसूल विभाग वाटप-** वरील नियम ६(५)(क) नुसार कार्यवाही केल्यानंतर, ज्या अधिकाऱ्यांनी पसंती दिलेल्या महसूल विभागात वाटपासाठी पद उपलब्ध नसेल, अशा अधिकाऱ्यांना वाटपासाठी शिल्लक राहिलेल्या महसूल विभागांमध्ये चक्राकार पध्दतीने महसूल विभाग वाटप करण्यात येईल. चक्राकार पध्दतीने विभाग वाटप करताना त्याची क्रमवारी नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण-१, नाशिक , कोकण-२, पुणे अशी राहील. या क्रमवारीनुसार अधिकाऱ्यांना त्यांच्या गुणवत्ता यादी/निवडसूचीतील क्रमानुसार प्रत्येकी एक महसूल विभाग वाटप करण्यात येईल.
(६)	**महसूल विभागांतर्गत पदस्थापना देणे-** महसुल विभाग वाटपानुसार, संबंधित महसूल विभागातील निरनिराळया जिल्हयातील रिक्त पदे विचारात घेऊन प्रशासकीय विभाग पदे भरण्याचे प्राधान्य ठरवेल. महसूल विभागांतर्गत पदस्थापना करताना, प्रशासकीय विभाग नियम ९ येथील निकष विचारात घेतल्याची खातरजमा करेल.

टीप- उपरोक्त कार्यपध्दतीनुसार महसूल विभाग वाटप करण्यासाठी सुलभ संदर्भासाठी उदाहरण या नियमांसोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये देण्यात आले आहे.

७. महसूल विभाग वाटपातून सूट अनुज्ञेय असणारी प्रकरणे :-

(१) खालील परिस्थितीत अधिकाऱ्यांना महसूल विभाग वाटपातून सूट अनुज्ञेय राहील.

(क) जे अधिकारी स्वत: अपंग आहेत;

(ख) ज्या अधिकाऱ्याचा जोडीदार किंवा त्याचे मूल मतिमंद आहे किंवा ज्या अधिकाऱ्यांनी मतिमंद असलेल्या स्वत:च्या भावाचे किंवा बहिणीचे पालकत्व स्वीकारलेले आहे;

(ग) कायदेशीर कागपत्राद्वारे एकल पालकत्व सिध्द झालेले अधिकारी;

(घ) विभागीय पदोन्नती समितीने ज्या तारखेस पदोन्नतीस पात्र असल्याची शिफारस केली असेल त्या तारखेस ज्या अधिकाऱ्यास सेवा निवृत्तीस तीन वर्ष किंवा त्यापेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे.

(२) उपरोक्त पोटनियम (१) मध्ये नमूद परिस्थितीत, संबंधित प्रशासकीय विभाग, संबंधित अधिकाऱ्यास त्याच्या सोयीचा महसूल विभाग उपरोक्त नमूद क्रम आणि रिक्त पदांची उपलब्धता विचारात घेऊन वाटप करेल.

८. वाटप झालेल्या महसूल विभागात व्यतित करावयाचा सेवा कालावधी:-

गट अ व गट ब च्या पदावर सरळसेवेने / पदोन्नतीने नियुक्त अधिकारी वाटप करण्यात आलेल्या संबंधित महसूल विभागात खालील तक्त्यात नमूद केलेला सेवा कालावधी पूर्ण करेल.

गट (१)	सेवा कालावधी (२)
गट अ	३ वर्षे
गट ब (राजपत्रित/अराजपत्रित)	३ वर्ष

टीप:- हे नियम **शासन राजपत्रात** प्रसिध्द होण्यापूर्वी ज्या अधिकाऱ्यांना "महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम, २०१५"मधील तरतूदीनुसार महसूल विभाग वाटप करण्यात आलेले आहे, अशा अधिकाऱ्यांनी या नियमात नमूद केलेला संबंधित महसूल विभागातील सेवेचा कालावधी पूर्ण केला असल्यास, ते महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ (सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २१)नुसार बदलीस पात्र राहतील.

९. वाटप केलेल्या महसूल विभागांतर्गत पदस्थापना देण्याबाबतचे निकष:-

वाटप केलेल्या महसूल विभागांतर्गत पदस्थापना देताना, आदिवासी विभागाने घोषीत केलेल्या आदिवासी क्षेत्रातील व गृह विभागाने घोषीत केलेल्या नक्षलग्रस्त क्षेत्रातील तसेच, केंद्र शासनाने जाहिर केलेल्या आकांक्षित जिल्हयातील रिक्त पदे प्राधान्याने भरण्यात येतील.

१०. महसूल विभागनिहाय कार्यरत पदांची यादी अद्ययावत ठेवणे:-

प्रत्येक वेळी महसूल विभाग वाटप केल्यानंतर, नियुक्ती प्राधिकारी महसूल विभागनिहाय कार्यरत अधिकाऱ्यांची पदांनिहाय यादी अद्ययावत ठेवेल.

११. महसूल विभाग वाटपाचे अधिकार :-

(१) या नियमातील तरतुदीनुसार अधिकाऱ्यांना महसूल विभाग वाटप करण्यास संबंधित प्रशासकीय विभाग सक्षम राहतील. यासाठी शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाची सहमती घेण्याची प्रशासकीय विभागास आवश्यकता रहाणार नाही.

(२) या नियमातील तरतुदीनुसार गट "ब" पदावर सरळसेवेने आणि पदोन्नतीने नियुक्ती करताना महसूल विभाग वाटपाचे अधिकार संबंधित प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील राज्यस्तरीय विभाग प्रमुख यांना प्रदान करण्यात येत आहेत आणि यासाठी शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाची सहमती घेण्याची प्रशासकीय विभागाला आवश्यकता नाही.

१२. **गंभीर आजाराच्या कारणास्तव महसूल विभाग बदलून देणे :--**

(१) या नियमानुसार महसूल विभाग वाटप केल्यानंतर, वाटप करण्यात आलेल्या विभागात **किमान एक वर्ष सेवा पूर्ण केल्यानंतरच**, शासकीय अधिकारी स्वत: किंवा यथास्थिती पती वा पत्नी वा त्यांची मुले वा त्यांच्यावर अवलंबून असलेले व त्यांच्यासोबतच राहणारे शासकीय अधिकाऱ्याचे आई किंवा वडील किंवा भाऊ किंवा बहिण तसेच ,महिला अधिकाऱ्यांचे सासरे किंवा सासू यापैकी कोणीही खालील नमूद गंभीर आजाराने पिडीत असल्यास, संबंधित अधिकारी महसूल विभाग बदलून मिळण्यासाठी अर्ज करु शकतील.

१. ह्रदय शस्त्रक्रियांची प्रकरणे
२.मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया किंवा किडनी डायलेसिस,
३.कर्करोग
४. ब्रेन टयुमर किंवा मेंदूवरील शस्त्रक्रिया
५. निश्चेतनावस्था (कोमा)
६. मनोविकृतीने ग्रस्त

(२) पोटनियम (१) खाली प्राप्त अर्जांचा संबंधित प्रशासकीय विभाग विचार करेल आणि महसूल विभाग बदलून देऊ शकेल. यासाठी वेगळयाने सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घेण्याची प्रशासकीय विभागाला आवश्यकता राहणार नाही.

१३. **संबंधित महसूल विभागात विहित मुदतीत रुजू न झाल्यास होणारे परिणाम :-** जर संबंधित अधिकारी या नियमानुसार वाटप झालेल्या संबंधित महसूल विभागात पदस्थापनेचे आदेश निर्गमित केल्यानंतर, ३० दिवसाच्या विहित मुदतीत संबंधित महसूल विभागात रुजू झाला नाही तर संबंधित अधिकाऱ्याचा अनुपस्थितीचा कालावधी अकार्यदिन (dies non) म्हणून गणला जाईल.

१४. **पुढील पदोन्नतीपूर्वी नागपूर, अमरावती, औरंगाबाद व कोकण -१ या महसूल विभागात सेवा करणे :** - या महसूल विभाग वाटप नियमावलीनुसार, सरळसेवा अथवा पदोन्नतीने सर्वप्रथम पदस्थापना केल्यानंतर, संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना त्यांच्या पुढील पदोन्नतीपूर्वी नागपूर, अमरावती, औरंगाबाद व कोकण -१ यापैकी कोणत्याही एका महसूल विभागात किमान ३ वर्ष सेवा करणे बंधनकारक राहील.

१५. **महसूल विभाग वाटप नियमांचे काटेकोरपणे पालन करणे :-**

(१) या नियमावलीद्वारे विहित करण्यात आलेल्या महसूल विभाग वाटप नियमांचे काटेकोरपणे पालन होईल, याची संबंधित प्रशासकीय विभागांनी दक्षता घ्यावी.

(२) जर नियम ११ नुसार महसूल विभाग वाटपाचे अधिकार देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी या नियमांचे उल्लंघन करणारे पदस्थापनेचे प्रस्ताव सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेस्तव सादर केल्याचे आढळून आले तर त्याची गंभीर दखल घेतली

जाईल व अशा अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई केली जाईल.

१६. प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे :- सदरहू नियम **राजपत्रात** प्रसिध्द झाल्याच्या दिनांकास, महसूल विभाग वाटपासाठी प्रलंबित असलेली सर्व प्रकरणे आणि महसूल विभाग बदलण्यासाठीचे प्रलंबित अर्ज या नियमातील तरतूदीनुसार निकाली काढले जातील.

१७. निरसन :- हे नियम **राजपत्रात** प्रसिध्द झाल्याच्या दिनांकास "महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम, २०१५" निरसित होतील.

परिशिष्ट

महसूल विभाग वाटप करण्यासाठी सुलभ संदर्भासाठीचे उदाहरण

(पहा मुख्य नियम ६)

(I) नियम ६ (४) नुसार महसूल विभागनिहाय वाटप करावयाच्या पदांची संख्या निश्चित करणे

क्र.	महसूल विभाग	नागपूर	अमरावती	औरंगाबाद	कोकण- १	नाशिक	कोकण -२	पुणे	एकूण
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
१	मंजूर पदांची संख्या	७९	७०	९७	४८	६७	१०	७२	४४३
२	भरलेल्या पदांची संख्या	५५	४९	६५	३२	५८	४	५४	३१७
३	रिक्त पदांची संख्या (नियम ६ (१) नुसार) (रकाना क्र. १ - रकाना क्र. २)	२४	२१	३२	१६	९	६	१८	१२६
	(i)महसूल विभाग वाटपासाठी पात्र उमेदवार/अधिकाऱ्यांची पदसंख्या ५० आहे .								
	(ii) नियम ७ नुसार सूट दयावयाची प्रकरणांची संख्या ८ आहे.								
४	नियम ६ (४) (क)नुसार सुट देण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांना पसंतीनुसार वाटप केलेला महसूल विभाग	२	२	१	१	०	१	१	८
	(iii) त्यामुळे नियम ६ (४)(ख) नुसार वाटप करावयाच्या पदांची संख्या ४२ येईल. (उपरोक्त (i) नुसार ५० पात्र अधिकाऱ्यांची संख्या वजा (ii) नुसार सूट द्यावयाची ८ प्रकरणे)								
५	वरील रकाना क्र. ४ प्रमाणे सूट दिलेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या पसंतीनुसार महसूल विभाग वाटप केल्यानंतर महसूल विभाग निहाय शिल्लक रिक्त पदे (रकाना क्र. ३ - रकाना क्र. ४)	२२	१९	३१	१५	९	५	१७	**११८**

६	वाटप करावयाची पदे महसूल विभाग निहाय शिल्लक रिक्त पदांच्या समप्रमाणात निश्चित करणे . [(महसूल विभागनिहाय रिक्त पदे/एकूण रिक्त पदे)x वाटप करावयाच्या पदांची संख्या]	(२२/११८) x४२= ७.८३	(१९/११८)x ४२= ६.७६	(३१ /११८)x४२ = ११.०३	(१५/११८) x४२= ५.३४	(९/११८) x४२= ३.२०	(५/११८) x४२= १.७८	(१७/११८) x४२= ६.०५	
७.	वाटप करावयाच्या पदांची पूर्णांकात संख्या	८	७	११	५	३	२	६	४२

(II) नियम ६ (५) नुसार महसूल विभाग निहाय वाटपाची कार्यवाही

क्र.	महसूल विभाग	नागपूर	अमरावती	औरंगाबाद	कोकण- १	नाशिक	कोकण -२	पुणे	एकूण
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
१.	वाटप करावयाच्या पदांची संख्या	८	७	११	५	३	२	६	४२
२.	संबंधित अधिकाऱ्यांनी पसंती दिलेले महसूल विभाग	७	४	५	५	६	६	९	४२
३.	अधिकाऱ्यांनी दिलेल्या पसंतीनुसार महसूल विभाग वाटप करणे.	७	४	५	५	३	२	६	३२
४.	पसंतीनुसार विभाग वाटप केल्यानंतर, चक्राकार पध्दतीने वाटपासाठी शिल्लक विभाग	१	३	६	०	०	०	०	१०

गुणवत्ता यादी/ निवडसूची- तील क्रमांक	अधिकाऱ्याचे नाव	पसंती दिलेला महसूल विभाग	सूट दिलेल्या प्रकरणी महसूल विभाग वाटप	पसंतीनुसार महसूल विभाग वाटप	पसंतीनुसार महसूल विभाग न मिळालेल्यांना चक्राकार पध्दतीने महसूल विभाग वाटप
१	क	कोकण१ (१)		कोकण१ (१)	---
२	ख	नागपूर (१)		नागपूर (१)	---
३	ग	नाशिक (१)		नाशिक (१)	---
४	घ*	कोकण२*	कोकण२ *	---	---
५	च	पुणे -(१)		पुणे -(१)	---
६	छ	अमरावती (१)		अमरावती (१)	---
७	ज	औरंगाबाद (१)		औरंगाबाद (१)	---
८	झ	कोकण१ -(२)		कोकण१ -(२)	---
९	ट	पुणे (२)		पुणे (२)	---
१०	**ठ***	पुणे *	पुणे *	---	---
११	ड*	नागपूर*	नागपूर*	---	---
१२	**ढ**	कोकण २ (१)		कोकण २ (१)	---

गुणवत्ता यादी/ निवडसूची-तील क्रमांक	अधिकाऱ्याचे नाव	पसंती दिलेला महसूल विभाग	सूट दिलेल्या प्रकरणी महसूल विभाग वाटप	पसंतीनुसार महसूल विभाग वाटप	पसंतीनुसार महसूल विभाग न मिळालेल्यांना चक्राकार पध्दतीने महसूल विभाग वाटप
१३	ण	नाशिक(२)		नाशिक(२)	---
१४	त	**औरंगाबाद** (२)		**औरंगाबाद** (२)	---
१५	थ	कोकण२-(२)		कोकण२-(२)	**---**
१६	द	पुणे(३)		पुणे(३)	---
१७	ध	नागपूर (२)		नागपूर (२)	---
१८	न	अमरावती (२)		अमरावती (२)	---
१९	प	औरंगाबाद (३)		औरंगाबाद (३)	---
२०	फ	कोकण१-(३)		कोकण१-(३)	---
२१	ब	नाशिक(३)		नाशिक(३)	---
२२	भ	कोकण२ (३)			नागपूर (८)
२३	म	नागपूर(३)		नागपूर(३)	---
२४	य*	अमरावती*	अमरावती*	---	---
२५	र	नागपूर (४)		नागपूर (४)	---
२६	ल	कोकण१-(४)		कोकण१-(४)	
२७	कक	नाशिक (४)			**अमरावती (५)**
२८	कख	पुणे(४)		पुणे(४)	
२९	कग*	औरंगाबाद*	औरंगाबाद*	---	---
३०	कघ	कोकण२ (४)			औरंगबाद (६)
३१	कच	नागपूर (५)		नागपूर (५)	---
३२	कछ	अमरावती (३)		अमरावती (३)	---
३३	कज	कोकण १(५)		कोकण १(५)	**---**
३४	कझ	नागपूर (६)		नागपूर (६)	---
३५	कट	पुणे(५)		पुणे(५)	**---**
३६	**कठ**	पुणे(६)		पुणे(६)	**---**
३७	कड	अमरावती (४)		अमरावती (४)	---
३८	**कढ***	नागपूर*	नागपूर*	---	---
३९	कण	कोकण २ (५)			**अमरावती (६)**
४०	कत	औरंगाबाद(४)		औरंगाबाद(४)	---
४१	कथ	नाशिक (५)			**औरंगाबाद (७)**
४२	कद	पुणे (७)			**अमरावती (७)**
४३	कध*	अमरावती*	अमरावती*	---	---

गुणवत्ता यादी/ निवडसूची-तील क्रमांक	अधिकाऱ्याचे नाव	पसंती दिलेला महसूल विभाग	सूट दिलेल्या प्रकरणी महसूल विभाग वाटप	पसंतीनुसार महसूल विभाग वाटप	पसंतीनुसार महसूल विभाग न मिळालेल्यांना चक्राकार पध्दतीने महसूल विभाग वाटप
४४	कन	पुणे (८)			**औरंगाबाद (८)**
४५	कप*	कोकण १*	कोकण १*	---	---
४६	कफ	नाशिक (६)			**औरंगाबाद (९)**
४७	कब	औरंगाबाद(५)		औरंगाबाद(५)	---
४८	कभ	नागपूर (७)		नागपूर (७)	---
४९	कम	कोकण २ (६)			**औरंगाबाद (१०)**
५०	कय	पुणे (९)			**औरंगाबाद(११)**
		एकूण	८	३२	१०
				एकूण सर्व	५०

* नियम ७ नुसार महसूल विभाग वाटपातून सूट मिळालेले अधिकारी

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

गीता कुलकर्णी,
शासनाचे उप सचिव.

क्रमांक - एसआरव्ही २०२०/प्र.क्र. ४९ /कार्या.१२

सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दि. १४ जुलै, २०२१

१. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
४. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
६. सर्व मा. संसद सदस्य/विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
७. मा.मुख्य सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
९. *प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१०. *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
११. *प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१२. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१३. *प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई,
१४. *प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), मंबई,
१५. *सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१६. *महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
१७. *महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
१८. *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
१९. *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
२०. *सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे कार्यालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई,
२१. *प्रबंधक, राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई ४०० ००१,
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (२ प्रती प्रसिध्दीकरिता),
२३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२४. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
२५. सर्व विभागीय आयुक्त,
२६. सर्व जिल्हाधिकारी,
२७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२८. सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
२९. सामान्य प्रशासन विभाग/का. ३९ (महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरिता),
३०. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१० प्रती)
३१. बहुजन समाज पार्टी, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य, बी.एस.पी. भवन, प्लॉट नं. ८३-अे, कलेक्टर कॉलनी, चेंबूर, मुंबई ७४ (५ प्रती)
३२. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरॅक नं.१ योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई २० (५ प्रती)
३३. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस. व्ही.पटेल रोड, मुंबई ४ (५ प्रती)
३४. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३ (५ प्रती),
३५. इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५ (५ प्रती),

GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 14th July 2021

NOTIFICATION

CONSTITUTION OF INDIA.

No. SRV2020/C.R.49/Desk12.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of the Revenue Division Allotment for appointment by nomination and promotion to the posts of Group "A" and Group "B" (Gazetted and Non-Gazetted) of the Government of Maharashtra Rules, 2015 and of all the existing Government Notifications, orders or instruments made or issued in this behalf, the Governor of Maharashtra is hereby makes the following rules, for Allotment of Revenue Divisions, for appointment by nomination and promotion to Group A and Group B (Gazetted and Non-Gazetted) posts, namely :—

1. ***Short title and commencement.****-(1)* These rules may be called the Maharashtra Government Allotment of Revenue Divisions for appointment by nomination and promotion to the posts in Group A and Group B (Gazetted and Non-Gazetted) Rules, 2021.

(2) These rules shall come into force on the date of publication of these rules in the *Official Gazette.*

2. ***Application.***-

(1) These rules shall be applicable,-

(a) to the posts in Group A and Group B (Gazetted and Non-Gazetted);

(b) to the posts of which seniority list is maintained at State Level;

(c) to the posts or cadres of which total sanctioned number of posts are thirty or more.

(2) These rules shall not be applicable,-

(a) to teaching posts, by taking in to account the academic interest of students ;

(b) to directly recruited officers from Group A and Group B from State Police Force with a purpose of appointing younger officers on priority in Naxlaite areas and Police Head Quarter of the State;

(c) to the Additional Collector and to the Additional Collector (Selection Grade) Cadre under the Revenue Department of the State;

(d) to the posts in Goods and Services Tax Department under the Finance Department of the State.

3. ***Definitions.***-In this rules, unless the context requires otherwise,-

(a) "Administrative Department" means the Department of Government of Maharashtra, Mantralaya, as specified in the Maharashtra Government Rules of Business;

(b) "Appointing Authority" means an authority competent to make appointment to any Group A and Group B (Gazetted and Non-Gazetted) posts or cadre or service;

(c) "Commission " means the Maharashtra Public Service Commission;

(d) "Government" means the Government of Maharashtra;

(e) "Group A and Group B posts" means those posts under the control of the Government which have been specifically classified as Group A or Group B in the respective Order of Post Creation or respective Order of Staffing Pattern or respective Recruitment Rules;

(f) "Revenue Division" means the Seven Revenue Divisions determined by the State Government for the purpose of Revenue Division Allotment viz. Nagpur, Amaravati, Aurangabad, Nasik, Konkan-1 [Palghar, Ratnagiri and Sindhudhurg (total 3districts)], Konkan-2 [Raigad, Thane, Mumbai Suburban and Mumbai City districts(total 4 districts)] and Pune;

(g) "Selection Committee" means the Selection Committee constituted for appointment to Group A and Group B posts which are exempted from the purview of the Maharashtra Public Service Commission as per the provisions of the Maharashtra Public Service Commission (Exemption from Consultation) Regulations, 1965;

(h) " single parenting" means the person who is sustaining his ward on his own, legally in absence of his marital partner (husband or wife);

(i) "State" means the State of Maharashtra;

(j) "State Level Head of Department" means the State Level Head of organization under the control of an Administrative Department of the Government;

(k) "Teaching Posts" means such posts on which the Government Servants appointed are actually doing the teaching job in Schools, Colleges, Universities, Polytechnics, etc.

4. ***Appointments in Revenue Division***.- The appointments shall be made to the posts of Group A and Group B by nomination and promotion in the Revenue Divisions as provided in these Rules.

5. ***Determination of Revenue Division wise posts***.- Before allotting Revenue Divisions, every Administrative Department of the Government shall determine Revenue Division wise total sanctioned posts in each Group A and Group B cadre.

6. ***Procedure to be followed while making Revenue Division Allotment***.- The following procedure shall be followed while making appointments to the posts in Group A and Group B, either by direct recruitment or by promotion, for the Revenue Division Allotment in accordance with the provisions of these rules.

Sr. No. (*1*)	Stages of Revenue Division Allotment (*2*)
(1)	***Number of posts for which candidates or officers are eligible for Revenue Division Allotment***.- *(a)* In case of appointment by direct recruitment, the number of posts for which candidates are eligible for Revenue Division Allotment is the number of candidates who are actually joined and are eligible for appointment as per the recommendations or merit list forwarded by the Commission or by the Selection Committee, as the case may be. *(b)* In case of appointment by promotion, the number of posts for which Officers are eligible for Revenue Division Allotment is the number of available Officers for appointment by promotion as per the Select List.
(2)	***Number of vacant posts***.- Revenue Division wise vacant posts excluding actual filled posts out of Revenue Division wise sanctioned posts as determined in accordance with rule 5.
(3)	***Information to be communicated to concerned officer in Merit List or Select List***.- *(a)* Number of posts of officers for Revenue Division Allotment as per rule 6(*1*). *(b)* Revenue Division wise number of vacant post as per rule 6(*2*). *(c)* Posts available for allotment shall be allotted in equal proportion of Revenue Division wise vacant posts. *(d)* Preference shall be called from concerned officers for one Revenue Division. *(e)* While asking for such preference, the information shall be sought from the concerned officer, whether an exemption from Revenue Division Allotment under rule 7 is admissible to him/her. If such an exemption is admissible then, the reasons thereof and supporting documents for the same shall be called from him/her.

(4)	***Determination of Revenue Division wise number of posts to be allotted***.- *(a)* ***Cases to be exempted from Revenue Division Allotment***.- The officers who are eligible for exemption form Revenue Division Allotment as per rule 7, shall first be allotted a Revenue Division preferred by them. *(b)* ***Determination of number of posts to be allotted***.- The number of posts to be allotted is the number of remaining posts after subtracting number of posts to be exempted as per rule 6(*4*)(*a*) from the number of posts of candidates or officers who are eligible for Revenue Division Allotment as provided in rule 6 (*1*). *(c)* ***Determination of Revenue Division wise remaining vacant posts***.- The number of Revenue Division wise remaining vacant posts shall be determined by subtracting the exempted number of posts as per rule 6(*4*)(*a*) from number of Revenue Division wise vacant posts as per rule 6(*2*). *(d)* ***Determination of number of posts to be allotted in equal proportion of Revenue Division wise remaining vacant posts***.- The number of posts to be allotted as per rule 6(*4*)(*b*) shall be decided in the equal proportion of Revenue Division wise vacant posts as per rule 6(*4*)(*c*).
(5)	***Procedure to be followed for allotment of Revenue Division***.- The allotment of Revenue Division shall be made in the following manner after deciding the number of Revenue Division wise posts to be allotted as per rule 6(*4*).
	(a) ***Allotment of Revenue Division in accordance with preferences***.- The allotment of Revenue Divisions shall be made by taking into account the preferences given by the officers as per their rank/number in the Merit List/ Select List and within the limit of number of posts decided for allotment in equal proportion of Revenue Division wise vacant posts as specified in rule 6(*4*)(*d*). *(b)* ***Revenue Division allotment by rotation***.- After following the procedure as specified in rule 6(*5*)(*a*), if there is no post available in the Revenue Division preferred by the officer, then the allotment of Revenue Division to such officer shall be made by rotation in the remaining Revenue Divisions which are remained for allotment. While allotting Revenue Division by rotation, the order of allotment shall be in the sequence of Nagpur, Amravati, Aurangabad, Kokan-1, Nasik, Kokan-2 and Pune. The concerned officers shall be allotted with one Revenue Division each in accordance with their rank/ number in Merit List or Select List.
(6)	***Postings to be made in concerned Revenue Division***.- After Revenue Division Allotment, the concerned Administrative Department shall have powers to prioritize the filling of posts by taking into account the number of posts lying vacant in various districts of the concerned Revenue Division. While making posting in the Revenue Division, the concerned Administrative Departments shall ensure that the criteria mentioned in rule 9 is duly considered.

Note.—An example is given in the *Schedule* appended to these rules for ready reference, while allotting Revenue Divisions in accordance with the procedure specified above.

7. Cases for which exemption from Revenue Division Allotment is admissible.- *(1)* There shall be exemption to the officer from Revenue Division Allotment in the following circumstances,-

(a) the officer who is physically challenged;

(b) the officer whose spouse or his child is mentally retarded or the officer who is guardian of his brother or sister, are mentally retarded;

(c) the officer who is legally proven as a single parent;

(d) the officer having 3 years or less than 3 years period for superannuation from the date of recommendation by the Departmental Promotion Committee, for their promotion.

(2) Under the circumstances mentioned in sub-rule (*1*), the concerned Administrative Department shall allot the convenient Revenue Division to the concerned officer by taking into account the aforesaid sequence and availability of vacant posts.

8. ***Period of service to be spent in allotted Revenue Division***.— The officers in Group A and Group B appointed either by direct recruitment or by promotion shall complete the following length of service in the concerned allotted Revenue Division.

Group (*1*)	Tenure of Service (*2*)
Group A	3 Years
Group B (Gazetted / Non-Gazetted)	3 Years

Note.—Before the publication of these rules in the *Official Gazette*, the officers who have been allotted Revenue Division as per the provisions of the Revenue Division Allotment for appointment by nomination and promotion to the posts of Group "A" and Group "B" (Gazetted and Non-Gazetted) of the Government of Maharashtra Rules, 2015, such officers shall be eligible for transfer as per the Government Servants Regulation of Transfers and Prevention of Delay in Discharge of Official Duties Act, 2005 (Mah. XXI of 2006), provided they have completed the length of service in the concerned Revenue Division as specified in these rules.

9. ***Criteria for posting in allotted Revenue Division***.- While making posting in the allotted Revenue Division, the vacant posts in tribal areas declared by the Tribal Development Department, Naxalite areas declared by the Home Department and Aspirational Districts declared by the Union Government, shall be filled on priority.

10. ***Updation of list of Revenue Division wise working posts***.- After every Revenue Division Allotment, the Appointing Authority shall maintain post wise updated list of all working officers in the concerned Revenue Division.

11. ***Power to allot Revenue Divisions***.-(*1*) The concerned Administrative Departments shall be competent to allot Revenue Divisions to officers under these rules. It is not necessary for the Administrative Department to obtain the concurrence of the General Administration Department for this purpose.

(*2*) The State Level Head of Department under the control of the concerned Administrative Department is empowered to allot Revenue Division to officers appointed by nomination and by promotion to the posts of Group B cadres as per the provisions of these rules. It is not necessary for the Administrative Department to obtain the concurrence of the General Administration Department for this purpose.

12. ***Effecting change in Revenue Division due to major ailments***.-

(1) After allotment of Revenue Division as per the provisions of these rules, the concerned officer may apply for change in the Revenue Division only after completion of one year service in the allotted Revenue Division, on occurrence of the following major ailments to the officer himself or his or her spouse or children or father or mother, brother or sister, and in case of lady officer, her father in law or mother in law, who are dependent on him or her and are staying together :—

(i) Cases of Heart Surgery.

(ii) Kidney Transplantation or Kidney Dialysis.

(iii) Cancer.

(iv) Brain Tumor or Brain Surgery.

(v) Coma.

(vi) Mental Disorder.

(2) The applications received under sub-rule (*1*), shall be considered by the concerned Administrative Department and may allow change in the Revenue Division. It is not necessary for the Administrative Department to obtain the concurrence of the General Administration Department for this purpose.

13. Consequences of not joining in concerned Revenue Division within prescribed time limit.- If the concerned officer has not joined in the concerned Revenue Division within period of 30 days of issuance of order of posting as per the provisions of these rules, such period of absence of the concerned officer shall be treated as *dies non*.

14. Service to be rendered in Revenue Divisions namely Nagpur, Amravati, Aurangabad and Kokan-1 before next promotion.- After making initial posting by direct recruitment or promotion as per the provisions of these rules, it shall be mandatory to the concerned officer to render minimum 3 years of service at least in any one of the Revenue Divisions, namely Nagpur, Amravati, Aurangabad or Kokan-1, before granting next promotion to him.

15. Strict compliance of provisions of these rules.-

(1) It shall be strictly ensured by the concerned Administrative Department that these rules are scrupulously complied with.

(*2*) If it is found that the officer to whom the powers under rule 11 has been delegated, submits the proposal of posting to the Competent Authority, in violation of the provisions of these rules, then the responsibility shall be fixed against such officer and strict action shall be taken against such erring officer .

16. ***Disposal of pending cases***.- All the cases pending for the allotment of Revenue Divisions and the applications pending for the change in Revenue Divisions, on the date of the publication of these rules in the *Official Gazette*, shall be disposed of as per the provisions of these rules.

17. Repeal.- On the date of publication of these rules in the *Official Gazette*, the Revenue Division Allotment for appointment by nomination and promotion to the posts of Group "A" and Group "B" (Gazetted and Non-Gazetted) of the Government of Maharashtra Rules, 2015, shall stand repealed.

SCHEDULE

An example for ready reference for allotting Revenue Divisions
(*See* rule 6)

(*I*) Determination of number of Revenue Division wise posts to be allotted in accordance with rule 6(4).

Sr. No.	Revenue Division	Nagpur	Amaravati	Aurangabad	Konkan-1	Nashik	Konkan-2	Pune	Total
(1)	(2)	(3)	(4)	(5)	(6)	(7)	(8)	(9)	(10)
1	Number of sanctioned posts	79	70	97	48	67	10	72	443
2	Number of filled up posts	55	49	65	32	58	4	54	317
3	Number of vacant posts (as per rule 6 (2) (Entry 1 *minus* Entry 2)	24	21	32	16	9	6	18	126
	(*i*) The number of posts for which candidates/officers are eligible for Revenue Division Allotment is 50.								
	(*ii*) The number of cases to be exempted as per rule 7 is 8.								
4	The Revenue Division allotted to those officers who are granted exemption as per rule 6(*4*)(*a*) according to their preference	2	2	1	1	0	1	1	**8**

	(*iii*) Therefore number of posts to be allotted as per rule 6(*4*)(*b*) will be 42. (50 numbers of eligible candidates/officers as mentioned above at entry (*i*) *minus* 8 numbers of cases to be granted exemption as per rule 6, as mentioned above at entry (*ii*))								
5	Revenue Division wise balance vacant posts after allotting Revenue Divisions to the officers who have been granted exemption as per Entry 4 above, according to their preferences (Entry 3 *minus* Entry 4)	22	19	31	15	9	5	17	**118**
6	Determination of number of posts to be allotted in the equal proportion of Revenue Division wise remaining vacant posts [(Revenue Division wise vacant posts / Total vacant posts) x the number of posts to be allotted]	(22/118) x42= 7.83	(19/118)x 42= 6.76	(31 /118)x42= 11.03	(15/118) x42= 5.34	(9/118) x42= 3.20	(5/118) x42= 1.78	(17/ 118) x42= 6.05	
7.	Integer of number of posts to be allotted	**8**	**7**	**11**	**5**	**3**	**2**	**6**	**42**

(II) Procedure for allotment of Revenue Division as per rule 6(5)

Sr. No.	Revenue Division	Nagpur	Amaravati	Aurangabad	Konkan-1	Nashik	Konkan-2	Pune	
(1)	(2)	(3)	(4)	(5)	(6)	(7)	(8)	(9)	(10)
1.	Number of posts to be allotted	8	7	11	5	3	2	6	42
2.	Number of Revenue Divisions preferred by concerned officers	7	4	5	5	6	6	9	42
3.	Allotment of Revenue Divisions as per the preferences given by concerned officers	7	4	5	5	3	2	6	32
4.	The Revenue Divisions available for allotment by rotation after allotting the Revenue Divisions according to the preferences	1	3	6	0	0	0	0	10

Rank / Number in merit list / Select List	Name of the Officer	The preferred Revenue Division	Revenue Division allotment in the cases of exemption granted	Revenue Division Allotment according to the preferences	Revenue Division Allotment by rotation to those officers who have not secured the Revenue Division as per their preferences
(1)	(2)	(3)	(4)	(5)	(6)
1	A	Konkan1 (1)		Konkan 1 (1)	---
2	B	Nagpur (1)		Nagpur (1)	---
3	C	Nashik (1)		Nashik (1)	---
4	D*	Konkan2*	Konkan 2 *	---	---
5	E	Pune -(1)		Pune -(1)	---
6	F	Amaravati (1)		Amaravati (1)	---
7	G	Aurangabad (1)		Aurangabad (1)	---
8	H	Konkan1 -(2)		Konkan 1 -(2)	---
9	I	Pune (2)		Pune (2)	---
10	**J***	Pune*	Pune*	---	---
11	K*	Nagpur*	Nagpur*	---	---
12	**L**	Konkan 2 (1)		Konkan 2 (1)	---
13	M	Nashik (2)		Nashik (2)	---
14	N	**Aurangabad**(2)		**Aurangabad** (2)	---
15	O	Konkan 2-(2)		Konkan 2-(2)	---
16	P	Pune (3)		Pune (3)	---
17	Q	Nagpur (2)		Nagpur (2)	---
18	R	Amaravati (2)		Amaravati (2)	---
19	S	Aurangabad (3)		Aurangabad (3)	---
20	T	Konkan 1-(3)		Konkan 1-(3)	---
21	U	Nashik (3)		Nashik (3)	---
22	V	Konkan 2 (3)			Nagpur (8)
23	W	Nagpur (3)		Nagpur (3)	---
24	X*	Amaravati*	Amaravati*	---	---
25	Y	Nagpur (4)		Nagpur (4)	---
26	Z	Konkan 1-(4)		Konkan 1-(4)	
27	AA	Nashik (४)			**Amaravati (5)**
28	BB	Pune (4)		Pune (4)	
29	CC*	Aurangabad*	Aurangabad*	---	---
30	DD	Konkan 2 (४)			Aurangabad (6)
31	EE	Nagpur (5)		Nagpur (5)	---
32	FF	Amaravati (3)		Amaravati (3)	---
33	HH	Konkan 1(5)		Konkan 1(5)	---
34	II	Nagpur (6)		Nagpur (6)	---
35	JJ	Pune (5)		Pune (5)	---
36	KK	Pune (6)		Pune (6)	---
37	LL	Amravati (4)		Amaravati (4)	---
38	MM*	Nagpur*	Nagpur *	---	---
39	NN	Konkan 2 (5)			**Amaravati (6)**
40	OO	Aurangabad(4)		Aurangabad (4)	---
41	PP	Nashik (5)			**Aurangabad (7)**
42	QQ	Pune (7)			**Amaravati (7)**
43	RR*	Amaravati*	Amaravati *	---	---
44	SS	Pune (8)			**Aurangabad (8)**
45	TT*	Konkan 1*	Konkan 1*	---	---

Rank / Number in merit list / Select List	Name of the Officer	The preferred Revenue Division	Revenue Division allotment in the cases of exemption granted	Revenue Division Allotment according to the preferences	Revenue Division Allotment by rotation to those officers who have not secured the Revenue Division as per their preferences
(1)	**(2)**	**(3)**	**(4)**	**(5)**	**(6)**
46	UU	Nashik (6)			**Aurangabad (9)**
47	VV	Kolhapur(5)		Aurangabad (5)	---
48	WW	Nagpur (7)		Nagpur (7)	---
49	XX	Konkan 2 (6)			**Aurangabad (10)**
50	YY	Pune (9)			**Aurangabad (11)**
Total			8	32	10
All Total					50

* The officers who have been granted exemption from Revenue Division Allotment as per rule 7.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

GEETA KULKARNI,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

No. SRV2020/C.R.49/Desk12
GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
Mantralaya, Mumbai 400 032,
Dated the 14th July 2021.

1. The Principal Secretary to the Governor, Raj Bhavan, Malbar Hill, Mumbai,
2. The Additional Chief Secretary to the Chief Minister,
3. The Private Secretary to all Ministers/State Ministers,
4. Hon'ble Opposition Leader, Legislative Council of the State of Maharashtra/ Legislative Assembly of the State of Maharashtra,
5. All Hon'ble Members of the Parliament/Members of the Legislative Council of the State of Maharashtra/ Members of the Legislative Assembly of the State of Maharashtra,
6. The Chief Secretary,
7. All Additional Chief Secretaries/Principal Secretaries/Secretaries of Mantralaya Departments,
8. All Mantralaya Departments,
9. *The Registrar, High Court (Original Side), Mumbai,
10. *The Registrar, High Court (Appellate Side), Mumbai,
11. *The Registrar, Office of the Loka Ayukta and Upa-Loka Ayukta, Mumbai,
12. *The Secretary, Maharashtra Public Service Commission, Mumbai,
13. *The Principal Secretary, Secretariat of Maharashtra Legislature (Assembly), Mumbai,
14. *The Principal Secretary, Secretariat of Maharashtra Legislature (Council), Mumbai,
15. *The Secretary, State Election Commission, New Administrative Building, Mumbai,
16. *The Accountant General, Maharashtra-1 (Account and Entitlement), Maharashtra, Mumbai,
17. *The Accountant General, Maharashtra-1 (Audit), Maharashtra, Mumbai,
18. *The Accountant General, Maharashtra-2 (Account and Entitlement), Maharashtra, Nagpur,
19. *The Accountant General, Maharashtra-2 (Audit), Maharashtra, Nagpur,
20. *The Secretary, Office of the Chief Information Commissioner of the State, New Administrative Building, Mumbai,
21. *The Registrar, State Human Rights Commission, Mumbai 400 001,
22. The Director General of Information and Public Relations, Mumbai, (2 copies for publicity)
23. Pay and accounts Officer, Mumbai,
24. Resident Audit Officer, Mumbai,
25. All Divisional Commissioners,
26. All Collectors,
27. All Chief Executive Officers of Zilla Parishads,
28. All District Treasury Officers,
29. All Heads of Departments and Heads of Offices under the All Departments of Mantralaya,
30. General Administration Department/Desk 39(For publishing on website),
31. The Librarian, Secretariat of Maharashtra Legislature, Library, 6th Floor, Vidhan Bhavan, Mumbai 400 032 (10 copies),
32. Bahujan Samaj Party, State Secretary, Maharashtra State, B.S.P. Bhavan, Plot No. 83-A, Collector Colony, Chembur, Mumbai 74 (5 copies),
33. Bhartiya Janata Party, Maharashtra State, C.D.O. Barrack No. 1, Opposite Yogaksham, Vasantrao Bhagwat Chowk, Nariman Point, Mumbai 20 (5 copies),
34. Bhartiya Communist Party, Maharashtra Committee, 314, Raj Bhavan, S. V. Patel Road, Mumbai 4, (5 copies),
35. Bhartiya Communist Party (Marxvadi), Maharashtra Committee, Janshakti Hall, Globe Mills Palace, Worli, Mumbai 13, (5 copies),
36. Indian National Congress, Maharashtra State Congress (I) Committee, Tilak Bhavan, Kakasaheb Gadgil Road, Dadar, Mumbai 25 (5 copies),
37. Nationalist Congress Party, Rashtravadi Bhavan, Free Press Journal Road, Nariman Point, Mumbai 21 (5 copies),
38. Shivsena, Shivsena Bhavan, Gadkari Chowk, Dadar, Mumbai 28 (5 copies),
39. Maharashtra Navnirman Sena, Krishnakunj, M. B. Raut Road, Shivaji Park, Dadar, Mumbai 28 (5 copies),
40. All Desks of General Administration Department,
41. Select File.

(* By Letter)

GEETA KULKARNI,
Deputy Secretary to Government

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार–ब

वर्ष ८, अंक ५२(३)] मंगळवार, एप्रिल १९, २०२२/चैत्र २९, शके १९४४ [पृष्ठे १०, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १२९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ एप्रिल २०२२

आदेश

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.

क्रमांक मुद्रांक-२०२२/प्र.क्र.७८/एम-१(धोरण).— महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश, " उक्त अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, जनहितार्थ तसे करणे आवश्यक असल्याची खात्री पटल्यामुळे, याद्वारे, ज्या संलेखांवर उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-एकच्या अनुच्छेदांन्वये मुद्रांक शुल्क आकारण्यायोग्य आहे अशा संलेखांच्या बाबतीत, उक्त अधिनियमाच्या कलम ३१ च्या पोट-कलम (४), कलम ३२अ च्या पोट-कलम (२) चे पहिले परंतुक व पोट-कलम (४), कलम ३४ च्या खंड (अ) आणि कलम ३९ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ब) यानुसार प्रदेय असलेल्या मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागावरील एकूण शास्तीपैकी, १ एप्रिल २०२२ पासून सुरू होणाऱ्या आणि ३१ जुलै,२०२२ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी दहा टक्के पर्यंत शास्ती आणि १ ऑगस्ट, २०२२ पासून सुरू होणाऱ्या आणि ३० नोव्हेंबर, २०२२ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी पन्नास टक्के पर्यंत शास्ती, पुढील शर्तींस अधीन राहून, कमी करीत आहे :—

शर्ती-

(१) मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागावरील शास्ती कमी करण्याकरिता अर्ज दाखल करण्याचा कालावधी, १ एप्रिल २०२२ पासून सुरू होणारा आणि ३० नोव्हेंबर २०२२ रोजी संपणारा आठ महिने इतका असेल.

या आदेशाखालील उक्त कपात, ज्या प्रकरणी, चुकवेगिरीची किंवा अडकवून ठेवण्याची किंवा अभिनिर्णयाची कार्यवाही सुरू करण्यात आलेली असेल आणि ज्या प्रकरणी, उक्त अधिनियमाची कलमे ३१, ३२अ, ३३, ३३अ, ४६, ५३(१अ) व ५३अ यांच्या तरतुदींअन्वये ३१ मार्च, २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी, पक्षकारावर किंवा निष्पादकावर किमान एक नोटीस बजावण्यात आलेली आहे अशा प्रकरणीच केवळ लागू असेल. तसेच, या आदेशाखालील उक्त कपात, ज्या प्रकरणी, उक्त अधिनियमाच्या तरतुदींअन्वये, कोणत्याही प्राधिकरणासमोर किंवा न्यायालयासमोर अपील किंवा पुनर्विलोकन किंवा पुनरिक्षण अर्ज प्रलंबित आहे अशा प्रकरणी देखील लागू असेल.

(३) या आदेशाखालील उक्त कपात, ज्या प्रकरणी, चुकवेगिरीच्या किंवा अडकवून ठेवण्याच्या, मुद्रांकाच्या तुटीचा शोध घेण्याच्या प्रयोजनार्थ किंवा मुद्रांक शुल्काच्या तुटीची वसुली करण्यासाठी अन्य कोणत्याही मार्गाने, मुद्रांक जिल्हाधिकाऱ्याने कोणतीही कार्यवाही किंवा कारवाई प्रस्तावित केली असेल, परंतु या आदेशाच्या प्रारंभाच्या तारखेस जी अपूर्ण असेल अशा प्रकरणांस लागू असेल. या आदेशाखालील उक्त कपात, प्राधिकरणासमोरील किंवा कोणत्याही न्यायालयासमोरील प्रकरणांमध्ये अंतर्भूत असलेल्या आणि ज्यामध्ये जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, मुद्रांक शुल्काच्या तुटीची व शास्तीची वसुली सुरू करण्यात आलेली आहे किंवा प्रस्तावित करण्यात आलेली आहे अशा संलेखांस लागू असेल.

(४) या आदेशाखालील उक्त कपात, ३१ मार्च २०२२ रोजी प्रलंबित असणाऱ्या आणि ज्यामध्ये किमान एक नोटीस बजावण्यात आलेली आहे अशा प्रकरणांनाच केवळ लागू असेल. हा आदेश, या तारखेनंतर दाखल केलेल्या नवीन प्रकरणांना लागू असणार नाही.

(५) ज्या प्रकरणी, या आदेशाखालील उक्त कपातीचा लाभ, आदेशामध्ये दिलेल्या विनिर्दिष्ट वेळेमध्ये घेतलेला नाही अशा सर्व प्रलंबित प्रकरणांचे, उक्त अधिनियमाच्या तरतुदींनुसार नियमन करण्यात येईल.

(६) संलेखातील पक्षकार किंवा मालकी हक्कातील त्याचा उत्तराधिकारी किंवा या आदेशाखालील उक्त कपातीमधील मुद्रांक शुल्काच्या तुटीची व शास्तीची रक्कम प्रदान करणारा पक्षकार अथवा मुखत्यारपत्र धारक, या आदेशाखालील शास्तीच्या कपातीचा लाभ मिळण्यासाठी अर्ज करू शकेल. जर या आदेशाखालील उक्त कपातीसाठी मुखत्यारपत्र धारकाने अर्ज दाखल केला असेल तर, मुखत्यारपत्राची प्रत, जोडणे आवश्यक असेल. प्राधिकरणाने निर्धारित केलेले बाजारमूल्य अंतिम असेल आणि ते पुनर्मूल्यांकन करण्यास किंवा बदलण्यास अधीन असणार नाही.

(७) या आदेशाखालील उक्त कपातीचा लाभ उपलब्ध होण्यासाठी, अर्जदाराने, या आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये ग्रास (GRASS) पोर्टलवर ऑनलाईन प्रणालीमार्फत इ-चलनाद्वारे मुद्रांक शुल्काची व शास्तीची रक्कम प्रदान करावयाची आहे.

(८) या आदेशामधील मुद्रांक शुल्काच्या तुटीची व शास्तीची रक्कम प्रदान करण्यासाठी, वरील अनुक्रमांक ७ मध्ये तरतूद केली असेल त्या मार्गांखेरीज, मुद्रांक शुल्क प्रदान करण्याचा अन्य कोणताही मार्ग अनुज्ञेय असणार नाही.

(९) उक्त कार्यवाहीमधील मागणी नोटीसीमध्ये किंवा उक्त अधिनियमान्वये संमत केलेल्या कोणत्याही आदेशामध्ये प्राधिकरणाने निर्धारित केलेली मुद्रांक शुल्काची व शास्तीची रक्कम अंतिम असेल. या आदेशाखालील उक्त कपातीचा लाभ उपलब्ध होण्यासाठी, बाजार मूल्याचे कोणतेही नवीन किंवा नव्याने निर्धारण करण्यास मुभा असणार नाही आणि मुद्रांक शुल्काच्या तुटीची रक्कम, शासनास संपूर्णपणे प्रदान करण्यात येईल.

(१०) मुद्रांक शुल्क निश्चित करण्यासाठी कोणतीही नवीन कार्यपद्धती या प्रकरणी अनुसरण्यात येणार नाही. यापूर्वी घेतलेल्या निर्णयाचा अर्जदाराने स्वीकार करावयाचा आहे. मूळ मुद्रांक शुल्काची रक्कम, शासनास संपूर्णपणे प्रदान केल्यानंतरच केवळ या आदेशाखालील उक्त कपात देण्यात येईल. मूळ मुद्रांक शुल्कात, कोणतीही सूट, माफी, कपात, सवलत (सूट) देण्यात येणार नाही.

(११) अर्जदाराने, त्याच्या किंवा तिच्या दस्तऐवजाचा संपूर्ण तपशील, मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या व शास्तीच्या संबंधातील निर्णयाची प्रमाणित प्रत तसेच कोणत्याही अपील प्राधिकरणासमोर किंवा कोणत्याही न्यायाधिकरणासमोर किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणासमोर प्रकरण प्रलंबित नाही असे नमूद करणारे प्रतिज्ञापत्र सादर करावयाचे आहे. जर वर नमूद केल्याप्रमाणे, कोणत्याही अपील प्राधिकरणासमोर किंवा कोणत्याही न्यायाधिकरणासमोर किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणासमोर अपील, पुनर्विलोकन किंवा पुनरीक्षण अर्ज, प्रलंबित असेल तेव्हा अशा बाबतीत, अर्जदाराने तो, विनाशर्त मागे घ्यावयाचा आहे आणि तशा अर्थाचे घोषणापत्र, या आदेशाखालील अर्जासोबत सादर करावयाचे आहे.

(१२) प्रकरणांमध्ये अंतिम निर्णय घेण्यात आल्यानंतर, मुद्रांक शुल्काची व लादलेल्या शास्तीची रक्कम, आदेशामध्ये नमूद केलेल्या विनिर्दिष्ट कालमर्यादेत तात्काळ शासनाकडे जमा करावयाची आहे. मुद्रांक शुल्काची व शास्तीची रक्कम जमा केल्यानंतर सात दिवसांच्या आत, दस्तऐवज प्रमाणित करण्यात येईल.

(१३) मूळ मुद्रांक शुल्क व शास्ती प्रदान करण्यात आल्यानंतर कोणताही परतावा देण्यात येणार नाही. एकदा का या आदेशाखालील उक्त कपातीचा लाभ मिळाल्यानंतर, कोणत्याही प्राधिकरणासमोर किंवा कोणत्याही न्यायालयासमोर कोणतेही अपील, पुनर्विलोकन किंवा पुनरिक्षण अर्ज टिकणार नाही.

(१४) अर्जदार, मूळ संलेख आणि आधारभूत दस्तऐवजांच्या स्व-सांक्षाकित प्रती यांसह, या सोबत जोडलेल्या **नमुना ' अ '** मधील अर्ज, या आदेशामध्ये नमूद केलेल्या विनिर्दिष्ट कालमर्यादेत सादर करील.

(१५) या आदेशामध्ये नमूद केलेल्या शेवटच्या तारखेनंतर मुद्रांक जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयास मिळालेल्या कोणत्याही अर्जावर, कायद्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(१६) जेव्हा या आदेशामध्ये नमूद केलेल्या अर्जाच्या तारखेपूर्वी आधीच संलेखावरील मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागावरील शास्ती प्रदान करण्यात आलेली असेल तेव्हा, कोणताही परतावा देण्यात येणार नाही.

(१७) ज्या प्रकरणी मुद्रांक शुल्क व शास्ती अद्याप प्रदान करण्यात आलेली नाही अशा प्रकरणी, पूर्वीच्या आदेशाखालील किंवा अभय योजनांखालील शास्तीमध्ये कपात करण्याचा लाभ मिळण्याचा अर्ज, ज्याने आधीच सादर केलेला आहे असा अर्जदार देखील या आदेशाखालील शास्तीमधील उक्त कपातीसाठी पात्र असेल. तथापि, या आदेशाखालील शास्तीमधील उक्त कपातीचा लाभ मिळण्यासाठी, अर्जदाराने, या सोबत जोडलेल्या **नमुना -' अ '** मध्ये मूलतः नव्याने अर्ज करावयाचा आहे.

नमुना - अ

अर्जाचा नमुना

दिनांक:

अर्जदाराचे नाव :

पत्ता :

भ्रमणध्वनी/ दूरध्वनी क्रमांक. :

ई-मेल आयडी :

पॅन क्रमांक :

बँकेचे नाव व खाते क्रमांक :

प्रति,

मुद्रांक जिल्हाधिकारी,

विषय: महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम,१९५८ (१९५८ चा ६०) याच्या तरतुदींअन्वये प्रदेय असलेल्या मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागावरील शास्तीमध्ये कपात करण्याकरिता अर्ज.

संदर्भ: महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आदेश क्रमांक. मुद्रांक- २०२२/ प्र.क्र.-७८/ एम-१ (धोरण), दिनांक १ एप्रिल,२०२२.

महोदय,

मी, खाली सही करणार, श्री/श्रीमती ----------, माझ्या वतीने किंवा श्री/श्रीमती ---------- यांच्या वतीने असे कळवितो की, माझे प्रकरण आपल्या कार्यालयामध्ये प्रक्रियाधीन असून त्याचा तपशील भाग-अ मध्ये (कोणत्याही असल्यास) नमूद केलेला आहे आणि/किंवा आता मी याद्वारे, भाग-ब मध्ये नमूद केलेल्या संलेखावरील, संदर्भाधीन आदेशाखालील मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागावरील शास्तीची कपात करण्याकरिता अर्ज करीत आहे.

भाग - अ

संदर्भाधीन आदेशाखालील कपातीसाठी सादर केलेल्या पुढील दस्तावेजांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

१. कार्यालयाचे नाव व पत्ता:

२. आधीच्या नोटीसीचा किंवा निर्णयाचा किंवा आदेशाचा तपशील:

३. नोंदणी किंवा प्रकरण क्रमांक:

४. कार्यालयाचे नाव:

५. नोटीस क्रमांक:

६. नोटीसीचा दिनांक:

७. मुद्रांक शुल्काची रक्कम:

८. शास्तीची रक्कम:

भाग - ब

संलेखाचा तपशील

१	दस्तऐवजाचा प्रकार	:	
२.	निष्पादित केल्याचा दिनांक	:	
३.	मान्य केलेला मोबदला	:	
४.	मालमत्तेचा तपशील	:	
	(अ) मालमत्तेचा सविस्तर पत्ता (सदनिका/ युनिट क्रमांक, इमारत क्रमांक व नाव, स्थान, इत्यादी)	:	
	(ब) गाव/ क्षेत्र/ प्रभाग, इत्यादी.	:	
	(क) अनुक्रमांक/ सी एस. क्रमांक/ सी.टी.एस. क्रमांक/ भूखंड क्रमांक, इत्यादी.	:	

५.	मालमत्तेचे क्षेत्र	:	सदनिका/ रोहाऊस/ बंगला/ दुकान/ डुप्लेक्स/ गच्ची/ वाहनतळ
	चटई क्षेत्र	:	
	बांधीव क्षेत्र	:	
६.	बाजारमूल्य प्रभावित करणारे अन्य घटक	:	
	(अ) बांधकामाचा प्रकार	:	
	(ब) बांधकामाचे वर्ष	:	
	(क) मजल्यांची संख्या	:	
७.	दस्तऐवजावर आधीच प्रदान केलेले मुद्रांक शुल्क, कोणतेही असल्यास	:	
	(अ) रक्कम रुपये	:	
	(ब) मुद्रांकाचा दिनांक	:	
८.	प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचा तपशील (मुखत्यारपत्रासह)	:	
	(अ) व्यक्तीचे नाव	:	
	(ब) भ्रमणध्वनी क्रमांक	:	
	(क) ई-मेल आयडी	:	

मी, याद्वारे असे घोषित करतो/करते की, वरील माहिती, माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी व अचूक आहे. वर घोषित केलेल्या तपशिलाच्या पुष्ट्यर्थ, स्व-साक्षांकित केलेले पुरावे मी यासोबत जोडलेले आहेत.

मी, आणखी असे घोषित करतो / करते की, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आदेश क्रमांक मुद्रांक २०२२/प्र.क्र. ७८/एम-१ (धोरण), दिनांक १ एप्रिल २०२२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींचे मी पालन करील.

आपला विश्वासू,

(स्वाक्षरी)

अर्जदाराचे नाव

दिनांक :

ठिकाण :

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श्रीधर डुबे पाटील,
शासनाचे सहसचिव.

REVENUE AND FORESTS DEPARTMENT,

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 1st April 2022.

Order

MAHARASHTRA STAMP ACT.

No. Mudrank-2022/C.R.No.78/M-1(Policy).— In exercise of the powers conferred by clause *(a)* of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958) (hereinafter referred to as 'the said Act') and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby reduces the penalty to ten *per centum* for the period commencing from the 1st April 2022 and ending on the 31st July 2022 and fifty *per centum* for the period commencing from the 1st August 2022 and ending on the 30th November 2022 of the total penalty on the deficient portion of stamp duty payable as per sub-section *(4)* of section 31, first proviso to sub-section *(2)* and sub-section *(4)* of section 32A, clause *(a)* of section 34 and clause *(b)* of sub-section *(1)* of section 39 of the said Act, in respect of instruments for which stamp duty is chargeable under articles of Schedule-I appended to the said Act, subject to the following conditions, namely :—

Conditions :—

(1) The period for filing application for reduction in penalty on the deficient portion of stamp duty, shall be eight months commencing from the 1st April 2022 and ending on the 30th November 2022.

(2) The said reduction under this Order shall be applicable only in cases where proceeding of evasion or impounding or adjudication has been started and where at least one notice has been served on the party or executor on or before the 31st March 2022 under the provisions of sections 31, 32A, 33, 33A, 46, 53(1A) and 53A of the said Act. Also, said reduction under this Order shall be applicable to such cases where appeal or review or revision application is pending for decision before any Authority or any Court under the provisions of the said Act.

(3) The said reduction under this Order shall be applicable to such cases in which any proceeding and action is proposed by the Collector of Stamps for the purpose of evasion or impounding, detection of deficit stamps or in any other way for recovery of deficient stamp duty, but which is incomplete on the date of commencement of this Order. The said reduction under this Order shall be applicable to instruments which are involved in cases before Authority or any Court and in which recovery of deficient stamp duty and penalty as an arrears of land revenue has been initiated or proposed.

(4) The said reduction under this Order shall be applicable only to pending cases as on the 31st March 2022 and in which at least one notice has been served. This Order shall not be applicable to new cases filed after this date.

(5) All pending cases in which benefit of the said reduction under this Order has not availed within the specified time given in the Order shall be governed as per provisions of the said Act.

(6) The party to the instrument or his successor in title or party paying an amount of deficit stamp duty and penalty in the said reduction under this Order or Power of Attorney holder may apply for benefit of reduction of penalty under this Order. If the Power of Attorney holder files application for the said reduction in this Order, a copy of the Power of Attorney shall require to be attached. The market value determined by the Authority shall be final and shall not be subject to revaluation or change.

(7) To avail benefit of reduction under this Order, applicant has to pay the amount of stamp duty and penalty by e-challan through online system on GRASS portal within the period specified in this Order.

(8) Except as provided in Serial No.7 above, no any other mode of payment of stamp duty will be allowed to pay the deficit stamp duty and penalty in the Order.

(9) An amount of stamp duty and penalty determined by Authority in demand notice in the said proceeding or any Order passed under the said Act shall be final. To avail the benefit of the said reduction under this Order, no new or fresh determination of market value shall be allowed and an amount of deficit stamp duty shall be fully paid to the Government.

(10) No new procedure for fixing stamp duty will be followed in these cases. The applicant will have to accept the decision taken earlier. The said reduction under this Order shall be given only after the amount of original stamp duty is fully paid to the Government. There will be no discount, remission, reduction exemption in the original stamp duty.

(11) The Applicant has to submit full details of his or her document, a certified copy of decision as to deficit stamp duty and penalty as well as an affidavit stating that the case is not pending before any Appellate Authority or any Tribunal or any other Authority. In case where appeal or review or revision application is pending for decision before any Appellate Authority or any Tribunal or any other Authority as mentioned above, the applicant shall have to unconditionally withdraw the same and submit a declaration to that effect along with application under this Order.

(12) Immediately after the final decision taken in the case, the amount of stamp duty and penalty imposed will have to be deposited with the Government within stipulated time limit mentioned in the Order. Document will be certified within seven days after the amount of stamp duty and penalty is deposited.

(13) No refund will be given after the original stamp duty and penalty has been paid. No appeal, review or revision, application before any Authority or any Court shall be maintainable, once the benefit of the said reduction under this Order is availed.

(14) The applicant shall submit an application in the Form 'A' appended hereto, along with original instrument and self-attested copies of supporting documents within stipulated time limit mentioned in the Order.

(15) Any application received by Office of Collector of Stamps after cutoff date mentioned in the Order shall be processed as per law.

(16) No refund shall be granted where penalty on the deficient portion of stamp duty has already been paid on instrument, prior to the date of application mentioned in this Order.

(17) The applicant who has already submitted application for benefit of reduction in penalty under previous Order or Amnesty Schemes in which case stamp duty and penalty has not been paid as yet, is also eligible for the said reduction in penalty under this Order. However, to avail benefit of the said reduction in penalty under this Order, the applicant shall have to make a fresh application in original in the Form 'A' appended hereto.

FORM A

FORM OF APPLICATION

Date:

Name of Applicant :
Address :
Mobile / Phone No. :
Email ID :
Pan Number :
Bank Name A/C No. :

TO,

The Collector of Stamps,
.....
.....
....

Subject: Application for reduction in penalty on the deficient portion of Stamp duty payable under the provisions of the Maharashtra Stamp Act (LX of 1958).

Reference: Government of Maharashtra, Revenue and Forests Department, Order No. Mudrank -2022/C.R. No 78/M-1 (Policy) dated the 1st April 2022.

Sir,

I, the undersigned, Shri/ Smt. ..... for myself or on behalf of Shri/ Smt. ..... inform that my case is under process in your good office, the details of which are mentioned in Part –A (if any) and / or I now hereby apply for reduction of penalty on the deficient portion of the stamp duty under the Order under reference on the instrument mentioned in Part- B.

Part-A

Details of the following documents submitted for reduction under the Order under reference are as follows:-

1. Office Name and Address :
2. Details of earlier notice or decision or Order :
3. Registration or case Number :
4. Name of office :
5. Notice number :
6. Date of Notice :
7. Amount of stamp Duty :
8. Amount of penalty :

Part –B

Details of Instrument

1.	Type of Document	:					
2.	Date of execution	:					
3.	Agreed consideration	:					
4.	Details of the property	:					
	(a) Detailed address of property (Flat/Units No. Building No. and Name, Location etc.	:					
	(b) Village/ Area/ Ward, etc.	:					
	(c) S.No./C.S.No./C.T.S No./ Plot No., etc.	:					
5.	Area of property	:	Flat	Raw House/ Bungalow/ Duplex	Shop	Terrace	Parking
	Carpet Area	:					
	Built-up Area	:					
6.	Other factors affecting the market value	:					
	(a) Type of Construction	:					
	(b) Year of Construction	:					
	(c) No. of Floors	:					
7.	Stamp Duty already paid, if any, on the document.	:					
	(a) Amount Rs.	:					
	(b) Date of stamping	:					
8.	Details of the person authorized (along with Power of Attorney)	:					
	(a) Name of person	:					
	(b) Mobile Number	:					
	(c) Email ID	:					

I hereby declare that the above information is true and correct to the best of my knowledge and belief. I have enclosed the self-attested proofs in support of the above declared details.

I further declare that, I shall abide by the conditions specified in the Government of Maharashtra, Revenue and Forests Department Order No. Mudrank-2022/C.R.No.78/M-1(Policy) dated the 1st April 2022.

Your faithfully,

Name of applicant
(signature)

Date :

Place:

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHRIDHAR DUBE PATIL,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक ४०] सोमवार, मार्च २७, २०२३/चैत्र ६, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १०१

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, पहिला मजला, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ मार्च, २०२३.

अधिसूचना

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.

क्रमांक जमीन-२०२२/प्र.क्र.१७०/ज-१.— महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ महा. अधि. ४१) च्या कलम २९अ आणि कलम ३२८, अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून "महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे) नियम,२०१९" यामध्ये सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने खालील नियम करण्याचे योजिले आहे. उक्त संहितेच्या कलम ३२९ च्या, पोट-कलम(१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, सदर नियम पूर्व प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत.—

१. या नियमांना, "महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे) (सुधारणा) नियम,२०२३" असे म्हणावे.

२. "महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे) नियम,२०१९ (ज्यांचा यापुढे "प्रमुख नियम" म्हणून उल्लेख केलेला आहे.) च्या नियम ३ मध्ये खालील सुधारणा करण्यात येत आहे,—

(१) उप-नियम (१) मधील "भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या" या मजकुराऐवजी "भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीच्या प्रदानानंतर, त्या जमिनीचा मूळ मंजूर प्रयोजनार्थ प्रत्यक्ष वापर सुरू होऊन, ५ वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतरच त्या", हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(२) उप-नियम (४) मध्ये,—

(१) तक्त्यापूर्वी खालील परंतुक समाविष्ट करण्यात येत आहेत :—

"परंतु, भोगवटादार वर्ग-२ अथवा भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीचे रूपांतरण करण्यासाठीच्या अधिमूल्याची रक्कम रू. १ कोटीपेक्षा अधिक येत असेल, अशा प्रकरणी राज्य शासनाची

पूर्वमान्यता (जमीन प्रदान केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था वगळून) घेतल्या खेरीज, जिल्हाधिकारी, अशा जमिनींचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरणाचे कोणतेही आदेश पारीत करू शकणार नाहीत."

"परंतु आणखी असे की, भोगवटादार वर्ग-२ अथवा भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या शासकीय जमिनींच्या, अशा विवक्षित प्रकरणी मूळ मंजूर प्रयोजनासाठीचा प्रत्यक्ष वापर सुरू केल्याच्या दिनांकापासून ५ वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्याखेरीज, जिल्हाधिकारी, अशा जमिनींचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरणाचे कोणतेही आदेश पारीत करू शकणार नाहीत."

(२) तक्त्यामध्ये—

(अ) परिच्छेद (अ)—

(१) रकाना क्रमांक (३) येथील शीर्षकामध्ये **'तीन वर्ष '** या मजकुराऐवजी **'पाच वर्ष '** हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(२) रकाना क्रमांक (४) येथील शीर्षकामध्ये **'तीन वर्ष'** या मजकुराऐवजी **'पाच वर्ष'** हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ब) परिच्छेद (ब)—

(१) रकाना क्रमांक (३) येथील शीर्षकामध्ये **'तीन वर्ष'** या मजकुराऐवजी **'पाच वर्ष'** हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(२) रकाना क्रमांक (४) येथील शीर्षकामध्ये **'तीन वर्ष'** या मजकुराऐवजी **'पाच वर्ष'** हा मजकूर दाखल करण्यात येईल.

३. उक्त प्रमुख नियमांमधील अधिमूल्याची रक्कम समायोजित करण्याबाबतचा नियम ४ हा वगळण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सुनिल कोठेकर,
शासनाचे उप सचिव.

REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 27th March, 2023.

NOTIFICATION

MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No. Jamin-2021/C.R.170/J-1.— In exercise of the powers conferred by sections 29A and 328 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, hereby makes the following rules to amend the Maharashtra Land Revenue (Conversion of Occupancy Class-II and Leasehold lands into Occupancy Class-I lands) Rules, 2019, the same having been previously published as required by sub-section (*1*) of section 329 of the said Code, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Land Revenue (Conversion of Occupancy Class-II and Leasehold lands into Occupancy Class-I lands) (Amendment) Rules, 2023.

2. In rule 3 of the Maharashtra Land Revenue (Conversion of Occupancy Class-II and Leasehold lands into Occupancy Class-I lands) Rules, 2019 (hereinafter referred to as "the principal Rules"),—

(1) in sub-rule (*1*) for the words "leasehold basis" the words "leasehold basis, after lapse of the period of five years from the date of commencement of actual use of land for which the land was granted originally," shall be substituted;

(2) to sub-rule (*4*),—

(I) before the Table, the following provisos shall be inserted, namely :—

"Provided that, the Collector shall not pass any order to convert the Occupancy Class-II land or leasehold land into Occupancy Class-I land in cases, where the premium for such conversion exceeds rupees one crore unless prior approval of the State Government (except the land granted to Co-operative Housing Society), is obtained:

Provided further that, the Collector shall not pass any order to convert the Occupancy Class-II land or leasehold land into Occupancy Class-I land only in such cases where the period of five years from the date of commencement of actual use of land for which the land was granted originally has lapsed.";

(II) in the Table,—

(a) in paragraph (A),—

(i) in column (3), in the heading, for the words "three years" the words "five years" shall be substituted;

(ii) in column (4), in the heading, for the words "three years" the words "five years" shall be substituted;

(b) in paragraph (B),—

(i) in column (3), in the heading, for the words "three years" the words "five years" shall be substituted;

(ii) in column (4), in the heading, for the words "three years" the words "five years" shall be substituted.

3. Rule 4 of the principal Rules relating to adjustment of premium shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SUNIL KOTHEKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक १०६] मंगळवार, ऑगस्ट ८, २०२३/श्रावण १७, शके १९४५ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २८३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग

मंत्रालय, १ ला मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ ऑगस्ट, २०२३.

अधिसूचना

महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७.

क्रमांक एकत्रि-२०२१/प्र.क्र.७४/ल-१.—महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम (१९४७ चा ६२) याच्या कलम ५ च्या पोट-कलम (३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या आधीच्या सर्व अधिसूचनांमध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा यांच्या नगरपालिका हद्दींमध्ये समाविष्ट असलेली क्षेत्रे वगळता, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्थानिक क्षेत्रामधील किंवा क्षेत्रांमधील, उक्त अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीच्या वर्गासाठी उक्त कलम ५ च्या पोट-कलम (१) अन्वये महाराष्ट्र शासनाने जे निर्धारित केलेले आहे अशा, उक्त अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रमाणभूत क्षेत्राची जाहीर नोटीस देत आहे.

अनुसूची

अ.क्र. (१)	स्थानिक क्षेत्र किंवा क्षेत्रे (२)	जमिनीचा वर्ग (३)	किमान प्रमाणभूत क्षेत्र (४)
१	नाशिक जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
२	अहमदनगर जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

अ.क्र. (१)	स्थानिक क्षेत्र किंवा क्षेत्रे (२)	जमिनीचा वर्ग (३)	किमान प्रमाणभूत क्षेत्र (४)
३	धुळे जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
४	नंदुरबार जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
५	जळगांव जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
६	पुणे जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
७	सातारा जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
८	सांगली जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
९	सोलापूर जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
१०	कोल्हापूर जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
११	औरंगाबाद जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
१२	जालना जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
१३	बीड जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
१४	परभणी जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
१५	हिंगोली जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
१६	नांदेड जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
१७	लातूर जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
१८	उस्मानाबाद जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
१९.	नागपूर जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

अ.क्र. (१)	स्थानिक क्षेत्र किंवा क्षेत्रे (२)	जमिनीचा वर्ग (३)	किमान प्रमाणभूत क्षेत्र (४)
२०	चंद्रपूर जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
२१	वर्धा जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
२२	भंडारा जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
२३	गोंदिया जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
२४	गडचिरोली जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
२५	अमरावती जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
२६	बुलढाणा जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
२७	वाशिम जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
२८	यवतमाळ जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत	२० आर
		बागायत	१० आर
२९	ठाणे जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत/वरकस	२० आर
		बागायत	१० आर
३०	पालघर जिल्हयातील सर्व तालुके	जिरायत/वरकस	२० आर
		बागायत	१० आर
३१	रत्नागिरी जिल्हयातील सर्व तालुके	वरकस	२० आर
		बागायत	१० आर
३२	सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्व तालुके	वरकस	२० आर
		बागायत	१० आर

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

संजय बनकर,
शासनाचे सह सचिव.

भाग चार-ब-२८३—२

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, 1st Floor, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 8th August, 2023.

NOTIFICATION

MAHARASHTRA PREVENTION OF FRAGMENTATION AND CONSOLIDATION OF HOLDINGS ACT, 1947.

No. Ektri-2021/C.R.74/L-1.—In exercise of the powers conferred by sub-section (*3*) of section 5 of the Maharashtra Prevention of Fragmentation and Consolidation of Holdings Act (LXII of 1947), and in partial modification of all earlier notifications issued in this behalf, the Government of Maharashtra hereby gives public notice of the standard areas specified in column (4) of the Schedule appended hereto, which the Government of Maharashtra has determined under sub-section (*1*) of the said section 5 for the class of land specified in column (3) thereof in the local area or areas specified in column (2) of the said schedule, excluding the areas comprised in the municipal limits of all the Municipal Corporations and Municipal Councils.

Schedule

Sr. No. (1)	Local Area or Areas (2)	Class of Land (3)	Standard Minimum Area (4)
1	All talukas of Nashik District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
2	All talukas of Ahmadnagar District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
3	All talukas of Dhule District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
4	All talukas of Nandurbar District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
5	All talukas of Jalgaon District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
6	All talukas of Pune District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
7	All talukas of Satara District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
8	All talukas of Sangli District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
9	All talukas of Solapur District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
10	All talukas of Kolhapur District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
11	All talukas of Aurangabad District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
12	All talukas of Jalna District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

Sr. No. (1)	Local Area or Areas (2)	Class of Land (3)	Standard Minimum Area (4)
13	All talukas of Beed District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
14	All talukas of Parbhani District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
15	All talukas of Hingoli District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
16	All talukas of Nanded District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
17	All talukas of Latur District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
18	All talukas of Osmanabad District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
19	All talukas of Nagpur District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
20	All talukas of Chandrapur District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
21	All talukas of Wardha District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
22	All talukas of Bhandara District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
23	All talukas of Gondia District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
24	All talukas of Gadchiroli District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
25	All talukas of Amravati District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
26	All talukas of Buldhana District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
27	All talukas of Washim District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
28	All talukas of Yeotmal District	Jirayat	20 R
		Bagayat	10 R
29	All talukas of Thane District	Jirayat/ Warkas	20 R
		Bagayat	10 R

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

Sr. No. (1)	Local Area or Areas (2)	Class of Land (3)	Standard Minimum Area (4)
30	All talukas of Palghar District	Jirayat/ Warkas	20 R
		Bagayat	10 R
31	All talukas of Ratnagiri District	Warkas	20 R
		Bagayat	10 R
32	All talukas of Sindhudurg District	Warkas	20 R
		Bagayat	10 R

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY BANKAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-अ

वर्ष १०, अंक ६] गुरुवार, जानेवारी ११, २०२४/पौष २१, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक ६

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ जानेवारी २०२४.

अधिसूचना

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक एलक्यूएन-२०२२/प्र.क्र.८२/अ-२.— भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम १०९ च्या पोट-कलम (१) आणि (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, "भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४" यामध्ये सुधारणा करण्याचे महाराष्ट्र शासनाने योजिले आहे. त्या नियमांचा पुढील मसुदा उक्त अधिनियमाच्या कलम-११२ द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आले आहेत :—

१. या नियमांना, "भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) (सुधारणा) नियम, २०२३" असे म्हणावे.

२. "भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४" च्या नियम-१८ मध्ये—

(१) उप-नियम (३) ऐवजी पुढीलप्रमाणे उप-नियम दाखल करण्यात येईल :—

"(३) द्यावयाची भरपाईची रक्कम ही, दहा कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल व शंभर कोटी रुपयांपेक्षा कमी असेल, तर जिल्हाधिकारी, संबंधित महसुली विभागाच्या विभागीय आयुक्तांची पूर्वमान्यता घेईल आणि त्यानंतरच निवाडा घोषित करील.";

(२) उप-नियम (३), च्या नंतर पुढील उप-नियम दाखल करण्यात येईल :—

"(३ क) द्यावयाची भरपाईची रक्कम ही, शंभर कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल, तर जिल्हाधिकारी, संबंधित महसुली विभागाच्या विभागीय आयुक्तांमार्फत प्रारूप निवाडा पूर्व मान्यतेस्तव राज्य शासनास सादर करील आणि राज्य शासनाची पूर्वमान्यता प्राप्त झाल्यानंतरच जिल्हाधिकारी निवाडा घोषित करील.";

३. उक्त नियमांमधील उप-नियम (४) वगळण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सुनिल कोठेकर,
शासनाचे उप सचिव.

REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated 11th January 2024.

NOTIFICATION

RIGHT TO FAIR COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION, REHABILITATION AND RESETTLEMENT ACT, 2013.

No. LQN-2022/C.R.82/A-2.— In exercise of the powers conferred by sub-section (*1*) and (2) of section 109 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013) in its application to the State of Maharashtra and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) Rules, 2014, the same having been previously published as required by section 112 of the said Act, namely :—

1. These rules may be called the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) (Amendment) Rules, 2023.

2. In rule 18 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) Rules, 2014,—

(1) for sub-rule *(3)*, the following sub-rule shall be substituted namely :—

"(3) If an amount of compensation to be paid is more than rupees ten crore and less than rupees one hundred crores, then the Collector shall get the previous approval of the Divisional Commissioner of the concerned revenue division and then only declare the Award.";

(2) after sub-rule *(3)*, the following sub-rule shall be added. namely :—

" (3A) If an amount of compensation to be paid is more than rupees one hundred crores, then the Collector shall submit the Draft Award for previous approval of the State Government through Divisional Commissioner of the concerned revenue division, and only after the previous approval of the State Government, the Collector shall declare the Award.";

(3) sub-rule *(4)* shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SUNIL KOTHEKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHBIL /2009/35530

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष १०, अंक ३(२)] शुक्रवार, जानेवारी १९, २०२४/पौष २९, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ७

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.- महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. . . पृष्ठे १-३

दिनांक १८ जानेवारी २०२४ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सतिश वाघोले,

सचिव (विधि विधान),

महाराष्ट्र शासन,

विधि व न्याय विभाग.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **" महाराष्ट्र शासन राजपत्रात "** दिनांक १९ जानेवारी २०२४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

१९६१ चा महा. २७.

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१, यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

१. या अधिनियमास, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २८-१अअ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे), याच्या कलम २८-१अअ मधील,— १९६१ चा महा. २७.

(१) पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (३-१अ) या कलमात व कलम २९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) जर एखाद्या व्यक्तीने, औद्योगिक उपक्रमास पट्ट्याने दिलेल्या जमिनी, वर्ग-एक भोगवट्याच्या जमिनी असतील तर, पोट-कलम (३) अन्वये अशा व्यक्तीस किंवा तिच्या कायदेशीर वारसांना, वर्ग-दोन भोगवट्यावर दिलेल्या जमिनी त्यासाठी कोणतेही अधिमूल्य न आकारता, वर्ग-एक भोगवट्यावर देण्यात आल्या असल्याचे मानण्यात येतील ;

(ब) जर एखाद्या व्यक्तीने, औद्योगिक उपक्रमास पट्ट्याने दिलेल्या जमिनी, वर्ग-दोन भोगवट्याच्या जमिनी असतील तर, पोट-कलम (३) अन्वये अशा व्यक्तीस किंवा तिच्या कायदेशीर वारसांना वर्ग-दोन भोगवट्यावर दिलेल्या जमिनी, जर अशा जमिनींना लागू असलेले संबंधित अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम यांमध्ये असे रूपांतरण करण्याची तरतूद असेल तर, उक्त अधिनियम व नियम यांच्या तरतुदींनुसार वर्ग-एक भोगवट्यामध्ये रूपांतरित करता येतील.";

(२) पोट-कलम (३अ) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल : —

" (३अ) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित याकडे निहित असलेल्या जमिनींची, याबाबत विशेष किंवा सर्वसाधारण आदेशाद्वारे, राज्य शासनाद्वारे निर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्तींवर, त्याने निश्चित केलेल्या दरांत, शासकीय किंवा निमशासकीय संस्थांना अथवा महानगरपालिकेला, नगरपरिषदेला, नगर पंचायतीला किंवा ग्राम पंचायतीला सार्वजनिक प्रयोजनासाठी देण्याकरिता विल्हेवाट करता येईल.

स्पष्टीकरण.—या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी " सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिनींची विल्हेवाट करणे " या शब्दप्रयोगाचा अर्थ,—

(अ) (एक) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम २ च्या खंड (२४) मध्ये व्याख्या केलेल्या परिषदेच्या किंवा नगर पंचायतीच्या नगरपालिका क्षेत्रापासून ; १९६५ चा महा. ४०.

(दोन) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (२) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या बृहत नागरी क्षेत्रापासून ; किंवा १९४९ चा ५९.

(तीन) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम २ च्या खंड (१०) मध्ये व्याख्या केलेल्या गावठाणाच्या किंवा गावाच्या स्थळाच्या हद्दीपासून, १९६६ चा महा. ४१.

पाच किलोमीटरच्या परिसरात स्थित असलेल्या शैक्षणिक, वैद्यकीय, सार्वजनिक आरोग्य, समाजकल्याण किंवा सांस्कृतिक प्रयोजनांसाठी ; किंवा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम २२ खालील विकास योजनेत नमूद केलेल्या इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी ; किंवा भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ याच्या कलम २ च्या पोट-कलम (१) मध्ये समाविष्ट असलेल्या अन्य कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनांसाठी ; आणि १९६६ चा महा. ३७. २०१३ चा १३.

(ब) या प्रयोजनासाठी शासनाने अधिसूचित केलेल्या सार्वजनिक प्रकल्पातील प्रकल्पबाधित व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी,

जमिनीची विल्हेवाट लावणे, असा आहे.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २९ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम २९ मधील, पोट-कलम (३) मध्ये,—

(एक) पहिल्या परंतुकामधील, " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट करील अशी रक्कम " या मजकुराऐवजी, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

" महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेच्या वास्तव बाजारमूल्याचे निर्धारण) नियम, १९९५ याच्या तरतुदींन्वये प्रसिद्ध केलेल्या प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रानुसार निर्धारित केलेल्या अशा जमिनीच्या बाजार मूल्याच्या पंचाहत्तर टक्के इतकी रक्कम ";

(दोन) दुसरे परंतुक वगळण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ मध्ये नवीन कलम २९अ समाविष्ट करणे.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम २९ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

कलम २७ अन्वये दिलेल्या जमिनीच्या भोगवट्याचे रूपांतरण.

" २९अ. कलम २९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हाधिकारी, कलम २७ अन्वये वर्ग-दोन भोगवट्यावर दिलेल्या जमिनींचे,—

(एक) अशी जमीन दिल्याच्या तारखेपासून दहा वर्षे उलटल्यानंतर ; आणि

(दोन) जर अशी जमीन देण्याच्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तींचे उल्लंघन केलेले नसेल तर ; किंवा जर अशा शर्तींपैकी कोणत्याही शर्तींचे उल्लंघन केलेले असेल तर, असे उल्लंघन नियमाधीन केल्यानंतर,

विहित करण्यात येईल अशा रूपांतरण अधिमूल्याचे प्रदान केल्यावर आणि अशा कार्यपद्धतीचे अनुपालन केल्यानंतर आणि अशा इतर अटी व शर्तींना अधीन राहून, वर्ग-एक भोगवट्यामध्ये रूपांतरण करू शकेल.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याचे कलम ४०अ वगळणे.

५. मुख्य अधिनियमाचे कलम ४०अ वगळण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ४६ ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ४६ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (इ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (इ-१) कलम २९अ अन्वये वर्ग-दोन भोगवट्याच्या जमिनींचे, वर्ग-एक भोगवट्यामध्ये रुपांतरण करण्याचे रूपांतरण अधिमूल्य, त्याची कार्यपद्धती आणि त्याच्या इतर अटी व शर्ती ;".

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

७. (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप उद्‌भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHENG / 2009 / 35528

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग आठ

वर्ष १०, अंक ४(२)] शुक्रवार, जानेवारी १९, २०२४/पौष २९, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ८

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause *(3)* of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) (Amendment) Act, 2023 (Mah. Act No. VI of 2024), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH WAGHOLE,
Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

MAHARASHTRA ACT No. VI OF 2024.

(First published, after having received the assent of the Governor in the " Maharashtra Government Gazette", on the 19th January 2024).

An Act further to amend the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) Act, 1961.

Mah. XXVII of 1961.

